3962
म. ग्रं. सं. ठाणे.
निबंध

धुनिक
राठी वाङ्मयातील

# स्त्रियांची आत्मचरित्रे:

## एक अभ्यास

डॉ. विमल भालेराव



REFBK-0025126

अपभ्रंश निबंध
३१८२
३५५२६
९८।१९०।८६

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचनाः—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५[८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

९२।९९।८६

3 DEC 1986
17 DEC 1986
2 APR 1987
2 APR 1987
2 APR 1987

13 MAY 1987
4 JAN 1988
1 MAY 1988
18 MAY 1988
8 JUN 1988
31 AUG 1988
7 DEC 1988
15 MAR 1989
23 DEC 1995

(क्र. मा. पहा)
५०००-३-८४

# आधुनिक मराठी वाङ्मयातील स्त्रियांची आत्मचरित्रे : एक अभ्यास

(१९१०-१९७५)

डॉ. विमल भालेराव

REFBK-0025126

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३९८२
दा. क्र. ८५५१२६
ग्रंथ २८।१०।८६
शाखा (.... ....)

साहित्य प्रसार केन्द्र
सीताबर्डी, नागपूर

प्रकाशक :
भा. ल. कुलकर्णी
साहित्य प्रसार केंद्र
सीताबर्डी, नागपूर १२

© डॉ. विमल भालेराव

प्रकाशन दिनांक :
२५ मार्च १९८६

मुद्रक :
दि. भि. धाक्रस
नाग मुद्रणालय
रुईकर पथ, नागपूर २

मूल्य : रु. ६५ /-

या पुस्तकाच्या प्रकाशनासाठी विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली; याच्या योजनेच्या अंतर्गत नागपूर विद्यापीठाकडून आंशिक आर्थिक साह्य मिळाले. यासाठी अनुदान आयोगाचे व नागपूर विद्यापीठाचे आम्ही आभारी आहोत.

जिवातळी जीव आंथरणाऱ्या सख्यत्वास

# स्वागत

डॉ. विमल भालेराव यांनी १९१० ते १९७५ या कालखंडातील ‘ आधुनिक मराठी वाङमयातील स्त्रियांची आत्मचरित्रे ’ या विषयावर लिहिलेला हा ग्रंथ अनेक दृष्टींनी वैशिष्ट्यपूर्ण आहे. या शतकाच्या उत्तरार्धात मराठी साहित्यात ‘ आत्मचरित्र ’ हा वाङमयप्रकार विशेष लोकप्रिय झाला आहे. सामान्यांची आणि असामान्यांची आत्मचरित्रे भराभर बाहेर पडत आहेत आणि या वाङमयप्रकाराला आज मराठी साहित्यात महत्त्वाचे स्थान मिळत आहे. आत्मचरित्रांच्या स्वरूपाची चर्चा करणारे आणि त्यांचा परामर्श घेणारे ग्रंथही बाहेर पडत आहेत. आपल्या जीवनातील बऱ्यावाईट आठवणी आपण सांगाव्यात, त्या सांगताना आपल्या जीवनप्रवासाकडे मागे वळून पाहावे आणि आपण जीवनात काय कमावले आणि काय गमावले याचा शोध घेण्याचा प्रयत्न करावा, ही आत्मचरित्रलेखनामागील महत्त्वाची प्रेरणा आहे। ही प्रेरणा तशी आकर्षक वाटते, विलोभनीयही वाटते आणि त्यामुळे सामान्यांपासून असामान्यांपर्यंत अनेक जण या वाङमयप्रकाराकडे आकृष्ट होतात. पण प्रत्यक्ष आत्मचरित्र लिहावयास सुरूवात केली म्हणजे हा प्रकार वाटतो तितका सोपा नाही हे त्यांच्या व त्यांच्या नसले तरी वाचकांच्या लक्षात येते. आत्मचरित्र लिहिणाऱ्याला कठोर आत्मपरीक्षण करावे लागते, तटस्थपणे स्वत:चा शोध घ्यावा लागतो व तो घेताना स्वत:च्या मर्यादा व स्वत:च्या ठिकाणी असणारे गुणदोष प्रामाणिकपणे समजून घ्यावे लागतात. स्वत:चे असे कठोर आत्मपरीक्षण सर्वांनाच साधते असे नाही. त्यामुळे पुष्कळशी आत्मचरित्रे आत्मगौरवाच्या तरी पातळीवर जातात, आत्मसमर्थनाची तरी भूमिका घेतात किंवा जीवनातील सुख-दु:खाच्या रुक्ष तपशिलात तरी रमतात. पुष्कळदा आत्मचरित्रकाराचे जे कार्यक्षेत्र असते त्या कार्यक्षेत्राच्या तपशिलातच तो गुंतून पडतो आणि व्यक्ती या नात्याने त्याची वाचकांना ओळख पटत नाही. आपणाला हव्या असलेल्या आणि आपले व्यक्तित्व उजळून टाकणाऱ्या घटनाच फक्त निवडून आपल्या प्रमादांकडे तो सोयीस्करपणे डोळेझाक करतो. त्यामुळे लेखकाचे यथार्थ दर्शन घडविणारे, आपल्या गुणदोषांसकट स्वत:चे चित्र तटस्थपणे रेखाटणारे आत्मचरित्र दुर्मिळच

असते. आत्मचरित्र हा लेखकाने स्वत:चा घेतलेला शोध असतो. तो शोध तटस्थ वृत्तीने घ्यावा लागतो, तो घेताना सत्याचा अपलाप होणार नाही ही पण काळजी घ्यावी लागते. हे सर्व फार थोड्यांना जमते. म्हणून हा वाङमयप्रकार जितका सोपा वाटतो तितकाच तो अवघडही आहे. शिवाय इतर वाङमयप्रकारांपेक्षा त्याचे वैशिष्टय असे की आत्मचरित्र फक्त एकदाच लिहिले जाते. त्यात कलात्मकता असली तरी स्वैर कल्पनाविलासाला वाव नसतो. काही आत्मचरित्रे त्यांमधील स्वैर कल्पनाविलासामुळे कादंबरीच्या पातळीवर जातात. असे अनेक धोके लक्षात घेऊन लिहिली गेलेली आदर्श आत्मचरित्रे मराठीत किती आहेत याचा खरोखर शोधच घ्यावयास हवा. असे अत्यंत अवघड आव्हान डॉ. विमल भालेराव यांनी स्वीकारले आहे. मात्र त्यांनी हा शोध स्त्रियांच्या आत्मचरित्रांपुरताच मर्यादित केला आहे.

स्त्रिया या अधिक प्रामाणिक असतात. मनमोकळेपणाने आपल्या भावभावनांची व सुखदु:खांची चित्रे आत्मचरित्रात त्या उत्कटपणे रंगवू शकतात. आत्मगौरवाच्या आहारी न जाता आपणाकडे त्या अधिक अलिप्तपणे पाहू शकतात. त्यामुळे पुरुषांच्या आत्मचरित्रांत जी आत्मगौरवाची व आत्मसमर्थनाची भूमिका येते ती स्त्रियांच्या आत्मचरित्रांत तितक्या प्रमाणात येत नाही. स्त्रियांच्या आत्मचरित्रांचे आगळेपण त्यांच्या मुक्त आविष्कारात असते.

या अभ्यासाच्या निमित्ताने डॉ. भालेराव यांनी केलेला आत्मचरित्राच्या तंत्राचा विचार अतिशय अभ्यासपूर्ण आहे. त्या अनुषंगाने आत्मचरित्र कुणी लिहावे, केव्हा लिहावे यासंबंधी विविध आत्मचरित्रकारांनी व्यक्त केलेली मते सांगून त्यांतून त्यांनी काढलेले निष्कर्ष खूपच बोलके आहेत. सहाव्या सातव्या शतकातील ओवी, गाणी, म्हणी यांचा मागोवा घेत स्त्री–आत्मचरित्रांची पाळेमुळे त्या तेथे नेऊन भिडवतात. आत्मचरित्र–लेखिकांच्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडविणे हा या ग्रंथाचा केंद्रबिंदू. आत्मचरित्रात लेखक वा लेखिका स्वत:चा शोध घेण्याचा प्रयत्न करीत असतात. त्यामुळे त्यांचे आत्मचरित्रांत पडणारे प्रतिबिंब हे विविधरंगी असते. स्त्रीच्या आत्मचरित्रांतून तर तिच्या व्यक्तिमत्त्वाचे खूपच वेगळे रंग प्रकट होत असतात. या सगळ्यांचा लेखिकेने रसिकतेने कानोसा घेतला आहे. या आत्मचरित्रांतील, काळाच्या दृष्टीने विचार केल्यास १९१० ते १९७५ या कालखंडात महाराष्ट्रात व भारतात धार्मिक, सामाजिक व राजकीय परिवर्तने खूप झाली. पुरुषांनी लिहिलेल्या आत्मचरित्रांतून या परिवर्तनाचे अनेक अंगांनी दर्शन घडते. कारण त्यांचे अनुभवक्षेत्र व्यापक होते आणि आत्मचरित्र लिहिणाऱ्या बहुतेक व्यक्तींचा या परिवर्तनाशी काही ना काही संबंध होता. बहुतेकांनी सामाजिक, राजकीय वा शैक्षणिक क्षेत्रांत काही विशेष कार्य केलेले असल्याने त्यांच्या आत्म

चरित्रांना एक वेगळे परिमाण लाभले होते. स्त्रियांच्या आत्मचरित्रांचे तसे नाही. सुरुवातीच्या काळात त्यांचा जीवनानुभव घराच्या चार भिंतींपुरताच मर्यादित होता. स्वातंत्र्योत्तर काळात स्त्रिया वेगवेगळ्या क्षेत्रांत चमकू लागल्या व त्यांच्या अनुभवाचे क्षेत्रही व्यापक बनले. या सर्वांचा अतिशय मर्मग्राही परामर्श येथे घेतला आहे. अक्षर वाङ्मयाच्या दृष्टिकोनातूनही आत्मचरित्र या वाङ्मयप्रकाराचे मूल्यमापन करण्याचा त्या प्रयत्न करतात. त्या दृष्टीने लक्ष्मीबाई टिळक यांची 'स्मृतिचित्रे,' सत्यभामाबाई सुखात्मे यांचे 'गेले ते दिवस,' आनंदीबाई शिर्क्यांचे 'सांजवात' आणि हंसा वाडकर यांचे 'सांगते ऐका' ही आत्मचरित्रे त्यांना लक्षणीय वाटतात. यांत अभिरुचीप्रमाणे आणखी काही नावांची भर पडावी.

१९१० ते १९७५ या कालखंडातील स्त्रियांनी लिहिलेल्या आत्मचरित्रांचा शोध डॉ. विमल भालेराव यांनी साक्षेपाने आणि समर्थपणे घेतला आहे हे हा ग्रंथ वाचताना सहजच जाणवते. आत्मचरित्र हा वाङ्मयप्रकार गेल्या वीस वर्षांत खूपच लोकप्रिय झाला आहे. या प्रकाराला नवे धुमारे फुटले आहेत. 'बलुतं,' 'उपरा,' 'रामनगरी,' 'क्लोरोफॉर्म'–इत्यादी पुरुषलेखकांनी लिहिलेल्या आत्मचरित्रांतून नव्या अनुभूती आणि नव्या जाणिवा प्रगट होत आहेत. कलाक्षेत्रात लोकप्रियता मिळविलेल्या आणि त्या क्षेत्राला वाहून घेतलेल्या कलावंतांची आत्मचरित्रे नवे विश्व आपणापुढे उभे करीत आहेत. आत्मचरित्रांची संकल्पनासुद्धा आज नवे रूप धारण करीत आहे.

त्या दृष्टीने डॉ. विमल भालेराव यांनी स्त्रियांनी लिहिलेल्या आत्मचरित्रांचा शोध घेऊन या क्षेत्रात महत्त्वाचे पाऊल टाकले आहे. त्यांनी आता येथेच थांबू नये, हा शोध असाच पुढे चालू ठेवावा अशी इच्छा कुणीही रसिक हा ग्रंथ वाचल्यावर प्रगट करील. या इच्छेला त्यांनी मान द्यावा, आम्ही त्यांच्या पुढील शोधाची वाट पाहात आहोत.

असा अभ्यासपूर्ण ग्रंथ लिहिल्याबद्दल विमल भालेराव यांचे मनःपूर्वक अभिनंदन.

पुणे

म. ना. अदवंत

# मनोगत

१९१० ते १९७५ या काळातील स्त्री-आत्मचरित्रांचा एका विशिष्ट दिशेने केलेला हा अभ्यास. स्त्री-वाङ्मयाचा उगम सहाव्या सातव्या शतकात ओवी, म्हणी, उखाणे यांसारख्या रूपात दिसत असला तरी पहिले स्त्री-आत्मचरित्र विसाव्या शतकाच्या आरंभी लिहिले गेले. स्त्रियांची आत्मचरित्रे पुरुषांच्या आत्म-चरित्रांच्या तुलनेत संख्येनेही कमी आढळतात. स्त्री-आत्मचरित्रे उशिरा लिहिली जाण्याचे व कमी असण्याचे कारण स्त्रियांच्या वाटयाला आलेली परिस्थिती होय. आपले मन दुसऱ्यांजवळ मोकळे करण्याची तिला मुभा नव्हती. आतल्या आत कुढणे व कुढत कुढत एक दिवस संपून जाणे हेच तिचे जीवन होते. अशी स्त्री स्वत:चे जीवन शब्दबद्ध करून लोकांसमोर येणे अशक्यच होते. परंतु इंग्रजी राजवटीने या स्त्रीचा कायापालट केला. तिची मन:क्रांती घडवून आणली. तिला चालते, बोलते आणि लिहिते केले.

प्रस्तुत काळात स्त्रियांची फक्त पस्तीस आत्मचरित्रे प्रकाशित झाली असली तरी त्यांत विविधता आहे. घरगुती स्त्री व इतर क्षेत्रांतील स्त्री या ठळक दोन गटांतून-पत्नी, माता, गृहिणी, समाजसेवक, कलाकार व साहित्यिक अशी स्त्रीत्वाची विभिन्न रूपे त्या काळासह आत्मचरित्रांतून पाहायला मिळतात. स्त्रीने काढलेली पतिचित्रे, पतीचा पत्नीकडे पाहण्याचा दृष्टिकोण, लेखनात साधलेले सत्यकथन, तटस्थता, 'स्व'ला केंद्रस्थान, घटनांची निवड व कुशल मांडणी, वस्तु-निष्ठ निवेदन, सामान्य ज्ञान, वाङ्मयीन दृष्टीने साधेपणा, सरलता, प्रासादिकता, उत्कटता आणि अल्पाक्षरता, ही स्त्री-लेखनाची कलामूल्ये, कलात्मक व अक्षर कलाकृती, साम्यवादी व गांधीवादी जीवनदृष्टी, आत्मचरित्रांतून घडणारा साहित्य-विषयक परिचय, व्यवहारी अपूर्णांकांतील पत्रे या वैशिष्टयांमुळे ही आत्मचरित्रे मराठी साहित्यास भूषणभूत होऊन बसली आहेत. अशा वैशिष्टयपूर्ण स्त्री-आत्म-चरित्रांच्या अभ्यासासाठी आत्मचरित्र : एक वाङ्मयप्रकार, स्त्री-आत्मचरित्रांची परंपरा, आत्मचरित्रांतील स्त्री-दर्शन, आत्मचरित्रांतून घडणारे तत्कालीन सामाजिक, धार्मिक व राजकीय परिस्थितीचे दर्शन, स्त्री-आत्मचरित्रांची वैशिष्टये

अशी या ग्रंथाची आखणी आहे. विवेचनाच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या आत्म-चरित्रांतील (आधारभूत ग्रंथ) उताऱ्यांचे पृष्ठांक तेथेच कंसात नोंदवले आहेत. आत्मचरित्रलेखिकांनी व चरित्र–आत्मचरित्र या वाङमयप्रकाराच्या अभ्यासकांनी पाठवलेल्या प्रश्नावलीची उत्तरे परिशिष्टात समाविष्ट केली आहेत. संदर्भासाठी डॉ. व. रा. बोरगावकर व डॉ. दु. का. संत यांचे नंतरचे छापील प्रबंध न वापरता आधीचे अप्रकाशित प्रबंध वापरले आहेत.

हा प्रबंध माझे मार्गदर्शक प्रा. डॉ. वि. बा. प्रभुदेसाई, विभाग–प्रमुख स्नातकोत्तर मराठी विभाग, नागपूर विद्यापीठ, नागपूर यांच्याशिवाय पुस्तकरूपात येणे अशक्यच होते. या ऋणानुबंधाचे धागे उकलत नाहीत पण मन मात्र भरून येते. तसेच, नामवंत साहित्यिक प्रा. म. ना. अदवंत यांनी अल्पावधीत 'स्वागत'पर प्रस्तावना लिहून दिली याबद्दल मी त्यांची ऋणांकित आहे. डॉ. द. भि. कुलकर्णी, प्रपाठक, स्नातकोत्तर मराठी विभाग, नागपूर विद्यापीठ, नागपूर यांनी वेळोवेळी केलेल्या सूचनांबद्दलही मी कृतज्ञ आहे. 'प्रबंधप्रकाशनार्थ अर्थसाहाय्य' या योजने-खाली विद्यापीठ अनुदान आयोगाने साडेसात हजार रुपये अनुदान देऊन मला उपकृत केले. साहित्य प्रसार केंद्राच्या आदरणीय राजाभाऊ कुलकर्ण्यांनी प्रकाशना-साठी सहजपणे होकार दिला त्याबद्दल मी त्यांची मन:पूर्वक आभारी आहे.

विमल भालेराव

अ–३,
सुधीर कॉलनी,
विवेकानंद नगर,
अकोला / ४४४००१

ग्रंथालय ठाणे

# प्रकरण-नामावली


| | | |
|---|---|---|
| प्रकरण १ | आत्मचरित्र : एक वाङ्मयप्रकार | १–३२ |
| प्रकरण २ | स्त्री–आत्मचरित्रांची परंपरा | ३३–६१ |
| प्रकरण ३ | आत्मचरित्रांतील स्त्री–दर्शन | ६२–१६३ |
| प्रकरण ४ | आत्मचरित्रांतून घडणारे तत्कालीन सामाजिक, धार्मिक व राजकीय परिस्थितीचे दर्शन | १६४–१९८ |
| प्रकरण ५ | स्त्री–आत्मचरित्रांची वैशिष्टचे | १९९–२४३ |
| | उपसंहार | २४३–२५३ |
| | परिशिष्ट | २५४–२६७ |
| | संदर्भसूची | २६८–२७८ |


# संक्षेपसूची

आ. दु. – आवृत्ती दुसरी.
आ. ना. – आवृत्ती नाही
का. ना. – काळ नाही
प. आ. – पहिली आवृत्ती
प्र. ३. – प्रकरण तिसरे
भा. दु. – भाग दुसरा
म. सा. प. – महाराष्ट्र साहित्य पत्रिका
स्थ. ना. – स्थळ नाही.

३९८२ ग्रा. क्र. २५५१२६

# आत्मचरित्र : एक वाङ्मय–प्रकार

एखादा काळ विशिष्ट वाङमयप्रकाराने गजबजलेला असतो. या दृष्टीने सांप्रतच्या मराठी साहित्यातील कालखंडाला 'आत्मचरित्र–युग' म्हणावेसे वाटते. सामान्य असामान्यांची आत्मचरित्रे भराभर बाहेर पडत आहेत. ती मराठी वाङमयात महत्त्वपूर्ण स्थान मिळवत आहेत.

एखादा अपवाद सोडल्यास माणसाचा स्वतःवर अतिशय लोभ असतो. त्यामूळे मृत्यूनंतरही जगात आपली स्मृती टिकवण्यास त्याची धडपड चाललेली असते. स्मृती जागती ठेवण्याच्या या प्रवृत्तीतूनच– 'मूर्तिकला,' 'मठ,' 'मंदिरे,' 'स्तंभ,' 'कबरस्थाने,' 'शिलालेख,' 'ताम्रपट' व 'छायाचित्रे' यांचा जन्म झाला असावा. या सर्वांच्या निर्मितिहेतूंकडे लक्ष पुरविल्यास ही आंशिक चरित्रे वाटतात. परंतु मानवी–बुद्धीने याच्यापुढे जाऊन स्वतःच स्वतःचे चरित्र लिहिले तर काय हरकत आहे ? असे झाल्यास ते चरित्र अधिक सत्यपूर्ण होईल. या विचारानुसार त्याने स्वतःचे चरित्र स्वतःच लिहिले असावे आणि त्यातूनच आत्मचरित्र या वाङमयप्रकाराचा जन्म झाला असावा.

आत्मचरित्र हा चरित्राचाच एक प्रकार होय. परंतु असे असले तरी त्यातील मूलभूत फरक असा की, चरित्रात एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीच्या जीवनाचा शोध घेत असते तर आत्मचरित्रात लेखक व चरित्रविषय दोन्ही एकच असतात.

**आत्मचरित्र या वाङ्मयप्रकाराची परंपरा**

इंग्रजी वाङमयाशी संबंध आल्यावर आत्मचरित्र हा वाङमयप्रकार आपल्याकडे खऱ्या अर्थाने रूढ झाला असे मराठीतील आत्मचरित्राच्या इतिहासावरून कळते. परंतु त्यापूर्वी आज आत्मचरित्र या नावाने ओळखला जाणारा वाङमयप्रकार किंवा आत्मचरित्र या वाङमयप्रकाराशी साधर्म्य दाखविणारे अथवा जवळिक साधणारे लिखाण मराठी वाङमयात झालेच नव्हते असे म्हणणे धाष्टर्याचे ठरेल. प्राचीन काळातील पुराण–वाङमयापासून आत्मकथनपद्धतीला महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले आढळते.

'श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनम्
अर्चनं वंदनं दास्यं सख्यमात्मनिवेदनम्'[1]

या नवविधा भक्तींपैकी 'आत्मनिवेदनम्' हा सर्वात श्रेष्ठ भक्तीचा प्रकार मानलेला आहे. पुराणकाळापासून आत्मकथनाला आलेले महत्त्व यावरून कळते. संत वाङमयातील नामदेव, जनाबाई, एकनाथ, तुकाराम व बहिणाबाई यांच्या अभंगांत आत्मचरित्रपर उल्लेख आलेले आहेत. परंतु ही जाणीवपूर्वक लिहिलेली आत्मचरित्रे नाहीत.

चरित्र व आत्मचरित्र या वाङमय-प्रकाराचे अभ्यासक प्रा. रा. कृ. लागू हे आत्मचरित्राच्या जन्मासंबंधी म्हणतात, "... आत्मचरित्राची प्रथा कोणी नवीनच सुरू केली असे नाही. वेदकालापासून तो आजतागायत तिला कधीच खंड पडलेला नाही ... 'तदैक्षत बहु स्यां प्रजायेय' या वाक्यातील लहानसा उद्गार म्हणजे त्या विश्वविनायक सत् तत्त्वाचे (ब्रह्माचे) आत्मचरित्र होय. भगवद्गीतेत सज्जनांचे संरक्षण आणि दुर्जनांचे निर्दालन करण्यासाठी मला वारंवार जन्म घ्यावा लागतो असे भगवान श्रीकृष्ण सांगतात. ते त्यांचे आत्मचरित्रच म्हटले तरी चालेल. याशिवाय अशा प्रकारचे अनेक आत्मचरित्रपर उद्गार भगवद्गीतेत सापडतील. ज्ञानेश्वरही आपल्या भावार्थदीपिकेत वेळोवेळी वाचकांना स्वतःच्या चरित्राची ओळख करून देतात."[2]

प्रा. लागू यांच्या वरील विवेचनावरून त्यांनी आत्मचरित्राचे क्षेत्र बरेच व्यापक केलेले दिसते. 'तदैक्षत बहु स्यां प्रजायेय' म्हणजे ब्रह्माचा 'आत्म-उद्गार' म्हणता येईल. याही पुढे जाऊन त्याला 'आत्मवृत्त' म्हणता येईल पण त्याला 'आत्मचरित्र' मात्र म्हणता येणार नाही.

भगवद्गीतेत भगवान श्रीकृष्ण आपले अवतारकार्य स्पष्ट करतात–

"यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत।
अभ्युत्थानमधर्मस्य तदाऽऽत्मानं सृजाम्यहम्"[3]
"परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम्
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे"[4]

---

[1] श्रीमद्भागवत, गोरखपूर, खंड पहिला, अ. ५, स्कंध. ७, श्लो. २३, पृ. ७९९

[2] रावबहादूर दादोबा पांडुरंग, संपा. अ. का. प्रियोळकर; मुंबई, १९४७, पृ. ७

[3] श्रीमद्भगवद्गीता, गोरखपूर, अ. ४, श्लो. ७ पृ. ८४

[4] तत्रैव, श्लो. ८

यासारखे श्रीकृष्णाचे अवतारकार्य स्पष्ट करणारे उल्लेख गीतेत अनेक ठिकाणी येतात. पण केवळ एवढ्या उल्लेखांवरून 'भगवद्‌गीता' हे भगवान श्रीकृष्णाचे आत्मचरित्र होऊ शकणार नाही. त्याला अधिक समर्पकपणे 'आत्मवृत्त' म्हणता येईल.

"भावार्थ-दीपिकेत ज्ञानेश्वर आपल्या चरित्राची ओळख करून देतात" हे प्रा. लागूंचे म्हणणे ग्राह्य वाटत नाही.

गीतार्थ सांगण्यास आशयाच्या आविष्कारासाठी सामर्थ्य लाभावे म्हणून ज्ञानदेव शारदेला नमन करतात.

"आता अभिनववाग्विलासिनी । जे चातुर्यकळाकामिनी ।
ते शारदा विश्वमोहिनी । नमिली मियां ।[5]

आपल्याला गीतार्थ मराठीत सांगायचा असल्याचे ज्ञानेश्वर जाहीर करतात—

"माझा मऱ्हाटाचि बोलु कवतिके"[6]

आपण हाती घेतलेले कार्य गुरूंमुळेच पूर्ण होणार अशी त्यांची गाढ श्रद्धा आहे. आपल्या गुरुकुळाविषयी, गुरूविषयी ते अतीव आत्मीयतेने बोलताना दिसतात—

गुरुकुळ "माहेषान्वयसंभूत"[7] असल्याचे सांगतात.

"अनादिगुरुशांकरा— । पासौनि शिष्य परंपरा ।[8] असा गुरुपरंपरेचा परिचय करून देतात. गुरूच्या संपर्काने आपण 'पूर्ण' झालो असे त्यांना वाटते.

"... तुझेया परिणती । मी पूर्णु जाला श्रीनिवृत्ती"[9]

गुरूच्या भरीव पाठबळामुळे—

"तेणे कारणे मी बोलैन । बोली अरूपाचे रूप दावीन"[10]

असे आत्मविश्वासाने सांगतात. श्रोत्यांना—

"... देया अवधान म्हणे हे माझी । विनवणी सलगी"[11]

अशी नम्र विनंती करतात.

शारदा–नमन, मराठी भाषा, गुरू आणि श्रोते यांच्या संदर्भात, गीतार्थग्रंथनाच्या निमित्ताने ज्ञानदेव–स्पष्टपणे–नि:संदिग्धपणे ज्ञानेश्वरीत दिसतात. पण स्वत:च्या लौकिक कुळासंबंधी, कौटुंबिक जीवनाविषयी–स्वत:च्या ऐहिकपार्थिव हकीकतींसंबंधी ज्ञानेश्वरीत कुठेही स्पष्टपणे त्यांचे बोल ऐकू येत नाहीत. आपल्याला माहीत असलेल्या ज्ञानेश्वरांच्या चरित्रावरून त्यांच्या जीवनातील प्रसंगांशी

[5] ज्ञानेश्वरी, सरकारी प्रत, आ. ति., मुंबई, १९६३, १.२१

[6] तत्रैव, ६.१४, [7] तत्रैव, १८.१७३७, [8] तत्रैव, १८.१७५८.

[9] तत्रैव, १.७६, [10] तत्रैव, ६.३६, [11] तत्रैव, ९.२

मिळते–जुळते प्रसंग ज्ञानेश्वरीत आलेले पाहून हे त्यांचेच जीवन त्यांनी रेखाटले आहे असे आपण म्हणतो. यावरून ते ज्ञानेश्वरांचे आत्मचरित्र होऊ शकणार नाही.

वरील विवेचनावरून 'ब्रह्याचा उद्‌गार,' 'भगवद्‌गीता,' 'ज्ञानेश्वरी' ही अनुक्रमे ब्रह्याचे, भगवान श्रीकृष्णाचे व ज्ञानेश्वरांची आत्मचरित्रे नाहीत तर त्यांना 'आत्मवृत्त' म्हणणे अधिक सयुक्तिक होईल असे वाटते. "प्रसंगविशेषी प्रकट झालेले त्रोटक आत्मपर उद्‌गार म्हणजे सुसंगत आत्मचरित्र नव्हे,"[12] हे समीक्षक गो. म. कुळकर्णी यांचे मतही वरील विधानाला पुष्टी देणारे आहे.

चरित्र व आत्मचरित्र या वाङ्मय–प्रकाराचे अभ्यासक डॉ. बोरगावकर यांच्या मते 'लीळाचरित्रा'चा 'एकांक' म्हणजे मराठीतील पहिले आत्मचरित्र होय. त्यासंबंधी त्यांचे विचार पुढीलप्रमाणे आहेत–

"चक्रधरांच्या पूर्वजीवनाविषयी शिष्यांनी चौकसबुद्धीने जे प्रश्न विचारले; ज्या शंका उपस्थित केल्या त्यांचे समाधान करण्याच्या हेतूने चक्रधरांनी स्वतःच्या पूर्वायुष्याची कहाणी सांगितलेली आहे ... चक्रधरांच्या आत्मकथनातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील कितीतरी गुणांवर प्रकाश पडतो. त्यांच्या तोंडची वाक्ये त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे एक जिवंत, प्रत्ययकारी दर्शन घडवितात. त्यात तत्कालीन समाजाचे चित्रण, ऐतिहासिक व्यक्तींचे उल्लेख आहेत ... विलासी जीवन, विरक्त साधकावस्था, सिद्ध पुरुषाचे भ्रमण, समाजातील सर्व स्तरांत मिसळून त्यांनी केलेला उपदेश इत्यादी अवस्थांचे चित्रण क्रमाक्रमाने घडून आलेले आहे हे या आत्मचरित्रात्मक लेखनाचे यश म्हणता येईल. इतर आत्मचरित्रांप्रमाणे चक्रधर आपल्या आत्मचरित्राचे लेखक नाहीत. चक्रधरांनी आठवणी सांगितल्या व म्हाइंभटाने लिहिल्या. असे असूनही त्यातील आत्मचरित्राचा भाव कायम राखण्यात म्हाइंभट यशस्वी झाले आहेत."[13]

शके ११९४ मध्ये चक्रधरांचे निर्वाण झाले. त्यांच्या चिरवियोगाचे दुःख विसरण्यासाठी त्यांच्या लीळा आठवीत बसणे हा एक उत्तम उपाय होता. यातूनच पुढे 'लीळाचरित्रा'ची निर्मिती झाली. चक्रधरांच्या लीळा प्रत्यक्ष म्हणा, ऐकीव म्हणा माहीत असणारी नागदेव, महदायिसा, साधे, आऊस व दादोस वगैरेंसारखी अनेक शिष्यमंडळी होती. या सर्वांनी आठवणी पुरविल्या व त्यांचा संग्रह म्हाइं-

---

[12] गो. म. कुळकर्णी, वाटा आणि वळणे, बेळगाव, १९७५, पृ. १४४

[13] व. रा. बोरगावकर, प्राचीन मराठी वाङ्मयातील चरित्रात्मक आणि आत्मचरित्रात्मक लेखनाचा समीक्षणात्मक अभ्यास, (अप्रकाशित प्रबंध) मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, १९६७, पृ. ५८५

भटाने केला. कारण म्हाइंभटाची आणि चक्रधरांची पहिली भेटच मुळी उत्तरार्धाचा काही काळ लोटल्यावर झाली. 'लीळा चरित्रा'चा उत्तरार्धच याची साक्ष देतो– "मग म्हाइंभटासी गोसावीयावरी 'हा ईश्वरू' : ऐसी प्रतीति आली : ईश्वरू म्हणौनि मग उठिलें : गोसावीयांसी दंडवतें घातली : श्रीचरणां लागले : मग वरिसा एका श्रीप्रभुचां ठाइं अनुसरलें : ॥" [14]

चक्रधरांची लीळा ज्याच्या अनुभवाची असेल ती त्याला विचारून आपल्या ग्रंथास प्रामाण्य आणण्याची पराकाष्ठा म्हाइंभटाने केली. याचे स्पष्टीकरण 'स्मृतिस्थळा'त मिळते– "मग माहींभटी भटोबासांपुढां अवघें सांगीतले : गोसावीयांचीया लीळा शोधूनि आणलीया : तिया संवादलीया : होये ते भटोबास मानिति : नव्हे तेथ म्हणति : 'हे श्रीमुखीचे शब्द नव्हेति : हे होति' : 'उपाध्याचिये अनुभवीचीया तिया उपाध्याते पुसावीया : नाथोचीये अनुभवीचीया तिया नाथोते पुसाविया : साधांचीये अनुभवीचीया तिया साधांते पुसावीया : ग्रैसायाचिपरी ज्याचीये अनुभवीचीया त्या त्यातेंचि पुसावीया' : यैसे भटोबासीं म्हाइंभटाते विहीले : मग माहींभटबासी तैसेंचि करुनि मागिलाचीपरी भटोबासांसी संवादिलीया : मग उत्तरार्ध–पूर्वार्ध : दोनि विभाग केले : " [15]

याप्रमाणे चक्रधरांच्या 'लीळा' त्यांच्या शिष्यगणाकडून गोळा केल्याने म्हाइंभटाने त्या कितीही पारखून घेतल्या असल्या तरी त्या पूर्णपणे सत्य आहेत असे मानता येत नाही. प्रेमापोटी, भक्तिभावापोटी हे 'गुरुचरित्र' लिहिले गेले असल्याने त्यात अतिशयोक्ती असण्याचाच संभव अधिक आहे. कारण आपल्या श्रद्धास्थानाबद्दल कौतुकाचे शब्द माणसाच्या तोंडून नेहमीच जास्त निघतात. त्यामुळे 'सत्यकथन' ही आत्मचरित्राची महत्त्वाची कसोटी 'लीळाचरित्रात पाळली गेली की नाही यासंबंधी मन साशंक होते. तसेच आत्मचरित्रात व्यक्ती स्वतःच्या दृष्टिकोनातून उभी केली जाते. तसे येथे नाही. म्हणून लीळाचरित्राला आत्मचरित्र म्हणण्यापेक्षा चरित्र म्हणणे योग्य वाटते.

नामदेवाच्या अभंगांत त्यांचे आत्मचरित्र रेखाटलेले आढळते. परंतु नामदेवांनी आपले आत्मचरित्र हेतुपुरस्सर लिहिलेले नाही. यास्तव त्यांच्या अभंगात ते अनुक्रमाने आलेलेही नाही. आपल्यालाच शोधून त्याची व्यवस्थित मांडणी करावी लागते. आपला जन्म, कूळ, व्यवसाय, विठ्ठलभक्ती, विठ्ठलप्राप्तीसाठी केलेले प्रयत्न

---

[14] लीळाचरित्र उत्तरार्ध : भाग पहिला, संपा. शं. गो. तुळपुळे, नागपूर, १९६४ लीळा ११३, पृ. ७५

[15] स्मृतिस्थळ; संपा. वा. ना. देशपांडे, यवतमाळ, १९३९, स्मृ. १४१; पृ. ४८

त्यासाठी घरातून होणारा विरोध, विठ्ठल–प्राप्तीचा आनंद वगैरे जीवनव्यापी उल्लेख त्याच्या अभंगांत सापडतात.

**नामदेवाच्या अभंगात चित्रित झालेले नामदेवाचे आत्मचरित्र**

" शिंपियाचे कुळीं जन्म झाला । "[16]

असे आपले ' कूळ शिंप्या 'चे असल्याचे नामदेव सांगतात. आजोबाचे नाव ' गोमा ' व आजीचे नाव ' उमा ' असून आई ' गोणाई ' व वडील ' दामाशेट ' असल्याची माहिती अभंगांतून पुरवतात. बाबाजी ब्राह्मणाने केलेली जन्मपत्रिका व तिच्यावरून वर्तविलेले भविष्यही त्यांनी स्पष्ट केले आहे.

" अधिक ब्याणव गणित अकराशतें । उगवतां आदित्य रोहिणीसी ।
शुक्ल एकादशी कार्तिकी रविवार । प्रभव संवत्सर शालिवाहन शके ।
प्रसवली माता मज मळमूत्रीं । तेव्हां जिव्हेवरी लिहिलें देवें ।
शतकोटी अभंग करील प्रतिज्ञा । नाम मंत्र खुणा वाचुनी पाहें ।।
ऐंशी वर्षे आयुष्य पत्रिका प्रमाण । नामसंकीर्तन नामया वृद्धि । "[17]

आपल्या जन्माची तिथी, वार, वर्ष यासह नोंद नामदेवाने केली आहे. ऐंशी वर्षाचे आयुष्य वाटचाला आलेले असून स्वतःच्या अवतारकार्याचा उल्लेखही त्यात येतो. विठ्ठल–प्राप्ती हे नामदेवांचे जीवन–ध्येय आहे. ध्येयप्राप्तीसाठी आटोकाट प्रयत्न केला जातो.

प्रदीर्घ तपश्चर्येनंतर झालेल्या आपल्या विठ्ठलमय अवस्थेचे वर्णन ते करतात–

" नामा तो केशव केशव तो नामा । अभिन्नत्व आम्हां केशवासी ।"[18]
" तहानभूक काही आथींचना मनी । विठ्ठल विठ्ठल म्हणोनि हाचि छंद ।।"[19]
" नामा म्हणें मज आदि अंतु एकु । जननी आणि जनकु पांडुरंग ।।"

विठ्ठलाच्या संदर्भातील आपले विविध भाव, निष्ठा नामदेवांनी प्रकट केली आहे. विठ्ठलाच्या नादी लागल्याने घरातील लोकांनी केलेली कानउघाडणी कुठल्याही प्रकारचा आडपडदा न ठेवता नामदेवांनी स्पष्ट केली आहे.

" सुहृदें, सोयरीं सकळिकें मिळोनि । करिती झाडणी नानापरी ।"[20]

असे नामदेव सांगतात. नामदेवांचे वडील स्वतःची नाराजी

---

[16] श्रीसकल संतगाथा, संपा. का. अ. जोशी, आ. दु. पुणे, १९६७, अ. क्र. १२४४·१ पृ. २०९

[17] तत्रैव, अ. क्र. १२५४, पृ. २११

[18] तत्रैव, अ. क्र. १२५२·२, पृ. २११

[19] तत्रैव, अ. क्र. १२६४·३, पृ. २१२

[20] तत्रैव, अ. क्र. १२६४·१६, पृ. २१२

"गणगोतांमाजी बरें केले नांव । माझे सत्व सर्व बुडविले [21]
अरे ऐसें तूंवां बुडविलें कुळ । सांडिली सकळ लोकलाज " [22]

नामदेवांना 'कुळबुडव्या' म्हणून व्यक्त करतात. नामदेवांची आई–गोणाई देखील त्यांची कान उघाडणी करते.

"सुदैवाची लेंकरें वर्ततातित कैसीं । तू मज झालासि कुळक्षय " [23]
सांडी सांडी नाम्या तू हे देवपिसे । बळे घर कैसे बुडवितोसी । [24]
नको संग धरू नामा ऐक गोष्टी । गोणाई हनुवटी धरूनी सांगे । [25]

अगोदर नामदेवांना चार शिव्या हासडून नंतर मातेच्या ममतेने गोणाई आपल्या मुलाची समजूत घालते. मुलाचे भले व्हावे म्हणून तळमळणारी आई नामदेवांनी याठिकाणी उभी केली आहे. कोणी काहीही म्हटले तरी नामदेव आपला विठ्ठल ध्यास सोडायला तयार नाहीत. ते आईला उत्तर देतात–

"एक पांडुरंग दुजा नाहीं चांग । म्हणुनी त्याचा संग धरिला मातें ।
माझी तुज काहीं करणे न लगे चिंता । मज आहे पोशितां पांडुरंग । [26]
इष्ट मित्र बंधू सज्जन सोयरा । माझिया संसारा हाचि एक । [27]

पांडुरंगाच्या खांद्यावर आपला जीवनभार टाकून निश्चितपणे विसावणारे नामदेव यातून उभे राहतात.

नामदेवांची पत्नी राजाई हिनेसुद्धा नामदेवांचे विठ्ठलवेड पाहून त्यांची खरडपट्टी काढलेली दिसते. पती हेच जीवनातील सर्वस्व असल्याने आणि आधारास्तव दुसऱ्याकडे पाहण्याची सोय नसल्याने तिचे संतापणे स्वाभाविक वाटते.

" लावोनी लंगोटी झालेती गोसावी । आमुची ठेवाठेवी कोण करी । [28]
तुमचिये गती लेंकरे नेणती ।। कोण चालविती घराचार ।
म्हणोनी माझें चित्त आपुलेनी उद्वेगे । कवणे जीवाचे सांगे सुख दुःख " [29]

आपल्या धर्मपत्नीची चीड नामदेवांनी अशी रेखाटलेली आहे.

---

[21] तत्रैव, अ. क्र. १३०८·२, पृ. २२२
[22] तत्रैव, अ. क्र. १३०८·१०, २२३
[23] तत्रैव, अ. क्र. १२६६; ५, पृ. २१३
[24] तत्रैव, अ. क्र. १२९८; ५, पृ. २२१
[25] तत्रैव, अ. क्र. १२७०; ५, पृ. २१४
[26] तत्रैव, अ. क्र. १२७२·२३ पृ. २१४
[27] तत्रैव, अ. क्र. १२७२·१०, पृ. २१४
[28] तत्रैव अ. क्र. १३२०२·०, पृ. २२४
[29] तत्रैव, अ. क्र. १३२०·८–९ पृ. २२४

स्वत:चे दोषही नामदेवांनी मनमोकळेपणाने सांगितलेले दिसतात. गर्वपरिहार, गुरूशिवाय असलेली ज्ञानाची व्यर्थता त्यांनी स्पष्ट केली आहे.

"कुलालाचे कुंभ भाजल्यावीण माती । काय साहे संगति पाणियाची ।
मेणाची पुतळी घेता करी वरी । अग्नीचे शेजारी राहे कैशी । "[30]

असे वाङ्मयीन दाखले देऊन आपली गुरूविण अवस्था स्पष्ट केली आहे. गुरू विसोबा खेचर यांच्यासंबंधी ते म्हणतात–

"डोळियाचे डोळे उघडिलें जेणें । आनंदाचे लेणे लेवविले "[31]

पुढे सर्वच विठ्ठलमय झाल्यावर आनंदाने बोलू लागतात–

"नाचूं कीर्तनाचे रंगी । ज्ञानदीप लावूं जगीं ।"[32]

विठ्ठलप्राप्तीनंतर आईला झालेल्या आनंदाची माहितीही अभंगांतून मिळते.

"गोणाई म्हणे नामा । भली केली रे बा सीमा "[33]

आईने नामदेवांना दिलेली ही शाबासकी आहे.

अशा प्रकारे आपल्या जीवनातील सर्व महत्त्वाची वळणे सांगून नामदेवाने मराठी साहित्यात नकळतपणे आद्य आत्मचरित्रकाराचे स्थान मिळविलेले आहे. "नामदेव उत्कट पण निर्भीड आत्मचरित्रकार "[34] असल्याचे द. के. केळकर कौतुकाने सांगतात तर डॉ. अ. ना. देशपांडे म्हणतात, "नामदेवांचे आत्मचरित्र हे मराठीतील पहिले आत्मचरित्र. एक दीन, दरिद्री सांसारिक मनुष्य प्रपंचातून परमार्थात जेव्हा उड्डाण घेतो तेव्हा त्याच्या मानसिक जीवनात कसकसे परिवर्तन होत जाते. त्याला देह–घरसंसाराचा कंटाळा कसा येऊ लागतो आणि शेवटी बंध-मोक्षाची काजळी फिटून त्याला कैवल्याचा साक्षात्कार कसा होतो याचे जिवंत निवेदन करणारी मराठीतली ही पहिली आत्मकथा आहे. महाराष्ट्रशारदेला एका भक्त-श्रेष्ठाने अर्पण केलेला हा आत्मचरित्राचा पहिला अमर नजराणा आहे. "[35] अ. ना. देशपांडे यांचा हा अभिप्राय सार्थ वाटतो.

संत जनाबाई, एकनाथ, तुकाराम आणि बहिणाबाई या सर्वांच्या अभंगांतही त्यांचे 'आत्मचरित्र' उमटलेले आढळते. "नामदेवांनी आत्मचरित्रात्मक लेखनाचा

[30] तत्रैव, अ. क्र. १३४६·१–२ पृ. २३१
[31] तत्रैव, अ. क्र. १४०१·४, पृ. २४०
[32] तत्रैव, अ. क्र. १३९२·१, पृ. २३९
[33] तत्रैव, अ. क्र. १३०१·५, पृ. २२१
[34] द. के. केळकर, मराठी साहित्याचे सिंहावलोकन, पुणे, पृ. १२१
[35] अ. ना. देशपांडे, प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, उत्तरार्ध, पुणे, १९६९ पृ. १०८

जो पायंडा पाडला त्याचा विकास तुकारामाच्या अभंगरचनेत दिसून येतो."[36] व. रा. बोरगावकर तुकारामाची अशी पाठ थोपटतात.

**तुकारामाच्या अभंगांतील तुकारामाचे आत्मचरित्र**

" याती शूद्र, वैश्य केला वेंवसाव । आदि तों हा देंव कूळपूज्य
संसारें झालों अति दु:खें दु:खी । मायबाप सेंखी क्रमलिया
दुष्काळें आटिलें द्रव्यें नेंला मान । स्त्री एकीं अन्न अन्न करता मेलीं
लज्जा वाटें जीवा त्रासलों या दु:खें । वेंवसाव देंसा तुटी येत ।
आरंभी कीर्तन करी एकादशीं । नव्हतें अभ्यासी चित्त आधी ।
काही पाठ केली संतांची उत्तरे । विश्वासे आदरे करोनिया ।
संतांचे सेविलें तीर्थ पायावणी । लाज नाहीं मनी येऊ दिली ।
टाकला तो काही केला उपकार । केले हें शरीर कष्टवुनी ।
वचन मानिले नाही सुहृदांचे । समूळ प्रपंचे वीट आला ।
सत्यासत्यासी मन केलें ग्वाहीं । मानिलें नाहीं बहुमतां ।
मानियेला स्वप्नी गुरूचा उपदेश । धरिला विश्वास दृढमनी ।
यावरी या जाली कवित्वाची स्फूर्ती । पाय धरिलें चित्तीं विठोंबाचें
निषेधाचा काही पडिला आघात । तेणें मध्यें चित्त दुखविलें
बुडविल्या वह्या बैसलो धरणें । केलें नारायणें सावधान ।
तुकाराम म्हणें माझें सर्व भांडवल । बोलविलें बोल पांडुरंगें । "[37]

या एका अभंगातून आपले कूळ, व्यवसाय, दुष्काळ, धंद्यात झालेले नुकसान; पहिल्या पत्नीचा अन्नान्न करीत झालेला मृत्यू, संसारातील ही नानाविध दु:खे वाट्याला आल्याने पांडुरंगाकडे घेतलेली धाव पण तिकडे आपले लक्ष लागत नसल्याची दिलेली प्रांजळ कबुली, संतांचे केलेले अनुकरण, स्वप्नातील गुरूचा उपदेश, स्वीकारलेली विठ्ठलशरणता, इंद्रायणीत बुडविलेल्या वह्या व पांडुरंगाने घातलेली समजूत-आपल्या आयुष्यातील जवळ जवळ सर्व प्रमुख टप्प्यांचे उल्लेख तुकारामाने या एका अभंगात ग्रथित केले आहेत. कुठल्याही प्रकारचा लफ्फेदार शब्द न वापरता साध्या सरळ शब्दांत तुकारामाने उभे केलेले हे जवळजवळ पूर्ण जीवनचित्र कौतुकास्पद वाटते. तुकारामाच्या अभंगांतील पुढील उल्लेखांवरून त्याचे संपूर्ण आत्मचरित्र आपल्या हाती येते असे

[36] व. रा. बोरगावकर, प्राचीन मराठी वाङ्मयातील चरित्रात्मक आणि आत्मचरित्रात्मक वाङ्मयाचा समीक्षणात्मक अभ्यास, ( अप्रकाशित प्रबंध) मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, १९६७, पृ. ६०५

[37] गं. बा. सरदार, तुकाराम दर्शन, पुणे, १९६८, पृ. १.२

म्हणायला हरकत नाही. आपल्या जीवनात विठ्ठलच सर्वस्व असल्याचे तुकाराम सांगतात–

"पतिव्रता नेणे आणिकांची स्तुती । सर्व भावे पति ध्यानी मनी ।
तैसे माझे मन एकविध जाले । नावडें विठ्ठलेविणें दुजे ।। "[38]

तुकारामाचे जीवनच विठ्ठलमय होऊन जाते. सदासर्वकाळ विठ्ठल आपला सांगाती आहे असे त्याला वाटते–

"जेथे जातो तेथे तू माझा सांगाती । चालविसी हाती धरोनिया ।[39]
"अंत:काळी विठों आम्हासीं पावला । कुडीसहित झाला तुका गुप्त "[40]

असे तुकाराम म्हणतात. विठ्ठलप्राप्ती हेच तुकारामाचे ध्येय आहे आणि त्याने ते मिळविलेले आहे. त्यातच त्याला आपल्या जीवनाची कृतकृत्यता वाटते. तुकारामाची व्यक्तिरेखा सर्व पैलूंसह त्याच्या आत्मचरित्रात चित्रित झालेली आहे.

भक्तसम्राट नामदेव मराठी वाङमयातील पहिले आत्मचरित्रकार ठरत असले, तुकारामाच्या अभंगांत आत्मचरित्राचे विकसित रूप दिसत असले तरी 'आत्मचरित्र' हा वाङमयप्रकार डोळयांसमोर ठेवून जाणीवपूर्वक ही आत्मचरित्रे लिहिली गेली नाहीत. अभंगांतून त्यांनी आपली सुखदु:खे विठोबाला आत्मीयतेने ऐकवली आहेत. याकडे काही अभ्यासक आध्यात्मिक पातळीवरील अंत:कलह यादृष्टीने बघतात. त्यांच्या दृष्टीने ही आत्मचरित्रे नाहीत. त्यांचे हे लिखाण आत्मचरित्र या वाङमय–प्रकाराच्या आधुनिक कसोटयांवर ताणता येणार नाही.

नामदेव–तुकारामादी संतांच्या अभंगांत आत्मचरित्र प्रकटलेले दिसत असले तरी त्या काळात या वाङ्मय–प्रकाराचा विकास आपल्याकडे झालेला आढळत नाही. स्वत:विषयी काही गौरवपर सांगू नये हे भारतीय संस्कृतीने पाजलेले बाळकडूच याला प्रामुख्याने कारणीभूत असावे. भारतीय संस्कृतीत व्यक्तिजीवनाला बरेचसे गौण स्थान मिळाले असल्याने व्यक्तीच्या मनमोकळया आविष्कारापेक्षा त्याचा संकोचच विशेष शिष्टमान्य समजला जातो. मुक्त विचारविनिमयापेक्षा मुकाटयाने केलेले आज्ञापालन आणि वैचित्र्यापेक्षा साचेबंदपणा हेच या संस्कृतीचे ठळक आणि महत्त्वाचे अंग. अशा स्थितीत प्राचीन काळात आत्मचरित्रासारखा व्यक्तिनिष्ठ लेखन–प्रकार आपल्याकडे रुजलेला नसावा हे स्वाभाविकच आहे. शिवाय प्राचीन काळातील साहित्यिकवर्ग सर्वस्वी ईश्वरभक्तीत आणि परमार्थ चिंतनात रममाण झाल्याने त्यास आत्मचरित्र लिहून स्वत:च्या गुणांचे किंवा कृत्यांचे

[38] श्रीसकल संतगाथा, भाग दुसरा, संपा. का. अ. जोशी, आ. दु. पुणे, १९६९, अ, क्र. १६४१, पृ. ४४६

[39] तत्रैव, अ. क्र. १९२६, पृ. १७३

[40] तत्रैव, अ. क्र. १६०७, पृ. ९

जनतेसमोर प्रकटीकरण करणे अप्रयोजक वाटले असावे. परंपरेने चालत आलेल्या किंवा लादल्या गेलेल्या या संकोचामुळे संतकवी हे आत्मचरित्रापासून अलिप्त राहिले असावेत.

"स्वकीर्ति कानी नायकावी । हा अमुका ऐसा नोहावी । सेची लोका "[41]

ह्या परिस्थितीचा साधुसंतांच्या मनावर दाट परिणाम झालेला होता. "जो आपली आपण करी स्तुती । तो एक मूर्ख" ही रामदासी उक्ती मनावर ठसलेली होती. आपला गुरुमंत्र कोणाला सांगू नये, सत्कर्माचा उल्लेख केल्याने ते क्षय पावते–इत्यादी विचार वरील मनोवृत्तीचेच निदर्शक आहेत. भारतीयांच्या या मूलभूत प्रवृत्तीमुळे आत्मचरित्र हा वाङमय–प्रकार आपल्याकडे प्राचीन काळात रुजला नसावा असे वाटते.

**आरंभापासून १९५० पर्यंतची आत्मचरित्रे**

अव्वल इंग्रजी कालखंडापासून आत्मचरित्र हा वाङ्मय–प्रकार आपल्याकडे रूढ झाला. १८७०–७१ मध्ये लिहिलेले दादोबा पांडुरंग यांचे 'आत्मचरित्र' हे रूढ अर्थाने मराठीतील पहिलें आत्मचरित्र मानले जाते. त्यामुळे आधुनिक मराठी साहित्यातील पहिले आत्मचरित्र लिहिल्याचा मान इतिहासाने दादोबा पांडुरंग यांना दिला आहे. १८५९ मध्ये विष्णुबुवा ब्रह्मचारी यांनी 'वेदोक्तधर्मप्रकाश' हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथात आत्मपर उल्लेख तुरळकपणे आलेले आहेत. पण तेवढ्या उल्लेखांवरून त्याला 'आत्मचरित्र' म्हणता येणार नाही. इंग्रजी कालखंडापूर्वी निरंजन माधव, नाना फडणीस, गंगाधरशास्त्री पटवर्धन, बापू कान्हो यांनी आत्मचरित्रे लिहिली आहेत.

निरंजन माधव यांचे 'संप्रदाय परिमळ' हे आत्मचरित्र होय. त्याने आपली पत्नी गंगावती हिच्या आग्रहावरून हा ग्रंथ लिहिला. प्राचीन मराठीत अशा भूमिकेतून लिहिलेला हा एकमेव ग्रंथ असावा असे वाटते. पती व पत्नी यांच्यातील संवादरूपाने हा ग्रंथ लिहिलेला आहे. नाना फडणवीस यांच्या आत्मचरित्रात नानांनी आपल्या दोषांचेही चित्रण प्रांजळपणे केलेले आहे. सरळ, साधे, प्रांजळ निवेदन व उत्कृष्ट लेखनशैली या दृष्टीने हे आत्मचरित्र उल्लेखनीय आहे. परंतु हे आत्मचरित्र विशिष्ट प्रसंगापुरते मर्यादित असल्याने त्याचा अपुरेपणा सतत खटकत राहतो. गंगाधरशास्त्री पटवर्धन यांनी मेजर वॉकर रेसिडेंट यांना सादर केलेला वृत्तांत म्हणजे त्यांचे आत्मचरित्र होय. वयाच्या आठव्या वर्षापासूनची हकीकत या आत्मचरित्रात येते. त्यांचे हे आत्मचरित्र कैफियत–वजा वाटते. पेशवाईच्या अस्तानंतर इंग्रजांनी काही माहीतगार लोकांकडून आत्मचरित्रे लिहून घेतली. त्यात बापू कान्हो होते. या आत्मवृत्ताची मांडणी बखरीसारखी झालेली दिसते. त्यामुळे

[41] ज्ञानेश्वरी, सरकारी प्रत, आ. ति. ४ मुंबई, १९६३, १३.८९.

हे आत्मवृत्त हकीकतवजा झाले आहे. दादोबांनंतर १८८७ साली बाबा पदमनजी यांनी ' अरुणोदय ' हे आत्मचरित्र लिहिले. आपल्या धर्मांतराची हकीकत त्यांनी यात सांगितलेली आहे. ती सांगत असताना हिंदुधर्मातील गुणावगुण, धार्मिक व सामाजिक समजुती, रूढी यांचे सत्याला न डावलता विवेचन केले आहे. पदमनजींनी बोधवादी दृष्टिकोणातून हे आत्मचरित्र लिहिले आहे. ही बहुतेक आत्मचरित्रे प्रांजळ व वास्तवदर्शी आहेत.

१९१० मध्ये रमाबाई रानडे यांनी ' आमच्या आयुष्यातील काही आठवणी ' लिहिल्या. न्यायमूर्ती रानड्यांचे चित्र उभे करण्यासाठी या आत्मचरित्राचा जन्म झालेला आहे. १९१५ मध्ये धोंडो केशव कर्वे यांनी ' आत्मवृत्त ' लिहिले. " आमची चरित्रे मध्यम सामर्थ्याच्या युवयुवतींमध्ये सामान्य मनुष्यालाही करता येण्यासारख्या काही गोष्टी आहेत अशी थोडीशी जाणीव उत्पन्न करून टाकतील," [42] या समजुतीने हे आत्मवृत्त लिहिले गेले. १९२८ मध्ये पार्वतीबाई आठवले यांनी ' माझी कहाणी ' हे आत्मचरित्र लिहिले. हे मराठीतील पहिले स्त्री-आत्मचरित्र होय. समाजाकडून विधवांवर होणारा अन्याय, त्यामुळे विधवांची होणारी दयनीय अवस्था इत्यादींचे जिवंत-चित्रण या आत्मचरित्रात झालेले आहे. १९२४ मध्ये धर्मानंद कोसंबी यांनी आपले ' निवेदन ' सादर केले. नाना पावगी यांच्या आत्मवृत्तात अहंकार व आत्मश्लाघा आढळते. लाला लजपतराय यांच्या ' Story of My Deportation ' या आत्मचरित्राचे ल. ब. भोपटकरांनी ' माझ्या हद्दपारीची कहाणी ' या नावाने सरस भाषांतर केले आहे. १९३४ मध्ये लक्ष्मीबाई टिळक यांनी ' स्मृतिचित्रे ' लिहिली. टिळकांचे चरित्र लिहिण्याच्या हेतूने लिहिले गेलेले हे आत्मचरित्र मराठी वाङ्मयात अमर स्थान मिळवून बसले आहे. १९४३ मध्ये कमलाबाई देशपांडे यांची 'स्मरणसाखळी' प्रकाशित झाली. या आत्मचरित्रात कमलाबाई बऱ्याच ठिकाणी आत्मसमर्थनाचा प्रयत्न करताना दिसतात. न. चिं. केळकरांच्या ' गतगोष्टी ' आत्मसमर्थनाने कलंकित झालेल्या आहेत. बोधवादी दृष्टिकोणातून ल. रा. पांगारकरांनी ' चरित्रचंद्र ' लिहिले. ' माझा चित्रपट व काशीचा संपूर्ण इतिहास ' या भाऊसाहेब वझे यांच्या आत्मचरित्राचे प्रांजळपण हे वैशिष्टय सांगता येईल. १९४४ मध्ये आनंदीबाई कर्वे यांचे ' माझे पुराण ' बाजारात आले. पतीला परमेश्वर मानण्याचा कालखंड असूनही आनंदीबाईंनी कर्व्यांना आत्मचरित्रात आवश्यक त्या ठिकाणीच स्थान देऊन स्वतःची प्रतिमा अगदी ठळकपणे रेखाटलेली आहे. या आत्मचरित्राचा हा विशेष कौतुकास्पद वाटतो. माधवरावांचे चित्र लोकांच्यासमोर ठेवण्याच्या हेतूने लीलाबाई पटवर्धन यांनी १९४५ मध्ये ' आमची अकरा वर्षे ' लिहिली. गो. स. टेंबे यांचे

[42] धोंडो केशव कर्वे, आत्मवृत्त, हिंगणे, १९१४, पृ. २

'माझा व्यासंग' हे आत्मचरित्र तटस्थवृत्तीने लिहिलेले दिसते. 'माझी भूमिका' हे बोडस यांचे आत्मचरित्र त्यातील वेळोवेळी केलेल्या आत्मसमर्थनाने खटकते. ना. गो. चापेकर यांची 'जीवनकथा' व विठ्ठल रामजी शिंदे यांनी 'माझ्या आठवणी व अनुभव' लिहिताना तटस्थवृत्ती बाळगलेली दिसते. 'स्मरणयात्रे'त काका कालेकरांनी आपले अनुभव मोकळेपणाने सांगितलेले आहेत. पी. सी. विठ्ठल यांचे 'माझे क्रीडा जीवन' म्हणजे हिंदी क्रिकेटचा संक्षिप्त इतिहास वाटतो. वि. दा. सावरकर लिखित 'माझी जन्मठेप' तटस्थवृत्ती आणि मनमोकळेपणा यामुळे वाचनीय झाली आहे.

१९१० ते १९५० या कालखंडात लिहिल्या गेलेल्या आत्मचरित्रांचा हा स्थूलमानाने घेतलेला आढावा आहे. या कालखंडातील बहुतेक आत्मचरित्रे बोधवादी दृष्टिकोणातून जन्मलेली दिसतात. तसेच बऱ्याच आत्मचरित्रांत आत्मसमर्थनही आढळते. काही आत्मचरित्रे अव्वल दर्जाचीही उतरलेली आहेत.

**१९५० नंतरची आत्मचरित्रे**

'कऱ्हेचे पाणी' हे पाच खंडात्मक प्रदीर्घ आत्मचरित्र लिहून आचार्य अत्र्यांनी आपला जीवनपट सादर केला आहे. कृ. पां. कुलकर्णी 'कृष्णाकाठची माती' या आत्मचरित्रात आपली सुखदुःखे तन्मयतेने चित्रित करताना दिसतात. न. वि. गाडगीळ यांनी "आपल्या जीवनाचा इतिहास आपणच लिहावा म्हणजे त्यातील अन्वयार्थाबद्दल आपल्या पश्चात कोणी सत्य अगर वस्तुनिष्ठ रीतीने सांगू शकणार नाही."[43] या हेतूने आपले 'पथिक' हे त्रिखंडात्मक आत्मचरित्र लिहिले. के. ना. वाटवेकृत 'माझी वाटचाल' व मो. वा. जोशीकृत 'एका पथिकाची जीवनयात्रा' यातून प्रतिकूल परिस्थितीवर सचोटीने मात करणाऱ्या कुटुंबांचे जीवन-दर्शन घडते. पांडुरंग चिमणाजी पाटील यांच्या 'माझ्या आठवणी' म्हणजे एक कुळकथा वाटते. 'एका जिंदगीची पटकथा' हे केशवराव धायबर यांचे आत्मचरित्र म्हणजे तटस्थवृत्तीने केलेले आत्मनिरीक्षण होय. गोपाळ गोडसे यांच्या "गांधीहत्या आणि मी' या आत्मचरित्रात निर्मळ सत्य आणि उत्कट वास्तव यांचा हृदयंगम मेळ झालेला दिसतो. 'निशिगंध'मध्ये मृणालिनी देसाई यांनी अलिप्तपणे एका कालखंडाचे चित्रण केले आहे. १९७० मधील हंसा वाडकर यांचे 'सांगते ऐका' हे आत्मचरित्र त्यातील निर्भीड सत्यप्रतिपादनामुळे आगळे ठरले आहे. 'जेव्हा माणूस जागा होतो!' मध्ये गोदावरी परुळेकरांनी वारल्यांमधील माणूस कसा जागा केला याची हकीकत समजते. 'शिबाराणीच्या शोधात' हे दिलीप चित्रे यांचे आत्मचरित्र मराठीतील पहिले अस्तित्ववादी आत्मचरित्र म्हणून डॉ. द. भि. कुलकर्णी यांनी गौरविले आहे.

---

[43] न. वि. गाडगीळ, पथिक, भाग एक, पुणे, १९६४, पृ. ४

'मातीची चूल,' हे आत्मचरित्र साधल्यांनी जे जे घडले, पाहिले, अनुभवले व भोगले ते ते जसेच्या तसे सांगण्याच्या हेतूने लिहिले आहे. सेतू माधवराव पगडी यांचे 'जीवनसेतू,' हे एक वाचनीय आत्मचरित्र म्हणता येईल. 'माझी जीवन-यात्रा' यात आप्पा पटवर्धनांनी १८९४ ते १९७१ या प्रदीर्घ काळात आपल्या जीवनात जे प्रयोग झाले त्यांचे तपशीलवार चित्रण केले आहे. अभ्यंकरांच्या 'अंतरीच्या नानाकळा' या आत्मचरित्रात आत्मचिंतनाचा अभाव आढळतो, तर वसंत शांताराम देसाई यांनी 'अशीच एकाची गोष्ट'मध्ये आपले जीवन शोध-काच्या नजरेतून न्याहाळलेले दिसते. 'संध्याकाळ'मध्ये गजानन जहागिरदार आपल्या कलाजीवनाची कथा वेधकपणे सांगतात. 'जीवनाची वाटचाल' हे बाबुराव पारख्यांचे आत्मचरित्र म्हणजे श्रद्धाळू अंतःकरणाने केलेले निवेदन वाटते. 'अशी ही बिकट वाट'मध्ये वार्ताहर म्हणून आलेले अनुभव वि. स. माडीवाल्यांनी चित्रित केले आहेत. बाबुराव काळयांनी 'पाऊल वाट' आत्मसमर्थनार्थ लिहिलेली जाणवते. 'कोठे आणि कधीतरी' या सुधीर फडक्यांच्या आत्मचरित्राकडे एक प्रांजल निवेदन म्हणून बोट दाखविता येईल. 'अजून चालतेची वाट,' हे आनंदी-बाई विजापुरे यांचे आत्मचरित्र व 'स्नेहांकिता,' हे स्नेहप्रभा प्रधान यांचे आत्म-चरित्र त्यांच्या प्रेमप्रकरणांनी वादळी ठरले आहे. नारायण महाडिक यांचे 'कैदी नं. ३१४६७' हे आत्मचरित्र म्हणजे खून केलेला नसतानाही खुनाचा आरोप कायद्याने सिद्ध होतो व जन्मठेपेची शिक्षा भोगावी लागते; अशा एका आरोपित गुन्हेगाराचे आत्मनिवेदन होय. हे एक आगळे आत्मचरित्र ठरते. 'सांजवात,' हे आनंदीबाई शिर्के यांचे साधे व निर्मळ निवेदन होय. अ. का. प्रियोळकरांच्या स्मृतिग्रंथात एक भाग प्रियोळकरांच्या आत्मचरित्राचा आहे. प्रियोळकरांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू त्यात रेखाटलेले दिसतात. हा एक वेगळा प्रयत्न आहे. 'लेखक आणि माणूस' या आपल्या आत्मचरित्रात श्री. ना. पेंडसे यांनी एक साहित्यिक आणि व्यक्ती या दोन्ही दृष्टिकोणांतून स्वतःचा शोध घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यात पेंडसे यशस्वी झालेले दिसतात. 'रामनगरी' हे राम नगरकर यांचे आत्मचरित्र त्यातील निरागस विनोदाने वाचनीय झाले आहे. 'पानाआडचे फूल,' हे आशालता सावे यांचे पत्ररूपाने प्रकाशित झालेले आत्मचरित्र होय. मराठीत हा प्रयोग अभिनव वाटतो 'दुर्दैवाशी दोन हात,' हे सरोजिनी शारंग-पाणी यांचे आत्मचरित्र १९७५ मधील उत्तम आत्मचरित्र म्हणून सांगता येईल. 'तसबीर आणि तकदीर' या आत्मचरित्रात श्री. के. क्षीरसागरांनी आपले 'अनुभवधन' वाचकांच्या स्वाधीन केलेले आहे. एका रोमँटिक मनाची आत्मकथा म्हणून हे आत्मचरित्र वाचनीय वाटते. या कालखंडातील कित्येक आत्मचरित्रांनी, पूर्वीप्रमाणे जन्मापासून लेखनकालापर्यंतची हकीकत बोधवादी दृष्टिकोणातून सांग-

ण्याची प्रथा मोडलेली दिसते. बऱ्याच आत्मचरित्रांत आत्मशोध घेण्याचा प्रयत्न झालेला दिसतो.

या आढाव्यावरून आत्मचरित्र या वाङ्मयप्रकाराची परंपरा नामदेवांपासून तो सद्य:काळापर्यंत म्हणजे तेराव्या शतकापासून विसाव्या शतकापर्यंत अशा प्रकारे सांगता येते. आत्मचरित्राच्या या परंपरेवरून आत्मचरित्राच्या तंत्रासंबंधीचा तपशील हातात येतो तो असा–

**आत्मचरित्राचे तंत्र**

**(अ) आत्मचरित्राची व्याख्या**

आत्मचरित्राचे स्वरूप समजण्यासाठी आत्मचरित्राच्या विविध व्याख्या केलेल्या आढळतात. " स्वतःच्या जीवनाची स्वत: लिहिलेली कहाणी " [44] अशी आत्मचरित्राची सोपी व्याख्या करता येईल असे डॉ. बोरगावकर यांचे मत आहे. Encyclopedia Britannica त आत्मचरित्राचा – " Autobiography the account of an individual human life written by the subject himself " [45] असा अर्थ दिला आहे.

" Autobiography : Art and practice of writing a narrative of one's own life " [46] असा The Universal Dictionary of the English Language मध्ये आत्मचरित्राचा अर्थ सापडतो. " A biography or narrative of one's life written by oneself" [47] असा आत्मचरित्राचा अर्थ Webster ने केला आहे.

बोरगावकर, Encyclopeadia, Universal Dictionary, Webster यांच्या वर्णनावरून आत्मचरित्र या शब्दाचा मुख्यार्थ तेवढा कळतो. परंतु त्यावरून आत्मचरित्राचा आवाका कळणारी व्याख्या स्पष्ट होत नाही. Prof. D. G. Naik यांच्या मते " The details of any given life, therefore, when accommodated in a story or narrative inevitably take a shape

---

[44] व. रा. बोरगावकर, प्राचीन मराठी वाङ्मयातील चरित्रात्मक आणि आत्मचरित्रात्मक लेखनाचा समीक्षणात्मक अभ्यास, (अप्रकाशित प्रबंध), मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, पृ. १३२

[45] Encyclopeadia Britannica, Vol. 2 London, 1768, P. 854

[46] The Universal Dictionary of the English Language, Ed. Henry Cecil Wyld, London P. 67

[47] Webster, New International Dictionary, 2nd Ed. Vol 1, New York, 1960 P, 140

or form, in literary terminology is called the form of autobiography." [48] या व्याख्येतून आत्मचरित्रास आवश्यक असलेले इतर पैलू सिद्ध होत नाहीत. "स्वतःच्या जीवनाचे दूरस्थपणाने सिंहावलोकन वृत्तीने केलेले अवलोकन आणि त्याविषयीचे प्रांजल निवेदन म्हणजे आत्मचरित्र " [49] अशी आत्मचरित्राची व्याख्या डॉ. सदा कऱ्हाडे यांनी केली आहे. स्वजीवनाचे तटस्थवृत्तीने अवलोकन करणे, प्रांजळ निवेदन करणे ह्या आत्मचरित्रास आवश्यक बाबी यातून स्पष्ट झाल्या आहेत. पण आत्मचरित्रास आवश्यक त्या घटनांची निवड, त्यांची कलात्मक मांडणी या आत्मचरित्रातील महत्त्वपूर्ण बाबी या व्याख्येतून निसटलेल्या दिसतात. त्यामुळे आत्मचरित्राची ही व्याख्याही परिपूर्ण वाटत नाही. "स्वजीवन तटस्थपणे न्याहाळून, त्यातून आवश्यक त्या बाबींची निवड करून, त्यांचे प्रांजल निवेदन व कलात्मक मांडणी यातून 'स्व 'चित्र रेखाटणे म्हणजे आत्मचरित्र होय " अशी आदर्श आत्मचरित्राची व्याख्या करता येईल. वरील व्याख्येत आत्मचरित्रास आवश्यक असणारे ताटस्थ्य, घटनांची निवड, प्रांजल निवेदन, कलात्मक मांडणी हे सर्व पैलू आलेले आहेत. त्यामुळे ही व्याख्या अधिक समर्पक होईल असे म्हणण्यास हरकत नाही. प्रत्येक वाङमय–प्रकाराची कलामूल्ये सारखी बदलत असतात. त्यामुळे कुठल्याही वाङ्मय–प्रकाराला चपखल व्याख्येत बसविणे कठीण आणि अवघड काम आहे. आत्मचरित्र हा वाङमय–प्रकारही याला अपवाद म्हणता येणार नाही.

### (ब) आत्मचरित्रलेखनामागील हेतू

साधारणपणे प्रत्येक कलाकृती कोणता ना कोणता तरी हेतू डोळ्यांसमोर ठेवूनच आकारली जाते. अर्थात आत्मचरित्र हा वाङ्मय–प्रकारही त्यातच मोडणारा आहे. नानाविध हेतूंनी आत्मचरित्रे लिहिली जातात. श्री. वि. द. घाटे हे या संदर्भात म्हणतात, "माणसे आत्मचरित्र का लिहितात ? ढोबळ उत्तर द्यायचे झाल्यास असे म्हणता येईल की ती त्यांची गरज असते. प्रत्येक लेखक वेगळा तशी त्याची गरजही वेगळी." [50] त्यामुळे आत्मचरित्रे विविध हेतूंनी जन्मलेली दिसतात.

आत्मचरित्रे 'स्वान्तःसुखाय' लिहिली जातात. वेळ जावा, करमणूक व्हावी, आपला पराक्रम दुसऱ्यास ऐकवून भारावून टाकावे अशी 'स्व 'सुखाची अनेक परिमाणे असू शकतात. आनंदीबाई कर्वे यांचे 'माझे पुराण,' कमलाबाई देशपांड्यांचे 'स्मरणसाखळी,' आनंद साधले यांची 'मातीची चूल' ही आत्मचरित्रे या हेतूंनी

[48] D. G. Naik, Art of Autobiography, Pune, 1962, P. 44

[49] सदा कऱ्हाडे, चरित्र आणि आत्मचरित्र, मुंबई, १९७६, पृ. १०१

[50] आनंदीबाई शिर्के, सांजवात, मुंबई, १९७२, पृ. ७.

लिहिलेली दिसतात. "स्निग्धजनसविभक्तं हि दुःखं सह्यवेदनं भवति।" या कालिदासाच्या उक्तीप्रमाणे सुखदुःख हलके करण्यास, स्वतःच्या वेदना बोलक्या करण्यासही आत्मचरित्र लिहिले जाते,"[51]–असा आत्मचरित्राचा लेखनहेतू अ. म. जोशी नमूद करतात. आनंदीबाई विजापुरे लिखित 'अजून चालतेची वाट,' सरोजिनी शारंगपाणी यांचे 'दुर्दैवाशी दोन हात,' ही आत्मचरित्रे याची उदाहरणे म्हणून सांगता येतील. "आपल्या साऱ्या स्मृतिरूप अनुभवांना सजीव करून त्यांची स्पंदणारी प्रतीती घेणे, त्यांचा आकार जाणिवेत उमटविणे, त्यांच्याकडे वेगळ्या कुतूहलाने आणि म्हणूनच तटस्थपणे पाहणे, आपल्या अनुभवांना संकेतरूप देऊन स्वतंत्र अस्तित्व प्राप्त करून देणे, अशा रीतीने त्यांना अजर आणि अमर करणे"[52] हा आत्मचरित्रामागील लेखनहेतू गंगाधर गाडगीळ यांनी स्पष्ट केला आहे. आपले अनुभव दुसऱ्याला सांगणे ही माणसाची अगदी सहजप्रवृत्ती आहे. या प्रवृत्तीतूनही आत्मचरित्रे आकारतात. पार्वतीबाई आठवले यांची 'माझी कहाणी,' शांताबाई आपटे यांचे 'जाऊ मी सिनेमात?" ही याची उदाहरणे म्हणून सांगता येतील. जुन्या आठवणींची माणसाला उजळणी करावीशी वाटते. या हेतूनेही आत्मचरित्रे लिहिली जातात. प्रमिलाबाई भालेराव यांचे 'अश्वत्थाची फुले', या हेतूने लिहिलेले आत्मचरित्र होय. आत्मशोध घेणे ही माणसाची एक निसर्गसिद्ध प्रवृत्ती आहे. यातूनही आत्मचरित्राचा जन्म होतो. उदाहरणार्थ, 'सांगत्ये ऐका' हे हंसा वाडकरांचे आत्मचरित्र आपल्यासंबंधी जनमानसात असणारे गैरसमज दूर व्हावे; आपली प्रतिमा जगात स्वच्छ राहावी हे हेतूही आत्मचरित्रामागे असू शकतात. उदाहरणार्थ, 'सांजवात' : आनंदीबाई शिर्के, 'स्नेहांकिता,' : स्नेहप्रभा प्रधान.

सर्वसामान्य माणसाला आत्मस्तोत्र गाण्याची हौस असते. ही हौस भागविण्यासाठी आत्मचरित्रे हे एक माध्यम ठरते. आपण केलेल्या कृत्यांचा कबुलीजबाब देण्याच्या हेतूनेही आत्मचरित्रे लिहिली जातात. फ्रेंच लेखक रूसो याने आपल्या आत्मचरित्राला 'Confession' असे नाव दिले आहे. उपकारकर्त्यांचे स्मरण हाही आत्मचरित्रलेखनामागील हेतू असू शकतो. उदाहरणार्थ, 'कृष्णाकाठची माती,'– कृ. पां. कुलकर्णी. सामाजिक व राजकीय जाणिवांतूनही आत्मचरित्रे लिहिली जातात. उदाहरणार्थ, 'पथिक'–गाडगीळ, 'आत्मवृत्त'–दादोबा पांडुरंग. त्यावेळची सामाजिक व राजकीय परिस्थिती आपल्यानंतरच्या पिढीला समजावी हा दृष्टिकोण या लेखनामागे असतो. निखळ बोधवादी दृष्टिकोणातूनही आत्मचरित्रे साकारतात. ल. रा. पांगारकरांचे 'चरित्रचंद्र' या दृष्टीने लक्षणीय

---

[51] अ. म. जोशी, चरित्र–आत्मचरित्र तंत्र आणि इतिहास, आ. दु. नागपूर १९६४, पृ. ९१/

[52] गंगाधर गाडगीळ, साहित्याचे मानदंडः, मुंबई, १९६२, पृ. ६८–६९

ठरते. आत्मचरित्राच्या लेखनहेतूविषयी ल. रा. पांगारकर म्हणतात, " माझ्या चरित्रात कोणास काही घेण्यासारखे नाही असे मला वाटते तर हे चरित्र लिहून प्रसिद्ध करण्याचा उद्योग मी केला नसता. दारिद्र्यात वाढलेल्या पण डोके वर काढू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांस, काही भरीव वाङमयकार्य किंवा धर्मकार्य करू पाहणाऱ्या लेखकास व वक्त्यास, परमार्थाची तळमळ वाहणाऱ्या मुमुक्षूस आणि संसार सुखमय करावा अशी वासना असणाऱ्या सांसारिकास ह्या चरित्रापासून काही बोध, आनंद व उत्साह मिळेल असा मला भरवसा वाटतो. "[53] महर्षी कर्व्यांचे 'आत्मवृत्त' ही बोधवादी दृष्टिकोणातून लिहिले गेले आहे. डॉ. भालचंद्र फडके आत्मचरित्र-लिहिण्याचे महत्त्वपूर्ण कारण सांगतात. " वस्तुतः माणूस आत्मचरित्र लिहिण्याच्या मनःस्थितीत येतो तेव्हा त्याला अखेरचा मुक्काम जवळ आल्याची जाणीव झालेली असते. कुठेतरी विविध संबंधांनी गुरफटलेल्या ' मी 'ला आपले व्यक्तित्व हर-' विल्याची किंवा लोक आपल्याला विसरून चालले आहेत याची बोच सलत राहते आणि मग हा ' मी ' आपल्या जीवनाचा पट मांडून त्यात रमून जातो."[54] इरावतीबाई कर्व्यांनाही आत्मचरित्र लिहिणे हे म्हातारपणाचे लक्षण वाटते. त्या म्हणतात—... स्वतःची खूण ठेवायची धडपड असते. सर्व ' अमुकपणा, ' ' मीपणा ' नाहीसा होणार, अजिबात जाणार हे कळते आणि जन्मभर ज्याने सोबत केली तो 'मी-' पणा टिकावा, ज्यांच्यामुळे हे व्यक्तिमत्त्व मिळाले त्यांच्या स्मृतीत काही दिवस घर करून राहावे म्हणून धडपड चालते. कोणी बोलत राहतात, कोणी फोटो काढतात; कोणी आपली बडबड कागदावर उतरवितात."[55] अशा विविध हेतूंनी आत्म-चरित्रे पूर्वी लिहिली गेली आहेत, सध्या लिहिली जात आहेत आणि पुढेही लिहिली जाणार आहेत.

जिज्ञासा हा माणसाचा जन्मदत्त स्वभावगुण आहे. दुसऱ्याचे जीवन जाणून घेण्याची त्याला नेहमीच उत्सुकता असते. व्यक्तीचे जीवनदर्शन घडविणे हेच आत्मचरित्राचे प्रमुख उद्दिष्ट आहे. त्यामुळे जिज्ञासातृप्तीचे समाधान या वाङमय-प्रकाराकडून पुरेपूर मिळू शकते आणि या कारणाने मानवी मने आत्मचरित्राकडे आपोआप आकर्षिली जातात.

आत्मचरित्र लिहिण्यासंबंधी विचार केला तर, कादंबरीप्रमाणे आत्मचरित्रांस कल्पनाशक्तीची जरूर नसते. शास्त्रीय ग्रंथाला आवश्यक असणारी तीव्र बुद्धिमत्ता व प्रगाढ व्यासंगही त्याला लागत नाही. चरित्र व इतिहास यांना लागणारे कठोर

[53] ल. रा. पांगारकर, चरित्रचंद्र, नाशिक, १९३९, पृ. ५७

[54] भालचंद्र फडके, अलिकडची आत्मचरित्रे. म. सा. प्र; ए. मे. जू. १९७६, पृ. ५१

[55] इरावती कर्वे, गंगाजल, पुणे, १९७४, पृ. १२२

परिश्रमही त्यासाठी आवश्यक नसतात. शिवाय उत्तम कलाकृती निर्माण करण्यास लागणारी समरसता इतर वाङ्मयप्रकारापेक्षा आत्मचरित्राच्या बाबतीत अधिक शक्य आहे. माणूस स्वतःविषयी स्वतःच अधिक सत्य सांगू शकतो. " Every man's life may be best written by himself. [56] हे डॉ. जॉन्सनचे उद्‌गार पटतात. या बाबींमुळे ' आत्मचरित्र ' हा एक सोपा वाङमय–प्रकार वाटू लागतो. परंतु, हे खरे नाही. आत्मचरित्र हा सोपा समजला जाणारा एक अतिशय अवघड आणि विलक्षण फसवा वाङमय–प्रकार आहे. आत्मचरित्र लिहिण्याच्या मार्गात येणाऱ्या संभवनीय अडचणींवरून आत्मचरित्राच्या बाबतीत निर्माण होणारी ही वस्तुस्थिती आहे.

(१) सत्यकथन, (२) तटस्थवृत्ती, (३) 'स्व'ला केंद्रस्थान, (४) घटनांची योग्य निवड व कुशल मांडणी, (५) वस्तुस्थितिदर्शक निवेदन ही आत्मचरित्राची आवश्यक अंगे. या अंगांचा तोल सांभाळताना त्यात निर्माण होणाऱ्या अडचणीं-वरून आत्मचरित्र हा वाङमय–प्रकार हाताळण्यास अतिशय अवघड असल्याचे लक्षात येते. कारण या सर्वांगांचा तोल सांभाळला जाण्यापेक्षा त्यांचा तोल जाण्याचीच अधिक शक्यता असते.

### अडचणी

#### (१) सत्यकथन

' सत्यकथन ' ही आत्मचरित्राची सर्वांत महत्त्वाची कसोटी आहे. बोरगावकर आत्मचरित्रातील सत्याविषयी म्हणतात, " आत्मचरित्र एकदाच एकाकडून लिहिले जात असल्याने सत्यदर्शनावर भर हवा." [57] समीक्षक मा. का. देशपांडे आत्म-चरित्रातील सत्याची महती सांगतात, " ज्याला फुलांचे कौतुक नाही तो उत्तम कवी होऊ शकणार नाही, ज्याला मुलांचे कौतुक नाही तो थोर तत्त्वज्ञ होऊ शकणार नाही व ज्याला सत्याची कदर नाही तो आदर्श आत्मचरित्रकार होऊ शकणार नाही." [58] रा. कृ. लागू यांच्या मते सत्य म्हणजे, " आत्मचरित्राचा कलिजा होय." [59] बोरगावकरांना आत्मचरित्र एकदाच लिहिले जात असल्याने सत्यकथन आवश्यक वाटते तर मा. का. देशपांड्यांच्या मते ' सत्य ' सांगणे आदर्श–आत्मचरित्राचे लक्षण ठरते. याहीपुढे जाऊन डॉ. लागूंनी सत्याला 'कलिजा'इतके महत्त्व

---

[56] James Boswell, The life of Samuel Johnson, Vol. I, London, 1904, P. 1

[57] व. रा. बोरगावकर यांचे पत्र, परिशिष्ट, पृ. ३९० (प्रस्तुत प्रबंध)

[58] मा. का. देशपांडे, साहित्य साधना, पुणे १९६१, पृ. ३८३

[59] रावबहादूर दादोबा पांडुरंग, संपा. अ. का. प्रियोळकर, मुंबई, १९४७ पृ. १६

पूर्ण स्थान दिले. ही सर्व मते स्वीकारार्ह वाटतात. आत्मचरित्रात लेखकाला स्वतःविषयी सत्य सांगायचे असते. जसे घडले तसे सांगायचे हेच त्याचे ध्येय ठरते. चरित्रापेक्षा आत्मचरित्रात सत्याचा खराखुरा आविष्कार व्हायला पाहिजे अशी वाचक अपेक्षा करतात.

सत्य सांगणे आवश्यक आहे हे मान्य केले तरी सत्याला तीन बाजू असल्याचे जाणवते. (१) स्वतःला दिसणारे सत्य, (२) प्रतिपक्षाला दिसणारे सत्य आणि (३) प्रत्यक्षात असणारे सत्य. यातील कोणते सत्य स्वीकारायचे हा प्रश्न निर्माण होतो. सत्य बोलणे एखाद्या वेळी सोपे जाईल पण सत्य लिहिणे फार अवघड काम आहे. सत्य लिहिताना विविध अडचणी निर्माण होतात.

माणसाला स्मरणशक्ती लाभलेली आहे. परंतु त्याबरोबरच विस्मृतीची प्रवृत्तीही त्याच्या ठिकाणी दिसून येते. बऱ्याच गोष्टी तो विसरतो. बालपणीच्या सर्वच गोष्टी त्याला आठवतात असे नाही. आजोबा–आजी, आई–वडील यांसारखी वडीलधारी माणसे बालपणीच्या गोष्टी सांगतात. त्यांची स्मरणे आपल्या स्मृतीत साठवली जातात. वडीलधाऱ्यांच्या कथनात कौतुकाचाच भाग अधिक असण्याची शक्यता असते. कारण हे कथन 'आपले मूल' या दृष्टिकोणातून झालेले असते. बालपणीच्या आठवणींचा अस्सलपणा असा हरवून गेल्याची शक्यता असते.

दादोबा पांडुरंग यांनी आपल्या 'आत्मचरित्रा'त 'बाळपणाचे स्मरण' दिले आहे. मौंजीच्या वेळी चाकू आपल्या हाती आला तेव्हा आपल्याला किती आनंद झाला याची आठवण दादोबा सांगतात. पण यापूर्वी एखादी नवीन वस्तू पाहिली की, लहान मुलास कसा अपरिमित आनंद होतो याचे प्रौढांच्या दृष्टिकोणातून दादोबा विवेचन करतात. त्यानंतर पुढे दादोबा म्हणतात, "काय बाळपणाची मौज !"[60] आधीच्या लांबलचक प्रौढ विवेचनावरून ही मौज प्रत्ययाला येत नाही. 'बाळपणाचे स्मरण' कथन करताना दादोबा आई–वडिलांनी मुलांचे पालन–पोषण कसे करावे यासंबंधी पाठ देतात. स्त्री–शिक्षणाचा देशकल्याणाशी किती निकटचा व अपरिहार्य संबंध हे पटवून सांगतात. बालपणाचा असा प्रौढ व प्रगल्भ दृष्टीतून विचार मांडण्याचा प्रयत्न केला की बालपणीची मजाच संपते. आत्म-कथनाऐवजी आत्मचरित्रकार हा भाष्यकाराची भूमिका घेताना दिसतो आणि हे बाळपणाविषयीचे भावडे विवेचन रूक्ष, नीरस व कंटाळवाणे होऊन बसते.

कुठल्याही प्रकारचे भाष्य न करता हंसाबाई वाडकर आपल्या बालपणाचा एक प्रसंग सांगतात. "एकदा मी आणि भाऊ शेजारच्या पारिजातकाच्या झाडावर खेळत असताना मी उंचावरून धपकन खाली पडले. इतका सपाटून मुका मार

[60] रावबहादूर दादोबा पांडुरंग, संपा. अ. का. प्रियोळकर, मुंबई, १९४७, पृ. ३२

बसला होता की, काही वेळ बोलताच येईना. भाऊ म्हणाला, "घरी आईला सांगू नकोस पडलीस म्हणून." 'सांगेन जा' मी म्हणाले. तो अजीजी करू लागला. "हवं तर तुला खाऊला पैसे देतो पण घरी सांगू नकोस." मी घरी सांगितलं नाही.[61] छोटी बहीण पडल्यावर पुढचा परिणाम आठवून दादाची उडालेली घाबरगुंडी, मोठेपणाची आठवण होऊन स्वतःच्या बचावासाठी त्याने गाजवलेली दादागिरी, मी तुझे ऐकत नाही 'सांगेन जा' हे बाळपणाच्या हूडपणाने छोट्या बेबीने (हंसाबाईंनी) दिलेले उत्तर, दादाच्या अजीजीपेक्षा खाऊच्या लालचीने गप्प बसणे बाळपणाची मौज अनुभवास आणून देते.

प्रौढ वयातही अनेक प्रसंगांची आणि व्यक्तींची आठवण पार बुजलेली असते. जो भाग स्पष्ट आठवतो त्यातही निर्भेळ सत्य सापडणे अवघडच आहे. कारण पूर्वायुष्यात अनुभवलेल्या दुःखांची आणि संकटांची स्मृती नंतर सुखकारक होते. सत्याची फसवेगिरी येथेच संपत नाही तर केव्हा केव्हा अशी वेळ येते की सत्याची वाट सोडून कल्पनाशक्ती नेईल तिकडे लेखक वाहवत जातो. आपण सत्याला सोडत आहोत याची लेखकाला जाणीव नसते असे नाही. परंतु सत्याकडे जाणून-बुजून कानाडोळा केला जातो. आपण निर्मिलेल्या कल्पनारम्य जगात वावरताना त्याला पार्थिव सृष्टीचा विसर पडतो. त्यामुळे सत्य आपोआप दूर ढकलले जाते.

लेखकाला आपल्या चरित्रात प्रत्येक व्यक्तीचा आणि घटनेचा ऊहापोह करता येत नाही. कारण काही व्यक्ती हयात असल्याने आत्मचरित्रात त्यांचा उल्लेख करून गुप्त बनाव उजेडात आणले तर त्या व्यक्तीच्या भावना दुखावल्या जातील याची लेखकाला भीती वाटते. ही भीती त्याला सत्य सांगण्यास रोधून ठेवते. अशा प्रकारे सत्य लपविले जाते.

स्वतःच्या लैंगिक अनुभवांचे निवेदन करताना माणसाला संकोच वाटतो. भारतीय संस्कृतीत या संकोचाला मानाचे स्थान मिळाले आहे. त्यामानाने पाश्चात्य संस्कृतीला लैंगिक संबंधाचे चित्रण करणे वावडे नाही. हॅवलॉक एलिस यांनी 'A Natural history' या आत्मचरित्रात लैंगिक संबंधाच्या अनेक आठवणी सांगितल्या आहेत. एथेल मॅनिन यांनी Confessions and impressions या आत्मचरित्रात लहानपणापासून आपल्या मनात लिंगविषयक जाणीव कशी निर्माण झाली याचे मनमोकळेपणाने वर्णन केले आहे. Isadora Duncan यांनी 'My life' या आत्मचरित्रात स्वतःच्या प्रेमसंबंधाचे निःसंकोचपणे चित्रण केलेले आढळते. अलीकडील 'मातीची चूल': आनंद साधले, 'अजून चालतेची वाट': आनंदीबाई विजापुरे, 'पानाआडचे फूल': आशालता सावे वगैरे आत्मचरित्रांत लैंगिक विषयाचे बरेच मनमोकळे चित्रण झालेले दिसते. पण एकंदरीत

[61] हंसा वाडकर, सांगत्ये ऐका, आ. दु. पुणे, १९७२, पृ. ५

अशी आत्मचरित्रे अपवादानेच सापडतात. परंपरेने म्हणा, निसर्गतः म्हणा लाभलेल्या या संकोचाने सत्याला काट मिळते. सभ्यतेच्या मर्यादा सांभाळण्याच्या या प्रयत्नाने सत्य दडविले जाते.

सत्यातील अडचणी सांगताना डॉ. सदा कऱ्हाडे म्हणतात, "... काही आठवणी आपण त्या त्या काळात या ना त्या प्रकारे टिपून ठेवतो. '... मनी वसे ते स्वप्नी दिसे.' आपल्याला वारंवार अनेक स्वप्ने पडलेली असतात. आपल्या जीवनाचा आणि विचारांचा काही भाग हा स्वप्नांनीच सिद्ध झालेला असतो. पण आपल्याला स्वप्नांचे विस्मरण होते. आत्मकथनात सत्य सांगायचे म्हटले तरी त्यात स्वप्नांचा अभाव असतोच ..." [62] डॉ. कऱ्हाड्यांचे मत विचार करण्यासारखे वाटते.

आत्मचरित्रकार सामान्य असला किंवा असामान्य असला तरी अंतर्यामी स्वतःवर बेहद्द खूष असतो. आपण मिळविलेले यश जसे त्याला मोठे दिसते तसेच आपण सोसलेले दुःखही त्याला असाधारण वाटते. मग बुजलेल्या जखमांचे व्रणही योद्ध्यांच्या थाटात अंगावर मिरवले जातात. आपले आयुष्य निरर्थक किंवा क्षणभंगूर आहे ही कल्पनाही त्याच्या मनाला कधी शिवत नाही. उलट आपले आयुष्य दीपस्तंभाप्रमाणे इतरांना मार्गदर्शक होईल व त्या प्रकाशात अनेकांना खाच-खळगे सोडून राजमार्गावरून जाता येईल असा त्याचा समज असतो. यापायी सत्याचा विपर्यास केला जातो.

मानवी व्यवहारात स्मरणशक्ती ही कळत नकळत काम करीत असते. किंबहुना काही गोष्टी स्मरणशक्तीकडूनच घडविल्या जातात. ज्याला आपण स्मृतिजन्य अनुभव म्हणतो ते स्मरणशक्तीनेच घडविलेले असतात. काही गोष्टी तीच रद्द करीत असते. दैनंदिन व्यवहारातल्या प्रत्येक क्षणीच्या घटितांचा संग्रह करणे तिला शक्य नसते. संस्मरणीय घटना आणि व्यक्तीच ध्यानात राहतात. नावडत्या गोष्टी मनात मूळ धरू शकत नाहीत. माणसाच्या स्मरणातून त्या नकळतपणे निसटतात. या नैसर्गिक नियंत्रणाचा उपयोग सत्य लपविण्याकडे होतो.

प्रांजलपणा तर दिसावा पण आपल्याबद्दल जनतेचे मत वाईट होऊ नये अशा द्वंद्वात मन सापडते. या संदर्भात श्रीमती दुर्गा भागवत म्हणतात, "मनच मनाला भिते, मनच मनावर मोहून जाते, मनच मनाला क्लृप्त्या शिकवते; दुसऱ्याच्या नजरेतून स्वतःकडे बघण्याची सवंग युक्ती सांगते, मन आतल्या खुज्या माणसाची देवतुल्य, मनोरम भव्य मूर्ती घडवते." [63] मनाकडूनच स्वतःच्या प्रति-

[62] सदा कऱ्हाडे, चरित्र–आत्मचरित्र, मुंबई, १९७६, पृ. ८९

[63] दुर्गा भागवत, आत्मचरित्राच्या अनुषंगाने काहीबाही, डूब, मुंबई, १९७५ पृ. ७७

मेचा विपर्यास केला जातो. सत्याने काही गैरसमज झाला तर हे कल्पित आहे या सबबीआड आत्मचरित्रकाराला दडता येत नाही. यावरून सत्याबद्दल आत्मचरित्र-काराला प्रीती नसते असा निष्कर्ष काढता येणार नाही. काही तरी कारण घडून ते टाळले जाते किंवा आपणहून बाजूला सरते.

सत्याच्या बाबतीत अशा अडचणी निर्माण होत असल्याने जर्मन कवी गटे याने आपल्या आत्मचरित्राला ' Poetry and truth ' असे नाव दिले आहे तर केशवराव भोळयांनी आपल्या आत्मचरित्राला 'जे आठवतं ते' हे शीर्षक दिले आहे. सत्यासंबंधीच्या अनंत अडचणी लक्षात घेऊन–श्रीमती मालतीबाई बेडेकर आत्मचरित्राचे, "शब्द सुटलेले धडे "[64] असे वर्णन करतात.

आत्मचरित्रकार स्वत:विषयी म्हणून जे सत्य सांगत असेल ते वाचकांना स्वीकारावेच लागते. गो. नी. दांडेकरांनी ' पालथ्या–उताण्या ' वयातच आपल्याला निसर्गसौंदर्याचे वेड लागल्याचे सांगितले आहे. हे त्यांनी सांगितलेलें सत्य वाचकाला अन्य कोणत्याही मार्गाने पारखून घेता येत नाही. लेखकाने सांगितलेले म्हणून ते खरे मानावेच लागते.

जे सांगायचे आहे ते जसे घडले तसे प्रांजळपणे–प्रामाणिकपणे सांगितले म्हणजे सत्याच्या बाबतीत साशंकता निर्माण होणार नाही. स्वत:च्या गुणांबरोबरच दोषांचेही यथातथ्य चित्रण केल्याची जेव्हा वाचकांची खात्री पटते तेव्हा आत्म-चरित्रकाराला त्याच्या सत्यप्रियतेबद्दल शाबासकी दिली जाते. ' स्मृतिचित्रे ': लक्ष्मीबाई टिळक, ' सांगत्ये ऐका ': हंसा वाडकर, ' गेले ते दिवस ': सत्यभामाबाई सुखात्मे, ' माझे पुराण ': आनंदीबाई कर्वे, ' सत्याचे प्रयोग ': महात्मा गांधी वगैरे आत्मचरित्रें 'सत्यकथन ' ही कसोटी पाळलेली म्हणून सांगता येतील.

आत्मचरित्रातील सत्य ऐतिहासिक कादंबरी, आत्मचरित्रात्मक कादंबरी आणि ललित साहित्यातील सत्यापेक्षा वेगळे असते. इतिहासातील एखादा प्रसंग, एखादी घटना निवडून त्यावर ऐतिहासिक कादंबरी लिहिली जाते. मूळ ऐतिहासिक प्रसंग जसाच्या तसा घेऊन नंतर इतर भाग काल्पनिक घालून कादंबरी लेखन करावे अशी मर्यादा कादंबरीकाराला घातली जात नाही. त्या कादंबरीवरून इतिहासाचे सत्यदर्शन आपल्याला घडेलच याची निश्चिती देता येत नाही व तशी अपेक्षाही करता येत नाही. हिंदीतील प्रसिद्ध साहित्यिक आचार्य चतुरसेन यांचे विचार या दृष्टीने मननीय वाटतात. "यह प्रकट है कि, ऐतिहासिक उपन्यास, काव्य और कहानियों में जो ऐतिहासिक तथ्य होते है वे विशुद्ध ऐतिहासिक नही। उनमें बहुत कल्पना और विकृती मिली होती है। पाठकोंको यह आशा नही करनी चाहिए की ' उपन्यास ' काव्य या कहानीको पढकर वे ऐतिहासिक ज्ञान-

[64] मालतीबाई बेडेकरांचे पत्र, परिशिष्ट

अर्जन करेंगे ऐसी पुस्तकोंमें तो उन्हे इतिहासके स्थानपर केवल 'इतिहास रस' ही प्राप्त होगा।"[६५] ऐतिहासिक कादंबरी, काव्य यांच्याकडून इतिहासाच्या सत्य-दर्शनाची अपेक्षाच करता येत नाही.

आत्मचरित्रात्मक कादंबरीत लेखक स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव न होऊ देता त्यातील एका किंवा अनेक पात्रांशी तादात्म्य पावतो. त्यामुळे त्याचे वेगळे अस्तित्व उरत नाही. या कारणास्तव एका विवक्षित दृष्टिकोनाने जगाकडे पाहणे व जगाचे चित्र रंगविणे त्याला सहज शक्य होते. आत्मचरित्राप्रमाणे लेखनात एक प्रकारचा जिव्हाळा निर्माण करता येतो. एकसूत्रीपणा आणता येतो. पण कादंबरी म्हटली की त्यात कल्पित भाग आलाच ! त्यातील कल्पनाविलाससंबंधी कुणा-लाही आक्षेप घेता येत नाही. आत्मचरित्राप्रमाणे 'निर्भेळ सत्य' आत्मचरित्रात्मक कादंबरीत असू शकत नाही व असावे अशी अपेक्षाही केली जाणार नाही. या कारणास्तव आत्मचरित्रपर कादंबरीला 'काल्पनिक आत्मचरित्र' असेही म्हटले जाते. कादंबरीकार पात्राचा विशिष्ट दृष्टिकोण कल्पून कादंबरी लिहीत असतो. त्यामुळे फक्त तेवढी एकच बाजू आपल्याला कळते. दुसरी अबोध राहते. आत्म-चरित्रात असे होत नाही.

ललित लेखक आपल्या अनुभवांची एक संगती अगर आकृती निर्माण करीत असतो. लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाच्या अगर अनुभवाच्या पद्धतीच्या संस्कारातून अनुभवांची जी संगती जुळते तिचे स्वरूप तार्किक नसते तर कलात्मक असते. त्यात हवे तसे फेरफार त्याला करता येतात. ज्या अनुभवावरून त्याला लेखन सुचले असेल त्या अनुभवातील सगळे तपशील तो आपल्या कलाकृतीत घेतोच असे नाही. तो अनुभव प्रकट होण्यास आवश्यक तेवढाच मजकूर घेतल्या जातो. वास्तवातल्या सत्याचा साहित्यात कितपत उपयोग करायचा ते लेखकाला ठरवावे लागते. या निवडीत आवश्यकता व औचित्य असते. कलाकृतीसाठी आवश्यक तेथे कल्पिताचा उपयोग करण्याची त्याला पूर्ण मुभा असते. न घडलेल्या घटना तो कल्पनेने उभ्या करू शकतो. परंतु त्या असत्य ठरत नाहीत. त्या कलाकृतीत वापरल्या गेल्याने कलाकृतीपुरत्या तरी 'सत्य' असतात. घटित वा प्रत्यक्ष सत्य, शास्त्रीय सत्य, आत्मसापेक्ष, त्रिकालाबाधित सत्य, अशी सर्व प्रकारची सत्ये ललित कलाकृतीत येतात. ललित साहित्यातील सत्य कलात्मक सत्य म्हणून ओळखले जाते. ललित साहित्यात वापरली गेलेली एखादी घटना सत्य आहे की नाही हे तपास-ण्याची कसोटी प्रत्यक्षात हे असे घडते का ? किंवा असते काय ? ही नसून त्या

---

[६५] आचार्य चतुरसेन, वैशालीकी नगरवधू (उत्तरार्ध) स्थ. ना., १९४६, पृ. ७९३

साहित्यकृतीत ती घटना कोणते कार्य करीत आहे, तिची योजना कशासाठी झाली आहे, आपले नियुक्त कार्य ती यथायोग्य करते की नाही ही आहे.

ऐतिहासिक कादंबरी, आत्मचरित्रात्मक कादंबरी आणि ललित साहित्य यांतील सत्यात व आत्मचरित्रातील सत्यात काही बाबतीत साम्य असले तरी ऐतिहासिक कादंबरी, आत्मचरित्रात्मक कादंबरी व ललित साहित्यातील सत्याला कल्पनेची बाधा नसते तर आत्मचरित्रातील सत्याला कल्पनेचा वाराही चालत नाही. तेथे फक्त घटिताची (Fact) ची अपेक्षा केली जाते. ते व्यक्तिसापेक्ष व मर्यादित असते. त्यामुळे आत्मचरित्रातील सत्य इतर साहित्यप्रकारातील सत्यापेक्षा वेगळे ठरते.

**(२) तटस्थवृत्ती**

तटस्थवृत्ती ही आत्मचरित्राची आवश्यक अट. हेरॉल्ड निकलसन यांनी आत्मचरित्राचे लक्षण, "Scientific autopsy and rigorous postmartem,"[66] मानले आहे.

आपले जीवन आपण तटस्थवृत्तीने पाहिले तरच ते आत्मचरित्र आत्मश्लाघा, आत्मसमर्थन या दोषांपासून अलिप्त राहू शकते. 'माझे चरित्र घडले तसे लिहा' असे नारायण वामन टिळकांनी सांगितले. लक्ष्मीबाईंनी तटस्थतेचे हे धोरण चांगले पाळले. टिळकाज्ञेतून जी 'स्मृतिचित्रे' निपजली ती अमर झाली. यथातथ्य चित्रण करणे ही तारेवरची कसरत आहे. आपण कसे आहोत हे समजून घेण्याच्या भरीस न पडता आपण लोकांना कसे दिसावे यासाठीच माणसाची धडपड चालू असते. त्याचा हा स्वभावच आहे. त्यामुळे आत्मचरित्रात तटस्थता पाळणे कठीण होऊन बसते.

आपल्या चुका जाहीरपणे कबूल करायला माणसाला सर्व अहंकार बाजूला ठेवावा लागतो. याशिवाय आपल्याला आपल्याकडे तटस्थवृत्तीने पाहता येत नाही. सारा अहंभाव नष्ट होणे ही महान योग्यांनाही साधण्यास कठीण अशी साधना होय. आपल्या गत जीवनाचे रूप आपल्याला नेहमीच लोभस दिसते. त्यातील संकटे, दुःखे काही कालावधीनंतर शीतल होतात. नकळतपणे आत्मचरित्रकाराकडून आत्मसमर्थन, आत्मप्रदर्शन केले जाते. वा. ल. कुलकर्ण्यांच्या मते, "आत्मसमर्थनार्थ व आत्मगौरवार्थ लिहिलेले आत्मचरित्र हे आत्मचरित्र होऊ शकत नाही."[67] भूतकाळासंबंधी आपल्याला काय वाटते हे सांगणे कठीण व ते लिहून काढणे अधिक कठीण काम आहे.

---

[66] Herold Nicolson, Development of English biography, London, 1947

[67] वा. ल. कुलकर्णी, वाङमयीन टीपा आणि टिप्पणी, ति. आ, मुंबई, १९७०, पृ. १०९

स्वत:कडे तटस्थवृत्तीने पाहण्यातही अशा अनेक अडचणी येतात. यावरून स्वत:ला न्याहाळणे किती अवघड आहे हे कळते. दुसऱ्यांचे परीक्षण चटकन करता येते पण स्वत:चे मात्र करता येत नाही; ही वस्तुस्थिती आहे.

(३) 'स्व 'ला केंद्रस्थान

आत्मचरित्राचे सौंदर्य 'स्व 'दर्शनात साठलेले असल्याने आत्मचरित्रात आत्मचरित्रकाराला केंद्रस्थान मिळायला पाहिजे. मनुष्य समाजशील प्राणी असल्याने लेखकाबरोबर इतर व्यक्तींचे चित्रण येणारच ! तरीही स्वत:चे केंद्रस्थान सुटता कामा नये. Prof. Roy Pascal या संदर्भात म्हणतात, " In the autobiography proper attention is focussed on the self.[68] कार्लाइलचे पुढील मतही याला पुष्टी देणारे आहे. " A hero is hero at all points." 'स्व 'दर्शन साधले नाही तर आत्मचरित्राचे महत्त्वच राहणार नाही.

बरेचदा आत्मचरित्रात पात्रांची खूप गर्दी होते. त्यामुळे प्रत्येक पात्राला नीटपणे उभे करता येत नाही व 'स्व 'कडेही लक्ष पुरविले जात नाही. याचा परिणाम असा होतो की, कुठलीच प्रतिमा सुस्पष्ट होताना दिसत नाही. तर केव्हा केव्हा 'स्व ' प्रतिमा बाजूला सारली जाऊन इतर व्यक्तींच्याच प्रतिमा गडद होतात. उदाहरणार्थ, स्त्रियांनी पतीसाठी लिहिलेली आत्मचरित्रे. 'आमच्या आयुष्यातील काही आठवणी ' : रमाबाई रानडे, 'आमची अकरा वर्षे' : लीलाबाई पटवर्धन, 'माझा नंदादीप ' : लक्ष्मीबाई पटवर्धन वगैरे. अशा प्रकारच्या आत्मचरित्रांना 'आत्मचरित्रे ' म्हणावे, 'सहचरित्रे ' म्हणावे की 'संयुक्त चरित्रे ' म्हणावे असा प्रश्न उपस्थित होतो.

(४) घटनांची निवड व कुशल मांडणी

आत्मचरित्रकाराला आत्मचरित्र कुठूनही सुरू करता येते व कुठेही संपविता येते. त्याने आत्मचरित्र जन्मबिंदूपासूनच सुरू केले पाहिजे असे नाही. त्याबाबतीत तो पूर्णपणे बंधमुक्त असतो.

Alfred Nobel याने आपले आत्मवृत्त His existance should have been terminated at birth by human doctor, as he drews his first howling breath. Principal virtues : Keeping his hails clean and never being a burden to any one. Principal faults : That he has no family, is bad tempered and has poor digestion. One and Only wish : Not to be buried alive. Greatest sin : That he does

---

[68] Roy Pascal, Design and Truth in Autobiography, London 1962, P. 41

not worship Mammom. Important events in life : None. [69] जन्म; आयुष्यातील प्रमुख तत्त्वे, प्रमुख दोष व इच्छा, गुन्हा सांगून अगदी थोडक्यात आटोपले आहे. असे उदाहरण मराठीत आढळत नाही. 'माझे पुराण' : बाया कर्वे, 'माझी कहाणी' : पार्वती आठवले ही आत्मचरित्रे छोटी आहेत तर आचार्य अत्रे यांचे 'कऱ्हेचे पाणी,' न. वि. गाडगीळ यांचे 'पथिक,' गंगूबाई पटवर्धन यांचे 'चाकोरीबाहेर' ही प्रदीर्घ आहेत.

घटनांच्या निवडीसंबंधी आंद्रे मोर्वा म्हणतात– "A biographer or autobiographer is obliged to omit from his narrative, the common place of daily life and to limit himself almost exclusively to salient events, actions and traits. The writing and the reading of the bulky volumes, otherwise required would be alike impossible." [70] आयुष्यातील सर्वसामान्य घटनांची काटछाट करून काही ठळक, ठसठशीत प्रसंगांच्या साह्याने आपली व्यक्तिरेखा सादर करण्याचा प्रयत्न आत्मचरित्रकाराला करावा लागतो.

आपल्या जीवनात घडलेली एखादी घटना दुसऱ्यांना फार महत्त्वाची आणि मोठी वाटते, पण आपल्याला ती आठवतही नाही. कारण व्यक्तित्वाच्या घडणीत कोणताही भाग न घेता ती संपलेली असते. इतरांच्या दृष्टीने ती घटना कितीही मोठी असली तरी तिला आत्मचरित्रात स्थान मिळण्याचे कारण नाही. याउलट दुसरी एखादी घटना इतकी क्षुद्र असते की त्यात भागीदार, साक्षीदार असलेले इतर लोक ती घटना विसरलेले असतात, पण आपल्या स्मरणात ती पक्की नोंदवलेली असते. ती कितीही लहान असली तरी व्यक्तित्वाच्या घडणीत तिचा हातभार लागलेला असतोच ! म्हणून तिला आत्मचरित्रात स्थान मिळायला हवे.

आत्मचरित्रात कोणत्या गोष्टी घ्याव्या व कोणत्या घेऊ नये हे अखेरी आत्मचरित्रकारालाच ठरवायला पाहिजे. कारण आपल्या दृष्टीने कितीही योग्य वाटत असले तरी टीकाकार टीका करणारच ! जे सांगितले जाते त्याबद्दल समीक्षक म्हणतात, "हे सांगायला नको होते." आणि जे सांगितले जात नाही त्याबद्दल समीक्षक म्हणतात, "हे सांगायला हवे होते. ते न सांगितल्याने आत्मचरित्रात काही जागा कोऱ्या सुटल्या आहेत. आत्मचरित्र अपुरे वाटते." वगैरे वगैरे ! व्यक्ती तितक्या प्रकृती हे विसरून चालणार नाही. स्वतःच्या गुणांचे दिग्दर्शन

---

[69] बाळ सामंत, हितगूज मुंबई, १९६५, पृ. १७ वरून उद्धृत.

[70] Andre Marous, Aspects of biography C. U. P. 1929, P. 141

करावे तर आत्मश्लाघेचा दोष घडतो. स्वतःचे दोष दाखवावे तर विनयाचा किंवा भोंदूपणाचा आव येतो. त्यामुळे अडकित्त्यात सुपारी अशी आत्मचरित्रकाराची गत होते.

ज्या घटनांतून व्यक्तिमत्त्व ठळकपणे उभे राहील त्या घटना जशाच्या तशा मांडल्या तर आत्मसमर्थन किंवा विनयाचा आरोप येण्याची शक्यता राहणार नाही. परंतु त्या घटनांमधून स्वतःच्या योग्यतेसंबंधी किंवा स्वकार्याच्या महत्त्वासंबंधी आत्मचरित्रकार स्वतः निकाल देऊ लागला तर ते आत्मसमर्थन ठरेल. आत्मचरित्रकाराने कुठल्याही बाबतीत निकाल देऊ नये. तो वाचकांवर सोपवावा. म्हणजे कुठलाही आरोप न येता सुंदर कलाकृती निर्माण होईल.

घटनांची निवड झाल्यावर त्यांची मांडणी कुशलतेने करता यायला पाहिजे. नाहीतर घटना एकापुढे एक मांडत असताना एखादी घटना मध्येच आठवते. त्याजागी तिला अकारण स्थान दिले जाते. आत्मचरित्रातील कलामूल्यांची अशी हेळसांड होते. आपल्या आयुष्यातील घडामोडींची चित्रे साधारणपणे सर्वांच्याच मनश्चक्षूंसमोर उभी असतात पण ती शब्दसृष्टीत रंगविण्याची कुशलता फारच थोड्या लोकांच्या अंगी असते.

**(५) वस्तुस्थितिदर्शक निवेदन**

आत्मचरित्र वस्तुस्थितिदर्शक व्हायला पाहिजे. संस्मरणीय घडामोडींनी आयुष्यातील फक्त दहा किंवा पंधरा वर्षांचा भाग व्यापलेला असतो. उरलेल्या आयुष्यातील आजचा दिवस कालच्यासारखा आणि उद्याचा दिवस आजच्यासारखा अशी स्थिती असते. परंतु लेखकाला याचा पूर्णपणे विसर पडतो. आपण ज्या परिस्थितीत आहोत, जसे आहोत त्यापेक्षा आपण कोणत्या परिस्थितीत असावे, कसे असावे याचा विचार करणेच त्याला अधिक आवडते. कल्पनासृष्टीतले जिणे अधिक सुखद व आनंददायक असते. त्यामुळे या चित्रणाला प्राधान्य मिळून आत्मचरित्र वस्तुस्थितिदर्शक होत नाही. ' आत्मस्तोत्र ' गाण्याची सर्वसामान्य माणसाला हौस असल्याने बऱ्याच अवास्तव गोष्टींना आत्मचरित्रात स्थान मिळालेले आढळते. घडलेल्या घटनांपैकी अशाच घटनांची निवड करावी की ज्या वाचकांच्या बुद्धीला पटू शकतील व पेलू शकतील. अशा घटनांची निवड झाल्याने ते आत्मचरित्र वस्तुस्थितिदर्शक होईल.

सत्यता, तटस्थता, ' स्व 'ला केंद्रस्थान, घटनांची निवड व कुशल मांडणी, वस्तुस्थितिदर्शक निवेदन या गुणांव्यतिरिक्त जान्हवी संत यांच्या मते " आत्मचरित्रकारांच्या अंगी शालीनता, दुसऱ्यांबद्दलची आपुलकी, समयसूचकता, हृदयंगम व सरस भाषाशैली हे गुणही आवश्यक आहेत." [71] स्वतःचे व दुसऱ्याचे गुणदोष

---

[71] जान्हवी संत, चरित्र–आत्मचरित्र, कोल्हापूर, का. ना. पृ. ४५

स्पष्टपणे दाखविण्यासाठी माणसाच्या अंगी शालीनता असावी लागते. इतर व्यक्तींच्या कुचाळक्या करून त्यांची टवाळी करण्यापेक्षा त्यांच्याकडे आपुलकीने पाहणे अधिक आवश्यक असते. काय लिहावे व काय लिहू नये याचे तारतम्य समयसूचकतेने पाळले जाणे आवश्यक आहे.

आत्मचरित्र कोणी लिहावे असाही एक प्रश्न आत्मचरित्रासंबंधी विचार करताना उपस्थित होतो. मृणालिनी देसाई म्हणतात, " आत्मचरित्र हा वाङमय-प्रकार प्रत्येक व्यक्ती हाताळू शकेल इतका त्याचा फलक मोठा आहे आणि गंमत अशी की, ज्या व्यक्तीकडे तो जातो त्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वासारखा आकार घेऊन तो आपल्या पुढे येतो." [72] असे आत्मचरित्राचे क्षेत्र विस्तृत आहे. बहुतेकांचे आयुष्य हे ठराविक चाकोरीतून जात असते. सकाळी उठायचे, जेवणाची वेळ झाली की जेवायचे, ऑफीसमध्ये जायचे, संध्याकाळी घरी यायचे, जेवायचे व झोपायचे असे साचेबंद आयुष्य बहुतेक लोक जगत असतात. त्यांच्या आयुष्यात सुख-दुःखे असतात पण ती सांगण्यासारखीही नसतात व ऐकण्यासारखीही नसतात. जीवनात काहीतरी सांगण्यासारखे असेल त्यानेच आत्मचरित्र लिहावे. नाहीतर आत्मचरित्र वाचणे कंटाळवाणे होईल. आत्मचरित्र कोणी लिहावे या संदर्भात श्रीमती दुर्गा भागवत यांचे विचार पटणारे आहेत. त्या. म्हणतात, " आत्मचरित्र लिहायचे तर जीवनाला घाट हवा, सूर हवा, रंग हवा." [73]

आत्मचरित्र कोणी लिहावे यावर कोणालाच बंधन घालता येत नाही. असामान्य व्यक्तीबरोबरच सामान्य व्यक्तीही आत्मचरित्र लिहू शकेल. सामान्य व्यक्तीचेही आत्मचरित्र वाचनीय होऊ शकते यासंबंधी कृ. पां. कुलकर्णी आपले विचार मांडतात, " जीवन सामान्य झाले तरी त्यात चमत्कार हे असायचेच. एखाद्या टांगेवाल्याच्या आयुष्यात नाही का चटका लावणारे प्रसंग आढळत ? एखाद्या आरामगृहाच्या वाढप्याच्या जीवनातसुद्धा नाही का सांगण्यासारखे पुष्कळ असत ? हे व्यवसायही क्षुद्र नाहीत व त्यातील जीवनही कधी क्षुद्र नसते. आयुष्य कुणाचेही झाले तरी त्यात काही राम असतोच. इतकेच नव्हे तर अशा सामान्य जीवनातच प्रसंग इतके काव्यात्मक व नाटयात्मक असतात की त्यापुढे काल्पनिक काव्य व नाटय फिके पडावे." [74] जिणे सामान्य असले तरी ज्याच्या आयुष्यात चटका लावणाऱ्या गोष्टी आहेत त्याचे आत्मचरित्र वाचनीय होईल.

---

[72] मृणालिनी देसाई यांचे पत्र, परिशिष्ट (प्रस्तुत प्रबंध)

[73] दुर्गा भागवत, आत्मचरित्राच्या अनुषंगाने काहीबाही, डूब, मुंबई, १९७५, पृ. ७५

[74] कृ. पां. कुलकर्णी, कृष्णाकाठची माती, प. आ. मुंबई, १९६१, पृ. ४

आत्मचरित्राचा लेखक कोणी महापुरुष किंवा कोणी महात्मा असावा लागतो असे नाही. शिक्षक, व्यापारी, सैनिक, वैमानिक, कारखानदार, मजूर, शेतकरी, डॉक्टर, राजकारणी, ड्रायव्हर, अशी मानवाची कार्यक्षेत्रे सर्वव्यापी आहेत. त्या त्या क्षेत्रातील माहिती त्या त्या लोकांनाच सर्वाधिक चांगली असण्याची शक्यता आहे. तेव्हा या नानाविध क्षेत्रांत वावरणाऱ्या लोकांनी आपले अनुभव, आपले जीवनप्रसंग, आपली सुखदु:खे वर्णन केली तर उत्कृष्ट साहित्य निर्माण होईल. ही आत्मचरित्रे वाचनीय होतील. ज्ञान आणि मनोरंजन असे दोन्ही हेतू या आत्मचरित्रांद्वारे साधले जातील. आत्मचरित्रे सामान्य लोकांची असल्याने अधिक लोकप्रियता पावतील व लोकांना अधिक जवळची वाटतील. पाश्चिमात्य वाङमयात अनेक सामान्य लोकांची आत्मचरित्रे लिहिलेली आढळतात व ती प्रसिद्धीही पावलेली दिसतात. थॉमस बर्ट या खाणकामगाराने मजूर चळवळीत भाग घेऊन शेवटी कामगारांचा नेता होईपर्यंत कशी मजल मारली याचा वृत्तांत सादर करणारी आत्मकथा लिहिली आहे. जॉर्ज एडवर्ड या शेतमजुराने पार्लमेंटचा सभासद होईपर्यंत केलेल्या प्रगतीचे वर्णन, 'The Autobiography of a supertramp' या आत्मचरित्रात केले आहे. मेरी बेटी या दरोडेखोर स्त्रीने ' Tiger Woman ' या नावाने आपली आत्मकथा प्रकाशित केली आहे. अलीकडे आपल्याकडेही सामान्य लोकांची आत्मवृत्ते झपाट्याने प्रकाशित व्हायला लागली आहेत.

आत्मचरित्र केव्हा लिहावे हा देखील एक महत्त्वाचा प्रश्न आहे. यासंबंधी विविध समीक्षकांनी विविध मते मांडलेली आढळतात. आनंद साधल्यांच्या मते, "स्वत:च्या मनासमोर नागवे होऊन स्वत:च्या विकृती पाहण्याचे सामर्थ्य आले म्हणजेच आत्मचरित्र लिहावे. कुठल्याही रागालोभाची आता पर्वा नाही, काहीही कमवायचे उरलेले नाही, मानापमान झाला तरी हरकत नाही, अशी वृत्ती निर्माण झाली की आत्मचरित्र लिहावे. ही वृत्ती कधी साठीत येईल, कधी पन्नाशीत तर कधी विशीतही. या वयाचा संबंध वर्षांच्या संख्येशी नाही तर केवळ या वृत्तीशी आहे."[75] स्वत:कडे तटस्थपणे पाहण्याची तयारी झाली की आत्मचरित्र लिहावे असे साधल्यांचे मत आहे तर आयुष्याच्या मध्यावर लिहिलेली आत्मचरित्रे अधिक यशस्वी होतात असा प्रा. वा. ल. कुलकर्णी यांचा अभिप्राय आहे. "जीवनाच्या साधारण अर्ध्या टप्प्यावर येता जे जीवन आपण आजपर्यंत जगलो त्याकडे प्रश्नांकित मुद्रेने वळून पाहणारा आत्मचरित्रकार आणि जीवनातल्या शेवटल्या दिवसांत आपल्या जीवनाचे सिंहावलोकन करू पाहणारा पूर्वीचा आत्मचरित्र लेखक यांच्या वृत्तीतच मूलतः फरक आहे. जीवनाचा निरोप घेताना

---

[75] आनद साधल, आत्मचरित्राविषयी काही विचार, सत्यकथा, मुंबई, १९७२, पृ. ३७

शेवटची निरवानिरव करून आणि आपल्या आयुष्याचा जमाखर्च सादर करून एकजण जातो आहे तर दुसरा जीवनाच्या ऐन मध्यावरच थांबून आपण आतापर्यंत जो प्रवास केला त्याकडे डोळे भरून पाहण्याचा व तद्द्वारा 'आपण खरोखर कोण आहोत' हे पुढील प्रवासाच्या दृष्टीने जाणून घेण्याचा प्रयत्न करीत आहे. म्हणूनच ही नवीन आत्मचरित्रे अधिक प्रामाणिक, जीवनाचे यथार्थ दर्शन घडवू शकणारी अशी ठरत आहेत."[७६] ही आत्मचरित्रे वा. ल. कुलकर्ण्यांना प्रांजळ वाटतात. जीवनाचे यथातथ्य चित्रण घडविणारी ठरतात. आत्मशोधनाच्या दृष्टीने ही पद्धत अभिनंदनीय आहे.

आत्मचरित्र केव्हा लिहावे यासंबंधी शं. वा. किर्लोस्कर आपले विचार मांडतात. "जगाच्या रंगभूमीवरून आपण बाजूला सरकू लागलो, प्रेक्षकांच्या टाळ्या आपणांस मिळेनाशा झाल्या म्हणजे मन जरा भांबावू लागते. जुन्या गोष्टी बदलल्या पाहिजेत असे आपण ठासून म्हणत असलो तरी नव्या गोष्टींचे स्वागत करायला म्हातारी मंडळी क्वचितच तयार होतात. जग बिघडत चालले हीच त्यांची ओरड असते. अशावेळी तरुणांना नावे ठेवण्याच्या अथवा त्यांच्याशी स्पर्धा करण्याच्या फंदात न पडता आपण एका बाजूला व्हावे हेच उत्तम. अशावेळी आपला वेळ घालवायला आत्मचरित्र लिहिणे हा एक फार चांगला उपाय आहे."[७७] शं. वा. किर्लोस्कर यांचे हे विचार अंतर्मुख करणारे आहेत. प्रा. श्री. के. क्षीरसागर यांच्या मते, "हा प्रकार वार्धक्यातच हाताळण्याला अधिक सोयीचा आहे. कारण कमी शरीरबळात वाचनीय करता येण्यासारखा हाच प्रकार आहे. मात्र बरीच दुनिया पाहिल्यावर, बरीच सुखदुःखे भोगल्यावर तो हाती घ्यायला हवा."[७८] आत्मचरित्र लिहिण्यास भरभक्कम अनुभव यायला हवे असे क्षीरसागरांना वाटते. जीवनाकडे तटस्थपणे पाहण्याची तयारी झाली की आत्मचरित्र लिहावे. तेच आत्मचरित्र यशस्वी होईल. येथे वयापेक्षाही ताटस्थ्य ही वृत्ती अधिक महत्त्वाची आहे

**सद्य:काळात मराठी साहित्यात आत्मचरित्राचे महत्त्व**

सद्य:काळात मराठी साहित्यात आत्मचरित्र या वाङ्मय–प्रकाराला स्वतंत्र व महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. बहुरंगी मानवी जीवन जाणून घेण्याची जिज्ञासा माणसाला असते. हे जिज्ञासापूर्तीचे समाधान आत्मचरित्राकडून मिळू

---

[७६] वा. ल. कुलकर्णी, वाङ्मयीन टीपा आणि टिप्पणी आ. ति. मुंबई १९७०, पृ. ११२

[७७] शं. वा. किर्लोस्कर, आत्मचरित्राच्या निमित्ताने, ललित, दिवाळी, १९७४, पृ. २४

[७८] श्री. के. क्षीरसागर, तसबीर आणि तकदीर, मुंबई, १९७६, पृ. १३

शकते. किंबहुना हा एकच वाङमय–प्रकार मानवी जीवन जाणून घेण्याची जिज्ञासा पुरेपूर पुरवू शकतो असे म्हटल्यास वावगे होऊ नये. चरित्राकडून हे समाधान मिळू शकते पण त्यातील प्रसंग सांगोवांगीचे असतात. त्यामुळे सत्याच्या बाबतीत साशंकता निर्माण होते. आत्मचरित्राकडून फक्त जिज्ञासाच पुरविली जाते असे नाही तर ते वाचकालाही अंतर्मुख बनविते. आत्मशोधन करायला लावते. तो तो काळही आत्मचरित्रावरून अभ्यासता येतो. लेखकाचे अंत:करण सरळ वाचकांच्या अंत:करणाला भिडत असल्याने एक प्रकारचा जिव्हाळा या वाङमय–प्रकारात जाणवतो. कारण नवनिर्मितिक्षम ललित साहित्यातील सृष्टीप्रमाणे आत्मचरित्रातील सृष्टी ही कल्पित–सृष्टी नसते तर प्रत्यक्ष जीवनानुभवावर पोसली जाणारी पुर्नर्निमित सृष्टी असते. नुसतीच पुर्नर्निमिती नसते तर यातून गत जीवनाला एक प्रकारचा सुसंगत आकार आणि अर्थ देण्याचा प्रयत्न असतो. पुस्तकामार्फत मानवीजीवन आस्वाद्य करण्याची ती खटपट असते. कित्येकदा आत्मशोधाच्या प्रक्रियेतून आत्मचरित्रकाराला गवसणारी स्वत:ची प्रतिमा त्याला स्वत:लाच त्याचे अभिनव दर्शन घडवणारी ठरते. जीवन जसे घडले तसेच लिहिले जात असल्याने आत्मचरित्राइतका जिवंत दुसरा कुठलाही वाङमय–प्रकार आढळत नाही. जीवनाच्या धकाधकीत जे लोक कधीही पराक्रम करताना दिसत नाहीत, ज्यांचे असामान्यत्व केव्हाही नजरेस पडत नाही, ज्यांच्या कर्तृत्वनिष्ठेवर, तपश्चर्येवर जग चालते पण त्यांचे कर्तृत्व मात्र अबोल असते त्या असंख्य जीवांची जीवनयात्रा जाणून घेण्यास आत्मचरित्र हे उत्तम साधन ठरते.

* * *

२

# स्त्री-आत्मचरित्रांची परंपरा

मराठी स्त्री-वाङमयाचा मागोवा घेण्यासाठी आपल्याला थेट सहाव्या-सातव्या शतकापर्यंत मागे जावे लागते या शतकांत स्त्रियांच्या ओठांवर खेळणाऱ्या ओवी, गाणी, म्हणी, उखाणेवगैरे स्त्री-वाङमयाचा उगम आढळतो. स्त्रीने आपली सुखदु:खे या माध्यमातून शब्दबद्ध केलेली दिसतात. त्यातील आत्माविष्कारावरून त्यांना आंशिक आत्मचरित्रे म्हटल्यास वावगे होऊ नये.

जीवनातील नानाविध अनुभव ओव्यांचे विषय झालेले आहेत. कधी लहानपणी खेळलेल्या खेळांच्या आठवणी तीव्रतर होतात आणि मग त्या शब्दरूप घेऊन ओठांबाहेर पडतात-

" सईच्या कानी बुगडया बुगडया ।
आम्ही खेळू फुगडया फुगडया । " [1]

लहानपणी आवडीने खेळलेल्या 'फुगडी'ची आठवण ह्या ओवीत साठवलेली दिसते. 'बुगडया' आणि 'फुगडया' असा प्रास साधून ओवीत लय साधलेली आहे नि कानांना गोड वाटेल अशी गेयता आणलेली आहे.
केव्हा लग्नानंतरची माहेरची ओढ या ओव्यांमध्ये उमटते-

" सरलं ग दळान माजं पायली पायली ।
विसाव्याची जागा बाई माजी ती मावली । " [2]

बरेचसे दळण एकावेळी दळून झाल्यावर झालेल्या श्रमांची जाणीव होऊन आईची आठवण येते. सासरी 'एक सासुरवाशीण' म्हणून कंठाव्या लागणाऱ्या जीवनात विश्रांती मिळणार नाही याची तिला जाणीव असते. माहेरी जावेसे वाटते. पण घरात बोलण्याची सोय नसते. मग हृद्गत जात्याशिवाय कुणाजवळ सांगणार ?

---

[1] सरोजिनी बाबर, मराठीतील स्त्रीधन, आ. दु. मुंबई, पृ. १७

[2] तत्रैव, पृ. २२७

आपले सुखदु:ख सांगण्यास परंतु या कानाची गोष्ट त्या कानापर्यंत न पोचविण्यास जाते हे एक फार मोठे साधन वाटते. जात्याजवळ ती आपले मन मोकळे करते. जात्याच्या घरघरीतून तिच्या हृद्‌गताला हुंकार मिळतो. ओवीमागून ओवी असे ओव्यांचे सर विणले जातात. सासरच्या तिखट अनुभवांना ओव्यांत गुंफून आपले दाटलेले दु:ख ती हलके करते–

" आंब्याच्या सावलीत कोयाळ बोले राधा ।
घरी उतरंडी आगाशी उपाशी गेले दादा ।" [3]

'आंब्याची सावली,' कोकिळेचे मंजूळ ओरडणे पार्श्वभूमीला घेऊन स्वत:च्या घरच्या श्रीमंत वातावरणाची कल्पना दिली आहे. घरात आकाशाला भिडणाऱ्या उतरंडीची समृद्धता आहे. पण त्याचा माहेरच्या माणसांना उपयोग होऊ नये ? घरी आलेल्या भावाला उजागिरीने जेवू घालता येऊ नये ? त्याला उपाशी जावे लागावे ? काळजाला घरे पाडणारा हा सासुरवास वाटतो. ही सासुरवाशीण आपली परिस्थिती स्वत:शी आठवून म्हणते–

" सासर एवडा वस नको करुंसा सासूबाई ।
दारीच्या चाफ्यापाई दूर देशाची आली जाई ।" [4]

'चाफा' आणि 'जाई' ही समर्पक प्रतीके वापरून आपल्या मुलासाठीच मी आले आहे असे ती सांगते. वेदनेमुळे नकळत पाणावलेले डोळे पदराने पुसते. आपली समजूत आपल्याशिवाय कोण घालणार ? आपणच आपल्याला सावरले पाहिजे या विचाराने जागी होते आणि ती समजूत ओवीत प्रकटते–

" आज सासुरवाशीन घरी जात्याचं झाडनं ।
पोटीच्या बाळकानं पुढं फिटलं पारनं ॥" [5]

आपला बाळराजा पुढे मोठा होऊन आपल्याला सुखात ठेवील या भविष्यकालीन स्वप्नात ती रंगते. बाळ नजरेसमोर तरळू लागते. अन् मग कौतुक सुरू होते. बाळाला झोप आली असताना––

" निजसर आले डोळे बाळा माझ्या राजसाचे ।
अंथरुण राजसाला जाईजुईचे ।" [6]

---

[3] सरोजिनी बाबर, महाराष्ट्र लोकसंस्कृती व साहित्य, नवी दिल्ली, १९७३, पृ. ४३

[4] सरोजिनी बाबर, मराठीतील स्त्रीधन, आ. दु. मुंबई, १९६४, पृ. २७९

[5] तत्रैव, पृ. २७९

[6] सरोजिनी बाबर, महाराष्ट्र : लोकसंस्कृती व साहित्य, नवी दिल्ली, १९७६, पृ. १०१

बाळासाठी सगळे काही नाजूक–साजूक हवे असते म्हणून अंथरूण जाईजुईंच्या फुलांचे कल्पिले आहे. बाळाच्या पाळण्याचे ती वर्णन करते––

"पालख पाळणा मोत्याचा खेळणा ।
जोजावीते बाई माझा लाडका चिमणा ।" [7]

या कौतुकाला अंत राहत नाही. वात्सल्याने हृदय भरभरून येते आणि आपसूक शब्द ओठांबाहेर येतात.

ह्या ओवीवाङमयाचा जन्म विद्वत्तेतून झालेला नाही तर उत्कट अनुभूतीतून झाल्याचे जाणवते. उत्कटता आणि एकतानता हे आत्मचरित्र या वाङमय–प्रकाराचे गुण येथे प्रकटले आहेत.

ओवीनंतर 'गाणे' हे माध्यम आत्माविष्कारासाठी–उपयोगात आणल्याचे मराठी वाङमयाच्या इतिहासावरून कळते. ओवीपेक्षा गाण्याचा घाट अधिक पसरट आहे. साधारणपणे एखादा प्रसंग, एखादी घटना गाण्यात पूर्णपणे चित्रित झालेली दिसते.

"धन संपत्तीला काय उणं सख्या वो आपुल्या वो घरीं जाऊयीनी
पिवळी शेलारी यावी घेऊनी अवघ्या नगीं लव भरजरीची
घडी रुमालांत घालुनी आणावी चौकशी करुनी
एवढं वरचेवरी ऐकुनी पिवळी शेलारी यावी घेऊनी
श्रावण शुद्ध आला महिना नागर पंचीम आली साजणा
मग पूजा करीन गौरीची आवड मला पिवळया शेलारीची
राधा नेसुनी रूपसुंदर लोळे पतीच्या ग चरणावर [8]

नवऱ्याला हट्टाने शेलारी घेऊन मागण्याचा प्रसंग या गाण्यात गुंफलेला आहे. मागणी फेटाळली जाऊ नये म्हणून चतुराईने श्रावणमहिन्यातील नागपंचमी, गौरीच्या पूजेची कारणे तिने पुढे केली आहेत. शेवटी हट्ट पूर्ण झाल्यावर आनंदाने पति–चरणावर लोळण घेतले आहे. हा एक स्त्री–आत्माविष्काराचा नमुना होय.

ओवीप्रमाणेच सूत्रबद्ध असलेले म्हणी, उखाणे ही माध्यमेही या कालखंडात आत्माविष्कारासाठी रूढ असल्याचे जाणवते.

"भाऊ भाऊ शेजारी भेट नाही संसारी" [9]

---

[7] सरोजिनी बाबर, महाराष्ट्र लोकसंस्कृती व साहित्य, नवी दिल्ली, १९७३, पृ. १३९

[8] सरोजिनी बाबर, मराठीतील स्त्रीधन, पुणे, १९५६, पृ. १९१

[9] सरोजिनी बाबर, महाराष्ट्र लोकसंस्कृती व साहित्य, दिल्ली, १९७३ पृ. १४५

दोन भावांमधील–रक्ताच्या नात्यातील वैमनस्य या म्हणीने अचूक टिपले आहे.

"कामापुरता मामा न ताकापुरती आजी "[10]

काम असेपर्यंत गोडगोड बोलायचे आणि काम संपले की तू कोण अन् मी कोण ? या माणसाच्या स्वार्थीवृत्तीवर या म्हणीने नेमके बोट ठेवून एक सर्वसामान्य विधान केले आहे.

"बहु शोधिली वसुंधरा । अशा पुरुषाची वाण ।
सासुबाईंच्या पोटी 'नारायणराव' नवरत्नांची खाण "[11]

अवघ्या दोन ओळींच्या या छोट्याशा उखाण्यातून बाईंनी पती हाच परमेश्वर मानण्याचा काळ असल्याने 'नवरत्नांची खाण' या विशेषणाने त्याला भूषविले आहे.

"अत्तर अत्तर झाड, त्याचं कत्तर कत्तर पान
शोधलं हिंदुस्थान, त्यात 'नारायणराव मिळाले छान'"[12]

अनुरागवती असे आपल्या गुणी नवऱ्याचे दुर्मिळत्व स्पष्ट करते.

ओव्या, म्हणी, उखाणे हे वाङमय प्रसादपूर्ण, सूत्रमय, बिंदूत सिंधू सामावणारे, वेदांप्रमाणेच आद्य वाङमय व पुरुषांशी असंबंधित म्हणून कमलाबाई देशपांडे या वाङमयाचा 'अपौरुषेय वाङ्मय' असा उल्लेख करतात. त्या म्हणतात, "हे वाङमय कागदावर लेखगत झाले नाही पण वाणीवर खेळले, त्याचप्रमाणे भूर्जपत्रे, शिला इत्यादिकांवर कोरले गेले नाही पण स्त्री–हृदयावर कोरले गेले व त्यामुळे विस्मृत न होता दंतकथांप्रमाणे वाणीवर खेळत खेळत पिढ्यान् पिढ्या चालत आले म्हणून वाङमय–वाचायुक्त हा शब्द येथे यौगिक अर्थाने लागू पडतो."[13] हे विचार पटतात.

"जसे सुचले तसे रचले
आणि मग रुचले म्हणून ठसले "[14]

असे या वाङमयाचे स्वरूप आहे आणि त्यातच त्याचे अक्षरत्व सामावलेले वाटते.

या प्राचीन स्त्री–साहित्यातील विश्व संकुचित आहे. कारण स्वतःचे कुटुंब, स्वतःचे गाव यापलीकडे स्त्रियांची नजर पोचत नव्हती. सासर–माहेरच्या कुटुंबांचे भले व्हावे यापेक्षा वेगळे आदर्श नव्हते व ध्येयेही नव्हती. आत्माविष्कारा-

---

[10] सरोजिनी बाबर, महाराष्ट्र लोकसंस्कृती व साहित्य, दिल्ली, १९७३, पृ. १४६

[11] कमलाबाई देशपांडे, अपौरुषेय वाङमय अर्थात स्त्री-गीते, पुणे, १९४८ पृ. ३५

[12] तत्रैव, पृ. ३५

[13] तत्रैव, पृ. ३४

[14] तत्रैव, पृ. १

साठी जन्मलेल्या या वाङ्मयात उत्कटता आणि तन्मयता हे गुण प्रामुख्याने आढळतात.

उपलब्ध साहित्यावरून ललित वाङ्मयाचा आरंभ महानुभाव वाङ्मया-पासून झाला असे मानले जाते. शके १२०८ च्या सुमारास आद्य मराठी कवयित्री महदायिसा हिने 'धवळे' म्हणजे लग्नसमारंभात गावयाची वरविषयक गाणी रचली. तेराव्या शतकात मुक्ताबाई-जनाबाई व पंधराव्या शतकातील बहिणाबाई या प्रमुख कवयित्री आपल्या काव्यरचनेने चमकल्या. अभंग हे त्यांच्या कवित्वाचे माध्यम आहे. बहुतेक अभंग ईश्वरविषयक भक्तीतून जन्मलेले दिसतात. संतकवींच्या नंतर मराठेशाहीत पंतकवी व शाहीर उदयास आले. शिक्षणास दुरावलेल्या स्त्रियांना पंतकवींची विद्वत्ता न पेलणारी होती. 'अबला' व 'भीरू' ठरलेल्या स्त्रीने 'वीरमर्दा'चे पोवाडे रचणे हे तिच्या शक्तीबाहेरचे काम होते. लावण्यांतल्या शृंगाराची स्त्री ही अधिष्ठात्री असली तरी स्त्रीसुलभ शालीनतेमुळे शृगारपूर्ण लावण्या लिहिण्याचा धीर तिला होणे बहुतांशी असंभवनीय होते. (याला एखादा अपवाद असू शकेल.) या काळात स्त्रियांना सहज जमणारी ओवी, अभंग ही कवनवाहनेही मागे पडली. त्यामुळे मध्यंतरीच्या जवळजवळ दीडशे वर्षांच्या काळात स्त्रियांचा आवाज मराठी साहित्यात फारसा उमटलेला दिसत नाही. एकोणविसाव्या शतकाच्या उत्तरार्धात पाश्चात्य संस्कृतीच्या प्रभावाने स्त्री लिहिती झाली. गिरिजाबाई केळकर, काशीबाई कानिटकर, आनंदीबाई शिर्के वगैरे स्त्रियांनी साध्या, सोप्या गद्यमाध्यमातून निबंध, कथा, कादंबरी या स्वरूपात लेखन सुरू केले. स्त्रियांनी हळूहळू ललित वाङ्मयाबरोबरच वैचारिक वाङ्मयातही उल्लेख-नीय कामगिरी केली. आज स्त्रीला अपरिचित असा कुठलाही वाङ्मय-प्रकार नाही. इरावतीबाई कर्वे, दुर्गाबाई भागवत यांच्यासारख्या विदुषी हे मराठी साहित्याचे भूषण आहे, अशी सर्वसाधारणपणे स्त्रीवाङ्मयाची परंपरा दिसून येते.

**स्त्री–आत्मचरित्रांची परंपरा**

मराठी वाङ्मयात स्त्रीला बऱ्याच उशिरा प्रवेश मिळालेला दिसतो. आत्म-चरित्र हा वाङ्मय–प्रकार इतर वाङ्मय–प्रकाराच्या तुलनेत साहित्यात विलंबाने नावारूपास आलेला आहे. त्यामुळे स्त्री–आत्मचरित्राचा जन्मही उशिराच झाला. रमाबाई रानडे यांच्या 'आमच्या आयुष्यातील काही आठवणीपर्यंत म्हणजे १९१० पर्यंत स्त्रियांनी आत्मचरित्रे लिहिली नाहीत असे समजले जाते. सहाव्या–सातव्या शतकातील ओवी, गाणी, म्हणी, उखाणे यांसारख्या स्त्री–वाङ्मयातील आत्मा-विष्कारावरून ती आंशिक आत्मचरित्रे म्हणता येतील. परंतु त्यांना आत्म-चरित्रे म्हणता येणार नाही व आत्मचरित्र या वाङ्मय–प्रकाराचे निकष लावून पडताळूनही पाहता येणार नाही. आत्मचरित्र या वाङ्मय–प्रकाराची काही पाळे-

मुळे फक्त आपल्याला तेथे शोधता येतात कारण स्त्रियांनी या माध्यमातून आपल्या व्यथा–वेदनांना, हर्ष–आनंदाला उद्गार दिला आहे. येथे काल्पनिकाला अवसर नाही. संत कवियित्री जनाबाई व बहिणाबाई यांच्या अभंगांमध्ये आत्मचरित्रपर निवेदन आढळते. मात्र 'आत्मचरित्र' हा वाङमय–प्रकार डोळ्यांसमोर ठेवून त्यांचे हे लिखाण झालेले नाही. भक्तीपोटी लिहिलेले अभंग एवढाच त्यांचा संदर्भ होता. विठ्ठलभक्ती हीच त्यामागील प्रेरणा. त्यात आत्मचरित्र अभ्यासकांनी शोधले. त्यावेळी गद्यवाङमय रूढ नव्हते. ओवी, गाणी, अभंग वगैरे पद्यात्मक माध्यमे विचाराविष्कारासाठी वापरावी लागत म्हणून जनाबाई व बहिणाबाई यांनी आत्म-प्रकटीकरणासाठी अभंग हेच माध्यम वापरले. जनाबाईंच्या अभंगांत कळत–नकळत का होईना आलेल्या आत्मचरित्रपर उल्लेखांवरून संत जनाबाई ही मराठीतील पहिली स्त्री–आत्मचरित्रकार मानावी लागते.

**जनाबाईंच्या अभंगातील संशोधित आत्मचरित्र**

जनाबाई ही शूद्र व पोरकी अशी नामदेवांची दासी. 'विठ्ठल' हेच तिच्या जीवनातील सर्वस्व आहे. केवळ नामदेवांमुळे विठांबाशी आपली मैत्री झाली या जाणिवेने नामदेवाचे ऋण ती कृतज्ञतेने मान्य करते–

जनी म्हणें जोड झालीं विठांबाचीं । दासीं नामयाचीं म्हणोनियां ।[15]
धन्य मायबाप नामदेव माझा । तेणे पंढरीराजा दाखविलें ।[16]

अभंगाच्या शेवटी येणाऱ्या 'नामयाची जनी' या शब्दांमधूनही तिची कृतज्ञताच व्यक्त होताना दिसते–

माय मेली बाप मेला । आतां सांभाळी विठ्ठला ।
मी तुझें गा लेंकरुं । नको मजसीं अव्हेरुं ।[17]

या शब्दांमधून आपली पोरकी कहाणी ती विठोबाला ऐकवते नि आपले अनाथ दुःख बोलके करते–

मायबाप बंधुबहिणी । तूं बा सखा चक्रपाणी ।[18]

अशी सर्वच नाती तिला एका विठोबाच्या ठिकाणी जाणवतात. विठोबा हेच तिला आपले 'माहेर' वाटते. माहेरच्या मोकळेपणाने ती विठोबाशी वागते. 'तुज वाचोनी मजला । कोणी नाही रे विठ्ठला' असे त्याला कळवळून सांगते. विठोबा

[15] श्री सकल संतगाथा, संपा. का. अ. जोशी, आ. दु., पुणे, १९६७, अ. क्र. ३१. ३ पृ. ४२७

[16] तत्रैव, अ. क्र. ७८.२, पृ. ४३१

[17] तत्रैव, अ. क्र. ५८.१–२, पृ. ४३०

[18] तत्रैव, अ. क्र. २०४, पृ. ४४३

आपल्याला 'दळू लागतो,' 'कांडू लागतो,' पाणी भरू लागतो,' 'शेण्या आण लागतो,' 'कपडे धुण्यास' मदत करतो, 'न्हायला घालतो' अशी तिची समज आहे. 'विठू' आपल्याला पोटच्या मायेने सांभाळतो या जाणिवेने भरारून येऊन ती त्याचा 'विठाई' असा उल्लेख करते. अति जवळिकीमुळे ती विठोबाला शिव्या देखील घालते—

अरे विठ्या अरे विठ्या । मूळ मायेच्या कारट्या ।
तुझी रांड रंडकी झाली । जन्मसावित्री चूडा त्याली ।
तुझें गेले मढें । तुला पाहून काळ रडे । [19]

तसेच विठोबाचे आपल्यावर असलेले उपकारही नम्रतेने मान्य करते—

माझे मनीं जें जें होतें । तें तें दिधलें अनंते ।
देंह देऊनी विदेही केलें । शांती देऊनी मी पण नेलें ।
मूळ नेलें हे क्रोधाचें । ठाणें केलें विवेकाचे ।
निजपदी दिधला ठाव । जनी म्हणे दाता देव [20]

विठ्ठलामुळेच आपल्याला जन्ममरणाच्या फेऱ्यांतून मुक्ती मिळाली असा तिचा गाढ विश्वास आहे. म्हणून, 'तुझे कृपे तरली जनी '[21] असे ती कृतज्ञतेने भारावून म्हणते. 'देह जाऊन विदेही होणे' ही जनाबाईच्या जीवनाची इतिकर्तव्यता होय.

अभंगात आलेली आई–वडिलांची ओळख, नामदेवाकडे येणे, नामदेवाच्या कृपेमुळे झालेली विठ्ठलप्राप्ती, माय, बाप, बंधू, भगिनी ही विठोबाशी जडलेली विविध नाती, विठ्ठलाच्या संगतीमुळे शेवटी मिळालेला मोक्ष हे जनाबाईंच्या जीवनातील सर्व महत्त्वाचे टप्पे अभंगांमध्ये चित्रित झालेले दिसतात. विठ्ठल हेच जनाबाईंच्या जीवनातील सर्वस्व असल्याने तिच्या जीवन कहाणीत विठ्ठलाला केंद्रस्थान मिळणे केवळ अपरिहार्यच नव्हे तर अटळ आहे. तरीही जनाबाईंनी आपली प्रतिमा स्पष्टपणे चित्रित केली आहे. 'विठू'च्या गुणगानात ती बेभानपणे रमत असली तरी आवश्यक त्या ठिकाणी ती स्वतःला प्रकट करायला विसरत नाही. विठ्ठलाच्या भोवती विणलेले तिचे हे लहानसे विश्व हेच तिचे आत्मचरित्र ठरते.

आऊबाई, लिंबाई, चोख्याची महारी, सोयराबाई, भागू महारीण यांच्या अभंगांमध्ये किंचित आत्मपर उल्लेख आलेले दिसतात परंतु त्या तुरळक उल्लेखांवरून त्यांना आत्मचरित्र हे नामाभिधान देता येणार नाही. जनाबाईनंतर तुकाराम

[19] श्री सकल संतगाथा, संपा. का. अ. जोशी, आ. दु., पुणे, १९६७; अ. क्र. १९.१.२.३, पृ. ४२६

[20] तत्रैव, अ. क्र. २०३.१.२.३, पृ. ४४३

[21] तत्रैव, अ. क्र. ४८.४, पृ. ४२९

शिष्या बहिणाबाई हिच्या अभंगांमध्ये तिचे आत्मचरित्र उमटलेले आढळते. बहिणाबाईंच्या अभंगांतील आत्मपर उल्लेख जनाबाईपेक्षा अधिक विस्तृत व ठळकपणे आलेले जाणवतात. त्यामुळे डॉ. व. रा. बोरगावकर यांनी, "प्राचीन आत्मचरित्रात्मक लेखनाचे स्वरूप बहिणाबाईंच्या आत्मचरित्रपर अभंगांमधून संकलितपणे अभ्यासता येते"[२२] ही बहिणाबाईंना दिलेली शाबासकी सार्थ वाटते.

**बहिणाबाईंच्या अभंगांत चित्रित झालेले बहिणाबाईचे आत्मचरित्र**

आपल्या माहेरासंबंधी मनोरंजक माहिती बहिणाबाईंनी दिली आहे. वेरुळच्या पश्चिमेस असलेले देवगाव हे बहिणाबाईंचे माहेर होय. या देवगावात सर्व देवांनी वस्ती केली आहे. अगस्तीमुनींनी चातुर्मासात देवगावी मुक्काम करून 'लक्ष तीर्थ वास करीतील, तेथे स्नान, दान आणि जप–अनुष्ठान करणाऱ्या मनुष्यास सिद्धी प्राप्त होईल' असा वर दिला आहे. अशा या पुण्यपावन देवगावी 'लेखक' श्री. आऊजी कुळकर्णी यांच्या कुळात त्यांचा जन्म झाला. पित्याचे नाव आउदेव व मातेचे नाव जानकी. आरंभी बरीच वर्षे त्यांना काही संतती नव्हती. म्हणून त्यांनी लक्ष तीर्थावर नित्य स्नान करून शिवाचे अनुष्ठान करण्याचा क्रम सुरू केला. नंतर त्यांना 'होईल संतान कन्या दोन पुत्र' असा दृष्टांत झाला. त्यापुढे एका वर्षाने बहिणाबाईंचा जन्म झाला.

वीरेश्वर नावाच्या ब्राह्मणाने पत्रिका करून भविष्य वर्तविल्याचे बहिणाबाई सांगतात–

"देवलासी काही होईल भाग्याची । आयुष्याची वळ फार आहे ।"[२३]

शिऊर येथील तीस वर्षे वयाच्या रत्नाकर पाठकाशी पाच वर्षे वयाच्या बहिणाबाईंचे लग्न होते. त्यांचा चांगुलपणा वडिलांच्या संकटकाळात त्यांनी केलेल्या मदतीवरून दिसून येतो. वडिलांच्या बिकट परिस्थितीत ते जावयाला निरोप पाठवितात–

गोत्रजाची फेडा बाकी साकी रीण । मागती लिहुन शेतमळा
तू सखा सोयरा जावई मित्र तू । आमुचा हा अंतु पाहू नको ।।[२४]

हा निरोप मिळताच 'माझे भ्रतार देवगावी आले व मध्यरात्री घर व गाव सोडून आम्ही सर्व मंडळी गोदातीरी आलो' असे बहिणाबाई कौतुकाने सांगतात. त्यावेळी

[२२] व. रा. बोरगावकर, प्राचीन मराठी वाङमयातील चरित्रात्मक आणि आत्मचरित्रात्मक वाङमयाचा अभ्यास, (अप्रकाशित प्रबंध) मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, १९६७, प्र. ३

[२३] ल. रा. पांगारकर, मराठी वाङमयाचा इतिहास तिसरा खंड, मुंबई, शके १८६१, पृ. १२

[२४] तत्रैव, पृ. १४

अकरा वर्षे वयाच्या बहिणाबाईंना संतांच्या संगतीत राहावेसे वाटल्याचा उल्लेख त्यांनी केला आहे–

"ऐसी वर्षे आकरा जालिया मजलागी । वाटें संतसंगी असावेंसे ।"[25]

"कथा आइकावी पुराणश्रवणी । ब्राह्मणपूजनी चित्त रिझें ।
उदास अंतःकरण नावडेची काही । प्राक्तनासी नाही उपाय तो ।"[26]

कोल्हापूरला आल्यावर बहिरंभटाने दिलेल्या गाईची हे कुटुंब मनोभावे सेवा करते. गाईच्या वासराला बहिणाबाईंचा लळा लागतो. बहिणाबाई सांगतात–

दळिता कांडिता वाहतांही पाणी । वत्सेंवीण जनी नावडें हों ।[27]

वासरू बहिणाबाईंबरोबर कीर्तनही ऐकायला जाते. आरती झाल्यावर ते माणसां-प्रमाणे नमस्कार करीत असल्याचे बहिणाबाई उल्लेखितात.

काही कालावधीनंतर वासरू मरते. तेव्हा 'प्राणासवे प्राण जाऊ पाहे माझा' अशी बहिणाबाईंची शोकाकुल अवस्था होते. पुढे बहिणाबाईंना झालेली मुलगी म्हणजे या वत्सानेच पोटी जन्म घेतला असे त्यांना वाटते. बहिणाबाईंच्या चरित्रात ज्या अनेक गूढ व चमत्कारीक गोष्टी आहेत त्यांपैकीच ही एक असावी.

जयरामस्वामींच्या कीर्तनात तुकारामांचे गुणगान ऐकून बहिणाबाईंच्या विमल अंतःकरणावर त्याचा ठसा उमटतो.

"तुकोबाची भेटी होईल तो क्षण । वैकुंठासमान होय मज
बहिणी म्हणे तुका सद्गुरु सहोदर । भेटता अपार सुख आहे ।"[28]

अशी त्यांना तुकारामांच्या भेटीची तहान लागते.

"मत्स जैसा जळावाचुनी चरफडी । तैसी ते आवडी तुकोबाची
त्रिविध तापाने तापले मी बहु । जाईना का जीऊ प्राण माझा ।"[29]

असे आपल्या अवस्थेचे त्यांनी वर्णन केले आहे. आपण अपराधी आहोत म्हणून तुकारामाचे दर्शन आपल्याला होत नसावे अशी शंकाही त्या प्रकट करतात. काही कालावधीनंतर झालेल्या तुकारामाच्या भेटीचे वर्णन बहिणाबाईने विस्ताराने केले आहे.

---

[25] ल. रा. पांगारकर, प्राचीन मराठी वाङमयाचा इतिहास, तिसरा खंड, मुंबई, शके १९६१, पृ. १३

[26] ज. र. आजगावकर, महाराष्ट्र संत कवयित्री, मुंबई, १९३९, पृ. ९९

[27] ल. रा. पांगारकर, प्राचीन मराठी वाङमयाचा इतिहास, तिसरा खंड, शके १८६१, पृ. १४

[28] ज. र. आजगावकर, महाराष्ट्र संत कवयित्री, मुंबई, १९३९, पृ. १०८

[29] तत्रैव, पृ. १०९

"तुकाराम रूपे घेऊन प्रत्यक्ष । म्हणे पूर्वपक्ष सांभाळिजे ।
नको करू चिंता आहे मी । तुजपाशी घेई अमृतासी हातीचिया ।।
ठेऊनियां कर मस्तकी बोलिला । मंत्र सांगितला कर्णरंध्री
म्यांही पायांवरी ठेविले मस्तक । दिधले पुस्तक मंत्रगीता ।
कार्तिकात वद्य पंचमी रविवार । स्वामीचा विचार कुरुक्रुपा ।
आनंदले मन चिद्रुप कोंदले । उठोनि बैसले चमत्कारे । "
"मंत्र आठवती तुकोबा स्वरूपे । स्वप्नामाजी कृपा पूर्ण केली । " [३०]

या तुकाराम दर्शनाने व दीक्षेने बहिणाबाईंचे मन आनंदून जाते. तुकारामाविषयी आपले भाव त्या व्यक्त करतात--

"पांडुरंग तुका पांडुरंग तुका । वेगळीक देखा केंवि होय । " [३१]

आपल्या नवऱ्यालाही तुकोबाचा छंद लागल्याचे बहिणाबाई सांगतात.

"छंदस होऊनी बैसला घरात । तुकोबासी चित्त लावुनिया ।। " [३२]

पुढे बहिणाबाईंचा झालेला उदोउदो त्याला सोसत नाही. त्याचे पतित्व जागे होते. मत्सरापायी तो त्यांना सोडून जातो. त्याचे बोल बहिणाबाई सांगतात--

"न पाहे ती मुख सर्वथा इयेचे । हिनत्व आमुचे कोण फेडी ? ।
भडिमा सोसूनि कोण राहे येथे । ऐसेया स्त्रियेते कोण पाळी । " [३३]

नवऱ्याचे हे उद्‌गार ऐकून त्या संतापत नाहीत तर विवंचनेत पडतात. त्यांचे भारतीय आर्यरक्त जागे होते. पतीची सेवा करणे हाच आपला परमधर्म आहे असे त्या म्हणतात. पती हेच सर्वस्व असल्याची जाणीव अभंगांत उमटते--

"भ्रताराची सेवा तोची आम्हां देव । भ्रतार स्वयमेय परब्रह्म ।
भ्रतारवचनासी उल्लंघीन जरी । पापें माझ्या शिरी पृथिवीचीं
भ्रतारसेवनें सांग हा परमार्थ । भ्रतारेंचि स्वार्थ सर्व आहे ?
सद्‌गुरु भ्रतार साधन भ्रतार । हा सत्य निर्धार अंतरीचा ।। " [३४]

पुढे त्या म्हणतात--

---

[३०] श्री सकल संतगाथा, खंड दुसरा, संपा, का.अ. जोशी, आ.दु. पुणे, १९६७ अ. क्र. ६.१-१०, पृ. ४०८

[३१] ज. र. आजगांवकर, महाराष्ट्र संत-कवयित्री, मुंबई, १९३९, पृ. ११०

[३२] तत्रैव, पृ. ११३

[३३] तत्रैव, पृ. ११४

[३४] ल. रा. पांगारकर, प्राचीन मराठी वाङमयाचा इतिहास, तिसरा खंड, मुंबई, शके १८६१, पृ. १६

भ्रताराशिवाय स्त्री म्हणजे–

" प्राणेविण देह काय पावे शोभा । रात्रीवीण प्रभा चंद्रचिये । [35]
भ्रताराची सेवा पतिव्रता करी । तरी ते उद्धरे अक्षयकुळे । [36]

अशी त्यांची नितांत श्रद्धा आहे. बहिणाबाईंच्या या वागणुकीने त्यांच्या नवऱ्याला स्वतःच्या अविवेकी वागणुकीचा पश्चात्ताप होतो. सर्व विसरून जाऊन तेही बहिणाबाईबरोबर तुकारामचरणी लीन होतात. बहिणाबाईंनी आपल्या नवऱ्यामध्ये घडवून आणलेल्या हृदयपरिवर्तनासंबंधी ल. रा. पांगारकर कौतुकाने म्हणतात, " सुशील व प्रेमी बायको नवऱ्याचे स्वभावदोष मनात न आणता त्याला कशी ताळ्यावर आणते याचे बहिणाबाई हे एक उत्कृष्ट उदाहरण आहे " [37]

आपल्या मुलाला मृत्यूसमयी त्या स्वतःच्या तेरा जन्माची हकीकत सांगतात. आश्विन शुद्ध प्रतिपदा, शके १६२२ ला देह ठेवणार असल्याचे त्या जाहीर करतात.

" बहिणी म्हणे मुक्त आम्ही । सद्‌गुरूचे ध्याने । " [38]

आपली जन्ममरणाच्या फेऱ्यातून सुटका झाल्याचे लोकांना सांगतात.

जन्म, माहेरासंबंधी माहिती, नवऱ्याचे चांगुलपण, स्वतःला संतसहवासाची लागलेली तळमळ, वत्सप्रेम, तुकारामाच्या भेटीची आस, तुकारामाने स्वप्नात दिलेला गुरुमंत्र, तुकारामाच्या भेटीने झालेला आनंद, पतीचा राग, स्वतःच्या गोड वागणुकीने त्याच्या स्वभावात घडवून आणलेले परिवर्तन, त्याची तुकाराम शरणता व शेवटी सद्‌गुरूमुळे जन्ममरणाच्या फेऱ्यातून मिळालेली मुक्ती या आयुष्यातील छोट्या–मोठ्या घटना–प्रसंगाचा आधार घेऊन बहिणाबाईने 'स्व'प्रतिमा ठळकपणे चित्रित केली आहे. स्त्री-जीवनाच्या स्वाभाविक मर्यादांना बहिणाबाईने परमेश्वर प्राप्तीपेक्षा अधिक महत्त्व दिले आहे. सांसारिक जीवनाचा अधिक्षेप न करता मिळविलेली मुक्ती यात बहिणाबाईचे वेगळेपण जाणवते.

पंधराव्या शतकातील बहिणाबाईंच्या या आत्मचरित्रानंतर मराठी वाङ्मयात अठराव्या शतकापर्यंत स्त्री–आत्मचरित्र लिहिलेले दिसत नाही. शके १८२२

---

[35] ल. रा. पांगारकर, प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, तिसरा खंड, मुंबई, शके १९६१, पृ. १९

[36] श्री सकल संतगाथा, खंड दुसरा, संपा.का.आ. जोशी, अ. दु. पुणे १९६७, अ. क्र. १२.३

[37] ल. रा. पांगारकर, प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, तिसरा खंड मुंबई शके, १८६१, पृ. १२–१३

[38] श्री सकल संतगाथा खंड दुसरा, संपा. का. अ. जोशी, आ. दु. १९६७ पुणे, अ. क्र. ३१.६, पृ. ४१२

मध्ये रमाबाई रानड्यांनी लिहिलेले आमच्या आयुष्यातील काही 'आठवणी' हे मराठी वाङमयाच्या इतिहासकारांनी पहिले स्त्री-आत्मचरित्र मानले आहे.

रमाबाई रानडयांनी आत्मचरित्र लिहिण्याची जी प्रथा सुरू केली ती अधिक कलाकुसरीने लक्ष्मीबाई टिळकांनी पुढे चालविली. या वाङमयप्रकारासंबंधी इतकी अवीट गोडी लक्ष्मीबाईंनी निर्माण केली की, आजतागायत ही परंपरा खंडित न होता दिवसेंदिवस ती अधिकाधिक समृद्ध होत आहे. १९१० ते १९७५ या प्रस्तुत अभ्यासासाठी निवडलेल्या कालखंडात एकूण पस्तीस आत्मचरित्रे येतात. घरगुती स्त्रियांची आत्मचरित्रे व इतर क्षेत्रातील स्त्रियांची आत्मचरित्रे असे त्यांचे ढोबळपणे दोन गट दिसतात. एकोणवीस आत्मचरित्रे घरगुती स्त्रियांची आहेत. त्यातील पुढील नऊ आत्मचरित्रे पतीसाठी लिहिली गेली आहेत.

**पतीसाठी लिहिली गेलेली आत्मचरित्रे**

(१) 'आमच्या आयुष्यातील काही आठवणी' : रमाबाई रानडे, १९१०, (२) 'स्मृतिचित्रे' : लक्ष्मीबाई टिळक, १९३४, (३) 'आमची अकरा वर्षे' : लीलाबाई पटवर्धन, १९४५, (४) स्मृतितरंग' : अन्नपूर्णाबाई रानडे, १९४७, (५) 'या सदाशिव' : इंदिरा भागवत, १९४७, (६) 'माझा नंदादीप, : लक्ष्मीबाई पटवर्धन, १९५२, (७) 'वेचलेले मणी' : राधाबाई केदार, १९५२, (८) 'ढळला रे ढळला दिन सखया' : 'उमटलेली पावले' : राधाबाई आपटे : १९५८ :१९६१ (९) 'मीच हे सांगितलं पाहिजे' : शीलवती केतकर, १९६९ या बहुतेक आत्मचरित्रांमागची-प्रेरणा पतीसंबंधीचे गैरसमज इष्ट होण्यास, त्याचे आदर्श लोकांसमोर ठेवण्यास 'पतिचरित्र' हीच सांगणे आहे. पतीचे चित्र रेखाटताना त्या अनुषंगाने आपले जेवढे चित्र उभे राहील तेवढेच त्या उभे करतात. आपल्या चित्राची स्वतंत्रपणे दखल घ्यायची त्यांची तयारी दिसत नाही. त्यांच्या लेखन-हेतूकडे लक्ष दिल्यास हा त्यांचा दोष म्हणता येणार नाही. बहुतेक पतिचरित्रे अतिशय भक्तिभावाने लिहिलेली आढळतात. त्यामुळे पतीचे दोष हे 'दोष' म्हणून वाचकांच्या पुढे न येता त्यांना कौतुकाने गुणांचे आवरण घातलेले दिसते. त्यामुळे कित्येकदा निकोप चित्रण त्यात येत नाही. हा त्या काळाचा परिणाम वाटतो. सर्वसामान्य स्त्रीला 'पती' हेच आपले सर्वस्व वाटत होते. त्यादृष्टीने विचार केला तर तिचे पतीकडे 'ईश्वर' म्हणून पाहणे स्वाभाविक वाटते.

**भक्तिभावाने लिहिलेल्या 'आमच्या आयुष्यातील काही आठवणी'**

रमाबाईंनी माधवरावांच्या मृत्यूनंतर या आठवणी लिहिल्या. पुस्तकाच्या प्रेरणेसंबंधी अर्पणपत्रिकेत रमाबाई खुलासा करतात, "... माझ्या अंतःकरणाला वाव मिळावा म्हणून मला सुखकर आठवणी काढून माझे समाधान व्हावे असा ती प्रयत्न करी. याप्रमाणे या पुस्तकात दिलेल्या काही गोष्टी ऐकून ती एके दिवशी

मला म्हणाली की, या तू लिहून काढल्यास तर पुष्कळांना वाचावयाला नाही का मिळायच्या ? नाही तर आमच्याकरता तरी लिहून काढ. यावरून हे पुस्तक लिहिण्याचे मी हाती घेतले." (अर्पणपत्रिका) माधवरावांच्या वियोगानंतर आपल्या दु:खाचा विसर पडावा, काही काळ का होईना दु:ख फुंकरले जावे म्हणून रमाबाईंनी आपल्या मुलीच्या सूचनेवरून या आठवणी लिहिल्या. माधवरावांच्या 'पूर्वजांचे वृत्त व स्वत:'चे बालपण या प्रकरणापासून पुस्तकाला सुरुवात होते आणि माधवरावांच्या मृत्यूबरोबरच आठवणी संपतात. पहिल्या सोळा पृष्ठांपर्यंत रमाबाईंनी माधवरावांची ओळख करून दिलेली आहे. नंतर आपल्या माहेरच्या हकीकतीकडे त्या वळलेल्या आहेत. 'आमच्या आयुष्यातील काही आठवणी' असे शीर्षक असले तरी हे प्रामुख्याने 'पतिचरित्र' असल्याने माधवरावांना केंद्रस्थान मिळालेले आहे. बारीक–सारीक घटना–प्रसंगांचा आधार घेऊन माधवरावांचे व्यक्तिमत्त्व जास्तीत जास्त स्पष्ट करण्याचा, त्यांच्याबद्दलचे गैरसमज पुसण्याचा प्रयत्न रमाबाईंनी केला आहे.

माधवभक्तीने ओथंबलेल्या रमाबाईंनी या आठवणी लिहिलेल्या आहेत. रमा-बाईंसारख्या नटव्या जगापासून सर्वस्वी दूर असणाऱ्या साध्वी स्त्रीने सांगितलेल्या या आठवणीतील सत्याबद्दल साशंकता निर्माण होत नाही. रमाबाई आठवणी सांगता सांगता कधी आपल्याला गतकाळात बुडवतात तर कधी लेखनकालाशी तन्मय झालेल्या दिसतात. या पुस्तकाच्या निमित्ताने एक नवीन वाङमयीन लेखन वाचकांसमोर आले. या नावीन्यातच प्रस्तुत पुस्तकाचे यश सामावलेले दिसते.

**टिळकाज्ञेवरून जन्मलेली 'स्मृतिचित्रे'**

स्त्रियांच्या आत्मचरित्रांना मराठी वाङमयात मानाचे स्थान मिळवून देणारे 'स्मृतिचित्रे' हे लक्ष्मीबाई टिळकांचे आत्मचरित्र देखील पतीसाठी म्हणजे टिळकांसाठीच लिहिले गेले आहे. 'माझे चरित्र घडले तसे लिहा' अशी टिळकांची सूचना होती. टिळकांना लक्ष्मीबाईंइतके जवळून पाहणारे व समजून घेणारे दुसरे कोणीच नव्हते. दत्तू लिहीत असलेल्या टिळक–चरित्राला माहिती पुरविण्यास लक्ष्मीबाई लिहित्या झाल्या. हीच वाचकांची अत्युच्च पसंती मिळवलेली 'स्मृतिचित्रे' होत. टिळकचरित्र असूनही–टिळकांइतक्याच किंबहुना काकणभर जास्तच लक्ष्मी-बाई आपल्या मनात घर करून बसतात. पतीसाठी लिहिलेले असूनही आपली प्रतिमा ठळकपणे उमटविणारे 'स्मृतिचित्रे' हे मराठीतील पहिले आत्मचरित्र होय.

**पतीच्या आज्ञेतून आकारलेली 'आमची' अकरा वर्षे**

आत्मचरित्रामागील प्रेरणेसंबंधी लीलाबाई सांगतात, "माधवराव म्हणत होते माझे चरित्र मीच लिहिणार आहे. माझ्यामागून दुसऱ्या कोणी माझ्यासंबंधी बेजबाबदारपणे काहीतरी लिहिल्यापेक्षा आपण स्वत: खरी हकीकत लिहावी हे

बरे. माझ्या हातून जर ही गोष्ट झाली नाही तर तू तरी हे काम अवश्य कर." (३) या माधवरावांच्या आज्ञेवरून लीलाबाई पटवर्धनांनी 'आमची अकरा वर्षे' लिहिली. माधवरावांचेच सत्यचित्र उभे करण्याचा त्यांचा हा प्रयत्न त्यामुळे लीलाबाई माधवरावांच्या बाजूला पुसटत्या निसटत्या तेवढ्या उभ्या आहेत. माधवरावांची प्रतिमा वास्तव वाटावी अशा घटना व घटनांची कुशल मांडणी ह्यामुळे लेखन गतकालसापेक्ष झाले आहे.

**पतिस्तोत्र गाण्याच्या निमित्ताने लिहिलेले 'स्मृतितरंग'**

अन्नपूर्णाबाई व रानड्यांची मित्रमंडळी यांचे रानडे हे आदराचे स्थान होते. त्यांच्यासाठी अन्नपूर्णाबाईंनी 'स्मृतितरंग' प्रकाशित केल्याचे त्या हृद्गतात सांगतात. आपल्या आदरणीय आणि आदर्श पतीचे गुणगान अन्नपूर्णाबाईंनी केलेले आहे. त्याच पुढे एका ठिकाणी आपल्या हेतूसंबंधी म्हणतात, " मुक्त मनाने स्तुती करता यावी म्हणून तर या लेखणीचा जन्म आहे. अथवा इतिकर्तव्यता आहे. स्तुती मात्र खोटी नव्हे." (६१) जसे आठवले तसे लिहिले असेही त्या सांगतात. " ही काय कादंबरी आहे इच्छेप्रमाणे रंगवायला. याचा लेखक वेगळाच आहे. त्याने घडविले तसे पुढे मांडायचे असे मी ठरविले आहे आणि ते सुद्धा आठवले तेवढे लिहिता येईल व लिहिणे योग्य होईल तेवढेच !" (३६) छोट्या–मोठ्या गोष्टी बऱ्याच पाल्हाळाने सांगण्याची अन्नपूर्णाबाईंची सवय आहे म्हणून बरेचदा रानड्यांवरची पकड ढिली होताना दिसते.

**यादवरावांची कर्तृत्व कहाणी 'या सदाशिव'**

कर्तृत्ववान यादवरावांचे चित्र इंदिराबाई भागवत यांनी 'या सदाशिव'-मध्ये काढले आहे. हे यादवरावांचे चरित्र असल्याचे त्यांनी आपल्या पत्रात सांगितले आहे. (परिशिष्ट) या पुस्तकामागील प्रेरणेसंबंधी इंदिराबाई म्हणतात, " लौकिकवान आणि आवडत्या माणसांचं स्मृतिचिन्ह कायम ठेवण्याचे जगात निरनिराळे प्रकार आहेत. फोटो, चरित्र, त्या व्यक्तीने लिहिलेले ग्रंथ यामुळे ती व्यक्ती जिवंतच असते. या विचारानेच प्रेरित होऊन साहेबांची मुलं, त्यांचे परिचित. स्नेही–संबंधी यांना स्मृतिरूपानं उपयोगी पडावं म्हणून मी लिहिण्याचं धाडस केलं. साहेब माझ्या वाट्याला फारच थोडे येत. शिवाय सर्वच गोष्टी त्यांना मला खुलासेवार सांगण्याची जरूर नव्हती. आठवून लिहायच्या गोष्टी साऱ्या वेळेवर आठवतीलच असे नाही, याची मला जाणीव आहे." (१०) प्रेरणेबरोबर बाईंनी आपल्या मर्यादाही स्पष्टपणे कबूल केल्या आहेत.

यादवरावांची ही घरगुती प्रतिमा नाही. त्यांच्या व्यवसायाच्या अनुषंगाने त्यांचे चित्र रेखाटण्याचा हा प्रयत्न होय. याचा खुलासा त्यांच्या पत्रावरून होतो. त्या सांगतात, " या पुस्तकाची वैशिष्टये माझ्या मते (१) ग्वाल्हेरच्या भागवतांच्या

खानदानी संस्थानी घराण्यात जन्म घेऊन सुद्धा माझ्या पतींनी आधुनिक दृष्टिकोण कसा जोपासला ? (२) कलांना पोषक असे वातावरण ग्वाल्हेरला नसताना सुद्धा त्यांनी स्वतंत्र कल्पकतेने व धडाडीने आपले व्यक्तिमत्त्व कसे घडविले ? (३) घरात किंवा आसपासच्या नातेवाइकांत व्यापार धंद्याची वहिवाट नसताना सुद्धा 'सिनेमा व फोटोग्राफी' सारख्या धंद्यात यश कसे मिळविले ? (४) ग्वाल्हेरच्या मासले-वाईक संस्थांनी राजेशाही वातावरणात कोणाचीही हुजुरी न करता आपले सर्व प्रयत्न प्रतिष्ठेने आणि खंबीरपणे कसे चालू ठेवले ? (५) स्वत:ला उच्च महाविद्यालयीन शिक्षणाचा लाभ मिळालेला नसतानासुद्धा प्रगतिशील आणि विशाल दृष्टिकोणाने आपल्या घरातील पुढील पिढ्यांना खेळीमेळीने कसे प्रोत्साहन दिले ? याबद्दलचे चित्रण करणे ही आहेत." [३९] यादवरावांच्या मृत्यूशी आत्मचरित्र संपलेले आहे. यादवरावांच्या तुलनेत इतर 'पतिचरित्रा'तील स्त्रियांप्रमाणे इंदिराबाईंना स्थान मिळालेले नाही. यादवरावांना उभे करताना पूर्वानुभवाची पुनर्निर्मिती झालेली दिसते. 'या सदाशिव' ही यादवरावांची नाव लिहिण्याची नावीन्यपूर्ण रीतच शीर्षक म्हणून निवडलेली आहे.

**पतिप्रेमातून लागलेला 'नंदादीप'**

पतीच्या निधनानंतर त्याच्या स्मृती अखंड तेवत राहाव्या या प्रेरणेतून लक्ष्मीबाईंनी हा 'नंदादीप' लावलेला आहे. यासंबंधी त्या लिहितात, "१९४८ मध्ये म. गांधींच्या वधाच्या वेळी आमचे घर जळाले. सर्व वस्तुमात्र नामशेष झाले. फक्त मी आणि मुले अंगावरच्या वस्त्रानिशी उरलो. आमच्याजवळ भूतकाळाच्या फक्त स्मृतीच होत्या. त्याही कालौघात विस्मृत होण्याची शक्यता. तेव्हा त्या स्मृती अक्षरबद्ध केल्या तर मुलांना, इतरेजनांना डॉक्टरांच्याबद्दल काही तरी कळेल हीच कल्पना. डॉक्टर केव्हा तरी म्हणत असतं "की एवढंसं कोणी काही केलं तर वृत्तपत्रातून केवढी जाहिरात होते. आम्ही इथे केवढाली कामे करतो आहोत. कुणाला पत्ताही नाही. कोणी अवाक्षरही बोलत नाही. चरित्र लिहिण्यामागे हेही एक कारण आहे." [४०] एक यशस्वी डॉक्टर आणि कुटुंबप्रमुख या दोन्ही दृष्टि-कोणातून बाईंनी डॉक्टरांना न्याहाळले आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचीही दोन्ही अंगे स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. लक्ष्मीबाई ही त्यांच्या आगेमागे उभ्या आहेत.

**श्रद्धाळू अंत:करणाने वेचलेले मणी**

केदारांच्या निधनानंतर व्यथित अंत:करणाला विरंगुळा मिळावा म्हणून रमाबाईंनी हे आपल्या जीवनातील काही 'मणी' वेचलेले आहेत. 'आपल्या कुटुंबातील मुलाबाळांसमोर त्यांच्या कर्तृत्ववान पित्याचा व आजोबांचा आदर्श

[३९] इंदिराबाई भागवत यांचे पत्र, परिशिष्ट

[४०] लक्ष्मीबाई पटवर्धन यांचे पत्र, परिशिष्ट

ठेवणे' (७) ही या लेखनामागील प्रेरणा असल्याचे रमाबाई केदार सांगतात. पाल्हाळ टाळून आटोपशीरपणे तरीही स्पष्ट अशी केदारांची प्रतिमा त्यांनी उभी केली आहे. आवश्यक त्या घटना निवडून व त्यांची कुशल मांडणी करून केदारांच्या घरगुती प्रतिमेबरोबरच साहित्यप्रेमी, सव्यसाची कायदेपंडित, धुरंधर राजकारणी या त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या पैलूंचाही परिचय करून दिला आहे. रमाबाईंचे चित्र धूसर उमटले आहे.

**आपटे गुरुजींची इच्छा आणि लोकाग्रह यातून जन्मलेले 'ढळला रे ढळला दिन सखया' आणि 'उमटलेली पावले'**

निधनापूर्वी आपटे गुरुजींच्या झालेल्या दीर्घ आजारावर राधाबाईंनी आपट्यांच्या अपुऱ्या राहिलेल्या इच्छेनुसार 'ढळला रे ढळला दिन सखया' लिहिले. 'आपटे गुरुजींचे संपूर्ण चरित्र आम्हाला वाचायला मिळाले तर बरे होईल' (१) या लोकांच्या आग्रहावरून राधाबाईंनी 'उमटलेली पावले' लिहिली. 'ढळला रे ढळला दिन सखया'मध्ये आजारपणातही खेळकर आणि आनंदी राहणाऱ्या आपट्यांचे चित्र रेखाटलेले आहे. आपट्यांच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वाचे दर्शन 'उमटलेली पावले'मध्ये घडते. आपट्यांनी राधाबाईंना सहधर्मचारिणी म्हणून दिलेला मान व आपट्यांच्या खांद्याला खांदा लावून राधाबाईंनी जीवनभर त्यांना दिलेली साथ हे या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्टय व वेगळेपणा होय. राधाबाईंनी आवश्यक ते जीवनानुभव प्रामाणिकपणे मांडून तन्मयतेने आपटेचित्र रेखाटले आहे.

**केतकरांसंबंधी जनमानसात असलेले गैरसमज दूर करण्यास लिहिलेले 'मीच हे सांगितलं पाहिजे'**

केतकरांसंबंधी असलेले गैरसमज दूर व्हावे या हेतूने शीलवतीबाईंनी डॉ. केतकरांचे चरित्र लिहिले आहे. केतकरांचे व्यक्तिमत्त्व स्पष्ट करताना आपले येतील तेवढेच उल्लेख शीलवतीबाईंनी दिलेले आहेत. डॉ. केतकरांच्या गुणांचे बाईंनी जेवढे तोंड भरून कौतुक केले आहे तितक्याच निर्भीडपणाने त्यांच्या दोषांवरही बोट ठेवले आहे. प्रस्तुत कालखंडात पतीच्या निमित्ताने लिहिल्या गेलेल्या आत्मचरित्रांपैकी फक्त या एका आत्मचरित्रात पतीचे दोष निर्भीडपणे व 'दोष' म्हणून सांगितले आहेत. 'पाश्चात्य संस्कृतीचा' हा परिणाम असू शकेल. शीलवतीबाईंनी घटनांची निवड व मांडणी योग्य रीतीने केलेली दिसते. सत्याबद्दल मन साशंक होत नाही.

**इतर घरगुती स्त्रियांची आत्मचरित्रे**

(१) 'माझे पुराण'– आनंदीबाई कर्वे १९४४, (२) 'गेले ते दिवस' सत्यभामाबाई सुखात्मे १९६५, (३) स्मरणमाला–जानकी फडणीस १९७०, (४) 'अजून चालतेची वाट' आनंदीबाई विजापुरे १९७२, (५) आंब्याचा डाळा :

सई आठवले १९७४, (६) दुर्दैवाशी दोन हात : सरोजिनी शारंगपाणी, १९७५, (७) पानाआडचे फूल : आशालता भावे, १९७५.

ही बहुतेक आत्मचरित्रे स्वतःची करमणूक व्हावी, दुसऱ्यांना आपल्या जीवनापासून काही उपदेश द्यावा, जगासमोर यावे अशा रूढ हेतूतूनच जन्मलेली आहेत. 'स्व प्रतिमा' सर्व पैलूंसह रेखाटण्याचाच प्रयत्न येथे दिसून येतो.

**आत्मचरित्र–लेखन 'प्रथे'तून लिहिलेले 'माझे पुराण'**

आनंदीबाई कर्व्यांनी आपल्या आजारपणात करमेनासे झाल्यावर ह्या आठवणी लिहिल्या. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या सूनबाई–श्रीमती कावेरी कर्वे यांनी या आठवणींना 'माझे पुराण' या रूपात आणले. पुस्तकांच्या प्रेरणेसंबंधी नमनामध्ये कावेरीबाई सांगतात, "हिंडणे, सतत काम करीत राहणे हेच बायाचे जीवन. आजारी असताना बायाचा वेळ जाता जात नसे. म्हणून बायाने आपली कहाणी लिहून काढली." (३) आनंदीबाई कर्वे आपला लेखन–हेतू स्पष्ट करतात. 'अलीकडे आपल्या आठवणी अगर अनुभव लिहून प्रसिद्ध करण्याची प्रथा पडत चाललेली आहे. ती पाहून आपल्या आयुष्यातील काही गोष्टी लिहून काढल्यास वाचनीय होतील असे माझ्याही मनात आले, म्हणून हे लिहीत आहे." (१) आपली गुणावगुणांकित स्पष्ट आणि स्वच्छ व्यक्तिरेखा आनंदीआईंनी चित्रित केलेली आहे. पतीला परमेश्वर मानण्याचा तो काळ असूनही आत्मचरित्रात कर्व्यांना आवश्यक व अपरिहार्य त्या ठिकाणीच स्थान मिळालेले दिसते. अनावश्यक बाबींना छेद देऊन पाल्हाळ टाळला आहे. छोटी–छोटी प्रकरणे व त्यांना दिलेली अर्थपूर्ण शीर्षके हे आणखी एक डोळ्यांत भरण्यासारखे वैशिष्ट्य आहे. एक उत्तम आत्मचरित्र म्हणून याची निवड केल्यास वावगे होऊ नये.

अवघ्या एकशे चौरेचाळीस पृष्ठांच्या या आत्मचरित्राला दिलेले 'पुराण' हे नाव अनेक समीक्षकांना आक्षेपार्ह वाटते. पण 'पुराणा'चा अर्थ लक्षेणेने लावला तर त्यात विसंगती जाणवणार नाही. थोड्या विस्ताराने वर्णिलेल्या घटनांना व हकीकतींना 'रामायण' किंवा 'महाभारत' म्हणण्याची प्रथा आहे. त्यातलाच हा प्रकार वाटतो.

**'स्व'करमणुकीतून जन्मलेले ' गेले ते दिवस**

सत्यभामाबाईंनी 'आत्मचरित्र' लिहिले. त्याचे पुनर्लेखन त्यांच्या सूनबाई इंदुमती सुखात्मे यांनी केले. पुस्तकाच्या हेतूसंबंधी त्या लिहितात, "ह्या पुस्तकात कुठलाही गूढार्थ उकलून दाखविलेला नाही. सामान्य कुटुंबातील संसाराचे चित्र सासूबाईंनी रेखाटलेले आहे. केवळ त्यांची करमणूक व आमची हौस या गोष्टी साधल्या आहेत." (१३) एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी व विसाव्या शतकाच्या आरंभी असलेल्या महाराष्ट्रीय ब्राह्मण स्त्रीच्या अवस्थेचे चित्र यात स्पष्टपणे

उमटलेले आहे. या पुस्तकासंबंधी आचार्य अत्रे आपला अभिप्राय व्यक्त करतात; 'गेले ते दिवस' ही श्रीमती सत्यभामाबाई सुखात्मे ह्यांची आत्मकथा असली तरी तिला आत्मकथा नाममात्रच म्हणावे लागेल कारण त्यांनी या कथेत स्वत:ला फारसे महत्त्व दिले नाही. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस आणि विसाव्या शत-काच्या आरंभी मराठी स्त्रीचे–विशेषत: महाराष्ट्रातील ब्राह्मण कुटुंबामधील स्त्रीचे-सामाजिक, कौटुंबिक, धार्मिक आणि सांस्कृतिक जीवन काय होते ह्याचा हे चरित्र म्हणजे एक प्रातिनिधिक वृत्तांतच म्हटला पाहिजे." (३) काळाच्या जिवंत चित्र-णाने लेखन गतकालसापेक्ष झाले आहे.

**'स्व' रंजनासाठी लिहिलेली स्मरणमाला**

पतिनिधनानंतर स्वत:च्या करमणुकीसाठी जानकीबाई फडणीस यांनी 'स्मरणमाला' लिहिले. अवघ्या पंच्याहत्तर पानांत जानकीबाईंनी गतजीवनाचा घेतलेला हा धावता आढावा म्हणता येईल.

**'स्व'दु:ख विसरण्यासाठी लिहिलेले 'अजून चालतेची वाट'**

माणूस चुकतो. कधी भावनेच्या नादी लागून तर कधी अविवेकाच्या आहारी जाऊन नको त्या गोष्टी करून बसतो. त्यावेळी त्याला या गोष्टीची जाण राहत नाही. पण केव्हातरी आयुष्यात एक दिवस असा येतो की केल्या कृत्यांनी तो पश्चात्तापतो. आपल्या चुका, दु:ख विसरण्यासाठी तो कबूल करतो. कधी स्वत:जवळ, कधी लोकांजवळ. आनंदीबाई विजापुऱ्यांचे असेच झाले. आपले दु:ख विसरण्यासाठी त्यांनी 'अजून चालतेची वाट' लिहिले. आपल्या लेखनहेतूसंबंधी त्या म्हणतात, "मी लिहिलं ते केवळ माझ्या विरंगुळ्यासाठी. जेव्हा माणसाच्या अंत:करणात दु:ख दाटून येतं तेव्हा त्याला कुठेतरी वाट करून दिल्याशिवाय राहवत नाही. त्यावेळला आसवांप्रमाणे आपले शब्द टिपून घेणारा कागदाशिवाय दुसरा मित्र कोणता ?" (१०) गणपतराव विजापुऱ्यांच्या आणि बाईंच्या वयात असलेल्या अंतराने संसारात बाईंना वाटणारी असमाधानता, बेहऱ्यांच्या नादी लागून शेवटी पदरात पडलेला प्रेमभंग, सर्वांची मने मोडून वाट्याला आलेले परित्यक्त जीवन या सर्वांचे प्रत्ययकारी दर्शन येथे घडते.

**वेळ जावा म्हणून लिहिलेले 'आंब्याचा टाळा'**

सुशीलाबाई आठवले खूप दिवस अंथरुणाला खिळून होत्या. अंथरुणावर पडून पडून कंटाळा येई. तेव्हा करमणूक व्हावी म्हणून त्यांनी आत्मचरित्र लिहिले. आपला लेखन–हेतू त्या स्पष्ट करतात– "१९७२ साली नानांना व मला अशी एक कल्पना सुचली की माझे एक छोटेसे आत्मवृत्त तयार करावे ... १९५६ मध्ये मधुमेह व रक्तदाबाने आजारी असूनही मी १९७० पर्यंत थोडे थोडे लिहू शकत असे. मी आयुष्यातील काही आठवणी लिहून काढल्या होत्या.... नानांच्या दुसऱ्या

डोळ्याचे ऑपरेशन होऊन त्यांना चष्मा मिळाल्यावर त्यांनी लेखनास सुरुवात केली. माझ्या आठवणींच्या आधारे ते लिहीत. लिहिलेला भाग मला वाचून दाखवीत. ते पसंत पडले की पुढे लिहीत." (१७२) हे आत्मचरित्र गद्य–पद्यात्मक आहे. हेच याचे वेगळेपण होय. बाईंनी बऱ्याच व्यक्तिरेखा पद्यात रेखाटल्या आहेत. 'एका सुखी जीवाची' ही कहाणी आहे. एक प्रभाचा मृत्यू सोडला तर त्यांच्या आयुष्यात वाईट काहीच घडले नाही. असे त्यांनी 'स्व'सुखाचे मोजमाप केले आहे. त्यांच्या कर्तृत्वामुळे 'आंब्याचा टाळा' ही त्यांना मिळालेली उपाधी होय. पूर्वानुभवांची पुनर्निर्मिती करून सगळे अनुभव नीटपणे गुंफून स्वचित्र उभं केलं आहे.

**लोकजागृतीस्तव लिहिलेले 'दुर्दैवाशी दोन हात'**

सरोजिनी शारंगपाणी एक दुर्दैवी जीव वाटतात. आपल्या जीवनात त्या पावलोपावली ठेचाळतात तशाच उठून रक्ताळलेल्या जखमेने कण्हत कुथत त्यांनी आपले जीवन व्यतीत केले. माहेरी घालविलेला काळ सोडला तर या तीनशे-चौसष्ट पानांच्या आत्मचरित्रात कुठेही त्यांचे हसणे ऐकू येत नाही. पुस्तकाच्या प्रेरणेसंबंधी त्या म्हणतात, 'माझ्या मनात पडलेलं समाजाचं प्रतिबिंब रमणीय नसलं तरी अनेकांना सावधगिरीची सूचना तरी देईल. अनर्थाला आणि दु:खाला कारणीभूत होणारे संबंध जोडू देणार नाही. घाईगर्दीने निर्णय घेऊ देणार नाही. परक्या माणसावर तो सुशिक्षित, संभावित असला, गोड बोलला तरी एकदम विश्वास ठेवणार नाही. एवढं झालं तरी माझ्या आत्मकथेच्या लेखनाचं सार्थक झालं असं मी समजेन." (३६४) ही प्रेरणा त्या पुस्तकाच्या शेवटी सांगतात. जवळ असलेल्या तुटपुंज्या पैशातून लहान बाळाचे दूध की नवऱ्याची सिगरेट ? ह्या निर्माण होणाऱ्या प्रश्नावरून त्यांच्या दुर्दैवाची बरीच कल्पना येते. अगदी शेवटपर्यंत बाईंना असाच दुर्दैवाशी सामना करावा लागलेला आहे. काल्पनिक सखीजवळ उमललेलं हे हृद्गत आहे. लेखन प्रसंगानुरूप गतकालसापेक्ष व लेखन कालसापेक्ष झाले आहे.

**गुरूच्या आज्ञापालनातून जन्मलेले 'पानाआडचे फूल'**

आशाबाईंचे वाङ्मयीन गुरू श्री. आनंद साधले बाईंना म्हणतात, "तुम्ही आतापर्यंत जे जीवन जगला आहात ते सर्व लिहून काढा आणि लिहाल तेही अत्यंत मनमोकळेपणाने व नि:संकोचपणे लिहा. त्याचे पुढे आपण एक छानसे पुस्तक काढू किंवा त्याला कादंबरीचे स्वरूप देऊ. तुम्ही फक्त लिहा. पुढे सारे मी पाहीन." (१२) हा साधल्यांचा बाईंना आज्ञावजा आग्रह. आपल्या लेखनहेतूचे स्पष्टीकरण आशाबाई पुढे देतात–"साधले यांचे 'मातीची चूल' हे आत्मचरित्र मी वाचलेले असल्याने त्यांच्याबद्दल माझ्या मनात एक अपार श्रद्धा, भक्ती आणि विश्वास

निर्माण झाल्यामुळे मी सारे लिहून काढण्यास तयार झाले." (१२) ही या आत्मचरित्रामागील प्रेरणा होय.

'पानाआड दडलेले फूल' लोकांच्या दृष्टीस आणण्याचा हा प्रयत्न आहे. त्यासाठी 'पत्र' हे माध्यम वापरलेले आहे. पत्ररूपाने लिहिलेले हे मराठीतील पहिले आत्मचरित्र होय. पत्रात माणूस मोकळा होतो तशाच आशाबाईही उकलत जातात. त्या गतकाळात बुडतात. आपल्यालाही त्याचा समांतरपणे अनुभव घ्यायला लावतात. निःसंकोचपणे आपल्या कन्या, प्रेयसी, पत्नी, माता व शिष्या या रूपांना साकारतात. केव्हाकेव्हा त्यांचे हे अती मोकळे होणे खटकते.

**सहचरित्रे**

प्रस्तुत कालखंडात (१) 'आमचा जीवनप्रवास' हे यशोदाबाई जोशी यांचे १९६५ मध्ये लिहिलेले व श्रीमती रुथ हिवाळे यांचे 'आमचे कृतार्थ सहजीवन' हे १९६८ मध्ये प्रकाशित झालेले ही दोन सहचरित्रे येतात. संसारात पतीइतकाच पत्नीचा किंवा पत्नीइतकाच पतीचा वाटा असतो. त्यामुळे कुणा एकाने जरी आत्मचरित्र लिहिले तरी दुसऱ्याचा उल्लेख त्यात येणे अपरिहार्य आहे. ज्याचे आत्मचरित्र असेल त्याची प्रतिमा अधिक गडद यायला हवी. परंतु वरील आत्मचरित्रात पती आणि पत्नी या दोन्ही प्रतिमांना सारखाच उठाव मिळालेला आहे. या दृष्टीने सहचरित्रे हा शब्दप्रयोग येथे केला आहे.

**यशस्वी सहचरित्र : 'आमचा जीवनप्रवास'**

आपल्या लेखनहेतूसंबंधी यशोदाबाई सांगतात, "१९४० साली विजयादशमीच्या दिवशी अण्णासाहेबांचा ८० वा वाढदिवस त्यांच्या आप्तेष्टांतर्फे मोठ्या थाटाने साजरा करण्यात आला. त्या दिवशी अण्णासाहेबांबद्दलच्या माझ्या 'आठवणी' मी लिहून काढाव्या अशी कल्पना त्यांच्या मित्रमंडळींनी व आमच्या आप्तेष्टांनी काढली व त्या त्या सर्वांच्या आग्रहावरून मी त्या लिहून काढण्याचे ठरविले." (२) पुढे त्या आपल्या प्रेरणेसंबंधी म्हणतात, "माझ्या मुलींनी मला अति आग्रह केला की, आक्का, तू तुमच्या जीवनप्रवासाची हकीकत लिहून काढच. भावी पिढीला तू व अण्णासाहेब यांसारख्या थोर व पवित्र पूर्वजांनी केवढा मोठा पुण्यसंचय करून ठेवला आहे ते तरी कळेल. तुमच्या अंगी हे देवपण येण्यासाठी तुम्हाला किती तऱ्हेचे टाकीचे घाव सोसावे लागले हे त्यांना समजून येईल व आपल्या घराण्याचे आध्यात्मिक धोरण भक्कम ठेवण्यास त्यांना मार्गदर्शन होईल." (१-२)

यशोदाबाईंनी अगदी बारीक बारीक घटनांचा आधार घेऊन मोरोपंत जोशी यांची व स्वतःची प्रतिमा स्पष्टपणे चित्रित केलेली आहे. त्यामुळे हे एक यशस्वी सहचरित्र आहे असे म्हटल्यास दुमत होऊ नये.

**उत्कृष्ट सहचरित्र : ‘आमचे कृतार्थ सहजीवन’**

१९६१ मधील डॉ. हिवाळयांच्या मृत्यूनंतर त्यांनी सुरू केलेल्या अहमदनगर कॉलेजने ‘कॉलेज–वार्षिक’ व ‘डॉ. हिवाळे श्रद्धांजली अंक’ असा जोडअंक काढण्यासाठी बाईंकडून हिवाळयांवर लेख मागविला. ही या पुस्तकामागील मूळ प्रेरणा होय. या लेखानंतर बाईंची डॉक्टरांचे चरित्र ‘ज्ञानोदय’ व ‘दीपक’ नावाच्या मासिकातून प्रसिद्ध केले. बाई म्हणतात, “या अल्प प्रयत्नानं मला नवी दिशा दाखविली नि संपादकांच्या विनंतीला प्रत्यक्षात आणण्याच्या मार्गाला मी लागले. आमच्या दोघांच्या ४० वर्षांच्या सहजीवनाची हकीकत लिहीत असताता जणू मी मनाने त्या काळातच प्रवेश केला. भोवतालचा मला विसर पडला. पानामागून पानं आणि आठवतील तसे प्रसंग लिहिले जाऊ लागले.” (७)

रुथ बाईंनी आपले माहेर किंवा सासर यासंबंधी काहीच माहिती न देता त्यांचा विवाह झाल्यापासून डॉ. हिवाळयांच्या मृत्यूपर्यंत हकीकत देऊन स्वतःचे आणि डॉ. हिवाळयांचे चित्र रेखाटले आहे. दोन्ही घराण्यांसंबंधी बाई कधी माहिती सांगत नाही पण त्यामुळे ह्या व्यक्तिरेखा उभ्या राहण्यास मुळीच अडचण पडत नाही. अनावश्यक फाफट पसाऱ्याचा दोष या आत्मचरित्राला लागला नाही असे म्हणावे लागते. अमेरिकेत घालविलेल्या दिवसांचे फार सुंदर चित्र त्यांनी रेखाटले आहे. अमेरिकेतील लहान–मोठया पद्धती सांगितलेल्या आहेत. या आत्मचरित्रात डॉ. हिवाळे व रुथबाई यांच्या प्रतिमा तर उत्कृष्टपणे चित्रित झालेल्या आहेत पण त्याचबरोबर अमेरिकन जीवनाची ओळखही यातून होते. हे या आत्मचरित्राचे फार मोठे वैशिष्टच म्हणावे लागेल. एक उत्कृष्ट सहचरित्र म्हणून या पुस्तकाचा उल्लेख केल्यास वावगे होऊ नये.

**वात्सल्यापोटी जन्मलेले ‘माझा नाना’ १९४९**

नानाच्या चिरवियोगाच्या शोकातून उद्‌भवलेल्या वात्सल्यापोटी लिहिलेले हे वेणूबाई आजरेकरांचे प्रस्तुत कालखंडातील एकमात्र आत्मचरित्र होय. मराठी वाङमयाच्या इतिहासाने एक आत्मचरित्र म्हणून याची दखल घेतली आहे. पण ते आत्मचरित्र नाही तर ‘पुत्रचरित्र’ होय. लक्ष्मण उर्फ नाना हा वेणूबाईंचा मुलगा युद्धात हरवतो. आपल्या मृत्यूनंतर नानाच्या आठवणी पुसल्या जाऊ नये, त्या टिकून राहाव्या या प्रेरणेने वेणूबाईंनी हे आत्मचरित्र लिहिले. आत्मचरित्र नानाच्या निमित्ताने लिहिले गेले असल्याने वेणूबाईंच्या प्रतिमेला त्यात वाव मिळालेला नाही. नानाची व्यक्तिरेखा उभी करताना स्वतःचे अटळ असलेले उल्लेख वेणूबाईंनी दिलेले आहेत. त्यामुळे वेणूबाईंची प्रतिमा यातून नीटपणे चित्रित झालेली दिसत नाही. आत्मचरित्रामागील हेतू लक्षात घेतल्यास हा या आत्मचरित्राचा दोष म्हणता येणार नाही. नानाचे व्यक्तिमत्त्व स्पष्टपणे चित्रित झाले आहे.

**इतर क्षेत्रांतील स्त्रियांची आत्मचरित्रे**

यात एकूण सोळा आत्मचरित्रे येतात. त्यांची क्षेत्रानुसार विभागणी अशी–

**शिक्षणक्षेत्र**

(१) 'स्मरणसाखळी' कमलाबाई देशपांडे, (२) 'गोदातरंग'–सुधा अत्रे : १९६९, (३) चाकोरीबाहेर गंगूवाई पटवर्धन ही आत्मचरित्रासंबंधीच्या रुळलेल्या प्रेरणांमधूनच लिहिली गेली आहेत. कमलाबाई सोडल्या तर इतर दोघींनी आपले सर्वांगी चित्र काढण्याचा प्रयत्न केला आहे. पण त्यांचे कार्यक्षेत्र असलेल्या शिक्षणक्षेत्रातील प्रतिमाच मनात टिकतात.

**शैक्षणिक अनुभवातून आकारलेली 'स्मरणसाखळी'**

प्रस्तुत कालखंडातील स्वत:साठी लिहिलेले हे पहिले आत्मचरित्र होय. आत्मचरित्रामागील प्रेरणेसंबंधी कमलाबाई सांगतात, "आजारपणात वेळ घालविण्यासाठी आठवणी लिहिल्या. आत्मचरित्र लिहिण्यास बसले नव्हते. पण गेल्या पंचवीस वर्षांत माझे सर्व लक्ष व शक्ती शिक्षणकार्याकडे केंद्रित झाली होती. त्यातीलच ह्या आठवणी. त्याला अजाणता आत्मचरित्राचे रूप आल्यासारखे वाटते खरे." (दोन शब्द : पृ. १)

शिक्षणक्षेत्र हेच कमलाबाईंच्या जीवनातील प्रमुख कार्यक्षेत्र होय. या आपल्या कार्यक्षेत्रातून त्यांनी 'स्व' प्रतिमा उभी केलेली आहे. सुरुवातीची काही पृष्ठे सोडली तर इतरत्र कुठेही त्यांचे घरगुतीरूप डोकावताना दिसत नाही. त्यादृष्टीने त्यांचे लेखनही झाले नाही. बरेचदा स्वत:ची बाजू मांडत असताना आत्मसमर्थनाचा तर हा प्रयत्न नसावा अशी शंका येते. या दोषामुळे अनेक समीक्षकांच्या मते हे आत्मचरित्र पडले आहे. डॉ. अ. ना. देशपांडे आत्मसमर्थनाला कंटाळून, आत्मचरित्र कसे नसावे याचे प्रात्यक्षिक म्हणून 'स्मरणसाखळी'चा उल्लेख करतात.

**सुधा अत्रे यांचे शैक्षणिक कार्य 'गोदातरंग'**

अत्र्यांचा मृत्यू, मुलींची लग्ने झालेली, स्वत:चे आजारपण या सर्वांमधून सुधाताईंच्या वाट्याला एकाकीपण येते. त्यामुळे सुधाताईंचा वेळ जाता जात नसे. म्हणून सुधाताईंनी आत्मचरित्र लिहिले. शिक्षणक्षेत्र हा बाईंचा आवडता प्रांत. यातच त्यांचे सर्व आयुष्य गेले. अत्र्यांसारख्या रसिक माणसाबरोबर संसार होऊनही त्यांची शिक्षणप्रांतातील व्यक्तिरेखाच अधिक भरीव वाटते. आत्मचरित्रात काही घटना, प्रसंग नको तेवढ्या पाल्हाळाने सांगितले जातात. पात्रांची गर्दीही बरीच झालेली दिसते. या कारणास्तव एक उत्तम आत्मचरित्र म्हणून त्याची निवड करता येत नाही.

**शैक्षणिक क्षेत्रास वाहिलेले आगळे व्यक्तिमत्त्व ' चाकोरीबाहेर '**

गंगुबाईंनी स्वीकारलेल्या चाकोरीबाहेरील जीवनाची ही कहाणी आहे. आपल्या लेखनहेतूसंबंधी गंगुबाई सांगतात, " ... मी स्वीकारला तो जीवनाचा मार्ग मी का स्वीकारला व तो कसा पार पडला हे जाहीरपणेच सांगून टाकावे, म्हणजे नुसते तर्ककुतर्क करण्यास वाव मिळणार नाही. ' चाकोरीबाहेर ' ची अशी सुरुवात झाली.' (८) प्रस्तुत कालखंडात येणाऱ्या एकूण पस्तीस आत्मचरित्रकार स्त्रियांपैकी गंगुबाई पटवर्धन ह्या एकमेव चाकोरीबाहेरचे सर्वसामान्य स्त्रीला न रुचणारे, पेलणारे असे नैष्ठिक ब्रह्मचाऱ्याचे जीवन जगल्या आहेत. यादृष्टीने निवडलेले ' चाकोरीबाहेर ' हे शीर्षक सार्थ वाटते. गंगुबाईंचे कार्यक्षेत्र शिक्षणक्षेत्र असल्याने त्या क्षेत्रातीलच गंगुबाईंचे चित्र प्रकर्षाने उभे झाले आहे. कधीकधी घटना, प्रसंग बऱ्याच विस्ताराने सांगितले आहेत असे जाणवते. यापेक्षा त्यांनी थोडा संक्षेप करून संयमाने वर्णन केले असते तर हे आत्मचरित्र अधिक सुटसुटीत झाले असते असे वाटते.

समाजक्षेत्र– यातील आत्मचरित्रे (१) ' माझी कहाणी '– पार्वतीबाई आठवले १९२८, (२) ' निशिगंध '–मृणालिनी देसाई १९६८, (३) ' जेव्हा माणूस जागा होतो–' गोदावरी परुळेकर १९७०, (४) ' पण ऐकतं कोण '–उषा डांगे १९७०, (५) ' हे गीत जीवनाचे '–सुमती शहा १९७१, (६) ' अश्वत्थाची फुले '–प्रमिला भालेराव १९७२–रूढ हेतूंनीच ही आत्मचरित्रे लिहिली आहेत. यात बहुतेक स्त्रियांनी आपल्या समाजकार्याच्याच अंगाचे स्वदर्शन घडविले आहे.

**विधवोन्नतीचे चित्र : ' माझी कहाणी '**

१९२८ मध्ये लिहिलेले हे पार्वतीबाई आठवले यांचे ' माझी कहाणी ' हे कालिकदृष्टया मराठीतील पहिले स्त्री–आत्मचरित्र होय. आपल्या लेखनहेतूविषयी पार्वतीबाई म्हणतात, " ' माझी कहाणी ' लिहून काढली असताना तिचा बराच उपयोग होईल अशी आग्रहाची सूचना मला माझ्या अनेक हितचिंतकांकडून करण्यात आली. ही सूचना मला योग्य वाटली." (११) पार्वतीबाईंना लेखनाची सवय नसल्याने त्यांनी सांगितल्यावर चिपळूणकर यांनी आठवणी लिहून काढल्या. त्याकाळात विधवेला सहन कराव्या लागणाऱ्या हालअपेष्टा पार्वतीबाईंनी अनुभवलेल्या आहेत आणि म्हणून स्त्रियांच्या व विशेषतः विधवांच्या उन्नतीसाठी त्यांनी आपले जीवन वाहून घेतले. त्यांनी केलेल्या विधवोन्नतीच्या कार्याचा हा आलेख. घडले तसे लिहिलेले हे एक सरळ प्रामाणिक निवेदन होय.

**स्वदेश–प्रीतीतून जन्मलेले ' निशिगंध '**

देशसेवा हे मृणालिनीबाईंचे ध्येय देश–प्रीतीतून जन्मलेले आहे. लहानपणापासून त्या देशसेवेने भारलेल्या दिसतात. त्यासाठी १९४२ च्या स्वातंत्र्य लढ्यात

भाग घेतात. त्या चळवळीत आलेले अनुभव, जीवनाचे एवढेच अंग निवेदन करणे ही या आत्मवृत्तामागील प्रेरणा आहे. यासंबंधी खुलासा त्यांनी आपल्या पत्रात केला आहे. त्या लिहितात, " ... यात एका व्यक्तीच्या निमित्ताने, जाणीवपूर्वक एका कालखंडाचे चित्रण उभे करण्याचा प्रयत्न केला आहे." [47] यातून त्यांची प्रतिमा प्रकट होते ती एक 'देशप्रेमी,' 'एक देशसेवक' म्हणून. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे इतर पैलू अस्पष्टपणे प्रकट होतात. घटनांची निवड व मांडणी कुशलतेने झालेली आहे. प्रकरणांची शीर्षके व आत्मचरित्राची काव्यात्म भाषा या आत्मचरित्राच्या लक्षणीय बाबी.

**मार्क्सवादातून साकारलेले 'जेव्हा माणूस जागा होतो'**

आदिवासींसाठी केलेल्या कामाचे अनुभव लिहावे अशी परुळेकरांची इच्छा होती. हीच या आत्मचरित्रलेखनामागील प्रमुख प्रेरणा होय. ठाणे जिल्ह्यातील डहाणू, उंबरगाव, टिटवाळा वगैरे भागातील आदिवासी जमातीचे जीवन गोदावरीबाई जवळूनच न्याहाळतात. या निरीक्षणातून सर्वांची व आपली जात 'माणूस' ही एकच असल्याचे त्यांना जाणवते आणि माणुसकीने त्या गहिवरून येतात. या जमातीतील माणसातला माणूस जागा करणे हे त्यांचे ध्येय बनते. आपले ध्येय साध्य करण्यासाठी राहाव्या लागणाऱ्या वातावरणातून, त्यांच्या कार्यातून प्रतीत होणारी गोदावरीबाईंची प्रतिमा 'जेव्हा माणूस जागा होतो!' मध्ये मिळते. स्वतःच्या रम्य जीवनाला विसरून, साम्यवादी तत्त्वांवर गाढ श्रद्धा ठेवून वारल्यांमधला माणूस जागा करणाऱ्या परुळेकरबाईंची प्रतिमा मनावर बिंबते. त्यांच्या कार्याच्या अनुषंगाने त्यांचा जन्म, घर यांसंबंधी थोडीफार माहिती आलेली आहे. परंतु ती सांगण्याचा मुद्दाम खटाटोप केलेला नाही. तसा या आत्मचरित्राचा उद्देशही नाही. त्यांची प्रतिमा आपल्या डोळ्यांसमोर उभी राहते ती 'एक मानव' या दृष्टीनेच !

**कामगार चळवळींची हकीकत 'पण ऐकतं कोण ?'**

कामगार चळवळीची हकीकत प्रसंगानुरूप सांगितल्यावर साम्यवादी उषाबाईंची मैत्रीण 'सरला' व मुलगी 'रोशा' यांच्या आग्रहातून 'पण ऐकतं कोण ?'ची उभारणी झाली. कामगारांच्या संपाच्या, चळवळींच्या, लढ्यांच्या हकीकती सांगता सांगता उषाबाईंनी 'स्व'चित्र रेखाटले आहे. त्या स्वतः यासंबंधी सांगतात, " खरं म्हणाल तर ही कहाणी माझी स्वतःची अशी कमीच. कामगार लढे, जनतेचे संग्राम, पार्टी, डांगे व त्यांचे सहकारी यांचे कार्य व नोंद यात नसती तर केवळ मी कुठे असते ? असा प्रश्न येऊ शकतो. पण मी तरी त्यापासून अलग कोठे आहे ? आणि कशी राहणार ?" (९) संपाच्या, चळवळींच्या हकीकती

[47] मृणालिनी देसाई यांचे पत्र, परिशिष्ट.

अतिशय मनोरंजक वाटतात. हेच या आत्मचरित्राचे वैशिष्टय आणि वेगळेपण होय.

**स्वार्थत्यागी जीवन–दर्शनातून साकारलेले ' हे गीत जीवनाचे '**

आपल्या स्वार्थत्यागी जीवनाची कहाणी सांगणे या प्रेरणेने सुमतीबाईंनी आत्मचरित्र लिहिले. सर्वसामान्य माणसाला हवी असणारी सर्व सुखे हात जोडून समोर उभी असताना त्या सर्वांना लाथाडून त्यांनी आपले जीवन दीनदुबळ्या व परित्यक्ता स्त्रियांच्या भल्यासाठी वेचले. हाच त्यांच्या जीवनातील अमोल त्याग होय. " श्रीमती सुमतीबाईंचे जीवन भर्तृहरीच्या ' एके सत्पुरुषाः परार्थघटकाः स्वार्थं परित्यज्य ये ' या सत्पुरुषाच्या व्याख्येचे चालते–बोलते उदाहरण आहे." (३) असे प्रस्तावनाकार अनंत गोविंद कुलकर्णी त्यांच्या कार्याबद्दल वाटणाऱ्या आदरातून म्हणतात. आपल्या त्यागी व्यक्तिमत्त्वाची प्रतिमा सुमतीबाईंनी स्पष्टपणे व एकाग्रतेने चित्रित केली आहे. सुमतीबाईंच्या त्यागाच्या हकीकती वाचताना कंटाळा येत नाही. या आठवणी रंजक आणि रोचक झाल्या आहेत. एक सुंदर आत्मचरित्र म्हणून याचा उल्लेख करता येईल.

**रुग्णसेवेतून साकारलेले ' अश्वत्थाची फुले '**

लेखन–हेतूचा खुलासा प्रमिलाबाई आपल्या पत्रात करतात– " मागच्या गोष्टी मुलांना सांगताना मुले म्हणत ' हे सर्व लिहून ठेव. मजा वाटेल वाचताना.' पूर्वीच्या वातावरणाचे वर्णन मुलांसाठी व माझी आवड म्हणून लिहून ठेवले." (४६) (परिशिष्ट) आपल्या व्यवसायातील विविध अनुभव सांगून त्यांनी ' स्व ' प्रतिमा रेखाटली आहे. या आत्मचरित्रात उमटलेले तत्कालीन मराठवाड्याचे जिवंत चित्र हे या आत्मचरित्राचे फार मोठे वैशिष्टय होय.

**चित्रपट, नृत्य व संगीतक्षेत्र**

यात येणारी आत्मचरित्रे–(१) 'जाऊ मी सिनेमात'–शांता आपटे–१९४०; (२) ' माझी नृत्यसाधना '–रोहिणी भाटे–१९५०, (३) ' स्वरवंदना ' ज्योत्स्ना भोळे १९७०, (४) 'सांगत्ये ऐका '–स्नेहप्रभा प्रधान १९७३. त्या त्या क्षेत्राचे बरे वाईट रूप उलगडून दाखवणे हे स्नेहांकिता सोडल्यास जवळपास सगळ्या आत्मचरित्रांचे उद्दिष्ट. स्नेहप्रभा प्रधान सिनेमात व नाटकात काम करणाऱ्या कलाकार आहेत, पण त्यांना ते क्षेत्र चितारायचं नाही तर त्यांचा डॉ. शिरोडकरांशी असलेल्या आगळयावेगळया मैत्रीचा खुलासा आहे.

**सिनेसृष्टीच्या सत्यदर्शनासाठी जन्मलेले ' जाऊ मी सिनेमात ?'**

चित्रपट सृष्टी हे शांताबाईंचे कार्यक्षेत्र आहे. त्या क्षेत्रातील आपले अनुभव देऊन त्यांनी ' स्व 'प्रतिमा स्पष्ट केली आहे. सिनेमात जाण्यासाठी मार्गदर्शन व्हावे म्हणून त्यांना अनेक पत्रे येत. त्या सर्व पत्रांना उत्तर म्हणून शांताबाईंनी या

सृष्टीचे खरे रूप दाखविले. तिचा वरचा मुखवटा काढून टाकला व मूळ चेहरा, निदर्शनास आणला. माणुसकीच्या गहिवरातून त्यांनी चित्रपट सृष्टीतील दिखाऊ : खोटया, फसव्या, बेगडी जागा जगाला उलगडून दाखविल्या आहेत. निष्पाप जीव या आमिषांना बळी पडून भुलतात. पण हत्तीचे दाखवायचे दात निराळे आणि खाण्याचे दात निराळे असतात. त्याप्रमाणे या सृष्टीचे आहे. भोळया जीवांच्या जीवनाचे वाटोळे होऊ नये ही शांताबाईंची मनीषा आहे. हे चित्रपटसृष्टीचे खरे स्वरूप समजावून घेऊन नंतर सिनेमात जाण्याचा विचार करावा असे त्या स्वानुभवातून सांगतात. आपला जन्म, बालपण वगैरे खाजगी जीवनासंबंधी त्या कधी बोलत नाहीत. उत्कृष्ट अभिनेत्री व उत्कृष्ट गायक म्हणून प्रसिद्ध पावण्याच्या हेतूतून आलेले अनुभव फक्त त्यांनी या आत्मवृत्तात सांगितले आहेत.

**नृत्याच्या आवडीतून जन्मलेले ' माझी नृत्यसाधना '**

नृत्य ही रोहिणीबाईंची आवडती कला होय. त्यांनी नृत्यासंबंधी ' मौज, ' ' नवभारत, ' ' अभिरुची, ' ' सत्यकथा ' व ' अनिल ' या मासिकांमधून लेख प्रकाशित केले. आचार्य शं. दा. जावडेकर व स. ज. भागवत यांनी हे लेख संपादित केले. आपल्या नृत्यकलेच्या आवडीसंबंधी त्या सांगतात, ' ... या नृत्याच्या उद्यानात प्रथम जी मी शिरले ती अगदी सहज, तेथील नृत्यपुष्पांवर दृष्टी टाकली तीही सहज आणि त्यांच्या सुवासाने मन प्रथम भारले गेले तेही मनाच्या सहजधर्मानुसार. मात्र काही काळ दुसऱ्यांमुळे का होईना तेथे वास करताच तेथे मन रमले ते इतके की, सूर्यास्त झाल्यावर, सायंछाया पडल्यावर कमलदले मिटू लागली तरी रसास्वादाने गुंगलेल्या भृंगाला त्याची चाहूल न लागून तो आतच बंद होऊन राहावा, तद्वत माझा जीव गुदमरला तरी मन आता तसूभरही हलणार नाही." (१२३–१३४) नृत्य हेच त्यांचे ध्येय बनले. ध्येयपूर्तीतून आलेल्या अनुभवांचे हे चित्रण आहे. त्यामुळे त्यांच्या संपूर्ण जीवनाचे दर्शन येथे घडत नाही तर फक्त नृत्यसृष्टी या एकांगाची ही दखल आहे. ' नृत्य ' या ध्येयप्राप्तीसाठी अविरत परिश्रम घेणाऱ्या, स्वतःचे दोष प्रांजळपणे कबूल करणाऱ्या, गुरूंचे ऋण कृतज्ञतेने मान्य करणाऱ्या नृत्यकलेचे महत्त्व व तिच्यापासून मिळणारा आनंद विशद करून सांगणाऱ्या रोहिणीबाई येथे बघायला मिळतात. नृत्यकलेसंबंधी गैरसमज पुसण्याचे काम या कलाकृतीने केले आहे.

**गायन आणि अभिनय यांच्या आवडीतून जन्मलेले स्वरवंदना**

शैलजाबाई राजे यांना ज्योत्स्नाबाई भोळे यांचा अभिनय आणि गाणे फार आवडे. या आवडीतून त्यांचा परिचय करून घेण्याची उत्सुकता त्यांना होती. या आवडीतूनच हे आत्मचरित्र जन्मले. रूढ प्रेरणांपेक्षा अशी वेगळी प्रेरणा या आत्मचरित्रामागे आहे. शैलजाबाई राजे यांनी जरी लेखन केले असले तरी त्यांनी

जोत्स्नाबाईंना पूर्णपणे उभे केलेले आहे. उत्कृष्ट कलाकार आणि उत्तम गृहिणी अशा दोन्ही भूमिका एकाच वेळी साधणाऱ्या प्रस्तुत कालखंडातील स्त्रियांमध्ये ज्योत्स्नाबाई एकमेव वाटतात. अर्थपूर्ण आणि बोलकी शीर्षके हे या पुस्तकाचे डोळ्यांत भरण्यासारखे वैशिष्टच होय.

**'सांगत्ये ऐका' एक परखड आत्मनिरीक्षण**

आत्मचरित्रात आपल्या लेखनहेतूसंबंधी हंसाबाई कुठेही बोलताना दिसत नाहीत. तीस वर्षे ज्या सिनेसृष्टीची निष्ठेने सेवा केली तिचे बाह्यरूप अत्यंत देखणे व आकर्षक वाटत असले तरी ते फसवे आहे, चकवणारे आहे हे लोकांना पटवून देण्यासाठी हंसाबाईंनी स्वत:ला आलेल्या अनुभवांचे सूक्ष्म निरीक्षण करून 'स्व'-प्रतिमा रेखाटलेली आढळते. एक यशस्वी कलाकार, पण अयशस्वी गृहिणी आणि मुख्यतः 'माणूस' या नात्याने दिलेल्या सिनेक्षेत्रातील धोक्याच्या सूचना अशी हंसाबाईंची प्रतिमा 'सांगत्ये ऐका' मधून मिळते. आपले अनुभव कुठलीही लपवाछपवी न करता त्यांनी अतिशय परखडपणे सांगितले आहेत. शब्दांकन दुसऱ्याचे असले तरी हंसाबाईंची अनुभूती जिवंत झाली आहे. आपल्याला अंतर्मुख करण्याची ताकद तिच्यात आहे. त्यांच्या निर्भेळ सत्यप्रतिपादनाबद्दल अनेक समीक्षकांनी या आत्मचरित्राची भरपूर प्रशंसा केली आहे. परखड आत्मनिरीक्षणामुळेच हंसाबाई सत्य सांगू शकल्या असाव्या असे वाटते.

**स्नेहसंबंध स्पष्टीकरणार्थ अवतरलेले 'स्नेहांकिता'**

जगावेगळे जीवन स्नेहप्रभाबाईंच्या वाट्याला आलेले आहे. ठिकठिकाणी असमाधानी राहिलेले मन तृप्तीसाठी सतत धडपडताना दिसते. अशावेळी लाभलेले 'डॉंकचे प्रेम' त्यांच्या जीवनातील सर्वस्व होऊन बसते. डॉंकच्या मृत्यूनंतर त्या पुन्हा एकट्याच पडतात. त्यांच्या आणि डॉंकच्या मैत्रीसंबंधी अनेक तर्ककुतर्क केले जातात. आपले आणि डॉंकचे संबंध स्पष्ट करण्यासाठी त्यांनी 'स्नेहांकिता' लिहिले. स्नेहप्रभा प्रधान निर्मळपणाने शिरोडकरांमध्ये गुंतून जातात. पण शिरोडकरांचा त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोण–प्रधानांइतका स्वच्छ वाटत नाही. ते एक बाई म्हणूनच त्यांच्याकडे पाहतात–असे स्नेहप्रभा प्रधानांचे अंतर्गत विसंगत लिखाण सांगते. त्यामुळे ही शोकांतिका ठरली आहे ती स्नेहप्रभा प्रधान यांच्या भावड्या मनाची.

**साहित्यक्षेत्र**– या क्षेत्रातील आत्मचरित्रे–(१) 'द्रौपदीची थाळी' : गिरिजा केळकर १९५९, (२) 'सांजवात' : आनंदीबाई शिर्के १९७२. गिरिजा केळकर व आनंदीबाई शिर्के दोघीही मान्यवर साहित्यिक आहेत. पण केवळ साहित्यक्षेत्र रेखणे हे त्यांचे उद्दिष्ट नसून आपली सर्वांगाने ओळख करून देणे ही त्यांची मनीषा आहे.

**द्रौपदीची थाळी ' : गिरिजा केळकर**

गिरिजाबाई केळकर आपल्या आत्मचरित्राच्या प्रेरणेसंबंधी म्हणतात, "माझ्यासारखीच्या आत्मचरित्रात वैशिष्टय ते काय असणार ? पण बरेच जणांचा माझ्यामागे आग्रह होता. त्यातल्या त्यात माझा पुतण्या यशवंत नरसिंह केळकर उर्फ चि. अण्णा याच्या वरचेवर होणाऱ्या आग्रहामुळे मी हे लिहावयास घेतले." (लेखिकेचे निवेदन) साहित्यिक हे गिरिजाबाईंचे प्रसिद्ध अंग पण त्याबरोबरच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या गृहिणी व समाजसुधारक या दोन पैलूंचेही येथे दर्शन घडते.

**स्वजीवन स्पष्टीकरणार्थ लावलेली ' सांजवात '**

आपला लेखनहेतू आनंदीबाई स्पष्ट करतात : 'मी आत्मचरित्र लिहिले ते माझ्या मुलांसाठी. त्यांना आपली आई कशी होती हे कळावे हा हेतू.' (परिशिष्ट, आनंदीबाई शिर्के यांचे पत्र) आनंदीबाईंनी जसे घडले तसे सरळ साधेपणाने लिहिले आहे. या कालखंडातील हे एक उत्कृष्ट आत्मचरित्र होय.

ओवी, गाणे, उखाणे, कोडी, अभंग या माध्यमातून आत्माविष्कार करत स्त्री हळूहळू आत्मचरित्र या वाङ्मयप्रकारापर्यंत पोचली. १९१० ते १९७५ या पासष्ट वर्षांच्या कालखंडात फक्त पस्तीस स्त्री–आत्मचरित्रे प्रकाशित झाली आहेत. ही आत्मचरित्रे कमी असण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे समाजातील स्त्रियांचे दुय्यम स्थान होय. पूर्वी समाजाचा स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोण फार संकुचित होता. मुलीचा जन्म म्हणजे पूर्वजन्मीच्या पापाचे फळ अशी सर्वसाधारण समजूत होती. या पारंपरिक समजुतीतून बाहेर यायला समाजाला दीर्घकाळ लागला. त्यामुळे स्त्रीच्या स्वतंत्र अस्तित्वाला समाजाने बऱ्याच उशिरा मान्यता दिली.

प्रारंभी स्त्री–शिक्षणाकडे दुर्लक्ष झाले. स्त्री म्हणजे पुरुषाची पूरक एवढेच तिला समाजात स्थान होते. तिच्या मनाची दखलच घ्यायला कुणी राजी नव्हते. व्यक्तिवादाच्या उदयानंतर तिचे मनोगत अनेक वाङ्मयरूपांच्या आधारे पुरुषवर्गाकडूनच बोलके झालेले दिसते. स्त्रीला शिक्षण मिळू लागल्यावर तिला तिच्या स्वतंत्र अस्तित्वाची जाणीव झाल्यावर स्वतःच्या व्यथा वेदनांना तिने कथा–कादंबऱ्यांच्या माध्यमातून शब्दरूप दिले. सद्यःकाळात कोणताही वाङ्मय–प्रकार स्त्री–लेखणीला अपरिचित नाही. असा कौतुकास्पद पल्ला तिने गाठला आहे.

आत्मचरित्र या वाङ्मय–प्रकाराच्या दृष्टिकोणातून विचार केल्यास, जनाबाईपासून आजपर्यंत स्त्री–आत्मचरित्रांकडे दृष्टिक्षेप टाकल्यास, स्त्री–आत्मचरित्रे प्रगतिपथावर आहेत असे निश्चितपणे म्हणता येते. समाजाचा एक जबाबदार घटक म्हणून मिळालेली मान्यता, स्वतःच्या स्वतंत्र अस्तित्वाची जाणीव, सर्वक्षेत्रांमध्ये पुरुषाच्या बरोबरीने वाव मिळाल्याने येणारे विविध अनुभव यामुळे स्त्रीचा

दृष्टिकोण व्यापक होत आहे. याचे प्रतिबिंब आत्मचरित्रातही उमटलेले दिसते. त्यामुळे आत्मचरित्रात समृद्धीच्या जोडीला विविधतेचा प्रत्यय येतो. अभ्यासासाठी निवडलेल्या आत्मचरित्रामागील लेखनहेतू लक्षात घेतल्यास ती बहुतेक आत्मचरित्राच्या रूढ हेतूतूनच जन्मलेली दिसतात. घरगुती स्त्रियांची आत्मचरित्रे म्हणजे प्रामुख्याने कुटुंबचित्रे आहेत तर इतर क्षेत्रांतील आत्मचरित्रांनी त्या त्या क्षेत्रांचा परिचय घडवला आहे. असामान्य स्त्रियांबरोबर सामान्य स्त्रियांची आत्मचरित्रे बाजारात आली आहेत व येत आहेत. ही प्रगती लक्षणीय आहे.

* * *

# आत्मचरित्रांतील स्त्री-दर्शन

प्रस्तुत प्रबंधाच्या अभ्यासासाठी निवडलेल्या १९१० ते १९७५ या कालखंडातील आत्मचरित्रांतून चित्रित झालेल्या स्त्री–प्रतिमांचा मागोवा घेण्याचा प्रयत्न या प्रकरणात केलेला आहे. त्यासाठी आत्मचरित्रांचे पुढीलप्रमाणे वर्गीकरण केले आहे आणि त्या क्रमानुसार प्रत्येक आत्मचरित्रात चित्रित झालेली स्त्री-प्रतिमा स्पष्ट केली आहे. येथे एकाच स्त्रीत्वाची विविध रूपे आढळतात. नैसर्गिकरीत्या लाभलेले स्त्रीत्व तेवढे सारखे असले तरी प्रत्येकाची मनोवृत्ती भिन्न आहे. ' व्यक्ती तितक्या प्रकृती ' याचा प्रत्यय येथे येतो.

**पतीच्या छायेतील स्त्री**

पतीसाठी लिहिल्या गेलेल्या आत्मचरित्रांचे पति-प्रतिमा रेखाटणे हेच ध्येय असल्यामुळे ' असे पती देवची ललनांना ' अशी बहुतेक लेखिकांची भूमिका आहे. पतिचित्र काढायचे असल्याने स्त्रीचे सर्व लक्ष पतीवरच केंद्रित होते. पतीची प्रतिमा जास्तीत जास्त गडद करण्याच्या प्रयत्नात स्वतःची प्रतिमा मात्र फारच फिकट व पुसट होते याकडे तिचे लक्ष जात नाही. पतीची प्रतिमा स्पष्ट करताना, स्वतःचे अगदीच अपरिहार्य असे उल्लेख ती करते. बऱ्याच वेळा त्यातून पतीच्या गुणांवर प्रकाश टाकण्याचाच तिचा हेतू असतो. त्यामुळे या आत्मचरित्रांतून स्त्रीची दबलेली, दडपलेली अशीच प्रतिमा चित्रित झालेली आढळते. परंतु आपल्या दबलेपणाची जाणीव तिला नाही वा दडपलेपणाचे भान नाही. हेच आपले खरे जीवन आहे याची तिला खात्री वाटते. हीच तिची जीवननिष्ठा आहे.

> " पिता रक्षति कौमार्ये भर्ता रक्षति यौवने ।
> पुत्राश्च स्थविरे भावे न स्त्री स्वातन्त्र्यमर्हति ॥–' मनुस्मृति ' ८.३

या श्रद्धेने ती वावरताना दिसते. पुराणात आणि इतिहासात ' पातिव्रत्य ' या शब्दाला असलेला " पतीला सर्व कामात मदत करणे, पतीशी कायावाचामनाने एकरूप होणे " [1] हा अर्थ सोडून देऊन पातिव्रत्य म्हणजे, ' पती सांगेल त्याप्रमाणे

[1] पु. बा. काळे, अनसूयाबाई आणि मी, संपा. सुरेश डोळके, पुणे, १९६३, पृ. २८८

वागणे, त्याची आज्ञा भंग न करणे हा अर्थ गृहीत धरूनच हरघडी वागताना सापडते. पतीच्या छायेत वाढणे हेच आपले जीवनसर्वस्व आहे असा तिचा समज आहे. प्रा. गो. म. कुलकर्णी यांनी या संदर्भात मांडलेले विचार मननीय आहेत. "स्त्री जीवनातील विवाहाचे स्थान लक्षात घेता ही निवेदने जेवढी पतीविषयी तेवढीच स्वत:विषयी का असू नयेत ? 'आमची,' 'आमच्या' हे शब्द काय सुचवितात ?" [२] आत्मचरित्रांची शीर्षके अशी पती व पत्नी दोघांच्याही जीवनाची निदर्शक असली तरीही प्रामुख्याने ही 'पतिचरित्रे आंशिक आत्मचरित्रे किंवा डॉ. वि. भि. कोलते म्हणतात त्याप्रमाणे चरित्र व आत्मचरित्र यांचे गोड मिश्रण आहे.

**'आमच्या आयुष्यातील काही आठवणीं'तील पतिभक्त रमाबाई**

माधवरावांच्या मृत्यूनंतर रमाबाईंचे जीवनच रिते होते आणि ती पोकळी भरून काढण्यासाठी, "जो श्रेष्ठात्मक सहवास आता राहिला नाही. त्याचा मानसिक रीतीने अनुभव घेण्यासाठी, वेळोवेळी घडलेल्या गोष्टी व झालेली संभाषणे काही सहज, काही विशेष कारणांमुळे ध्यानात राहिली ती तशी सध्याच्या स्थितीत अंत:करणाचे सांत्वन करण्यासाठी हा आठवणींचा ग्रंथ तयार केला" असे रमाबाई सांगतात. रमाबाईंचा हेतू स्पष्टपणे माधवरावांची प्रतिमा चित्रित करण्याचाच आहे. र. गो. सरदेसाई यांचे विचारही या विधानाशी मिळते जुळते वाटतात. "पुस्तकाचा हेतू सार्वजनिक गोष्टींचा उल्लेख करण्याचा नसून रावसाहेबांच्या एकंदर आयुष्याचे चित्र महाराष्ट्रीयांपुढे नीटपणे ठेवण्यासाठी त्यांना स्वत:स असलेली व त्यांनी इतरांपासून मिळवलेली खाजगी माहिती प्रसिद्ध करण्याचा आहे." [३] अशी या आठवणींची रचनाच पतिभक्तीतून झालेली आहे. माधवराव हेच रमाबाईंचे सर्वस्व आहे आणि रमाबाई त्यांच्या छायेत खुशीने उभ्या आहेत. याची कबुली स्वत:च रमाबाई देतात. "मी माझ्यासंबंधाने फारशी हकीकत लिहू नये म्हणून आरंभापासून हा विचार मनात ठेवून चालले आहे. पण चमत्कार असा की संसारात बायकोचा संबंध अगदी सावलीसारखा असल्याने कितीही टाळू म्हटले तरी टाळता येत नाही. म्हणून 'स्वत:ची' अगर मनाची स्थिती नीट समजण्याकरताच माझा जेथे संबंध आला तेथे मात्र चालतच नाही म्हणून ठेवीत आहे." (१३२)

पतीच्या छायेत राहणे ही रमाबाईंची आंतरिक श्रद्धा आहे. सत्तावीस वर्षे रमाबाई माधवरावांची सावली बनून राहिल्या. माधवरावांच्या बालपणापासून या आत्मचरित्राला सुरुवात होते व माधवरावांच्या मृत्यूपाशीच ते संपते. रमाबाईंनी

[२] गो. म. कुलकर्णी, वाटा आणि वळणे, बेळगाव, १९७५, पृ. १५०

[३] र. गो. सरदेसाई, आमचा संसार, मुंबई, दु. आ. १९५०, पृ. ३

स्वीकारलेली भूमिका ही भक्ताने स्वीकारलेल्या नामसंकीर्तनकारासारखी आहे. आपली जीवनगाथाच रमाबाईंनी माधवरावांच्या भोवती केंद्रित केली. रमाबाई माधवरावांच्या मृत्यूनंतर तेवीस वर्षे जगल्या. संस्मरणीय असे कार्यही त्यांनी केले. पण या आठवणींमधून पतिभक्त रमाबाईच सतत वावरताना दिसतात. पहिल्या बायकोच्या निधनानंतर लग्न करायचे नाही व केले तर एखाद्या विधवेशी करायचे असा उदारमतवादी माधवरावांचा निश्चय असतो. पण वडिलांच्या आग्रहास्तव वयाने एकवीस वर्षे लहान असलेल्या कुमारिकेशी ते लग्न करतात. या कृती–उक्तीतील अंतराने समाजाने त्यांच्यावर नेहमीच ठपका ठेवला पण माधवरावांच्या या कृतीचे रमाबाई समर्थन करतात. " माझ्या मते सर्व चरित्रात खऱ्या स्वार्थत्यागाचा व मनाच्या मोठेपणाचा जो काही भाग असेल त्यामध्ये अत्यंत उदात्त व महत्त्वाचा हाच भाग आहे. यासंबंधाने कोणी कितीही नावे ठेवली तरी मला तर त्याबद्दल अत्यंत आदर वाटतो." (२१) इतरत्र अनेकदा माधवराव वडिलांच्या आज्ञेप्रमाणे वागत नाहीत. पण त्याबद्दल रमाबाई कधी अवाक्षरही बोलताना दिसत नाहीत. शिक्षणासाठी रमाबाईंना घरातील वडील माणसांची बरीच बोलणी खावी लागतात. पण केवळ माधवरावांसाठी त्या सर्व सोसतात. फार झाले तर एकीकडे कोपऱ्यात बसून गुपचूप रडतात. आपण असा सोशिकपणा दाखविला नाही तर माधवरावांच्या सुखात व्यत्यय येईल असे त्यांना वाटत असे. महिन्याच्या खर्चाला नेमून दिलेल्या रकमेशिवाय जास्त खर्च लागला तर तो सुद्धा माधवरावांच्या परवानगीनेच त्या करीत.

रमाबाईंची पतिभक्ती इतकी वज्रलेप आहे की माधवरावांविरुद्ध तक्रार करण्याचा विचारच कधी त्यांच्या मनाला शिवत नाही. " मी सांगतो ते तू मुकाट्याने कर " या रानड्यांच्या हुकुमाविरुद्ध त्या कधीही बंड करीत नाहीत. त्यांची पतिभक्तीच त्यांना ओठ उघडू देत नाही. त्यांचे भारतीय आर्य स्त्रीचे रक्त त्यांना गप्प बसायला लावते. " स्वतःच्याच आवडीने वर्तन ठेवण्याचा माझा सर्वस्वी कल असे." (८३) असे शांतपणे श्रद्धाळू अंतःकरणाने त्या सांगतात. पत्नीने पतीशी कसे वागावे याविषयी त्यांचे विचार निश्चित आहेत. " आपण नम्र व विनयशील होऊन आपल्या पतीशी व वडील माणसांशी आदराने व आज्ञाधारकपणाने वागावे. त्यात आपले कल्याण आहे." (१००) तासगावच्या शाळेत दिलेले हे व्याख्यान रमाबाईंच्या भूमिकेची निश्चिती पटविते.

काही प्रसंग तर रमाबाईंनी माधवरावांचे आपल्यावरील प्रेम किंवा माधवरावांच्या मनाचा मोठेपणा, त्यांची विचारी वृत्ती, समजूतदारपणा स्पष्ट करण्यासाठी म्हणूनच सांगितले असावेत असे वाटते. शिक्षणावरून घरातील लोक रमाबाईंना घालूनपाडून बोलत. तेव्हा माधवराव रमाबाईंची–आपल्या लहानशा

बायकोची समजूत घालतात, "थोडे सोसावयास शिकावे. उत्तर दिले नाही म्हणजे झाले. मी तुला कधी काही बोलत नाही ना. इतर कोणी काही बोलल्यास रडत जाऊ नकोस." (४४) रमाबाईंचा तिखट, खारट, अळणी स्वयंपाक माधवराव न कुरकुरता जेवत असत. "मिस् हरफर्डला शिवल्याबद्दल स्नान करण्याचे कारण नाही. वस्त्रांतर केले तरी पुरे. त्यांच्या रागावण्याकरता व बोलण्याकरता उगाच त्रासाने गार पाण्याने स्नान करून किंवा दुसरे काही करून आपली प्रकृती बिघड-वून घेऊ नकोस." (७७) एक पती म्हणून माधवरावांनी रमाबाईची घेतलेली काळजी या प्रसंगामधून दाखवायची असावी असे वाटते. आपल्या आजारपणात रमाबाई एकटचा आहेत या विचारांनी माधवरावांना हुंदके येतात. हे सर्व प्रसंग आपल्या गुणी नवऱ्याचे कौतुक करण्यासाठीच रमाबाईंनी निवडले असावे.

माधवरावांच्या आधी आपल्याला मरण यावे ही रमाबाईंची इच्छाही त्यांच्या पातिव्रत्यावर प्रकाश टाकणारी आहे "मला समजू लागल्यापासून सर्व सुखाचा व आनंदाचा ठेवा काय ते एवढेच ठिकाण आहे. ... स्वतःची जोड मिळाल्याने मला जी धन्यता व जे समाधान होत आहे तिला उपमा नाही." (२६९) रानडयांशी संबंध हा बाईंना ईश्वरी प्रसाद वाटतो. शस्त्रक्रियेच्या टेबलावर असताना डोळे मिटून त्या प्रथम माधवरावांना नमस्कार करतात. परमेश्वराआधी रमाबाईंनी पहिल्या नमस्काराचा मान आपल्या 'पतिदेवा'ला दिला आहे.

वरील सर्व उदाहरणांवरून माधवरावांच्या छायेत उभ्या असलेल्या पतिभक्त रमाबाईंची प्रतिमा आपल्या हाती येते. पुस्तकाच्या पानापानांमधून पतिभक्त रमाबाई डोकावतात या पतिभक्त रमाबाईंव्यतिरिक्त त्यांचे स्वतंत्र अस्तित्व दाखव-णारे तुरळक उल्लेख सापडतात.

रमाबाई मातृ-पितृभक्त आहेत. आई-वडिलांच्या परोपकारी वृत्तीचे वर्णन रमाबाई मोठ्या कौतुकाने करतात. बाहुल्यांच्या प्रसंगातून त्या आपले बालमन वाचकांसमोर मांडतात. मास्तरणीशी बोलण्यात तासन्तास घालविणे, दुसऱ्या दिवसापर्यंत पुस्तक, पाटी, पेन्सिल यांची दृष्टिभेटही न होणे इत्यादी प्रसंगांमधून अवखळ रमाबाई दिसतात. नाशिकला गेल्यावर आपल्या स्वतंत्र संसाराची स्वप्ने पाहणाऱ्या रमाबाईत एका संसारोत्सुक स्त्रीचे दर्शन घडते. इतरत्र वाटेल तेवढी मान तुकविणाऱ्या रमाबाई काठीचा छंद हरवला असताना माफी मागायला तयार नसतात. एका हट्टी स्त्रीचे हे चित्र वाटते. रमाबाईंना स्वावलंबी जिणे आवडते. त्यांच्या आजारपणात त्या म्हणतात, "माझ्याकडून नेहमीसारखी कामे झाली तरच मला बरे वाटेल नाही तर श्रीमंतांच्या बायका लुळ्या-पांगळ्या होऊन चार चार माणसे आपल्या सेवेत ठेवतात त्यापेक्षा मेलेले बरे." (२४१)

रमाबाईंचे संसारनिरीक्षण, त्यांच्या स्वतंत्र चिंतनशील प्रज्ञेचे दर्शन "कुटुंबात मुख्य स्वामिनी असते ती प्रेमळ, धर्मनिष्ठ, निरलस असली म्हणजे संसारातील सर्वच माणसे सुखी, नीतिमान व उद्योगी अशी होतात व त्यांचे दिवस आनंदात जाऊन स्वर्गसुख येथेच आहे असे त्यांना वाटते." (७२) यासारख्या वाक्यांमधून घडते. अशा एखाद दुसऱ्या प्रसंगामधून स्वतंत्र रमाबाई प्रकट होताना दिसतात. इतरवेळी त्यांची प्रतिमा प्रामुख्याने माधवरावांमध्येच विलीन झालेली दिसते.

**'स्मृतिचित्रां'मधून प्रतीत होणाऱ्या लक्ष्मीबाई टिळक**

पतिभक्तीने भारावून रमाबाई रानडयांनी 'आमच्या आयुष्यातील काही आठवणी' लिहिल्या त्याच पतिभक्तीने प्रेरित होऊन टिळकांचे चरित्र लिहिण्याच्या निमित्ताने लक्ष्मीबाई टिळकांनी 'स्मृतिचित्रे' लिहिली. रमाबाई माधवरावांमध्ये सर्वस्वाने विलीन झाल्या आहेत तर लक्ष्मीबाईंनी आपले स्वतंत्र अस्तित्व जोपासले आहे. त्यामुळे पतिभक्त लक्ष्मीबाईंबरोबर स्वतंत्र अस्तित्व असणाऱ्या लक्ष्मीबाईंही 'स्मृतिचित्रां'त वावरताना दिसतात.

"सुरकुळ–टिळक–श्रीनाराण–चरणी लीन जाहली
लक्ष्मी मी तू हे विसरली" (भाग २, पृ. १०)

या ओळींतून लक्ष्मीबाईंची पतिभक्ती स्पष्ट होते. अनेक ठिकाणी टिळकांच्या छायेत उभे राहण्यात, त्यांच्यापुढे नम्रतेने लवण्यात आपल्या जीवनाची धन्यता मानली आहे. रेव्ह. टिळकांशी पती या नात्याने संबंध आल्याने जीवनात फार बदल झाला ही कृतज्ञतेची भावना लक्ष्मीबाईंनी अनेकवेळा बोलून दाखविली आहे. त्या अतिशय भारावून सांगतात, "मी जी आहे ती केवळ टिळकांमुळे. टिळकांनी आपली ध्येये ठरवावी मी डोळे झाकून ती आचरणात आणावी. त्यांनी कविता रचाव्या मी त्या गाव्या. त्यांनी भीक मागावी व मी त्यांची झोळी धरून चालावे." (भाग ४, पृ. १०) 'सोवळे' झालेल्या नाना गोखल्यांची मुलगी 'मनी' लग्नानंतर महार–मांगांची मुले आपली म्हणून अतिशय आस्थेने प्रेमाने सांभाळते आणि स्वतः धर्मांतर करते या आपल्या जीवनातील स्थित्यंतराचे श्रेय अत्यंत श्रद्धेने लक्ष्मीबाईंनी टिळकांच्या पदरात घातले आहे.

टिळक आणि लक्ष्मीबाई यांच्या काही वृत्तींमध्ये मूलतःच फरक होता. त्यामुळे अधूनमधून भांडणाची पाळी येई. लक्ष्मीबाई भांडतही. पण ती भांडणे क्षणिक असत. क्षणाचा राग ओसरल्यावर एरवी लक्ष्मीबाईंचे अंतःकरण पति-श्रद्धेने ओतप्रोत भरलेले दिसते. टिळकांची बेफिकीर वृत्ती, तऱ्हेवाईकपणा व विक्षिप्त-पणा हे दोष लक्ष्मीबाई मनाने पूर्णपणे जाणून आहेत. त्याची जाणीव त्या टिळकांना कधी कधी करून देताना दिसतात. परंतु इतरांनी टिळकांचे हे दोष दाखवलेले लक्ष्मी-

बाईंना चालत नाहीत. आत्याबाई व मामा टिळकांना यांच्या 'बेपत्ता होण्या'-वरून नावे ठेवतात तेव्हा लक्ष्मीबाई उत्तरतात, "... साऱ्यांनीच पालखीत बसायचे तर पालखीचा दांडा कोणी उचलायचा ?" (भाग १. पृ. ४०) पतिभक्त लक्ष्मीबाईंचे दर्शन या उत्तरातून घडते.

टिळक ख्रिस्ती होणार या बातमीने लक्ष्मीबाईंच्या जीवाचे पाणी पाणी होते. ख्रिस्ती झाल्यावर लोक टिळकांना वाळीत टाकतील, त्यांचे हाल करतील या विचाराने त्या अस्वस्थ होतात टिळक ख्रिस्ती झाल्यावर आता आपल्याला काही करता येणार नाही. आपण याबाबतीत हतबल आहोत. याची जाणीव लक्ष्मीबाईंना असते परंतु टिळक हिंदुधर्मात परत यावे म्हणून त्या चार सोमवार, चार मंगळवार, चार शुक्रवार, एकादशा, एकवेळ जेवून राहणे वगैरे व्रते करतात. मारोतीच्या हातात काठी देणे, त्याच्या अंगावर रामनामाच्या चिठ्ठ्या लावणे असे त्यांचे उपाय सुरू असतात. पतिभक्तीतूनच लक्ष्मीबाईंकडून हे प्रकार केले जात असावे असे दिसते. शेवटी, "कुठेही असले नि सुखरूप असले म्हणजे झाले" (भाग २, पृ. ४) अशी टिळकांची सुखरूपता हे पतिभक्त मन चिंतिते.

टिळकांचे आपल्यावर किती प्रेम होते, टिळक आपल्याशी किती विचाराने वागत हे सांगण्यासाठीच लक्ष्मीबाईंनी पुढील प्रसंगांची 'स्मृतिचित्रां'साठी निवड केली असावी काय अशी शंका येते.

लग्न समारंभात भांग मिसळलेली भजी खाऊन आपल्या पत्नीला भ्रमिष्ठासारखे होऊ नये म्हणून टिळकांनी लक्ष्मीबाईंच्या पानातील भजी भर पंक्तीत काढून घेतल्याचे लक्ष्मीबाई कौतुकाने नमुद करतात. सासरी आल्यावर मामंजींच्या अंगात आलेली देवी "लक्ष्मीबाईविषयी,". . आता जी मुलगी सून झाली आहे ती फार वाईट पायगुणाची आहे. हिच्यामुळे घरात सुख व शांती नांदणार नाही. हिच्यामुळे दुसऱ्यांचे वाईट होत जाईल. आत्ताच ह्या 'झाडाची' मुलगी वारली ती हिच्याच पायगुणाने." (भाग १, पृ. १५) असा आपला अभिप्राय व्यक्त करते. या अभिप्रायाने संतापून टिळक तिला हळद–कुंकू वाहण्याचे नाकारतात व पुन्हा एकदा पत्नीप्रेमाचा प्रत्यय आणून देतात. मामंजींचे मत लक्ष्मीबाईंबद्दल चांगले नसल्याने मामंजी लक्ष्मीबाईंना टाकून दुसरे लग्न करण्याचा सल्ला देतात तेव्हा टिळक ठामपणे उत्तर देतात. "मी तसे कधीच करणार नाही. माझा संसार नाही झाला, तरी असले कृत्य माझ्या हातून कदापि घडणार नाही." (भाग १, पृ. ४५) लक्ष्मीबाईंना लांबून विहिरीचे पाणी आणण्याचा त्रास पडू नये म्हणून स्वतः टिळक वडिलांच्या नकळत पाणी भरीत. पाणी लक्ष्मीबाईंनीच भरले आहे असे भासवीत. लक्ष्मीबाईंना जास्त कष्ट होऊ नये म्हणून जपणारे टिळक लक्ष्मीबाईंनी या प्रसंगातून वाचकांच्या समोर उभे केले आहेत दत्तूच्या जन्मापासून

लक्ष्मीबाईंचे पोट सारखे दुखत असे. त्यामुळे पहाटे उठल्यावर टिळक प्रथम शेगडी पेटवून लक्ष्मीबाईंच्या खाटेखाली ठेवीत व नंतर स्वतः चहा घेत असल्याचा उल्लेख लक्ष्मीबाई पतिप्रेमाने भारावून करतात. आजारपणात टिळकांनी मातेप्रमाणे शुश्रूषा केल्याचे त्या तितक्याच प्रेमाने सांगतात. टिळकांनी मृत्युपत्रात लक्ष्मीबाईंना 'देवता' (Angel) (भाग ३, पृ. १४५) व 'माझी आवडती माणसे' (भाग ३, पृ. १४५) या यादीत लक्ष्मीबाईंना पहिला नंबर दिल्याचे उल्लेख त्या अभिमानाने करतात. लक्ष्मीबाई "स्वर्गात टिळकांशी गाठ पडली तर ती त्यांच्याशी सपाटून भांडेन" (भाग ४, पृ. १३१) असे म्हणत असल्या तरी त्यांनी टिळकांसाठी आपल्या आवडीनिवडी बाजूला सारल्या होत्या. एवढेच नव्हे तर आपला धर्मही त्यांनी टिळकांसाठी त्यागला होता.

वरील प्रत्येक घटनाप्रसंगातून लक्ष्मीबाईंची पतिभक्ती, पतिश्रद्धा व पतिनिष्ठा दृग्गोचर होते.

"टिळकांच्या अस्थी पेटीत जाताच मला माझे अस्तित्व जाणवू लागले." (भाग ४, पृ. १) असे लक्ष्मीबाई 'स्मृतिचित्रां'च्या चौथ्या भागात सांगतात. परंतु 'स्मृतिचित्रे' वाचून झाल्यावर मनात रेंगाळत राहतात त्या विविधरूपाने आपल्यासमोर वावरलेल्या लक्ष्मीबाई "टिळकांनी आपली ध्येये ठरवावी. मी ती डोळे झाकून आचरणात आणावी" (भाग ४, पृ. १०) असे लक्ष्मीबाई म्हणत असल्या तरी लक्ष्मीबाई 'स्व'ला विसरून पूर्णत्वाने टिळकांमध्ये कधीच विलीन झालेल्या नाहीत आपले स्वतंत्र मत मांडून त्या आपल्या अस्तित्वाची जाणीव करून देतात. याची कबुली आपल्याला त्यांच्याकडूनच मिळते. कारण 'स्मृतिचित्रा'त कोणताही निर्णय त्या चटकन घेतात आणि मग त्याला सहजपणे टिळकांची अनुमती मिळते. या त्यांच्या स्वतंत्र अस्तित्वामुळे पतिभक्ती, पतिश्रद्धा, पतिनिष्ठा हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू ठरतात पतिभक्ती म्हणजे पतीच्या छायेत राहणाऱ्या इतर स्त्रियांप्रमाणे लक्ष्मीबाईंचे सर्वस्व नाही असे म्हणावे लागेल। न सांगता निघून जाणे, महिनेन्‌महिने बेपत्ता राहणे, एकदा गप्पा मारीत बसले, काव्यगायन सुरू झाले किंवा वादविवादात गुंतले म्हणजे घरादाराची आठवण साफ विसरून जाणे या टिळकांच्या सवयींमुळे लक्ष्मीबाईंना स्वतःचे असे स्वतंत्र कार्यक्षेत्र मिळत गेले. त्यांचा आत्मविश्वास बळकट होत गेला आणि त्यामुळेच लक्ष्मीबाई स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व टिकवू शकल्या टिळकांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारल्यावर ज्या लक्ष्मीबाई भाऊ, दीर, बहीण यांच्या आश्रित म्हणून राहत होत्या त्याच लक्ष्मीबाई टिळकांच्या चिरवियोगानंतर भांबावलेल्या नाहीत. आता मी कसे करू ? म्हणून कपाळावर हात देऊन बसत नाहीत तर अनेक रंजल्या गांजलेल्यांना

मातेच्या ममतेने सांभाळण्याइतक्या त्या मनाने कणखर बनलेल्या आहेत. 'स्मृतिचित्रां'तून लक्ष्मीबाई स्वतंत्रपणे प्रतीत होतात त्या अशा–

दत्तू लिहीत असलेल्या टिळक चरित्राला मदत म्हणून लक्ष्मीबाईंनी 'स्मृतिचित्रे' लिहायला सुरुवात केली असली तरी 'स्मृतिचित्रां'चा प्रारंभ मात्र लक्ष्मीबाईंच्या माहेरापासून होतो. अशी प्रारंभीच त्यांच्या स्वतंत्र अस्तित्वाची जाणीव त्या करून देतात. लक्ष्मीबाईंची आणि आपली ओळख होते ती नाना गोखल्यांची चोरून पेरू खाताना पकडली जाणारी 'मनी' म्हणून.

लक्ष्मीबाई लिहितात, "मला दोनचार गोष्टींचा विशेष नाद होता व थोडयाबहुत प्रमाणात तो अजूनही आहे. तो म्हणजे बाहुल्या खेळणे, गाणी म्हणणे, गोष्टी सांगणे व ऐकणे आणि रांगोळया घालणे. माझ्या ह्या नादीपणामुळे आत्याबाईंची व भिकुताईची मला खूपच बोलणी खावी लागत. मी गोष्टी सांगू लागले की, त्यांनी म्हणावे ह्या गोष्टींच्या पायी बायका आपली घरेदारे सोडून गेल्या आहेत. तुझ्या गोष्टी कोणत्या थरास जातील त्या जावोत. गाणी म्हटली म्हणजे म्हणावे, साऱ्या संसाराची गाणी केली आहेस. बाहुल्या खेळू लागले म्हणजे, म्हणावे, साऱ्या संसाराचा खेळखंडोबा करून टाकला आहेस पण ह्या बोलण्याचा माझ्यावर काही परिणाम होत नसे जित्याची खोड मेल्यावाचन जायची नाही." (भाग १, पृ. ७३) या छंदापायी एक मूल झाल्यावरही बाहुला–बाहुलीच्या लग्नाचा ताशेवाजंत्र्या लावून चार दिवस सोहळा लक्ष्मीबाई खेळल्या आहेत. टिळकांची प्रौढता आणि घरातील लोकांची 'लोक काय म्हणतील' ही गुदमरून टाकणारी भावना लक्ष्मीबाईंच्या या छंदांना दडपू शकली नाही. आपल्या या छंदामुळेच हळव्या, कोमलवृत्तीच्या बालकवींच्या बरोबरीने काल्पनिक गोष्टींच्या जगात त्या रमल्या. आपल्या खेळकरपणाने कोणाची फजिती करण्याचे, कोणाला अद्दल घडविण्याचे तर कोणाची केवळ मौज उडविण्याचे बेत त्यांनी आखले. आपले हे छांदिष्टपण लक्ष्मीबाईंनी जन्मभर जोपासले आहे. समीक्षक सरोजिनी वैद्य यांचा, "लक्ष्मीबाईंचे सगळे छंद 'मेल्यावाचून सुटू नयेत' इतके उत्कट आणि अस्सल असल्याने ते त्यांच्या व्यक्तित्वाचे अंगच बनले आहेत."[४] हा अभिप्राय सार्थ वाटतो.

त्यांचा स्वभाव जसा खेळकर आहे तसाच मनमिळाऊही आहे या वैशिष्टयामुळे त्या कोणाशीही चटकन समरस होतात. त्यांना क्षणार्धात आपलेसे करून टाकतात. लक्ष्मीबाई स्वतःच आपला स्वभाव उकलून दाखवितात, "मला उपचाराची बाधा बहुतकरून कधीच होत नाही माझे पाहुणे मला घरचेच वाटत व मी कधी कोणाच्या घरी गेले की क्षणार्धामध्ये घरची बनते." (भाग ३, पृ. ५)

[४] सरोजिनी वैद्य, माती आणि मूर्ती, मुंबई, १९७५, पृ. ९३

लाखात एखाद्याच्या वाट्याला यावे एवढे मोठे मन लक्ष्मीबाईंना लाभलेले आहे. त्या सतत दुसऱ्यांसाठी धडपडताना दिसतात. परंतु 'कर्मण्येवाधिकारऽस्ते' या 'भगवद्‌गीते'च्या शिकवणुकीप्रमाणे त्यांची ही धडपड आहे. परिस्थितीने त्या 'लक्ष्मी' नसल्या तरी मनाने मात्र 'लक्ष्मी' आहेत याचा प्रत्यय 'स्मृतिचित्रां'त पदोपदी येतो. मागचेपुढचे काहीही माहीत नसताना "चल येतेस का माझ्याबरोबर" (भाग २, पृ. ७२) म्हणून भिकाऱ्याच्या मुलीला क्षणार्धात आपली मुलगी समजून वागविणाऱ्या लक्ष्मीबाई धन्य होत. "दुष्काळाचे चित्र" (भाग २, पृ. ९४) म्हणून जवळ केलेली 'दया' त्यांच्या कनवाळू वृत्तीचेच प्रतीक म्हणावे लागेल. अशी कितीतरी उदाहरणे या आत्मचरित्रात सापडतात.

'हे विश्वचि माझे घर' असा त्यांच्या संसाराचा पसारा आहे. गावोगाव त्यांच्या लेकी, सुना, नाती, आहेतच ! कोणाला औषध करून दे, कोणाला सोबत म्हणून निजायला जा, कोणाला मोलकरीण शोधून दे, कोणाला दुपारी भर बारा वाजता सिनेमाची जाहिरात पोहचवून दे अशा अनेक व्यापांनी त्या सदा वेढलेल्या दिसतात. वक्तृत्व समारंभाच्या वेळी आलेल्या पाहुण्यांना गरम पिठले-भात खाऊ घातल्यावरच हे मन शांत होते. स्वतःचा काडीचाही फायदा नसताना ऊन, वारा, पाऊस, तहान, भूक सर्व विसरून जाऊन दुसऱ्यांसाठी झिजत राहणे यात त्यांनी आपल्या जीवनाची इतिकर्तव्यता मानलेली आहे. हे झिजणे चंदनाच्या जातीचे आहे. ही झीज केवळ मनुष्य प्राण्यांसाठीच त्या सोसतात असे नाही तर मुक्या प्राणिमात्रांची काळजीही तितक्याच आस्थेने करण्यात लक्ष्मीबाईंचे मन रमून जाते. 'ब्लॅकी'ला बरे नसताना त्याला औषध देणे, खाटेवर नीट झोपविणे, खाटेखाली शेगडी ठेवणे हे सर्व सोपस्कार त्या प्रेमाने करतात. आजारी 'बन्या'ला रात्रभर मांडीवर घेऊन जागत बसून त्याला प्राणदान देणाऱ्या लक्ष्मीबाईंना देवाशिवाय दुसरी कोणती उपमा द्यावी ?

दुसऱ्यांच्या गुणांचे तोंड भरून कौतुक करण्यास लागणारा मोठेपणाही त्यांच्याजवळ आहे आपल्या सासूबाईंचे चांगुलपण त्या मोठ्या अभिमानाने सांगतात. 'आदर्श माता' (भाग २, पृ. २२) म्हणून त्यांचा उल्लेख करतात. भावजयांनी त्यांच्या हलाखीच्या दिवसांत प्रेमाने सांभाळल्याचे कृतज्ञतेने भारावून बोलतात. सून बी. ए. झालेली असली तरी तिचा कामसूपणा, व्यवहारदक्षता व एकनिष्ठा ह्यामुळे त्यांच्या अंगावर मूठभर मास येते.

मनाच्या मोठेपणाबरोबरच लव्हाळ्याची नम्रता लक्ष्मीबाईंजवळ आहे. आपल्यावरील सर्वांचे ऋण त्या विनम्रभावाने मान्य करतात. आजच्या पदवीयुगाच्या दृष्टीने लक्ष्मीबाई पदवीधर नाहीत. रूढ अर्थाने त्या सुशिक्षितही नाहीत. जोडाक्षरे त्यांना घोटाळ्यात टाकतात. मनुष्य शब्द लिहिण्यास त्यांना ढीगभर

पुस्तके उपसावी लागतात. 'क्ष' आणि 'ज्ञ' या वर्णांमधील भेद त्यांना समजत नाही. हे खरे असले तरी त्यांच्या जीवनाला एक वाङमयीन पार्श्वभूमी लाभलेली आहे. जुन्या पोथ्या–पुराणांशी त्यांचा चांगला परिचय आहे. त्या ख्रिस्ती झाल्यावर मिशनरी स्त्रियांना मराठी शिकवितात. अधून–मधून टिळकांचे वर्गही घेतात. लक्ष्मीबाई भजन–कीर्तनात तरबेज आहेत. टिळकांची अभंगांजली त्यांना मुखोद्‌गत आहे. आधुनिक कवींशी व कवितेशी त्यांची ओळख आहे. त्यांच्या थोड्या कविताही प्रकाशित झाल्या आहेत. 'करंज्यातील मोदक' ही त्यांची अतिशय गाजलेली कविता. इंग्रजीचे अजिबात ज्ञान नसताना त्यांनी तीन महिन्यांचा नर्सिंग कोर्स मोठ्या धाष्टर्याने पूर्ण केला. पण या कुठल्याही गोष्टीचा उल्लेख त्या फुशारकीने करीत नाहीत तर "अशिक्षितातील अशिक्षित" (भाग १, पृ. ७४), "मठ्ठातली मठ्ठ" (भाग १, पृ. ८१), "अडाणी बाई" (भाग ३, पृ १८) अशी नम्रता बाळगून आहेत. स्वतःचे अखंड हसणे, संशयी स्वभाव हे दोषही त्यांनी प्रांजळपणे सांगितले आहेत.

प्रसंगी लक्ष्मीबाई कणखर होताना दिसतात. स्वतःला पटत नसलेल्या गोष्टी करायला त्या तयार होत नाहीत. ढोंगी अतिथींचा, "तुम्ही माझे व्याही जावई नाही. मी तुमची मिजास चालू देणार नाही." (भाग ३, पृ. ४६) असे खरमरीत स्वागत करायला घाबरत नाहीत. रोग्यांची दुर्धर अवस्था पाहून, "तुम्ही आपले रात्री स्वस्थ घरी जाऊन झोपता पण येथे काय चालले आहे याची तुम्हाला काही कल्पना आहे काय ?" (भाग २, पृ. ११४) असा डॉक्टरांना जाब विचारताना त्या भीत नाहीत.

लक्ष्मीबाई स्वाभिमानी आहेत. कुणापुढे तोंड वेंगाडणे किंवा पदर पसरणे त्यांना आवडत नाही. बुटींच्या बागेत नुसत्या ज्वारीच्या कण्या व ताक खाऊन राहण्याच्या प्रसंगावरून हे प्रत्ययास येते. अशी त्यांच्या स्वाभिमानी वृत्तीवर प्रकाश टाकणारी बरीच उदाहरणे 'स्मृतिचित्रा'त सापडतात.

लक्ष्मीबाई मुंबईला जातात तेव्हा नेता येईल तेवढा भाजीपाला व फळफळावळे नेतात. कोणत्याही संसारी स्त्रीला असावा असाच लक्ष्मीबाईंचा हा सोस वाटतो.

दत्तूला दूधवाली धंतोलीला न्यायला तयार होते मी त्याला जीव लावीन म्हणून परोपरीने समजावून सांगते. तेव्हा लक्ष्मीबाई म्हणतात, "तू जीव लावशील पण माझा जीव कोठे राहील ?" (भाग १, पृ. १२०) आपला मुलगा आपल्यापासून दूर जाणार या कल्पनेने दुखणारे मातेचे मन यातून दिसते. दत्तूने पाटीवर शेताचा पसारा उभा केलेला पाहून हे मातृहृदय विदीर्ण होते. पुण्याच्या मुक्कामात हौशीला बाहेर झोपविल्यावर त्यांचे काळीज विव्हळते. या काळीज–कळा त्यांना रात्रभर जागवितात. दत्तू सतरा–अठरा वर्षांचा झाल्यावर लक्ष्मीबाईंमधील आई

स्वप्ने पाहू लागते. आत्मनिरीक्षण लक्ष्मीबाई वाचकांसमोर मांडतात. "दत्तू सतरा–अठरा वर्षांचा होता. मला सुखस्वप्ने पडू लागली होती. साऱ्या जगात माझा मुलगा मोठा विद्वान झाला आहे असे मला वाटू लागले. तो कॉलेजात गेलेला आणि इतका चांगला. आईच मी–मला त्याच्यात काही दोष दिसत नसत. मला वाटे माझा मुलगा इतका चांगला असून ह्याला मुली का सांगून येत नाहीत ? ख्रिस्ती लोकांत मुली सांगून येत नाहीत. मुलाकडून मुलीला मागणी घालावी लागते पण प्रत्यक्ष अनुभव नसल्यामुळे हे मी विसरून जाई ... दत्तूचे लग्न व्हावे, नाही तर निदान ठरावे तरी, अशी माझ्या मनाला सारखी तळमळ लागलेली होती. हिंदू असते तर इतक्या अवधीत एखादी लहानशी सून हाताशी आली असती, पण तेथे ते शक्य दिसेना. मुली सांगून येत नाहीत तर नाही, आपणच कोठे खडे टाकून पाहावे व तसे टिळकांना न कळत मी एक–दोन ठिकाणी खडे टाकलेही. पण मला उत्तर मिळे, 'अहो बाई, मुलगा अजून शिकतो आहे. आताच काय त्याच्या लग्नाचे घेऊन बसला ?' पण माझ्या मनाला ते पटतच नसे." (भाग ३, पृ. ५५–५६) एका मातेची सहज प्रवृत्ती यातून दिसते. परंतु तेवढ्यावर लक्ष्मीबाई थांबलेल्या नाहीत, तर त्यांनी निरीक्षणाने मातृहृदयाच्या कमकुवत जागा सांगितल्या आहेत. माता आणि आत्मनिरीक्षक अशा दोन्ही अंगांनी त्या एकदम उभ्या राहिल्या आहेत.

स्त्रियांमध्ये अभावानेच आढळणारे विनोदाचे अंगही लक्ष्मीबाईंना लाभले आहे. "... ज्या घरी पाय घालणार नाही असा मी निश्चय केला होता त्याच घरी नेहमीचा पाय रोवून बसले." (भाग १, पृ. १४). राहुरीस आल्यावर स्वतःच्या सुधारलेल्या प्रकृतीचे त्या वर्णन करतात, "...मी इतकी फुगायला लागले की काहीच्या बाहीच. हातात बांगड्या व गळ्यात गळसऱ्या तटाटू लागल्या. थोडक्यात म्हणजे राहुरीस गेल्यावर मी चांगलीच वजनदार बायको झाले होते." ( भाग ३, पृ. १०–११) असे विनोदाने 'स्मृतिचित्रां'त हरघडी लक्ष्मीबाईंचे बोट धरले आहे. स्वतःच्या व्यंगावरच बहुतेक त्याची उभारणी लक्ष्मीबाईंकडून केली जाते. आपल्या विनोदासाठी त्या दुसऱ्यांची शिकार करताना दिसत नाहीत. त्यांचा विनोद निरागस व अकृत्रिम वाटतो.

लक्ष्मीबाई श्रद्धाळू आहेत. देवावर त्यांचा पूर्ण भरवसा आहे आपले बेत, विचार आणि पुढील सर्व कृती देवाच्या इच्छेवर अवलंबून असतात असा त्यांचा दृढ विश्वास आहे. " माणसाने दिलेले पुरत नाही व देवाने दिलेले सरत नाही." (भाग २, पृ. ५०) असे त्या पटवून सांगतात. अशा श्रद्धेबरोबरच त्या विचारीही आहेत. टिळक ख्रिस्ती झाल्यावर लोक बायबल जाळण्याचा त्यांना सल्ला देतात तेव्हा लक्ष्मीबाई उत्तरतात, "... मी हे जाळले तर त्यांना आणखी ते मिळणे अशक्य आहे काय ? जगातील सारी पुस्तके जळून जातील काय ? मी ते जाळीत नाही."

(भाग १, पृ. १४४) स्वतःच्या संसारनिरीक्षणावरून, " स्वच्छता व टापटीप ही जातीपेक्षा व्यक्तीवर अवलंबून आहेत." हा विचारही त्यांनी मांडला आहे. " सत्ते-पुढे शहाणपण काय कामाचे ?" ( भाग ४, पृ. ६४ ) अशी वाक्ये त्या सहज बोलून जातात.

पतिभक्त, खेळकर, मनमिळाऊ, परोपकारी, नम्र, प्रांजळ, स्वाभिमानी, श्रद्धाळू, विनोदी व विचारी असे लक्ष्मीबाईंचे व्यक्तिमत्त्व ' स्मृतिचित्रां 'त सर्वांगाने सहज उमलून आले आहे. वाचकांच्या मनात घर करून बसावे इतके स्वतंत्र अस्तित्व त्याला लाभले आहे.

**'आमची अकरा वर्षे ' मधील माधवरावांची छाया लीलाबाई**

आत्मचरित्र लिहिण्याची माधवरावांची अपुरी राहिलेली इच्छा पूर्ण करण्याच्या निमित्ताने ' आमची अकरा वर्षे लिहिली गेली.' हा लेखनहेतूच लीलाबाईंची प्रतिमा दुय्यम असल्याचे सांगतो. रमाबाई रानडे किंवा लक्ष्मीबाई टिळक यांच्यापेक्षा लीलाबाईंचा पिंड फार निराळा आहे. रमाबाई रानडे स्वेच्छेने माधवरावांमध्ये विलीन झाल्या आहेत. लक्ष्मीबाई स्वेच्छेने स्वतंत्र अस्तित्व टिकवून राहिल्या आहेत तर लीलाबाई पटवर्धन पारंपरिक रूढींच्या प्रभावाने माधवरावांची छाया बनून राहिल्या आहेत.

लीला–माधव यांचा संसार म्हणजे दोन परस्पर विरोधी मनांची अकरा वर्षे चाललेली झुंज आहे. एका ध्येयवादी तरुणाशी सामान्य मुलीची नियतीने घातलेली ही गाठ आहे. सुरुवातीपासूनच परस्परांची मते एकमेकांबद्दल स्वच्छ नव्हती. माधवराव लीलाबाईंच्या रूपावर नाराज होते तर लीलाबाई माधवरावांच्या पूर्वकृत्यांवर नाखूष होत्या. माधवरावांच्या इच्छेप्रमाणे स्वतःच्या घडून गेलेल्या स्वभावाला वळविताना लीलाबाईंना विलक्षण मनस्ताप होतो. हा अन्याय आहे, ही जबरदस्ती आहे असे त्यांचेच एक मन त्यांना सांगते तर " ज्याच्याशी लग्न होते त्याच्याशी जुळते घेणे हेच इतर हिंदू स्त्रियांप्रमाणे माझे ध्येय होते." (५०) असे म्हणून त्यांचे दुसरे मन त्यांना गप्प बसविते. या पारंपरिक रूढीच्या संस्कारामुळे लीलाबाई माधवरावांशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करतात, नम्रता स्वीकारतात आणि बनतात ती माधवरावांची सावली. जिला फक्त मूळ रूपाच्या आड राहण्याचा अधिकार आहे, स्वतंत्र मते नाहीत. असली तरी व्यक्त करण्याचा हक्क नाही आणि व्यक्त केली गेली तरी जी फेटाळली जाण्याचीच शक्यता अधिक आहे, मूळ रूपाबरोबर मुकाट्याने जाणेच जिचे कर्तव्य आहे, याची साक्ष ही ' अकरा वर्षे ' देतात.

लग्न लागल्यानंतर इतर मंडळीला भेटायला जाताना माधवराव लीलाबाईंना सांगतात, " कुंकू फार मोठे झाले आहे, ते लहान कर आणि मग मंडळीत

ये." (३३) माधवरावांची ही आज्ञा समजून लीलाबाई तसे करतात. पारंपरिक रूढींवर पोसले गेलेले त्यांचे मन माधवरावांना विरोध करायला तयार नसते. तर त्यांचेच मन त्यांची समजूत घालते, "आजपर्यंत आईबापांची आज्ञा मानली आता पतीच्या आज्ञेप्रमाणे वागलेच पाहिजे. 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति।' " (३३) कुणाच्या तरी आज्ञेत राहण्यातच आपल्या जीवनाची सार्थकता आहे अशी लीलाबाईंची धारणा झालेली दिसते. लहानपणापासून करीत आलेली आषाढी एकादशी मोडण्याची लीलाबाईंची अजिबात इच्छा नसते पण केवळ माधवरावांसाठी त्या मोडतात. "तू अशिक्षित बायकांसारखी सगळा वेळ घरकामात व स्वयंपाकात घालू नकोस. काही तरी वाचन लेखन करीत जा. मला दोन पदार्थ कमी वाढलेस तरी चालतील." (४२) असे माधवराव सांगतात. "मला हा युक्तिवाद कधीच पटला नाही." (४२) असे लीलाबाई वाचकांजवळ कबूल करीत असल्या तरी प्रत्यक्ष माधवरावांसमोर मात्र त्यांच्यातील हिंदू पत्नीने त्यांना मुके केले आहे. लीलाबाईंचे दुपारचे झोपणे माधवरावांना पसंत नसे. आपल्यामुळे त्यांना मनस्ताप नको म्हणून लीलाबाई आपली झोप बाजूला सारून नेमून दिलेला अभ्यास करीत. संस्थानात नोकरी करावी असे माधवरावांना वाटत नाही. माधवरावांनी ती नोकरी स्वीकारावी असे लीलाबाईंना मात्र सारखे वाटत असते. पण माधवरावांच्या त्रासिक मुद्रेकडे पाहून त्या म्हणतात, "तुम्हाला त्यात सुख नसले तर तसे करू नका. मला सद्यःपरिस्थितीतही समाधान वाटेल." (३०) आपल्या वागणुकीने पतीचा विरस होऊ नये ही त्यांच्यातील हिंदू पत्नीची भावना या वागणुकीमागे आहे.

माधवरावांचे लीलाबाईंवरील प्रेम दर्शविणारे काही प्रसंगही 'आमची अकरा वर्षे' सांगतात. एकटीला जेवण जात नाही म्हणून माधवराव लीलाबाईंचे जेवण होईपर्यंत थांबत. सकाळी सहापर्यंत उठायची सवय नसल्याने पहाटे उठल्यावर माधवराव स्वतःचा चहा स्वतःच करून घेत. "पहाटे त्यांनी चहाकरिता मला कधीही उठविले नाही." (४१) असे त्या प्रेमाने नमूद करतात. लीलाबाईंच्या आजारपणात माधवरावांनी रात्ररात्र जागून काढल्याचे त्या भारावून बोलतात. "एका थोर विभूतीचे अगाध प्रेम शेवटी मला लाभले." (१९४) असा उल्लेख गहिवरून पुस्तकाच्या शेवटी करतात.

सतत माधवरावांच्या इच्छेप्रमाणे वागताना लीलाबाईंना कधी कधी फार त्रास होतो. त्याच आपली अवस्था सांगतात, "प्रत्येक वेळी आपणच नमते घ्यावे व ते म्हणतील तसे मनाला पटत नसूनही वागावे असे प्रसंग वारंवार येऊ लागले. संसारात गम्य व रम्य असे मला काही वाटेना." (१२९) आपले उबगलेले मन या ठिकाणी लीलाबाईंनी प्रकट केले आहे. केव्हा केव्हा तर आपण उगीचच लग्न

केले असे पश्चात्तापाचे उद्‌गारही त्यांच्या तोंडून बाहेर पडले आहेत. लग्नानंतरच्या पहिल्या काही महिन्यांनंतरची आपली असमाधानता त्या व्यक्त करतात, "दिवाळीपर्यंतचे आमचे दिवस मोठे चमत्कारिक गेले. मला मानसिक ताप असह्य होऊन बारीक ताप येऊ लागला. एकदा माझ्या मनात असेही आले की, आता आपण ह्यांच्यापासून काही दिवस दूर राहिले तर बरे होईल." (४९) एका नवविवाहितेचे हे उद्‌गार आहेत. यावरून त्यांच्या संसाराची कल्पना सहज येऊ शकते.

लीलाबाईंचे रूप बेताचेच होते. आपल्या रूपाचा उपहास त्यांना सोसत नाही. "तुला काय वाटते तू सुंदर आहेस ?" (४७) हे माधवरावांचे बोलणे लीलाबाईंच्या जिव्हारी लागते. त्या माधवरावांना फणकाऱ्याने उत्तर देतात, "मी कुरूप आहे याची मला चांगली जाणीव आहे. तुमच्याशी लग्न झाल्यापासून तर माझ्या कुरूपपणाची जाणीव वारंवार लोकही करून देऊ लागले आहेत. देवाने माझे रूप असे केले हा माझा गुन्हा नाही. पण कुरूप माणसांना अंतःकरण असतं हे माणसाने अगदीच विसरू नये. किंबहुना कुरूप माणसाचे अंतःकरण सुंदर माणसापेक्षाही सुंदर असू शकते हे लक्षात ठेवा." (४७) लीलाबाईंना संसाराची अतिशय आवड आहे. घर नीटनेटके असावे, नवऱ्याला चार पदार्थ करून खाऊ घालावे असे त्यांना वाटते. पण माधवरावांच्या स्वभावाला अनुसरून त्यांना स्वतःच्या इच्छेला वारंवार मुरड घालावी लागते. आपल्या या स्थितीवरून लीलाबाई म्हणतात, "लहानपणी जी लग्ने होतात तीच सुखाची. सासरच्या मंडळीशी ओळख होऊन त्यांच्यात पूर्णपणे एकरूप व्हायला पुष्कळ अवसर सापडतो. परंतु मोठेपणीच्या लग्नात त्यातल्या त्यात सुशिक्षित मनाचे कंगोरे कायमचे घडल्यावर जी लग्ने होतात ती मात्र एक प्रकारे मोठ्या जबाबदारीची व जोखमीची, कारण एकदा स्वभाव बनून गेल्यावर एकाने दुसऱ्यासारखे वागण्याचा कितीही प्रयत्न केला तरी तो प्रत्येकवेळी साधतोच असे नाही. त्यात अनेक ठिकाणी खटके उडण्याचाच अधिक संभव असतो." (४९) माधवरावांच्या संसारात असमाधानी असलेल्या लीलाबाईंच्या मनाचे हे पडसाद वाटतात. माधवरावांशी जुळते घेताना होणाऱ्या त्रासातून त्यांनी हा निष्कर्ष काढलेला दिसतो. माधवरावांनी सर्व परिस्थिती समजावून सांगितल्यावर आपण मनाचा हिय्या करून माधवरावांशी लग्नाला तयार झाल्याचे त्या सांगतात. "मी तुमच्यावर इतका जीव टाकते पण तुम्हाला माझ्या तळमळीची कल्पना नाही." (१३३) असे लीलाबाईंचे असमाधानाचे रुदन अधूनमधून ऐकायला येते. जेथे त्या माधवरावांशी समरस होऊ शकत नाहीत किंवा तसा प्रयत्न करूनही त्या प्रयत्नांना मनाची साथ मिळत नाही तेव्हा त्यांचे स्वतंत्र अस्तित्व जागे होते. मन बंड करते परंतु आपण माधवरावांची छाया आहोत अशी जाणीव मनाला होताच बंड मागे घेतले जाते आणि त्यांची प्रतिमा पतीच्या छायेत धूसर होत जाते.

लीलाबाईंचा संकोची स्वभाव, लहानपणापासून कोणाच्यातरी आज्ञेत राहण्याची सवय आणि बरेच दिवस एकटे राहिल्याने दुसऱ्याचा विचार न करता स्वतःच्या मनाप्रमाणे वागणे ही माधवरावांची सवय या सर्व परिणामातून लीलाबाई माधवरावांची 'छाया'च राहिल्या असाव्या.

**'स्मृतितरंग'मधील रानडयांच्या निस्सीम भक्त–अन्नपूर्णाबाई**

"चालविसी हाती धरोनिया" (४५) किंवा "पुष्पसंगे मातीस वास लागे" (१०५) अशी पतिछायेत नम्रतेने उभे राहण्याचीच अन्नपूर्णाबाईंची रीत असल्याचे 'स्मृतितरंग' वाचल्यावर जाणवते. "माझी बायको शोभशील अशा तऱ्हेने वागलं पाहिजे बरं का?" (१६) नवऱ्याची ही सूचना म्हणजे अन्नपूर्णाबाईंना तेवीस अक्षरी मंत्रच झाला. तो मंत्र भक्तिभावाने अन्नपूर्णाबाईंनी जपल्याची कथा 'स्मृतितरंग' प्रत्ययास आणून देतात.

'आदर्श पुरुष' (लेखिकेचे हृद्गत) हे अन्नपूर्णाबाईंनी रानडयांना बहाल केलेले विशेषण पतिभक्तीतून जन्मलेले आहे. "रानडयांशी लग्न करून सुखाचा अमूल्य ठेवा मिळवला" (११२) या विधानावरून त्यांची पतिभक्तीच प्रकट होते. रानडयांची कविता छापून येते तेव्हा सुखावलेल्या अन्नपूर्णाबाई म्हणजे त्यांचे पतिभक्त रूपच होय. रानडयांना कॅन्सर झाल्याचे जेव्हा कळते तेव्हा या पत्नीची अवस्था, "आता माझे डोळे ऐकेनात. पानावर बसल्यावर अश्रू गाळण्याचा हा पहिलाच प्रसंग होता. जेवताना मुलेसुद्धा रडलेली त्यांना आवडत नसत ... आपले घर म्हणजे या चार भिंतीत साठविला असलेला माझा स्वर्ग अदृश्य होऊन अगदी वैराण अरण्य झाले होते, त्या जागेचे." (११५) ही अन्नपूर्णाबाईंची तगमग त्यांचे पतिप्रेम दाखविते आणि हे पतिप्रेम पतिभक्तीतूनच जन्मले असावे असे वाटते. कारण पती हेच आपले सर्वस्व आहे अशी त्यांची दृढश्रद्धा आहे. परमेश्वर आणि भक्त अशी या पति–पत्नीप्रेमाची रीत आहे. अपार कष्ट केल्यावर एखाद्या वेळी चुकूनमाकून हा 'देव' त्यांना प्रसन्न होतो आणि तेच त्यांना आपले जीवनसाफल्य वाटते. रानडयांच्या आधी आपल्याला मृत्यु यावा ही अन्नपूर्णाबाईंची इच्छा त्यांची पतिभक्तीच दर्शविते लवकर मृत्यू येण्यासाठी त्या आपले वजन कमी करतात. वजन कमी झाल्यावर आता आपण मरू म्हणून सुखावतात. हा भाबडेपणाही पतिभक्तीपायी अन्नपूर्णाबाईंनी स्वीकारलेला आहे. पतीविना आपले आयुष्य त्यांना 'मृतवत, (१४९) वाटते. बाईंचे पतिभक्त मन पतीच्या वियोगाने पानापानातून विव्हळताना दिसते.

पायांना पडलेल्या भेगा बऱ्या व्हाव्या म्हणून रानडयांनी आणलेली व्हॅसलीनची बाटली रानडयांचे अन्नपूर्णाबाईंवरील प्रेम सिद्ध करण्यास त्यांना पुरेशी वाटते. तेवढया प्रेमप्राप्तीसाठी आपल्याला घ्यावा लागलेल्या श्रमांचा त्या कधीही

विचार करीत नाहीत. असा हा निस्सीम भक्तीचा प्रकार आहे. रानडयांचा सहवास त्यांना 'सुखाचा आगर' (५०) वाटतो. ह्या सर्व बाबी अन्नपूर्णाबाईंची पतिभक्त प्रतिमा स्पष्ट करण्यास मदत करतात. पतीसाठी स्वतःच्या स्वभावाला घातलेली मुरड, त्याच्या आज्ञेत राहून त्यांना सुखी करण्याचा केलेला प्रयत्न सांगत असताना किंवा इतर निमित्ताने त्यांचे पुढील अस्पष्ट रूप आपल्या हातात येते.

अन्नपूर्णाबाईंना शिक्षणाची अतिशय आवड आहे. परिश्रमाने व चिकाटीने त्या शिकतात. मूर्तिकलेच्या प्राप्तीसाठी अविरत धडपडताना दिसतात. कलेप्रमाणेच त्यांना निसर्गाचेही प्रेम आहे. या नवनवोन्मेषशाली निसर्गात त्या स्वतःचे भान हरतात. सीता रामाबरोबर अरण्यात–निसर्गसान्निध्यात राहिली. त्यामुळे वनवास हा त्यांना शाप नाही तर वरदान वाटतो. त्यासंबंधी त्या म्हणतात, "पतीच्या सहवासात ईश्वरनिर्मित स्थिरचर भावंडांमध्ये किती सुखाचा गेला असेल सीता-माईचा काळ !" (४१) प्रेमात त्यागाचे स्थान फार महत्त्वाचे आहे. त्यागाची महती सांगताना आतापर्यंत ताजमहालासंबंधी परंपरेने मानले गेलेले विचार अन्न-पूर्णाबाईंना पटत नाहीत. "प्रेमाच्या दिव्याला त्यागाचे कोंदण होते की नाही मला ठाऊक नाही आणि पैसे, अधिकार यांच्या जोरावर बांधलेल्या सुंदर इमारतीवरून तसे मानायला माझे मनही तयार नाही. कदाचित माझी दृष्टी विशाल नसेल म्हणूनही असे होणे शक्य आहे. मला आपली श्रीरामचंद्रांची अरण्यातील पावलेच प्रेम–प्रतिमा वाटतात." (९९) रामाचा वनवास आणि ताजमहाल यासंबंधी बाईंनी मांडलेले वरील विचार म्हणजे त्यांच्या स्वतंत्र चिंतनशील प्रज्ञेचा आवि-ष्कार वाटतो. "प्रेमात जितकी बंदी जास्त तितकी मौज जास्त" (२२) हे वरवर मौजेचे वाटणारे पण अत्यंत अर्थगर्भ असे हे विधान त्या आपल्या अनुभवा-वरून करतात. "मनुष्य ब्राह्मण आपल्या गुणाने व कर्माने होत असतो." (५३) अशी भगवद्गीतेला अभिप्रेत असलेली कर्मावरून जात निश्चित करण्याची रीत त्यांना पटते. "नावाने अन्नपूर्णा पण बहुतेक प्रांतात अपूर्णा अशीच होते." (५८) यातून बाईंचे नम्र व्यक्तिमत्त्व जाणवते. आपली भांडणे, चोरून खाणे त्या खुल्या दिलाने कबूल करतात. "मी जरा उतावळीच होते. मनावर ताबा ठेवायची फारशी सवय नव्हती. चटदिशी राग येई. मग मात्र पश्चात्ताप होई." (६०) हा बाईंचा प्रांजळ आत्माविष्कार वाटतो.

अन्नपूर्णाबाईंची ही प्रतिमा पतीच्या छायेतील असल्याने पुसट आहे. कारण इतरत्र बाईंनी स्वतःला अस्तित्व न ठेवता पतिभक्तीला वाहून घेतले आहे.

### यादवरावांच्या कलाने वागणाऱ्या इंदिराबाई

यादवरावांचे चरित्र लोकांसमोर ठेवण्यासाठीच इंदिराबाई भागवतांनी 'या सदाशिव' लिहिले. सर्वसाधारण पतिभक्त स्त्रियांप्रमाणेच इंदिराबाई भागवतांचीही

भूमिका आहे. आपला जन्मच पतिसुखासाठी आहे आणि त्यातच आपल्या जीवनाचे परमकल्याण आहे अशी त्यांची धारणा आहे. पतीला त्यांनी परमेश्वर मानले आहे याची कबुली त्या स्वतःच देतात " ... परमेश्वराचे गुणगान करायला कुठलीच आडकाठी नसते." (२) भगवंतांना परमेश्वर मानल्याने सहजच इंदिराबाईंकडे भक्ताची भूमिका आली आहे. भक्तीमुळे यादवरावांच्या आनंदातच त्या आपला आनंद मानतात. यादवरावांच्या इच्छेप्रमाणे 'आर्टस् कॉलेज 'मध्ये जाण्याची परवानगी वडील देतात तेव्हा इंदिराबाईंना अतिशय आनंद होतो. पती हेच दैवत असल्याने त्याचा आनंद तोच आपला आनंद, त्याचे सुख तेच आपले सुख अशी जास्तीत जास्त पतीत विलीन होण्याची इंदिराबाईंची भूमिका दिसते. यादवराव परीक्षेत पास व्हावे म्हणून इंदिराबाई महादेवाला प्रार्थना व शिवलीलामृताचे पारायण करतात. पतीच्या भल्यासाठी काहीही करणे आपले कर्तव्यच आहे हा भक्तिभाव इंदिराबाईंच्या या वागण्यातून दिसतो. यादवराव आजारी पडतात तेव्हा इंदिराबाई म्हणतात, "माझे हातपायच गळाले." (१३८) यादवरावांवरील प्रेमाने हातपाय गळणे साहजिक आहे. पण इंदिराबाईंचे प्रेम भक्तीतून अंकुरलेले दिसते.

आपण व यादवरावांनी मिळून गप्पागोष्टी करीत चहा घ्यावा असे इंदिराबाईंना वाटणे स्वाभाविक आहे. पण यादवरावांच्या भोवती नेहमीच माणसांचा गराडा पडलेला असे. त्यामुळे यादवरावांकडून इंदिराबाईंची ही लहानशी इच्छा पूर्ण होत नाही. अशा वेळी ते म्हणत, "माणसाचं मन मोठं पाहिजे. माणसाची संकुचित वृत्ती नसावी." (३३) यादवरावांचा समजूतदारपणा, विचारी स्वभाव यातून इंदिराबाईंना वाचकांसमोर ठेवायचा असावा. यादवरावांचा हा उपदेश योग्य असला तरी इंदिराबाईंनी हट्ट केला असता तर यादवरावांनी त्यांच्या मनाप्रमाणे एखाद्यावेळी वागायला हरकत नव्हती असे वाटते. पण पतीच्या 'नाही 'ला आपल्या हट्टीपणाने किंवा स्वतंत्र मतीने 'होकार' देण्याची वृत्ती इंदिराबाईत नाही. "आपले काही खर्च न होता नवऱ्याचे कोणत्याही गोष्टीनं समाधान होत असेल तर बायकोने केले पाहिजे." (२०) असे त्या सांगतात. यावरून पतीच्या 'हो' ला 'हो' म्हणण्यातच त्यांना आपले जीवन-कल्याण वाटत होते असे दिसते.

पतिभक्त इंदिराबाईंव्यतिरिक्त वेगळे अस्तित्व असलेली इंदिराबाईंची प्रतिमाही 'या सदाशिव 'मध्ये वाचायला मिळते. साहेबांचे चरित्र लिहिताना सर्वच आठवणे शक्य नाही. त्यामुळे त्यात रिक्तता भरपूर राहिली असेल अशी नम्र भूमिका बाईंनी पुस्तकाच्या आरंभीच घेतलेली आहे. त्या अतिशय संकोची आहेत. त्यामुळे बाळंतपणात जिभेच्या लोळागोळा होण्याने होणारे हाल मुकाटपणे सोसतात. समाजातील एकंदर विवाहविषयक परिस्थिती लक्षात घेऊन विधान करतात,

"आई–बाबा मुलामुलींना योग्य असाच वर–वधू शोधत असतात. ते कधीही आपल्या मुलांचं अकल्याण करीत नाहीत. पण अनुभवाच्या बाबतीत मात्र लहान-मोठ्यांचा दृष्टिकोण वेगळाच असणार ! आजकाल शिक्षण घेणाऱ्या मुलींना वाटते, 'आम्ही आमच्या स्वतंत्र आहोत.' आईबाप लग्न जुळवायला लागले तर म्हणतात, 'आम्हाला लग्नच करायचे नाही. आम्हाला मुलगाच पसंत नाही.' आणि आपल्या लहानपणीच्या अल्लडपणानं एखादेवेळी खरोखर चांगले मिळत असलेलं घरसुद्धा गमावतात. शेवटी त्यांनी स्वतःच ठरविलेल्या लग्नात स्वर्गाचे देव थोडीच येणार ? तेच आपले गणपतराव, भास्करराव किंवा अविनाश, मधुकर असतात झालं. लग्न न करण्याच्या अट्टहासात पालकांची परिस्थिती कशी आहे ? आपल्या शिक्षणाची योग्यता काय आहे ? किंवा शिक्षण घेतल्यावर आपलं ध्येय काय आहे याचा मुळीच विचार करीत नाहीत. असं करताकरता निसर्ग नियमांनी सर्वांच्याच आयुष्यात एकवेळ अशी धायकुतीची येते की, "पुष्कळांचे अगदी एक-मेकांच्या संमतीने झालेले विवाह पाहून आश्चर्याने मन थक्क होते. पुष्कळांचे योग्य विवाहही होतात." (३) यशस्वी जीवन जगण्यासाठी इंदिराबाई सांगतात, "... ज्या कोणाला एकमेकांच्या साह्याने जन्म काढायचा असतो त्यांनी एकमेकांच्या कलाने घेतलेच पाहिजे." (२०) महत्त्वाची जीवनतत्त्वे मांडणाऱ्या इंदिराबाई यातून दृग्गोचर होतात. एकमेकांच्या कलाने त्या वागायला सांगतात पण त्या स्वतः मात्र यादवरावांच्या कलानेच वागताना दिसतात. याठिकाणी प्रकटलेले हे त्यांचे स्वतंत्र मन आहे. इंदिराबाई बरेचदा बुद्धिवादी वाटतात. पारायण करूनही यादव-राव नापास होतात त्यावेळी, "... इच्छित कामना–सिध्यर्थ, असे पौराणिक ग्रंथांत जागोजाग लिहिलेलं असतं." (२२) त्यामुळे भावनांची फसवणूक होते असे त्या म्हणतात. यादवराव नापास झाले. देवाची मर्जी ! अशी दैववादी भूमिका त्या मांडत नाहीत. तर वरील बुद्धिनिष्ठ अर्थ लावतात. यादवरावांचा धंदा यशस्वी होण्याचे कारण म्हणजे, "त्यांचा सतत उद्योग व पूर्वजांची पूर्वपुण्याई होय. पूर्व-पुण्याई–वाडवडिलांचे पिढीजात सद्वर्तन, खरेपणा, औद्योगिक वर्तन हे होत." (२५–२६) पूर्वपुण्याई या शब्दाचा आशयही बुद्धिनिष्ठ आहे. या सर्व विधानां-वरून इंदिराबाई जीवनानुभवाला तळापासून सामोऱ्या गेलेल्या दिसतात. पति-भक्तीमुळे माहेरचे अस्तित्व, किंवा इतर बाबी यासंबंधी फारसे बोलले जात नाही. पण तरीही वरील प्रसंगांमधून यादवरावां–व्यतिरिक्त वेगळे अस्तित्व असणारी इंदिराबाईंची पुसटशी स्वतंत्र प्रतिमा मिळते. परंतु इंदिराबाई प्रामुख्याने आपल्या मनावर ठसा उमटवून जातात त्या पतिभक्त म्हणूनच !

**'माझा नंदादीप' मधील पतिभक्त लक्ष्मीबाई**

पतीच्या छायेत उभे राहण्याचे जे व्रत इंदिराबाई भागवतांनी घेतले आहे तेच व्रत लक्ष्मीबाई पटवर्धनांनीही स्वीकारलेले आहे. पती म्हणजे–

"प्राणांचा जो प्राण । जीवाचे जीवन
चैतन्यी चैतन्य । ओती नित्य ।" (१६५)

असे त्यांना वाटते. त्याचा सहवास 'सुधेहुनी गोड', 'स्वर्गसुख' ठरतो. पती हेच सर्वस्व समजून

"तूची पतिदेवा । माझा पांडुरंग
चिंतनात दंग । जीव माझा ।" (१७९)

पतीला देव मानल्याची कबुली त्या स्वतः देतात—

"द्रेवच म्हणुनि । तुजसी पाहिले
आणि पूजियेले । हृदयात" (१७२)

पतिनिधनानंतर 'देवाशिवाय देव्हारा' (६०) अशी त्यांच्या घराची अवस्था होते. आपल्या स्वतःच्या अवस्थेचे त्या वर्णन करतात—

"तळमळ होई । राया तुझ्याविण
पळभर चैन । नाही जीवा
आनंदी आनंद । जरी हे भोवती
परि नाही चित्ती । समाधान"। (१७१)

पतीविना त्यांना आपले सर्वस्व हरविल्यासारखे वाटते. डॉक्टरांमध्ये शक्यतोवर एकरूप होण्याचाच बाईंचा प्रयत्न आहे. त्यातच त्यांनी आपल्या आयुष्याची सार्थकता मानलेली आहे. डॉक्टर एम्. बी बी. एस्. झाल्यावर त्यांना अतिशय आनंद होतो आणि त्या सुटकेचा निःश्वास टाकतात. आपण पास होतो की नापास याची काळजी विद्यार्थ्याला स्वतःला म्हणजे डॉक्टरांना असावी तितकीच लक्ष्मीबाईंना आहे. इतके एकजीवित्व त्यांनी डॉक्टरांशी साधले आहे. पतिप्रेमापेक्षा हा पतिभक्तीचाच परिणाम असावा असे वाटते. भालचंद्रांची हिऱ्याच्या अंगठीची हौस पूर्ण झाली नाही म्हणून हे पतिभक्त मन हळहळताना दिसते. पतिभक्तीमुळे डॉक्टरांच्या गुणांनी त्या अतिशय भारावून गेलेल्या आढळतात. या भारावलेपणाचा परिणाम म्हणजे आत्मचरित्राच्या शेवटी जोडलेली 'अभंगमाला' होय.

डॉक्टरांचे आपल्यावर किती प्रेम आहे हे सांगून त्यांचा समजूतदारपणा, विचारीपणा, यावर प्रकाश टाकण्याचा लक्ष्मीबाईंचा प्रयत्न असावा असे वाटते. बाईंच्या आजारपणात, "सासूबाईंना आवडत नसले तरी डॉक्टर सासूबाईंच्या नकळत येऊन, प्रेमळपणे चौकशी करून आपल्याकडून होईल तेवढे त्यांनी माझे दुःख कमी करण्याचा प्रयत्न केला." (३५) चांगल्या गोष्टी करण्यासाठी 'डॉक्टरांचे नेहमी प्रोत्साहन असे' (२) असे आवर्जून सांगतात. यातून पतिभक्त लक्ष्मीबाईच प्रकटताना दिसतात.

पतिभक्त लक्ष्मीबाईंव्यतिरिक्त स्वतंत्र अस्तित्व असणारे लक्ष्मीबाईंचे पुसटसे चित्र ' माझा नंदादीप 'मध्ये चित्रित झालेले आढळते. लक्ष्मीबाईंना शिक्षणाची अतिशय आवड आहे. लहानपणी आई–वडिलांचे छत्र न लाभल्याने त्यांची शिक्षणाची इच्छा पूर्ण होऊ शकत नाही. इंग्रजी तिसरीत असताना वर्गात चांगला नंबर असूनही केवळ परिस्थितीमुळे त्यांना शिकावयास मिळत नाही. सासरीही त्यांची ही इच्छा पूर्ण होऊ शकत नाही. जीवाचा आटापिटा करून त्या हिंदीच्या परीक्षेला बसतात तेव्हा, आपली अवस्था त्या सांगतात, " मी हिंदीच्या पहिल्या परीक्षेला बसण्याची सर्व तयारी केली होती. अभ्यास झालाच होता. दौत, टाक, पेपर वगैरे घेऊन मी परीक्षेला निघाले. फाटकापर्यंत जाते तोच समोरून पाहुणे मंडळी आली. डॉक्टर घरी नव्हतेच. अर्थात माझी परीक्षा घरातील चुलीपुढे झाली." (१२०) एकदा लग्न झाल्यावर घरातल्या गृहिणीनेच सर्व पाहिले पाहिजे. तिच्या इच्छा, आवडींचा विचार केला जात नसे. अशा अवस्थेत लक्ष्मीबाईंचे शिक्षण होणे कठीणच नव्हे तर अशक्य होते. लक्ष्मीबाईंची वृत्ती बंडखोर नव्हती. त्यामुळे त्यांचा पेपर गेला.

ही शिकण्याची इच्छा त्या दुसऱ्याला शिकवून पूर्ण करतात. सांगतात, " ... चवथी पास झालेल्या मुली घरी रिकाम्याच असत. त्यांना गोळा करून दुपारी दोन ते पाचपर्यंत काहीतरी शिकवण्याचे ठरवून मी सुरुवात केली. कोणी इंग्रजी शिकत, तर कोणी शिवायला येत, तर इतर काही कागदांची फुले, हार, चिंध्यांची चित्रे करीत असत. मला काही फार येत होते अशातला भाग नाही, परंतु काहीतरी उद्योग करावयाचा म्हणून मी हे करीत होते. तीसपस्तीस मुली येत असत. एक चरखा घेतला आणि सर्व मुलींना सूत काढायला शिकविले. काही राष्ट्रीय गाणी करून ती मुलींना म्हणायला शिकविली. गोकुळअष्टमी, वटपौर्णिमा, गणेशचतुर्थी यासारखे उत्सव आम्ही दरवर्षी करीत असू. मुलींची संभाषणे बसवायची, त्यांचे खेळ घ्यायचे, टिपऱ्या गोफ शिकवायचे, पळण्याच्या वगैरे स्पर्धा ठेवायच्या, गावातील स्त्रियांना बोलावून हळदीकुंकू करायचे, असे कार्यक्रम सुरू केले. मला थोडेसे काव्य व लेखन करण्याचा नाद होता. माझ्या अल्प शिक्षणामुळे आणि पुढील प्रापंचिक पसाऱ्यामुळे जरी माझ्या हातून काही घडले नाही, तरी मी मुलींना नाना विषयांवर छोटी–छोटी संभाषणे लिहून देऊन ती त्यांच्याकडून नाट्याच्या स्वरूपात करवून घेतली. त्या संभाषणांना अनुरूप अशी लहान मोठी गाणीही बसविली. ती पेटीवर बसवून मीच वाजवीत असे. मुलींना टिपऱ्या, गोफ वगैरेही मीच शिकवीत असे. अशा तऱ्हेचा अपूर्व उत्साह त्यावेळी माझ्याजवळ होती ... घरातला सर्व व्याप सांभाळीत बाहेरील आवडीच्या उद्योगातही मी लक्ष घालीत असे. मी स्वत: घरातले सर्व मुलांचे कपडे शिवणे, विणकाम वगैरे करीतच असे. त्याशिवाय स्वदेशी चळवळ सुरू झाल्यापासून स्वदेशीचा प्रचार करण्याकरिता म्हणून मी घरी स्वदेशी बांगड्याही विकावयास ठेवल्या होत्या. याशिवाय पेन्सिली, साबण, रिळे, कागद

वगैरे बऱ्याच वस्तू मी मागवीत असे. त्याही वेळी अवेळी गिऱ्हाइकांना द्यायच्या असत. या सर्व कामांमुळे मला सकाळपासून रात्रीपर्यंत कधी फुरसतच नसे." (३१–३२–३३) यावरून उद्योगशील व दुसऱ्यांना शिकविण्यात रस घेणाऱ्या लक्ष्मीबाईंची ओळख होते.

लक्ष्मीबाईंची शिवण्याची आवड बहुकक्षी आहे. चार मुलांची आई झाल्यावर बाईंनी घेतलेले व्यायामाचे शिक्षण त्याचा पुरावा होय. मिरजेला झालेल्या अखिल महाराष्ट्र शारीरिक शिक्षण परिषदेत 'तरुणांची उंची व वजन कसे वाढेल' या विषयावर त्या उत्तम चर्चा करतात. "इतके चांगले तू बोलशील अशी माझी कल्पना नव्हती. तुझ्या मानाने आजचे तुझे बोलणे छानच झाले." (६५) डॉक्टरां-कडून या चर्चेबद्दल त्या अशी शाबासकी मिळवतात. डॉक्टरांबरोबर बुद्धिबळाचा खेळही आवडीने खेळतात.

दुसऱ्यांचे कौतुक करण्याची ताकद असलेले मोठे मन लक्ष्मीबाईंजवळ आहे. 'सासूबाईंचा स्वभाव शांत होता' असे त्या अतिशय कौतुकाने व अभिमानाने सांगतात. डोली, खुर्ची, रिक्षा यांसारख्या माणसाला माणसाने उचलावयाच्या–ओढावयाच्या वाहनात बसायला त्यांचे संवेदनशील मन तयार होत नाही. या कुसुमकोमल मनाबरोबर आवश्यक त्या ठिकाणी कणखर धीट मनही त्यांना लाभलेले दिसते. कुसुमच्या आजारपणात तिची नाडी हाताला लागेनाशी झाल्यावर खुद्द डॉक्टरही घाबरून जातात. पण त्या डॉक्टरांना धीर देतात.

ईश्वरावर त्यांची श्रद्धा आहे. १९४३ मध्ये पडलेल्या दुष्काळात महादू शिपाई जेव्हा सर्वांना आंबिल देण्याचे कार्य करतो तेव्हा बाई म्हणतात, "ईश्वर कोणाच्याही मनींमुखीं उभा राहून कार्य करतो अगर करवितो हेच खरे." (९१) अशी स्वतंत्र लक्ष्मीबाईंची प्रतिमा 'माझा नंदादीप' मधून चित्रित होताना दिसते. परंतु हे प्रामुख्याने पतिचरित्र असल्याने लक्ष्मीबाईंची प्रतिमा धूसर झाली आहे.

**नानासाहेब केदारांच्या छायेतील रमाबाई**

केदारांची व्यक्तिरेखा उभी करण्यासाठीच रमाबाईंनी हे 'मणी' वेचलेले आहेत. केदारांच्या जन्मापासून डॉक्टर होईपर्यंत केदारांचा जीवनवृत्तांत सांगितल्या-वर रमाबाई स्वतःसंबंधी किंचित माहिती देतात. हा पतिभक्तीचाच परिणाम वाटतो. केदारांचे आपल्यावर प्रेम होते, केदार आपल्याला फार जपत असत हे प्रसंग सुद्धा केदारांच्या गुणांवर प्रकाश टाकण्यासाठीच निवडले असावेत असे दिसते.

रमाबाईंच्या मते केदार म्हणजे 'स्फूर्तिदेवता' (५) होय. 'कै. नानासाहे-बांच्या फोटोपाशी बसले की त्यांना स्फूर्ती होई व लेखणीतून झरझर मजकूर उतरे" (५) असे त्यांचेच बोल रमाबाई तांब्यांनी प्रस्तावनेत उद्धृत केले आहेत.

पुस्तकाची अर्पणपत्रिकाही रमाबाईंच्या पतिभक्तीवर प्रकाश टाकणारी आहे. "आज जे काय मी वेडेवाकडे लिहू शकते ते ह्यांनी दिलेल्या ज्ञानाचे फळ होय असेच मी म्हणेन." (१७६) असे त्या भारावून म्हणतात.

आई-वडिलांची एकुलती एक मुलगी म्हणून लाडात वाढलेल्या रमाबाईंचा लग्न झाल्यावर मात्र सासूकडून छळ होतो. रमाबाईंची ही स्थिती पाहून केदारांना वाईट वाटते. आपण बायकोचा कैवार घेत आहोत असे चुकूनही न वाटू देता करायच्या त्या गोष्टी मुकाट्याने व सहज केल्यासारख्या ते करीत असे रमाबाई सांगतात. याचे एक उदाहरण म्हणून त्यांनी चहाचा प्रसंग सांगितला आहे. लग्नापूर्वी रमाबाई चहा घेत असत. केदारांकडे कोणी चहा घेत नसल्याने लग्नानंतर त्यांना चहा मिळत नसे. आपल्याला चहा मिळावा म्हणून स्वत: केदारांनी चहा घेण्यास सुरुवात केली असे रमाबाई मोठ्या कौतुकाने सांगतात. पतिभक्तीने भारावलेल्या रमाबाई केदारस्तोत्र गाण्यात इतक्या तल्लीन होतात की, मुलांच्या जन्मतारखांचे उल्लेखच त्या बहुतेक देतात. किंवा "२६ सप्टेंबर १९१३ रोजी सासूबाईंनी दुसऱ्या नातवंडाचे मुखावलोकन केले." (५६) अशी एखादी ओळ उद्धृत करतात. बाकी मुलांच्या हालचाली अठ्ठ्यांशी पानापर्यंत कुठेही ऐकू येत नाहीत. आपल्या लाडक्या मुला-बाळांच्या बाबतीतसुद्धा पतिभक्तीने रमाबाईंना अबोल केलेले दिसते. मंत्री म्हणून निवडून आल्यावर केदारांना ओवाळलेली पंचारती, त्यांची मीठ-मोहऱ्यांनी काढलेली दृष्ट पतिप्रेमापेक्षा पतिभक्तीवरच अधिक प्रकाश टाकते. या सर्व प्रसंगांमधून पतिभक्त रमाबाईच स्पष्ट होतात.

पतिचित्र रेखाटीत असतानाच इतर काही प्रसंगांमधून रमाबाईंची मर्यादित स्वतंत्र अस्तित्व असणारी फिकटशी व्यक्तिरेखा हातात येते. रमाबाईंचा जन्म तळकोकणातील वागमांडले येथील दाबके यांच्या घराण्यातील. केदारांनी मागणी घातल्यावरचे रमाबाईंचे लाजणे स्त्रीसुलभ आहे. मैत्रिणीच्या सासरचे लोक तिला लवकर माहेरी पाठवत नाहीत. "तुम्ही तरी माझ्या बाबतीत असे करणार नाही ना !" (४९) हा बाईंनी केदारांना विचारलेला प्रश्न अल्लड रमाबाईंचे दर्शन घडवितो.

मुलींना आपल्या माहेरचे किती कौतुक असते हे सांगताना रमाबाई लिहितात, "एकवेळ पुरुष पत्नीकरता आपल्या आप्तांची उपेक्षा करील पण स्त्री मात्र स्वत:च्या माहेरचा अभिमान कधीही विसरणार नाही." (५०) बराच काळ माहेरी गेल्याचा हा परिणाम असावा किंवा रक्ताचे नाते म्हणूनही हे जन्मजात आकर्षण असावे. आपला मुलगा आय्. सी. एस्. व्हावा ही बाईंची महत्त्वाकांक्षा मातृसुलभ आहे. सासूबाई रमाबाईंशी वाईट वागतात. पण तरीही सून म्हणून आपल्या कर्तव्याला जागून रमाबाई त्यांच्याशी चांगले वागतात. त्यांच्या आजार-

पणात त्यांची मनोभावे शुश्रूषा करतात. यातून कर्तव्यनिष्ठ रमाबाई साकार होतात. नवीन मुलींच्या संसारासंबंधी बाई म्हणतात, "स्वत: निवडलेल्या आजच्या सुधारलेल्या जमान्यातील पतिराजांबरोबरचे आताच्या सुशिक्षित आणि प्रौढ मुलींचे संसार पाहिले म्हणजे त्यांच्या निवडीत विवेक नसून विकारच असतो असे म्हणणे भाग आहे. नवीन विचारप्रवाह सुरू होणाऱ्या सध्याच्या नव्या जगात जुने ते सर्वच सोने असेही मानणे योग्य होणार नाही. बदलता काळ व बदलती विचार-सरणी यांना अनुसरून आवश्यक त्या सुधारणा व आवश्यक ते बदल व्हायलाच पाहिजेत. प्रश्न एवढाच की तसे करताना तात्त्विक भूमिकेचे अधिष्ठान सुटणार नाही एवढी खबरदारी घेतली म्हणजे झाले." (३२–३३) "संसारात केवळ स्त्रीच्याच नव्हे तर पुरुषाच्या त्यागालाही थोरपद आहे."(४८) आपल्या कर्तव्याची जाणीव ठेवून शिस्त, प्रामाणिकपणा व नियमितपणा हे गुण अंगी बाणवून दुसऱ्यास त्या गुणांचे अनुकरण करावयास लावतात ती माणसे चांगली." (७७) ही चांगल्या माणसाची त्यांची व्याख्या पटते. वरील उदाहरणांवरून संसारनिरीक्षक रमाबाई आपल्यासमोर उभ्या राहतात. हे पतिचरित्र असल्याने केदारांनाच मानाचे व महत्त्वाचे स्थान मिळालेले आहे. त्यामुळे रमाबाईंचे चित्र पडद्यातले आहे.

**'ढळला रे ढळला दिन सखया' आणि 'उमटलेली पावले'मधील पतिश्रद्ध राधाबाई**

माधवराव रानडे रमाबाईंना आपल्या हुकुमानुसार वागायला लावतात. माधवराव पटवर्धनांच्या हातूनही नकळतपणे तेच घडते. रमाबाई, लीलाबाई पतींच्या आज्ञेत वावरताना दिसतात. परंतु आतापर्यंत पाहिलेल्या स्त्रियांपेक्षा राधाबाई आपट्यांची अवस्था वेगळी आहे. लग्नानंतर आपटे गुरुजी राधाबाईंना त्यांची महत्त्वाकांक्षा, त्यांची आवड, संसारासंबंधी काही अपेक्षा वगैरे एकूण ज्यातून राधाबाई स्पष्ट होतील अशी माहिती विचारतात. "दोघांच्या विचाराने आपले ध्येय ठरवू" (४२) असे त्यांना म्हणतात. म्हणजे स्वत:ला वाटेल त्या वागणुकीची निवड करण्याची संधी आपट्यांनी राधाबाईंना दिली आहे. पण राधाबाई स्वत:ला स्वतंत्र न ठेवता सर्वस्वी आपट्यांच्या स्वाधीन होतात. "पती हेच संसारातील दैवत होय व पतीचे समाधान हाच माझा आनंद होय." (४३) या विधानावरून राधाबाईंनी आपखुशीने पतीची छाया होण्याचा निर्णय घेतलेला दिसतो. बेचाळीस वर्षे बाईंना आपट्यांची सोबत लाभते. आपट्यांच्या मृत्यूनंतर त्यांची अपुरी राहिलेली इच्छा पूर्ण करण्यासाठी आपट्यांचे चरित्र त्या लिहितात. त्यातून आपट्यांच्या सावलीत वावरणाऱ्या राधाबाईंची प्रतिमा चित्रित झालेली दिसते.

लाडात आणि सुस्थितीत वाढलेल्या राधाबाई आपट्यांच्या हलाखीच्या परि-स्थितीत त्यांची छाया म्हणून आनंदाने राहतात. आपट्यांच्या राष्ट्रभक्तीने त्याही

प्रेरित होतात. कीर्तने करून राष्ट्रीय शाळेला पैसे मिळवून देतात. राष्ट्रभक्ती हे आपले ध्येय आपटयांच्या इच्छेनुसार ठरवितात. राष्ट्रभक्तीसाठी आपटे जसे वागतील तसे त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून वागतात. यातून राधाबाईंची पतिभक्तीच निर्भेळपणे व्यक्त होताना दिसते.

'ढळला रे ढळला दिन सखया' ह्या पतिचरित्रातील एकशेपंचवीस पानांचा मजकूर पतिभक्तीमुळेच त्या लिहू शकल्या असाव्या असे वाटते. आपटयांची प्रकृती विकोपाला जाते तेव्हा बाईंचे डोळे अविरत गळायला लागतात. आपटयांच्या वेदनेपायी राधाबाईंची शुद्ध नाहीशी होते. ह्या घटना राधाबाईंचे आपटयांमधील विलीनत्व दाखवितात.

आपल्यावरील आपटयांचे प्रेम दर्शविणारी विधाने आपटयांचा मोठेपणा सिद्ध करण्यासाठी पतिभक्तीतून–पतिश्रद्धेतून दिली गेली असावी असे जाणवते. गुरुजींना आपल्या लिखाणावर राधाबाईंचा अभिप्राय अगोदर लागत असे. "माझी राधा खूष आहे ना माझ्या लिखाणावर !" (९७) हे आपटयांचे उद्गार राधाबाई मोठ्या प्रेमाने सांगतात. शेवटी आपटे म्हणतात, "पुन्हा जन्म घेणे असेल तर तो तुझ्याचसाठी घेईन. येशील ना मजबरोबर ? माझ्यावाचून करमणार नाही तुला दुसरीकडे." (९८) राधाबाईंची पतिभक्ती स्पष्ट करण्यासाठी ही विधाने पुरेशी वाटतात. याव्यतिरिक्त वरील दोन्ही पुस्तकांतून स्वतंत्र राधाबाई पुसटत्या निसटत्या रेखल्या गेल्या आहेत.

आईच्या मृत्यूनंतर आईला दाराच्या फटीतून पाहण्याच्या प्रसंगातून बाल राधाबाईंचे दर्शन घडते. आपल्या हृदयावर उमटलेल्या आपटयांच्या 'पावला' बरोबरच इतरांच्या 'पावलां'चे ऋणही राधाबाईंनी नम्रतेने मान्य केले आहे. नागपूरला स्वतंत्र बिऱ्हाड करून राहण्याच्या त्यांच्या इच्छेतून स्त्री–सहज संसारी वृत्ती दिसते. आपल्या मुलाची मौंज थाटामाटाने करण्यासाठी कष्ट करणारे हौशी; प्रेमळ आणि कर्तव्यनिष्ठ मातृहृदय राधाबाईंचे आहे. लीलाच्या दुखण्यात हे कोमल हृदय कळवळताना आढळते.

आपले दोषही राधाबाईंनी प्रांजळपणे सांगितले आहेत. "मला करमत नसले की आई दुसऱ्यांशी गप्पा मारताना मला बघवत नसावी. त्यांच्या गप्पा ऐन रंगात आल्या असताना मला भूक लागली असे म्हणून गप्पात व्यत्यय आणायचा." (९) आईच्या गप्पात विनाकारण व्यत्यय आणत असल्याची राधाबाईंची ही कबुली आहे.

जीवननिरीक्षणावरून, त्यांना वेळोवेळी आलेल्या अनुभवांतून काही जीवनतत्त्वे, सामान्य विधाने राधाबाईंनी मांडली आहेत. "निराश झालेला माणूस भ्रामक कल्पनेला चटदिशी चिकटतो." (२) निराशाग्रस्त माणसाला विवेकाविवे-

काचे भान राहत नाही. त्यामुळे त्याची होणारी अवस्था राधाबाईंनी अचूक हेरली आहे. " कोणाच्या घरात आत्या, आज्या, चुलत्या असतात व त्यांचाच उपद्रव होतो. आणि सावत्र ही भावना फोफावण्यास त्या मदत करतात. घरातील वडील-धाऱ्या स्त्रिया पहिल्या मुलाची विशेष काळजी वाहतात. व मुलांचा कैवारही पदोपदी घेतात. अशा वागणुकीमुळे मुलास त्या स्त्रियांबद्दल आपुलकी व प्रेम वाटते. आणि मग साहजिकच सावत्र आईचा ओढा व लळा मुलास लागत नाही." (३) सावत्र मुले आईपासून का दुरावली जातात याचे हे बुद्धिनिष्ठ कारण. " बोलण्यामध्ये समानता व साधेपणा सहज आणता येतो. पण स्वतःच्या वर्तनात ही तत्त्वे पाळलेली पाहण्यास मिळणे फार दुरापास्त आहे." (७५) बोलणे सोपे आहे. परंतु त्यानुसार वागणे कठीण आहे हे सत्य राधाबाईंनी पटविलेले आहे. " स्त्री–स्वभाव असा आहे की सुख आणि दुःख कोणाजवळ निवेदन केल्याशिवाय बरे वाटत नाही." स्त्री–स्वभावाचे हे राधाबाईंचे सूक्ष्म व मार्मिक निरीक्षण होय.

' ढळला रे ढळला दिन सखया ' आणि ' उमटलेली पावले ' यांतून पतिभक्त पत्नी, प्रेमळ माता, सुकन्या, संसारनिरीक्षक असे बहुविध पैलू असणारे राधाबाईंचे चित्र प्रकटलेले आहे. राधाबाई ' ढळला रे ढळला दिन सखया ' पेक्षा ' उमटलेली पावले ' मध्येच आपले व्यक्तित्व अधिक उलगडताना दिसतात.

**' मीच हे सांगितलं पाहिजे ! ' मधील केतकर**

" डॉक्टरांचं व्यक्तिमत्त्व मला जसं समजलं तसं ते लोकांसमोर उभं कर-ण्याचा माझा प्रयत्न आहे. अर्थात पतीच्या चित्रात मी आणि मुलं पार्श्वभूमीवर येणं साहजिक आहे." (१८) असे निवेदनात सांगून बाईंनी आपल्या निसटत्या अस्तित्वाची कल्पना प्रारंभीच दिली आहे. " विवाहानंतर मी अंतर्बाह्य महाराष्ट्रीय बनण्याचा प्रयत्न करू लागले." (३२) एवढे एक वाक्य सोडले तर सबंध पुस्त-कात पतिभक्त म्हणून शीलवतीबाईंची प्रतिमा कुठेही मूळ धरताना दिसत नाही. त्यांना केतकरांची जी मते मान्य नसतात ती त्या पतिभक्ती म्हणून स्वीकारीत नाहीत. काँग्रेसच्या सदस्यत्वासाठी शीलवतीबाईंचा अर्ज केतकर त्यांना न विचारता भरतात. त्यांना ते खटकते. " त्यांनी असं करायला नको होतं. हे माझं मत अद्या-पही कायम आहे." (३२) असे त्या आजही म्हणतात. यावरून शीलवतीबाईंचे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व दिसते. केतकरांचे सिगारेटचे व्यसन त्यांना अजिबात आवडत नाही. डॉक्टरसाहेबांनी मद्यपान केलेले चालत नाही. या बाबतीत त्या केतकरांचा स्पष्टपणे निषेध करतात.

शीलवतीबाई स्वतः ज्यू असूनही त्यांचे भारताचे आकर्षण जबरदस्त आहे. त्यांचे हिंदुस्थान–प्रेम दुर्गाबाई भागवत यांनी शीलवतीबाईंच्या शब्दात स्पष्ट केले आहे. " या पुस्तकात हिंदुधर्माची नालस्ती आहे. मी हिंदू आहे. त्याचा अनुवाद

मी करणार नाही." (२) अत्यंत हलाखीच्या दिवसांत, "त्यांनी रोखठोक जबाब देऊन दीड दोन हजार रुपये हातचे घालवले. आपल्या मुलीचा भुकेजलेला चेहराही त्यांना मोहात पाडू शकला नाही." (२) दुर्गाबाईंनी शीलवतीबाईंच्या वरील विधानाला आपल्या विधानाची पुष्टी देऊन त्यांचे भारतप्रेम अधिक उजेडात आणले आहे. दिवाळीच्या तीन दिवसांत मोठ्या निष्ठेने लक्ष्मीसाठी त्या दिवा लावून ठेवतात. लक्ष्मीसाठी डब्यात काहीतरी ठेवले पाहिजे ही पारंपरिक भारतीय पद्धत आदराने पाळतात. या सर्वांमधून हिंदुस्थानप्रेमी शीलवतीबाई प्रकट होतात.

शीलवतीबाईंना शिक्षणाची अतिशय आवड आहे. त्याविषयी त्याच सांगतात, "मी दिवसा शाळेत शिकवी आणि सायंकाळी क्लासमध्ये जाई. कारण मला पुढील शिक्षण पदरात पाडून घ्यायचे होते." (२७) त्यांची वाचनाची भूक अफाट होती. त्यांना असलेली नृत्याची आवड व निसर्गाचे वेड यावरून त्यांचे सुजाण रसिकत्व लक्षात येते.

शीलवतीबाईंची केतकरांवर आंधळी श्रद्धा नाही किंवा भक्तीही नाही. तर पतिविषयक विलक्षण डोळस असे हे प्रेम आहे. केतकरांचे त्यांना आकर्षण आहे आणि त्यात आंधळेपणापेक्षा नैसर्गिकताच अधिक आढळते. एकटीने बसून चहा घेण्यापेक्षा केतकरांबरोबर चहा घेण्यात त्यांना अधिक आनंद वाटतो. हिंदुस्थानातून केतकरांकडून भेट म्हणून आलेल्या वस्तू त्या अतिशय जपून ठेवतात. काही वस्तू त्यांना मिळत नसत. पण केतकरांना कळविले तर त्यांना वाईट वाटेल म्हणून त्या कळवीत नसत. छोट्या छोट्या बाबींतून केतकरांकडून जपणाऱ्या बाई यातून दिसतात. त्यांचे हे जपणे त्यांनी केतकरांकडून कबूल करून घेतलेल्या पुढील नियमांवरून अधिक स्पष्ट होते. "अगदी महत्त्वाचं काम आलं तरी जेवणावरून उठता कामा नये. त्याचप्रमाणे झोपेतूनसुद्धा कोणीही आलं तरी मी तुम्हाला उठवणार नाही." (२७) डॉक्टरांचे हलाखीत गेलेले बालपण जेव्हा त्यांना कळते तेव्हा त्या अतिशय हळहळतात. "केतकरांना आपलं गेलेलं बालपण पुन्हा परत मिळवून देण्याची शक्ती आपल्या अंगी असती तर किती बरे झाले असते !" (३९) असा विचार शीलवतीबाईंचे हळवे मन करू लागते. त्यांना बालपणीचे सौख्य लाभावे म्हणून त्या मुलांत खेळू देत, "पण लहानपणी या खेळातून जो आनंद आणि जे समाधान लाभलं असतं. त्याची सर थोडीच येणार होती."(१२१) याची त्यांना कल्पना होती पण तरीही त्या प्रयत्न करीत.

मुलीच्या आजारपणात त्यांच्या घरी येणाऱ्या गृहस्थांची मोलाची मदत मान्य करणाऱ्या बाई त्यांच्या सेवेबद्दल कृतज्ञ राहतात. "मुलांच्या हाती थोडे थोडे पैसे दिले तर मुलांना वस्तूंच्या किंमती समजू लागतील. त्याचप्रमाणे त्यांना

काटकसरीचे महत्त्वही लक्षात येईल. सहनशीलता त्यांच्या अंगी बाणेल. तसेच स्वतंत्रपणे आपले आपण निर्णय घेण्याची संधीही त्यांना मिळेल." (८८) मुलांना विचारपूर्वक वळण लावणारी आई यातून दिसते. "वात्सल्य हा त्यांच्यातला गर्द गहिरा भाग आहे." (१४) या दुर्गाबाईंच्या पुष्टीने शीलवतीबाईंमधील आई अधिक उजेडात येते.

आपले दोषही शीलवतीबाईंनी प्रामाणिकपणे कबूल केले आहेत. आपल्या ठिकाणी धडाडी व आत्मविश्वास नसल्याचे त्या स्पष्टपणे सांगतात. 'स्त्रीकर्म-सदन' आपल्याला चालविता आले नाही याची कबुली देतात. संशयखोरपणा हा स्वतःतील दोष त्या तितक्याच निर्भीडपणे बोलून दाखवतात. स्वानुभवावरून व निरीक्षणावरून बाईंनी काही लक्षणीय निष्कर्ष काढले आहेत. "घरात गडी माणसं वावरत असली की कुटुंबियांना एकांत कसा तो मिळतच नाही आणि घरातला मोकळेपणा तेवढ्यातल्या तेवढ्यात नाहीसा होतो..." (५१) "चिंता म्हणजे अक्षरशः शरीराला आणि मनाला पोखरून टाकणारी व्याधी." (९९)

'मीच हे सांगितलं पाहिजे!' मधून शीलवतीबाई केतकर, पत्नी, ज्ञान-पिपासू त्याचबरोबर रसिक, आदर्श माता, संसारनिरीक्षक अशा रूपात अंधुकपणे चित्रित झालेल्या दिसतात.

**इतर घरगुती स्त्रियांच्या आत्मचरित्रांतील स्त्री**

या स्त्रिया पांढरपेशा समाजातील आहेत. प्रत्येकीच्या वाट्याला आलेली समाजाची अवस्था जवळपास सारखी आहे. या स्त्रियांचे प्रमुख कार्यक्षेत्र म्हणजे त्यांचे 'घर.' घर सांभाळून काही करता आले तर त्या करतात. प्रत्येकीचे घर वेगळे–रीतीभाती वेगळ्या. तसेच त्यातून घडत जाणारे प्रत्येकीचे व्यक्तित्वही वेगळे. 'स्व' प्रकटन हा या आत्मचरित्रांचा प्रमुख हेतू. त्यामुळे प्रत्येक स्त्रीची पूर्ण व स्पष्ट प्रतिमा चित्रित झालेली आढळते. इतकी स्वच्छ प्रतिमा पतीसाठी लिहिलेल्या किंवा विविध क्षेत्रांतून प्रकटलेल्या स्त्रियांची दृग्गोचर होताना दिसत नाही. स्वतःला केंद्रस्थान मिळाल्याने ही प्रतिमा मनमोकळेपणाने आविष्कृत झाली आहे. बारीकसारीक घटना तपशीलांचा आधार घेऊन स्वतःला जास्तीत जास्त स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. इतर प्रतिमा केवळ योगायोगाने येतात.

**'माझे पुराण' मधील परोपकारी 'बाया'**

"ज्यासी आपंगिता नाही । त्यासी धरी जो हृदयी ।
तोची साधु ओळखावा । देव तेथेचि जाणावा ।" (नमन, पृ. ३)

पुस्तकाच्या प्रारंभीच कावेरीबाई कर्व्यांनी तुकारामाच्या अभंगाने बायाच्या साधुत्वाला 'नमन' केले आहे. 'माझे पुराण' मधून बायाचे मानवी देवत्व आपल्या अनुभवाला येते. आनंदीबाई ही चार–चौघींसारखी सर्वसामान्य गृहिणी. पण या

सामान्यांतूनच आपले असामान्यत्व बायाने घडविलेले आहे. महर्षी कर्व्यांच्या खांद्याला खांदा लावून कुठल्याही 'प्रकारचा' गाजावाजा न करता बायाने दीन–दुबळ्यांना मातेच्या ममतेने सांभाळून फार मोठे समाजकार्य केले. या कार्यासाठी तिने मार्गदर्शक म्हणून कर्व्यांची निवड केलेली नाही. कर्व्यांकडून ती कधी संथा घेताना दिसत नाही. माणुसकीची निष्ठेने पूजा करून आनंदीबाईने आपल्या कर्तृत्वाने देवत्व मिळविले आहे. त्यातच तिचे असामान्यत्व आहे. बायाच्या स्वतंत्र कर्तृत्वाचे ते फलित आहे. 'माझे पुराण'मध्ये आपल्या असामान्य व्यक्तिमत्त्वाचे तिने स्पष्ट दर्शन घडविले आहे.

बाया कर्वे ही देवरुखच्या जोश्यांच्या अकरा अपत्यांमधले सातवे अपत्य म्हणून जन्माला आली. लग्न झाल्यावर नातू घराण्याची सून म्हणून ती राहिली. परंतु दुर्दैवाने लवकरच प्राप्त झालेल्या वैधव्याला स्वतःच्या स्वतंत्र बुद्धीने झिडकारून महर्षी कर्व्यांची पत्नी ही भूमिका तिने स्वीकारली व पार पाडली आणि तरीही समाजात आपले स्वतंत्र अस्तित्व टिकवून ती जगली. स्वतःच्या कर्तृत्वाने अमर झाली. तिला अनुलक्षून असलेले 'बाया कर्वे' हे एकेरी व लोकप्रिय संबोधन तिच्याबद्दल लोकांना वाटणाऱ्या आपुलकीचा पुरावा वाटतो.

बाया विलक्षण समजूतदार आहे. वीस वर्षे वयाच्या नातूशी आठ वर्षांच्या बायाचे लग्न होते. बायाच्या अंगावर फार कमी दागिने घातले जातात. "आपल्या माहेरची गरिबी आहे, एवढे तरी आपल्याला मिळाले हे भाग्यच, आपण जर दागिन्यांसाठी रडलो तर आईला दुःख होईल." (१३) आपले रडणे–आपली नाराजी पाहून आपल्या आईला दुःख होईल म्हणून बाया मनाची समजूत घालते. त्याला गप्प बसविते. वडिलांची गरिबी पाहून, आपला त्यांच्यावरील भार कमी व्हावा म्हणून पतीच्या निधनानंतर सासरचे पत्र येताच बाया सासरी जायला तयार होते. अवघ्या एकरा वर्षे वयाची ही आनंदी या प्रसंगांमुळे फार तोलदार मनाची वाटते.

लहान वयात लग्न झाल्याने सासरी असताना वारंवार आईची आठवण येते. पण त्याबरोबरच आईने बजावून दिलेली, "काही कागाळी आली तर मी तुला भेटणार नाही. मुलींना आईपेक्षा सासूच जवळ बरं ! सासूचा, 'चागलं काम करते' असा निरोप आला म्हणजे बोलवीन." (२०–२१) ही ताकीदही बायाला आठवते. माहेरी नेणार नाही म्हणून बाया हौशीने काम करते. रडायला आले तर डोळ्यांत केर गेला असे खोटेच सांगते. आईच्या धाकाने दबलेले बालमन बायाने या ठिकाणी उलगडून दाखविले आहे.

बायाच्या स्वतंत्र बुद्धीची साक्ष बऱ्याच प्रसंगांवरून पटते. लग्नानंतर अवघ्या तीन महिन्यातच बाया विधवा होते. "याचे कारण लोक 'परतवेल' असे म्हण

लागले." (१५) बायाच्या स्वतंत्र बुद्धीला हे पटत नाही. ती म्हणते, "कावळा बसायला व फांदी मोडायला एकच गाठ पडली." (१५) केस काढण्यासाठी ती क्षेत्रावर जायला तयार होत नाही. "तुम्हाला इथंच काय करायचे ते करा. क्षेत्रा-बित्रावर मात्र मी येणार नाही." (२६) असे ती निर्भीडपणे सांगते. बायाला कर्व्यांचे 'धोंडो' हे नाव अजिबात आवडत नाही. ती त्यांना कर्वे म्हणते. लग्नानंतर नवऱ्याचे नाव घेतले तर त्याचे आयुष्य कमी होते हे परंपरेचे मत बायाच्या बुद्धीला पटत नाही. मुलांचे कान टोचणे, कानात सोन्याच्या सुकल्या घालणे तिला आवडत नाही. स्वतःच्या बुद्धीला जे पटत नाही ते ती टाळते. सर्वसामान्य लोकांची देवाबद्दलची कल्पना बायाला मान्य नाही. ती एक शक्ती आहे एवढाच तिचा विश्वास आहे. घर सांभाळून अनाथ, अपंगांना मदत करणे हा बायाचा धर्म आहे. या कालखंडाच्या मानाने बाया फार बुद्धिवादी वाटते. किंबहुना प्रस्तुत कालखंडात येणाऱ्या सर्व स्त्रियांत बायाच अधिक बुद्धिवादी ठरते असे म्हटल्यास वावगे होऊ नये.

बाया जशी बुद्धिवादी आहे तशीच ती परंपरानिष्ठही आहे. असे परस्परांशी विसंगत गुण बायाच्या ठिकाणी आहेत. कर्वे बायाशी व मुलांशी फार तुटक वागत. पण त्यांच्या या वागण्याचा बाया कोणाला पत्ता लागू देत नसे. कर्व्यांच्या अशा वागणुकीबद्दल तिला वाईटही वाटत असे व रागही येत असे. बाया म्हणते, "मान सांगावा जनांत व अपमान सांगावा मनात." (११६) आपल्या नवऱ्याची चारचौघात बेअब्रू न करणारी भारतीय पत्नी–बाया यातून दिसते. कर्वे आपली बाजू घेऊन कधीही बोलत नाहीत ही रुखरुख तिच्या मनाला आहे. "मी होते म्हणूनच तुम्ही एवढे मोठे झालात." (१२२) असेही ती कधीमधी बोलताना दिसते. पण ही बोलणी दमदार वाटत नाहीत. "एवढ्या मोठ्या थोर गृहस्थाची मी बायको आहे व त्यांच्या कामात मला थोडीबहुत मदत करता आली ह्या कल्पनेने मला किती आनंद व समाधान होते याचे वर्णन करता येणार नाही." (१२३) ही लीनता तिने रूढीपुढे मान तुकवून स्वीकारलेली आहे. कर्वे जिवंत असताना अहेवपणी मरण यावे ही तिची मागणीही रूढीला अनुसरूनच आहे. केस काढल्यावर एक वेळ जेवणे व यासारखी इतर व्रतवैकल्ये बाया निमूटपणे करते. एरवी रूढीविरुद्ध आवाज उठवणारी बाया गप्प राहून सर्व व्रते आचरते यावरून तिची रूढिशरणता जाणवते.

बायाला शिक्षणाची हौस आहे. वयाच्या चोविसाव्या वर्षी पंडिता रमाबाईंच्या शाळेत जाऊन, अहर्निश कष्ट करून, स्वतःचे अपमान गिळून शिक्षण घेणे तिच्या शिक्षणप्रियतेचेच द्योतक वाटते. ती कर्तबगार आहे. आपल्या मनगटातील कर्तृत्वावर तिचा विश्वास आहे. सासरी आल्यावर वयाच्या बाराव्या वर्षापासून बाहेरची

सर्व कामे ती पाहते. प्रसंग आला तर मुले–बाळे वाढविण्यास पैसे मिळण्याचे साधन हाती यावे म्हणून बाया सर्टिफिकेट मिळविण्यास धडपडते. तिच्या कर्तबगारीतूनच ही दूरदृष्टी जन्मलेली दिसते. पडेल ते काम करून मुलांना वर आणण्याची शपथ ती आपल्या कर्तृत्वाच्या विश्वासावरच घेताना दिसते. " बाईंच्या (पंडिता रमाबाई) शिकवणुकीचा व अनुभवांचा माझ्या आयुष्यावर फार परिणाम झालेला आहे. आपल्या जातीसाठी–बायकांसाठी–काही करावे अशी इच्छा त्यांच्याच उदाहरणा वरून माझ्या मनात उत्पन्न झाली. पुढे हिंगण्याचा आश्रम व इतर संस्थांकरिता जी काही थोडीफार सेवा मी केली ती त्यांच्याच उपदेशाचे फळ आहे." (३६८) असे ती विनम्रतेने मान्य करते. आपल्या कतृत्वाचे श्रेय तिने पंडिता रमाबाईंच्या ओटीत टाकले आहे तर आपले मोठेपण कर्व्यांच्या पदरात घातले आहे. यातून बायाची कृतज्ञताच जाणवते. दुसऱ्याला आपला त्रास होऊ नये याचे सतत भान ठेवून वागणारी बाया स्वावलंबनाचे प्रतीक ठरते. कॉलेजच्या कामाचा राजिनामा देण्याचा विचार करणाऱ्या कर्व्यांची कान उघाडणी करणारी बाया तडफदार पत्नी वाटते आणि त्याचबरोबर आपल्या जबाबदारीची जाणीव असलेली विचारी माता वाटते. मुलांच्या भवितव्यासाठीच हा प्रशस्त सल्ला ती कर्व्यांना देते.

अनाथ, जगात काही कारणांनी फसलेले, समाजाकडून दूर लोटलेले जीव बायाकडे येत. त्या सर्वांना आश्रय देऊन बाया आनंदाने त्यांचे सर्व करीत असे. परोपकारी, प्रेमळ माता म्हणून बाया या ठिकाणी उभी राहते. चांगल्या मुलांचे कुणीही करू शकेल पण अशा लोकांना जवळ करायला मातेचे मोठे मनच असावे लागते "माझी मुले" (७५) म्हणून बाया त्यांचा उल्लेख करते. हाच बायाच्या जीवनातील सर्वांत मोठा परोपकार वाटतो व यातच बायाचे असामान्यत्व सामावलेले दिसते.

नखाने खरवडून गूळ चोरून खाणे, दूध–पोहे–पावटयांची उसळ कोणाला न कळविता खाणे, सासूबाईंच्या चोरून धान्य विकणे, सासूबाईंची संमती न घेता मोलकरणीकडून काम करवून घेणे व कामाचा मोबदला म्हणून धान्य देणे या आपल्या हातून घडलेल्या चुकाही तिने प्रांजळपणे कबूल केल्या आहेत.

अशी गुणावगुणांकित स्पष्ट आणि स्वच्छ आनंदीबाई कर्व्यांची प्रतिमा 'माझे पुराण' या आत्मचरित्रातून आविष्कृत होताना दिसते. बाया विशेषत्वाने लक्षात राहते ती एक 'परोपकारी' व्यक्ती म्हणून. मराठी साहित्याचे समीक्षक वि. सी. सरवटे यांनी " मागील पिढीतील पांढरपेशा वर्गातील सुशील, मायाळू गृहिणीच्या मोकळ्या मनाचे चित्र यात वाचावयास मिळते." [5] असा 'माझे पुराण' संबंधी व्यक्त केलेला अभिप्राय ग्राह्य वाटतो.

---

[5] वि. सी. सरवटे, मराठी साहित्याचे समालोचन, खंड तिसरा, स्थ. ना.; १९६९, पृ. २०८–२०९

**‘ गेले ते दिवस ’मधील सत्यभामाबाई–एक तृप्त गृहिणी**

गत दिवसांच्या आठवणीने व्याकूळ होऊन सद्य:परिस्थितीच्या तुलनेतून ‘ गेले ते दिवस ’ हा उद्‌गार सत्यभामाबाईंनी काढलेला नाही तर आतापर्यंत गेलेल्या दिवसांकडे, गतायुष्याकडे बाईंनी वळून पाहिलेले आहे. स्वत:च्या सत्याहत्तर वर्षांच्या आयुष्याच्या सिंहावलोकनातून त्यांनी चित्रित केलेली ‘ स्व ’ प्रतिमा अशी– कऱ्हाड तालुक्यातील उंब्रज या गावी १८८६ मध्ये सुखवस्तू घराण्यात त्यांचा जन्म होतो. प्रेमळ व आनंदी खेळण्याबागडण्यात त्यांचे बालपण सुखात जाते.

वासुदेवरावांचे घराणे, शेतीभाती पाहून वयाच्या नवव्या वर्षी सत्यभामाबाईंचे लग्न होते. व्याहीभोजन, अक्षत, हळद घाणा, गौरीहार, रुखवत, लग्नघटिका, साग्रसंगीत–वाजतगाजत लग्नाची पंगत, सूनमुख, वरात, मांडव परतणे, पायघड्या, रासन्हाणी व गोंधळ हे ते ओळीने चार दिवस चालणारे लग्नविधी आनंदात पार पडतात आणि त्यांची सासरी बुधाला पाठवणी होते.

सासरी वासुदेवराव, आतेसासूबाई, चुलतसासूबाई व त्यांची तीन वर्षांची मुलगी असा आटोपशीर संसार असतो. सासूने सुनेला छळायचे आणि सून सासू झाली की सासूच्या छळाने होणारी केविलवाणी अवस्था पार विसरून जाऊन सुनेला छळायचे अशी परंपरेने चालत आलेली ही छळवणूक आत्येसासूबाई अंगीकारतात. सत्यभामाबाईंच्या आईने प्रेमाने दिलेला लाडवांचा डबा आतेसासूबाई “ किती वास येतो ह्याला ” (५०) असे म्हणून अंगणात फेकून देतात. गावात राहणाऱ्या मामींकडे त्यांना राहायला बोलावतात. चुलत सासूबाई त्यांची वेणी घालत असतात तेव्हा आतेसासूबाई त्यांना खसकन ओढतात. त्यांच्या पदरात सोन्याची दहा फुले, सोन्याचे गोंडे व आणखी दागिने बांधतात आणि “ जा आता आपल्या मामाच्या घरी ” (५१) असे म्हणून त्यांना पाठवून देतात. पाठीवर केस मोकळे सोडलेले असता रडत रडत त्या मामांकडे जातात. लग्न झाल्यावर एक महिनाभरात आतेसासूबाईंचे हे प्रताप त्यांच्या वाट्याला येतात.

आतेसासूबाई अधूनमधून सासुरवासाची चुणूक दाखवीत असल्या तरी चुलतसासूबाई मात्र सत्यभामाबाईंना नेहमी सावरून धरतात. त्यांच्या पाठीराख्या म्हणून उभ्या राहतात. सासूबाईंचा चांगुलपणा त्या मोठ्या कौतुकाने सांगतात. “माझी आई नुकतीच वारली असल्यामुळे सासूबाई माझ्यावर जास्तच प्रेम करीत होत्या. आईची उणीव त्यांनी मला मुळीच भासू दिली नाही.” (५८) रात्री सत्यभामाबाई सासूचे पाय चेपतात तेव्हा सासूबाई म्हणतात, “ सत्यभामा, आज तू फार दमलीस ग बाळ. कशाला माझे पाय चेपतेस ? जा, झोप आता.” (५९) मातेच्या तोंडी शोभावे असे हे सासूबाईंचे ममताळू शब्द आहेत. सणावारी सर्वांच्या बरोबर सत्यभामाबाईंना गरम पुरणपोळी त्या खायला घालतात. सोळा सोम-

वारांचे व्रत त्यांना करायला लावतात. निर्जल उपासाने जीव गळून गेला असेल या विचाराने त्यांना त्या काही काम करू देत नाहीत. उलट पोटच्या मुलीच्या काळजीने त्यांना म्हणतात, "सत्यभामा, सबंध दिवस तुझ्या पोटात काही नाही. तुला खूप अशक्तपणा आला असेल. मी सारं बघते स्वैंपाकघरातलं. तू आता इकडे येऊ नकोस. तोंडात खडीसाखर ठेवून सोवळयानेच तिथे देवघरात झोप ...खरंच गे पोरी, हे किती कडक व्रत मी तुला करायला लावलं." (७८) दुसऱ्या दिवशी सकाळी पहाटे चार वाजता त्यांना दही–भात खायला घालून परत झोपायला लावतात. कोणती आई मुलीची यापेक्षा काळजी घेणार आहे ? असे हे मायलेकी-सारखे सासू–सुनेचे मेतकूट आहे.

पतीची सर्व कर्तव्ये उत्तम रीतीने पार पाडणारे वासुदेवराव सत्यभामाबाईंना पती म्हणून लाभले होते. या दृष्टीनेही बाई समाधानी होत्या. लग्नात मुलाकडे फराळाचे सामान पाठवायला उशीर होतो. लगेच नवरामुलगा म्हणून वासुदेव-रावांकडे तक्रार नोंदवली जाते. तेव्हा वासुदेवराव शांतपणे सांगतात, "विसरले असतील गडबडीत." (२३) असा दुर्मिळ समजूतदारपणा वासुदेवरावांच्या ठिकाणी आहे. लहानवयात कुटुंबाचा भार त्यांच्यावर पडतो. पण आपली जबाब-दारी ते धीराने व नीटपणे सांभाळतात. लोकनिंदेची पर्वा न करता मुलांच्या भवितव्याच्या दृष्टीने बुधाची वडिलोपार्जित शेती, घरदार विकून पुण्याला येतात.

अत्यंत बिकट परिस्थिती असते. लाकडाची वखार, लोण्याचा व्यापार वगैरे व्यवसाय ते करून बघतात. पण स्वतःच्या अतिप्रामाणिकपणामुळे हे धंदे त्यांच्या-जवळ तग धरून राहत नाहीत. तीस रुपये महिन्याची नोकरी ते स्वीकारतात. पण तेथेही त्यांचा प्रामाणिकपणा आड येतो. या परिस्थितीची मुलांना ते जाणीव करून देतात. "चहा नाही. हॉटेलात खाणे नाही. कोणत्याही प्रकारची चैन नाही. चांगला अभ्यास करून उत्तमरीतीने पास होत चला. नाही तर तुम्हाला अनाथा-श्रमात ठेवायची पाळी येईल." (१०६) अशी त्यांची मुलांना शिकवणूक आहे.

सत्यभामाबाईंची ते प्रेमाने देखभाल करतात. त्यांच्या कामात त्यांना मदत करतात. सर्वांच्या शेवटी सत्यभामाबाई जेव्हा एकटयाच जेवत असत तेव्हा ते मुलांना सांगतात, "तुमची आई एकटीच जेवत आहे. तिच्याजवळ कोणीतरी जाऊन बसा." (६७) परोपकारी वृत्ती, प्रामाणिकपणा, व्यवस्थितपणा हे अतिशय दुर्मिळ सद्गुण वासुदेवरावांच्या ठिकाणी आहेत.

मुले आज्ञाधारक आहेत. आईवडील सांगतील त्याप्रमाणे वागतात. आपली परिस्थिती लक्षात घेऊन शिकवण्या करून शिक्षण घेतात. अनंता, पांडुरंग या छोटया भावंडांची जबाबदारी स्वीकारतात. मुले 'आचार्य' पदवीसारख्या उच्च पदव्या मिळवून आई–वडिलांचे नाव उज्ज्वल करतात. मुलांविषयी त्या सांगतात,

"दोनही मुलांचे शिक्षण संपले. आमच्या स्वार्थत्यागाचे चीज झाले म्हणून आम्हाला किती आनंद झाला ते सांगायला माझ्याजवळ शब्दच नाहीत. ह्यांनी मुलांच्या शिक्षणासाठी किती हाल सोसले ! शिळी भाकरी खाऊन अर्धपोटी दिवस काढले. मुलांनीही अभ्यासाव्यतिरिक्त कुठेही लक्ष दिले नाही. सिनेमा, नाटक किंवा इतरही करमणुकीचे प्रकार पाहायला ती कधी गेली नाहीत. आम्ही सांगितलेल्या सर्व गोष्टी मुलांनी ऐकल्या व त्याची गोड फळे त्यांना व आम्हालाही चाखायला मिळाली." (१३६–१३७) सत्यभामाबाईंचे हे तृप्तीचे उद्‌गार सर्व काही सांगून जातात.

सुना, नातवंडे, पणतवंडे सर्वांचे सुख बाईंना मिळते. आवश्यक तेथे स्वतःच्या स्वभावाला मुरड घालून त्या सर्वांशी खेळीमेळीने वागतात. "मुलांच्या सुखासाठी सर्व करायचे, हेच आमचे ध्येय प्रथमपासून असल्यामुळे मुलांना जेथे सुख लागेल व काम करायला आवडेल तिथेच राहणे हे आम्ही आमचे कर्तव्य समजत होतो." (१७२–१७३) त्या आपली शिकण्याची आवड पाटीच्या तुकड्यावर लहान मुलांना शेंगा देऊन भागवितात. "वयाने मी वृद्ध आहे. त्याला इलाज नाही. पण माझी मते आधुनिक आहेत. माझे जावई कानडी, नातजावई गुजराथी, पण मला त्याबद्दल कौतुक व आनंदच आहे." (२१५) "माझ्या आयुष्यात कोणतीच कमतरता नाही. मुले, नातवंडे, सर्वजण सुखात नांदत आहेत." (२१५) हे उद्‌गार बाईंच्या तृप्तजीवनाचे दर्शक आहेत. अशी एक तृप्त गृहिणी म्हणून सत्यभामाबाई सुखात्मे 'गेले ते दिवस' मधून आपल्याला वाचायला मिळतात.

**'स्मरणमाले'तील आदर्श गृहिणी जानकीबाई फडणीस**

जानकीबाई फडणीस चारचौघींसारख्या सर्वसामान्य स्त्री. परंतु त्यांनी आपले गृहिणीपद यशस्वी रीतीने सांभाळले आणि त्या आदर्शगृहिणी या पदाला पोचल्या. 'स्मरणमाले'त हे आदर्श गृहिणीचे चित्र आपल्या समोर येते ते असे–

पुण्यनगरीत सुसंपन्न आणि सुसंस्कृत गर्दे घराण्यात जानकीबाईंचा जन्म झाला. श्रीमंत घराण्यातील एकुलती एक मुलगी त्यामुळे अतिशय कोडकौतुकात त्यांचे बालपण गेले. वयाच्या अकराव्या वर्षी आपली नित्याची गाठ पडते ती तेरदळ येथील फडणिसांची सून म्हणून. पुण्याच्या चालीरीतीत आणि तेरदळच्या चालीरीतीत फार फरक असतो. सुरुवातीला जाणवणारा सासर आणि माहेर यातील फरक त्या सांगतात, "माहेरच्या नि सासरच्या वातावरणात खूपच अंतर होते हे तर खरेच ! माहेरी सर्व कामांना नोकर तर सासरी सर्व काम घरी. माहेरी आंबेमोहर तांदळाचा भात व पोळी तर सासरी बिजवड तांदळाचा भात व भाकरी ! पहिल्या पहिल्यांदा फार जड गेले ! जेवण जायचे नाही. चौत भाकरी खाता खाता पुरे होऊन जाई ! पानात काही टाकायचे नाही अशी कडक

शिस्त ! कुणी वडील माणसे आली की उठून उभे राह्यचे, ही पद्धतही पाळावी लागे." (५८) सासर माहेर यातील या तफावतीमुळे सुरुवातीला जानकीबाईंना फार त्रास होतो. पण त्या हळूहळू सासरच्या सर्व चालीरीती आत्मसात करतात. स्वतःच्या मिळून–मिसळून वागण्याने सर्वांना आपलेसे करून टाकतात. एकत्र कुटुंबाची जबाबदारी हसतमुखाने स्वीकारतात. "पुण्याची आहे पण किती साधी आहे.' (६) सासरच्या मंडळीकडून जानकीबाईंना मिळालेला हा अभिप्राय त्यांच्या समजूतदार वागणुकीचेच फळ होय. पडेल ते काम करायचे, सर्वांच्या जेवणा–खाण्याकडे जातीने लक्ष पुरवायचे. जानकीबाईंच्या या वागणुकीमुळे "तंगे, तुझ्या हातात अन्नपूर्णा आहे." (४) या शब्दात सासूबाई त्यांचे कौतुक करतात. जानकीबाई लिहितात, "माझ्यावर सासूबाईंचे खरोखर अतिशय प्रेम होते ते मी लहान असल्यापासून त्यांनी अखेरपर्यंत कायम ठेवले होते." (७१) एका सुनेने सासूबद्दल असे उद्‌गार काढणे कौतुकास्पद नि दुर्मिळ आहे. जानकीबाईंच्या उत्तम वागणुकीचेच हे फलित म्हणावे लागेल.

जानकीबाई आपल्या पतिदेवांशी कायावाचामनाने एकरूप झालेल्या दिसतात. 'देवा !' हे त्यांनी पतीसाठी उपयोगिलेले संबोधन बरेच काही सांगून जाते. पुस्तकाच्या शेवटच्या परिच्छेदात त्या परमेश्वराला प्रार्थना करतात, "हे कालस्वरूपी परमेश्वरा तू मला माझ्या पतिदेवांचा विसर पडू देऊ नकोस ! त्यांची ही मुलंबाळं नातवंड आहेत त्यांना सुखात ठेव. तू मला जे स्मशानवैराग्य प्राप्त करून दिलंस त्यातून मला बाहेर काढू नकोस ! माझ्या पतिदेवाचं जे मला दुःख झालं आहे ते तू कमी करू नको. 'कोणी निंदा कोणी वंदा' त्याविषयी माझ्या मनाला फिकीर वाटू नये अशी तूच खबरदारी घे. एवढीच माझी प्रार्थना हे कालस्वरूपी परमेश्वरा तुला आहे." (७५) ही त्यांची प्रार्थना जानकीबाईंची पतिनिष्ठा स्पष्ट करते. स्वतःची पतीविना अवस्था त्या रेखाटतात, "माझ्या देवावाचून मला क्षणभरही करमत नाही. उठता, बसता, खाता, पिता, जागृतीत, स्वप्नात माझे पतिदेवच मला दिसतात. एखादा म्हातारा जसा तरुणपणाची उसनी ऐट आणतो तसाच केव्हा केव्हा मला उसनाच उत्साह वरकरणी दाखवावा लागतो ! पण हृदयातील उदासीनता कोठे जाणार ? मला माझ्या देवापाशीच गेलं पाहिजे तरच मला समाधान प्राप्त होईल." (७४) जानकीबाईंनी पतीशी साधलेले एकजीवित्व यावरून स्पष्ट होते.

मुलांवरही त्या चांगले संस्कार करतात. जानकीबाईंना स्वतःच्या आई–वडिलांचा अभिमान आहे. अण्णांची देवासारखी वागणूक, त्यांचा हातगुण, त्यांची शिस्त व आईचे आचारविचार यासंबंधी त्या अतिशय आदराने व अभिमानाने बोलतात. स्वतःच्या अनुभवावरून, निरीक्षणावरून "देवाचे बेत आधी माणसाला

कळते तर सर्व अनर्थ टळले असते." (२७) यासारखी तत्त्वगर्भ वाक्ये सहज बोलून जातात. गृहिणीने पार पाडावयाच्या सर्व जबाबदाऱ्या जानकीबाई यशस्वीरीत्या पार पाडतात. म्हणूनच 'एक आदर्श गृहिणी' म्हणून त्या लक्षात राहतात.

**'अजून चालतेची वाट !' मधील आत्मनिरीक्षक आनंदीबाई**

दु:खाला वाट मोकळी करून देण्यासाठी 'अजून चालतेची वाट' हे आत्मचरित्र लिहिले गेले. आतापर्यंत चालून झालेल्या या वाटचालीच्या चित्रणातून आनंदीबाईंनी सर्वांगाने व ठळकपणे स्वत:ला उभे केले आहे. 'ठेविले अनंते तैसेचि रहावे' ही वृत्ती त्यांना पसंत नाही. आपल्या वाटचाला आलेले पसंत पडले नाही तर त्याविरुद्ध त्या बंड करतात. त्यासाठी वाटेल ती जिद्द स्वीकारतात. या मूलभूत प्रवृत्तीतून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला वेगळेपण लाभते. जगावेगळ्या—चाकोरीबाहेरच्या घटना बरेचदा या वृत्तीतून जन्मतात म्हणून त्यांचे व्यक्तिमत्त्व आगळे ठरते. सर्वसामान्य बुद्धी ज्याचा विचार आणि स्वीकार करू शकत नाही—करू शकणार नाही असे हे व्यक्तिमत्त्व आहे. त्यामुळे सामान्यांच्या दृष्टिकोणातून हे एक वादळी व्यक्तिमत्त्व वाटते. "मी एक सामान्य स्त्री. फक्त महत्त्वाकांक्षेने पछाडलेली, इतकंच माझं भांडवल आणि त्यामुळंच माझं जीवन जगावेगळं घडलं." (१०) अशी आपल्या जगावेगळ्या जीवनाची कल्पना आनंदीबाईंनी पुस्तकाच्या प्रारंभीच दिली आहे. प्रस्तावनाकार ना. सी. फडके म्हणतात, "आनंदीबाईंच्या मनाची घडण सर्वसामान्य स्त्रीच्या मनाहून फार वेगळी होती. आनंदीबाई विजापुरे ही आयुष्याच्या ठराविक चाकोरीतून जाणारी स्त्री नव्हती." (६) पद्मभूषण फडक्यांनीही आनंदीबाईंचे वेगळेपण असे स्पष्ट केले आहे.

लहानपणी 'गोदावरी' हे त्यांचे पाळण्यातले नाव पुसावे लागून त्याऐवजी 'शांता' हे नाव ठेवावे लागते. ही घटनाच विलक्षण प्रतीकात्म वाटते. कारण पुढे 'आनंदी' हे नाव पुसले जाते आणि 'नंदा' एवढेच नाव उरते. या नावे बदलण्याच्या उलाढालीत त्यांच्या जीवनातील आनंदच पार मावळून जातो.

आनंदीबाई आपल्या आई—वडिलांचे पहिले अपत्य ! पहिलेपणाचे कोडकौतुक त्यांच्या वाट्याला आलेले आहे. त्यांना आपल्या आईवडिलांचा विलक्षण अभिमान आहे. ढोले मास्तरांचे वर्गात बाप काढणे त्यांना सहन होत नाही. आपण आनंदीबाईजवळ राहावे अशी त्यांच्या आईची लहानशी इच्छा पण ती काही आनंदीबाईंना पुरविता येत नाही याची खंत त्यांना सतत कुरतडत राहते. "मी जिवंत आहे तोवर हा घाव कधीही भरून येणार नाही." (१८०) असे त्या कळवळून म्हणतात. आईच्या आशीर्वादाने आपल्याला हेल्थ व्हिजिटरच्या (Health Visiter) कोर्सचे सर्टिफिकेट मिळाले असे त्या आईवरील निस्सीम श्रद्धेने सांगतात. बाईंच्या मनाविरुद्ध आईवडील विजापुऱ्यांशी त्यांचे लग्न करून देतात. पण म्हणून त्या

माता–पित्यांवर रागवत नाहीत. " ... परिस्थितीमुळे वाकणं त्यांना भाग पडलं होतं, हे मी जाणून होते. किंबहुना त्यांचं जीवन सुखी व्हावं म्हणूनच मी या लग्नाला उभी राहिले होते. आणि पुढेही त्यांच्याबद्दलच्या कर्तव्यात मी कधी कसूर होऊ दिली नाही." (६३) असे त्यांनी आपल्या पालकांच्या कृत्याचे समर्थन केले आहे. पुढे माहेरच्या लोकांना त्यांना जो काही हातभार लावता येतो त्याबद्दल त्यांना फार समाधान वाटते.

आनंदीबाईंना शिक्षणाची फार आवड आहे. " खूप शिकावं, डॉक्टर व्हावं, गोरगरिबांना औषधं द्यावी." (५७) असे त्यांचे मनोराज्य आहे. एकदा पुस्तक वाचायला घेतले की तहानभूक हरविण्याइतकी त्यांना वाचनाची आवड आहे. ही शिक्षणाची आवड केवळ पुस्तकांपुरतीच मर्यादित नाही. विविध कला शिकण्यास उत्सुक असलेले कलासक्त मन आनंदीबाईंना लाभलेले आहे. वीणकाम टापटिपीचे, सफाईचे करण्यासाठी त्यांचे सतत प्रयत्न सुरू असतात. भरतकामाबद्दल त्या सुवर्ण-पदक मिळवतात. संगीत, नाट्य व चित्रकला या कलांशीही त्या थोड्याफार परिचित आहेत. विविध खेळांविषयी त्यांना प्रेम आहे. घोड्यावर बसणे व पोहणे त्या शिकल्या आहेत. गृहसजावटीचीही त्यांना हौस आहे. सर्व व्याप सांभाळून, अनेक अडचणींना तोंड देऊन त्या जिद्दीने नर्सिंग कोर्स व हेल्थ व्हिजिटरचा कोर्स पूर्ण करतात. त्यातून त्यांच्या शिक्षणप्रेमाची व ज्ञानपिपासेची साक्ष पटते.

वृक्षांची, प्राणिमात्रांची त्यांना कणव आहे. फुलाला झाडापासून विलग करून झाडाला दुखवणे त्यांना कसेसेच वाटते. फुलाला झाडावर ठेवूनच त्याचे सौंदर्य मनसोक्त उपभोगावे ही त्यांची आवड. कवठाला फळे यावी म्हणून ग्रहणात कवठाच्या बुंध्यावर घाव घालण्याचे उपाय होतात. ते घाव घालण्याचे दृश्य बघताना, " मला ते दृश्य पाहवेना. माझ्याच अंगावर कुणीतरी घाव घालीत असल्याचं दुःख मला झालं. मी धावत जाऊन झाडाला मिठी मारली. घाव बसलेल्या ठिकाणी हात ठेवला. तो तेथून पाणी झिरपत होतं. माझ्या मिठीमुळे झाडाला मायेचा आसरा मिळाला आणि ते अश्रू ढाळू लागलं, असाच मला भास झाला." (१९) अशी त्यांची अवस्था होते. त्यादिवशी त्या जेवत नाहीत. यात्रेत रेड्याला बळी देण्याचा प्रकार त्यांना अत्यंत क्रूर वाटतो. असे हे विलक्षण संवेदनाक्षम मन आहे.

बाईंच्या सौंदर्यासक्त मनाला त्यांच्यात आणि विजापुऱ्यांच्या वयात असलेले अंतर, वयानुसार विजापुऱ्यांच्या रूपाला आलेला स्थूलपणा त्यांना चांगलाच खटकतो. विजापुऱ्यांच्या संसारात त्यांचे मन सतत कुरकुरत राहते. विजापुऱ्यांनी बांधलेल्या मंगळसूत्राबद्दल त्या म्हणतात, " माझ्या मंगळसूत्राबद्दलही मला कधी अभिमान वाटला नव्हता. माझ्या बाबतीत हे मंगळसूत्र म्हणजे एका वासराच्या

गळ्यात बांधलेल्या दाव्यासारखं होतं." (८३) असमाधानी वैवाहिक जीवन विसरण्यासाठी त्यांचे कलाप्रेमी मन विविध कलांमध्ये रमून स्वतःला रिझवताना दिसते. त्यामुळे त्या घराण्याचे देवधर्मही हौशीने पार पाडतात. येणाऱ्या–जाणाऱ्यांचे आगत–स्वागत करण्यात गुंग होतात. "वैवाहिक जीवन रंगत नव्हतं" (१०५) अशी कबुली देतात. आपल्या बरोबरीच्या तरुणाबरोबर संसारचित्र रंगविण्यात त्यांचे मन रस घेते. या असमाधानाचा शेवटचा परिणाम म्हणजे त्यांचे मन बेहऱ्यांकडे धाव घेते. त्यांच्या सुरळीत आयुष्याला जबरदस्त धक्का देणारे हे प्रकरण ठरते.

बेहऱ्यांच्या व आपल्या वयातील फरक, आपली पत्नी, माता ही पदे क्षणार्धात त्या भिरकावून देतात आणि बेहऱ्यांच्यामागे बेभानपणे लागतात. १९४२ ते १९५१ या नऊ वर्षांच्या कालावधीत त्यांची आणि बेहऱ्यांची फक्त तीन वेळा गाठ पडते. परंतु या सहा आणि तीन वर्षांच्या अंतराने झालेल्या भेटीतही आनंदीबाई बेहऱ्यांना विसरू शकत नाहीत. त्यांच्या मनातले संसारस्वप्न जागे होते. त्यांचे पत्नीपद त्यांना अडवू शकत नाही. मातृपद थोपवू शकत नाही. प्रेमाने धुंद आणि बेछूट झालेली एक प्रेयसी एवढीच भूमिका त्या वठवीत असतात. "... गळ्याला काचणारी सोन्याची सरी तोडून फेकून द्यावी त्याप्रमाणे हे स्त्रीत्वाचे अलंकार मी तोडले होते. उरले होते फक्त प्रेयसी ! आणि प्रेमाने झपाटलेली ही प्रेयसी वाटेल त्या संकटाला धुडकावून लावण्याइतकी बेडर बनली होती." (१८५) असे बाईंनीच आपल्या अवस्थेचे स्पष्टीकरण केले आहे. स्वतःचे सोनेनाणे व शक्ती सर्व त्या बेहऱ्यांसाठी खर्च करतात. पदोपदी बेहऱ्यांचे अपराध पोटात घालतात. मनातील स्वप्न साकार होईल या आशेने बेभान बनतात. सर्वस्वाने बेहऱ्यांच्या स्वाधीन होतात. पण एक दिवस 'देव' मानलेल्या बेहऱ्यांमधील 'पाषाणत्व' त्यांना तीव्रतेने जाणवते. हळूहळू ते पक्के होत जाते. आणि त्यांचे स्वप्न साकार होण्याऐवजी उधळले जाते. त्या विफल होतात. चिडून बेहऱ्यांची आतडी बाहेर काढतात. त्यांना "एक भ्याड पुरुष" संबोधतात. "सोबत, पैंजण, कादंबरी, नुवा या मासिकांचे संपादक, एक मार्मिक लेखक इत्यादी अलंकार बेहऱ्यांच्या अंगावर चमकत आहेत ते माझ्यामुळे." (६२) असे वाचकांना पटविण्याचा प्रयत्न करतात. बेहऱ्यांच्या प्रेमात विकल झालेले बाईंचे मन मागे वळून आत्मदोष शोधू लागते.

आपल्या शोकांतिकेचे कारण आपल्या जबरदस्त महत्त्वाकांक्षेत आणि तिच्या पूर्ततेत त्यांना सापडते. हेच या व्यक्तिमत्त्वातले असामान्यत्व आणि असफल जीवनाचे कारण आहे. "... सामान्यातून असामान्याकडे सतत झेप घेणारं बंडखोर मन मला दिलं होतं" (६२) असा या घटिताचा उगम त्या सांगतात. आपल्या या जगावेगळ्या वागण्याने जयंताचे–आपल्या पुत्राचे–जो आपल्या जीवनातील सगळा आनंद आहे त्याचे मन वळविता येत नाही. आनंदीबाईंच्या या बेलगाम

वागण्याने त्यांच्याबद्दल मुलाच्या मनात अनादर निर्माण होतो. म्हणून जयंत लग्नाच्या बाबतीत कोणतीच विचारपूस त्यांच्याजवळ करीत नाही. एवढेच नव्हे तर त्या आणि सुनीला एकाच घरात राहत असताना लग्नाचे निमंत्रण सुनीलाला दिले जाते आणि प्रत्यक्ष जन्मदात्या आईला मात्र नाही. ही त्यांची बोच फार मोठी आहे. खोली सोडताना, "हा सगळा अपमान आणि दुःख मुकाटयानं गिळणं भाग होतं. काकांना किंवा वसंताला दोष देण्याचा अधिकार माझ्या स्वैर वर्तनानं मी गमावला होता." (१८५) त्यांनी आपल्या स्वैर वर्तनाची अशी कबुली दिली आहे.

आनंदीबाईंचे मन फार मोठे आणि प्रामाणिकही आहे. विजापुऱ्यांचा 'देव-माणूस' या शब्दात त्या गौरव करतात. त्यांचे महानमानवत्व मान्य करतात. "कोणताही प्रसंग येवो, काकांसारख्या एकनिष्ठ, सालस माणसाची प्रतारणा करणं, खोटं बोलणं मला जमणार नाही. मी त्यांना साऱ्या गोष्टी सांगून टाकल्या." (१७५) असे आपण त्यांच्याशी प्रामाणिक असल्याचे स्पष्ट करतात. किर्लोस्कर-वाडीचे ऋण कृतज्ञतेने मान्य करतात. अडलेल्यांना मदतीचा हात पुढे करतात. त्यागाचा अर्थ कळण्यासाठी 'गणपति–विसर्जन' आहे असा नवीन अर्थ त्यांची बुद्धी लावते. त्या स्वाभिमानी आहेत. किर्लोस्करवाडीच्या प्रांतिक महिला परिष-देच्या वेळी उपाध्यक्षपदी त्यांची निवड होते. पण वेळेवर पत्रिकेत नाव मात्र छापले जात नाही. आनंदीबाईंचे मन हा अपमान विसरत नाही. यमुनाबाईंना झाल्या प्रकरणाचा ते जाब विचारते.

"समाजाइतकी लहरी आणि कठोर दुसरी शक्ती नाही. समाज एखाद्याला डोक्यावर घेऊन मिरवेल तर दुसऱ्याला पायतळी तुडवायला मागेपुढे पाहणार नाही." (२४) हे सत्य चटकन हृदयाला जाऊन भिडते. "आदर्श जीवन हेच की जे बालपणी स्वप्न पाहतं, तरुणपणी पराक्रम गाजवतं आणि वृद्धपणी वादळी समुद्रात खंबीरपणे उभं राहून अंधारात प्रकाशाचे किरण फेकणाऱ्या दीपस्तंभाप्रमाणे इतरांची वाट उजळतं." (६२) ही त्यांची आदर्श जीवनाची व्याख्या मार्गदर्शक वाटते. "माणसाचं आयुष्य उभ्या आडव्या अनेक भावनांच्या धाग्यांनी विणलेलं वस्त्र आहे. ते कुजकं विटकं निघालं म्हणून एकदम फेकून थोडंच देता येतं? थोडा रफू करून, ठिगळ लावून माणसाला ते वापरावंच लागतं." (२७२) वाटयाला आलेले जीवन जगावेच लागते. ते कसेही असले तरी टाकून देता येत नाही. हे त्यांचे चिंतन मननीय वाटते.

### 'आंब्याचा टाळा' मधील 'आम्रटहाळ' सुशीलाबाई

बाया कर्वे यांची बहीण पार्वतीबाई आठवले. त्यांची ही सून. सुशीलाबाईंच्या सासूबाई सुशीलाबाईंना 'आम्रटहाळ' म्हणत. यात थोडा चिडवण्याचा भाग असे.

परंतु प्रसंगाला–कार्याला शोभा आणण्याचे काम 'आम्रटहाळचा 'चे. जीवनातील जवळ जवळ प्रत्येक लहानमोठ्या प्रसंगात सुशीलाबाई ' आम्रटहाळ ' ठरलेल्या आहेत. 'आंब्याचा टाळा ' या गद्य–पद्यमिश्रित आत्मचरित्रातून 'आम्रटहाळ ' सुशीलाबाई आपल्याला दिसतात त्या अशा–

१८९४ मध्ये होळी पौर्णिमेस डहाणू–उंबरगाव येथे फारशी सुस्थिती नसलेल्या पण मनाने तृप्त व समाधानी अशा आई–वडिलांच्या पोटी 'सई 'चा जन्म झाला आहे. आई–वडिलांची लाडकी कन्या म्हणून त्यांचे लहानपणी भरपूर कोडकौतुक होते. वीस वर्षांच्या आत मुलीचे लग्न करणार नाही असे प्रतिज्ञेवर लिहून देणाऱ्या गरीब पालकांच्या होतकरू मुलींना पूर्णपणे मोफत शिक्षण हिंगण्याच्या संस्थेत दिले जाई. मुलांचा खर्च ज्या फंडातून होई त्या ब्रह्मचर्य फंडातून शिक्षण घेणाऱ्या पहिल्या थोड्या मुलींमध्ये सुशीलाबाई एक होत्या. 'महिला विद्यालयाची राणी ' (१६) या टोपणनावाने त्या कॉलेजमध्ये वावरतात. स्वतःच्या गुणांनी त्यांनी हे राणीपद मिळवले असावे असे वाटते.

जाडीभरडी लुगडी नेसण्याची, दागिने न मिळण्याची म्हणजेच आजन्म गरिबीत राहून संसार करण्याची तयारी ठेवून त्या नानांशी लग्न करतात. सई जोशीच्या–सुशीला आठवले होतात. आपल्या अंगच्या गुणाने नानांच्या दारिद्र्यात स्वर्ग निर्माण करतात. आम्रटहाळ–आंब्याचा टाळा–बनतात. पत्नी, माता, सासू, आजी, पणजी ही पदे यशस्वीरीत्या भूषवितात.

नानांच्या सहवासात त्या तृप्त आहेत. सुशीलाबाईंवर सतत प्रेमाचा वर्षाव करणारे नाना त्यांना देवाप्रमाणे वाटतात–

> "नारायण मम सखा हृदयीचा करी पूर्ण काम
> कशास घेऊ दुज्या प्रभूचे वृथा मुखी नाम " (१२५)

हे बोल त्यांची तृप्ती दर्शवितात.

त्यांच्या मते आपली मुले म्हणजे "आनंदकंद." (३९) कुमुदला नाटकाच्या वेळी झालेला त्रास पाहून पुन्हा लहान मुलांना घेऊन नाटकाला किंवा सिनेमाला जायचे नाही असे ठरवणाऱ्या बाई आपल्या माता या पदाची जबाबदारी ओळखून वागताना दिसतात. मुलांना लहान वयात आई लागते हे जाणून मुले मोठी होईपर्यंत 'चूल आणि मूल ' हेच आपले ध्येय ठरवितात. मुलांच्या काळजीविषयी त्या सांगतात, "माझ्या मुलांच्या बाबतीत मात्र माझे मन पूर्ण गुंतलेले असे व ती सुस्वभावी व चांगली निघावी यासाठी माझी धडपड असे." (६१) कुमुदच्या सासरचे लोक तिच्याबद्दल अतिशय कौतुकाने बोलतात, तिच्यावर सर्वच खूष असतात हे पाहून हे मातृहृदय आनंदाने व समाधानाने फुलून येते. आपले मूल मोठे झाले तरी आईला ते लहानच वाटते. असेच अरविंदाच्या बाबतीत घडते. तो जेव्हा

इंग्लंडला जायला निघतो तेव्हा मातृहृदयाची कालवाकालव होते नि शब्दात साकार होते.

> " आणि कोठे जाशील बाळ आता
> तुझ्याविषयी लागेल मला चिंता
> तुझे आहे वय सान रे अजून
> कसा फिरशील एकटा जगातून " (८३)

मुलांवर कुठलीही बंधने त्या घालत नाहीत. मुलाच्या लग्नासंबंधी त्या म्हणतात, " पाहण्याचा मान प्रथम वरास द्यावा. भावी वधूच्या पालकांच्या संमतीने वधूस वराने पाहावे. त्याला पसंत झालेल्या मुलीसच आमच्या होकारासाठी पुण्यास आणावे." (७९) वडीलकीचा फायदा घेऊन आपल्या धाकाने मुलांना पिचवून टाकणे सुशीलाबाईंना पसंत नाही. सूनबाईला त्या उपदेश करतात–

> " सूनबाई तुझे माझे एक घर एक कूळ
> सदाचरणे आपुल्या राखू तयास उज्ज्वल " (१२१)

घर आपल्या दोघींचेही आहे. दोघी नीटपणे सांभाळू अशी त्यांची आपल्या सुनेला शिकवणूक आहे. सुनेच्या चांगल्या वागणुकीचे त्या भरघोस कौतुक करतात–

> " तिच्या पायगुणे नाही, संसारी सौख्याला वाण
> माझी ग शांताबाई, आहे सद्‌गुणांची खाण
> ..................................
> गृहलक्ष्मी ही भाग्याची शोभतसे माझे घर "

सुनेच्या सद्‌गुणांचे कौतुक करणारी ही मोठ्या मनाची सासू आहे. " ताईचे जीवन म्हणजे लाखात एखादीच्या वाट्याला येणारे ! पूर्णत्वाच्या जवळ जाणारे !... माणुसकीचा गहिवर त्या संत गुणाचे मूर्तिमंत प्रात्यक्षिक असे अवघे त्यांचे जीवन." (१८७–१८८) एका सुनेने सासूबद्दल काढलेले हे उद्‌गार; ज्या नात्याबद्दल फारसे चांगले ऐकू येत नाही अशा सासू आणि सुनेच्या संबंधातील गूळपीठ दाखवितात. नातवाच्या बाळलीला पाहून त्यांना बाळकृष्णाच्या लीला आठवतात. १९६९ साली मुलाकडून पणतू झाल्यावर सुवर्णफुले उधळणाऱ्या समाधानी पणजीचे दर्शन पुस्तकाच्या प्रारंभी असलेल्या छायाचित्रातून घडते. आपल्या तृप्त संसारासंबंधी सुशीलाबाई म्हणतात–

> " ... माझा हा संसार । जशी कर्वंदाची जाळी
> फुलाफळांनी लवली । प्राणापरी ती सांभाळी " (९६)

आपला फुलाफळांनी डवरलेला संसार स्वतःच्या पश्चात नीटसपणे सांभाळण्याची सूचना त्यांनी सुनेला दिली आहे. " मनुष्य प्रेमाचा भुकेला असतो व सहवासाने

गळ्यात बांधलेल्या दाव्यासारखं होतं." (८३) असमाधानी वैवाहिक जीवन विसरण्यासाठी त्यांचे कलाप्रेमी मन विविध कलांमध्ये रमून स्वतःला रिझवताना दिसते. त्यामुळे त्या घराण्याचे देवधर्मही हौशीने पार पाडतात. येणाऱ्या–जाणाऱ्यांचे आगत–स्वागत करण्यात गुंग होतात. "वैवाहिक जीवन रंगत नव्हतं" (१०५) अशी कबुली देतात. आपल्या बरोबरीच्या तरुणाबरोबर संसारचित्र रंगविण्यात त्यांचे मन रस घेते. या असमाधानाचा शेवटचा परिणाम म्हणजे त्यांचे मन बेहऱ्यांकडे धाव घेते. त्यांच्या सुरळीत आयुष्याला जबरदस्त धक्का देणारे हे प्रकरण ठरते.

बेहऱ्यांच्या व आपल्या वयातील फरक, आपली पत्नी, माता ही पदे क्षणार्धात त्या भिरकावून देतात आणि बेहऱ्यांच्यामागे बेभानपणे लागतात. १९४२ ते १९५१ या नऊ वर्षांच्या कालावधीत त्यांची आणि बेहऱ्यांची फक्त तीन वेळा गाठ पडते. परंतु या सहा आणि तीन वर्षांच्या अंतराने झालेल्या भेटीतही आनंदीबाई बेहऱ्यांना विसरू शकत नाहीत. त्यांच्या मनातले संसारस्वप्न जागे होते. त्यांचे पत्नीपद त्यांना अडवू शकत नाही. मातृपद थोपवू शकत नाही. प्रेमाने धुंद आणि बेछूट झालेली एक प्रेयसी एवढीच भूमिका त्या वठवीत असतात. "... गळ्याला काचणारी सोन्याची सरी तोडून फेकून द्यावी त्याप्रमाणे हे स्त्रीत्वाचे अलंकार मी तोडले होते. उरले होते फक्त प्रेयसी ! आणि प्रेमाने झपाटलेली ही प्रेयसी वाटेल त्या संकटाला धुडकावून लावण्याइतकी बेडर बनली होती." (१८५) असे बाईंनीच आपल्या अवस्थेचे स्पष्टीकरण केले आहे. स्वतःचे सोनेनाणे व शक्ती सर्व त्या बेहऱ्यांसाठी खर्च करतात. पदोपदी बेहऱ्यांचे अपराध पोटात घालतात. मनातील स्वप्न साकार होईल या आशेने बेभान बनतात. सर्वस्वाने बेहऱ्यांच्या स्वाधीन होतात. पण एक दिवस 'देव' मानलेल्या बेहऱ्यांमधील 'पाषाणत्व' त्यांना तीव्रतेने जाणवते. हळूहळू ते पक्के होत जाते. आणि त्यांचे स्वप्न साकार होण्याऐवजी उधळले जाते. त्या विफल होतात. चिडून बेहऱ्यांची आतडी बाहेर काढतात. त्यांना "एक भ्याड पुरुष" संबोधतात. "सोवत, पैंजण, कादंबरी, बुवा या मासिकांचे संपादक, एक मार्मिक लेखक इत्यादी अलंकार बेहऱ्यांच्या अंगावर चमकत आहेत ते माझ्यामुळे." (६२) असे वाचकांना पटविण्याचा प्रयत्न करतात. बेहऱ्यांच्या प्रेमात विकल झालेले बाईंचे मन मागे वळून आत्मदोष शोधू लागते.

आपल्या शोकांतिकेचे कारण आपल्या जबरदस्त महत्त्वाकांक्षेत आणि तिच्या पूर्ततेत त्यांना सापडते. हेच या व्यक्तिमत्त्वातले असामान्यत्व आणि असफल जीवनाचे कारण आहे. "... सामान्यातून असामान्याकडे सतत झेप घेणारं बंडखोर मन मला दिलं होतं" (६२) असा या घटिताचा उगम त्या सांगतात. आपल्या या जगावेगळ्या वागण्याने जयंताचे–आपल्या पुत्राचे–जो आपल्या जीवनातील सगळा आनंद आहे त्याचे मन वळविता येत नाही. आनंदीबाईंच्या या बेलगाम

वागण्याने त्यांच्याबद्दल मुलाच्या मनात अनादर निर्माण होतो. म्हणून जयंत लग्नाच्या बाबतीत कोणतीच विचारपूस त्यांच्याजवळ करीत नाही. एवढेच नव्हे तर त्या आणि सुनीला एकाच घरात राहत असताना लग्नाचे निमंत्रण सुनीलाला दिले जाते आणि प्रत्यक्ष जन्मदात्या आईला मात्र नाही. ही त्यांची बोच फार मोठी आहे. खोली सोडताना, "हा सगळा अपमान आणि दुःख मुकाट्यानं गिळणं भाग होतं. काकांना किंवा वसंताला दोष देण्याचा अधिकार माझ्या स्वैर वर्तनानं मी गमावला होता." (१८५) त्यांनी आपल्या स्वैर वर्तनाची अशी कबुली दिली आहे.

आनंदीबाईंचे मन फार मोठे आणि प्रामाणिकही आहे. विजापुऱ्यांचा 'देव-माणूस' या शब्दात त्या गौरव करतात. त्यांचे महानमानवत्व मान्य करतात. "कोणताही प्रसंग येवो, काकांसारख्या एकनिष्ठ, सालस माणसाची प्रतारणा करणं, खोटं बोलणं मला जमणार नाही. मी त्यांना साऱ्या गोष्टी सांगून टाकल्या." (१७५) असे आपण त्यांच्याशी प्रामाणिक असल्याचे स्पष्ट करतात. किर्लोस्कर-वाडीचे ऋण कृतज्ञतेने मान्य करतात. अडलेल्यांना मदतीचा हात पुढे करतात. त्यागाचा अर्थ कळण्यासाठी 'गणपति–विसर्जन' आहे असा नवीन अर्थ त्यांची बुद्धी लावते. त्या स्वाभिमानी आहेत. किर्लोस्करवाडीच्या प्रांतिक महिला परिष-देच्या वेळी उपाध्यक्षपदी त्यांची निवड होते. पण वेळेवर पत्रिकेत नाव मात्र छापले जात नाही. आनंदीबाईंचे मन हा अपमान विसरत नाही. यमुनाबाईंना झाल्या प्रकरणाचा ते जाब विचारते.

"समाजाइतकी लहरी आणि कठोर दुसरी शक्ती नाही. समाज एखाद्याला डोक्यावर घेऊन मिरवेल तर दुसऱ्याला पायतळी तुडवायला मागेपुढे पाहणार नाही." (२४) हे सत्य चटकन हृदयाला जाऊन भिडते. "आदर्श जीवन हेच की जे बालपणी स्वप्न पाहतं, तरुणपणी पराक्रम गाजवतं आणि वृद्धपणी वादळी समुद्रात खंबीरपणे उभं राहून अंधारात प्रकाशाचे किरण फेकणाऱ्या दीपस्तंभाप्रमाणे इतरांची वाट उजळतं." (६२) ही त्यांची आदर्श जीवनाची व्याख्या मार्गदर्शक वाटते. "माणसाचं आयुष्य उभ्या आडव्या अनेक भावनांच्या धाग्यांनी विणलेलं वस्त्र आहे. ते कुजकं विटकं निघालं म्हणून एकदम फेकून थोडंच देता येतं ? थोडा रफू करून, ठिगळ लावून माणसाला ते वापरावंच लागतं." (२७२) वाट्याला आलेले जीवन जगावेच लागते. ते कसेही असले तरी टाकून देता येत नाही. हे त्यांचे चिंतन मननीय वाटते.

### 'आंब्याचा टाळा'मधील 'आम्रटहाळ' सुशीलाबाई

बाया कर्वे यांची बहीण पार्वतीबाई आठवले. त्यांची ही सून. सुशीलाबाईंच्या सासूबाई सुशीलाबाईंना 'आम्रटहाळ' म्हणत. यात थोडा चिडवण्याचा भाग असे.

प्रेम वाढते. मनुष्य आपली प्रेमाची भूक भागविण्यासाठी परिस्थितीनुरूप वेगळी वेगळी नाती जोडीत असतो." (३०) मानवी जीवनातील सत्य या ठिकाणी त्यांनी उलगडून दाखविले आहे.

संसार यशस्वी करण्याची जबाबदारी स्त्रीची अधिक आहे असे त्यांना वाटते. "संसार यशस्वी व्हायला स्त्रीला रफूची कला अवगत हवी. संसारात कुठेतरी केव्हातरी धस लागणारच. पण रफू करता येईल तर हे धस वेळेवर सांधले जाऊन संसारातील नवेपणा टिकून राहील." (३४) पतिपत्नीसंबंधाबद्दल त्या म्हणतात, "दोघांनीही एकमेकांना देव समजून आपणाकडे भक्ताची भूमिका घेतली तर दोघे एकरूप होतील. पण पत्नीने थोडीशी पड खाल्ली तर तिला निसर्गाने दिलेल्या गुणांमुळे—देण्यांमुळे ती देवाला आपल्या मुठीत ठेवील." (३४) आपल्या मरणाची माणसाला भीती वाटत असते. तो म्हणतो, "मी आता वयातीत झालो आहे. केव्हा ना केव्हा जाणारच. अमरपट्टा घेऊन कोण आले आहे ?... पण हा सर्व वरवरचा देखावा असतो. आपले घरदार, आपली जवळची मंडळी सोडून जिवलग लोकांचा निरोप घेऊन जगातून निघून जाण्याची कल्पनासुद्धा माणसाला असह्य असते." (१२८) मानीव मनाचे, मानवाच्या चिवट जिजीविषेचे त्यांचे हे अचूक निरीक्षण आहे.

"मला तुझ्याबद्दल किती प्रेम व अभिमान वाटतो हे कसे आणि किती सांगू ? माझे शब्द माझ्या भावना दाखवायला अगदी अपुरे आहेत. आपल्या जीवनाच्या यशस्वितेचे श्रेय तुलाच दिले पाहिजे. आपल्या कौटुंबिक जीवनात विशेषत: बिगर नात्याच्या माणसांना तू जो संयम, सहानुभूती दाखविलीस आणि असूयेचा अभाव प्रकट केलास त्याला तोड सापडणे कठीण आहे." (१८०–१८१) "आईने मला दिलेली अमोल ठेव." (१८४) सुशीलाबाईंना नानांनी दिलेले हे प्रमाणपत्र. सीताबाई अण्णिगेरी यांनी त्यांच्या वागणुकीबद्दल काढलेले उद्‌गार, "तिने... जे नेहमी सौजन्य दाखविले त्याची सर कोणास येणार नाही. असे उदाहरण लाखात तरी सापडेल की नाही कुणास ठाऊक." (१८३) त्यांच्या 'आम्रटाळा' या बिरुदावर प्रकाश टाकतात. 'आम्रटहाळ' बनण्याचे श्रेय त्यांच्या गुणांना आहे. देवावर विश्वास ठेवून सश्रद्ध अंत:करणाने त्या जगतात. तक्रार करणे, नियमांविरुद्ध बंड करणे त्यांच्या स्वभावात नव्हते. सहनशीलता, सौजन्य, प्रामाणिकपणा, दुसऱ्यांबद्दल वाटणारी आपुलकी, सहानुभूती हे त्यांचे दैवी गुण आहेत.

'आम्रटहाळ' प्रसंगाला शोभा आणतो खरा—पण प्रसंगाला शोभा आणण्यासाठी आंब्याच्या फांदीला झाडापासून विलग व्हावे लागते. 'स्व' सुख त्यागावे लागते. दुसऱ्या दिवशी वाळण्याची तयारी ठेवावी लागते. हेच सुशीलाबाईंनी केले. त्यातच सुख मानले. म्हणूनच त्या 'आंब्याचा टाळा' होऊ शकल्या.

३९८२ २५५२६ निबंध १०२ २५२०५८६ (स्थळ प्रत)



## ' पानाआडचे फूल ' मधील आशालता सावे

तारापूर या छोटयाशा खेडयात आशाबाईंचा जन्म झाला. शहरी दिमाखा-पासून अलिप्त असलेले खेडयाचे भोळे-भाबडेपण निरागसपणे त्यांनी उचलले आहे. दुर्दैवाने जन्म झाल्यावर अकरा महिन्यांतच त्यांच्या वडिलांचा शेवट होतो. आईला विलक्षण सासुरवास, वडील गेलेले अशा परिस्थितीत सर्व साधारणपणे मुलांच्या वाटयाला जे हाल येतात ते त्यांच्या वाटयाला येतात. केर काढणे, भांडी घासणे, कपडे धुणे, शेण गोळा करणे, भाजीपाल्याची पाटी बाजारात नेऊन ठेवणे अशी बालवयाला न झेपणारी कामे त्यांना करावी लागतात. लहानपणचे लाड त्यांच्या वाटयाला येत नाहीत. पावसाच्या दिवसात शाळेत भिजत जावे लागते. छत्रीसाठी हट्ट धरला तर "पोते घेऊन जा," असे हुकमी आवाजात बजावले जाते. मुलींच्या रंगीबेरंगी साडया पाहून त्यांनाही छान छान साडया नेसाव्याशा वाटतात. पण प्रत्येकी अडीच रुपये किंमतीच्या जाडया-भरडया दोन साडया त्यांच्या वाटयाला येतात. अशा करुण अवस्थेत त्यांचे बालपण जाते. सतत कोंडमारा त्यांच्या वाटयाला येतो.

घरकामामुळे आशाबाईंचा अभ्यास होत नाही. या कारणास्तव शाळेतील प्रगती शून्य असते. त्यामुळे त्या लवकरच शाळा सोडतात. त्यांच्या वाटयाला आलेले खडतर शैशव संपते आणि त्यानंतर साव्यांची प्रेयसी म्हणून बाईंची प्रतिमा आपल्यासमोर साकार होऊ लागते.

आपले चारचौघींसारखे सामान्य रूप साव्यांना पसंत पडले यावर बाईंचा विश्वासच बसत नाही. "खरंच का मी तुम्हाला आवडले ? मला तुम्ही कधी विसरणार नाही ना ?" असे रूपसुंदर साव्यांची पसंती कळताच बाई आनंदून विचारतात. 'सावे येणार' म्हणून शनिवाराकडे त्यांचे डोळे लागतात. एक रविवार उलटला की दुसऱ्या रविवारची वाट असे हे चक्र सुरू असते. साव्यांच्या नुसत्या नजरभेटीनेही ही प्रेयसी तृप्त होते. साव्यांच्या पहिल्या पत्राचे त्या लाड करतात. पोस्टमनच्या वाटेकडे पत्रासाठी तासन्तास डोळे लावून बसतात. पत्र मिळताच आनंदाच्या उकळ्या या प्रेयसीच्या हृदयात फुटू लागतात.

मध्यंतरी पत्रिका जुळली तरच लग्न होणार या साव्यांकडे घेतल्या जाणाऱ्या निर्णयाने त्या व्याकूळ होतात. अन्नपाण्याची इच्छा त्यांना राहत नाही. नुसतीच मनाची उलाधाल होते. त्या परमेश्वराची करुणा भाकतात, "परमेश्वरा ! ह्या परीक्षेत मी अपेशी ठरू देऊ नकोस. आम्हा दोघांचे ग्रह एकमेकास मिळतेजुळते ठरू देत..." (१३९) सुदैवाने त्या या परीक्षेत पास होतात. या निकालाचा आनंद ओसरतो न ओसरतो तोच दुसरी परीक्षा समोर उभी ठाकते. सावे मुदतीच्या तापाने आजारी पडतात. साव्यांना भेटण्यासाठी त्यांची तडफड सुरू असते. एका विरहि-

णीची ही तडफड आहे. आपल्या तडफडत्या अवस्थेसंबंधी त्या लिहितात, "कुणी त्यांच्या प्रकृतीची खबरबात घेऊन आले की मी अधीर होऊन ऐकत असे. माझे मन त्यांच्यापासून घुटमळून परत येई. माझ्या मनाचे पाखरू टाहो फोडून वेड्यापिशा-सारखे तडफडत होते... रात्रंदिवस. कुठेतरी जाऊन मी एकटीच रडत होते... मनातल्या मनात आक्रंदून देवाला म्हणे, "परमेश्वरा असा निर्दय, निष्ठुर होऊ नको. आमची ताटातूट करू नको. त्यांना बरं कर... क्षणभर मला फुलांच्या राशीवर बसवून आता असा घोर निराशेच्या धगधगलेल्या खाईत लोटून देऊ नकोस... मी... चोहोबाजूंनी रखरखलेल्या वाळवंटात उभी असल्यागत त्यांच्या भेटीच्या दिवसाची वाट पाहत, तिष्ठत, डोळ्यातून टिपे गाळीत आला दिवस कसातरी लोटीत होते." (१४४)

मध्यंतरी अशी संकटे येऊन शेवटी त्यांचे साव्यांशी लग्न होते. लग्न झाल्यावर साव्यांबरोबर गृहप्रवेश करताना बाईंमधली 'पत्नी' देवाची प्रार्थना करते, "परमेश्वरा, मी आज ह्या घरात माझे पहिले पाऊल टाकीत आहे ते भाग्यशाली, शुभलक्ष्मीचे ठरो. माझ्या आगमनाने ह्या घरात सदैव सुखशांती व भरभराट नांदो. घराण्याची वंशवेल वाढती राहो." (१६२) यातून त्यांची पारंपरिक भारतीय स्त्रीची मनोवृत्ती प्रकटते. यापुढे आशाबाई वाचकांसमोर येतात ती एक सहनशील पत्नी म्हणून !

एकत्र कुटुंबात सर्वांच्या मर्जीप्रमाणे वागता वागता बाईंच्या अगदी नाकी नऊ येतात. कोकणला जवळ असे मुंबईचे त्यांचेच घर असल्याने येणाऱ्या जाणाऱ्यांचे आदरातिथ्य करून त्या शिणतात. मुंबईतील पाण्याच्या तुटवड्याने रात्री तीन वाजता उठून त्यांना पाणी भरावे लागते. हे सर्व करीत असताना आशाबाईंना फार यातना होतात. स्वतःच्या आवडी–निवडी बाजूला साराव्या लागतात. "माझी पापड खाण्याची इच्छा सुद्धा पूर्ण झाली नाही" (१७७) असे त्या आज लिहून वाचकांपुढे आपले मन मोकळे करतात. पण त्यावेळी 'पापड पाहिजे' असे म्हणण्याची त्यांची हिंमत नसते. त्यांचे भारतीय रक्त त्यांना गप्प बसवते. दोन भावांमध्ये आपल्यामुळे वितुष्ट येऊ नये म्हणून त्या क्षणोक्षणी जपतात. पडतील ती कामे निमूटपणे करतात. त्या सांगतात, "त्यांच्यासाठी सारे मी सोसायला, भोगायला तयार होते. संसारात पाऊल टाकले होते. त्यांच्या पाठोपाठ जाणे हाच माझा धर्म होता. व्रत होते." (१७५) पतीचे सुख तेच आपले सुख मानणारी–पतीविना स्वतःला वेगळे अस्तित्व न ठेवणारी भारतीय पत्नी यातून दिसते. पतीमुळे होणाऱ्या या हालांना त्या कंटाळत नाहीत. स्वतंत्र बिऱ्हाड करावे असे स्वप्न त्या क्षणभर पाहतात. त्यात रमतात. पण ही अवस्था फारच क्षणिक असते. हरतालिकेच्या वेळी त्या देवाला प्रार्थना करतात, "जन्मोजन्मी हाच पती मला मिळू दे." (१८६)

अशी पदोपदी त्यांच्यातली भारतीय स्त्रीच प्रामुख्याने दिसते. कितीही त्रास झाला तरी पती हेच सर्वस्व असे तिला वाटत असल्याने मिटल्या ओठांनी ती सर्व सहन करते.

अशोकच्या जन्माने हे मातृहृदय सुखावते. " उद्या हे मूल आपल्याला सावली देणार !" (२००) हे विचार मनात येताच हे जननीहृदय बोलते, " पण हे पांग फेडायलाच हवेत असे थोडेच आहे !" (२००) निःस्वार्थ मातृहृदयाचे दर्शन यातून घडते. कोणतीही अपेक्षा न ठेवता आई आपल्या बाळाचे सर्व करीत असते. आई इतके निःस्वार्थी प्रेम कोणीच करू शकत नाही. बाळाला काही अपाय होईल म्हणून पथ्य पाळतात. अशोकचे शाळेतले रडणे ऐकून त्यांचे हृदय कळवळते. या सर्वांतून आशाबाईंमधली ' आई ' आपल्या दृष्टीस पडते.

लहानपणापासून सावेबाईंना वाचनाची आवड आहे. या वाचनप्रीतीतूनच त्यांची आणि साहित्यिक श्री. आनंद साधले यांची ओळख होते. त्या आपण होऊन साधल्यांचे शिष्यत्व पत्करतात. गुरुप्रेमापोटी आपल्या पहिल्या कथेचे मानधन त्यांना देतात. एवढेच नव्हे तर त्यांच्यामुळेच हे आत्मचरित्र लिहिले असेही त्या सांगतात. गुरूच्या प्रेरणेने जसे आठवेल तसे पत्ररूपाने लिहिलेले हे आत्मचरित्र आहे. कधी कधी सावेबाई नको तितक्या मोकळेपणाने काही बाही लिहून जातात. परपुरुषासमोर त्यांचे मन एवढे उघडे होते हे बरे वाटत नाही अशी टीका प्रस्तावनाकार मालती-बाई बेडेकर यांनी केली आहे. ती रास्त वाटते. ' मनात येईल ते लिहून काढा.' ही गुरूंची सूचना लेखिकेला असल्याने नेहमीच्या लज्जासुलभ गोष्टींखाली लपलेले सत्यही लेखिका भडाभडा लिहीत गेली. गुरूची आज्ञा शिरसावंद्य मानून मनात आले ते लिहिले असे असले तरी सर्वसामान्य भारतीय वाचकाला बाईंचे–पुत्र-जन्माचा प्रसंग व यासारखे इतर प्रसंग कितपत आवडतील अशी शंका मनात आल्यावाचून राहत नाही. अशी आशालताबाईंची कन्या, प्रेयसी, पत्नी, माता, शिष्या ही रूपे ' पाना–आडचे फूल 'मधून स्पष्ट झालेली आढळतात.

**' दुर्दैवाशी दोन हात–'मधील दुर्दैवी सरोजिनीबाई**

तीनशे पासष्ठ पानांचे हे आत्मचरित्र सरोजिनीबाईंच्या वाटचाला आलेले दुर्दैव उकलून दाखविते. " माझी जीवनकथा म्हणजे एक नाटकच घडले म्हणा ना. ...पहिल्या भागात आशा, आकांक्षा, अपेक्षांची बीजं पेरली गेली. रोपं चांगली मूळ धरणार असं वाटू लागलं पण ... दुसऱ्या भागात काळेकुट्ट ढग जमा झाले. वादळी वारे सुटले. विजा चमकू लागल्या. चोहोकडे अंधार कोंदला. तिसऱ्या भागात सर्व शांत झालं. वातावरण निवळलं, पण आशा, आकांक्षांची रोपटी उद्ध्वस्त झाली होती. काळ पुष्कळच पुढे सरकला होता. नवीन योजना सुचताहेत पण त्या तडीस जाणार नाहीत. तुझ्या अंगात तशी ताकद राहिलेली नाही. काळही थोडा राहिला

आहे अशी वैफल्याची भावना हृदयात भरून राहिली आहे." (५–६) आत्मचरित्राच्या आरंभी आलेला हा उतारा सरोजिनीबाईंच्या जीवनाची जाणीव करून द्यायला मदत करतो. सुरुवातीसच त्यांच्या दुर्दैवाशी ओळख होते.

जन्मापासून दुर्दैव त्यांच्या मागे लागलेले आहे. जन्म झाल्याबरोबर "मुलगी ! त्यात आज अमावस्या ! शांत लागली असणार !" (७) असे निराशेचे उद्‌गार काढले जातात. मुलगी झाल्याचे ऐकून वडील गणपतीची पूजा अर्धी टाकून उठतात. पाठोपाठ झालेल्या चार मुलींनी आई-वडिलांचे मन आंबून गेले होते आणि याची परिणती म्हणून त्यांच्या वाट्याला 'अंबू' हे नाव येते. समाजाचा आणि आईवडिलांचा मुलीकडे व मुलाकडे पाहण्याचा दृष्टिकोन भिन्न भिन्न असल्यामुळे, "... अगदी लहानपणापासून आपण मुलगा असतो तर किती बरं झालं असतं" (७) अशी खंत त्यांच्या मनात निर्माण होते.

लहानपणापासून शिक्षणाकडे त्यांचा ओढा आहे. बालवर्गात एक हुशार मुलगी म्हणून त्या ओळखल्या जातात. पहिल्या नंबराची खात्री असते. पण दुर्दैव पुढे येऊन उभे राहते. परीक्षेच्या वेळी दिपोटींचे दहा शब्द सांगून झाले तरी यांच्या रेघा आखून संपत नाहीत आणि शेवटी पाटीवर फक्त रेघाच राहतात. त्यांच्या शिक्षिकेची बहीण वर्गात असते म्हणून तिलाच पहिला नंबर दिला जातो. त्यासाठी पाट्यांची देवाण घेवाण, मार्कांची अदलाबदल ह्या गोष्टी होतात. महाविद्यालयीन शिक्षण सुरू असताना आईची बाळंतपणे, त्यामुळे धाकट्या भावंडांची जबाबदारी, घरातील इतर पाहुणे. अशी कामे अंगावर पडतात. " माझी कुतरओढ व्हायची " (४५) अशी त्या तक्रार करतात. नापास होऊन चालण्यासारखे नव्हते कारण शिक्षण बंद व्हायची भीती होती. केव्हा केव्हा तर त्यांना परीक्षेला उपाशी जावे लागत असे. " अभ्यासाची चांगलीशी तयारी नसल्यामुळे मी पुस्तकं चाळीत होते. आत येऊन पाहाते तो भाताला नुकताच कढ आलेला. मला न जेवताच परीक्षेला जावं लागलं. लागोपाठ दोन पेपर होते इंग्रजीचे. सहा वाजेपर्यंत सुटका नव्हती. जाताना मधल्या वेळात कॅन्टीनमध्ये काही तरी घेऊन खा असं आईनं सांगितलं होतं. पण कॅन्टीन म्हणजे लहानशा दोन खोल्या होत्या. छप्परवजा. तिथे खूप गर्दी होती. खाणं, चहा देणाऱ्या पोऱ्याची धांदल उडून गेली होती त्याचं दर्शन सुद्धा झालं नाही. मग ऑर्डर देऊन खाणं दूरच. परीक्षेला मी एकटीच मुलगी होते. तेव्हा मुलांच्या गर्दीत घुसणं अशक्यच होतं. मला सबंध दिवस उपास पडला." (५९) कुणाही सहृदय माणसाच्या डोळ्यात पाणी आणणारी ही अवस्था आहे. लग्न झाल्यावरही अनंत अडचणी वाट्याला येतात तरीही शरीराकडे दुर्लक्ष करून; मनाचा हिय्या करून त्या एम्. ए. होतात.

समाजाचा रोष पत्करून आई–वडील बाईंना शिकवायला तयार होतात. सारे सुरळीत सुरू असते पण पुन्हा दुर्दैव वाट्याला येते. एका पुरुषाच्या प्रेमात त्या अडकतात. त्या पुरुषात त्या इतक्या गुंततात की व्यवहारी जगाची त्यांना शुद्ध राहत नाही. नंतर तो विवाहित असल्याचे त्यांच्या निदर्शनास येते. या आघाताने जीवावरच्या दीर्घ दुखण्याला त्यांना तोंड द्यावे लागते. कशाबशा त्या यातून सावरतात. आपल्या सहजीवनाची कल्पना त्या मांडतात. "मी स्वतः शांतपणे, खेळीमेळीने, सरळपणे वागीन पण मुद्दाम कोणी वाकड्यात शिरले तर मी ते मुळीच ऐकून घेणार नाही. अजून माझी ह्यांच्याशी ओळखही झाली नाही पण मी प्रथमच मोकळेपणी सर्व सांगणार आहे. मी त्यांच्यावर पूर्ण विश्वास टाकणार आहे. त्यांनीही तसाच माझ्याविषयी विश्वास बाळगला पाहिजे. मला कपट, खोटंनाटं, फसवणूक असलं काही आवडत नाही. ... पति–पत्नीनं शंकेखोर मनानं सहजीवनाला सुरुवात केलेली मला मुळीच आवडणार नाही. आमचं पटायचं नसेल तर प्रथमपासूनच तसं झालेलं बरं." (९६) सरळ, साधेपणाने संसार करू इच्छिणाऱ्या स्त्री–सहज प्रवृत्तीतून जन्मलेले हे विचार वाटतात. पण दुर्दैवाने हे स्वप्न उधळले जाते. लग्नापासून त्यांच्या वाट्याला येते ती फक्त फसवणूक ! आणि योजनाबद्ध छळ ! कधी कधी तर या छळाने अगदी परिसीमाच गाठली जाते. सामान्य माणूस ज्याची कल्पनासुद्धा करू शकणार नाही अशा प्रकारचे हे असामान्य छळ आहेत. काट्याकुट्यांचे, खाचखळग्यांचे, खडतर हेव्यादाव्यांचे, भांडणतंट्यांचे; दीन, दरिद्री, कठोर, कृतघ्न व मनस्ताप देणारे जीवन त्यांच्या वाट्याला येते. त्यांच्या परीक्षाच परीक्षा घेतल्या जातात.

लग्न झाल्या झाल्या "पन्नास कप चहा कर, पाहुणी माणसं उठेपर्यंत चहा तयार झाला पाहिजे." (९३) या सासूबाईंच्या लष्करी आवेशात दिलेल्या आज्ञेने या परीक्षेला सुरुवात होते. घरातले कोणीच त्यांच्याशी धड वागत नाही. शारंगपाण्यांच्या जितके जवळ जाण्याचा त्या प्रयत्न करतात तितके ते रागाचा आव आणून, अधिकार गाजवून विक्षिप्तपणाने वागतात. सरोजिनीबाईंना ताप आला असताना मायेने चौकशी करण्याऐवजी, "आईला खूप औषधं माहीत आहेत. तिला सांग. ती देईल एखादं औषध" (१०४) असं थंड उत्तर देतात. शारंगपाण्यांच्या अंधत्वामुळे त्यांना वाचून दाखवायचे काम सरोजिनीबाईंकडे येते. उच्चार चुकले; अर्थ लागला नाही तर ते सांगत नाहीत. उलट कुचेष्टेने हसतात. दिवसभर घरातल्या घरात राहून त्या कंटाळतात. शारंगपाण्यांना बाहेर चलण्याविषयी विचारतात तेव्हा उत्तर मिळते, "मी दमलो आहे. फिरायला बिरायला काही येणार नाही. अशी कटकट करीत येथे उभी राहू नको." (१३८) अशा त्यांच्या साध्या साध्या इच्छासुद्धा पुरविल्या जात नाहीत. डोळ्यांच्या ऑपरेशनच्या वेळी बाई त्यांच्याबरोबर जाण्याची तयारी दाखवितात. पण त्यांची कुचेष्टा केली जाते आणि

शेवटी बाईंमुळे डोळे गेले असे खापर त्यांच्या माथ्यावर फोडले जाते. सरोजिनी-बाईंकडे पैसे असले तर त्या केव्हाही आपल्याला सोडून जाऊ शकतात या भीतीने शारंगपाणी त्यांच्याजवळ पैसा ठेवायला तयार नसतात. दळणाला, भाजीला ते पैसे मोजून देत व उरलेले पैसे मोजून परत घेत. शारंगपाणीबाईंनी सतरावेळा तोंड वेंगाडून त्यांना पैसे मागण्यात त्यांना आनंद वाटतो.

शारीरिक अस्वास्थ्याने बाईंकडून वाचन होत नाही तेव्हा शारंगपाणी त्यांच्याशी अबोला धरतात. डोळे दुखत असताना एक डोळा मिटून त्या वाचतात. पण त्यांची कीव केली जात नाही. आर्थिक परिस्थिती हलाखीची असताना शोभनाचे दूध की शारंगपाण्यांची सिगरेट असा प्रश्न निर्माण होतो. तेव्हा सिगरेट आणण्याविषयी ते सुचवितात. यावरून त्यांच्या निष्ठुरतेची कल्पना येते. आपल्या माणसाला त्रास द्यायचा नाही तर कुणाला असे त्यांच्याकडून स्वतःच्या वागणुकीचे समर्थन केले जाते. जे या पत्नीचे सर्वस्व, तिचा जीवन आधार त्यांच्या वागणुकीची ही रीत आहे. आपल्या वागणुकीबद्दल त्यांना कधीही वाईट वाटत नाही. पश्चात्ताप होत नाही. त्यांची ही माणुसकीला न शोभणारी वागणूक पाहून आपलीच मती कुंठीत होते. अशी यांच्या सहजीवनाची तऱ्हा आहे. सासूबाई, दीर आणि जाऊ त्यांच्या जाचाचे प्रकार आणखी निराळे आहेत.

"सासूबाई म्हणजे निव्वळ आग" (१०६) या वर्णनावरून सासूबाईंच्या वागणुकीची कल्पना येते. छोटया छोटया बारीक–सारीक कारणांवरून चिडणे हा त्यांचा स्वभावधर्म आहे. सुनेने परसातील मोगऱ्याची चार फुले खुडून डोक्यात घातली तर त्यांच्या अंगाचा तिळपापड होतो. खाद्यपदार्थ जाणीवपूर्वक समोर ठेवून 'चोरून खाते काय ?' अशी परीक्षासुद्धा घेतली जाते. शोभनेचा जन्म झाल्यावर पहिली नात म्हणून कौडकौतुकाचा बाळंतविडा तर राहूच द्या पण तिचे मुखावलोकनही न करणाऱ्या ह्या आजीबाई जगावेगळया वाटतात. बाळंतीण म्हणून काळजी तर नाहीच पण त्यांना धड जेवायलाही घालत नाहीत. घरातल्या घरात वेगळे काढून आजूबाजूच्या लोकांना तमाशे दाखवतात. सदासर्वकाळ शिव्या आणि अपशब्द उच्चारण्यासाठीच त्यांची जिव्हा लवलवताना दिसते. पांढऱ्या पायाची, अपशकुनी, कमनशिबी यांसारखी बिरुदे बाईंना लावण्यात त्यांचे मन आनंद मानते. धाकटया दीराचे लग्न झाल्यावर काम करायला बाई आणि कौतुकाला मात्र जाऊबाई अशी अवस्था सासूबाईंच्या वागण्याने घरात निर्माण होते. पोटच्या पोरासाठी घरात आलेल्या सुनेशी सासूने असे तिरकसपणे वागावे हे पाहून खरोखर आश्चर्य वाटते. दुर्दैव सरोजिनीबाईंचे एवढेच उत्तर आपल्याला देता येईल.

घराच्या भांडणावरून बाईंचे दीर–प्रतिष्ठाप्राप्त वकील त्यांना कोर्टात खेचतात. सराजिनीबाईंसारख्या एका साध्वीची विटंबना यापेक्षा ती आणखी

कोणती व्हावी ? ‘कानामागून आली आणि तिखट झाली’ अशी जाऊबाईंच्या वागण्याची तऱ्हा आहे. वास्तुशांतीनिमित्त आलेल्या थोरल्या जावेला ‘इथं कशाला आलात’ (१५६) असे विचारायला त्यांना काहीच वाटत नाही. एकाच बाईच्या वाट्याला अशी सर्व सारखीच छळवादी माणसे यावी याचे राहून राहून आश्चर्य वाटते. बाईंचे दुर्दैव ते हेच !

सर्वांच्या अशा वागण्याने त्यांचा जीव मेटाकुटीला येतो. मागच्याचे दुःख नाही; सध्याची खंत नाही आणि पुढची चिंता नाही. ज्याच्या खांद्यावर मान टाकून निश्चितपणे जीवन जगावे त्या शारंगपाण्यांचे स्वतःचे जीवन असे संवेदनाहीन असते. प्रत्येक ठिकाणी त्या अडखळतात. मध्येच स्वतःचे भान न राहून ठेचाळतात. वेदना सहन करीत करीत पुन्हा वाटचाल करू लागतात. स्वतःच्या जीवाच्या करारावर सर्व सहन करतात. आपल्या अवस्थेचे त्या वर्णन करतात, “ ... जीवनातला सारा रस आटून जाऊन नुसतं फोलपट उरलं होतं कर्मयोगाचं. कर्म करीत रहायचं. फळाची आशा धरायची नाही.” (१८२) त्यांच्या या दुर्दैवाची कीव येते.

जीवनातला जवळजवळ प्रत्येक क्षण आनंदहीन असतो. पण त्या कधीही आक्रस्ताळेपणा करताना दिसत नाहीत. सासूबाई वाईट वागत असल्या तरी त्यांच्या आजारपणात त्या मन लावून त्यांची सेवा करतात. मागचे सर्व विसरून जाऊन सुनेचे कर्तव्य पार पाडतात. “ वैधव्यावस्थेत मुलांना वाढवून शिकवल्याबद्दल खरोखरच सासूबाईंचं कौतुक करण्यासारखं होतं.” (१०९) असे त्यांच्या कर्तृत्वाचे गुणगान करतात. सासूबाईंचेही आयुष्य सुखात गेले नव्हते. अकाली वैधव्य, तीन मुलांची जबाबदारी, मोठ्या मुलाचे वेडेपण असे त्यांचे गतजीवन चाळून त्यांच्या अशा वागणुकीचे कारण शोधण्याचा प्रयत्न केला जातो. मुलाचे थाटात केलेले बारसे, त्याला दिलेली सोन्याची साखळी, कडे याची नोंद करायला त्या विसरत नाहीत. घरात दादाकडून मिळालेली माणुसकीची वागणूक त्या सांगतात. आठल्ये, देवस्थळी वगैरे शेजाऱ्यापाजाऱ्यांकडून मिळालेल्या निःस्वार्थी मदतीचे ऋणही मान्य करतात. यावरून कृतज्ञ सरोजिनीबाईंचे दर्शन घडते.

“ सासुरवाशीण म्हणजे आधी तोंड बंद केलं पाहिजे. मग आपली बाजू किती का खरी असेना.” (१३०) “ स्वार्थाने माणसाच्या मनात प्रवेश केला म्हणजे मात्र क्षणात त्याचा पशू बनतो.” (१६१) “ परक्या घरात परक्या माणसांशी संबंध आला की संयमाचे भक्कम बांध घालावे लागतात मनाला !” (१२०) ही जीवनसत्ये स्वानुभवावरून त्या मांडतात.

घरी अशी अवस्था असली तरी माहेरी जाऊन आपले रडगाणे गाणे त्यांना पटत नाही. “ ... मी काहीही सहन करीन पण त्यांच्या दारात जाऊन त्यांना

मन:स्ताप देणार नाही." (१५९) एकदा लग्न करून दिले की आईवडिलांची जबाबदारी संपली. त्यांना त्यांच्या इतर काळज्या असतात. आपण कशाला त्यात भर घालावी अशी आईवडिलांच्या मनाचा विचार करणारी बाईंची मनोवृत्ती आहे.

त्या बुद्धिवादी आहेत. पहिल्या वर्षातले बारा सण करण्याचा उद्देश, त्या निमित्तानं एकमेकांकडे जाणं, एकमेकांना लहानसहान वस्तू भेट देऊन आपलेपणा वाढविण्याचा असतो." (१२४) त्यांची ही सणांची उकल पटते. शारंगपाण्यांचे डोळे यावे, त्यांना दिसायला लागावे म्हणून सासूबाई देवाधर्माचे उपाय सुचवितात. बाईंचा या उपायांवर विश्वास नाही म्हणून त्या नकार देतात. अभिषेक, अनुष्ठान, भैरोबाला चांदीचे डोळे वाहण्याचा नवस सासूबाई करतात. यावर त्या म्हणतात, " पण देव नवसाला पावणार कसा ? देवाकडून वेळीच आलेल्या सूचना मानून औषधोपचार केले नाहीत. उलट व्यंग झाकण्याचा यत्न केला तर उशिरा केलेले उपाय सफल होणार कसे ?" (१७४).

आल्या संकटांना तोंड देऊन त्या सर्व निभवतात. दुर्दैवाला सामोऱ्या जातात. मुलांची काळजी वाहतात. त्यांचे सर्व नीटनेटके करतात पण बाईंची घरात सतत उपेक्षा होत राहते. " घरात नानाप्रकारे होणारा छळ सोसून, शिव्या, अपशब्द स्वीकारून आणि आज मी वेदनेने विव्हळत पडले तरी यांच्या तोंडून एकही शब्द येत नाही विचारपूस करणारा. उलट रोज वाचनाच्या अपेक्षेने माझं काम होतं केव्हा आणि मी सेवेत रुजू होते केव्हा म्हणून पुस्तकं काढून वाट पाहायची. मला वाचन होणार नाही असं वदवायचं आणि मग आपटत थोपटत पुस्तक ठेवून द्यायचं." (३४०) डोळे जाणार हे माहीत असूनही शारंगपाणी जाणूनबुजून लग्न करतात. मुलीकडच्यांना फसवतात. बाईंना हे कळते. स्वत: शारंगपाणीही याची कबुली देतात. त्या असहकाराचे बंड पुकारतात. पण हे फार उशिरा मिळालेले स्वातंत्र्य आहे. ज्याचा आता फारसा उपयोग होऊ शकणार नाही हेही सरोजिनीबाईंचे दुर्दैव !

" माझं जिणं चारचौघीसारखं प्रथमपासूनच नव्हतं," (९८) या त्यांच्या म्हणण्याचा पदोपदी प्रत्यय येतो. " एखाद्या आपुलकीच्या प्रसंगाच्या आठवणीवर तरी मी जगावं असं कधी घडलंच नाही. सारे लहानमोठे कडवट प्रसंग आणि ते विसरण्याची केविलवाणी धडपड." (१३१) हे कडवट प्रसंग कुणाच्याही डोळ्यात चटकन पाणी उभे करणारे आहेत. त्या आपले निरीक्षण करतात— " शोकांतिकेचे बीज माझ्या स्वभावाच्या एखाद्या अतिरेकी दोषाकडेही असेल नाही कुणी म्हणावं." (५) इतरांची वाईट वागणूक सोसून कदाचित आपल्या चुकांमुळे ते वाईट वागत असतील असा हा आत्मशोध आहे.

सरोजिनीबाई लक्षात राहतात त्या एक ' दुर्दैवी ' जीव म्हणून. काही माणसं दु:ख भोगण्यासाठी जन्माला येतात. थोडा कुठे आनंदक्षण वाटयाला आला की ते उठतात. परत नव्या उत्साहाने वाट चालू लागतात. पुन्हा कोलमडतात; त्यांच्या जीवनात उठणे–पडणे सतत चालू राहते. त्यांचे दुर्दैव अंतर्मुख करते.

**पुत्र चरित्र ' माझा नाना ' मधील वेणूबाई आजरेकर**

प्रस्तुत कालखंडातील एकूण पस्तीस आत्मचरित्रांपैकी 'माझा नाना' हे एकमेव आत्मचरित्र मुलासाठी लिहिलेले आहे.

> " माता अभागी म्हणवी तुझी मी
> कीर्ती सुता ही मिरवील नामी " (३)

असा वेणूबाईंनी आपला लेखनहेतू सांगितलेला आहे. लेखनाचे निमित्त 'नाना' असल्याने बाईंचे हे आत्मचरित्र म्हणजे नानाचे चरित्रच म्हणावे लागेल. नानाचे चित्र साकार करता करता नानाच्या बाळलीलांचे कौतुक करणारी आई, नाना मोठा झाल्यावर त्याच्या भविष्याची चिंता वाहणारी आई, नानाच्या मृत्यूनंतर त्याच्या चिर वियोगाने व्याकुळ झालेली माता अशी या मातृत्वाची विविध रूपे पुसटपणाने उभी राहतात. स्वत:ची स्वतंत्र प्रतिमा रेखाटणे हे त्यांचे उद्दिष्टच नाही. कारण आत्मचरित्रलेखनामागील तो हेतूच नाही. नानाच्या निमित्ताने लिहिलेल्या त्या आत्मचरित्रातून वेणूबाई साकारतात त्या अशा–

वेणूबाई आपल्या आई–वडिलांची पहिलीवहिली मुलगी. आई–बाबा दोघांनाही मुलीची हौस असल्याने त्यांचे बालपण लाडाकोडात गेलेले आहे. शिक्षणाची आवड असल्याचे त्यांनी सांगितले आहे. लग्नानंतर त्या इंग्रजी, ड्रॉईंग, गाणे, सतार शिकल्या आहेत.

लग्न झाल्यावर श्री. आजरेकर विलायतेला जातात तेव्हा सर्वजण हुरहुरतात. पण वेणूबाई सांगतात, " मी आपली निर्विकार होते. कशासाठी वाईट वाटायचे ते कळेना. ते घरी नसले म्हणजेच मला मोकळे वाटून बरे वाटे." (४४) आजरेकर त्यांना ' मी तुला पत्र लिहू का ?' म्हणून विचारतात तेव्हा त्या नको म्हणतात. घरात काकांना येतील त्यातून मला खुशाली कळेल असे त्या उत्तरतात. यातून वेणूबाईंच्या भाबडेपणाचे व प्रांजळपणाचे दर्शन घडते.

सासर–माहेरच्या लोकांची हकीकत त्यांनी फारशी दिली नाही. जी दिली आहे ती नानामधील आनुवंशिकता पडताळून पाहण्यासाठी. त्या लिहितात, " या दोन घराण्यांचे आनुवंशिक गुण, परंपरा आणि परिस्थिती यांचा चरित्रविषय झालेल्या माझ्या मुलाच्या गुणवैशिष्टयांचा काही संबंध आढळून येतो काय हेही ठरविण्यास ही माहिती कदाचित उपयोगी पडेल." (१८) असे तुरळक उल्लेख

सोडले तर इतर सर्वत्र नानाच्या निमित्ताने प्रकटलेले त्यांचे मातृहृदयच दिसते आणि त्या लक्षात राहतात त्या आई म्हणूनच.

बाईंच्या अपेक्षेप्रमाणेच नानाचे रूप असते. नानाच्या रूपाचे, नानाच्या बाललीलांचे त्या मोठ्या कौतुकाने वर्णन करतात. नानाच्या रूपाबद्दल बाई म्हणतात, "डोळे अतिशय पाणीदार, कपाळ, भुवया, नाक वगैरे किती रेखीव चित्रासारखे होते. गुलाबी गोऱ्या रंगाचे यथार्थ वर्णन तर मी करूच शकत नाही... आम्ही त्याला रात्रंदिवस पाहतो तरी तृप्ती होत नाही." (७४) नानाचे पाळण्यातून हुंकार देणे, घेण्यासाठी तऱ्हेतऱ्हेच्या युक्त्या करणे, 'दादादा' 'बाबाबा'(७४) हे त्याचे बोबडे बोल कुणालाही वेड लावणारे होते. नानाच्या जन्मासंबंधी रमाबाई म्हणतात, "वेणूताई तुमचा मुलगा चांगल्या मुहूर्तावर जन्माला आला आहे. लोकमान्य टिळकांच्या चळवळींची पूर्ती करण्यात, स्वराज्य मिळविण्यात तुमचा हा मुलगा पुढारी होवो हाच माझा त्याला आशीर्वाद बरं कां ?" (७०) रमाबाईंचे हे उद्‌गार ऐकून या आईचे हृदय आनंदाने फुलून येते. नानाचा व्यवस्थितपणा, सोशिकपणा, समजूतदारपणा, आईच्या आज्ञेप्रमाणे निर्भयपणे अंधारात बसून राहणे, वेणूबाईंना कोणी हात लावताच 'बप्प, बप्प, बप्प' (८५) करून त्याचे हात झिडकारून संरक्षण करीत असलेला हा चिमुकला शरीर–रक्षक, मोठ्या माणसासारखी त्याने वेणूबाईंची घातलेली समजूत–असे नानाचे गुण सांगण्यासाठीच वेणूबाईंनी एक प्रकरण लिहिले आहे. बाळाची छोटी–मोठी कृती कौतुकाच्या नजरेतून पाहणारी आई यातून दिसते.

नाना मॅट्रिकच्या परीक्षेत नापास होतो तेव्हा त्याच्या भवितव्याविषयी वेणूबाईंना फार काळजी वाटते. पुढे नाना सैन्यात दाखल होतो तेव्हा त्यांचा जीव भांड्यात पडतो. नाना विलायतेला जातो तेव्हा त्याने अंगठी मागूनही आपण दिली नाही म्हणून त्यांचे मन हुरहुरते. त्याच्यावर हा अन्याय केला असे वाटू लागते. नानाच्या चिरवियोगाने व्याकूळ झालेल्या मातेचे मन याठिकाणी वाचकांच्या मनाचा ठाव घेते.

'बेपत्ता' म्हणून आलेल्या तारेवर त्यांचा विश्वासच बसत नाही. जगाच्या पाठीवर तो कोठेना कोठे असून केव्हातरी आपल्याला भेटेलच अशी त्यांची आस आहे. नानाच्या परतीसाठी त्या देवाची करुणा भाकतात. "He lost his life on the 19th August 1944" (१०) अशी बातमी येऊनही नाना परत येईल या विचाराभोवती त्यांचे मन आशेने पिंगा घालताना दिसते. रोज रेडिओवर येणाऱ्या बातम्यांवरून या मातृहृदयाची उलघाल आपल्याला समजते. "आशाखोर मन मला फिरवीत राही की, चि. नानाचा मृत्यू प्रत्यक्ष घडला नसून सरकारी कारभाराच्या सोयीसाठी ( For official purpose ) गृहीत धरला आहे." (१३)

अशी आपली अवस्था त्यांनी सांगितली आहे. कुठल्याही आईला आपल्या लाडक्या मुलाच्या अशा अनपेक्षित मृत्यूची कल्पना सहन होणार नाही. या चिरंतन मातृवृत्तीचे दर्शन यातून घडते.

शेवटी वीरमाता म्हणून आपण आनंद मानला पाहिजे अशी त्या आपल्या मनाची समजूत घालतात. नानासंबंधी सर्व माहिती त्यांनी सांगितलेली आहे. पण तरीही पुत्रप्रेमाने भारावून जाऊन नानाची पत्रे व नानावर केलेल्या कविता पुस्तकाच्या शेवटी वेणूबाईंनी जोडलेल्या आहेत. आपल्या मृत्यूनंतर आपल्या सुपुत्राचे अस्तित्व टिकून राहावे यासाठी एका आईने केलेला हा प्रयत्न आहे. वेणूबाई मनावर नोंदवल्या जातात त्या प्रामुख्याने आपल्या आईच्या भूमिकेने !

**सहचरित्रातून प्रकटलेली स्त्री**

'आमचा जीवन प्रवास 'मध्ये यशोदाबाई जोशी यांची प्रतिमा सर्वांगाने चित्रित झालेली दिसते तर 'आमचे कृतार्थ सहजीवन 'मध्ये रूथबाईंनी आपल्या विवाहोत्तर जीवनातील प्रतिमेलाच महत्त्व दिलेले आढळते.

**'आमचा जीवन प्रवास 'मधील यशस्वी जीवन यशोदाबाई जोशी**

लेडी यशोदाबाई जोशी व सर मोरोपंत जोशी यांच्या चौऱ्याहत्तर वर्षांच्या सहजीवनाची कहाणी सांगणाऱ्या 'आमचा जीवन प्रवास' या आत्मचरित्रातून यशोदाबाईंची प्रतिमा प्रतीत होते ती अशी ...

१८६८ मध्ये अभ्यंकरांच्या घराण्यात जन्मलेल्या यशोदाबाईंनी वयाच्या दहाव्या वर्षापासून जोशी घराण्याच्या गृहिणीपदाची जबाबदारी स्वीकारलेली आहे. वयाच्या दहाव्या वर्षी सासरी आलेल्या यशोदाबाईंचे माहेरी बेजबाबदारपणे वागणारे मन सासरी एकदम वेगळ्या व अनोळखी वातावरणात जबाबदारीने वागायला राजी होत नाही. यशोदाबाई दहा वर्षांच्या म्हणजे त्या काळाच्या मानाने गृहिणीपद सांभाळण्यास वयाने लहान नसल्या तरी मनाने लहानच आहेत. परंतु यशोदाबाई आपली जबाबदारी ओळखून मनाला हळूहळू सवय लावतात. त्याला सर्व शिकवितात. पत्नी, माता आणि गृहिणी ही पदे जबाबदारीने स्वीकारतात आणि यशस्वीपणे सांभाळतात.

पत्नी या नात्याने आपले कर्तव्य ओळखून अण्णासाहेबांची सर्वतोपरी काळजी घेतात. अण्णासाहेबांवर त्यांचा विलक्षण विश्वास आहे. अंड्याचा स्पर्श म्हणजे विटाळ मानणाऱ्या यशोदाबाई अण्णासाहेबांनी मांसाहाराचे महत्त्व पटवून दिल्यावर मांसाहारी पदार्थ करायला शिकतात. यशोदाबाईंमध्ये हे परिवर्तन घडून येते ते अण्णासाहेबांवरील गाढ विश्वासामुळेच ! अण्णासाहेबांच्या सत्काराचे प्रसंग बाई अतिशय भारावून सांगतात. अण्णासाहेबांनी उत्तरादाखल केलेल्या भाषणांसंबंधी त्या बोलतात, "त्यांनी जे भाषण केले ते इतके हृदयस्पर्शी होते की ते

ऐकताना अनेकांनी प्रेमातिरेकाने आपले डोळे पुसले. हे त्यांचे भाषण ... माझ्या हृदयावर कायमचे कोरले गेले असून ते मला निरंतर आनंद देत असते." (२०५) अण्णासाहेब म्हणजे त्यांना परमेश्वरी अवतार वाटतात. त्यासंबंधी त्या म्हणतात, "अण्णासाहेबांबद्दलच्या माझ्या भावना तर वाणीने व्यक्त करणे मला अशक्यच आहे. ते ईश्वरी अवतार असून आम्हा कुटुंबियांना उद्धरण्यास या लोकी अवतरले अशी माझी दृढ श्रद्धा आहे. त्यांचा गुणगौरव मी कसा आणि किती करू ?" (२२७) यशोदाबाईंमधील भारतीय पत्नीचे दर्शन यातून घडते.

मुलांना चांगल्या सवयी लागाव्या, त्यांच्यावर चांगले संस्कार व्हावे म्हणून मुलांची दिनचर्या त्या अगदी आखीव बनवितात. मुले सकाळी पाच वाजता उठतात. पावणे सहा वाजता फिरायला जातात. सात वाजता त्यांची शिकवणी सुरू होते. त्या मुले नऊ वर्षांची होईपर्यंत त्यांना काँव्हेंटमध्ये पाठवितात. काँव्हेंटमध्ये पाठविण्याचा हेतू मुलांच्या रीतीभातींकडे (Manners) तेथे विशेष बारकाईने लक्ष पुरविले जाते हा असतो. परघरी जाणाऱ्या मुलींना सर्व यायला पाहिजे म्हणून यशोदाबाई त्यांना रोज सकाळ संध्याकाळ चटण्या–कोशिंबिरी वाढायला लावतात. रविवारी निरनिराळे पदार्थ करायला शिकवितात. मुलींना चित्रकला, रंगकाम, पेटी वाजविणे यांचेही शिक्षण दिले जाते. रात्री अण्णासाहेब व त्या मुलांशी खेळीमेळीने गप्पा मारतात व त्यांना उपदेशपर गोष्टी सांगतात. मुलांचा सर्वांगाने विकास व्हावा यासाठी जागरूकतेने प्रयत्न करणारी यशोदाबाईंमधील आई याठिकाणी वाचकांसमोर येते. मुलांच्या कोवळ्या मनावर विपरीत परिणाम होऊ नयेत यासाठी आईबापांनी अत्यंत जागरूकता ठेवली पाहिजे असा प्रेमळ सल्ला आधुनिक माता–पित्यांना यशोदाबाईंनी दिला आहे.

शिक्षणासाठी आपल्यापासून मुलांना दूर ठेवताना त्यांचे मातृहृदय तिळतीळ तुटते. मुलीच्या सासरी जाऊन राहणे स्वतःच्या मनाला पटत नसतानाही मुलीच्या कल्याणासाठी यशोदाबाई तिच्या ( कमलाबाईंच्या ) सासरी जाण्यास तयार होतात. विरुद्ध पार्टीकडून बाळंतपणासाठी आलेली परिचारिका मुलीचे बाळंतपण नीटपणे करील की नाही या विचाराने हे मातृमन अस्वस्थ होते. यशोदाबाईंमधील मातेचे रूप असे अनेक प्रसंगांमधून प्रकटते.

"आमच्या घरात सुना माहेरवाशिणी व लेकी सासुरवाशिणी असे झालेले दिसत आहे." (१४७) या यशोदाबाईंच्या मुलीने काढलेल्या उद्गारांवरून बाईंची सुनांशी असलेली प्रेमळ वागणूक कळते. मोठ्या सुनेला लहान्या सुनेशी सख्ख्या बहिणीप्रमाणे वागण्याचा त्या सल्ला देतात. एकीत जे सुख आहे ते विभक्तीत नाही असे तिला पटवून देतात. आपल्या घराण्याची पद्धत सुनेने चालवावी असे त्यांना वाटते. त्या सुनांना समजावून सांगतात, "मन मोठे ठेवावे, अन्नदान करीत राहावे,

त्याने बरकत राहते व आपल्या मनाला समाधान मिळते." (१७४) मालकिणीस सगळे येत असले व वाटेल ते काम करण्याची तिची तयारी असली म्हणजे नोकर माणसे वचकून असतात, अरेरावी करीत नाही असे त्यांचे मत आहे. सुनांना यशस्वी जीवनाच्या खुब्या मातेच्या ममतेने समजावून सांगणारी अशी ही प्रेमळ सासू आहे.

आपल्या घराचा, घराण्याच्या पद्धतींचा यशोदाबाईंना अतिशय अभिमान आहे. दहा वर्षांनी नागपूरहून अमरावतीला आल्यावर आपल्या आवडत्या घराचे मनोगत त्या सांगतात, "तू मला इतके दिवस सोडून का गेलीस ? तुझ्या गैर-हजेरीत माझी बघ कशी आबाळ झाली. तुझ्या प्रेमळ जोपासनेने मला आता प्रफुल्लित कर. आपल्या लाडक्या मुलाची पुष्कळ दिवस आबाळ होऊन ते भेटले म्हणजे आईचे हृदय जसे कळवळून येते तसे त्यावेळी मला झाले." (१७३) असे त्यांचे आपल्या घरावर पुत्रवत प्रेम आहे. आपल्या घराण्याच्या पद्धतींना नावे ठेवलेली यशोदाबाईंना आवडत नाहीत. शांता त्यांना म्हणते, "आपल्या घरात औपचारिक गोष्टी ( Formalities ) फार पाळल्या जातात. त्या करू नयेत." (१४७) त्यावेळी बाई तिला तडफदार उत्तर देतात, "प्रत्येक घरची काही वैशिष्टये असतात, ती त्यांनी पाळणे योग्य. आता तुझ्या नव्या घरात तुला वाटतील त्या पद्धती तू कर." (१४७)

एकोणविसाव्या शतकात टेनिस खेळणे, घोड्यावर बसणे, सायकल चालविणे या गोष्टी स्वतः करण्याइतपत यशोदाबाई पुरोगामी विचाराच्या आहेत. त्यांना आपल्या देशाविषयी फार प्रेम आहे. देशासाठी आपण काहीतरी केले पाहिजे असे त्यांना सारखे वाटत राहते. त्यामुळेच त्यांनी आपल्या मुलाच्या मौंजीत त्याला घातलेली भिक्षावळ "देशाला स्वतंत्र करण्याचे वाण हाती देत आहे ते घे" (८१) अशी आहे. त्या १८९२ मध्ये 'वनिता समाजाची स्थापना करतात. बायकांना समाजात येण्याची गोडी लागावी म्हणून कीर्तनांपासून सुरुवात होते. पुढे कीर्तनांची जागा व्याख्यानांना दिली जाते. नंतर बायकांना लोणची, मुरांबे, पापड वगैरे तऱ्हेतऱ्हेचे पदार्थ कसे करावे, मुलांची जोपासना कोणत्या पद्धतीने करावी, लोकरीचे विणकाम, कपडे बेतणे, भरतकाम, साक्षरता वगैरे गोष्टी शिकविल्या जातात. 'वनिता समाज' ही यशोदाबाईंची अमरावतीतील फार मोठी कामगिरी होय. आजही 'वनिता समाज' आपली सर्व वैशिष्टये टिकवून यशोदाबाईंचे नाव उज्ज्वल करीत आहे.

यशोदाबाईंनी प्रत्येक क्षेत्रात यशस्वी वाटचाल केली आहे. "परमेश्वराने मला प्रेमळ व सच्छील असे मुलगे, मुली, सुना, नातवंडे वगैरे भरपूर ऐश्वर्य दिले. त्याबद्दल मला धन्यता वाटते." (२२७) यशोदाबाईंच्या यशस्वी जीवनाची साक्ष पटविण्यास हे उद्गार पुरेसे वाटतात.

**' आमचे कृतार्थ सहजीवन ' मधील कृतार्थ जीवन : रूथबाई हिवाळे**

ज्ञानार्जन आणि ज्ञानदान हेच डॉक्टर हिवाळे यांचे जीवन–ध्येय आहे. आपले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी डॉक्टरसाहेबांना विविध अडचणींमधून जावे लागते. स्वदेशही सोडावा लागतो. रूथबाई डॉक्टरांचे जीवन–ध्येय तेच आपले जीवन–ध्येय मानतात आणि त्यातच आपल्या जीवनाची कृतार्थता समजतात. या कृतार्थ रूथबाई ' आमचे कृतार्थ सहजीवन 'मधून साकारतात त्या अशा...

डॉक्टरांच्या शिक्षणासाठी त्यांना स्वदेश सोडावा लागतो. बाईही डॉक्टरांच्या-बरोबर स्वदेश सोडून परदेशी जातात. त्यावेळी व्याख्याने देऊन पैसा मिळवून डॉक्टरांचे शिक्षण सुरू असते. डॉक्टरांच्या शिक्षणाला आपलाही आर्थिक दृष्टीने हातभार लागावा म्हणून रूथबाई सतार वाजवून दर आठवड्याला पंचवीस डॉलर्स मिळवितात. हाताने स्वयंपाक केला तर तेवढीच पैशाची बचत होईल म्हणून प्रवासात हाताने स्वयंपाक करतात.

डॉक्टरसाहेब परगावी गेल्यावर घरातील सर्व जबाबदारी त्यांना सांभाळावी लागते. मुलींच्या निरनिराळ्या दुखण्यांना तोंड द्यावे लागते. त्यावेळी त्यांना त्रासही होतो. परंतु डॉक्टरसाहेबांच्या अभ्यासात अडथळा येऊ नये म्हणून बाई याची त्यांना कधी झळ लागू देत नाहीत. घरची चौकशी करण्यास कोठूनही डॉक्टर-साहेबांचा फोन आला की सर्व ठीक असल्याचे सांगतात. डॉक्टरसाहेबांनी सुरू केलेल्या कामात त्यांना आपल्याकडून होईल तेवढी मदत करण्याचा प्रयत्न करतात. स्वदेशी आल्यावर गरीब विद्यार्थ्यांना कमी खर्चात दोनवेळा सकस जेवण मिळावे म्हणून खाणावळ सुरू करतात. खाणावळीची सर्व जबाबदारी त्याच स्वीकारतात. मुले नियमितपणे पैसे देत नाहीत. त्यावेळी स्वतःच्या घरखर्चातून पैसे घालावे लागतात. त्यामुळे स्वतःचा घरखर्च चालविताना त्यांची बरीच ओढाताण होते. पण या बाबी रूथबाई डॉक्टरसाहेबांपर्यंत कधी पोहचू देत नाहीत.

डॉक्टरसाहेबांनी खेड्यापाड्यातील लोकांसाठी चालविलेले ' लोकशिक्षण ' हे मासिक व ' उषा ' हे साप्ताहिक नीटपणे चालावे, त्यासाठी जास्त खर्च करावा लागू नये म्हणून प्रुफे तपासणे, पैशाचा हिशेब ठेवणे, आलेल्या पत्रांना उत्तरे लिहिणे, अंक तिकिटे लावून पोस्टात टाकण्यासाठी तयार करणे, वर्गणीदारांना क्रमांक देणे, लागणाऱ्या वस्तूंच्या वेळच्यावेळी ऑर्डर्स देणे, कागद मिळविणे, वेळ पडल्यास मासिकात लेख लिहिणे, साप्ताहिकासाठी मजकूर पुरविणे ही कामे त्या स्वतःची घरकामे सांभाळून करतात. यासाठी स्वतंत्र माणूस लावावा लागला नाही तर तेवढेच पैसे वाचतील हा यामागील हेतू. विल्सन हायस्कूलची जबाबदारी स्वीकारल्यावर डॉ. हिवाळे सांगतात, " शाळेसाठी खूप परिश्रम करून ती उर्जिता-वस्थेला आणणे अगत्याचे आहे. शिवाय आपल्याला अगदी विनामूल्य काम करून

शाळेची आर्थिक परिस्थिती सुधारावयाची आहे." (१६२) अशाप्रकारे डॉक्टरसाहेब रूथबाईंच्या मदतीची त्यांची अपेक्षा त्यांना बोलून दाखवितात. डॉक्टरसाहेबांबरोबर कॉलेजचे काम सांभाळून बाई मदत करतात. गरजू विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह काढतात. आपल्या अनेक गैरसोयी पत्करून त्या हे काम सांभाळतात. डॉक्टरसाहेबांना त्यांच्या कामात वेळोवेळी करता आलेल्या या मदतीने आपले जीवन 'कृतार्थ' झाल्याचे समाधान रूथबाईंना मिळते.

### विविध क्षेत्रांतील स्त्रीदर्शन

शिक्षणक्षेत्र, समाजक्षेत्र, चित्रपट, नृत्य, नाटक व संगीतक्षेत्र आणि साहित्यक्षेत्र अशी ही चार क्षेत्रे आहेत. या क्षेत्रातील स्त्रियांची आत्मचरित्रे स्वतःचे विशिष्ट क्षेत्र रेखाटण्यासाठी लिहिली गेली आहेत. या आत्मचरित्रातील स्त्री एकतर विशिष्ट ध्येयाने प्रेरित झालेली आहे किंवा तिच्या काही स्वतंत्र आवडी आहेत वा काही छंद आहेत. त्यातच ती रमलेली दिसते. याला अपवाद दिसतो तो साहित्यक्षेत्राचा. गिरिजाबाई केळकर व आनंदीबाई शिर्के या दर्जेदार साहित्यिक केवळ साहित्यक्षेत्रातच गुंतलेल्या नाहीत. साहित्यापेक्षा त्यांचे गृहिणीपदच महत्त्वाचे ठरले आहे. त्या काळात लेखिकांची अत्यल्प संख्या, त्यांचे समाजातील स्थान यांची ओळख 'द्रौपदीची थाळी' व 'सांजवात'मधून योगायोगाने होते.

कलाक्षेत्रातील स्त्रीची—समाजात बरीच फरपट झालेली दिसते. घर नि आपले क्षेत्र सांभाळताना काहींची ओढाताण होताना आढळते. त्या त्या क्षेत्रातील स्त्रियांचे कार्यक्षेत्र सारखे असले तरी त्यांना आलेले अनुभव वेगळे आहेत. कार्यपद्धती भिन्न आहे. यातून प्रत्येकीने 'स्व' अस्तित्व जपले आहे.

## शिक्षणक्षेत्र

### स्मरणसाखळी 'तील शैक्षणिक कार्यकर्त्या श्रीमती कमलाबाई देशपांडे

शिक्षणक्षेत्र हेच कमलाबाईंच्या आयुष्यातील महत्त्वाचे कार्यक्षेत्र. 'स्मरणसाखळी'त त्यांची प्रतिमा आपल्या प्रत्ययास येते ती प्रामुख्याने शैक्षणिक कार्यकर्त्या म्हणून. 'स्मरणसाखळी'चा परिचय करून देताना त्या सांगतात, "... गेल्या पंचवीस वर्षांत माझे सर्व लक्ष व शक्ती शिक्षणकार्याकडे केंद्रित झाली होती व त्यातीलच ह्या आठवणी." (दोन शब्द) मुलींच्या सक्तीच्या शिक्षणाचा प्रश्न वादातीत असतो तेव्हा त्या आपले मत ठामपणे सांगतात, "मुलींचे सक्तीचे शिक्षण दूर टाकू नका." (८०) त्याच वेळी त्या आपला निश्चयही जाहीर करतात, "... मला शिक्षणकार्यास वाहून घ्यायचे आहे. शिक्षणाचा प्रसार होणाऱ्या गोष्टीस हातभार लावायचा म्हणून मी हा निश्चय करीत आहे" (८३) कमलाबाईंना मित्रपरिवारही ध्येयाला साजेसा व ध्येयाची पाठराखण करणारा मिळतो. साताराची कन्याशाळा म्हणजे त्यांच्या ध्येयाचे मूर्त रूप होय. 'स्व'-

ध्येयाच्या प्राप्तीसाठी वाटचाल करणाऱ्या कमलाबाई वाचकांच्या मनावर आपले चित्र उमटवून जातात ते असे ...

महाविद्यालयीन शिक्षणास प्रारंभ करताना स्वत: स्वावलंबी होणे व इतर स्त्रियांना स्वावलंबी करणे ही गोष्ट कमलाबाईंनी डोळ्यांसमोर ठेवलेली असते. त्यासाठी शिक्षण या माध्यमाची त्या निवड करतात. जी. ए. होताच हिंगण्याला हायस्कूलमध्ये शिक्षक म्हणून काम करण्यास सुरुवात करतात आणि त्याबरोबरच साक्षरता प्रसाराचे कामही अतिशय आवडीने स्वीकारतात. ध्येयप्राप्तीसाठी धडपडणाऱ्या कमलाबाईंचे दर्शन याठिकाणी घडते.

महिला विद्यापीठाची कल्पना लोकप्रिय करण्यासाठी साताऱ्याला कन्याशाळेची स्थापना केली जाते. विद्यापीठाच्या परीक्षेसाठी विद्यार्थिनी तयार करावयाच्या हेच या शाळेचे ध्येय असते. ही शाळा सुरू होते ती दादासाहेब करंदीकर यांच्या बंगल्यातील दोन खणांच्या माडीत. सात विद्यार्थिनींची पहिलीत तीन, दुसरीत तीन व पाचवीत एक अशी विभागणी होते. दोन बैठे बाक व एक डेस्क यावर हे वर्ग बसत. एक मोडके टेबल हेच शाळेचे ऑफीस. पाणी पिण्याच्या तांब्यावर ठेवलेले भांडे ही घंटा ! आणि स्वत: सुपरिंटेंडेंट हीच घंटा देणारी व इतर कामे करणारी मोलकरीण अशा थाटात शाळा सुरू होते. या शाळेचे काम कमलाबाई विनावेतन करतात. पुढे स्वत:ला मिळत असलेल्या महिन्याच्या पंचाहत्तर रुपये पगारातून शाळेच्या हलाखीच्या दिवसांत तीस रुपयांची मदत करतात.

आलेल्या संकटास न भिता व दु खास न जुमानता हाती घेतलेले काम धैर्याने व समाधानाने करण्याची वृत्ती असल्याने कुठल्याही संकटाने त्या डळमळून जात नाहीत. "जगात अनेक उपयुक्त गोष्टी आहेत. सगळ्याच करणे व दरवेळी नवीन दिसेल ते करणे शक्य नाही तेव्हा एकदा आपण जे शपथपूर्वक स्वीकारले तेच शेवटपर्यंत करावे. त्यामुळे दरवेळी उसळणाऱ्या लाटेवर अग्रेसर म्हणून आपण चमकू शकणार नाही पण एक काम पुरे केल्याचे समाधान मिळेल." (२३७) अशी कमलाबाईंची विचारसरणी आहे. "कन्याशाळा ही स्त्रियांना अनीतीच्या मार्गाकडे जोराने नेणारी मोटारगाडी आहे." (१९८) असे लोकांचे कन्याशाळेबद्दल मत असले तरी घरोघरी जाऊन शिक्षणाचे महत्त्व पटवून देऊन त्या शाळेसाठी मुली जमवतात. शिक्षणासंबंधी स्त्रियांच्या मनात गोडी निर्माण व्हावी, शाळेचे आकर्षण वाटावे म्हणून, जुन्या बायकांना देखील यावेसे वाटावे म्हणून असे कार्यक्रम स्नेहसंमेलनात ठेवतात. त्यांची मुलींशी वागणूक त्या स्वत:च सांगतात, "प्रत्येक मुलगी ही विचाराने वागणारी असणार, तिजमध्ये सत्प्रवृत्ती असणारच, तेव्हा शिक्षा किंवा वाक्ताडन यापेक्षा तिला सूचना दिली तर ती लवकरच उमजते असा माझा विश्वास." (१४१) पुढे त्या लिहितात, "प्रसंगावधान राखून सरसकट नियम न धरता त्या

व्यक्तीची पारख करून कृती झाली पाहिजे." (१४१) थोडासा अवखळपणा हा विद्यार्थ्यांनी करावयासच हवा. अगदीच मोजूनमापून यंत्रासारखे वागणारे ते विद्यार्थी कसले ? अशी विद्यार्थ्यांना समजून घेण्याची कमलाबाईंची वृत्ती आहे.

"एखादी होतकरू विद्यार्थिनी दिसली म्हणजे स्वाभाविकपणे माझे तिजकडे जास्त लक्ष ओढे व विशेषतः ती माझ्या विषयाची म्हणजे ऐच्छिक संस्कृत घेणारी असेल तर तिला तिचे संस्कृत जास्त वाढविण्यास मदत करावी, शक्य तर तिच्याकडून पी. ए. चा अभ्यास करावयाचे ठरवून घ्यावे असे वाटे." (३०१) याठिकाणी कमलाबाई एक हाडाच्या शिक्षक म्हणून वाचकांसमोर येतात. मुलींशी अशा वागणुकीने मुलींकडूनही त्यांना चांगला प्रतिसाद मिळतो. मुलींना त्या आदर्श वाटतात. पुढील पत्रे यावर प्रकाश टाकणारी आहेत. "कमलाकाकी मागल्या वर्षी मी जी. ए. होऊन घरी राहिले होते. पण मोकळे राहावयाची सवय नाही. त्यामुळे तासाची वेळ होताच कसेतरी होई व पुन्हा कॉलेजात जावेसे वाटे. तुमची वारंवार आठवण होई. कारण नुसत्या शिक्षकापेक्षा वेगळचा दृष्टीने तुम्ही आमच्याकडे लक्ष ठेवीत होता. आता सांगलीस आल्यापासून तुम्ही कॉलेजात सांगत होता त्या गोष्टी मी करते." (३०२) एक विद्यार्थिनी लिहिते, "मी शाळेत काम करताना काही अडचणीचा प्रसंग आला म्हणजे तुमची फार आठवण होते." (३०३) या पत्रांवरून कमलाबाईंचे वेगळेपण आपल्या लक्षात राहते. "कन्याशाळेच्या मुख्यस्थानी स्त्री असणे अवश्य. त्यायोगे शिस्तीचे प्रश्न सोडविण्यास बरे पडते." (२३४) असे त्या स्वानुभवावरून सांगतात.

संस्थेच्या आजन्मसेविका असल्याने कित्येकदा स्वतःच्या विचारांना त्यांना मुरड घालावी लागते. संस्थेत येताना मनुष्य स्वतःच्या इच्छेने येतो. पण पुढे त्याला संस्थेच्या इच्छेनुसार वागावे लागते. आपल्याला संस्थेचे काम करायचे आहे ही जाणीव ठेवून संस्था आपल्यासाठी काही कार्य करील, हे विसरून चालायचे असते. ही संस्थेची परिस्थिती लक्षात घेऊन कमलाबाई आपली वागणूक ठेवतात. आपल्या इच्छांना तिलांजली देऊन आपले ध्येय नेटाने पुढे नेतात.

साताऱ्याची कन्या शाळा हे कमलाबाईंच्या जीवनातील अतिशय महत्त्वपूर्ण कार्य होय. "साताऱ्याच्या कन्या शाळेची संस्थापना व जोपासना अत्यंत अल्प वेतनावर करून त्यांनी संस्थेच्या कार्याचा बाहेर प्रसार केला." (४१५) "सातारा कन्या शाळेच्या स्थापनेच्या व जोपासनेच्या बाबतीत अत्यंत अल्प वेतनावर त्यांनी परिश्रमपूर्वक केलेली सेवा संस्था विसरणे शक्य नाही." (४१६) हे अनुक्रमे गंगूबाई तांबोळी व भा. धों. कर्वे यांचे अभिप्राय याची प्रचीती आणून देतात. शिक्षक, मुख्याध्यापक, प्राध्यापक, सेक्रेटरी, सुपरिटेंडेंट शिक्षणक्षेत्रातील ही सर्व

पदे कमलाबाई अतिशय काळजीपूर्वक सांभाळतात. कमलाबाई विशेषत्वाने लक्षात राहतात त्या सातार्‍याच्या कन्या शाळेतील कार्याने.

**'गोदातरंग 'मधील सुधा अत्रे**

सुधाताई ह्या नामवंत साहित्यिक आचार्य अत्रे ह्यांच्या पत्नी ! अत्र्यां-सारख्या रसिक माणसाच्या सहवासात त्यांचा संसार फार रसिकतेने व्हायला हवा होता आणि एक संसारी स्त्री ही व्यक्तिरेखाच अधिक ठळक व्हायला हवी होती. पण दुर्दैवाने तसे होत नाही. त्यांच्या जीवनातील ही बाजू बरीच उदास भासते. अत्र्यांच्या वागणुकीने वाट्याला आलेले असफल वैवाहिक जीवन, त्यातून जन्मलेला मनस्ताप ह्या गोष्टी मनाला क्षणभर चटका लावून जातात. सहानुभूतीचा ओघ सुधाताईंकडे वळवितात. पण हे सारे क्षणापुरतेच ठरते. आत्मचरित्राच्या एकूण बत्तीस प्रकरणांपैकी सुरुवातीची बालपण, शिक्षण आणि नोकरी ही तीन प्रकरणे सोडली तर पुढील सर्व म्हणजे अठ्ठावीस प्रकरणे संसाराशी संबंधित आहेत. नानीचा जन्म, मीनीचा जन्म, त्यांचे विवाह, नातवंडांची बारशी, मौंजी वगैरे सोहळे, अत्र्यांच्या मराठ्याचा व शिवशक्तीचा जन्म, अत्रे थिएटर्सची स्थापना, बाबुरावांनी गाठलेले कीर्तीचे शिखर असे संसाराशी संबंधित अनेक लहान–मोठे प्रसंग बाईंनी विस्ताराने सांगितले आहेत. तरीही एक संसारी स्त्री म्हणून बाईंची व्यक्तिरेखा मनात मूळ धरत नाही. त्यांची शिक्षणप्रांतातील व्यक्तिरेखा अधिक भरीव वाटते. 'गोदातरंग' मधून बाईंच्या व्यक्तिमत्त्वाची हीच बाजू अधिक स्पष्ट होत असल्याने याच व्यक्तिमत्त्वाचा शोध या ठिकाणी घेतला आहे. लहानपणापासून आपण जगात काहीतरी मिळवले पाहिजे, काहीतरी केले पाहिजे ही सुधाताईंची महत्त्वाकांक्षा. त्यांच्या वाट्याला शिक्षकाचा पेशा येतो आणि शिक्षणकार्याला स्वतःला वाहून घेतले जाते. तन, मन, धन लावून शिक्षणक्षेत्राची सेवा त्या करतात. 'गोदातरंग' मध्ये जवळपास अकरा प्रकरणांतून या व्यक्तिरेखेचे चित्रण झालेले आहे.

आपल्या महत्त्वाकांक्षेची ओळख सुधाताईच करून देतात. "केवळ पोटा-करिता मी शिक्षिकेचा धंदा करीत नव्हते. शिक्षणाच्याद्वारे आपण काहीतरी कार्य करावे असे मला सारखे वाटत होते. लहानपणापासून आपण काहीतरी केले पाहिजे. जगात मिळविले पाहिजे अशी एक महत्त्वाकांक्षा माझ्यामध्ये होती." (९८)

बालवयापासून त्यांना वाचनाची आवड. घरात एका पाठोपाठ झालेल्या मृत्यूने आलेले आईचे आजारपण, लहान वयापासून सुधाताईंना मातृसुखाला वंचित करते. प्रभाकर आणि लेलू या वडील भावंडांचे वागणे बरेचसे 'स्व 'केंद्री असते. वडील–दादा ज्यांचा यांना घरात फार मोठा आधार असतो, ते नोकरीच्या निमि-

त्ताने सतत बाहेरगावी असतात. या घरच्या परिस्थितीने ज्या वयात सर्वांच्या लाडा–कौतुकाने मोठे व्हायचे, त्या वयात स्वतःत दंग होण्याची पाळी येते. बरेच एकाकीपण त्यांच्या वाट्याला येते. यातून ही वाचनाची आवड अधिक बळावते. दिवसातला बराचसा वेळ वाचनात जातो. भरपूर अभ्यास करून वर्गात पहिला नंबर मिळवण्यात त्यांना आनंद वाटतो. मॅट्रीक आणि बी. ए. च्या वेळी खूप अभ्यास करूनही वेळेवर अकल्पितपणे आजारपण येऊन त्यांना कसेतरी पास व्हावे लागते. आपला अभ्यास वेळेवर उपयोगी पडू शकला नाही म्हणून त्या हळहळतात.

सुधाताई हुजुरपागेच्या शाळेत वीस वर्षे काम करतात. त्यांच्या व्यवस्थित कामाबद्दल मुख्याध्यापिका मिस फिल्ड त्यांचे अतिशय कौतुक करतात. शाळेतील पहिल्या बी. टी. असल्याने " शी इज ए बी. टी. . " (४७) असे त्या जिव्हाळ्याने भारावून इतरांना सांगतात. शाळेत शिक्षण खात्यातील कोणी आले तर नव्या पद्धतीने म्हणजे Direct Method ने पाठ घ्यायला लावतात. मुख्याध्यापिकेच्या या कौतुकावरून एक शिक्षक म्हणून पोटतिडिकीने काम करीत असलेल्या सुधाताई आपल्याला दिसतात.

वीस वर्षे हुजुरपागेच्या शाळेत उत्तम काम केल्यावर नाशिक येथील मुलींचे हायस्कूल व मुलींचे सरकारी ट्रेनिंग कॉलेज ह्यावर मुख्याध्यापिका म्हणून त्यांची नेमणूक होते. निरोप देताना त्यांच्या वीस वर्षांच्या उत्कृष्ट कार्याबद्दल कोणीच काही बोलत नाही म्हणून त्यांना फार वाईट वाटते. आपले दुःख त्याच सांगतात, " मला अतिशय वाईट वाटले. आपण आपल्या रक्ताचे पाणी करून इतके दिवस शाळेची सेवा केली. त्याच्याबद्दल कृतज्ञतेचा एक शब्द सुद्धा आज माझ्या कानी पडू नये का ? मी त्या दिवशी अतिशय हताश झाले. ' अति तेथे माती ' म्हणतात ती अशी." (९४) जीव ओतून काम केल्यावर आपल्या कामाबद्दल कौतुकाचे चार शब्द ऐकायला मिळावे अशी सर्वसामान्य माणसाची अपेक्षा असते. तेव्हा बाईंचीही अपेक्षा असणे गैर वाटत नाही. हे कौतुक कामाला नवा हुरूप देण्यास कामी पडते. पण कित्येकदा मनाचा एवढाही मोठेपणा माणसाला दाखविता येत नाही.

नाशिक ही सुधाताईंची जन्मभूमी व त्यांचे आजोबा भाषांतर पाठमालाकार तर्खडकर यांची कार्यभूमी म्हणून येथे काहीतरी भरीव कामगिरी करून दाखविली पाहिजे ही मनीषा त्या उराशी बाळगून असतात. नाशिकला शाळा, कॉलेज व बोर्डिंग असे तिन्ही व्याप त्यांना सांभाळावे लागतात. प्रत्येक कार्य अतिशय जबाबदारीने केले जाते.

ट्रेनिंग कॉलेजच्या मुलींची पूर्ण चौकशी करून त्या मुलींना प्रवेश देतात. मुलींचे नुकसान होऊ नये हा प्रेमळ हेतू या निवडीमागे असतो. मुलींना चांगले वळण लावणे हे त्या आपले कर्तव्य समजतात. त्या लिहितात, " लहानपणापासून

मुलींच्या बुद्धीची वाढ कशी होते, तिच्या सवयी कशा तयार होतात व ती कोणत्या स्वभावाची बनते ह्याकडे माझे नेहमी लक्ष असे. मुलगी जर वाह्यात होत चालली तर तिच्याकडे लक्ष देऊन तिला सुधारणे मी माझे कर्तव्य समजत असे. अशा कितीतरी वांड मुलींना सुधारण्याचा मी प्रयत्न केला आहे व त्या सुधारल्या देखील आहेत." (९८) शिक्षण म्हणजे फक्त पुस्तकी ज्ञानाकडे लक्ष देणे नसून मुलींच्या सर्वांग विकासाकडे आस्थेने लक्ष पुरविणाऱ्या ह्याडाच्या शिक्षक म्हणून सुधाताई या ठिकाणी लक्ष वेधून घेतात.

वर्गात शिस्तीने जावे, वर्गात शिक्षक नसताना देखील गडबड करू नये; जिन्यावरून पळत जाऊ नये, मोठमोठ्याने ओरडू नये असे मातेच्या ममतेने मुलींना वळण लावतात. मुलींच्या हजारो कटकटी समजून घेतात. त्यांच्यात एकी निर्माण करतात. खेड्यातील मुलींना वागण्याचा विशेष पोच नसतो. याविषयी त्या म्हणतात, "त्यांचा मी व्यक्तिशः विचार करीत असे. एखादीकरता मला एखादा नियम थोडा सैल करावा लागे व तिला जास्त सहानुभूतीने वागवावे लागे." (१०२) यातून एक सहृदय शिक्षक म्हणून सुधाताई मनावर ठसतात.

मुलींमध्ये नाट्य व अभिनयाची रुची निर्माण व्हावी म्हणून करमणुकीचे कार्यक्रम घेतात. महिन्यातून एखादा चित्रपट त्यांना दाखवतात. मुलींना घडविण्याचे हे त्यांचे प्रयत्न कौतुकास्पद वाटतात. स्पृश्य आणि अस्पृश्य अशा वर्णविभाजनाने मुलींना जेवायला बसविण्याची पद्धत मोडून वर्गवारीने त्यांना जेवायला बसवितात. जातिभेदामुळे श्रेष्ठ-कनिष्ठ असा भाव या अजाण मुलींच्या मनामध्ये निर्माण होऊ नये, त्यांचे विपरीत परिणाम मुलींना भोगावे लागू नये म्हणून केलेला हा प्रयत्न आहे. मुलींच्या मनाचा विचार करणाऱ्या, त्यांना समजून घेणाऱ्या सुधाताई यातून दिसतात.

युद्धाच्या काळात रेशनिंग सुरू होते. धान्याची टंचाई असताना नवीन नवीन युक्त्या काढून बाई मुलींना पोटभर जेवायला घालतात. सकाळची शाळा असताना शाळा फार उशिरा सुटे. गरिबांच्या मुलींना घरून काही खाऊन येता येत नसे. शेवटच्या तासाला त्यांचे अभ्यासात लक्ष लागत नसे. कधी एकदा शाळा सुटते असे त्यांना होऊन जाई. अशा वेळी, " माझ्याजवळ मी काही चॉकलेटच्या गोळ्या ठेवीत असे व मधल्या सुटीत ... अशा अगदी छोट्या मुलींना खाण्यास देई. मधली सुटी झाली की एखादी छोटी मुलगी हळूच माझ्याकडे येऊन त्या गोळ्या घेऊन जाई. ' कोणाला ही गोष्ट सांगू नका बाई ' असे त्या वारंवार मला म्हणत. त्यांचे म्हणणे असे की ही गोष्ट इतर मुलींना कळली तर आम्हाला वाटेल ते बोलतील व चिडवतील. मी पण त्यांना ' कोणाला सांगणार नाही ' म्हणून वचन दिले. गरिबीची लाज ही सर्वांनाच असते." (१५५) अशी त्यांची मुलींशी समजूतदार वागणूक असते.

सुधाबाईंचे वागणे मुलींशीच प्रेमाचे आहे असे नाही तर त्यांच्या हाताखाली काम करणाऱ्या शिक्षिकांकडेही त्या तितक्याच प्रेमळदृष्टीने पाहतात. " प्रत्येकीला काहीतरी येतच असतं. उगीच कुणी कुणाला नावे ठेवू नये " (१५५) अशी वृत्ती त्या शिक्षकांमध्ये निर्माण करतात. " आपल्या नव्या सासूबाई फार चांगल्या आहेत." (१५५) शिक्षिकांनी त्यांच्याबद्दल दिलेला हा अभिप्राय त्यांच्या उत्तम वर्तणुकीचेच द्योतक आहे. स्वतःविरुद्ध उठणाऱ्या कंड्यांना त्या धैर्याने सामोरे जातात. मुलींची चांगली तयारी करून शाळेला भरघोस यश मिळवून देतात. कृ. पां. कुलकर्णी शाळेच्या स्नेहसम्मेलनाचे कौतुक करतात त्यावेळी, " ह्या गॅदरींगचे सर्व श्रेय मिसेस कानेटकरांना होते. कारण त्यांनी स्वतः मेहनत घेऊन विद्यार्थ्यांचे सर्व कार्यक्रम बसविले होते." (१५१) असे सांगतात. ज्याचे श्रेय त्याच्या पदरात घालण्याचे मोठे मन सुधा अभ्यांजवळ आहे.

वरील प्रत्येक प्रयत्नातून स्वतःची महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्याची सुधाताईंची धडपड दिसते. मिस रुस्तम यांनी इन्स्पेक्शनमध्ये शाळेला दिलेला ' ए वन ' (१३९) ग्रुप. " हुजुरपागेपेक्षा तू शाळा फार चांगली ठेवली आहेस. मुलींचे शिवणकाम, भरतकाम, ड्रॉईंग वगैरे फार चांगले आहे." (११०) हे ट्वेल्स् बाईंनी दिलेले प्रशस्तिपत्र म्हणजे सुधाताईंची महत्त्वाकांक्षा सफल झाल्याची चिन्हे होत. चटका देणारी दुःखे बाजूला ठेवून काहीतरी जगात करायचे ही आस पदरी बांधून त्यासाठी ' शिक्षण ' या स्वतःच्या आवडीला तनमनधनाने वाहून घेणाऱ्या सुधाताईंचे असे दर्शन ' गोदातरंग ' घडवते.

**' चाकोरीबाहेर 'मधील शैक्षणिक क्षेत्रास वाहिलेले एक वेगळे व्यक्तिमत्त्व : गंगूबाई पटवर्धन**

प्रस्तुत कालखंडातील एकूण पस्तीस आत्मचरित्रकार स्त्रियांमध्ये गंगूबाई पटवर्धन ही एकच स्त्री चाकोरीबाहेरचे जीवन जगणारी आहे. चारचौघींपेक्षा सर्वस्वी निराळे असे जीवन त्यांनी स्वीकारलेले आहे. गंगूबाई आपल्या मनावर ठसा उमटवून जातात त्या जगावेगळी स्त्री म्हणून ! स्वीकारलेले जीवन निष्ठेने आणि पूर्ण विजयाने जगणारी स्त्री म्हणून !

भातुकलीच्या खेळात भिवाने गंगूबाईंच्या मैत्रिणीशी केलेला अति-प्रसंग; काकांचे मावशीशी ' नवरा ' या नात्याने वागणे पाहून ' पुरुष म्हणजे वाईटच ' असा निष्कर्ष हे बालमन काढते. महाडला गेल्यावर माईच्या लग्नातील विधी बघून त्यांना किळस येते. लग्नात वधूपक्ष म्हणून आई-वडिलांचे सतत नमते घेणे खटकते. त्यांच्या बुद्धीला हे प्रकार पटत नाहीत. लग्न करणे म्हणजे असा प्रकार असेल तर लग्न न करण्याचा निर्णय माईच्या लग्नाच्या वेळी घेतला जातो.

बायकांना वटपौर्णिमेच्या दिवशी वडाची पूजा, हरतालिकेला वाळूच्या महादेवाची पूजा करताना पाहून त्यांना गंमत वाटते. हसू येते. कोणत्याही अंध-श्रद्धेवर विश्वास ठेवायला त्यांचे मन तयार होत नाही. घरकामात त्यांचे लक्ष लागत नाही. बंब पेटविण्याची वेळ आली तर चार वेळा रॉकेल घालून पेटविल्या-वरही शेवटी बंब विझला म्हणून त्या परत येतात. भाजी शिजेपर्यंत बघायला सांगितले तर पातेल्यातून धूर निघायला लागतो तरी पुस्तक सोडून भाजी बघायला जाण्याचे भान राहत नाही. दाराला कडी न घालता नुसते कुलूप त्या घालतात. अशी यांच्या घरकामाची तऱ्हा आहे. "इतर स्त्रियांप्रमाणे माझे कोण-त्याच घरकामात लक्ष नाही. त्याची आवडही नाही. तेव्हा लग्न, संसार ह्या गोष्टी माझ्यासाठी नाहीत. त्यांना मी लायक नाही. इतर स्त्रियांपेक्षा निराळेच जीवन जगणार... अविवाहित राहून काहीतरी देशसेवा करणार. हे चाकोरीतील जीवन परमेश्वराने आपल्यासाठी निर्माण केलेलेच नाही." (४०) असे आपल्या आवडी-वरून ठरवितात. त्यांचा हा विचार आईला पटत नाही. ध्येयाला योग्य असा पुरुष मिळाला तर त्याच्याशी लग्न करीन असे त्या सांगतात. पटवर्धनांना निरखून, पारखून त्या पटवर्धनांशी लग्न करतात. आपले व्रत मात्र त्या ढळू देत नाहीत. लग्नबंधन हे केवळ नावापुरते राहून शिक्षण–संस्था हेच त्यांचे कार्यक्षेत्र ठरते. त्यातच त्या रमतात. वडील आणि मिळवती स्त्री या दृष्टिकोणातून त्यांना काही जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. शिक्षणाकडे गंगूबाईंचा लहानपणा-पासून ओढा. त्यांच्या शिक्षणामुळे घरात संघर्ष निर्माण होतात पण त्याकडे त्या कानाडोळा करतात. हिंगण्याचा महिलाश्रम, हुजूरपागा, मुंबईचे फ्री मिशन, चर्च हायस्कूल अशी अनेक ठिकाणी परिस्थिती येईल. त्याप्रमाणे राहून अखेरी जिद्दीने व चिकाटीने त्या हिंगण्याच्या आश्रमातून जी. ए. होतात.

कमलाबाई देशपांड्यांच्या सल्ल्यावरून हिंगण्यालाच काम करण्याचे ठरवि-तात. १९१९ साली महर्षी अण्णासाहेब कर्वे यांच्या भाषणाने प्रभावित होऊन, "अप्पांचा 'निष्काम कर्ममठाचा प्रयोग फसला असला तरी आपल्या जीवनात मी तो सफल करून दाखवीन अशी मी प्रतिज्ञा केली होती." (५७) असे त्या सांगतात. १९२० पासून हिंगण्याच्या महिलाश्रम स्कूलमध्ये काम करतात नि आपल्या कामाबद्दल चांगला शेरा मिळवितात. मुलींशी हळूवारपणाने वागतात. मुलींच्या रडण्याने त्यांचे अंतःकरण तुटते. मुलीला एकीकडे नेऊन, पाठीवरून प्रेमाने हात फिरवून चूक समजावून सांगतात. पुन्हा ती चूक न करण्याबद्दल बजाव-तात. पहिल्या चुकांची उजळणी करून कधीही हिणवत नाहीत. एका मुलीचा दोष दुसरीच्या कानापर्यंत जाऊ देत नाहीत. गंगूबाई पटवर्धन इंग्लंडला जाताना मुलींचे त्यांच्या गळ्यात पडून रडणे त्यांची मुलींशी असणारी प्रेमाची, चांगुल-पणाची वागणूक सिद्ध करण्यास पुरेसे आहे. साताऱ्याच्या कन्याशाळेत एक वर्ष

काम केल्यावर त्यांना परत हिंगण्याला यावे लागते. संस्थेसाठी काहीतरी नवीन केले पाहिजे या तळमळीने त्या गर्ल गाईडचे पथक नव्याने सुरू करतात. यावरून बाईंची आपल्या संस्थेवर विलक्षण श्रद्धा असल्याचे जाणवते. निष्ठा असल्याशिवाय काही नवीन करण्याची मनापासून इच्छा होत नाही.

इंग्लंडहून परत आल्यावर हिंगण्याच्या संस्थेत पटवर्धन व बाई या दोघांचे आजन्म सेवकत्व नाकारले जाते. कारण पतिपत्नींना आजन्म सेवकत्व देऊ नये असा त्यांचा नियम असतो. परंतु भास्करराव व कावेरी यांच्यावेळी या नियमाला मुरड घातली जाते. अधिक पगार द्यायलाही संस्था तयार नसते म्हणून शेवटी चीड येऊन त्या हिंगणे सोडतात. शिकविण्याची हौस पूर्ण व्हावी, अभ्यासाशी संबंध राहावा ही इच्छा आणि गरज म्हणून त्या एक खाजगी शिकवणी स्वीकारतात. सुशीलाला शिक्षणाची गोडी लावतात. त्यांना निरोप देताना या कुटुंबाच्या डोळ्यांत आलेले पाणी बाईंच्या कर्तव्यनिष्ठेचे, सुवर्तणुकीचे फळ वाटते. अनेक घडामोडी झाल्यातरी त्यांचे शिक्षणावरचे प्रेम, निष्ठा कमी होताना दिसत नाही. बडोदा संस्थानात ट्रेनिंग कॉलेजच्या प्रमुख म्हणून नेमणूक झाल्यावर गुजराथी येत नाही म्हणून त्या गुजराथी शिकतात. गुजराथीच्या परीक्षेला बसतात. आपले कार्य आपल्याला नीटपणे करता यावे यासाठीच त्यांची ही धडपड सुरू असते.

गंगूबाई तडफदार आहेत. स्वतःवर खोटेनाटे आरोप घेतलेले त्यांना बिलकूल खपत नाहीत. निकालापूर्वी मुलींना गुण सांगितल्याचा आरोप जेव्हा बाईंवर येतो तेव्हा त्या अधिकाऱ्यांना म्हणतात, " सूचना काढण्यापूर्वी, माझं नाव घेण्यापूर्वी मला बोलावून का विचारलं नाहीत ? मला असे भलते आरोप केलेले चालणार नाहीत." (२४९) वाङमय परिषदेच्या अध्यक्षपदासाठी ना. सी. फडक्यांना विचारण्यात येते तेव्हा त्यांनी दिलेला नकार, त्यांची उद्धटपणाची वर्तणूक त्यांनी धीटपणाने सांगितली आहे. आपण कर्जबाजारी असताना हिंगण्याच्या संस्थेने आपल्याला मदत केली नाही, बापूसाहेब आजन्म सेवक असूनही त्यांच्या मृत्यूनंतर आश्रम त्यांच्या मुलांना मदत करायला तयार होत नाही. हे संस्थेकडून झालेले अन्यायही त्यांनी निर्भीडपणे बोलून दाखवले आहेत.

नागपूरच्या प्रांतिक महिला परिषदेच्या अध्यक्षा म्हणून पटवर्धन बाईंचा गौरव केला जातो. बडोद्याच्या जिल्हा शिक्षण मंडळाचे ट्रेनिंग कॉलेज व प्राथमिक शाळा मंडळाचे, बडोदा नगरपालिकेचे सभासदत्व, ट्रेनिंग कॉलेजच्या आजीमाजी विद्यार्थिनींनी दिलेले मानपत्र त्यांच्या यशस्वी कारकिर्दीची निदर्शक आहेत. याच संदर्भात प्रस्तावनाकार ह. रा. दिवेकर म्हणतात, " लेखिकेचा पिंडच कार्यकर्त्रीचा आहे. उगाच विचारांचे जाळे विणीत बसणारीचा व त्यातच अडकून पडणारीचा

नाही." (२) गंगूबाई पटवर्धन प्रामुख्याने मनावर ठसा उमटवून जातात त्या 'चाकोरीबाहेर 'चे जीवन जगणाऱ्या म्हणून !

**'माझी कहाणी 'मधील विधवांची उन्नती हेच जीवनध्येय असलेल्या पार्वतीबाई**

विधवांची उन्नती करणे हे पार्वतीबाईंचे जीवनध्येय त्यांच्या बालपणापासून ठरलेले नाही. कोकणात देवरुखला जोशांच्या घराण्यात त्यांचा जन्म होतो. कोकणचे जन्मजात दारिद्र्य त्यांच्याही वाट्याला आलेले. " बायकांनी शिकावे की नाही याविषयी चर्चा देखील होत नसे. स्त्री–शिक्षणाचा प्रश्नच त्यावेळी फारसा उपस्थित झाला नव्हता. आम्हा लहान मुलींना पूजेची तयारी करता आली, तांदूळ कांडता येऊ लागले, उष्टे खरकटे काढता येऊ लागले, लहान मुलांना आंघोळ घालून त्यांची खाण्यापिण्याची व्यवस्था करता येऊ लागली म्हणजे आम्हाला मिळावयाचे ते सर्व शिक्षण मिळाले असा त्यावेळी समज होता." (२) एकोण-विसाव्या शतकात स्त्रीशिक्षणाचा प्रश्न असा अबोल असल्याने पार्वतीबाई अशि-क्षितच राहतात.

वयाच्या अकराव्या वर्षी त्यांना आठवल्यांचे पत्नीपद स्वीकारावे लागते. पायाने अधू असलेले आठवले पार्वतीला मनातून पसंत नसतात. पण आई-वडिलांच्या 'होकारा 'पुढे स्वतःचा नकार कळविण्याचे सामर्थ्य त्यांच्या ठिकाणी नसते. वयाच्या पंधराव्या वर्षी नानाचा जन्म होतो. विसाव्या वर्षी त्या विधवा होतात. त्या वयाच्या सव्वीसाव्या वर्षी वडील बहीण-बाया हिच्याकडे येतात. तिच्याकडे राहून शिक्षणास प्रारंभ करतात. पुढे आपले मतपरिवर्तन कसे होत गेले हे त्याच सांगतात. " देवरुखास असताना केशवपन हा एक धार्मिक आचार आहे व तो चालू ठेवणे धार्मिक विधी आहे असे मला वाटत असे. हिंगण्यास काम करू लागल्यावर देखील संस्थेतील एका सोवळ्या झालेल्या विधवेने जेव्हा आपले वेषांतर घडवून आणले तेव्हा तिने फार मोठे पाप केले असे मला वाटले... परंतु नंतर... केस वाढवि-ण्यासंबंधी आपणच आपले उदाहरण घालून द्यायला पाहिजे असे मला वाटू लागले. म्हणून लोकांच्या कुचेष्टा, तर्क–वितर्क व निंदा ह्याकडे लक्ष न देता १९१२ साली मी केस वाढविण्यास सुरुवात केली." (३१) परिस्थितीनुरूप पार्वतीबाईंमध्ये झालेले मतांतर यावरून कळते. याच सुमारास महर्षी अण्णासाहेब कर्वे हिंगण्याला विधवाश्रम काढतात. पार्वतीबाई स्वतःला विधवाश्रमाला वाहून घेतात. आश्रमाच्या आजन्म सेविका होतात. विधवांची उन्नती करणे हेच त्यांचे जीवनध्येय ठरते. त्यासाठी त्या ज्या समाजात वावरतात त्यातून त्यांचे चित्र 'माझी कहाणी 'त वाचायला मिळते ते असे.

आश्रमात वर्गणी गोळा करण्याचे काम पार्वतीबाईंच्या वाट्याला येते. खांड-व्याला वर्गणी गोळा करायला जाताना त्यांचा एकुलता एक मुलगा नाना १०५

डिग्रीपर्यंत तापाने फणफणलेला असतो. पण त्याला दुसऱ्यांजवळ सोपवून पार्वतीबाई वर्गणी मागायला जातात. मुलाचे आजारपण त्यांच्या कर्तव्याच्या आड येत नाही. यावरून पार्वतीबाईंना आपल्या कार्याविषयी असणारी कळकळ, त्यांची कार्यनिष्ठा आणि त्यांची निश्चयी वृत्ती दिसते. वर्गणी मागण्यासाठी वेगवेगळ्या ठिकाणी फिरावे लागत असे. त्यावेळी विधवांची दयनीय परिस्थिती त्यांच्या लक्षात येई. त्यांची हालाखीची परिस्थिती बघून पार्वतीबाईंचे हृदय तिळतीळ तुटे. विधवांची अवस्था लक्षात येण्यासाठी तीर्थक्षेत्रावरील विधवांची स्थिती त्या वाचकांसमोर मांडतात. " उडुपी येथे मध्वस्वामींच्या मठात विधवा आपला वेळ सकाळपासून संध्याकाळपर्यंत घालवतात ... विधवांना रात्री भोजन करण्याची परवानगी नाही. अंगावर वस्त्रही पुरते अंगभरून नसते ... आपली वपन केलेली डोकी संन्याशा-प्रमाणे उघडी टाकतात व फिरतात ... आरती झाल्यावर तेथे प्रसाद म्हणून फराळाकरिता ओंजळ ओंजळ खडीसाखर, लाह्या वगैरे त्यांना देण्यात येतात. हा प्रसाद घेऊन क्षेत्रातील ओल्यातच त्या खात बसतात, व तेथेच बहुतेक त्या निज-तात. रात्रीच्यावेळी संन्याशीही देवळात वस्तीला असतात ... क्षेत्रातून देवधर्म करीत हिंडणाऱ्या विधवांची स्थिती फार अनुकंपनीय आहे. त्यांना धड ना प्रपंच ना परमार्थ अशी स्थिती आहे. ... विधवाश्रमासारख्या संस्था स्थापन करण्याची जरुरी फार आढळून येत आहे." (२६) पार्वतीबाईंना विधवांबद्दल असणारी कणव, त्यांच्या समस्यांची खरीखुरी जाणीव, त्यांच्यासाठी काहीतरी करायला पाहिजे ही आंतरिक तळमळ यातून स्पष्ट होते.

पार्वतीबाई परदेशी वर्गणी मागायला जातात तेव्हा इंग्रजीचे ज्ञान नसल्याने पावलोपावली अडचण पडते. अधून मधून व्यवहारच खुंटतो. म्हणून इंग्रजी शिक-ण्यास सुरुवात करतात. त्या शिकत असताना आश्रमात गोळा होणारी वर्गणी कमी पडते. त्यावेळी, " एका माझ्यासारख्या काम करणाऱ्या स्त्रीचे इंग्रजी शिक्षण बुडून त्यामुळे पन्नास मुली जर इंग्रजी शिकत राहिल्या तर त्यात मुळीच वावगे होणार नाही." (३८) या विचाराने इंग्रजी वाढविण्याच्या नादी न लागता आश्रमासाठी मदत मिळविण्याच्या कामाला जोमाने सुरुवात करतात. आपल्या कर्तव्यापुढे ' स्व 'शिक्षणाचा त्याग करणाऱ्या बाई यातून दिसतात. आश्रमाच्या वर्गणीसाठी अमेरिकेला जातात तेव्हा, ' आता काय खावे, कोणीकडे जावे ' अशी स्थिती कित्ये-कदा त्यांच्यावर येते पण आपले कसे होईल या स्वार्थी विचाराने वर्गणीचे काम अर्धवट टाकून त्या येत नाहीत. तेथे गालिचे साफ करणे, कपबशा विसळणे, खिडक्यांची भिंगे पुसणे, झाडलोट करणे, लहान मुलांचे कपडे धुणे, पुस्तके विकणे यासारखी हलक्या दर्जाची कामे करतात. चिकाटीने वर्गणी गोळा करतात. विध-वांच्या शिक्षणास वर्गणी गोळा करण्याच्या कामाबद्दल बाईंना महिन्याला ठराविक वेतन दिले जात नाही. तर जेवून खाऊन फक्त अडीच रुपये हातखर्चासाठी म्हणून

मिळतात. त्याची त्यांना पर्वा वाटत नाही. किंबहुना हा विचारही कधी त्यांच्या मनात डोकावला नसेल ! त्या नेहमी कायावाचामनाने आश्रमाशी एकजीव झालेल्या दिसतात.

"गृहाला व कुटुंबाला नीट वळण व शिस्त लावण्याची जबाबदारी विवाहित स्त्रियांवर येऊन पडली आहे. स्त्रिया या देशातील भावी माता असल्यामुळे त्यांना संसारोपयोगी असे सर्व शिक्षण दिले पाहिजे." (९५) "स्वत: आईने आपल्या अंगी नियमितपणा व शिस्त आणल्यास घरातील मुलांच्या व चाकर-नोकरांच्या जीवनालाही चांगले वळण लागेल." (९६) "युरोपियन राहणीमधील स्वच्छता, टापटीप, गृहशिक्षण, गांभीर्य, इत्यादी चांगल्या गुणांचे अनुकरण होण्याऐवजी वरवरच्या फॅशनचेच अनुकरण सध्या आपल्या समाजात होत आहे." (९७) "खरी घाण घाणीचे काम करण्यात नसून, घाणीमध्ये राहणे हीच खरी घाण आहे." (९९) "विवाहाचे वेळी मुलींचे वय सोळा ते वीसपर्यंत व मुलांचे वय पंचवीस ते तीसपर्यंत असावे. ... ठराविक मर्यादेचे आत विवाह घडवून आणणे, हे गृहसौख्याचे दृष्टया अत्यंत श्रेयस्कर आहे." (१००) "स्त्री-शिक्षण-संस्थेत काम करणाऱ्या स्त्री-शिक्षकांवर पुरुष-शिक्षकांपेक्षा अधिक जबाबदारी येऊन पडते. मुली पुरुष-शिक्षकांपेक्षा स्त्री-शिक्षकांचे अधिक अनुकरण करतात, म्हणून विशेषत: स्त्री-शिक्षकांनी आपली वागणूक आदर्शवत ठेवून संस्थेत सर्व कामे शिस्तीने चालतील अशी काळजी घ्यावी." (१०३) समाजाच्या अभ्यासातून बाईंनी एकोणिसाव्या शतकात मांडलेले हे सामाजिक विचार आजच्या काळातही उपयुक्त ठरणारे, विचार करायला लावणारे आहेत.

हे सर्व विचार बाईंनी समाजसुधारकाच्या भूमिकेतून मांडलेले दिसतात. "पार्वतीबाईंच्या कहाणीत समाजसुधारणा करायला निघालेल्या स्त्रीची तळमळ दिसते."* हे वि. पां. दांडेकरांचे म्हणणे सयुक्तिक वाटते. विधवांची उन्नती हेच ध्येय मानलेल्या बाईंनी, स्त्रियांच्या व विशेषत: विधवांच्या उन्नतीसाठी खटपट करणाऱ्या सर्व बंधुभगिनींना आपली कहाणी अत्यंत प्रेमाने अर्पण केली आहे. ही अर्पणपत्रिकाही बाईंच्या ध्येय-प्रेरित व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकणारीच आहे. एकोणिसावे शतक म्हणजे स्त्रियांनी माजघरात वावरण्याचा काळ ! पण पार्वतीबाई धैर्याने माजघरातून बाहेर आल्या. समाजात वावरल्या. आपल्या ध्येयाच्या पूर्तीने एक ध्येयवादी आदर्श स्त्री म्हणून जगल्या.

**'निशिगंध' मधील देशभक्त मृणालिनी देसाई**

देशसेवा करणे हे मृणालिनी देसाई यांचे ध्येय. लहानपणापासून त्या देश-सेवेने भारलेल्या दिसतात. आपल्या ध्येयप्राप्तीसाठी त्याला अनुरूप अशा लोकां-

---

* वि. पां. दांडेकर, मराठी साहित्याची रूपरेषा, आ. २, बडोदे, १९६१; पृ. ५२८

मध्ये व परिस्थितीत मृणालिनीबाई वावरतात. 'निशिगंध' या त्यांच्या आत्मचरित्रातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे इतर काही पैलू पुसटपणे चित्रित होत असले तरी प्रामुख्याने 'देशसेवक,' 'देशभक्त' हेच मृणालिनीबाईंचे रूप आपल्या मनात घर करून राहते.

भारताच्या स्वातंत्र्याला आवश्यक असणारी स्वदेशीची चळवळ सुरू असते. तेव्हा या स्वदेशीच्या घोषणेने लहानशी मृणालिनी प्रेरित होते. 'स्वदेशी' म्हणजे काय हे कळण्याचेही तिचे वय नसते. नुकत्याच झालेल्या वाढ दिवसाला शिवलेला मऊ मऊ फुलाफुलांचा फ्रॉक ही जेमतेम तीन वर्षांची मृणालिनी परदेशी कपड्यांच्या होळीत जाळून मोकळी होते. त्या दिवसापासून खादीचा रखरखीत व जाडाभरडा फ्रॉक घालण्याचे व्रत घेते. बाहुला–बाहुलीच्या खेळात दंग होण्याचे हे वय पण असा जगावेगळा निर्णय मृणालिनी अंतःप्रेरणेने घेते. त्या दिवसापासून 'देशसेवा' हे तिचे ध्येय ठरते.

आपण पारतंत्र्यात आहोत हे मृणालिनीबाईंचे सतत ठणकते दुःख होय. आपल्या ध्येयासंबंधी त्या सांगतात, "... लहान असल्यापासून–ज्या दिवशी विलायती फ्रॉकची होळी केली त्या दिवसापासून मी देवाजवळ मागत होते–"देवा, मला मोठी होऊ दे. जेलमध्ये जाऊ दे. मग आम्हाला स्वराज्य दे. तोवर थांब !" (६८) देशाच्या स्वराज्यप्राप्तीत आपला थोडाफार तरी हातभार लागावा असे देशभक्त मृणालिनीबाईंना नेहमी वाटत राहते.

वाढत्या वयाबरोबर त्यांचा स्वराज्य–ध्यासही वाढत जातो. महात्मा गांधीजींची तत्त्वे त्यांना भारून टाकतात. गांधीजी त्यांना अतिशय पूज्य आणि आदरणीय वाटतात. गांधीजींच्या बरोबर राहता यावे, त्यांच्या दिव्यत्वाला जवळून न्याहाळता यावे, त्यांची अमृतवाणी कानावर पडावी म्हणून १९४२ च्या मे महिन्यात विदर्भातील जीवघेण्या उन्हाला न जुमानता बाई पुण्याहून सेवाग्रामला जातात. नुकत्याच मॅट्रीक झालेल्या बाईंचे हे वागणे त्यांचे गांधीप्रेम व पर्यायाने देशप्रेम दर्शविते गांधीजींचे कौतुकाचे चार शब्दही त्यांना पुरेसे वाटतात. "जगावेगळा मुत्सद्दी" (३५) या बिरुदाने त्या मोठ्या कौतुकाने गांधीजींना गौरवितात.

सरदार वल्लभभाई पटेल, पंडित नेहरू या थोर पुढाऱ्यांच्या व्याख्यानाने देसाईबाई अधिक जागृत होतात. त्यांचे ध्येय एकदम पेट घेते. "...असले मेलेले जिणे आम्हाला नको आहे. थोडे जगू पण एखाद्या पेटत्या ठिणगीसारखे जगू... सर्वस्वाचा होम करून हसत हसत मरणाला माळा घालू आम्ही." (३८) अशी शपथ आपल्या सहकाऱ्यांसह गुरुपौर्णिमेच्या दिवशी घेतली जाते. याठिकाणी त्यांचे स्वराज्य–प्रेम अधिक जोमाने उसळून आलेले दिसते.

मृणालिनी देसाई आपल्या सहकाऱ्यांसह कामाला लागतात. सरकारच्या भीतीमुळे सर्व कामे चूपचाप चाललेली असतात. "एक विराट जागा होत होता—आम्ही लाखो माणसे त्याच्यात सामावलो होतो—एकमेकांशी न बोलता एकजीव होऊन—प्रचंड कामे देखील चुटकीसरशी करणार होतो !" (४९) अशी सर्व देशभक्त मंडळी जीव ओतून आपापले काम करण्यात मग्न असतात. निरोप पोचविण्याचे काम यांच्या वाट्याला येते. वाटेतच त्यांना पोलीस पकडतो. तेव्हा प्रसंगावधानाने त्या चिठ्ठी गिळून टाकतात. ध्येयासाठी राखलेले प्रसंगावधान, बाळगलेली सावधगिरी यातून दिसते. मृणालिनीबाईंबरोबर काम करणाऱ्या मुलाची बोटे पोलिसाने पाय दिल्याने रक्तबंबाळ होतात. पण ध्येयापुढे स्वतःच्या चिरडलेल्या बोटांकडे लक्ष द्यायला त्याला वेळ नसतो. ध्येयाने भारलेले हे जीव ध्येयापुढे स्वतःच्या जीवाकडे पूर्णपणे दुर्लक्ष करताना दिसतात.

देसाई पकडल्या जातात. दहा दिवस त्यांना तुरुंगवास भोगावा लागतो. तुरुंगातून बाहेर पडल्यावर शिक्षण किंवा इतरत्र कशातच त्यांचे लक्ष लागत नाही. तुरुंग त्यांच्या डोळ्यांपुढून हलायला तयार होत नाही. आणखी तुरुंगवास घडला असता तर बरे झाले असते असे त्यांना राहून राहून वाटते. पुढे सरकारविरोधी चळवळीत पडल्याने दीड वर्षाचा कारावास त्यांच्या वाट्याला येतो. एकदा तर चोवीस तास उलटल्यावर त्यांना प्यायला पाणी मिळते. आलेली पत्रे काहींच्या चिटोऱ्या करून तर काही खोडखाड करून फक्त पत्राचा मायना आणि पत्र लिहिणाऱ्याची सही एवढाच मजकूर ठेवून वाचायला देतात. पत्र लिहिण्याची तर बंदीच असते. पत्र लिहिण्यास मिळत नाही म्हणून त्या आतल्या आत संतापतात. तडफडतात पण ओठांवाटे शब्द मात्र फुटू देत नाहीत. जेलमध्ये होत असलेल्या छळाचे वर्णन करतात; "... वळ उठू न देता कण्याचे मणके खिळखिळे करून माणसाला जन्मातून उठवता येते म्हणे. तशीच छळाची आगळी तऱ्हा या लोकांची होती. जोर, जुलूम. मारझोड, उपासतापास काही देखील बोट ठेवून दाखविता येण्यासारखे नव्हते—पण मोठ्या खुबीने मनाची उभारी तोडून सारे जिणे भकास, कडवट, अपेशी करून टाकण्याचे ते तंत्र प्रभावी होते खरे." (६९) मानवाला न शोभणारी क्रूर वागणूक त्या मुकाट्याने सहन करतात. कारण अचल ध्येयनिष्ठा. ती त्यांना गप्प बसायला लावते. हा अमानुष छळ सोसला जातो. तो केवळ देशप्रेमापोटीच ?

अखेरी ही सेवा फळते. १५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र होतो. गांधीजींच्या जयजयकाराने बाई उमलून येतात. पण उमलणे क्षणिक ठरते. भारत—पाक फाळणीच्या बातमीने त्यांचे मन कोमेजते तेवढ्यातच बापूजींच्या खुनाचा दुसरा हादरा बसतो. त्यांचे मन जीवाच्या आकांताने आक्रंदते. बापूजींनी दिलेली सुरी आणि त्यांचे पत्र एका पेटीत जपलेले असते. दुर्दैवाने घराला आग लागते

स्वत:ला जाळून घेऊन त्या ते पत्र सुखरूप मिळविण्याचा प्रयत्न करतात. पण हाती येते ती चिमटभर राख. तेव्हा विव्हल उद्गार बाहेर पडतात, "दैवत भंगलं की त्याचं विसर्जनच करून टाकायचं असतं!" (८९) मायेने जपलेल्या बापूजींच्या पत्राची ती चिमूटभर राख मृणालिनीबाई समुद्रात नेऊन टाकतात. हे ध्येय कोलमडलेल्या मृणालिनी देसायांना स्वत:चा टेकू देऊन उठवते ताठ करते. स्वत:च्या कर्तव्याची जाणीव करून देते. देशासाठी काहीतरी करायचे म्हणून त्या समाजसेवेला लागतात. गृहोद्योगाची जबाबदारी स्वीकारतात. त्यांच्यावर पैसे खाल्ल्याचा आरोप येतो. पण तरीही त्या खंबीर असतात. "प्राजक्ताचे झाड मुळापासून हलविले, झाडाला यातना झाल्या तरी हलविणाऱ्यावर फुलांची वृष्टीच होते." (११२) असे प्राजक्ताशी आपले नाते जोडतात. हे विचार जन्मलेत ते केवळ देशप्रीतीपायीच! अशा देशभक्त मृणालिनीबाई 'निशिगंध' या आत्मचरित्रात बघायला मिळतात.

**'जेव्हा माणूस जागा होतो' मधील साम्यवादाने भारलेल्या गोदावरी परुळेकर**

चारचौघांसारखे सामान्य जीवन व्यतीत करीत असताना कॉ. शामराव परुळेकर यांच्या कार्यामुळे ठाणे जिल्ह्यातील पालघर, डहाणू, उंबरगाव, टिटवाळा-वगैरे ठिकाणच्या वारली या आदिवासी जमातीशी गोदावरीबाईंची ओळख होते. आपली आणि त्यांची जात एकच–माणूस ही. पण त्यांच्या आणि आपल्या जीवनातील महदंतर पाहून त्यांना रशियन क्रांतिकारक कार्ल मार्क्स याचा साम्यवाद आठवतो. माणुसकीचा गहिवर येतो आणि या वारली जमातीतील 'माणूस जागा करणे' हे त्यांचे जीवन–ध्येय बनते. ध्येयसिद्धीसाठी गोदावरीबाईंना ज्या वातावरणात राहावे लागते, ज्या लोकांत वावरावे लागते त्यातून आणि त्यांच्या कार्यातून त्या चित्रित होतात.

एकेकाळी वारल्यांच्याच मालकीची असलेली जमीन जमीनदारांनी त्यांच्याकडून बळजबरीने हिसकावून घेतली आहे पूर्वीचा मालक वारली आज त्याच जमिनीवर वेठीने काम करतो जमीनदार आणि वारली यांच्या परिस्थितीत फार मोठा फरक त्यांना जाणवतो. त्या सांगतात, "एका बाजूला अन्नाला मोताद असलेली, अंगावर वस्त्र नाही, औषध नाही, शिक्षण नाही, कोणाचाही मार खावा, वेळप्रसंगी कोणी जीव घेतला तरी त्याची दाद ना फिर्याद अशी हजारो वारली शेतकऱ्यांची प्रजा होती, तर दुसऱ्या बाजूला चैनीने रुबाबात जीवन व्यतीत करीत असलेले मूठभर श्रीमंत जमीनदार होते." (३२) हृदय पिळवटून टाकणारे अत्याचार जमीनदारांकडून वारल्यांवर जाणीवपूर्वक केले जात असत. अत्याचाराविरुद्ध थोडी जरी तक्रार केली तर त्यांना चाबकाचा फटका ठरलेला असे. आदिवासी म्हणजे त्यांच्या हिशेबी फक्त एक ढोर. मुका! भावनाहीन! संवेदनारहित! वेठीला कामाला

आल्यावर दुपारी जेवायला तर सोडाच पण पाणी प्यायला देखील सुटी मिळत नसे. पाणी पिण्यास शेतातून बाहेर पडला तर, " सकाळी पाणी का पिऊन आला नाहीस ? ...कोणाचा हुकूम घेऊन शेताच्या बाहेर पाणी पिण्यास गेलास ?" (४३) अशा दरडावण्या मिळत. या गुन्ह्याची शिक्षा म्हणून नांगराचा एक बैल सोडून त्या जागी या गुन्हेगाराला जुंपण्यात येई. असा अघोरी शिक्षेचा प्रकार होता. तोही एक माणूस आहे, त्यालाही आपल्यासारखी तहान लागू शकते असा समंजस विचारच कधी होत नसे. आदिवासी निरक्षर ! त्याच्या निरक्षरतेचा फायदा घेऊन त्यांच्याकडून स्वतःला हव्या असलेल्या, वाटेल त्या कागदावर त्याचा अंगठा घेतला जाई. एकदा कोळशाची भट्टी बिघडली असताना शिक्षा म्हणून त्या वारल्याला जळत्या भट्टीत फेकले जाते. प्रसंगी जिवंत पुरण्याच्या शिक्षाही होत असत. बातमी कानोकान झाली तर हातपाय तोडण्याच्या धमक्या मिळत. डॉक्टरांकडून तपास झाला तर हाडे बैलाची आहेत असे सांगून मालक सहीसलामत मोकळा होई. एकापेक्षा एक भयंकर अशा पाशवी अत्याचाराने वारली गांजला होता. जमीनमालकांच्या तडाख्यातून वारल्यांच्या बायकासुद्धा सुटत नसत. बायकांच्या कुचंबणेला मर्यादा नव्हती. जमीनमालक त्यांच्या कुळाच्या किंवा गड्यांच्या बायका स्वतःची मालमत्ता म्हणून वापरत असत. जेथे पुरुष अन्यायाविरुद्ध तोंड उघडू शकत नव्हते तेथे स्त्रियांच्या बंडाचा प्रश्नच उपस्थित होत नव्हता.

जंगलाचे काम करणाऱ्यास सरकारकडून वेतन मिळे पण ते मधल्यामध्येच फस्त होई. आपली अवस्था वारली सांगतात, " बाई, जंगलाचं काम केल्याबद्दल एका फॉरेष्टानं आम्हाला पसापसा मीठ दिलं होतं." (४९) अशी त्यांच्या कष्टाची किंमत होती. गवत कापण्याची मजुरी आणा–दोन आणे नाहीतर गाडगेभर ताडी मिळत असे. वारल्यांची ही करुण अवस्था बाईंच्या हृदयाला पीळ पाडते. त्यांच्या कर्तृत्वाला आव्हान देते.

वारल्यांचे जेवण म्हणजे तांदळाची पेज, झाडाचा पाला व कडू कंद, हे होय. कधी कधी एवढे मिळणेही कठीण होई आणि उपास करावे लागत. ही वारल्यांची परिस्थिती पाहून गोदावरी बाईंमधला ' माणूस ' कळवळतो "... या नरकवासातून त्यांना सोडविण्यासाठी अप्रतिहत प्रयत्न करण्याची, त्यांच्यातील माणूस जागा करण्याची माझे पती कॉ. परुळेकर व मी आम्ही दोघांनी प्रतिज्ञा केली," (३१) असे त्या सांगतात. " त्यांच्यामध्ये ज्वालामुखी धगधगतो आहे. त्यांची शांतता ही ठिणगीवरची राख आहे. ती फुंकून टाकणे आपले काम आहे."(३७) हे बोल माणुसकीने पेटून उठलेल्या गोदावरीबाईंचे दर्शन घडवतात.

गोदावरीबाई वारल्यांना सर्व कायदे समजावून सांगतात. वेठ बेकायदा आहे. वेठ करायची नाही असे त्यांच्या मनावर बिंबवितात. त्यांना समान हक्कांसाठी

भांडण्यास शिकवितात. साम्यवादी भूमिका स्वीकारायला लावतात. वारंवार सभा घेऊन त्यांच्यावरील अन्यायाची त्यांना जाणीव करून देतात.

हे सर्व करीत असताना वाट्याला येईल त्या परिस्थितीत त्या राहतात. केव्हा केव्हा अंगावर धुळीचे लेपच्या लेप जमले असताना आंघोळीविना राहावे लागते. काजळीला केलेल्या आंघोळीविषयी त्या सांगतात, "मुबलक पाण्याने स्वच्छ अंग धुण्याच्या आशेने मी दोनतीन फर्लांग ज्यासाठी चालत गेले, ... तेथे होते एक पाणी साचून साचून हिरवेगार झालेले पाण्याचे डबके. ... त्या पाण्यावरचा तो हिरवा तवंग पाहून माझ्या डोळ्यात मात्र पाणी आले. ... माझ्या अंगावर शहारे आले. त्या पाण्याने अंग धुण्यास मन धजेना. ऐसपैस, स्वच्छ न्हाणीघरात वाटेल तेवढे कढत पाणी घेऊन मनसोक्त आंघोळ करणाऱ्या मला तेथे आंघोळ करायची म्हणजे अगदी जिवावर आले." (२२–२३) पण बाईंचे ध्येय लगेच त्यांना जागे करते. त्या आपले गतजीवन विसरतात. वारल्यांची कोंड्याची भाकरी खातात. आंबाड्याच्या भाजीचे आंबट, तिखट गरगट गोड करून घेतात, मिळेल तसा चहा आनंदाने घेतात. दगडावर, झाडाखाली, खडबडीत जमिनीवर जशी वेळ येईल तशा झोपतात. हा प्रत्येक प्रसंग ध्येयाने प्रेरित झालेल्या गोदावरीबाईंचे दर्शन घडवितो. कोठूनही वारल्यांच्या 'ये' (३७) म्हणून आलेल्या हाकेला आनंदाने दाद देतात. चटकन हाक मारल्याजागी त्या पोचतात. कधी घरी परतायला अपेक्षेपेक्षा होणाऱ्या वेळाने परुळेकरांची आठवण येऊन व्याकूळ होतात. अशावेळी "जीवनात ध्येयप्राप्तीसाठी साऱ्या भावना बाजूला साराव्या लागतात." (१२०) अशी त्यांचे ध्येयनिष्ठ मन त्यांची समजूत घालते.

केव्हा केव्हा फार त्रास झाला म्हणजे, "कशाला आपण या भानगडीत पडलो. मुंबईला राहून काम करता आले असते. पण ... ध्येयनिष्ठा पुन्हा मला ताळ्यावर आणून माझ्या जबाबदारीची जाणीव करून देई." (१२४) असे त्या लिहितात. त्या १९४६ ते १९४८ मध्ये हद्दपार होतात. १९४८ ते १९५१ पर्यंत भूमिगत होतात. १९५१ ते १९५३ पर्यंत कारावास भोगतात. वारल्यांमधील माणूस जागा करण्यासाठी सर्व सोसले जाते.

या प्रयत्नांनी हळूहळू आदिवासी जागा होतो. वेठ करणार नाही असे सांगतो. "खावटी देणार नाही" (७१) म्हणून कडक शब्दांत जमीनदाराला बजावतो. "मेला तरी भिणार नाही." (५६) असे ठणकावून म्हणतो. असा वारल्यांच्या मन:स्थितीचा नवा आविष्कार बाईंचे ध्येय घडवून आणतो. त्यांच्या प्रयत्नाने त्यांची अस्मिता जागी होऊन तो अंतर्बाह्य बदलतो. मी काही करू शकतो. मला माणूस म्हणून जगण्याचा हक्क आहे असे आत्मविश्वासाने सांगतो. धडपणे बोलता न येणारा आदिवासी व्यासपीठावरून व्याख्याने देतो. माणूस या नात्याने

न्याय मिळविण्याचा प्रयत्न करतो. गोदावरी परुळेकरांच्या वीस वर्षांच्या चळवळीचा हा परिणाम आहे. "हीच त्यांची व आमची आजची कमाई." (१५९) असे त्या ध्येयपूर्तीच्या आनंदाने सांगतात. परंतु लगेच "आपण केवळ निमित्त आहोत." (९९) असे त्या विनम्रतेने म्हणतात.

वारल्यांना जागे करणे या ध्येयाने भारलेल्या, साम्यवादावर गाढ श्रद्धा ठेवणाऱ्या, माणुसकीच्या गहिवरापोटी चिडून उठलेल्या, ध्येयापोटी स्वतःच्या रम्य गतजीवनाला विसरणाऱ्या, पतीच्या आठवणीने व्याकूळ होणाऱ्या अशा गोदावरी-बाईंच्या विविध रूपांचे दर्शन 'जेव्हा माणूस जागा होतो' मधून घडते. या सर्वां-तून बाई लक्षात राहतात त्या एक मानव म्हणून !

**'पण ऐकतं कोण ?' मधील कामगार चळवळीतील कार्यकर्त्या : उषाबाई डांगे**

उषाबाईंचा जन्म सनातनी भावे घराण्यातला. तत्कालीन सामाजिक रूढीला अनुसरून परकरी वयातच उषाबाईंचे लग्न होते. लग्नाबरोबरच त्यांच्या जीवना-तील आनंद पुसला जातो. एका पाठोपाठ अनेक दुःखे त्यांच्या वाट्याला येतात. या दुःखांचा कळस म्हणजे विसाव्या वर्षी त्या विधवा होतात. त्या आपली अवस्था सांगतात, "आयुष्याच्या रंगभूमीवर पहिल्याच प्रवेशात नाटकाचा अंत झाला होता. अनुभवण्यासारखे काही शिल्लक नव्हते. अश्रूंखेरीज गमावण्यासारखे काही उरले नव्हते. मला भविष्यकाळ दिसत नव्हता. भूतकाळाकडे वळूनही पाहायची ताकद उरली नव्हती. वर्तमानकाळ सांगत होता— तुझे जीवन संपले. त्या काळातील शेकडो हिंदू विधवांचे जीवन माझे 'जीवन' होणार होते. जीव आहे तोवर जिवंत राहा. अवहेलना, दुःख आणि हालअपेष्टांचा फेरा सुरू होणार होता. कधीही न संपणारा, न तुटणारा फेरा." (११) अशा केविलवाण्या अवस्थेत उषाबाई अस-ताना त्यांची बग्याशी गाठ पडते आणि त्यांच्या जीवनाचे रूपच बदलून जाते. ते निराळ्या दिशेने धावू लागते.

बग्याच्या इच्छेला मान देऊन सासरच्या आणि माहेरच्या लोकांच्या मर्जी-विरुद्ध त्या सेवासदनात दाखल होतात. तेथे सहावीपर्यंत शिक्षण घेऊन नंतर मुंबईला नर्सिंग कोर्स घेतात. रुग्णांची मन लावून सेवा करतात. १९२७ मध्ये बग्याशी— डांग्यांशी विवाहबद्ध होतात. येथपासून कामगारांच्या जीवनाशी त्यांचे जीवन सांधले जाते. "सारे ब्रह्म तेचि कामगार" (१६६) असे त्या आपल्या जीवनाचे वर्णन करतात अशी अवस्था होण्याचे कारण म्हणजे लग्न झाल्यावर बाई डींचे ध्येय तेच आपले ध्येय मानतात. यासंबंधी त्या लिहितात, "ज्या ध्येयप्राप्तीसाठी डी झटत होते त्याकरता सर्व सहन करण्याची माझी तयारी होती. गरिबांसाठी जीवाची पर्वा न करता झगडणाऱ्या डींना यश यावे हा एकच 'राग' मी पुढे जीवनभर आळविला." (३७)

कामगारांना कामावरून काढून टाकणे, त्यांच्याकडून जास्त काम करून घेणे व त्या तुलनेत रोजगार कमी देणे वगैरे कारणांसाठी कामगारवर्गाकडून संप पुकारले जातात. कामगारांवर होणाऱ्या या अन्यायांची चीड येऊन कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी त्या संपामध्ये भाग घेतात. 'बिटिया' मिलमधून काही स्त्री कामगारांना पूर्वसूचना न देता बेरोजगार करण्यात येते त्यावेळी त्या अतिशय संतापतात. इतर बायकांच्या मदतीने गिरणी–मालकाला घेराव घालतात. कामगार स्त्रियांना जागे करण्यासाठी चाळीचाळीतून व्याख्याने देतात. "ताई बोलणार आहे." (१६३) असा निरोप मिळताच स्त्रिया हातातील कामे टाकून भाषण ऐकायला येतात. यावरून कामगार स्त्रियांना असलेले उषाबाईंच्या व्याख्यानाचे महत्त्व कळते.

१९२९ मधील गिरण्यांच्या दुसऱ्या सार्वत्रिक संपात कामगारांवर घोडेस्वार सोडण्यात येतात. रोझाचा जन्म होऊन जेमतेम बारा दिवस लोटलेले असतात. त्यावेळी त्या आपली अवस्था सांगतात, "तो अन्याय पाहून माझी मी बदलून गेले. घरी येताच बारा दिवस लोटले न लोटले तोच संपाच्या पिकेटिंगसाठी गिरण्यांच्या दारावर जाऊ लागले. चाळीचाळीतून सभा घ्यायला लागले. ... मी सर्वांसाठी काम करीत होते आणि सर्व माझ्यासाठी झटत होते." (५४) स्वतःच्या जीवाची पर्वा न करता कामगारांसाठी वाटेल ते करण्याची बाईंची तयारी असते डींना चळवळीत भाग घेतल्याने अनेकदा तुरुंगात जावे लागते. परंतु त्या घाबरून जात नाही. याची साक्ष डींना जन्मठेपेची शिक्षा झाल्यावर उषाबाईंनी त्यांना दिलेल्या पुढील निरोपावरून पटते. "मी त्यांना पाहिले आणि सर्व शक्ती एकवटून मोठ्याने सांगितले, 'तुम्ही नीट राहा. मी घाबरलेली नाही माझी काळजी करू नका." (६५) उषाबाईंनी डींच्या ध्येयाशी सांधलेले एकजीवित्व, कामगारांसाठी कराव्या लागणाऱ्या कर्तव्याची त्यांना असलेली जाणीव यातून स्पष्ट होते.

डी तुरुंगात गेल्यावर बाईंचे विरोधक त्यांना मारण्याचा प्रयत्न करतात. उषाबाईंविरुद्ध अतिशय गलिच्छ व निंदानालस्तीची पत्रके काढून कामगारामध्ये वाटतात. चळवळीत भाग घेतलेल्या व युनियनच्या उपाध्यक्षपद सांभाळणाऱ्या उषा डांगे या सर्वांना धैर्याने तोंड देतात. कामगार चळवळींना वाहिलेले 'नवी क्रांती' हे साप्ताहिकही चालवितात. त्या कामगारांच्या कार्यासाठी कामगारांकडूनच फंड जमवितात. त्याबद्दल रेडबॅनरचा बहुमान त्यांना देण्यात येतो. त्यांनी कामगारांसाठी केलेल्या कार्यामुळे त्यांना परदेशी जाण्याचा सन्मान मिळतो. त्या अभिमानाने सांगतात, "१९५३ च्या मार्च महिन्यात जागतिक ट्रेड युनियन फेडरेशनतर्फे सोशल सिक्युरिटी या विषयावर काँग्रेस भरली. तिला जाण्याची संधी मला मिळाली... तेथे मला ए. आय. टी. यू. सी. ची प्रतिनिधी म्हणून

भाषण करावे लागले. भाषण मराठीतच लिहिले आणि वाचले... मला वाटते आंतरराष्ट्रीय परिषदेत मराठीत भाषण होण्याचा हा पहिलाच प्रसंग असावा." (२३२) एक सर्वसामान्य स्त्री आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर परदेशास जाते त्यामुळे वाचकांच्या मनातही त्यांच्या कर्तृत्वाबद्दल आदर निर्माण होतो.

कामगारांच्या चळवळीत भाग घेतल्याने त्यांना तुरुंगात जावे लागते. घरादाराचे पाश तोडावे लागतात. पण त्याबद्दल उषाताईंना दुःख किंवा खेद वाटत नाही. तुरुंगात गेल्याचे प्रसंग त्या अभिमानाने सांगतात. कामगारांसाठी आपल्याला काहीतरी करता आले या जाणिवेने त्यांना अतिशय आनंद होतो. त्या म्हणतात; "जीवनभर ज्याच्याबद्दल समाधान मानता येईल अशी कामगिरी माझ्या हातून करून घेतली म्हणून मी खरोखर स्वतःला धन्य समजते." (८५) कामगारांना न्याय मिळवून देणे हेच ध्येय असल्याने आपले जिणेही कामगारांसाठीच असल्याचे त्यांनी सांगितले आहे. कामगारांचे आपल्यावर असलेले ऋण त्या मान्य करतात. "भांडवलदारांशी लढत असताना कामगारांच्या बाजूने उभ्या राहणाऱ्यांना ते आपल्याशी एकरूप करून घेतात. मग तेथे ब्राह्मण–अब्राह्मण, मराठी-बिगर मराठी, असा भेद राहत नाही. तेथे सापडते ते निर्व्याज प्रेम व मानवतेची निष्ठा. हा अमूल्य ठेवा या कामगारांनी मला दिला अन् तो मी जन्मभर जतन करून ठेवला." (६१) डींच्या राजकारणामुळे त्यांना खाजगी जीवनच उरत नाही. त्यांचे जीवन कामगारांच्या जीवनाशी एकरूप होऊन जाते आणि त्यातच उषाबाईंना आपल्या जीवनाची कृतकृत्यता वाटते.

कन्या, पत्नी, विधवा, विद्यार्थी, परिचारिका, कामगार चळवळीतील कार्यकर्त्या अशा विविध रूपांतून बाई 'पण ऐकतं कोण ?' मधून प्रकटतात. परंतु आपल्या मनावर त्यांची व्यक्तिरेखा उमटून राहते ती कामगार चळवळीतील कार्यकर्त्या म्हणून !

**'हे गीत जीवनाचे' मधील समाजसेवक सुमतीबाई**

"भारतातील पहिली न्यायतीर्थ व काव्यतीर्थ विदुषी" म्हणून गौरविल्या गेलेल्या सुमतीबाई बालपणापासून रंजल्या गांजलेल्यांना मदतीचा हात पुढे करण्याच्या ध्येयाने प्रेरित झालेल्या आहेत. जाणत्या वयापासून विधवा, परित्यक्ता यांच्या दयनीय अवस्थेने सुमतीबाईंचे हृदय कळवळते. या स्त्रियांसाठी आपण काहीतरी केले पाहिजे या जाणिवेतून स्त्री–शिक्षण हेच सुमतीबाई आपले ध्येय मानतात. ध्येयपूर्तीसाठी जीवापाड श्रम करतात. शेवटी ध्येयप्राप्तीने आनंदून जातात. पुस्तकाच्या मुखपृष्ठावरील छायाचित्र याची साक्ष देते.

सुमतीबाईंचा वाण चारचौघींपेक्षा निराळा आहे. लहानपणापासून त्यांचे हे वेगळेपण प्रत्ययास येते. गरीब मैत्रिणींना पोटभर अन्न व अंगभर वस्त्र मिळत

नाही हे पाहून त्यांचा जीव कासावीस होतो. डोळे पाण्याने भरून येतात. त्या मैत्रिणींची करुणस्थिती पाहून, आई-वडिलांच्या नकळत घरातून मैत्रिणींना कपडे व खाद्यपदार्थ पुरवितात. "हे प्रभो ! तुझ्या परोपकारी, दयाळू नि क्षमाशील स्वभावाप्रमाणे माझ्यातही अशी शक्ती निर्माण कर की माझ्या हातून काही सत्कार्य घडावं ! तू सर्वत्र असतोस ना ? त्यांची सेवा म्हणजे पर्यायाने तुझीच ना रे सेवा ? मग अशांचीच सेवा मला करायची आहे. त्यासाठीच मला शक्ती हवीय. सामर्थ्य हवंय..." (२३) अशी परमेश्वराजवळ करुणा भाकतात. खेळण्या बागडण्याच्या या वयात सुमतीबाईंच्या मनात असे प्रौढ विचार येतात.

विधवा, परित्यक्ता स्त्रियांची केविलवाणी स्थिती पाहून त्यांच्या जीवनाची परवड थांबविण्यासाठी आपले उभे आयुष्य खर्ची पडले तरी चालेल पण हे सारे थांबायला पाहिजे. संपायला पाहिजे असे त्यांना वाटते. स्त्रियांच्या अनेक प्रकारच्या दुःखांच्या मुळाशी, निरक्षरता हे कारण असल्याचे त्यांना जाणवते. त्याकाळी बहुतेक मुलींना शाळेत घातले जात नसे. घातले तर त्यांना इंग्रजी शिक्षण द्यावे की नाही हा प्रश्न उपस्थित होत असे. लग्न लवकर होत असत म्हणून मधूनच मुलींना शाळेतून काढून घेत. "शिक्षण म्हणजे लग्नाची गाडी येईपर्यंत थांबावयाचे प्रतीक्षागृह !" (५६) अशी स्त्री-शिक्षणाची केविलवाणी अवस्था सुमतीबाई आपल्यासमोर उभी करतात. स्त्रियांसाठी काहीतरी भरीव कार्य केले पाहिजे. त्यासाठीच आपला जन्म आहे. चार-चौघींसारखे संसारी जीवन आपल्याला जगता येणार नाही याची त्यांना तीव्रतेने जाणीव होते नि स्त्री-कार्य हेच त्यांचे जीवनध्येय ठरते.

या ध्येयप्राप्तीसाठी त्या आपले जीवनच आखीव बनवितात. वयाच्या एकोणविसाव्या वर्षापासून सुमतीबाई ब्रह्मचर्यव्रत स्वीकारतात. तेव्हापासून एकवेळ जेवण, विहिरीचे पाणी, हातांनी दळलेले पीठ आणि शुद्ध तूप असा नियमबद्ध आहार घेतात. "त्याग नि व्रतवैकल्ये... भारतीय संस्कृतीची भूषणं आहेत... पाश्चात्यांना मोहीत करणारी. जगाला भुरळ पाडणारी !" (१०७) अशी भारतीय व्रते आणि त्यागपद्धतीची महती गातात.

१९५२ साली स्वतःचे शिक्षण संपवून 'भारत महिला शिक्षण मंडळा'ची स्थापना करतात. आश्रमासाठी वर्गणी गोळा करण्यास ठिकठिकाणी फिरतात. तेथील संस्थांना भेटी देतात. त्यांच्या व्यवस्थापनकार्याविषयी बारकाईने चौकशी करतात. हिंगण्याला असताना संस्थेचा कारभार सांभाळण्याबाबत महर्षी अण्णासाहेब कर्व्यांकडून सथा घेतात. "... आपण ज्या उद्दिष्टानं एखादी संस्था सुरू करतो, एखादे कठीण व्रत स्वीकारतो ... तेच ध्येय मानून त्याच्या परिपूर्तीसाठी एकनिष्ठेने आणि सातत्याने प्रयत्नशील असावयास पाहिजे. त्याच्यासाठी पडतील

तेवढे श्रम; घ्यावे लागेल तेवढे मोल देण्याची तयारी ठेवावी लागते. अशा प्रकारच्या निष्ठेनंच कुठलीही संस्था उन्नतीच्या दिशेने मार्गक्रमण करू शकते." (४५) हा राजरत्न कर्व्यांचा उपदेश बाई आपल्या हृदयावर कोरून ठेवतात. आपली संस्था जास्तीत जास्त चांगली करण्यासाठी त्या सतत प्रयत्नशील असतात.

'All sided development of personality is the aim of Education' हे शिक्षणाचे तत्त्व त्यांना पटते. पण ज्याची जशी कुवत असेल तसे त्याला शिक्षण द्यावे असे त्या सांगतात आणि या दृष्टीने आश्रमात दिले जाणारे शिक्षण त्या ठरवितात. आश्रमातील शिक्षणाविषयी त्या म्हणतात, "आश्रमाच्या शाळेत नुसतं पुस्तकी शिक्षणच दिलं जात नाही. मुलींना आवडणाऱ्या गोष्टीं-मार्फत त्यांना नीतीचे धडेही दिले जातात. धर्माविषयी देवादिकाविषयी त्यांच्या मनात आदर निर्माण केला जातो." (५६) सर्वसामान्य मुलींचा विचार करून अतिशय डोळसपणे सुमतीबाईंनी ठरविलेले हे शिक्षण वाटते. मुलींना शिक्षणाचे महत्त्व पटवून देऊन शहाबाई त्यांच्या मनात शिक्षणाविषयी ममत्व निर्माण करतात. त्यासाठी अनेक योजना आखतात. मुलींना मोफत शिक्षण देतात, त्यांची राहण्याची सोय व्हावी म्हणून वसतिगृह चालवितात. मुलींशी गोड बोलून प्रेमळपणाने त्यांच्या मनाचा अंदाज घेतात. त्यांच्या कुवतीनुसार त्यांना शिक्षण देतात. "रक्ताचा संबंध नसतानाही मातेसमान माया जी स्त्री मुलीला देऊ शकते तिचे प्रेम मातेहून महान नि मंगल होय. अशी माझी भावना आहे." (१३८) या अनुभवाने त्या मातेच्या ममतेने वागतात. पालकांचे मुलींना निर्धास्तपणे बाईंकडे सोपवून जाणे म्हणजे मुलींशी असणाऱ्या त्यांच्या प्रेमळ वागणुकीची साक्ष होय. मुलींचे हित पाहणारी ही आई आहे.

मुलींचे उध्वस्त जीवन आकाराला आणल्याबद्दल पालक कृतज्ञता दर्शवितात. मुलींना सांभाळताना त्यांना कधी कधी फार त्रास होतो. पण पालकांच्या कृतज्ञते-कडे लक्ष देऊन, "जाऊ दे ! ... माझ्या या झिजण्यातून जर अशी उत्फुल्ल जीवनं आकारास येणार असतील तर मी का वाईट वाटून घ्यावं ? खिन्न व्हावं ? इतरांना सुगंध देताना स्वतःचे अस्तित्व सरतंय याचा कधी उदबत्तीने विचार केलाय का ?" (६७) असा सुमतीबाईंच्या मनाचा मोठेपणा आहे.

संस्थेची उन्नती हेच सर्वस्व असल्याने स्वतःच्या आईचा मृत्यू झाला असतानाही संस्थेचा वार्षिक उत्सव आणि हिराचंद दोशी यांचा ऐंशीवा वाढदिवस त्या थाटाने साजरा करतात. त्या म्हणतात, "ज्यावर माणसाचे प्रभुत्व नाही, त्यासाठी माणसाने आपले मन इतके खचू देण्याचे कारण नाही." (९१) त्यांचे संयमी मन यातून दिसते. या निष्ठेने चालविलेल्या कार्यातून बाई 'पद्मश्री' ही पदवी मिळवितात आणि भारताचे भूषण ठरतात. आई–वडील, राजुलमती आत्या, गुरू–

शांतिसागर महाराज, महात्मा गांधी, विवेकानंद व महर्षी कर्वे या सर्वांचे ऋण त्या कृतज्ञतेने मान्य करतात... या यशाचे वाटेकरी त्यांचे सहकारी व हितचिंतकच होत, म्हणून हा गौरव केवळ त्यांचा नसून या सर्वांचा आहे असे त्यांना वाटते. श्रीमती सुमतीबाईंचे जीवन भर्तृहरीच्या "एके सत्पुरुषाः परार्थघटकाः स्वार्थ परित्यज्य ये" या सत्पुरुषांच्या व्याख्येचे चालते-बोलते उदाहरण आहे." (१) हा प्रस्तावनाकार अनंत गोविंद कुलकर्ण्यांचा अभिप्राय सार्थ वाटतो. अशी 'चंदनाचे परी त्वा झिजावे' ही रामदासी उक्ती साक्षात करणारे सुमतीबाईंचे चित्र 'हे गीत जीवनाचे !' मधून मिळते.

**'अश्वत्थाची फुले' मधील रुग्णसेवक प्रमिलाबाई भालेराव**

बालवयात लग्न झालेल्या प्रमिलाबाई भालेराव ह्या चार चौघींसारख्या सर्वसामान्य गृहिणी. परंतु अकाली बाईंची मुलगी कुमुद हिचा मृत्यू घडतो. आपल्या अज्ञानामुळे आपल्याकडून तिची सेवा नीट घडली नाही व त्यामुळे असा प्रसंग ओढवला असे त्यांना सारखे वाटत राहते. त्या सांगतात, "डोळसपणे वागून आपल्या चुका सुधारल्या पाहिजेत असं मला सारखं वाटू लागलं. लग्नापासून आठ वर्षांच्या काळात घरातील कोणाची ना कोणाची शुश्रूषा करण्यातच माझा वेळ गेला. थोडंफार जुजबी ज्ञानही लाभलं होतं. अशाच परिस्थितीत मी नर्सिंग कोर्स घ्यावा ही कल्पना सारखी मनात घोळू लागली." (४१) हे एक कारण. आणखी नांदेडमधील स्त्रियांच्या उपराचाची गैरसोय, आई-वडील व मोठा भाऊ यांच्याकडून सेवावृत्तीचे मिळालेले बाळकडू या सर्वांचा परिणाम होऊन प्रमिलाबाई परिचारिकेच्या शिक्षणाकडे वळतात. परिचारिकेची समाजास अत्यंत गरज आहे पण आजही समाज या व्यवसायाकडे आदराने पाहू शकत नाही. एक क्षुद्र व्यवसाय एवढीच समाजाच्या लेखी या व्यवसायाला किंमत आहे. आज ही परिस्थिती असताना प्रमिलाबाईंच्या वेळी एका ब्राह्मण स्त्रीने हा व्यवसाय स्वीकारावा ही कल्पनाच समाजाला रुचणारी नव्हती. परंतु प्रमिलाबाई समाजाकडे पूर्ण दुर्लक्ष करतात. परिचारिकेचे शिक्षण घेतात. स्वतःचे प्रसूतिगृह काढतात. रुग्णसेवा हाच त्यांचा जीवन-व्यवसाय होऊन बसतो. रुग्णसेवक प्रमिलाबाई 'अश्वत्थाची फुले' या आत्मचरित्रातून आपल्यासमोर साकारतात त्या अशा...

कुणाचीही निरलस सेवा करावी हा त्यांचा पिंड. रात्रीअपरात्री रुग्णाची हाक येताच त्याच्या सेवेला धावून जाणे, दवाखान्यात आलेल्या रुग्णांची काळजीपूर्वक देखभाल करणे या गोष्टी त्यांच्या निरलस सेवेच्या साक्ष म्हणून सांगता येतील. "तुम्ही आलात म्हणून मुलीला आराम पडला." (४०) "तुमच्याकडे आले की कसलीच काळजी वाटत नाही." (७७) हे रुग्णांचे उद्‌गार याची प्रचीती आणून देतात.

कोणतीही गोष्ट तिचे शास्त्रीयदृष्टया महत्त्व लक्षात घेऊन सर्वांना समजेल, पटेल अशा अत्यंत सोप्या पद्धतीने पटवून देण्याची त्यांची रीत आहे ऋतुमान पाहून मानवी आरोग्यास पोषक भाजीपाला–फळे वापरली जातात असे बाई वैद्यकीय चिकित्सेतून समजावून सांगतात. "चैत्र महिन्यात वसंत ऋतूनिमित्त हळदी–कुंकू समारंभ करून भिजविलेली हरभऱ्याची किंवा मुगाची डाळ प्रसादाच्या रूपानं वाटण्यात येते हरभऱ्याची उसळ, खरबूज, कैरी यांचा वापर केला जातो. ऋतुमान पाहून प्रचारात आलेली ही फळं व धान्यं शरीरास पुष्टिदायक होतात. वैशाखात लिंबाचे सरबत व गुलकंद वापरतात. ज्येष्ठात पावसाळा सुरू होतो. जांभूळ या फळाची सद्दी सुरू होते. हे फळ आरोग्यास फार चांगले आहे. ... आषाढ महिन्यात फळभाजी व पालेभाजी पुष्कळ मिळू लागते. मग त्यात नावीन्य निर्माण होतं. मक्याची कणसं, काकडया, मुळे, टोमॅटो, कांदे, लसूण, वांगी, दोडके, दूधभोपळा, पडवळ, कारली, पालक, मेथी, आंबटचुका, शेपू, करडई, अंबाडी, कोथिंबिरी, मिरची, आलं, लिंबू ... यांचा नवेपणा एक दोन महिने टिकतो ...नवे पाहुणे यावेत व जावेत त्याप्रमाणं नव्या नव्या भाज्या भेटण्यास येतात व जातात. आरोग्याला त्या साऱ्याच उपयुक्त असतात. ... कारलं कडू असलं तरी मसाल्याच्या चवीने गोड करून आई ते खाऊ घालते. त्यामुळं लिव्हरला पुष्टी मिळते. ... शेपूचा वास आपल्याला आवडत नाही. सारखे शेपूचे ढेकर येतात. पण शेपू वातहारक असते. पालेभाज्या रक्तशुद्धीसाठी फारच उपयुक्त असतात. कडधान्येदेखील शरीरवाढीसाठी व शरीर–रक्षणासाठी उत्तम असतात. ... श्रावण भाद्रपद महिन्यात पालेभाज्या व फळभाज्यांचा हंगाम खूप असतो. आश्विनात तो बदलतो. फ्लॉवर, मटार, ओला हरभरा, कोबी या भाज्यांची भर पडते. आवळे, बोरं, पेरू ही तुरट–गोड फळं कार्तिक मार्गशीर्ष महिन्यात मिळू लागतात. त्यावेळी ती त्या हवामानात शरीरास पोषक असतात." (५–६) आपल्या नित्यपरिचयाच्या परंतु आपल्याला महत्त्वहीन वाटणाऱ्या या गोष्टी आरोग्याच्या दृष्टीने किती मोलाच्या आहेत हे यावरून कळते.

लहान बाळाची रोज होणारी प्रगती आईच न्याहाळू शकते. आज हसायला लागले, उद्या पालथे पडायला लागले, हुंकार देऊन सरकायला लागले. आज सर्दी झाली त्यामुळे उद्या सुस्ती येईल वगैरे रोजचे बदल फक्त आईचीच नजर टिपते. आपल्या नित्याच्या व्यवसायातून बाईंनी केलेले हे संशोधन आहे. संशोधक प्रमिलाबाईंचे दर्शन आपल्याला यातून घडते.

फक्त खाऊन–पिऊन शरीर चांगले राहते असे नाही तर त्यासाठी मानसिक स्वास्थ्यही फार आवश्यक असते. मनःस्वास्थ्य नसले तर शरीराची काळजी घेण्यासाठी करण्यात येणारे बाह्योपचार व्यर्थ ठरतात. या मनःशांतीस आवश्यक असणाऱ्या काही बाबी त्यांनी समाजनिरीक्षणावरून मांडल्या आहेत. मनःस्वास्थ्य

बिघडविण्यास घराघरातून कारणभूत होणारे मतभेद पाहून प्रमिलाबाई म्हणतात, "प्रत्येक पिढीमध्ये काहीतरी नवं व निराळं असतं. ते समाजास तारक आहे की नाही याचा विचार होऊन त्याला उत्तेजन द्यावं की नाही हे समाजानं जरूर ठरवावं, परंतु 'आमच्या घरातली रीत अशी आहे आणि पुढंही असंच चाललं पाहिजे' हा दुराग्रह नसावा. "स्त्रियांमध्ये पुरुषांपेक्षा हा दुर्गुण फार दिसून येतो." (२९) परस्परांच्या विचारांची सांधेजोड न झाल्याने मनावर ताण पडतो. याचा परिणाम शरीरावर झाल्यावाचून राहत नाही. "सुशिक्षित म्हणजे ज्याच्या अंगी सुविचारानं वागण्याचा समजूतदारपणा आहे असा माणूस. पुष्कळ शिकलेला पण संकुचित विचारांचा, अहंमन्यता असणारा माणूस म्हणजे खऱ्या अर्थानं अज्ञच म्हणावा लागेल." (६६) आपल्या वडिलांचे हे विचार त्या हृदयावर कोरून ठेवतात व आपल्या आयुष्यात गिरवितात आणि वाचकांनाही सांगतात. अशा वागणुकीने मन:स्वास्थ्य बिघडणार नाही व त्याचा परिणाम आरोग्यावर होणार नाही ही त्यांची प्रेमळ मनीषा यामागे आहे. "मनाच्या गोंधळात सापडलेल्यांना योग्य मार्ग दाखवणं म्हणजेच धर्मानं वागणं व संस्कृती जाणणं." (६६)

कोणाचेही मन:स्वास्थ्य कोणाकडूनही बिघडविले जाऊ नये यासाठी, आचरणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण असलेल्या ह्या गोष्टी प्रमिलाबाईंनी सांगितलेल्या आहेत. रुग्णांच्या शरीराबरोबर त्यांच्या मनाचाही विचार करणाऱ्या प्रमिलाबाई भालेराव यातून स्पष्ट होतात. वैद्यकीय आणि मानसशास्त्रीय अशा दोन्ही दृष्टिकोणांतून ही त्यांची चिकित्सा होय. रोग्यांचा असा सर्वांगाने विचार करणारे रुग्णचिकित्सक दुर्मिळत्वानेच आढळतात. प्रमिलाबाई आपला ठसा वाचकांच्या मनावर उमटवून जातात तो या आपल्या वेगळ्या चिकित्सेमुळे.

## चित्रपट, नृत्य, नाटक व संगीतक्षेत्र

### 'जाऊ मी सिनेमात ?' मधील शांता आपटे

'जाऊ मी सिनेमात ?' या छोटयाशा आत्मचरित्रातून शांताबाई आपल्याला समजतात त्या अशा–

बहिणीच्या कोकीळ कंठाची बाबुरावांना शांताबाईंच्या– भावाला जाणीव होते. हिला शिकवले, वाव दिला तर चांगली तयार होईल. नावारूपाला येईल व जन्माचे सार्थक होईल हे विचार शांताबाईंपुढे मांडले जातात. गानकलेची सेवा करायची असा शांताबाईंचा मनोनिश्चय होतो. त्या तंबोऱ्याची हळद–कुंकू–फुले वाहून भक्तिभावाने पूजा करतात. असे गान–क्षेत्रात पाऊल ठेवून अथक परिश्रमाने उत्तम गायक अशी कीर्ती मिळवतात. कठोर परिश्रमाशिवाय कुठलीही कला सर्वांगाने प्राप्त होत नाही हे स्वत:च्या अनुभवावरून वाचकांना सांगतात. "कोणत्याही कलेत प्रावीण्य मिळविण्यासाठी खडतर तपश्चर्या करावी लागते. अतोनात परिश्रम

घ्यावे लागतात. ... रक्ताचे पाणी केल्याशिवाय कोणीही आपले ध्येय गाठू शकत नाही." (१०) ब्राह्मण कुमारिकेने आदबीने माजघरात राहावे, घराबाहेर पाऊल टाकू नये अशी समाजात चाल होती. जिथे घराबाहेर यायला समाजाकडून मज्जाव होत होता तेथे एका कुलीन ब्राह्मण कुमारिकेने गाण्याच्या क्षेत्रात पाऊल टाकणे म्हणजे समाजाच्या दृष्टीने ब्रह्मघोटाळा होता. परंतु बाईंची ध्येयप्राप्तीची जबरदस्त मनीषा या पारंपरिक चालीरीतींना धुडकावून लावते. समाजाच्या मोठ्या डोळ्यांचा रोष पत्करते. अचल निष्ठेने त्या ध्येय-प्राप्ती करतात.

'उत्कृष्ट गायक' हे नाव समाजात स्थिरावते. बाबूराव पेंढारकरांच्या सूचनेवरून अभिनयगुणाला आव्हान मिळते. पार्श्वगायनाची सोय उपलब्ध नसल्याने गायनकलेला पूरक अशी अभिनय कला साध्य करून चित्रपटसृष्टीत वावरण्याचे ध्येय त्यांच्यासमोर उभे राहते. यापूर्वी 'श्यामसुंदर' या मूकपटात शांताबाईंनी काम केले होते पण 'शांताला' 'संत सखूचेही काम करता येणार नाही' या टीकेने त्यांनी हा नाद सोडलेला असतो. पेंढारकरांच्या सूचनावजा विनंतीवरून त्यांची अपुरी मनीषा परत उचल खाते. उत्कृष्ट अभिनेत्री बनणे हे फार दिवसांपासून उराशी बाळगलेले ध्येय साकारण्यासाठी या मार्गात आड येणारे स्वतःचे शिक्षण इंग्रजी पाचवीत असताना त्या बंद करतात. यावरून त्यांची ध्येयप्राप्तीची अनावर ओढ लक्षात येते.

चित्रपटात त्या आपल्या भूमिकेशी समरसून काम करतात. तिच्याशी एकजीवित्व साधतात. या एकजीव होण्यासंबंधी त्या लिहितात, "मी माझे व्यक्तित्व घरी ठेवूनच स्टुडिओत पाय ठेवी." ध्येयप्राप्तीसाठी आळस, कंटाळा यासारख्या सहज मानवी वृत्ती त्यांनी त्यागल्या होत्या. 'कुंकू' या गाजलेल्या चित्रपटासंबंधी त्यांनी सांगितलेला प्रसंग यावर प्रकाश टाकणारा आहे. "कुंकू मधील एक प्रसंग माझ्या मनाप्रमाणे वटेना. माझे समाधानच होईना... मी घरी आले व माझ्या आईपुढे तो प्रसंग घडवून आणला. तेथे तो वठला... मगच तो प्रसंग स्टुडिओमध्ये पुन्हा चित्रित करण्यात आला." (८०) यावरून त्यांची ध्येयनिष्ठा, ते पूर्ण करण्यासाठी चाललेली धडपड व त्याकरता घेतले जाणारे जीवापाड परिश्रम जाणवतात. शरीरावर परिणाम होऊ नये म्हणून आपला आहार नियमित ठेवावा लागतो. रोज व्यायाम घ्यावा लागतो. अशा विविध यम-नियमांचे पालन करून त्या आपले ध्येय गाठतात. 'उत्तम गायक' आणि 'उत्कृष्ट अभिनेत्री' या बिरुदांनी विभूषित होतात. कीर्तीने त्यांचे नाव सर्वत्र दुमदुमू लागते.

याबरोबरच चित्रपटसृष्टीला कलावंतांची किंमत नाही असा तीव्र निराशेचा अनुभवही त्यांना येतो. परिणामतः चित्रपटसृष्टीलाच त्या उबगतात. या मायानगरीतील फसव्या जागा लोकांना उकलून धोक्याच्या जागा नीटपणे न्याहाळून

वाटयाला येईल तसे जीवन पदरात घेण्याची तयारी ठेवून लोकांनी सिनेमासृष्टीत जावे. भोळे–भाबडे जीव सिनेसृष्टीच्या दिखाऊपणाला भुलून बळी पडू नये म्हणून जीवाच्या कळवळ्याने त्या इतरांना सूचना देतात.

चित्रपटसृष्टीचे एकूण सात गट त्यांनी पाडले आहेत. (१) भांडवलवाले : स्वस्त दरात उत्तम माल कसा मिळेल याकडे त्यांचे लक्ष असते. (२) कंपन्या : कंपनी हे चित्रपटकलेचे हृदय पण त्या हृदयाचे काळीज उलटे आहे. (३) डिस्ट्रीब्यूटर्स : चित्रपट धंद्यातील हे दलाल. चित्रपट कंपन्यांना आपली नाके मुठीत धरून त्यांना शरण जावे लागते. (४) एक्झिबिटर्स : सिनेमा थिएटरांचे चालक व मालक लोकांनी चित्रपट बघावे म्हणून विविध प्रकारची आमिषे दाखवितात. (५) ॲडव्हर्टायजर्स : जो पैसा देईल त्याची टिमकी हे वाजवितात. वृत्तपत्रे काबीज करतात. खोटया, फसव्या जाहिराती छापून घेतात. (६) वर्कर्स : नट व इतर सहकारी या वर्गात येतात. दिग्दर्शक, संगीत दिग्दर्शक, छाया चित्रकार, ध्वनिलेखक हे नोकरवर्गात येतात. चित्रपटकथा लेखकांचाही यात समावेश होतो. पण त्यांच्या बुद्धीला व कर्तबगारीला मोल नाही. नट-नटयांना बटीक म्हणून वागविले जाते. क्षणात वर चढविले जाते तर क्षणात खाली आपटले जाते. मजुरांचा त्राता तर कोणीच नसतो. मुले, मुली शाळा सोडून, घरदार सोडून येथे येतात. पण त्यांची निव्वळ माती होते. त्या स्वतःच्या डोळयांनी निरखलेली अनेक उदाहरणे देतात. नटाला वागविण्याची रीत त्या सांगतात, " हे पहा मिस्टर, तुम्हाला यशस्वी नट व्हायचे असेल तर प्रथम तुम्ही स्वतःला विसरायचे, ही पहिली गोष्ट. आपले व्यक्तित्व विसरल्यावर जी भूमिका तुम्ही करणार असाल त्या भूमिकेशी समरस व्हायचे ... जे करायचे ते आम्ही सांगू त्याप्रमाणे करायचे ... आम्ही सांगितल्याप्रमाणे तुम्ही आपले काम वठविलेत की तुमचे कर्तव्य संपले." (५६) (७) जनता : " ... जनतेच्या आधारावर, श्रद्धेवर, पैशावर, सहानुभूतीवर सिनेमासृष्टीचा हा सर्व वरचा फुलोरा जगतो, पोसतो, प्रफुल्लित होतो व माजतोही ! " (३७) या बाबी बारकाव्यांसह सांगून चित्रमयजगताचे आंतररूप बाईंनी उकलून दाखविले आहे. अशी परिस्थिती असली तरी कोणी सिनेमात जाऊच नये असा सल्ला त्या देत नाहीत. लोकांचा निष्कारण बळी जाऊ नये म्हणून ह्या धोक्याच्या सूचना त्यांनी दिल्या. यशस्वी नट होण्यास नटाने काय करायला पाहिजे याचे मार्गदर्शनही त्या करतात. " अभ्यासपूर्वक व कर्तव्यबुद्धीने काम केल्यास व त्याला परिश्रमांची जोड दिल्यास कोणत्याही व कसल्याही परिस्थितीवर मात करता येते व आपला उत्कर्ष आपल्याला साधता येतो. यश जवळ येते व प्रसिद्धी हात धरून पाठीस लागते." (७९–८०) " चित्रपट सृष्टीतील एक कलोपासक म्हणून मला जो अल्पस्वल्प, बरावाईट अनुभव आला तो चित्रपटाचा

आडपडदा न ठेवता मी सर्वांच्या पुढे ठेवण्याचे ठरविले." (९०) असे आपले मनोगत त्यांनी व्यक्त केले आहे.

'गायक,' 'अभिनेत्री,' 'म्हणून जाऊ मी सिनेमात ?' मधून बाईंची प्रतिमा स्पष्ट होतेच पण त्यांना चित्रपट सृष्टीचा जो उबग आला आहे त्यातून 'एक माणूस' या नात्याने त्यांचे दर्शन घडते. कारण माणुसकीच्या गहिवरातूनच आपल्याला जाणवलेल्या चित्रपट सृष्टीतील दिखाऊ, खोटचा, फसव्या व बेगडी जागा त्यांनी उलगडून दाखविलेल्या आहेत. निष्पाप जीव या चित्रसृष्टीच्या मुखवटचाला बळी पडून त्यांच्या जीवनाचे वाटोळे होऊ नये ही त्यांची मनीषा माणुसकीतूनच जन्मलेली आहे. 'जाऊ मी सिनेमात ?' मधून गायक, अभिनेत्री आणि 'एक माणूस' अशी शांताबाई आपटे यांची प्रतिमा साकारली आहे.

**माझी नृत्यसाधना 'मधील नृत्यांगना रोहिणी भाटे**

"या नृत्याच्या उद्यानात प्रथम मी जी शिरले, ती अगदी सहज, तेथील नृत्यपुष्पांवर दृष्टी टाकली तीही सहज आणि त्यांच्या सुवासाने प्रथम मन भारले गेले तेही मनाच्या सहजधर्मानुसार ! मात्र काही काळ दुसऱ्यांमुळे का होईना तेथे वास करताच, तेथेच मन रमले ते इतके, की सूर्यास्त झाल्यावर, सायंछाया पडल्या- वर कमलदले मिटू लागली तरी रसास्वादाने गुंगलेल्या भृंगाला त्याची चाहूल न लागून तो आतच बंद होऊन राहावा, तद्वत माझा जीव गुदमरला तरी आता मन येथून तसूभरही हलणार नाही." (१२३–१२४) असे बाई सांगतात. नृत्यात अडकून नृत्य हेच त्यांचे ध्येय बनले. आपले ध्येय साध्य करीत असताना बाईंना जे विविध अनुभव आले ते 'माझी नृत्यसाधना 'मध्ये त्यांनी ग्रथित केलेले आहेत. त्यातून नृत्यवेडचा रोहिणीबाई आपल्या पुढे साकारतात.

पुस्तकाच्या प्रारंभी, नृत्यकलेपासून दूर असणाऱ्या वाचकांना नृत्यकलेची थोडीफार माहिती असली म्हणजे वाचताना नीरसता वाटणार नाही. म्हणून भगवान शंकराच्या हातातील डमरूपासून लेखनकालापर्यंत नृत्यकलेचा इतिहास सांगितला आहे. स्वतःच्या नृत्यकलेच्या आवडीतून त्यांनी ही अभ्यासपूर्ण माहिती वाचकांना पुरवलेली दिसते. आपल्याला जे आवडते ते दुसऱ्यांना सांगावे ही माण- साची सहजप्रवृत्ती यातून जाणवते.

मॅट्रिक झाल्यावर रोहिणीबाई नृत्य शिकायला लागतात. हेच त्यांचे नृत्य- क्षेत्रातील पहिले पाऊल होय. 'राजनर्तकी' हा नृत्यप्रधान बोलपट पाहून आल्या- वर आपली नृत्याची आवड अधिक जोमाने उफाळून आल्याचे त्या सांगतात. ही कला साध्य करण्यासाठी रोज घरी एक तास नृत्य करू लागतात. नृत्याच्या शिकवणीसाठी रोज पाच मैलांचे अंतर बस आणि पायपीट यांच्या साहाय्याने तुडवून दोन महिन्यात त्या बरीच नृत्यकला संपादन करतात. नृत्य अधिकाधिक

चांगले करण्यासाठी मुंबई पुण्याला होणारे कार्यक्रम जीवाचा आटापिटा करून बघतात. चांगले कार्यक्रम बघून आपल्या ध्येयप्राप्तीकडे वाटचाल करण्यास त्यांना स्फूर्ती आणि उत्साह मिळतो. नृत्यकलेत पारंगत होण्यासाठी परिश्रम घेणाऱ्या रोहिणीबाई या धडपडीतून साकारतात.

स्वतःला येणारे नृत्य दुसऱ्याला शिकविले की त्यालाही नृत्य येईल व आपले दोष कळून आपली प्रगती होईल या हेतूने त्या नृत्यवर्ग चालवितात. उत्तर हिंदुस्थानात नृत्यकलेची जेवढी प्रगती झाली होती तेवढी महाराष्ट्रात झाली नव्हती म्हणून पुणे हे ठिकाण नृत्यवर्गासाठी निवडतात. साडेतीन–चार वर्षे वयाच्या मुली नृत्य–वर्गात येत. अपुऱ्या वेळात या लहान लहान पोरींना त्यांच्या लहरीने, कलाने अगर त्यांच्या समजुतीने नृत्य शिकविण्याइतका धीर राखणे त्यांना फार त्रासदायक होई. खूपशा मुली कंटाळून निघून जात. असे या क्षेत्रातील आपले अपयशसुद्धा त्या प्रांजळपणे कबूल करतात. मोठ्या मुली मात्र चांगल्या तयार होत.

सोहनलाल यांनी दिलेल्या नृत्यविद्येच्या शिदोरीवर आपल्याला एवढी वाटचाल करता आली असे त्या कृतज्ञतेने भारावून सांगतात. त्याकाळी नृत्यकलेकडे आदराने पाहिले जात नसे. समाजाची नाराजी पत्करूनही रोहिणीबाई आपल्या विषयात पारंगत होतात. अनेक नृत्यप्रकार त्या स्वतः रचतात. नृत्य ही कला 'नाचणे' या शब्दात उपहासिली जाते तशी ती कला नसून, "नृत्य मग ते कथ्थक, कथाकली, भरतनाट्य अगर मणिपुरी यांपैकी अगर कोणत्याही पद्धतीचे असो, आपल्या हृदयात उत्पन्न होणाऱ्या भावनांना प्रत्यक्षात उतरविण्याचे, निराकार विचारांना साकार बनविण्याचे एक अत्यंत उच्च साधन आहे." (९८) असे नृत्याचे महत्त्व त्या वाचकांना पटवून देतात.

कथ्थक नृत्य हा त्यांचा विशेष आवडता प्रकार. हा नृत्यप्रकार म्हणजे सौंदर्यशोध आणि आनंदबोध असल्याचे त्या सांगतात. 'नृत्य' कला या ध्येयप्राप्तीसाठी अविरत परिश्रम घेणाऱ्या, त्या क्षेत्रातील आपले दोष प्रांजळपणे कबूल करणाऱ्या, आपल्या गुरूचे ऋण कृतज्ञतेने मान्य करणाऱ्या, नृत्यकलेचे महत्त्व व तिच्यापासून मिळणारा आनंद विशद करून सांगणाऱ्या नृत्यांगना रोहिणीबाईंची प्रतिमा 'माझी नृत्यसाधना' या आत्मचरित्रातून चित्रित होते.

**'स्वरवंदना'मधील कलाकार आणि गृहिणी ज्योत्स्नाबाई**

गोव्याच्या लावण्यमयी सृष्टीत जन्मलेली ही दुर्गा केळकर लहानपणापासून गानवेडी आहे. मोठ्या बहिणींच्या शिकवण्या ती एकचित्ताने ऐकते. याचे फलित म्हणजे बालवयात तिला 'यमन' रागासारखे राग सर्व बारकाव्यांसह गाता येतात. "कुणी गा म्हटलं की आमचा आ वासलेलाच" (२४) असे गाण्याच्या आवडीबद्दल त्यांनी सांगितले आहे. निसर्गदत्त देणगीला परिश्रमांची जोड लाभलेली

आहे. काळावेळाचे भान विसरून गाण्याचे धडे त्यांनी घेतलेले आहेत. प्रत्येक गाणे सामान्य जनतेने उचलून धरले आहे. गाण्याच्या बळावर त्यांना भारतदर्शन घडते. एवढेच नव्हे तर परदेशातसुद्धा जायला मिळते. सगळीकडे गाण्याचे भरपूर कौतुक होते. त्यांचे जीवनच संगीतमय होऊन जाते. त्या म्हणतात, "आमचा संसार हा सुरांच्या संगतीतच सुरू झाला आणि आजही त्या संसारात सुरांनीच सजावट केली आहे." (३१)

गायनक्षेत्राइतकेच नाटयक्षेत्रात ज्योत्स्नाबाईंनी अभिनेत्री म्हणून यश मिळविले आहे. 'कुलवधू' आणि 'आंधळयांची शाळा' ही त्यांची विशेष गाजलेली नाटके होत. 'कुलवधू'तील आपल्या यशाबद्दल त्या म्हणतात, "बालगंधर्व आणि 'एकच प्याल्या'तील सिंधू ही जशी आजही लोकांना अलग करता आलेली नाही, तसंच भानुमतीबद्दल माझं म्हणता येईल. भानुमती म्हणजे ज्योत्स्ना भोळेच ! दुसरं कुणाला भानुमती मानायला लोक तयारच नाहीत." (९१) सतत पंचवीस वर्षे ही भूमिका गाजते. 'आंधळयांची शाळा' हे ज्योत्स्नाबाईंचे लोकांनी विशेष उचलून धरलेले नाटक. या भूमिकांबद्दल त्यांचे रसिकांकडून उत्स्फूर्त कौतुक होते. पुण्याला 'आंधळयांच्या शाळेचा' प्रयोग असताना प्रेक्षकांनी तब्बल तीन तास पाहिलेली ज्योत्स्नाबाईंची वाट त्यांच्या लोकप्रियतेचे निदर्शक होय. या दोन्ही नाटकांतील अपूर्व यशाने त्यामागील परिश्रम ज्योत्स्नाबाई भरून पावतात. कोण-त्याही कामात आळस आणि दिरंगाई आपल्या रक्तातच नसल्याचे त्या सांगतात. त्यांचे हे गुण त्यांच्या अजोड यशास कारणीभूत ठरतात. "भाग्यवती" (६५) असा त्या आपला उल्लेख करतात. कलाकार या नात्याने कृतकृत्य झाल्याचा त्यांचा हा उद्‌गार वाटतो.

आपली कलाकाराची भूमिका त्यांनी जशी निष्ठेने सांभाळली आहे तितक्याच जागरूकतेने आणि कर्तव्यभावनेने गृहिणीपदही सांभाळलेले दिसते. स्वयंपाकघरात त्यांचे पूर्ण लक्ष आहे. केवळ लक्षच नव्हे तर केशवरावांच्या डब्यातील पदार्थ खाताना इतरांनी केलेले बाईंच्या पाककौशल्याचे कौतुक त्यांचे सुग्रणत्व पटविते. स्वतःच्या मातृपदाचीही त्यांना तेवढीच जाण दिसते. आपल्या कुठल्याही छंदामुळे मुलांचे हाल होऊ द्यायचे नाही हे त्यांनी स्वतःला घातलेले बंधन आहे. सुहासला ताप असताना त्यांचे पाय घरातून निघत नाहीत. "मी बाहेर पडले ... मन सुहासपाशी ठेवूनच ... प्रयोग संपला न घारीच्या वेगानं मी घरी धावले." (७१) घर आणि मुले सोडून दोन दिवसही दूर राहणे त्यांच्या जिवावर येते. त्यांनी उत्तम प्रकारे घेतलेली केशवरावांची काळजी त्यांना आपल्या पत्नीपदाचे असलेले भान दर्शविते. गाण्याचे कार्यक्रम करताना किंवा नाटकात काम करताना आपल्या गृहिणी-पदाला धक्का न लागू देण्याची त्या खबरदारी घेतात.

दुसऱ्यांना मदत करताना त्यांना आनंद वाटतो. त्यांचे मन विलक्षण संवेदनाक्षम आहे आपल्यावरच्या रागाने दादूने मरण ओढवून घेतले म्हणून त्या हळहळतात. त्याच्या आठवणीने व्याकूळ होतात. आपल्या जीवनात दोन्ही भूमिकांबद्दल दुर्मिळ असे अपूर्व यश मिळवूनही त्या अतिशय नम्र आहेत. "माझ्यासारखी चार–दोन वेळा लहानसहान कामं केलेली लोकांसमोर गायिलेली..." (४२) असे स्वतःबद्दल विनम्र उद्गार काढतात. महाराष्ट्र नाटयपरिषदेतर्फे जेव्हा त्यांना बालगंधर्व सुवर्णपदक मिळते तेव्हा त्या कृतज्ञतेने आपल्या यशाचे कारण असलेल्या गुरूंचा उल्लेख करतात. आपल्या या 'वेगळ्या' जीवनाची त्यांना जाण आहे. आपल्या दैवरेखा काही आगळ्याच आखलेल्या असाव्या असे त्यांना वाटते. "...माझ्या जीवनाचा कुणी अज्ञात सूत्रधार आहे. त्याची माझ्यावर बहाल मर्जी आहे आणि म्हणूनच माझ्या आयुष्याची आखणी तो मोठ्या जागरूकतेनं करतो आहे आणि त्या परिस्थितीला मिळतीजुळती माणसं आपोआप माझ्या जीवनात येताहेत." (१६२) असे त्या अभिमानाने सांगतात.

शैलजा राजे ज्योत्स्नाबाईंबद्दल म्हणतात, "बाई गायिका आहेत. बाई अभिनेत्री आहेत. बाई लेखिका आहेत. बाई–बाई सर्व काही आहेत. स्त्रीत्वाचे जे काही आदर्श गुण असतील ते सारे विधात्यानं बाईंना बहाल केलेले आहेत." (१६२) बाईंचे यशस्वी जीवन न्याहाळून शैलजाबाईंनी काढलेले हे उद्गार आहेत. प्रस्तावनाकार के. त्र्यं. दाते यांनीही बाईंच्या या यशाबद्दल कौतुक केले आहे. "कलावंत व गृहिणी या दोन्ही भूमिका सांभाळण्यात आपले रसिक कलावंत पती श्री. केशवराव यांचा मोठा भाग आहे यात शंकाच नाही. परंतु कलावंत पतीपेक्षा त्याच्या कलावंत स्त्रीची जबाबदारी दुप्पट असते व ती आपण सहज सांभाळत आहात." (प्रस्तावना) हे दात्यांचे म्हणणे ग्राह्य वाटते. ज्योत्स्नाबाई आठवणीत राहतात त्या दोन्ही भूमिकांतील अपूर्व यशानेच !

**'सांगत्ये ऐका' मधील एक असफल जीवन : हंसा वाडकर**

आपल्यापैकी बहुतेक सर्वांना हंसाबाईंची ओळख आहे ते जुन्या काळातील एक प्रसिद्ध नटी म्हणून ! त्यातही 'सांगत्ये ऐका' यासारख्या तमाशाची जातकुळी सांभाळणाऱ्या सिनेमात काम करणारी एक नटी म्हणून ! अशा प्रकारच्या नटयांकडे बघण्याची समाजाची नजर फारशी स्वच्छ नसते. बहुतेक ती दूषितच भासते. हा त्यांचा रंगरंगोटी केलेला मुखवटा आहे याचा समाजाला विसर पडलेला असतो. त्यांच्या मूळ चेहऱ्याचा विचारच कधी मनाला स्पर्शत नाही आणि या तुटपुंज्या भांडवलावर अनेक तर्ककुतर्क लढविले जातात. हंसाबाईंच्या बाबतीत बरेचसे असेच घडले.

हंसाबाईंच्या चेहऱ्याचे दर्शन घडते ते ' सांगत्ये ऐका ' ह्या त्यांच्या सोलीव प्रामाणिक आत्मचरित्रात. " चोवीश तास पिणारी बाई मी " (१०६) येथपासून हल्ली जपसुद्धा करते " (१०७) येथपर्यंतच्या जीवनप्रवासातली स्वतःची सुरूप कुरूप चित्रे त्यांनी उलगडून दाखविली आहेत. गायन, अभिनय, नृत्य, सेवावृत्ती, पाककौशल्य असे विपुल गुणवैभव वाट्याला येऊनही प्रत्यक्ष जीवनात मात्र हंसाबाई अयशस्वी झाल्या आहेत. आपल्या या अपयशाची कारणे त्यांनीच शोधली. आपले समग्र जीवन न्याहाळले ते एका तिऱ्हाइताच्या नजरेने !

लहानपणी मातीच्या चुलीच्या खेळात दंग होऊन जाणाऱ्या या बेबीला संसाराची विलक्षण आवड आहे. आवश्यक तेवढे शिकून चार चौघींसारखा साधा-सुधा संसार करावा हे तिने मनात जपलेले स्वप्न आहे. परंतु वडिलांच्या दारूच्या व्यसनापायी घरातील आर्थिक परिस्थिती बिकट होते. भावाच्या शिक्षणाचा प्रश्न सुटणे आवश्यक असते. " तुझ्यापेक्षा मोहनचे शिक्षण महत्त्वाचे आहे. तू काम कर म्हणजे मोहन तरी शिकेल." (३०) लहानग्या बेबीची आईकडून अशी मनधरणी सुरू होते. कारण कुटुंबाच्या भवितव्याच्या दृष्टीने भावाच्या शिक्षणाचा प्रश्न महत्त्वाचा असतो. घरची आर्थिक परिस्थिती सावरण्यासाठी ही दहा वर्षांची चिमुरडी बेबी सिनेक्षेत्राचा उंबरठा ओलांडते.

मामा वरेरकरांच्या इच्छेला मान देऊन सतत हसरा चेहरा म्हणून ' हंसा ' हे त्यांनी सुचविलेले नाव आपले पूर्वीचे ' रतन ' हे नाव टाकून त्या धारण करतात. एक ' नटी ' म्हणून समाजात वावरताना आपल्या बहिणीने साळगावकर हे आड-नाव लावणे भावाला पसंत पडत नाही. सिनेमात काम करताना बायजा आत्याने लावलेले ' वाडकर ' हेच आडनाव त्या लावतात. असा ' हंसा वाडकर ' या नावाचा हा इतिहास ' सांगत्ये ऐका 'मधून समजतो. या नावानेच तीस वर्षं त्या सिनेसृष्टीची मनोभावे सेवा करतात. या तीस वर्षांच्या अनुभवातून एक कलाकार म्हणून हंसाबाई आपल्यासमोर उभ्या राहतात त्या अशा–

कलाकार म्हणून चित्रपटात कोणतेही काम करायला त्यांना कमीपणा वाटत नाही. "एक आर्टिस्ट म्हणून कुठलंच काम स्वीकारण्यात मला कुठंच कमीपणा वाटत नाही. उलट आव्हान वाटते." (९८) कुठलेही काम बिनाकुरकुरीने स्वीकारणाऱ्या हंसाबाई यातून दिसतात. शुटिंगला वेळेवर पोचणे, संवाद नीट पाठ करून पुन्हः पुन्हा म्हणून पाहणे, हे त्यांनी स्वतःला घातलेले नियम त्यांची कर्तव्यनिष्ठा दर्शवितात. आपल्याला न समजणारे संवाद वडील कलाकारांकडून समजावून घेण्यात त्यांना अपमान वाटत नाही. आपले काम जास्तीत जास्त चांगले व्हावे ही सदिच्छा या परिश्रमांपाठीमागे दिसते. त्यांनी काम केलेल्या सिनेमांपैकी फक्त ' संतसखू ' सोडल्यास एकाही सिनेमाचे "चित्रीकरण

चालू असताना कोणत्याही प्रसंगाचा माझ्यामुळे रिटेक घ्यावा लागला नाही" (३९) असे सांगतात. यावरून त्यांचे जीव ओतून काम करणे लक्षात येते. 'रामजोशी' मधील बयेची भूमिका करताना नाच येत नाही म्हणून रात्रंदिवस मेहनत करून हंसा वाडकर नाच शिकतात. या गुणांमुळे लवकरच त्या लोकप्रिय होतात. चवदा वर्षे वय असताना त्यांचे नऊ–दहा चित्रपट पडद्यावर आले होते. एवढ्या लहान वयातील हे अफाट कर्तृत्व त्यांच्या अभिनयनैपुण्याचे, कर्तव्यनिष्ठेचे द्योतक म्हणावे लागेल !

'लग्नाची बेडी' या नाटकात त्यांनी सातशेवेळा केलेले रश्मीचे काम त्यांच्या नाट्यसृष्टीतील यशाची ग्वाही देते. पण या यशासाठी त्यांनी अविरत प्रयत्नही केले आहेत. आपल्या यशाने त्या कधीही हुरळून जात नाहीत. स्वर्गात पोचलो असे त्यांना कधी वाटत नाही. आपल्याला तर सर्व येते. आता काय शिकायचे बाकी आहे अशी त्या कधी स्वतःची समजूत करून घेत नाहीत. "कला कधी पूर्णत्वाला पोचते कां ?" (१३३) असे त्यांच्यातील विनम्र कलाकाराचे बोलणे आहे. "कलेशी बेइमानी केली नाही. जे केले ते कलेची आब राखून." (१११) हे त्यांचे बोल त्यांच्यातील हाडाच्या कलाकाराचे दर्शन घडवतात.

'प्रभात'मध्ये त्यांनी काम केलेले आहे. प्रभातबद्दल त्यांना फार अभिमान आहे. अलीकडे 'प्रभात'ला 'शाळा' म्हणून जे हिणवले जाते ते त्यांना आवडत नाही. प्रभातचे घरगुती वातावरण, प्रभातची शिस्त त्यांना अजोड वाटते. एक दिग्दर्शक म्हणून अण्णांबद्दल त्यांना फार कौतुक आहे. "अण्णांसारखे अण्णाच" (६२) या शब्दात दिग्दर्शनाबद्दल त्या गौरवोद्गार काढतात. हिमांशु रॉय, राजाभाऊ नेने, बाबूराव पेंढारकर वगैरे गुणी माणसांबद्दल त्यांना अतिशय आदर आहे. त्यांना त्या खाली वाकून आदबीने नमस्कार करतात. "कोणीही मोठा माणूस दिसला की, आदराने त्यांच्या पायाला हात लावून नमस्कार करण्याची लहानपणापासून माझी सवय होती." (५३) गुणांपुढे नम्र होण्याचे बाळकडू त्यांना बालवयापासून मिळालेले दिसते. स्टुडिओमधील बाईंबरोबर काम करणाऱ्या मुली त्यांच्या नाजूक अवस्थेत त्यांना प्रेमाने सांभाळतात. त्यांचे ऋण हंसा वाडकर कृतज्ञतेने मान्य करतात. या सर्वांतून एक यशस्वी कलाकार म्हणून बाईंची प्रतिमा आपल्यासमोर उभी राहते.

इकडे हे यशस्वी कलाजीवन वाट्याला आलेले असले तरी संसारी जीवनात मात्र त्यांची फरपट होताना दिसते. उगीचच्याउगीच त्यांच्यावर कोणी संशय घेतलेला त्यांना आवडत नाही. बंदरकरांच्या 'ड्रॅमॅटिक युनियन' या नाटक कंपनीत काम करताना बंदरकरांशी त्यांचा वारंवार संबंध येतो. लहानपणी जरी बाईंनी त्यांच्याशी लग्न करण्याची शपथ घेतली असली तरी अद्याप मैत्रीचे संबंध कायम

असतात. पुढचे पाऊल कुणाकडूनही उचलले जात नाही. पण या मैत्रीचा आईला भलताच संशय येतो. ती हंसाबाईंना सारखे घालून पाडून बोलते. शेवटी चिडून जाऊन पत्रिका जमत नसतानाही, कुंडलीचा कौल नसतानाही त्या बंदरकरांशी विवाहबद्ध होतात. बंदरकर दुसऱ्यांच्या सांगण्यावरून त्यांच्या चारित्र्याबद्दल शंका घेतात. तेव्हा ह्या तडकतात. 'पोर्टवाईन'च्या बाटल्यांची सोबत स्वीकारतात. पोटची मुले आपली नाहीत या हेक्याने बंदरकरांनी निर्दयपणाने हिरावून घेतलेले त्यांचे मातृत्व त्यांना धुळीस मिळविते. ज्या गोष्टी आजपर्यंत कधी केल्या नव्हत्या त्या जगावर सूड उगविण्यासाठी हंसाबाई करतात. त्यापायी आपल्या जीवनाची राख करून बसतात आणि शेवटी "मीच अधिकाधिक खोलात गेले. जगाला काहीही झालं नाही." (१०६) असे उदास पश्चात्तापाने सांगतात. आपणच आपल्या पायांवर धोंडा पाडून घेतल्याची त्यांनी दिलेली ही कबुली आहे.

सूड उगवण्याच्या भावनेने त्या बेतालपणे वागतात. पण त्या क्षणाची धुंद ओसरल्यावर आपल्या वागणुकीची त्या निर्भर्त्सना करतात. स्वतःचा गेलेला तोल पुनः पुन्हा सावरण्याचा प्रयत्न करतात. तुटलेले धागे कसोशीने जुळविण्याचा प्रयत्न करतात. परंतु बिचाऱ्या दुर्दैवी हंसाबाईंना यातले काहीच साधत नाही. त्यांना सिनेमा रात्री बघायला आवडतो तर बंदरकरांना दुपारी. यासारख्या अगदीच क्षुल्लक कारणांवरून त्यांची क्षणोक्षणी भांडणे होतात. रेखाच्या जन्मानंतर रेखाला बघायला, तिच्या पाचवीला, बारशाला कुणीच येत नाही. त्यांना हा आपल्या मातृत्वाचा अपमान वाटतो. प्रयत्न करून भरण्याचा घाट घातलेली जखम अशी पुनः पुन्हा चिघळत जाते. हंसाबाई एकेचाळीस दिवसांच्या मुदतीच्या तापातून उठल्यावर 'घरची मंडळी' त्यांच्या नकळत सिनेमाशी करार करते. त्यांना बाईंच्या प्रकृतीची काळजी नसते. त्यांना हवा असतो फक्त पैसा. माणसाची किंमत वाढवायला त्याचा पैसा कारणीभूत ठरतो याची त्यांना जाणीव होते. रात्री बारा–एक वाजता शूटिंग करून आल्यावर वडिलांच्या मृत्यूनंतर 'जेऊन घे व झोप' अशा माणुसकीच्या शब्दालाही त्या पारख्या होतात आणि शेवटी बंदरकर सांगतील त्याप्रमाणे वागणे आपल्याला जमणार नाही म्हणून बंदरकरांचे घर सोडतात.

त्या [१] राजन जावळेकडे येतात. जुने आयुष्य झुगारून देतात. जुन्या सवयी सोडतात. दारू तर जाऊच द्या पण कांदा–लसूण या रोजच्या जेवणातील तामसी पुगुलाचाही त्याग करतात. राजनशी लग्न करतात. त्यांच्या मुलीची आजारपणात मायेने सेवा करतात. सासूबाईंना प्रेमाने सांभाळतात. साधेसुधे जीवन जगण्याचे आपले स्वप्न पुरे करण्याचा प्रयत्न करतात. "हंसा फार गुणी होती." [१]

[१] राजन जावळे, माझ्या जीवनातील हंसा, अपर्णा, दिवाळी अंक, १९७६, पृ. ९२

हा राजन् जावळेने हंसाबाईंच्या सहवासावरून काढलेला निष्कर्ष बरेच काही सांगून जातो.

बंदरकर वाईट वागतात पण त्यांचे गुण कबूल करण्याइतके मोठे मन हंसाबाईजवळ आहे. "एवढं झालं तरी माझा बंदरकरांवर विश्वास आहे. माझ्या वयाच्या सहाव्या वर्षापासून ते मला ओळखतात. नाही पटलं माणसाचं संसारात म्हणून तो मनुष्य वाईट आहे असं नाही. आमचे धागे जुळू शकले नाहीत एवढंच. ते मला समजू शकले नाही. कदाचित मी त्यांना समजू शकले नसेन. हिला बरं वाटतं ना मग राहू द्या. अशी त्यांची वृत्ती आहे. ... जरी त्यांना कळलं मी दुःखात आहे, संकटात आहे तर माझ्यासाठी प्रत्यक्षपणे, अप्रत्यक्षपणे ते धावून येतील." (१६९) आपला संसार अयशस्वी झाला तरी त्याचे खापर त्या सर्वस्वी बंदरकरांच्या माथ्यावर फोडीत नाहीत. आपलाही दोष असू शकेल असे त्या मान्य करतात.

त्या वेगळ्या राहतात. व्यसनांवर मात करायलाही शिकतात. पण आपल्या जीवनाबद्दल त्या उदास आहेत. "कलेची सेवा केल्याचे समाधान लाभतं खरं पण त्यापेक्षा दुःखच फार टोचणी देतात." (११५) त्यांच्या असफल जीवनाची ही बोच आहे.

सिनेमाक्षेत्रातील काळ्या बाजूही त्या उकलून दाखवितात. सिनेमाक्षेत्रात एकदा उतरलेला माणूस परत फिरू म्हटले तरी बाहेर पडू शकत नाही तर अधिकाधिक फसत जातो, गुरफटत राहतो. या चित्रनगरीचीच ही किमया आहे असे स्वानुभवावरून सांगतात. "कुठलीही स्त्री त्या लाईनमध्ये आणा. अगदी सती सावित्रीसारख्या पतिव्रतेलादेखील आणा, ती आहे तशी राहूच शकत नाही. पातिव्रत्य, घरगुती वातावरण आणि ही लाईन कधी एकत्र येऊच शकणार नाही." (११४) असे त्या पटवून सांगतात. सुखाने संसार करायचा असेल तर या लाईनकडे ढुंकूनही बघू नका असा मुलींना सल्ला देतात. आजकालचे कलाकार मन लावून काम करीत नाहीत. त्यामुळे चित्रपट अयशस्वी होतात असे त्या ठामपणे लिहितात.

एक यशस्वी कलाकार पण अयशस्वी गृहिणी आणि माणूस या नात्याने सिनेक्षेत्रातील धोक्याच्या सूचना देणाऱ्या अशी हंसाबाईंची प्रतिमा 'सांगत्ये ऐका' मधून मिळते. हंसाबाई आपल्या लक्षात राहतात त्या असफल जीवनामुळेच !

### 'स्नेहांकिता' मधील एक विस्कटलेले जीवन : स्नेहप्रभा प्रधान

स्नेहप्रभा प्रधान लहानपणापासून डॉक्टर होण्याचे स्वप्न उराशी बाळगून आहेत. गायन, अभिनय, चित्रकला, रंगकाम, शिवण वगैरे विविध कलाही त्यांना अवगत आहेत. असे विपुल गुणवैभव वाट्याला येऊनही नियतीकडून त्यांचे जीवन

सदा विस्कटले जाते. या विस्कटलेपणातून अनेक चिरदुःखे त्यांच्या वाट्याला येतात. 'स्नेहांकिता' मधून त्यांचे विस्कटलेपण प्रत्ययास येते ते असे–

तन–मन–धनाने शैक्षणिक क्षेत्रास वाहून घेतलेल्या सुशिक्षित आणि सुसंस्कृत आईवडिलांच्या पोटी स्नेहप्रभाबाईंचा जन्म होतो. अशा परिस्थितीत त्यांचे बालपण सुखासमाधानाने जायला पाहिजे अशी कुणाचीही अपेक्षा असणे सहज आहे. परंतु वाटयाला आलेली सावत्र भावंडे, त्यांच्या आणि प्रधानबाईंच्या वयात असणारे बरेच अंतर त्यामुळे बरेचसे पोरकेपण त्यांच्या वाटयाला येते. आपले बालपण त्या उलगडून सांगतात, "माझ्यात आणि माझ्या सावत्र भाऊबहिणींत वयाचे बरेच अंतर आहे. तेव्हा मी सर्वच बाजूंनी एकाकी होते. माझ्या वयाचे आसपासही घरात कुणी नव्हते... मुळातच अती भावनाशील असल्यामुळे मला घरातील विशिष्ट वातावरण जाचत असे. माझ्या वाटयाला वडील कधी विशेष आलेच नाहीत, त्यामुळे इतर मुलांप्रमाणे मला खऱ्या अर्थाने सुख मिळाले नाही." (६) असे बालपणापासूनच काही ना काही कारण घडून बाईंचे जीवन विस्कटले जाते.

डॉक्टर व्हावे, जीव ओतून रोग्यांची सेवा करावी, ही स्नेहप्रभा प्रधान यांनी लहानपणापासून बाळगलेली महत्त्वाकांक्षा. लहानपणी चुलीतील राखेच्या पुड्या घरातील आजाऱ्यांना देण्यावरून त्यांच्या जबरदस्त महत्त्वाकांक्षेची आपल्याला कल्पना येते. कॉलेजमध्ये असताना इतर डॉक्टरांचे ऑपरेशन्स त्या एकाग्र चित्ताने पाहतात. खरे रोगी बघण्याचे, तपासण्याचे आणि त्यांना औषधे देण्याचे दिवस जवळ येतात, थोड्याच दिवसात मालकीचा स्टेथॉस्कोप गळ्यात पडणार असतो पण ही सुरळीत चाललेली जीवन–घडी नियतीकडून अस्ताव्यस्त केली जाते.

अकाली झालेला वडिलांचा मृत्यू, आईला जडलेली संधिवाताची व्याधी, तिच्यावर असलेली बहीण–भावांच्या शिक्षणाची जबाबदारी, स्नेहप्रभाबाईंचा मेडिकल कॉलेजचा खर्च ह्या सर्व समस्या एकाचवेळी 'आ' वासून बसतात. वाट्याला आलेल्या या बिकट परिस्थितीमुळे मेडिकलची वाट त्यांना नाइलाजास्तव सोडून द्यावी लागते. चित्रपटात काम करण्यासाठी त्या करारनाम्यावर सही करतात. लहानपणापासून उराशी बाळगलेले स्वप्न नियती क्षणार्धात पुसून टाकते, हातातोंडाशी आलेला घास असा हिसकला जातो.

चित्रपटसृष्टी हे त्यांच्या आयुष्यातील नवे पर्व सुरू होते. वाटयाला आलेल्या भूमिकेशी एकरूप होऊन काम करणाऱ्या स्नेहप्रभाबाईंना या क्षेत्रात तरी सुखसमाधान लाभत असेल असे दुरून पाहणाऱ्याला वाटते. पण त्यांच्याबरोबर वाचकही याठिकाणी हताश होतात. १९३९ साली या नवीन जीवनाला सुरुवात होऊन १९५० पर्यंत हे जीवन चालू असते. संधिवाताच्या दीर्घ आजारात आईचा

मृत्यू होतो. मनुष्य एकदा चार पैसे मिळवून स्वतःची जबाबदारी पेलण्यास समर्थ ठरला की, साऱ्यांनाच स्वतःवरची जबाबदारी टाळण्यापुरता तो समृद्ध वाटतो. येथेही हेच घडते. आप्तेष्ट सोयीस्करपणे त्यांच्याकडे कानाडोळा करतात. माणसाला कोणत्याही वयात, रक्ताच्या–बिनरक्ताच्या माणसांकडून हव्या असणाऱ्या मायेला–प्रेमाला त्या मुकतात. वाटयाला एकाकीपण येते. या काळातील त्यांचे खाजगी जीवन असे वाळवंटी बनते.

अभिनयकुशलता, कर्तव्यनिष्ठा त्यांना अमाप लोकप्रियता मिळवून देते. दौऱ्यात विश्रांतीसाठी स्वतंत्र खोली, विनतिखटी, शाकाहारी जेवण या त्यांना हव्या असलेल्या सोयी केल्या जातात, पण हे सुख क्षणिक ठरते. सुखापेक्षा दुःखेच जास्त टोचणी देतात. बाहेरचे क्षण–दोन क्षण सोडले तर इतरत्र फक्त उदासता. सर्व सुखसोयींनी सज्ज असलेले घर. एकटेपणा वाटू नये म्हणून घरात कोणीतरी सोबतीला ठेवलेले असायचे. परंतु घरात कुणी असून नसल्यासारखेच. त्या सांगतात, " रात्रीच्या प्रयोगाहून परतले तरी चौकशी करायला दाराशी कुणी नसायचे." (१६) ज्या प्रेमाच्या चार शब्दांसाठी माणूस सदा हपापलेला असतो त्या प्रेमळ शब्दांना ह्या सतत पारख्या झालेल्या दिसतात. त्यांच्या जेवणा–खाण्याचीही कुणी काळजी घेत नाही. दहा माणसे जेवतील एवढी स्टीलची भांडी घरात असताना त्यांच्यापुढे जेवण येते ते कधी पितळेच्या भांडयांतून तर कधी काही स्टीलची भांडी व काही पितळीची भांडी यातून. सकाळचे जेवण कधी संध्याकाळी मिळायचे. अशी त्यांच्या जेवणाची तऱ्हा होती. त्यांच्या गैरहजेरीत घरात नोकरचाकर धुमाकूळ घालतात. हा चोहोबाजूंनी पडलेला ताण त्यांना सहन होत नाही. आपले विस्कटलेले जीवन स्वतःच्याच हाताने कायमचे मालविण्यासाठी अॅलर्जीसाठी जवळ असलेल्या सर्वच गोळया त्या घेतात. पण नियती इतक्या सहजासहजी त्यांना जीवनातून मोकळे करायला तयार होत नाही. तो प्रयत्न फसतो. या प्रयत्नाची फार मोठी किंमत त्यांना द्यावी लागते. त्यांची मनोवृत्ती नेहमीसाठीच उदास होऊन बसते. या काळातील स्वतःच्या अवस्थेचे त्या वर्णन करतात, " ... मला कशातच रस राहिला नव्हता. रडत बसण्याचा माझा पिंड नाही पण मी अधिकाधिक घरकोंबडी बनले. महिनान्‌महिना कधी चित्रपट पाहिला नाही, बाहेर पडले नाही. कधी हवापाणी बदलण्यासाठी बाहेरगावी गेले नाही." (१५) एका महान कलाकाराच्या नशिबी असे जिणे यावे याचा खेद वाटतो. त्यांची नियतीने केलेली ही क्रूर थट्टा वाटते.

आपला एकाकीपणा विसरण्यासाठी, विस्कटलेल्या जीवनाची घडी नीट बसविण्यासाठी स्नेहप्रभा प्रधान किशोर साहूशी लग्न करतात. परंतु जीवन–घडी नीटपणे घालण्यासाठी केलेला हा प्रयत्नही फसतो. ही घडी नीट बसत तर नाहीच उलट चार दुःखे जास्तीची घेऊन ती अधिक विस्कटली जाते. त्यांना एकदा या

मार्गाने धाडून नियतीचे समाधान होत नाही. वेळोवेळी त्यांची परीक्षा घ्यायला ती कजाग सासूसारखी टपलेली असते. पहिल्यांदा ठेच लागलेली असूनसुद्धा तिच्या वेदना विसरून त्या पुन्हा लग्न करतात. आपले जीवन सुरळीत चालेल, चार मायेची माणसे मिळतील या आशेने. पण ही आशा सर्वस्वी फोल ठरते. पहिली ठेच याठिकाणी रक्तबंबाळ झालेली दिसते. रक्ताची मंडळी नसली तरी या लग्नामुळे आई–वडील, बहीण–भाऊ मिळणार या विचाराने, कौटुंबिक सुखासाठी हपापलेल्या प्रधानबाई सुखावतात. माणसाच्या चेहऱ्यावरून त्याच्या अंतरंगाची परीक्षा करता येत नाही. चेहरा गुळगुळीत असला तरी अंतःकरण तेवढेच गुळगुळीत असेल याची आपण ग्वाही देऊ शकत नाही. यामुळे त्या फसवल्या जातात. लग्न होऊन पुरते तीन–चार तासही लोटले नसतात तेवढ्यात धोब्याची धुलाई चुकविण्यासाठी त्यांचे पतिराज त्यांना " मी घरी येतो तू पुढे जा " (२५) असे म्हणून त्यांना वाटेतच सोडून देतात. हे लग्न म्हणजे प्रधानांना चालती–बोलती पैशाची खाण समजून सासरच्या लोकांनी त्यांच्याशी केलेला शुद्ध व्यवहार असतो. याची प्रचीती आल्यावर बाईंच्या संवेदनाशील मनाला या व्यवहाराचा कोरडेपणा–रुक्षता सहन होत नाही. तरीही उद्या जन्माला येणाऱ्या अर्भकामुळे आपले जीवन आनंदित होईल या अपेक्षेने नवऱ्याचा जुगार, दारू, त्याच्या इतर स्त्रियांबरोबरच्या शृंगाराची किळसवाणी वर्णने डोळ्याआड करून त्या राहतात. शरीराच्या नाजूक अवस्थेत त्यांना होणाऱ्या कामाचा त्रास त्या नवऱ्याजवळ सांगतात. तेव्हा, ' गर्भपात करवून घे ' (२७) असे निर्दय उत्तर त्यांना मिळते. या घणाघाताने त्यांची सहनशक्ती संपते. नव्याने जोडलेला हा संबंध कायमचा तोडला जातो. पूर्वीपासून विस्कटलेले स्नेहप्रभाबाईंचे जीवन या घटनेने अधिकच विस्कटून बसते !

वाट्याला आलेले विस्कटलेपण विसरण्यासाठी नियती किंचित्काळ त्यांना सुखाचे क्षण दाखविते. त्यांची आणि डॉक्टर शिरोडकर यांची गाठ घालून देते. डॉकची अलौकिक बुद्धिमत्ता, स्वतःच्या धंद्यातील त्यांचे अपरिमित यश यामुळे बाई दिपून जातात. डॉकच्या आगमनामुळे आई–वडील, बहीण–भाऊ ही हरवलेली सर्व नाती त्यांना गवसतात. विविध दुःखांनी व्यापलेले आपले गतजीवन त्या विसरतात. नव्या उत्साहाने जीवनाला सामोऱ्या जाण्याला तयार होतात. स्वतःच्या आनंदाचे वर्णन त्या करतात– [" डॉक माझ्या आयुष्यात आले आणि माझ्या जीवनात हास्य आले, प्रकाश आला, लहानपण आले. त्यांच्या ' बेटा ' या हाकेने मी खरोखरच नावाप्रमाणे 'बेबी' बनले. डॉक आले की, बारा–तेरा वर्षांच्या मुलीप्रमाणे मी उत्साहाने उजळून निघे. त्यांना कुठे ठेवू अन् कुठे नाही असे होऊन जाई मला. एक नवीन शक्ती, नवीन प्रेरणा, नवीन धडाडी माझ्यात वास करू लागली. एका आगळ्याच आनंदाने मी अंतर्बाह्य न्हाऊन निघाले. डॉकलाही आमची मैत्री हा एक नवीनच अनुभव असावा. शारीरिक सलगीचा लवलेश नसतानाही सर्वथैव सुखावणारी,

समाधान देणारी, उल्हसित करणारी आमची मैत्री त्यांच्याही जीवनाचा केंद्रबिंदू बनली." (३४८) ३८

डॉक आणि प्रधानबाई दोघांच्याही जीवनाची केंद्रबिंदू असलेली ही मैत्री डॉक स्वतःच्या भीरुपणामुळे आपल्या पत्नीला समजावून सांगू शकत नाहीत. कमलाबाईंच्या अनुपस्थितीत ही मैत्री रुजते, अंकुरते, बहरते, स्वतःची पाळेमुळे घट्ट बसण्याइतपत तिची वाढ झालेली असते परंतु कमलाबाईंच्या आगमनाने तिला बाळवी लागते. नीट बसत चाललेली बाईंची जीवन–घडी पुन्हा विस्कटली जाते.

रक्ताची नाती–कुजकी असली तरी कायद्याने ती जखडलेली असतात; हक्कांची अंमलबजावणी करू शकतात परंतु ही मानलेली नाती प्रिय असली तरी त्यांना कुठल्याही प्रकारचे बंधन नसल्याने ती क्षणार्धात मातीमोल होऊ शकतात. ही जाणीव त्यांना तीव्रतेने होते. रोज नियमितपणे येणारे डॉक कधी पाच मिनिटांसाठी येऊन जात. ज्या लगबगीने येत त्याच लगबगीने त्यांचे निघून जाणे होई. केव्हा महिनेन्‌महिने फोनवरसुद्धा बोलणे होत नसे. मग प्रत्यक्ष भेटीचा प्रश्नच नाही. हा ताण प्रधानबाईंना असह्य होई. मैत्री पूर्णपणे तोडून टाकावी या निर्णयावर त्या येतात. पण डॉक तयार नसतात. ' उद्या येऊ नका ' असे ह्यांनी बजावल्यावर स्वतः कबूल केल्यावरही दुसऱ्या दिवशी डॉक येतातच. ' धरले तर चावते आणि सोडले तर पळते ' अशी डॉकच्या संदर्भात त्यांची गत होते.

' आला क्षण उपभोगायचा ' असे डॉकचे तत्त्वज्ञान असल्याने या काळातही डॉक स्थिर असतात. कमलाबाई आपली मैत्री समजावून घेऊ शकणार नाहीत असे ते ठामपणाने उत्तर देतात. ते म्हणतात, " समजून घेणाऱ्या माणसाला समजावता येतं बेटा. पण ज्यानं निश्चयच केला आहे. गैरसमज करून घ्यायचा त्याला खरं सांगण्यानं काय फरक पडणार आहे." (३९) परंतु डॉकचा हा युक्तिवाद स्नेहप्रभा प्रधानांना पटत नाही. आपल्या मैत्रीत काहीही काळेबेरे नसताना आपण सर्व कमलाबाईंना सांगून टाकावे असे त्यांना सारखे वाटत राहते. पण डॉक या गोष्टीला कधीही कबूल होत नाहीत. डॉकच्या वागणुकीचे स्पष्टीकरण त्या देतात, " डॉकचे बहुतेक निर्णय फक्त स्वतःच्या मनःशांतीला विचारात घेऊन घेतले जात. त्याचमुळे मिसेस शिरोडकर मुंबईला येताच त्यांनी माझ्या मनःस्थितीचा विचार न करताच त्यांचे निर्णय माझ्यावर लादले." (४८) यांचा यत्किंचितही खेद डॉकला वाटत नाही असे त्यांचे मत आहे. त्या लिहितात, " माझ्यावर त्यांची अफाट माया असली तरी, त्यांना माझी अनेक प्रसंगी फार आठवण होत असली तरी, ' मलाबरोबर नेणे शक्य नाही. ' ही कटू परिस्थिती स्वीकारून ते आलेल्या क्षणाची मनसोक्त चव घेत." (५७) डॉकची ही वागणूक, त्यांची बेपर्वाई त्यांना असह्य होते. " चोवीस तास माझे मन, घाण्याला जुंपलेल्या बैलाप्रमाणे, ' असं का, असं

का ?' अशा अर्थहीन सवालाने स्वत:लाच सतावत राही." (५२) अशी त्यांची केविलवाणी अवस्था होते. या सर्वांची फलश्रुती म्हणजे–प्रेमाच्या नात्यात स्वत:च्या मालकीची असलेली फक्त एकच गोष्ट ' झुरणे.' ती तेवढी बाईंच्या हाती उरते. या झुरण्यापायी त्या चैतन्यहीन होतात. सतत अठरा वर्षे ज्या मैत्रीची जोपासना केली, डॉकला जीवन–सर्वस्व मानले त्या डॉकला मृत्यूनंतर त्या डोळाभरून पाहू शकत नाहीत. असा नियतीने त्यांच्याशी सतत दावा साधून प्रधानबाईंना हरविले आहे. त्या कशीबशी स्वत:ची समजूत घालतात–

"अखेरचे येतील माझ्या हेच शब्द ओठी
लाख चुका असतील केल्या केली पण प्रीती ... (२३१)

"माझ्या तोंडाशी घास आला तरी तो सुखासुखी घशाखाली उतरत नसतो. अनपेक्षित अडचणी नेहमी दत्त म्हणून स्वागतार्थ असतातच." (१३) अनपेक्षित अडचणींनी सदा विस्कटत राहणे हेच यांचे जीवन आहे. त्यामुळे त्या लक्षात राहतात– एक विस्कटलेले जीवन म्हणून !

**साहित्यक्षेत्र 'द्रौपदीच्या थाळी 'मधील गृहिणी, साहित्यिक आणि समाजसेवक गिरिजाबाई केळकर**

श्रीमती गिरिजाबाई केळकर यांनी 'द्रौपदीची थाळी' या आत्मचरित्रात आपली अठ्ठावन वर्षांची कारकीर्द चितारलेली आहे. यातून उत्तम गृहिणी, कळकळीची समाजसेविका व कीर्तिवंत साहित्यिक अशी तिन्ही अंगे एकाच ठिकाणी एकवटलेल्या गिरिजाबाईंची प्रतिमा स्पष्ट झालेली दिसते.

गिरिजाबाईंनी गृहिणी ही आपली सर्वांत महत्त्वाची व प्रमुख भूमिका मानली आहे. वनवासाच्या वेळी द्रौपदी आपल्या थाळीमुळेच सर्वांचे आदरातिथ्य नीटपणे करू शकते. एका गृहस्थाश्रमाच्या आश्रयावरच ब्रह्मचर्य, वानप्रस्थ आणि संन्यास या तिन्ही आश्रमांतील लोक योगक्षेम करतात. हा आदर्श त्यांच्या डोळ्यांसमोर होता. त्यासाठीच 'द्रौपदीची थाळी' हे नाव त्यांनी आपल्या आत्मचरित्राला दिलेले आहे. आपल्या कुटुंबीयांकडे एक जबाबदार गृहिणी म्हणून त्या लक्ष देतात. मुलाबाळांच्या योग्य वाढीच्या दृष्टीने त्यांच्या आवडीनिवडींकडे बारकाईने लक्ष पुरवितात. बाळासाहेबांचा पूर्ण विचार करून त्यांना देशी मालाचे दुकान घालून देतात. आपल्या अज्ञानाने आपल्याला आपल्या मुलाचा मृत्यू पाहावा लागला. स्वत:च्या मुलांची नीट काळजी घेता यावी म्हणून त्या होमिओपॅथीचा अभ्यास करतात. 'आई' या पदाची जबाबदारी ओळखून त्यांचे हे वागणे वाटते.

गिरिजाबाईंच्या स्वतंत्र बुद्धीची ओळखही बऱ्याच प्रसंगांमधून पटते. काशीला गेल्यावर रूढीप्रमाणे गंगेला वेणीदान करायला त्या तयार होत नाहीत. स्त्रियांना सुधारण्याचे त्यांचे समाजकार्य हे देखील त्यांच्या स्वतंत्र बुद्धीचेच प्रतीक

म्हणावे लागेल. त्या काळाच्या मानाने बऱ्याच पुढारलेल्या गिरिजाबाई कधी कधी मात्र विलक्षण परंपराप्रिय वाटतात. त्या पार्ट्यांना जातात पण तेथे काही खाणे–पिणे त्यांना चालत नाही. पुरुषाशिवाय स्त्रीचे जीवन व्यर्थ आहे असे त्यांना वाटते. "मला काही कमी नाही... त्रेपन वर्षं ज्या देवाच्या सहवासात गेली तो देव गेल्याने आज देव्हारा सुना पडला आहे. म्हणून आनंदात सुद्धा उदासीनता येते." (१३६) पतीच्या चिरवियोगाने विव्हळणारी पत्नी यातून दिसते.

स्वतःच्या निरीक्षणावरून काही सामान्य तत्त्वे त्यांनी मांडली आहेत. "कोणाचेही काही बरे दिसले की त्याला काहीतरी जोड देण्यातच जगाला समाधान वाटते." (७७) कोणाचे वर्चस्व कोणाला सहन होत नाही. कोणीही कोणावर प्रेम करू शकते याविषयी त्या म्हणतात, "जेवणातच प्रेम असते तर सख्खे भाऊ एकमेकांच्या उरावर का बसते ?" (१३४) आपल्या जीवनाबद्दल त्या सांगतात– "मध्यम वर्गीयांना हवे तेवढे वैभव, पवित्र अन् पुण्यवान अशा सासूबाई, बहिणीप्रमाणे प्रेम करणारी देवतेसमान नणंद व ज्याचे मोल करता येणार नाही अशी आयुष्याची जोड, गोजिरवाणी, आज्ञाधारक पण बुद्धिवान मुले, खरा प्रेम करणारा बंधुवर्ग व मैत्रिणी ह्यात काल भराभर जात होता. उठल्यापासून निजेपर्यंत जिकडे तिकडे आनंदीआनंद दिसत होता. आई, वहिनी, ताई, आईसाहेब असे ध्वनी कानावर आदळून मन गर्वाने फुलत असे." (६५) बाईंच्या जीवनतृप्तीची साक्ष या उताऱ्यावरून मिळते. केळकरांचे अगोदर जाणे ही एकच त्यांच्या कलत्या आयुष्यातील बोच होय.

'गृहिणी भूषण' भाग १ व २, 'त्रियांचा वर्ग व समाजचित्रे' भाग १ व २, 'राजकुवर,' 'आयेषा,' 'केवळ विश्रांतीसाठी,' 'हीच मुलीची आई,' 'छापलेली अध्यक्षीय भाषणे,' ही बाईंची साहित्यसंपदा त्यांच्यातील साहित्यिकाचे दर्शन घडविते. 'पुरुषाचे बंड' लिहून त्यांनी पहिल्या स्त्रीनाटककाराचा मान मिळविला आणि सुवर्णपदक प्राप्त केले. इतके विविध वाङ्मयप्रकार बाईंनी हाताळले. त्या कालखंडातील बाई पहिल्या स्त्री–लेखिका आहेत. ही माहिती त्या स्वतःच पुरवितात. "... त्यावेळेस नवयुग, लोकमित्र, अरविंद, वनिता समाज या सर्व अंकांना लेखांची मागणी असे. कारण त्यावेळेस माझ्याशिवाय कोणीच स्त्री लेखिका नव्हती." (५४) या क्षेत्रात पहिलेपणाचा मान बाईंनी मिळविला आहे. १९२७ ला मुंबई येथे भरलेल्या नाट्यसंमेलनाचे अध्यक्षपद, मुंबई ग्रंथसंग्रहालयाचेही अध्यक्षपद वगैरे सन्मान त्यांची एक दर्जेदार साहित्यिक म्हणून महती पटविणारे आहेत. पण तरीही त्यांच्यातील साहित्यिक नम्र आहे. "माझं काय लुटुपुटूची भातुकली" (५१) असे म्हणून त्या गौणत्व स्वीकारतात.

बऱ्यांच्या घरात जन्मलेल्या गिरिजाबाईंना शिक्षणाची विलक्षण आवड आहे. राजकोटला पुढच्या वर्गाची सोय नसते. तेव्हा त्या सहावी पास झाल्यावर परत सहावीत बसतात. ट्रेनिंग कॉलेजच्या मुलींचे विणकाम दुरुस्त करून देतात आणि त्या मोबदल्यात एका दिवसासाठी पुस्तक घेऊन वाचतात. बरेचदा त्यासाठी त्यांना मुलींची आर्जवे करावी लागतात. यावरून त्यांची ज्ञानपिपासा आणि वाचनाची आवड या दोन्हींवर प्रकाश पडतो. त्यांचे हे शिक्षणप्रेम केवळ पुस्तकांपुरतेच मर्यादित नाही तर विणकाम, भरतकाम, रांगोळ्या व पाककला क्षेत्रातही काहीतरी नवीन शिकण्याची, नवे करण्याची त्यांना हौस आहे. शिक्षणाची आवड केवळ स्वत:पुरतीच मर्यादित नाही तर आपल्या शिक्षणाने दुसऱ्याला सुधारावे ही तळमळ त्यांना आहे. विशेषत: स्त्रियांनी सुधारावे, पुढे यावे ही त्यांची समाजसेवकाची कळकळ आहे. यासाठी शहरातील स्त्रियांपेक्षा खेड्यातील स्त्रियांना सुधारण्याचे काम त्यांना विशेष महत्त्वपूर्ण वाटते. रमाबाई रानडे गिरिजाबाईंना पुण्यात राहण्याविषयी सुचवितात तेव्हा त्या रमाबाईंना उत्तर देतात, " तुम्हाला शहरात पुष्कळ विद्वान बायका मिळतील. पण माझ्या खेड्यातल्या बायकांना नवे जग कोण दाखवील ?" (५८) यावरून खेडूत स्त्रिया सुधारण्याकडेच त्यांचा अधिक ओढा होता हे दिसते. जळगाव, खानदेशसारख्या खेड्यात राहून, अतोनात परिश्रम घेऊन स्त्रियांसाठी त्यांनी विविध सुधारणा केल्या. सुधारणांविषयी त्या सांगतात, "... शुक्रवारी हळदीकुंकवाला बोलवायचे. रोज कोणाकोणाकडे बसायला जायचे. नवा अधिकारी आला की, त्याच्या मंडळीची ओळख करून घ्यायला बायकांना घेऊन जायचे. सगळ्यांकडे वरचेवर जाण्यायेण्याने स्नेह वाढला... पुरुषांची व्याख्याने आम्ही गॅलरीत बसून ऐकली. पण पुरुषांच्या सभेत खाली नव्हे. डोहाळ जेवणे, बारसे वगैरे प्रसंगी बायका बोलवायच्या. अशाने संघटन वाढले. मग नुसत्या गप्पा, फुटाणे, त्यांच्या जोडीला वर्तमानपत्रातील गप्पा, मासिकातले चुटके सुरू झाले. मग हळूच कोणी आला गेला की त्याचे व्याख्यान... पुढे हळूच लायब्ररी काढली... १९१९ मध्ये उद्घाटन होऊन 'भगिनीमंडळ' हे नामकरण झाले. खानदेशातील स्त्रियांची ही पहिली संस्था आहे... सामुदायिक गोष्टींची स्त्रियांना गोडी लागावी म्हणून चैत्राचे हळदीकुंकू मंडळाचे म्हणून करावे." (५८–५९–६०) यावरून स्त्रियांना सुधारण्यासाठी हळूहळू बायकांची मने कशी तयार करावी लागली आणि बाईंनी हे काम किती परिश्रमाने व चिकाटीने केले याची कल्पना येते. "... शहरी सुधारणा न आणता खेडेगावाच्या राहणीला पोषक, जुन्यातला चांगलेपणा ठेवून प्रमाणबद्ध नवे घेणारी स्त्री–संस्था असावी ही महत्त्वाकांक्षा असल्यामुळे हे श्रम झाले." (५८–५९) असे त्या नमूद करतात. यातून समाजसुधारक केळकरबाईंचे दर्शन घडते. सहशिक्षण घ्यायचे असेल तर अगदी साधी राहणी व साधा पोषाख करायला त्या सुचवतात. जेलच्या व्हिजिटर,

समारंभाच्या अध्यक्ष, बँकेच्या मेंबर, लोकल बोर्डातील मेंबर अशी विविध पदे त्यांनी भूषविलेली आहेत. ही पदे बाईंच्या सामाजिक प्रतिष्ठेवर प्रकाश टाकून त्यांचे समाजकार्य अधिक उजेडात आणण्यास मदत करतात. आदर्श गृहिणी, लोकप्रिय साहित्यिक, कळकळीची समाजसुधारक असे पैलू असलेली गिरिजाबाईंची प्रतिमा येथे प्रकटली आहे पण–यातील सर्वात गडद रूप आहे ते आदर्श गृहणीचे. पुस्तकाचे ' द्रौपदीची ' थाली हे शीर्षकही या दृष्टीने बोलके आहे.

**' सांजवात 'मधील : एक सोज्वळ स्त्री : आनंदीबाई शिर्के**

१९१३ मध्ये झालेला अनसूया शिंदे व काव्यानंद शिर्के यांचा देशस्थ–कोकणस्थ विवाह तत्कालीन समाजाला मान्य नव्हता. समाजाने आनंदीबाईंवर विविध आरोप घेतले. त्यामुळे आपल्याबद्दल आपल्या मुलाबाळांचे मन कलुषित व्हायला नको म्हणून ' सांजवात 'मधून आपले व्यक्तिमत्त्व साकारण्याचा प्रयत्न केला आहे.

आनंदीबाई एक सामान्य स्त्री असल्या तरी त्यांना असामान्य प्रतिभा लाभलेली आहे. या असामान्य प्रतिभेमुळेच त्यांची आणि शिर्क्यांची ओळख होते. समाज मोठा डोळा करून पाहत असतानासुद्धा समाजाकडे दुर्लक्ष करून त्यांनी शिर्क्यांशी लग्न केले. हे धाडस तत्कालीन समाजात असामान्य वाटते.

आनंदीबाई ही शिंद्यांची लाडकी लेक. त्यामुळे लहानपणी त्यांचे विविध हट्ट पुरविले जातात. आपल्या माहेरच्या जीवनाबद्दल त्या स्वत:च सांगतात, " कोणाचा कडू कठोर शब्द सोसण्याची सवय नव्हती. मानीपणाने एकप्रकारची हुकमत गाजविण्याची सवय होती. हुकूम ऐकण्याची नव्हती." (१२८) त्यांना वाचनाची व शिक्षणाची अतिशय आवड आहे. बाणभट्टाची कादंबरी, सरस्वतीचंद्र ही चार भागात विभागली गेलेली दीर्घ कादंबरी त्यांनी अल्पवयात वाचली आहे. नवनवीन शिकण्याची संधी त्या नेहमी शोधत असतात. त्यांची बुद्धी परोपकारी आहे. दुसऱ्यांची सेवा करण्यात त्यांना आनंद वाटतो. या दृष्टिकोणातून त्या नर्सिंग कोर्स घेतात " देवा ! दुसऱ्यांची सेवा माझ्या हातून घडू दे " (२३४) अशी देवाची करुणा भाकतात.

आपल्या बाबांची हुंडा देण्याची ऐपत नाही. हुंडा घेणारा नवरा आपल्याला नको हे जाणणाऱ्या आनदीबाई समजूतदार वाटतात. " आई–बाबांचे म्हातारपण सांभाळण्यासाठी मुलासारखी जबाबदारी आपणच घेतली पाहिजे आणि ते नर्सिंग शिकूनच साधेल. लग्न करून साधणार नाही." (३३२) हे त्यांचे मनोराज्य. पण डॉ. बागल्यांमुळे आनंदीबाई हळूहळू शिर्क्यांमध्ये अडकतात आणि शेवटी आपखुशीने अनसूया शिंदेच्या आनंदी शिर्के होतात.

लग्न झाल्यानंतर, " ह्यापुढं ह्यांच्या मर्जीप्रमाणे वागलं पाहिजे. आपल्या मतांना मुरड घातली पाहिजे." (७९) असे म्हणतात. शिर्क्यांच्या मार्गदर्शनाचा

त्या कृतज्ञतेने उल्लेख करतात. शिक्यांविना त्यांना आपले जीवन एकाकी वाटते. शिक्यांना आपले आत्मचरित्र वाचू दिले नाही याची खंत अजूनही त्यांच्या मनावेगळी होत नाही. आनंदीबाईंची भारतीय स्त्रीला साजेशी पतिभक्त प्रतिमा यातून उभी राहते.

सासरी आल्यावर कामे करताना त्यांना फार त्रास होतो. सर्व त्रास मुकाटपणे सहन केला जातो. पण सवलती मागितल्या जात नाहीत. "आपणहून सवलती मागण्याची मला सवय नव्हती." (१८२) असे हे मानिनी मन आपल्या वागणुकीचे स्पष्टीकरण देते. झोप लागल्यावर आपले बाळ कोणी पळवून नेईल म्हणून आनंदीबाईंचे रात्र जागून काढणे, दवाखान्यात बाळाला आंघोळ घालताना, कपडे बदलताना बाळ बदलले जाईल काय ही त्यांना वाटणारी भीती, त्यांच्या नैसर्गिक मातृवृत्तीवर प्रकाश टाकते. सासू–सासऱ्यांचे, आई–वडिलांचे अनमोल ऋण मान्य करणारे यांचे अंतःकरण कृतज्ञ आहे. आईच्या अपंगावस्थेत आपण काही करू शकत नाही या विचाराने त्यांचे मन हळहळते. "मुलीचा जन्म ! आई–बापांची सेवा-शुश्रूषा करू म्हटले तरी हातून घडत नाही, उलट लाड किंवा सेवा काही म्हणा करून घेण्यासाठीच मुलीने आईजवळ जायचे असेच घडते." (८२) किंचित का होईना माहेरच्यांचे आपल्याला काही करता यावे या इच्छेतूनच त्या पदोपदी माहेरची बूज राखताना दिसतात.

थोर समाजकार्यकर्ते म्हणून नावाजलेले ॲडव्होकेट नाईक मृत्युमुखी पडतात तेव्हा त्यांच्या अंगावरची जरीचे काम केलेली शाल–मौल्यवान म्हणून अंत्यसंस्कारापूर्वी काढली जाते. "एवढा मोठा मोहरा हरपला त्या हानीपेक्षा शाल त्यांच्या अंगावर जळाली असती तर मोठी हानी झाली असती काय ?" (१९४) या बाईंनी केलेल्या निषेधावरून त्यांना असलेली गुणी माणसाची किंमत कळते.

पुढील बाबी त्यांचे जीवनचिंतन, सूक्ष्मनिरीक्षण स्पष्ट करतात. "तात्पुरत्या उत्साहाने उच्चारली गेलेली अभिवचने पाळली जातातच असे नाही." (५५) त्यांनी जोखलेला हा मानवी स्वभाव. "पांढरे पातळ मळू नये म्हणून आपण किती जपतो. तसं आपल्या वागणुकीला जपण्याबद्दल पांढरं पातळ आपल्याला सूचना देत राहतं." (९५) स्वानुभवावर आधारलेला हा उत्स्फूर्त उद्‌गार एखाद्या काव्यमय सुभाषिताप्रमाणे रसिकांचे लक्ष वेधून घेतो. "कोणाकडेही काठाला लागेतो राहू नये." (२३३) थोडक्यात गोडी असावी, अती तेथे माती हे तत्त्वच येथे मांडले आहे. "मोठ्या वयात ज्यांची लग्ने होतात त्यांच्या आवडी–निवडी, मते, स्वभाव जरा निब्बरच झालेल्या असतात. लहानवयात मुलामुलींची मने जशी कोवळी, लवचिक असतात, न कुरकुरता वळतात, वाकतात. तशी प्रौढ मुलामुलींची बिनतक्रार वाकत नाहीत." (३३२) ही सूचना आनंदीबाईंनी शिक्यांच्या मता-

प्रमाणे वागताना त्यांना होणाऱ्या त्रासातून केलेली दिसते. 'सांजवात'मध्ये आलेल्या लेखनविषयक माहितीतून साहित्यिक आनंदीबाईंचा परिचय होतो. 'कुमारी आनंदी' या टोपणनावाने त्या लिहीत. त्यांच्या कथा, निबंध 'मनोरंजन' व 'मराठी मित्र'मधून प्रकाशित होत. 'कथाकुंज' हा त्यांचा कथासंग्रह. 'मोठी माणसे' या शालेय पुस्तकात आनंदीबाईंचे काही धडे घातले जातात. 'मनोरंजन'-कडून होणारी त्यांच्या लेखनाची मागणी, 'असेच लिहीत जा. मासिक तुमचे आहे,' हे 'मराठामित्र'चे सांगणे त्यांच्या कसदार लिखाणाची साक्ष पटवतात. 'कलादर्श' मासिकाचे संपादकत्व, जळगाव साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष-पद हे सन्मान त्यांचे एक साहित्यिक म्हणून मोल दर्शविणारेच आहेत.

कोल्हटकर, घाटे, माधवराव पटवर्धन वगैरे थोर साहित्यिकांशी असलेला त्यांचा चांगला परिचय, बडोदा, इंदूर येथील साहित्य संमेलनाची उपस्थिती– आनंदीबाईंचे साहित्यप्रेम दाखवणारे आहेत. पण साहित्यक्षेत्रातील त्यांच्या वावरण्याचे सगळेच उल्लेख विस्ताराने आलेले नसल्याने त्यांच्या या पैलूची फक्त ओळख येथे होते.

विनम्रता हा आनंदीबाईंच्या व्यक्तित्वाचा 'सांजवात'मध्ये जाणवणारा आणखी एक पैलू. ऑनररी मॅजिस्ट्रेटचे पद, 'मराठा परिषदे'च्या पहिल्या अधिवेशनाचे अध्यक्षपद यासंबंधी त्या कधी आढयतेने बोलत नाहीत.

अशी लग्नापूर्वीच्या आनंदीबाई, लग्नानंतर आज्ञाधारक पत्नी, प्रेमळ माता म्हणून वावरणाऱ्या आनंदीबाई, संसारनिरीक्षक, तत्त्वचिंतक साहित्यिक व विनम्र आनंदीबाईंची प्रतिमा 'सांजवात'मधून दृग्गोचर होताना दिसते. 'सांजवात' मधून ठिकठिकाणी प्रतीत होणारा आनंदीबाईंचा सोज्वळपणा मनावर विशेषत्वाने ठसतो.

**एक संगती**

प्रस्तुत कालखंडातील स्त्री–आत्मचरित्रकारांमधील काही स्त्रिया रक्ताच्या नात्याने एकमेकींशी बांधल्या गेल्या आहेत तर काही एकाच संस्थेशी निगडित आहेत. त्यांनी केलेले 'स्व' प्रकटन आणि इतरांनी केलेले त्यांचे चित्रण, एकाच संस्थेविषयी त्यांची भिन्न भिन्न मते, यातून त्यांची जी प्रतिमा चित्रित झालेली आहे तिचे आलेखन करण्याचा प्रयत्न याठिकाणी केला आहे.

पार्वतीबाई आठवले (माझी कहाणी) आणि आनंदीबाई कर्वे (माझे पुराण) या दोघी बहिणी आहेत. दोघींनीही आत्मचरित्रांत एकमेकींचे उल्लेख मोठ्या प्रेमाने व आदराने केले आहेत. दोघींनीही स्वतःला समाजकार्याला वाहून घेतलेले आहे. कुठल्याही प्रकारचा गाजावाजा न करता, बडेजाव न मिरविता त्या आपले कार्य अथक प्रयत्नांनी करताना दिसतात.

सुशीलाबाई आठवले (आंब्याचा टाळा) पार्वतीबाई आठवल्यांच्या सूनबाई. बाया कर्वे त्यांची मावससासू. सुशीलाबाईंनी पार्वतीबाईंचा व बायाचा मोठेपणा मान्य केलेला आहे. अरविंदाच्या मौंजीत घडलेल्या नथेच्या प्रसंगानंतर काही दिवसांनी "बायाने (आनंदीबाई कर्वे) आपल्या हातातल्या बांगड्या व पाटल्या काढून माझ्या हातात घातल्या व म्हणाली 'मी तुला माझी मोठी सूनच मानते. माझी ही तुला देणगी !'" (५१) नंतर बाया स्वत: मात्र काचेच्या बांगड्या घालून राहते. हा बायाच्या मनाचा मोठेपणा सुशीलाबाईंनी मोठ्या कौतुकाने सांगितलेला आहे. बायाला रिकामे बसणे आवडत नसे. कोणावर आपला भार टाकणे पसंत नव्हते. अण्णांना विद्यापीठाने बांधून दिलेल्या खोपट्यात ती व अण्णा राहत असत. ती स्वत:चे जेवण स्वत: करून खाई. सुशीलाबाई नोकरी करून पैसा मिळवीत नसत म्हणून बाया त्यांना 'बांडगूळ' (५२) म्हणे, हेही त्या तितक्याच मोकळेपणाने बोलून जातात. विधवांची उन्नती करणे हे पार्वतीबाईंचे जीवन-ध्येय खरे. सुशीलाबाई सांगतात, "पार्वतीबाईंचे वेषांतर झाले होते. त्यांनी केस वाढविले होते. समाजाला एका तऱ्हेने धक्का दिला होता. तरी पण माझ्या लग्नाची चोळी बेतण्याच्या वेळी खणाला पहिली कात्री लावण्याचे काम त्यांनी एका सुवासिनीकडून करून घेतले व मागून माझ्या विधवा मैत्रिणींनी चोळी बेतुन शिवून तयार केली." (२४) एखाद्या विधवेशी अगर विशिष्ट कुमारिकेशी लग्न करावे असे नानासाहेबांना वाटत असे.

आपल्या आईविषयी ते लिहितात, "आई तर विधवेशी विवाहाला सुखासमाधानाने कधीही संमती देती ना." (१८५) अशी पार्वतीबाईंच्या स्वभावातील विसंगती 'आंब्याचा टाळा' मधून वाचायला मिळते. सासूचा अपमान करण्याचा हा सुशीलाबाईंचा प्रयत्न नसून मानवी स्वभावातील विसंगती दाखविण्याचा हा त्यांचा प्रयत्न असावा असे वाटते. मनुष्य कितीही सुधारला तरी काही समजुती त्याच्या मनात दृढ झालेल्या असतात. त्यानुसार तो बरेचदा वागताना दिसतो. बोलण्यात आणि वागण्यात विसंगती दिसली तरी त्याला त्याची पर्वा नसते याचे प्रत्यंतर याठिकाणी येते.

गिरिजाबाई केळकर (द्रौपदीची थाळी) कमलाबाई देशपांडे (स्मरणसाखळी) आपली पुतणी असल्याचा उल्लेख करतात.

बाया कर्वे, पार्वतीबाई आठवले, कमलाबाई देशपांडे, गंगूबाई पटवर्धन ह्या एकाच हिंगणे शिक्षण संस्थेत काम करणाऱ्या आहेत. बाया कर्वे व पार्वतीबाई आठवले आपल्या संस्थेच्या दोषांसंबंधी कधी काही बोलताना दिसत नाहीत. कमलाबाई देशपांडे व गंगूबाई पटवर्धन यांनी संस्थेकडून आपल्यावर झालेले अन्याय व संस्थेच्या उणिवा धिटाईने दाखविल्या आहेत. संस्थेच्या चालकांना आपल्या

संस्थेतील दोष कळून त्यांनी ती निर्दोष करण्याचा प्रयत्न करावा या हेतूनेही या दोघींनी संस्थेच्या बोटचेप्या जागांवर बोट ठेवले असावे.

कमलाबाई देशपांडे, गंगूबाई महिलाश्रमातील एक उत्साही शिक्षिका असल्याचे लिहितात. गंगूबाईंचा एकवचनीपणा त्यांनी मोडकांना दिलेल्या, "मी कमलाबाईंना एकदा होकार दिला, आता मी नकार देऊ शकत नाही." (स्मरणसाखळी : २०९) या उत्तरावरून सांगितला आहे.

सुधाताई अत्र्यांच्या विस्कटलेल्या सांसारिक जीवनाबद्दल गंगूबाईंना अतिशय वाईट वाटते. नाशिकला ट्रेनिंग कॉलेजच्या बक्षीस समारंभाच्या वेळी अध्यक्ष म्हणून गेल्या असताना गंगूबाई मातेच्या ममतेने सुधाताईंची समजूत घालतात. "बाबूराव एक हुशार, कर्तबगार व्यक्ती आहे. त्यांची कल्पनाशक्ती व स्मरणशक्ती अफाट आहे. त्यांचे कर्तृत्व बहुरंगी व बहुढंगी आहे. अशी माणसे थोडीफार वाहवतातच. पण ठोकर लागली की भानावरही येतात. त्याची वाट पाहत राहिले पाहिजे. मुलींवर त्यांचे अतोनात प्रेम आहे. तुमच्याबद्दल ओढ आहे. त्यामुळे ते केव्हातरी सरळ मार्गावर येतील. चंद्रावर डाग असतो ना, तसंच समजायचं व धीर धरायचा." (चाकोरीबाहेर–३४५) गंगूबाईंनी सुधाताईंना दिलेला हा दिलासा आहे.

वारल्यांमधील माणूस जागा करणाऱ्या गोदावरीबाईंना संपूर्ण वारली जमात मनापासून आणि चांगल्या भावनेने 'राणी' म्हणत असल्याचा उल्लेख 'पण ऐकतं कोण ?' मध्ये वाचायला मिळतो. परंतु 'जेव्हा माणूस जागा होतो !' मध्ये प्रत्यक्ष गोदावरीबाईंनी मात्र आपल्या 'राज्ञी' पदाबद्दल मौन धारण केलेले दिसते. गोदावरीबाईंचा हा संयम कौतुकास्पद आहे.

इतर आत्मचरित्रांमध्ये परस्परांसंबंधी आलेले उल्लेख फारच क्षणिक वाटतात. यातील फक्त वरील उल्लेखच 'एकसंगती' दाखवितात.

* * *

४

# आत्मचरित्रांतून घडणारे तत्कालीन सामाजिक, धार्मिक व राजकीय परिस्थितीचे दर्शन

'स्व' चित्र रेखाटणे हा आत्मचरित्राचा मुख्य उद्देश आहे. किंबहुना स्वतःचे चित्र रेखाटण्यासाठी आत्मचरित्र या वाङमय प्रकाराचा जन्म झालेला आहे असे म्हणता येईल. असे असले तरी 'मनुष्य हा समाजशील प्राणी आहे.' माणूस एकाकी जीवन जगू शकत नाही. चारचौघांपेक्षा निराळे असलेले संन्यासी, तपस्वी, यती व सिद्धही याला अपवाद नाहीत असे त्यांचे चरित्र वाचताना लक्षात येते. व्यक्तीची घडण समाजाकडून होत असते. त्यामुळे तिच्या चित्राबरोबर तिला घडविणाऱ्या समाजाचे चित्र येणे अंगदी अपरिहार्य आहे. व्यक्ती आणि समाज परस्पर विणीतून घडत असतात. यांना विलग करता येत नाही. वि. द. घाटे आत्मचरित्रात समाज–चित्रण येणे किती अटळ आहे हे समजावून सांगतात, "... आत्मचरित्र नुसते आत्मचरित्र कधीच नसते. त्यामध्ये समकालीन समाज पदोपदी डोकावत असतो. वैयक्तिक जीवनातील घटना आणि समस्या सांगताना समाजाचा विचार करावाच लागतो. प्रत्येक माणसाच्या जीवनात समाज पुरेपूर मुरलेला असतो." (सांजवात पृ. ८) चरित्र आत्मचरित्रात माणसे दिसतात तसाच काळ आणि समाज दिसतो. तत्कालीन समाजाची अवस्थांतरे समजावून घेण्यास आत्मचरित्रासारखे दुसरे बलवत्तर साधन नाही असे म्हटल्यास वावगे होऊ नये. Dr. D. G. Naik या संदर्भात म्हणतात, " ...Certain autobiographies enable us to know the history of certain periods in a far better way than the actual books of history."[1] काही आत्मचरित्रांत तर व्यक्तीच्या चित्रणापेक्षा समाजाचेच चित्रण अधिक प्रभावीपणे झालेले दिसते. उदाहरणार्थ, ' गेले ते दिवस ' या सत्यभामाबाई सुखात्मे यांच्या आत्मचरित्रात विसाव्या शतकातील स्त्रियांची परिस्थिती ' स्व ' चित्रणापेक्षा अधिक प्रकर्षाने चित्रित झालेली आढळते. दादोबा पांडुरंग यांच्या आत्मचरित्रात इंग्रजी राजवटीचे यथार्थ दर्शन घडते. आचार्य अत्र्यांनी तर समाज-

[1] D. G. Naik, Art of Autobiography, Pune, 1962, P. 42

दर्शनासाठी ' कऱ्हेचे पाणी ' लिहिलेले आहे. यासंबंधी तेच सांगतात, " ह्यात 'मी'ला महत्त्व नाही. गेल्या पन्नास वर्षांत महाराष्ट्रामध्ये ज्या ज्या ऐतिहासिक, राजकीय, सामाजिक आणि वाङ्मयीन घडमोडी घडल्या त्यांचा इत्थंभूत वृत्तांत सांगण्यासाठी आत्मचरित्र हे माझे एक निमित्त आहे. हे मराठी समाजाचे चित्र आहे."[२] या विवेचनावरून आत्मचरित्रातील समाजदर्शनाची अपरिहार्यता व महती कळते. समाजचित्रणात सामाजिक, धार्मिक, राजकीय वगैरे बाबींचे चित्रण अनुस्यूत असते.

प्रस्तुत कालखंडातील आत्मचरित्रे पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ मराठवाडा, मध्यप्रदेश, कर्नाटक, गोवा व परदेश अशा विविध भागांतील स्त्रियांची आहेत. सर्व थरांतील स्त्रियांची आत्मचरित्रे नाहीत, तर प्रामुख्याने पांढरपेशा समाजातील. त्यामुळे हे दर्शन बहुतांशी त्या समाजाचे आहे. बहुतेक प्रश्नही बुद्धिजीवी वर्गाचेच आहेत. साधारणपणे १८४५ ते १९७३ पर्यंतच्या म्हणजे एकशे अठ्ठावीस वर्षांच्या कालखंडातील हे समाजचित्रण म्हणता येईल. हा संक्रमणकाळ. पूर्वी समाज कर्मकांड, अंधश्रद्धा, रूढी, परंपरा यांच्या मगरमिठीत सापडलेला होता. ब्रिटिश राजवट, स्वातंत्र्य चळवळ, समाजसुधारणेचे अनेक प्रयत्न, औद्योगिक प्रगती यामुळे त्याचे आधुनिकीकरण झाले. व्रते, चूल नि मूल, सासुरवास, अज्ञान यात पिचलेली स्त्री हळूहळू कशी स्वतंत्र पावले टाकायला शिकली हे येथे वाचायला मिळते.

## सामाजिक परिस्थिती

### कुटुंबव्यवस्था

समाजात व्यक्तित्वाची बांधणी होत असली तरी पुरुषाचे व्यक्तित्व व्यवसायाने सिद्ध होते. त्यामुळे पुरुषांच्या आत्मचरित्रात प्रामुख्याने उभारला जातो तो व्यवसायाचा आलेख. कुटुंबाला त्या मानाने गौणस्थान मिळते. स्त्रीचे मुख्य कार्यक्षेत्र कुटुंब. ती नोकरी, व्यवसाय करणारी असली तरी ' घार उडे आकाशी । लक्ष तिचे पिलापाशी ' अशी तिची गत. त्यामुळे रूढी, आचारविचार स्त्री आत्मचरित्रांत विशेषत्वाने चित्रित झालेले दिसतात.

जमिनीची मशागत करून त्यावर निर्वाह करणारी माणसे, स्त्री, मुलेबाळे असा ' कुटुंब ' या शब्दाचा अर्थ कोशात सापडतो. भारतात वैदिककाळापासून कुटुंबव्यवस्था स्थापन झाली. कुटुंब म्हणजे पती-पत्नी नि त्यांची मुले असा हा सुटसुटीत आकृतिबंध नसून किमान तीन पिढ्यांची ती बेरीज असे. या कुटुंबव्यवस्थेत सर्वांचे एकत्र राहणे, एकत्र स्वयंपाक, वडिलोपार्जित संपतीवर सर्वांची मालकी नि स्त्रीचा पुरुषाच्या बरोबरीने समावेश होता. तिला गृहराज्ञी मानले जाई. स्त्री म्हणजे समृद्धी. लक्ष्मी. स्त्रीमुळेच सर्व विश्वाचे अस्तित्व टिकून आहे असा समज होता.

---

[२] प्र. के. अत्रे, कऱ्हेचे पाणी, खंड, ५, आ. दु. मुंबई १९७९, पृ. ३

या आत्मचरित्रांतून एकोणविसाव्या शतकाच्या उत्तरार्धापासून विसाव्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंतच्या काळातील संयुक्त कुटुंबपद्धतीचे दर्शन घडते. घरात स्वतःची मुले-मुली, सुना, नातवंडे–जावा, काका–काकू, दीर, नणंदा, आश्रित मुले, स्त्रिया–असा भरभक्कम राबता असे. वडीलधाऱ्यांना विशेष मान. त्यांच्या इच्छेप्रमाणे सर्व लोक मुकाट्याने वागताना दिसतात. कुणीही आपल्या मतस्वातंत्र्याचा विचार करताना आढळत नाही. आपल्याला काही मतस्वातंत्र्य असू शकते हा विचारच एकत्र कुटुंबपद्धतीत अंकुरलेला दिसत नाही. घरातील कर्ता पुरुष सर्व सांभाळत असल्याने लहानांना स्वतःच्या जबाबदारीची जाणीव होत नाही. फक्त स्त्रिया किंवा लहान मुलेच वडील माणसांपुढे वाकतात असे नाही तर स्त्रियांइतकेच पुरुषही वडील माणसांच्या आज्ञेत असलेले दिसतात.

प्रथम पत्नीच्या मृत्यूनंतर विधवेशी विवाह करण्याची इच्छा असूनही बत्तीस वर्षे वयाच्या माधवराव रानड्यांनी वडिलांच्या आज्ञेवरून अकरा वर्षे वयाच्या रमाबाईंशी केलेला विवाह वडिलांच्या आज्ञापालनाचे उदाहरण होय. वडिलांच्या आवडीला मान देऊन स्वतःची इच्छा नसतानाही माधवराव पटवर्धन फारसी घेतात. वडील माणसांसमोर स्वतःच्या बायकोशी किंवा मुलांशी बोलणे इष्ट समजले जात नसे. तो त्यांचा अपमान समजला जाई. रमाबाई रानडे सांगतात; "आम्हा भावंडांपैकी कोणी मुले कधी वडिलांजवळ जायची नाहीत. कारण मी जन्मले त्याच्या आधी एकवर्षपर्यंत आमची आजी जिवंत होती, म्हणून तिच्यादेखत ते कोणत्याच मुलाशी बोलत नसत. मग जवळ घेणे कोठले ? आजी निवर्तल्यावर मी झाले, त्यामुळे ते मला जेवावयास व निजावयास पुढे घेऊ लागले व लाड करू लागले." (२९) पती थोडा जरी पत्नीच्या कलाने अगर आवडीने वागायला लागला तर घरात संघर्ष निर्माण होत असे रमाबाई केदारांकडून कळते. मोठ्या माणसांसमोर लिहिण्या वाचण्यात त्यांची अमर्यादा केल्यासारखे होई. नुकत्याच वाचायला शिकलेल्या रमाबाई रानडे केरात सापडलेला कपटा उत्सुकतेने वाचतात तेव्हा, "तुमचे हापीस माडीवर आहे. तेथे तुम्ही वाचा की नाचा. आमचा अपमान केला तर खबरदार !" (४२) असे वडील बायकांकडून सांगितले जाते. राधाबाई आपटे शिकत असताना आपट्यांच्या परवानगीने त्या शाळेत जातात. घरातील वडील मंडळीला विचारले नाही म्हणून ती मंडळी राधाबाईंशी तुटकपणाने वागते. वडील माणसे आली की बाकीच्यांनी चटकन उठून उभे राहण्याची पद्धत 'स्मृतितरंग' व 'स्मरणमाला'मध्ये अन्नपूर्णाबाई रानड्यांनी आणि जानकीबाई फडणीसांनी स्पष्ट केली आहे. सगळी पत्रे वडील माणसांच्याच नावावर आली पाहिजेत अशी रूढी अस्तित्वात असल्याचे 'माझा नंदादीप'मधून कळते. लक्ष्मीबाईंच्या नावावर आलेले डॉक्टरांचे आणि भावाचे पत्र पाहून "ही गोष्ट बरी नाही." (१५) अशी वडील माणसांकडून नाखुशीची सूचना मिळते. अगदी छोट्या छोट्या

गोष्टीही वडील माणसांच्या सल्ल्याशिवाय करण्याची रीत नव्हती. सणाच्या दिवशी पुरण किती घालायचे हेही वडील पुरुषांच्या सल्ल्याने ठरत असल्याचे 'गेले ते दिवस' सांगतात. वास्तविक स्वयंपाक घरातील नेहमीच्या अनुभवावरून पुरण किती लागेल याचा अंदाज पुरुषांपेक्षा स्त्रीलाच अधिक असणार ! पण प्रत्येक बाबतीत वडील माणसाला मान द्यायचा अशी रीत असल्याने इतर विचार केले जात नसावे. मुलींनी बांगड्या कशा व किती भरायच्या, लुगडे कोणत्या रंगाचे व कसे घ्यायचे हेही वडील माणसांच्याच इच्छेने ठरत असल्याचे प्रस्तुत आत्मचरित्रातून कळते. वडील माणसांसमोर लहानांनी पायात चपला घालणेसुद्धा इष्ट समजले जात नसे, असे 'पानाआडचे फूल'मध्ये वाचायला मिळते. वडील माणसांसमोर स्त्रियांनी आणि पुरुषांनी वागायच्या या सर्वसाधारण रीती ब्राह्मण आणि मराठा समाजात असल्याचे वरील आत्मचरित्रांत वर्णिलेल्या बाबींवरून कळते.

कृषिप्रधान अवस्थेपासून पुरुषांपेक्षा स्त्रीला वडील माणसांच्या अधिक धाकात राहावे लागले, असे डॉ. दु. का. संत यांचे निरीक्षण आहे. ते म्हणतात, "कृषिसंस्कृतीत शेतीच्या शोधाने माणूस ज्या नवनवीन गोष्टी शिकला त्यायोगे त्याच्या ठिकाणचा आत्मविश्वास वाढला. एक प्रकारच्या अहंमन्यतेचा उगम झाला. स्त्री-जीवनाच्या दृष्टीने मात्र या सर्व प्रक्रियेचा परिणाम प्रतिकूल झाला. स्त्रीदास्याच्या कल्पनेचा उगम झाला."[३] या परिस्थितीचा अनुभव आत्मचरित्रात चित्रित झालेल्या काही उदाहरणांवरून येतो. 'एक दासी' या नात्याने वागण्याचे नशिबी आल्याने कन्या, भगिनी, पत्नी, माता या सर्व भूमिकांमध्ये स्त्रियांची फार कुचंबणा झालेली दिसते. तिचे दास्यत्व प्रखरतेने जाणवते ते ती कुणाची तरी पत्नी आणि कुणाची तरी सून म्हणून वावरताना ! दुर्दैवाने पदरी पडलेले वैधव्य सांभाळताना !

स्त्रीला घरातील सगळी कामे पुरुषाच्या मर्जीने करावी लागत. त्यात तिच्या हातून थोडी जरी ढिलाई झाली तरी त्याचे तंत्र बिघडे. तिला बोलणी नि कित्येकदा मारही खावा लागे. पण त्यात तिला काही गैर वाटत नसे. नवरेपणाचा तो विशेष हक्कच या समजुतीत ती असावी. यशोदाबाई जोशींनी आपल्या चुलत मामंजींचे असे प्रसंग वर्णिले आहेत. मामंजी खूप संतापी होते. त्यांना केव्हा नि कशाचा राग येईल ते सांगता येत नसे. जेवणात जरा काही बिघडले, भातात खडा किंवा एखादा केस निघाला तर त्यांचा भडका उडायचा. बायकोला वाटेल तसे बोलत. ती बिचारी त्यांना वाढताना थरथर कापत असे. ते बाहेर गेले की घरातील बायकांना मोकळेपणाने वागता येई. एकदा ते गावाला जायला बाहेर पडले

---

[३] दु. का. संत, मराठी साहित्यातील स्त्री, (अप्रकाशित प्रबंध,) मुंबई विद्यापीठ १९५०, प्र. २

नि घरातल्या सगळ्या बायका झोपाळ्यावर बसून ओव्या म्हणायला लागल्या. त्यांत त्यांची बायको लक्ष्मीही होती. खेळ रंगलेला. तेवढ्यात मामंजी बाहेरगावी न जाता घरी परतले. त्यांनी दार उघडायला हाका मारल्या. पण खेळात दंग झालेल्या बायकांना ऐकू आले नाही. शेवटी त्यांनी लाथांनी दार मोडून घरात प्रवेश केला तो जमदग्नीच्या अवतारात. तो बघून लेकी सुना पळाल्या. पण लक्ष्मीबाईंना मात्र–शिव्यांची लाखोळी नि लत्ताप्रहार सोसावा लागला. त्या सुकून गेल्या. लंगडत कामे करीत होत्या. तक्रार करणार कुणाजवळ ?

। लक्ष्मीबाई टिळकांच्या सासूबाई "वामनराव अतिशय आजारी आहेत. त्यांची डोळेभेट घेण्यास अवश्य यावे. हयगय करू नये." (१–२३) या नवऱ्याच्या पत्राने भांबावून जातात. मुलाला कडेवर घेऊन अनवाणी मोरवाडला निघतात. वाट काट्याकुट्यांची. तेथें बघतात तो पतिदेव अंगणात गप्पा मारत बसलेले. त्यांची तब्येत ठीक बघून त्या विसावतात. झाडझूड करून, अंग धुऊन पाणी आणण्यास विहिरीवर जातात. डोक्यावर हंडा, खांद्यावर धुणे, आता जाऊन स्वयंपाक करायचा असे डोक्यात विचार अशा त्या घरी परत येतात. अंगणातील यजमानांना त्या म्हणतात, "एवढा हंडा उतरवायचा होता." (१–२४) त्यांना उत्तर मिळते "मी काही तुमचा चाकर नाही." (१–२४) एवढे बोलून त्यांचे समाधान झाले नाही. त्यांनी बायकोची मान धरून तिला लाथ मारली. त्यांनी जमिनीवर अंग टाकले. आणि यातच आठ दिवसांत त्यांचा शेवट झाला. अशी ही जीवघेणी नवरेशाही. फिर्यादीची सोय नाही.।

"मी सांगतो ते तू मुकाट्याने कर." (२५१) ह्या माधवरावांनी फर्मावि-लेल्या आज्ञेत रमाबाई रानडे आनंदात राहतात. त्याविरुद्ध कधीही कुरकुरताना दिसत नाहीत. पण नवऱ्याच्या आज्ञेनुसार वागण्यात बरेचदा रमाबाईंची कुचंबणा होताना दिसते. काही झाले असताना माधवरावांना कळून त्यांच्या सुखात व्यत्यय येऊ नये म्हणून कोपऱ्यात एकीकडे जाऊन गुपचून रडणे, पुन्हा काही झाले नाही म्हणून हसतमुखाने माधवरावांच्या स्वागतास हजर राहणे आणि एवढे करूनही ओळखायला आलेच तर आईची आठवण आली असे म्हणून वेळ मारून नेणे या प्रसंगांमधून रमाबाईंची कुचंबणा स्पष्ट होते. माधवराव आणि लीलाबाई (आमची अकरा वर्षे) यांच्या संसारात माधवरावांची पुस्तकी ज्ञानाची आवड आणि लीला-बाईंची संसाराची आवड या परस्परविरोधी आवडींमुळे माधवरावांच्या मार्गदर्शना-प्रमाणे चालताना लीलाबाईंना त्रास होतो. माधवरावांच्या वेताळाचा त्यांच्यावर फार परिणाम होतो. त्यावेळी "जीवन असह्य होई. लग्न केल्याचा पश्चात्ताप होई." (५५) अशी आपली अवस्था होत असल्याचे त्या सांगतात. हा लीलाबाईंच्या गुदमरीचा उद्‌गार वाटतो. बहुतेक पुरुषांनी आपला नवरेपणा न सोडल्याने

स्त्रियांची अशी कुचंबणा होत असल्याचे आत्मचरित्रांवरून कळते. यासारखी अनेक उदाहरणे आत्मचरित्रांत सापडतात.

सुनांची अवस्था फार केविलवाणी दिसते. सून म्हणजे हक्काचा गुलाम, दास व नोकर असल्याचे दृष्टीस पडते. बरेच दिवस देशावर गेल्याने कोकणी पद्धतीचा स्वयंपाक लक्ष्मीबाईंना करता येत नसे. याची कल्पना असूनही तांदळाच्या भाकरीला भेगा पडल्या म्हणून मामंजी कडाडतात, "... हे चालणार नाही, तुमची माहेरची माणसे जनावरे असतील ? मी नाही." (१·४१) आंथरूण घालायला विसरले तर जेवता जेवता पानावरून उठायला लावून आंथरूण घालायला लावतात. लक्ष्मीबाईंनी शाई सांडलेली नसतानाही खरा प्रकार समजून न घेता लक्ष्मीबाईंना म्हणतात, "ही सरकारी शाई होती. तुला भरून द्यावी लागेल." (१·४९) त्यासाठी तेच उपाय सुचवितात, "दळण दळ मोलाचे." (१·४९) अशा मामंजींच्या सासुरवासाच्या तऱ्हा 'स्मृतिचित्रां'तून समजतात. एकदा लग्न होऊन सासरी आल्यावर माहेरच्या माणसांचा तिच्यावर किंचितही हक्क राहत नसल्याचे जाणवते. माहेरून कोणी आले तर त्यांच्यासमोर सुनेने एकदम जाणे योग्य समजले जात नसे. सत्यभामाबाईंचे मामा (गेले ते दिवस) येतात तेव्हा त्यांना एकदम बाहेर येता येत नाही. आनंदीबाई शिर्के आपल्या निरीक्षणावरून सांगतात, सुनांच्या माहेरून खाण्याची वस्तू आली तर ती सुद्धा तिच्यापर्यंत पोचणे कठीण असे. "सुनांच्या माहेरून खाण्याची काही वस्तू आली की पाटील ती खालच्या खाली हस्तगत करीत. हे जाणून सुनांचे वडील एखादा लाडू, आंबा, पेढा किंवा कलिंगड, खरबुजाची खाप आपल्याजवळ लपवून ठेवीत आणि मुलगी रात्री केर, घाणपाणी टाकायला खाली आली की देत. अन् बिचारी काळोखात उभी राहून, ते खात असे." (७) किती करुण अवस्था आहे ही ! आईने आपल्या मुलीसाठी प्रेमाने पाठविलेला खाऊ वडील मंडळीकडून अविचारीपणाने खाल्ला जावा याचे आश्चर्य वाटते.

परघरची मुलगी याच भावनेने, सुनेला पदोपदी वागणूक मिळत असल्याचे दिसते. सासुरवाशिणींना मोठ्याने हसण्याबोलण्याची परवानगी नसल्याचे ज्योत्स्नाबाई भोळे (स्वरवंदना) आणि अन्नपूर्णाबाई रानडे (स्मृतितरंग) यांच्याकडून कळते. सुनेचे काही दुखले तर सांगण्याची रीत नव्हती. तिला दुःख असह्य होऊन सांगितले तर ढोंग करते असा तिच्यावर आरोप घेतला जाई. यशोदाबाई जोशी आपले अनुभव सांगतात, "... माझे पोट भारी दुखे. त्यांना वाटे की मी पोट दुखण्याचे ढोंग करते. मग त्याबाबत मला त्या फार बोलत. मला इतके वाईट वाटे की सांगायची सोय नाही. ... तशीच नेटाने बसून त्यांचे महिनाभर पुरेल इतके डाळ–तांदळाचे निवडण आटोपून देई." (२४) काही झाले तरी सुनेकडे

'सून' म्हणून पाहण्याचीच दृष्टी असल्याचे जाणवते. आपल्या मुलाच्या सुखासाठी ती आपल्या घरी आलेली आहे असा समंजस विचार झालेला आढळत नाही. सुना शेतात राबत असत पण त्यांना कणीस, काकडी, यासारख्या पाहिल्यावर कुणालाही खाव्याशा वाटणाऱ्या गोष्टी, आपल्या हाताने घेऊन खाण्याची उजागरी नव्हती. घरी भरपूर दूधदुभते असूनही सुनांना ताकाचे पाणी मिळणे मुश्कील असे. चांगले पदार्थ फक्त पुरुषांनाच मिळावे अशी त्यावेळी पद्धत होती. याचा परिणाम म्हणजे सुना चोरून ताक पीत आणि लोणचे खात. ही माहिती 'सांजवात'मधून मिळते. जिला मालकीण म्हणून संबोधायचे त्या सुनेचे हक्क या तऱ्हेचे होते. 'मी तो हमाल भारवाही' अशी तिची अवस्था.

सासूच्या धाकामुळे पोटच्या मुलाला वाटेल तेव्हा घ्यायची उजागरी नव्हती असे राधाबाई आपटे स्वतःचे निरीक्षण सांगतात. (उमटलेली पावले) काही वाईट घडले तर सून वाईट पायगुणाची असे, तिच्या डोक्यावर खापर फोडले जाते. नणंदेचा मृत्यू झाल्यावर लक्ष्मीबाईंच्या वाईट पायगुणाने झाला असा त्यांच्यावर ठपका ठेवला जातो. कामात चूक झाल्यामुळे श्रीयुत आगलावे (पण ऐकतं कोण) यांच्यावर खटला भरला जातो. तेव्हा उषाबाईच वाईट पायगुणाच्या ठरतात. सुनेच्या गुणांचेही कौतुक होत नसे. सरोजिनी शारंगधर भाकरी चांगल्या करायच्या. त्यावर सासूबाईंचा माहेराशी संबंधित शेरा, "दरिद्री माणसे, भाकरीचे तुकडे मोडायची सवय. पोळी मिळतीच कुठे ?" (११०) उलट एखाद्या वेळा भाजीला दोन वेळा फोडणी घातली तर, "अशानं आठवड्याला पासरी तेल लागेल. श्रीमंतांची लेक. तिला काय त्याचं !" (११०) सासुरवासाचे असे तऱ्हेतऱ्हेचे नमुने वाचायला मिळतात. पुरुषाचे जाऊ द्या पण स्त्रीच स्त्रीला छळते. आपल्या जातीचं मन ती जाणू शकत नाही.

सुनांना मिळणाऱ्या अशा प्रकारच्या वागणुकीचा परिणाम असा झाला की स्त्रियांची स्वतंत्र बुद्धीच कुंठली. आपण स्वतंत्र विचार करू शकतो याचा त्यांना विसर पडला. यशोदाबाई जोशी आपल्या निरीक्षणावरून सांगतात, "... अनेक सासुरवाशिणी, चाळीस–पंचेचाळीस वर्षांच्या झाल्या तरी सासूच्या हाताखाली समाधानाने राहत. त्यांना जसे काही ते स्वाभाविकच वाटे." (६) आपल्या सासूने आपल्याला छळले म्हणून आपण आपल्या सुनेला छळायचे ही परंपरा सांभाळण्यात त्यांना काही गैर वाटत नसे.

याला थोडेफार काही अपवादही सापडतात. उदाहरणार्थ, बाया कर्वेच्या सासरचे लोक. बायाच्या यजमानांचा मृत्यू होऊन बाया माहेरी येते. त्यावेळी बायाचे सासरे पत्र लिहितात, "माझी सून मेली. आहे हा मुलगाच आहे असे आम्ही मानतो. तरी सूनबाईस पाठवून द्यावे." (१८) पांढऱ्या पायाची, तुझ्यामुळे

आमच्या घराचे वाटोळे झाले अशा शिव्या घालत नाहीत. फक्त सासरेच बायाशी समजूतदारपणे वागतात असे नाही तर सासूबाईही बायाशी मुलीच्या नात्याने वागताना दिसतात. बाया चोरून नखाने खरवडून गूळ खात असे तेव्हा सासूबाईंनी बायाला कोणत्या प्रकारचा गूळ आवडतो हे विचारून "तिने एक लोटा घेऊन त्यात चिकट गुळाचे मडके ठेवून शिंके माझ्या हाताला पोचेल असे बांधले व वाटेल तेव्हा त्यातला खा, म्हणजे नख दुखायचे नाही." (२२) असे सांगितले. आपल्या प्रेमळ सासूची कृती आनंदीबाई कर्वे अभिमानाने सांगतात. कमलाबाईंना वैधव्य प्राप्त झाल्यानंतर त्यांच्या भावीकाळाची आर्थिक दृष्टीने तरतूद करण्यासंबंधी तात्यासाहेब केळकर विचारतात. तेव्हा सासऱ्यांनी सून म्हणून केलेला विचार कमलाबाई सांगतात. "लग्नाचे दिवशी जे दागिने माझ्या अंगावर घातले होते तेवढ्यांचीच किंमत माझ्या नावे बँकेत टाकली. दोघांमध्ये हा व्यवहार झाला पण या कानाचा त्या कानासही कळला नाही. अर्थात त्याच्याबद्दल चर्चा, वाटाघाटी, परस्परवितुष्ट येणे आदी गोष्टी घडण्याचे कारणच उरले नाही. खरोखर असे वर्णन अतिशयोक्त होणार नाही."

"कन्यायाः किल पूजयन्ति पितरो जामातुराप्तं जनं ।
सम्बंधे विपरीतमेव तदभूदाराधनं ते मयि ॥" (१६२)

या शब्दांत कमलाबाई देशपांड्यांनी आपल्या पितृतुल्य सासऱ्याचे कौतुक केले आहे. कमलाबाई साताऱ्याची कन्या शाळा चालवितात तेव्हा घरातील प्रत्येक जण सहानुभूतीने मदत करतो. "घरची मदत विशेषच होती. किंबहुना कमलाबाईंची शाळा असे म्हणण्याऐवजी देशपांड्यांची शाळा म्हणणे जास्त शोभेल," (२१३) अशी घरच्या लोकांनी केलेल्या साह्याची कमलाबाई 'स्मरणसाखळी'त नोंद करतात. विशेष काळजीने विचारपूस करून प्रेमाने खाऊ घालणाऱ्या सासूबाईंचे वर्णन सत्यभामाबाई सुखात्मे ( गेले ते दिवस ), सई आठवले ( आंब्याचा टाळा ), गिरिजाबाई केळकर (द्रौपदीची थाळी), जानकी फडणीस (स्मरण माला) करताना आढळतात. पण सुनेशी मुलगी समजून वागणारे सासू–सासरे तुरळक. सर्वसाधारणपणे सुनेकडे 'सून' म्हणूनच पाहण्याची दृष्टी आढळून येते.

प्रबोधनानंतर सुनेकडे पाहण्याची दृष्टी बरीच मवाळ झालेली दिसते. हा स्त्रीच्या अर्थार्जन व स्वतंत्र कुटुंबपद्धतीचा परिणाम असेल किंवा स्त्री इतर क्षेत्रात वावरू लागल्याने तिला प्राप्त झालेल्या विशाल दृष्टीचा परिणाम असेल किंवा सुनेला आपल्या हक्कांची जाणीव झाल्याची ही फलश्रुती असू शकेल. ज्योत्स्नाबाई भोळे आपल्या सुनेच्या चांगल्या वागणुकीचे, तिच्या पाककौशल्याचे तोंडभरून कौतुक करतात. सिल्व्हिया बाळंतीण असूनही ज्योत्स्नाबाईंना जेवायला जायला परवानगी देते तेव्हा त्या आश्चर्यचकित होतात. त्यांना सिल्व्हियाचे फार कौतुक वाटते.

त्याच भावनेने भारावून जाऊन आपल्या सुनेचे गुणगान त्या शैलजाबाईंजवळ करतात.

'आंब्याचा टाळा' मध्ये सुशीलाबाई आपल्या सुनेचे वर्णन करतात,"

" माझी ग ही शांताबाई, आहे सद्‌गुणांची खाण
... ... ... ... ... ... ... ... ... ...
झाल्या लेकी या परक्या सून माझी लेक खरी
... ... ... ... ... ... ... ... ... ...
लेक मानीते सुनेला सासू होय दुजी आई (१०४)

प्रमिलाबाई भालेराव, आनंदीबाई विजापुरे यांनीही आपल्या सुनांच्या गुणांचे गोडवे गायले आहेत. एक विरोधी चित्रही असे दिसते की—सासुरवास कमी झाला पण सूनवास वाढायला लागला आहे. वृद्धांची समस्या अधिकाधिक बिकट होत चालली आहे. वृद्धाश्रम हे त्याचेच फलित !

लहान मुलांना वागविताना त्यांच्या मनाचा विचार झालेला दिसत नाही. त्यांना फार धाकात वागविले जात असे. मुलांना चांगले वळण लागावे हाच या धाकामागील वडील मंडळीचा हेतू असावा. परंतु अतिधाकामुळे मुलांच्या मनावर काही विपरीत परिणाम होईल हा विचार त्यांच्या मनाला शिवताना दिसत नाही. लहान मुलांच्या अवस्थेसंबंधी आनंदीबाई शिर्के 'सांजवात' मध्ये लिहितात, " मुलांनी खेळावे या गोष्टीला विशेष महत्त्व नसे. मुलांनी देवासारखे गुपचूप बसावे अशी अपेक्षा असे. मुलांच्या खोडचा अनिवार झाल्या म्हणजे त्यांना शाळेत डांबीत." (२०९) मुलांचे शाळेत जाणेही आवश्यक समजले जात नसे असे दिसते. मुलांनी त्रास देऊ नये म्हणून शाळा हा त्यावरील तोडगा असल्याचे जाणवते. सुशीलाबाई आठवले लहान असताना वारंवार विहिरीजवळ जात. त्यांनी विहिरीजवळ जाऊ नये म्हणून विहिरीत उतरून भीती दाखविण्याचा प्रयत्न वडील मंडळी करतात. विहिरीत पडल्याने होणारे नुकसान त्यांच्या बालमनाचा विचार करून त्यांना समजावून सांगितले जात नाही. त्याकाळी मुलांना मिळणाऱ्या वागणुकीसंबंधी सुशीलाबाई आठवले आपला अनुभव सांगतात, "त्यावेळी मुलांच्या मानसशास्त्राचा विचार आताप्रमाणे रूढ नव्हता. कोणत्याही गोष्टीपासून मुलांना परावृत्त करण्यासाठी मार देऊन भीती उत्पन्न करणे हा राजमार्ग होता." (२५) अशी मुलांना वागविण्याची रीत आत्मचरित्रावरून कळते. मुलांचे हट्ट फारसे पुरवले जात नसल्याचे दिसते. जबरदस्त धाकामुळे मुलेही बिचकूनच वागताना आढळतात.

मुलगा 'वंशाचा दिवा' म्हणून बरेचदा मुलाकडे पाहण्याचा दृष्टिकोण सहानुभूतीचा दिसतो. त्या तुलनेत मुलीकडे पाहण्याचा दृष्टिकोण कठोर आढळतो. हा तत्कालीन समाजाचा परिणाम असावा. मुलींना आजच्या इतकी किंमत त्यावेळी

समाजाने दिली नव्हती. सद्य:परिस्थितीइतकी स्त्रियांच्या कर्तृत्वाची ओळखही त्याकाळी पटलेली नव्हती. ' मुलगी म्हणजे परक्याचे धन ' अशी सर्वसाधारण लोकांची पारंपरिक व संकुचित वृत्ती असल्याचे दृग्गोचर होते. उदाहरणार्थ, सरोजिनी शारंगपाणी यांचा जन्म झाल्यावर ' मुलगी ' झाल्याचा निरोप येताच वडील गणपतीची पूजा अर्धी टाकून उठतात. सगळ्यांचे चेहरे आंबट होतात. ' मुलगी ' या दृष्टिकोणातून पाहत असल्याने आशाबाईंना पावसाळ्यातही छत्री घेऊन दिली जात नसावी. शरीराला न पेलणारे, वयाला न शोभणारे अडीच रुपयांचे बांड घेऊन दिले असावे असे वाटते.

लहान मुलांना त्यांच्या मनाचा कानोसा घेऊन आजच्याइतके हळूवार रीतीने त्या काळात वागविल्याचे दिसत नाही. पुढे इतर बदलांबरोबर ही वृत्तीही बरीच बदलत गेल्याचे जाणवते. मुलांची कुवत पाहून, त्यांची आवड. ओळखून त्यांना शिक्षण दिले जाते. उदाहरणार्थ, वंदना भोळे हिची गाण्याची आवड, वारशाने वाट्याला आलेले गाण्यास आवश्यक असे गुण लक्षात घेऊन तिला गाणे शिकविले जाते. परदेशातही पाठवले जाते. तिच्या गाण्याच्या आवडीचा विकास केला जातो. आनंदीबाई विजापुऱ्यांची सुनेला परदेशात जाऊन दंतवैद्याचे शिक्षण घेते. उत्तम दंतवैद्य म्हणून नावारूपाला येते. उषाबाई डांग्यांची रोझा धिटाईने संभाषणे करून माणसांमधील ' माणूस ' जागविताना दिसते. हंसाबाईंची शोभा सिनेमाक्षेत्रापासून पूर्णपणे अलिप्त राहून ताठमानेने नोकरी करते. सुधाताई अत्र्यांची मुलगी ' नानी ' (शिरीष पै) स्वेच्छेने एलएल. बी. झाली आहे.

याशिवाय या कुटुंबपद्धतीच्या अनुषंगाने आणखी काही बारीक सारीक समाजातील रूढींचे आकलन या आत्मचरित्रांतून होते. गाणे म्हणणे स्त्रियांसाठी योग्य समजले जात नव्हते. ही ब्राह्मण समाजात असलेली रीत ' जाऊ मी सिनेमात ?' मध्ये शांता आपट्यांनी सांगितली आहे. तर " गाणे ऐकणे ही देखील सभ्य कुटुंबाची—निदान स्त्रियांची तरी रीत नव्हती. कथा—पुराणाच्यावेळी जे गाणे ऐकायला मिळे तेच." असा तत्कालीन समाजातील रीतींचा खुलासा मृणालिनीबाईंनी केलेला आहे. नृत्यकलेकडे संशयाने पाहत असल्याचे माझी ' नृत्य साधना 'मध्ये रोहिणी भाटे सांगतात. ' सांगत्ये ऐका 'मध्ये हंसाबाई वाडकर आपला अनुभव कथन करतात, " तो काळ स्त्रियांनी चित्रपटात काम करण्याचा, नाचण्याचा, गाण्याचा नव्हता. समाज अशा स्त्रियांकडे कुत्सित नजरेने पाहत असे." (४) मुलींनी नाटकात काम करणे इष्ट समजले जात नसल्याचे इंदिराबाई भागवत यांच्या ' या सदाशिव ' मधून कळते. यावरून सिनेमा, नाटक व गायन यात स्त्रियांनी भाग घेऊन त्याद्वारा जनसमूहासमोर आलेले समाजाला चालत नसल्याचे दिसते. प्रत्येक स्त्री आपली वेणी दुसऱ्या स्त्रीकडून घालून घेत असे. स्वत: स्वत:ची वेणी घालणे

उद्धटपणाचे लक्षण वाटत असल्याचा खुलासा सत्यभामाबाई सुखात्मे आणि जानकीबाई फडणीस यांनी केला आहे. स्त्रियांनी आरशात पाहणेदेखील चांगले समजले जात नसे. कुणी आरशात आपले तोंड पाहिले तर म्हणायचे, "बसल्या आपला मुखडा न्याहाळीत ऐन्यात ! पण त्यामुळे नकटं नाक सरळ थोडीच होणार आहे ?" गेले ते दिवस : (५८) असे वेडेवाकडे बोलणे लहानशा बाबींसाठी ऐकावे लागत असे. नुकत्याच जन्मलेल्या बाळाला सुद्धा 'अहो', 'जाहो' म्हणत असत. 'अहो' 'जाहो' चे पालन जितके काटेकोर होई तितके ते घराणे प्रतिष्ठित समजले जात असल्याची चाल गुजराथमध्ये असल्याचे 'सांजवात' मधून कळते. घरात पुरुषमंडळी उपस्थित नसताना परपुरुषाला चहा देणे इष्ट समजले जात नसल्याचे गिरिजाबाई केळकरांनी 'द्रौपदीची थाळी'मध्ये सांगितले आहे. "मोठाली एकत्र कुटुंबे, पडदानशीन पद्धत त्यामुळे स्त्रियांचं असं बाहेर वावरणं नव्हतं. लग्नाच्यावेळी उभ्यानं पुढच्या दारात शिरलं की मेल्यावर आडव्यानं मागच्या दारानं बाहेर निघायचं..." (२३) अशी मराठवाड्यातील स्त्रियांची अवस्था प्रमिला भालेराव यांनी आपल्या, 'अश्वत्थाची फुले' या आत्मचरित्रात कथन केली आहे. नवरा बायकोचे फिरणे लोकांच्या विलक्षण कुतूहलाचा विषय असल्याचे 'गोदातरंग' व 'आमची अकरा वर्षे'मध्ये वाचायला मिळते. मोरोपंत जोशी, रानडे यासारख्यांकडून विभक्त कुटुंबपद्धतीचे धाडस झाले आहे. पण अशी उदाहरणे थोडी आहेत. त्यापायी विविध समस्यांना त्यांना तोंड द्यावे लागले.

आत्मचरित्रांमध्ये उल्लेखल्या गेलेल्या परिस्थितीवरून वरील कौटुंबिक चालीरीतींचे आपल्याला ज्ञान होते. प्रबोधनपूर्व कालखंडापेक्षा प्रबोधनोत्तर कालखंडात थोडी सुधारणा जाणवते, पण तेवढ्यावरून समाज बदलला असे ठामपणे सांगता येत नाही.

### विवाहपद्धती

विवाह ही एक समाजाची गरज आहे. लोकहितवादींचे विचारधन समजावून सांगताना पु. ग. सहस्रबुद्धे म्हणतात, "लग्न हा धर्माचा नियम नसून ती एक रीत आहे."[१] तर 'स्त्री जीवनाची नवी क्षितिजे'चे प्रस्तावनाकार न. वि. गाडगीळ विवाहासंबंधी आपले विचार मांडतात, "... विवाह ही केवळ व्यक्तिगत बाब नाही. तिला एक सामाजिक पार्श्वभूमी असते व काही सामाजिक हेतूही असतो आणि तो हेतू म्हणजे समाज चालविण्याचा असतो, वंश चालवायचा असतो आणि म्हणून स्त्री आणि पुरुष हे प्रवृत्तीनुसार एकत्र येतात. त्यांच्या एकत्र येण्याचा सामाजिक हेतू योग्य तऱ्हेने साध्य व्हावा म्हणून समाज काही नियमन,

---

[१] 'लोकहितवादींची शतपत्रे,' संपा. पु. ग. सहस्रबुद्धे, आ. ति. पुणे, १९६३ पृ. ३६

काही नियंत्रण करीत असतो. आणि हे नियमन व नियंत्रण काही कायद्याने होते, काही सामाजिक संकेताने व काही व्यक्तिगत संयमाने."[६] या कारणास्तव विवाहाची समाजाला गरज असल्याचे कळते. या आवश्यक बाबतीतही अनेक विपरीत चालीरूढी दिसतात.

हिंदुधर्माचा इतिहास तपासला तर इला, उर्वशी यांच्या विवाहपद्धतीवरून ते जाणत्या वयातील विवाह दिसतात. कमळाच्या पानावर प्रेमपत्र लिहिणारी शकुंतला, कृष्णाला पत्र पाठवून आपणांस पळवून नेण्यास सांगणारी रुक्मिणी, अर्जुनाशी प्रेमविवाह करणारी सुभद्रा या स्त्रिया नक्कीच बाला नव्हत्या. पण दहाव्या शतकानंतर चित्र पालटले. परकीयांची आक्रमणे, जैन व बौद्धधर्माच्या प्रभावाने जाणत्या, शिकलेल्या मुली वयाच्या सोळा-सतराव्या वर्षी संन्यास घ्यायला लागल्या. म्हणून हिंदुधर्मात सामाजिक अनर्थ ओढवण्याच्या भीतीने तिचे उपनयन व शिक्षण बंद होऊन स्त्री धर्मिणी होण्याआधीच लग्न उरकण्याची प्रथा पडायला लागली. विचारवंतांनी " ऋतू प्राप्त झालेल्या मुलीला अविवाहित ठेवणे म्हणजे दरमहा एका भृणहत्येचे पाप डोक्यावर घेण्यासारखे आहे." " कसला तरी नवरा पाहून मुलीचा विवाह कसातरी उरकून टाकावा." यासारखे नियम घातले. त्यामुळे तिला कळू लागायच्या आतच तिचे शुभमंगल होई. लग्न म्हणजे-नवे कपडे, दागिने, गोडधोड जेवण, नवरा म्हणजे खेळायला सवंगडी ही तिची समजूत. आपले लग्नही पुढे त्यांना आठवत नसे. यशोदाबाईंचे लग्न वयाच्या सहाव्या वर्षी झाले. आपल्या वरातीचा तेवढा प्रसंग लक्षात राहिल्याचे त्या सांगतात-" त्यावेळी हत्ती जोरात झुलू लागला. इतका की मी भयभीत होऊन रडू लागले ! तेव्हा माझ्या शेजारी बसलेल्या माझ्या पतिराजांनी जवळच फळाचे ताट होते त्यातले एक केळ सोलून मला खायला दिले आणि त्या नादात माझे रडणे थांबले !" (८) पण हेही वय लग्नाला मोठे झाले. कारण दुसऱ्या तिसऱ्या वर्षी लग्न झाल्याची उदाहरणे आहेत. सत्यभामाबाई सुखात्म्यांच्या आत्मचरित्रात-तीन वर्षांच्या सुनेला सोवळ्यातील सासूकडे जायचे होते म्हणून तिचे कपडे काढायला तिच्या लहानशा नवऱ्याला हाक मारावी लागली. असा उल्लेख येतो. आठ वर्षांनंतर मुलीचे लग्न केले तर 'मुलीचा बाप नरकात जातो' असे त्यावेळी धर्मशास्त्र सांगत होते. आठ वर्षांच्या वरची मुलगी घोड नवरी ठरे तर तेरा वर्षांचा मुलगा घोडनवरा. 'आमचा जीवनप्रवास, ह्या 'स्मृतिचित्रे,' 'माझे पुराण,' 'पाना आडचे फूल' वगैरे आत्मचरित्रांत वाचायला मिळते. लग्नाची ही एक तऱ्हा तर दुसरी-राजरोस होणारे बाला जरठ विवाह. पन्नास वर्षांचा मुलगा व दहा वर्षांची

[६] लोकहितवादींची शतपत्रे, संपा. पु. ग. सहस्रबुद्धे, आ. ति. पुणे, १९६३; पृ. ३६

मुलगी तर केव्हा बारा वर्षांच्या मुलीचे पन्नास वर्षे वयाच्या पुरुषाशी लग्न, कधी वधू तेरा वर्षाची तर वर त्रेचाळीस वर्षांचा अशी बाला–जरठ विवाहाची उदाहरणे सत्यभामाबाई सुखात्मे (गेले ते दिवस), सुशीलाबाई आठवले (आंब्याचा टाळा), यशोदाबाई जोशी (आमचा जीवनप्रवास) यांनी सांगितलेली आहेत आणि याही पुढची अवस्था म्हणजे "मूल पोटात असतानाच लग्न ठरे नि परिणामी विजोड जोडपे होई. सत्यभामाबाई सुखात्मे." (१०) आनंदीबाई शिर्के यांचा अनुभव. "एक सतरा अठरा वर्षांची मुलगी व तिचा नवरा एवढासा दहा बारा वर्षांचा पोर होता. ती त्याला पाहून लाज काढायची म्हणजे तोंडावर पदर ओढून तोंड झाकायची. हे विजोड जोडपे म्हणजे पोटात असताना ठरलेल्या लग्नाचा परिणाम होता. मुलगे किंवा दोन्ही मुलीच जन्माला आल्या तर दुसरे भिन्नलिंगी मूल जन्माला येईपर्यंत थांबायचे व मग त्या विजोड जोडप्याची सांगड घालायची अशी प्रथा होती." (१९) आपण दिलेला शब्द पाळायचा, एखाद्या घराण्याशी आपला संबंध कायम ठेवायचा, या इच्छांमुळे अशा विवाहांची प्रथा पडली असावी.

ब्राह्मण समाजात मुलीला दारोदार दाखवायला घेऊन जाण्याची पद्धत नसल्याचे आनंदीबाई कर्वे यांच्या 'माझे पुराण' मधून कळते, तर याच काळात वैश्य समाजात मुलगी दाखवायला नेण्याची पद्धत असल्याचे सुधाताई अत्रे यांच्या 'गोदातरंग'मधून समजते.

वेदकाळी वराच्या निवडीबाबत काही नियम शास्त्रकारांनी घातलेले दिसतात. त्याचे पौरुष वादातीत हवे असे. नारद ऋषींच्या मते बळकट हाडे असलेला वर योग्य होय. वात्सायनाच्या दृष्टीने विद्यासंपन्न व खरा प्रेम करणारा वर निवडावा. परस्पर आकर्षण हे त्याच्या दृष्टीने योग्य सूत्र. त्याच्या श्रीमंतीकडे त्यांनी कानाडोळा केला आहे. मध्ययुगीन समाजाने हे सगळे शास्त्र बाजूला सारले. वधू–वरांच्या निवडीबाबत सर्वाधिकार घरातील वडील मंडळीकडे असत.

मुलगा किंवा मुलगी यांच्या मताला किंमत दिली जात नसे. पार्वतीबाई आठवले स्वानुभव लिहितात, "...मला असे कळले की पाय लंगडा आहे, नोकरी पंधरा रुपये दरमहाची आहे. नातलग सासू, सासरा वगैरे कोणी नाही. मला स्वतः हे स्थळ मनातून पसंत नव्हते. तरी मी काही बोलले नाही." (४–५) रमाबाई केदार सांगतात, "तो काळच असा होता की लग्नाच्या बाबतीत मुलीची संमती घेण्याची आईबापांना जरुरीच भासत नसे व या सामाजिक रूढीमुळे आपले विचार बोलून दाखविण्याची संधी मुलींना कधीही मिळत नसे." (३२) जानकीबाई फडणीस यांच्या 'स्मरणमाला' या आत्मचरित्रातही अशा प्रकारचे उल्लेख येतात. "मुलीच्या लग्नाच्या दृष्टीने घरदार, पैसा, कूळ, शील, नावलौकिक

यापुढे बी. ए., एम्. ए. काही जास्त वाटत नाही." (२) अशी माहिती 'या सदाशिव' मध्ये इंदिरा भागवत यांच्याकडून मिळते.

बालविवाहाचा परिणाम म्हणजे मुलींची शारीरिक आणि मानसिक अशी दोन्ही प्रकारची कुचंबणा होत असे. जे वय खेळण्याबागडण्याचे त्या वयात त्यांना 'सून' म्हणून घरात जबाबदारीने वागावे लागे. त्यामुळे बालपण मोडले जात असे. अजाण वयात मातृत्वाची न पेलणारी जबाबदारी सांभाळावी लागे. वयाच्या पंधराव्या वर्षी नानाचा जन्म झाल्याचे पार्वतीबाई आठवल्यांनी 'माझी कहाणी' मध्ये सांगितले आहे. त्याचे अनिष्ट परिणाम पुढच्या पिढीला भोगावे लागले तरी त्याची दखल समाजाकडून घेतली जात नसे. १८१८ मध्ये इंग्रजांची हिंदुस्थानवर सार्वभौम सत्ता प्रस्थापित झाल्यावर इंग्रजी विद्येच्या संपर्काने समाजात फरक पडल्याचे दिसते. १८९१ साली विवाहासाठी मुलीचे वय दहा-अकरा वर्षे व मुलाचे वय अठरा वर्षांच्या आत नसावे असा कायदा झाला. नंतर शारदा कायद्यानुसार मुलीच्या लग्नाचे वय चौदा वर्षे निश्चित करण्यात आले आणि शेवटी १९२९ मध्ये बालविवाहाला कायद्याने बंदी करण्यात आली पण कायदे फक्त पुस्तकात झाल्याचे आढळून येतात. त्यांची अंमलबजावणी आत्मचरित्रांत उल्लेखिल्या गेलेल्या परिस्थितीवरून बरेच ठिकाणी झालेली दिसत नाही. १९५५ मध्ये म्हणजे स्वातंत्र्य-प्राप्तीनंतर हिंदुविवाह कायद्यानुसार मुलीचे लग्नसमयी वय पंधरा वर्षे ठरले. १९७६ मध्ये ही वयोमर्यादा मुलीच्या अठरा वर्षांपर्यंत वाढविण्यात येऊन एकवीस ही मुलाच्या लग्नाची वयोमर्यादा कायद्याने निश्चित झाली.

आत्मचरित्रकार स्त्रियांची लग्ने बहुतेक वयाच्या बारा, तेराव्या वर्षी झालेली आढळतात. पण त्यांच्या पुढच्या पिढीची म्हणजे मुलींची लग्ने मुलगी पूर्णपणे सज्ञान झाल्याशिवाय झालेली दिसत नाहीत. महात्मा ज्योतीबा फुले, लोकहितवादी, न्यायमूर्ती रानडे, सुधारक आगरकर यांनी केलेल्या स्त्रीसुधारणांच्या प्रयत्नांचे ते फळ वाटते. पण याचा एक परिणाम म्हणजे प्रौढ विवाह समस्या होय. मागच्या व आजच्या दोन्ही काळांतील हा प्रश्न दिसतो. शिक्षणामुळे मुलींना स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव होऊ लागली. शिकलेल्या प्रौढ मुलींना मनासारखा नवरा मिळाला नाही तर त्या अविवाहित राहणे पसंत करायला लागल्या. यादृष्टीने गंगूताई पटवर्धन यांच्या 'चाकोरीबाहेर' मध्ये आलेल्या "अण्णांच्या महिला विद्यापीठाचे ध्येय सुगृहिणी व सुमाता निर्माण करणं हे आहे. पण त्यातून शिकून बाहेर पडणाऱ्या पुष्कळ मुली अविवाहित राहण्याचं ठरवतात असं का होतं ?" या वादाचे वर्णन मननीय आहे. (९१) आणि गंमत म्हणजे बहुतांशी तेच आजचेही प्रश्न आहेत. वर पक्षाचा वरचष्मा विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातही कायम आहे. वर पक्षाचे विक्षिप्त अनुभव सरोजिनी शारंगपाण्यांनी नमूद केले आहेत. मुलाच्या चष्म्यासंबंधी वडील विचारतात तेव्हा नवऱ्या मुलाचा धाकटा

भाऊ एकदम उसळून म्हणतो– "तुम्हाला आम्ही लग्न ठरवायला बोलवलं होतं ? मुलगी द्यायची नसेल तर देऊ नका. पण काहीतरी शंका काढून फाटे फोडू नका. असल्या नसत्या प्रश्नांची उत्तरे आम्ही देणार नाही." (८९) विवाहसमयी राजकन्या आपल्याबरोबर शंभर गाई आणतात असं अथर्ववेद सांगतात. पण येथे स्वखुशी होती. आत्मचरित्रांत हुंड्याविषयी तक्रार ऐकायला येत नाही. पण आज मात्र ही समस्या अधिकाधिक बिकट होत आहे. निष्पाप जीव यापायी बळी पडत आहेत. वराची सांपत्तिक, शैक्षणिक उंची जितकी जास्त तितका हुंड्याचा आकडा जास्त. ही वसुली कधी पैशाच्या रूपात तर कधी वस्तूंच्या रूपात होताना दिसते.

विजातीय विवाहाची पद्धत रूढ नसल्याचे उल्लेख 'गोदातरंग': सुधा अत्रे, 'अजून चालतेची वाट,: आनंदीबाई विजापुरे या आत्मचरित्रांत आलेले आहेत. 'सांजवात' मधून देशस्थ व कोकणस्थ मराठे विवाहही किती वादळी ठरत होता हे कळते. केतकरांच्या पत्नी शीलवतीबाई ज्यू आहेत. पुढच्या पिढीत आनंदीबाई विजापुरे यांच्या सुनीलाचे लग्न बंगाली गृहस्थाशी झाले तर ज्योत्स्नाबाई भोळे यांच्या सूनबाई पाश्चात्य आहेत. सत्यभामाबाई सुखात्मे यांचे जावई कानडी तर नातजावई गुजराथी आहेत. पण अशी उदाहरणे बोटांवर मोजण्याइतकी आहेत. पूर्वी समाज ज्या रोषाने विजातीय विवाहांकडे पाहत होता ती तीव्रता थोडी कमी झाल्यासारखे वाटते.

त्याकाळी बालविवाह होत असत. स्त्रियांना शिक्षणही दिले जात नसल्या-मुळे विधवांची स्थिती अतिशय दयनीय असल्याचे दिसते. पूर्वी हिंदुधर्मात रूढ असलेली विधवा विवाह नियोग पद्धती विसरलेली आढळते.

सत्यभामाबाई सुखात्मे 'गेले ते दिवस' मध्ये विधवांची अवस्था सांगतात, "माझ्या धाकट्या मामांची ... दत्तोपंत कुर्लेकर ह्यांची मुलगी सोनी बालविधवा होती. तिच्याकडे एकदा माझे थोरले मामा आले असताना तिने उसाचे करवे करून त्यांना बशीत खायला दिले. पण ती विधवा म्हणून मामांनी ती बशी तशीच फेकून दिली." (९) पुढे सत्यभामाबाई म्हणतात, "त्या काळी विधवांशी वागण्याची समाजाची तऱ्हाच वेगळी होती." (९) पार्वतीबाई आठवल्यांनी 'माझी कहाणी' मध्ये विधवांच्या अवस्थेचे करुणचित्र काढले आहे. कुणाचेही डोळे वाचताक्षणी पाणवावे अशी ही अवस्था आहे. बालविधवा म्हणजे लोकांच्या गमतीचा विषय असल्याचे बाया कर्वे स्वानुभवावरून लिहून जातात. "कोणी वेडेवाकडे बोलावे, कोणी उगीचच खोडी काढावी, कोणी माझ्याकडे पाहून वाकुल्या दाखवाव्या." (२७) विधवांना अनेक नियमांनी जखडलेले असे आणि त्याला धार्मिकतेचे आव-रण घातले जात असे. विधवेचे केस काढून तिला लाल लुगडे नेसवून अंधाऱ्या खोलीत बसविले जाई. अशी पद्धत 'पण ऐकतं कोण' मध्ये उषा डांगे वर्णन कर-

तात. काही झाले तरी तिला मुंडन करावेच लागे. नाहीतर नवऱ्याला नरक प्राप्त होतो अशी समजूत होती. तिला पुराणाला जाता येत नाही, उपास करता येत नाही; एवढेच नव्हे तर तिचा नमस्कारही पुराणिकाला चालत नाही. लोक विधवांच्या हातचे खात नसत. न्हालेल्या विधवेच्या केसांतून जितके थेंब गळतात त्या प्रत्येक थेंबागणिक तिच्या नवऱ्याला किड्याचा जन्म येतो अशा समजुती असल्याचे आनंदीबाई कर्वे आणि यशोदाबाई जोशी यांच्याकडून कळते. गुजराथी विधवांना लालकाळ्या आलवणात तोंड झाकून सकाळ संध्याकाळ मोठमोठ्याने हेल काढून वर्षभर नेमाने रडावे लागते, अशी गंभीर आणि गमतीदार पद्धत आनंदीबाई शिर्कांनी सांगितलेली आहे. " आपला समाज टाकलेल्या निर्जीव वस्तू उचलणारा, वापरलेली वस्त्रे अंगाशी लावणारा, त्याला हे कसं चालणार ? टाकलेल्या बाईकडे तो फक्त उपेक्षेनेच पाहू शकतो. हिच्यातच काही दोष असेल ... किंवा याहीपुढे जाऊन मी तर ऐकलं की हिचं वागणं फारच सैल होतं ... म्हणून तिच्या चारित्र्याची चिरफाड करू पाहतो. तीच स्त्री श्रम करून चार पैसे मिळवू म्हणाली तर तिच्या शरीराचा सौदा करण्यास उभा ठाकतो." (२७) अशी विधवा आणि परित्यक्ता स्त्रियांची दुःखे सुमतीबाईंनी बोलकी केली आहेत. विधवांवर केले जाणारे आरोप त्या सांगतात, " नवऱ्याच्या मृत्यूला तीच कारणीभूत झाल्याप्रमाणे तिला सर्व हिडीसफिडीस करतात. हिडीसफिडीस करूनही लोक घरी ठेवून घेतीलच अशी खात्री नाही. कारण विधवेची सावलीही त्यांना अशुभ वाटते ... अभद्र वाटते, सासरची माणसं परकीच असतात. माहेरची माणसं रक्ताची ! परंतु लग्न लावून दिल्यानंतर जणू काही हे नातं तुटतं. जिव्हाळा सरतो. मग उरतो व्यवहार ! जग काय म्हणेल ही धास्ती ... या धास्तीमुळे ते तिला आपल्याकडे दोन दिवसांसाठीही ठेवून घ्यायला तयार नसतात. त्यांना ते मोठे संकट वाटतं ! अशी सासरला मुकलेली, माहेराला अंतरलेली मुलगी." (५८–५९) किती केविलवाणी अवस्था आहे ही ! हृदय हेलावून सोडणारी ! डोळ्यात चटकन पाणी आणणारी ! " पुर्नविवाहाचा कायदा नव्हता आणि शिक्षणाची प्रथा नव्हती. बालविधवेचे सर्व आयुष्य आप्तेष्टांचे कष्ट उपसण्यात, दुसऱ्यांच्या ताबेदारीतच जात असे." (९) असे ' गेले ते दिवस 'मध्ये सत्यभामाबाईंनी विधवांच्या अगतिकतेचे वर्णन केले आहे. वरील विवेचनावरून विधवा म्हणजे ' समाजाने टाकलेली स्त्री ' असेच म्हणावे लागेल. समाजाच्या या विचारसरणीने आपण पापी आहोत, अशुभ आहोत असे तिला वाटत असे. पुर्नविवाहाची कल्पना अशा विचाराने भारलेल्या विधवेला पटत नसे. आनंदीबाई कर्व्यांचे वडील म्हणत– " दूर कोठेतरी जाऊन कुमारिकाच आहे असं सांगून तुझे लग्न करावे." त्यावेळी त्या उत्तर देत,– " नको बाबा, लग्न केलं नि तोही पती अंतरला तर ! नकोच ते. त्यापेक्षा सासरी राहून काम केले

तर सारे आयुष्य जाईल." उषाताई डांग्यांचेही मत असेच, "बग्याच्या जीवनात आपण कसे जायचे ?" (३२)

१८५६ साली पुनर्विवाहाच्या कायद्याला मान्यता मिळाली. बायाचा पुनर्विवाह १८९३ मध्ये झाला. म्हणजे या कायद्यानंतर विवाह होऊनही कर्वे आणि बाया यांना समाजाने वाळीत टाकले. आनंदीबाईंचे वडील बाळकृष्ण केशव जोशी यांच्या-कडून पुनर्विवाहाला मान्यता दिल्याबद्दल शंभर रुपये दंड घेतला जातो. पुनर्विवाहित बायाला कोणी कुंकू लावायला देखील पुढे येत नाही. तिला कुंकू लावून आपल्या सुखाला कुठे धक्का लागेल. आपले सुख दुखावेल अशी इतर स्त्रियांना भीती वाटते. लीलाबाईंच्या बाबांचा पुनर्विवाह झाल्यामुळे लीलाबाई व माधवराव यांचे लग्न लावायला ब्राह्मण यायला तयार होत नाही. पुनर्विवाहिताच्या मुलीशी लग्न झाल्यामुळे माधवरावांची कन्याशाळेतील नोकरी सुटते. पुनर्विवाहाचे असे परिणाम तत्कालीन समाजात होत असल्याचे दिसते.

यानंतर शिक्षणाच्या बळाने स्त्रियांना मिळालेल्या स्वातंत्र्याने स्त्रियांना धैर्य आलेले दिसते. स्नेहप्रभा प्रधानांचा घटस्फोट (स्नेहांकिता), आनंदीबाई विजा-पुऱ्यांनी गणपतराव विजापुऱ्यांशी घटस्फोट घेऊन गणपतराव बेहऱ्यांशी ठेवलेले विवाहबाह्य मैत्रीचे संबंध ही याची उदाहरणे होत. पण त्यासाठी सुधारकांना मात्र पावलोपावली झगडावे लागल्याचे इतिहास सांगतो. अण्णासाहेब कर्व्यांनी 'विधवा-श्रम' काढला. पद्मश्री सुमतीबाई शहा यांनी 'श्राविकाश्रमा'ची स्थापना केली. "१८५६ साली विधवा विवाहाचा कायदा पास झाल्यापासून त्याचा लोकांस सहज फायदा घेता येतो अशी स्थिती येण्यास १९५६ म्हणजे शंभर वर्षे लागली."[6] असे विधान कमलाबाई देशपांडे आपल्या निरीक्षणावरून करतात. वरील विवेचनावरून समाजाची प्रगती फार मंद गतीने होत असल्याचे जाणवते.

मुलगी बघायला गेल्यावर तिचे नाक, कान ओढून सोशिकता पारखण्याची पद्धत, बहीण–भावंडे किती विचारून मुकी, बहिरी आहे का म्हणून वधूसंशोधन करण्याची रीत, मध्यप्रदेशात असलेली लग्नापूर्वी गंगापूजन करण्याची रूढी, पाठ-राखिणीची रीत, लग्नातील रुसणीफुगणी, भांग घालून सर्वांना हसविणे, चार चार दिवस लग्नसमारंभ करण्याची चाल लक्ष्मीबाई टिळक, यशोदाबाई जोशी, लक्ष्मी-बाई पटवर्धन, इंदिराबाई भागवत, सत्यभामाबाई सुखात्मे यांनी सांगितली आहे. त्यावेळच्या समाजातील विवाहसंबंधित बारीक–सारीक रीती यावरून कळतात.

बहुतांशी स्त्रियांची अशी अवस्था असल्याने बायकांचा जन्म नकोसा वाटे. मुलीचा जन्म म्हणजे संकट समजले जाई. 'ज्याच्या पदरी पाप त्याच्या पदरी लेकी आपोआप' ही म्हण या विचाराचे फलित होय.

---

[6] कमलाबाई देशपांडे; स्त्रियांच्या कायद्याची वाटचाल; पुणे, १९६०. पृ. ११२

पुढे ही परिस्थिती बदललेली दिसते. शिक्षणाने स्त्रीला डोळस बनवले. आर्थिक दृष्टीने समर्थ केले. त्यामुळे नवरा, मुले याविषयी तिचा दृष्टिकोण पालटला आहे. पतीला देव मानण्याचा जमाना काहीसा बदलला आहे. तो एक मानव आहे, सहचर आहे, आपण त्याच्यापेक्षा कोणत्याही बाबतीत कमी नाही अशी तिची विचारसरणी बनत चालली आहे. तिचे वागणे–बोलणेही मोकळे होत चालले आहे. विशेषत: स्त्रीविषयक अवस्था, दुखणी, यांची वाच्यता करीत नसे. अगदीच नाइलाज झाला तर मला 'तीन दिवस उपास घडला,' 'माझी माहेरी जाण्याची वेळ आली' असे सूचक उल्लेख केले जातात. बऱ्याच आत्मचरित्रांत याचा नामनिर्देशही आढळत नाही. सुधारणांचा परिणाम झालेल्या यशोदाबाई जोशी, सुधा अत्रे यांच्याकडून मात्र यासंबंधी बरीच स्पष्ट वर्णने येतात. अलीकडच्या आत्मचरित्रांत मात्र बालिका, किशोरी, तरुणी, प्रेयसी, पत्नी व माता या प्रत्येक अवस्थेत उठलेले भावकल्लोळ नि:संकोचपणे रेखाटलेले दिसतात. (पानाआडचे फूल) विवाहबाह्य संबंधाची स्पष्ट कबुली हंसा वाडकर, आनंदीबाई विजापुरे यांच्या आत्मचरित्रात वाचायला मिळते. त्यांच्या त्यामागील वेगळ्या व्यथाही समजतात. आपल्या वाट्याला आलेले जिणे तडजोडीने भोगणे त्यांना पटत नव्हते. मनासारखे घडण्यास समाजबंधने त्यांना थोपवू शकली नाहीत. ही स्त्रीच्या नव्या स्वातंत्र्याची झेप वाटते. पुरुषाची स्त्रीशी असलेली वासनिक मैत्री समाज मान्य करतो. पण स्त्रीने आपल्या प्रे[illegible] किंवा मैत्रीला प्रतिष्ठा मागितली तर मात्र संघर्ष निर्माण होतो !

**शैक्षणिक अवस्था**

वेदकाळात स्त्री–शिक्षणाला पुरुषाइतकेच मानाचे आणि महत्त्वाचे स्थान दिले जात असे. मुलांप्रमाणे मुलीचाही उपनयन विधी होऊन तो संस्कार म्हणजे शिक्षणार्थ गुरुगृही जाण्याचा समारंभ असे समजत. विद्यार्थिनींचे दोन गट असत. (१) सद्योद्वाहा–शिक्षण झाल्यावर अनुरूप पती निवडून गृहस्थाश्रमात प्रवेश करण्याचा संकल्प केला आहे अशा मुली आणि (२) ब्रह्मवादिनी–आजन्म ब्रह्मचर्य व्रत पाळून अध्ययन आणि अध्यापनाला वाहून घेणाऱ्या मुली. स्त्रिया स्वतंत्रपणे यज्ञही करीत असत. सीता, रुद्रबली, रुद्रयाग वगैरे संज्ञांनी ते ओळखले जात. वेदातील कित्येक सूत्रे स्त्रियांनी केली आहेत. सूर्या, जुहू, वाक्, इन्द्राणी, श्रद्धा, शची, सार्पराज्ञी, रोमशा, लोपामुद्रा, शाश्वती इत्यादी अनेक स्त्रियांची सूक्ते ऋग्वेदात आहेत. सुलभा, लोपामुद्रा, घोषा, गार्गी, मैत्रेयी वगैरे स्त्रिया विदुषी म्हणून ओळखल्या जात.

पुराणकालात स्त्रियांच्या शिक्षणाची ही अवस्था राहिली नाही. तिच्या इतर अवनतीबरोबरच ती या क्षेत्रातही खाली ओढली गेली. मुस्लीम राजवटीत स्त्रीच्या

या अधोगतीला अधिकच वेग आलेला दिसतो. इतिहासकाळात शिवाजीच्या राज्यात जातीने लक्ष घालणाऱ्या जिजाबाई, विविध प्रकारचे युद्धविषयक शिक्षण घेऊन आपले राज्य हिंमतीने सांभाळणारी राणी लक्ष्मीबाई वगैरे कर्तबगार स्त्रिया आढळत असल्या तरी त्यांची संख्या मोजकीच होती. इतर बहुजन स्त्रिया अज्ञानाच्या गर्तेतच खितपत पडलेल्या दिसतात. आपणही पुरुषांप्रमाणे शिकू शकतो ही त्यांची स्वतंत्र विचारसरणीच समाजाने मारून टाकली होती.

हिंदुस्थानात १८१८ मध्ये इंग्रजी राजवट सुरू झाली. त्यांच्या कर्तृत्वाने कित्येक भारतीय भारावून गेले. महात्मा ज्योतीराव फुले, आगरकर, भांडारकर, लोकहितवादी, रानडे वगैरे सुधारक पुढे सरसावले. स्त्रियांसाठी आपण काहीतरी केले पाहिजे, ज्यामुळे स्त्री स्वतंत्र विचार करू शकेल, आपले भवितव्य घडवू शकेल या विचाराने त्रस्त झाले. स्त्रियांची दयनीय अवस्था पाहून त्यांचा जीव कळवळला. टप्प्याटप्प्याने स्त्रीसुधारणा घडली. पुरुषाला इंग्रजांच्या नवविचारांचे दर्शन घडल्याने तो नवीन दृष्टीने आपली सहचारी, बहीण, आई यांच्याकडे पाहू लागला. तेव्हा त्यांची पदोपदी होणारी ससेहोलपट, अवहेलना त्यांच्या नजरेस पडली. तिच्याकडे पाहून त्यांचे मन कारुण्याने भरून आले. पण ही भूतदया होती. तीत न्याय–अन्याय, योग्य–अयोग्य इत्यादी निकषांना फारसे स्थान नव्हते. या अवस्थेत स्त्री स्वतःही सुप्तावस्थेतच आहे. ज्योतीबा फुले, लोकहितवादी यांचे कार्य प्रामुख्याने या अवस्थेचे द्योतक आहे. या दृष्टीने स्त्री–समस्यांचे ते पहिले भाष्यकार वाटतात. लोकांच्या भूतदयेला आवाहन करून त्यांनी विविध प्रकारचे युक्तिवाद, वादविवादादी साधनांच्याद्वारे समाजाची स्त्रीविषयक मनोधारणा बदलण्याचा प्रयत्न केला. स्त्रीला पराकोटीच्या परस्वाधीनतेतून बाहेर काढण्यासाठी त्यांनी प्रमुख्याने स्त्रीशिक्षणाचा पुरस्कार केला. समाजाच्या रूढींवर कठोरपणाने, न्याय बुद्धीने आसूड ओढले. पुढे हळूहळू या प्रयत्नांचे परिणाम दिसायला लागले.

बायकांनी शिकावे की नाही हा प्रश्नच निर्माण झाला नव्हता असे पार्वतीबाई आठवले सांगतात. "लहान मुलींना पूजेची तयारी करता येऊ लागली, तांदूळ कांडता येऊ लागले, उष्टे खरकटे काढता येऊ लागले, लहान मुलांना आंघोळ घालून त्यांची खाण्यापिण्याची व्यवस्था करता येऊ लागली म्हणजे त्यांना मिळायचे ते सर्व शिक्षण मिळाले असा समज असे. मॅट्रीकची परीक्षा म्हणजे तिचा भात–पिठल्याचा स्वयंपाक." (१) अशी तत्कालातील स्त्रियांच्या शिक्षणाची अवस्था 'माझी कहाणी' मधून कळते. बायकांचा शिक्षणाशी मुळीच संबंध नव्हता. स्त्री आणि शिक्षण परस्परविरोधी शब्द असल्याचे 'गेले ते दिवस' सांगतात. घरट्यातल्या पक्षाप्रमाणे मुलीचे जग चूल आणि मूल एवढेच होते. "घरे हीच महाविद्यालये होती. त्यावेळी सासूसासऱ्याने म्हटले की मुलगी गुणी आहे की तीच

पदवी समजली जाई. घरातील कोणाचेही लहानमोठे काम आनंदाने करणे हाच अभ्यास. मुलींमुळे घरात नांदणारे समाधान हीच पारितोषिके व दागिने." (२६) असे गृहशिक्षणालाच सर्व महत्त्व असल्याचे 'स्मृतितरंग'मध्ये अन्नपूर्णाबाई रानडयांनी स्पष्ट केले आहे. १९१० मध्ये शिक्षणाची ही अवस्था होती. मुलीच्या शिक्षणापेक्षा मुलाचे शिक्षण अधिक महत्त्वाचे समजले जात असे. त्यामुळे स्वतःच्या शिक्षणापेक्षा भावाच्या शिक्षणाचा प्रश्न महत्त्वाचा ठरून हंसा वाडकर अर्थार्जन करायला लागतात. खेडयापाडयात केवळ मुलींच्याच नाही तर मुलांच्याही शिक्षणाची दुर्दशा असल्याचे 'पानाआडचे फूल'मधून कळते. अभ्यासाविषयी मुलांच्या मनात प्रेम निर्माण व्हावे, शिक्षणास उत्तेजन मिळावे म्हणून परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या मुलांना पुस्तके व मुलींना परकर–पोलक्याचे कापड बक्षीस म्हणून दिल्याचे सावेबाईंनी सांगितले आहे. तर नुसती लिहिता वाचता येणारी मुलेसुद्धा क्वचितच भेटत असत, असे आपले निरीक्षण 'जेव्हा माणूस जागा होतो' मध्ये गोदावरीबाई परुळेकरांनी मांडले आहे. एखाद्या मुलाला इंग्रजी आले तर 'साहेबाची भाषा येते हे भूषण समजले जाई,' असे 'वेचलेले मणी'मध्ये रमाबाई केदार नोंदवतात.

काही मुलींना शाळेत पाठवीत. परंतु मुलगी आठ–नऊ वर्षांची होताच तिच्या लग्नाची वेळ येत असे. त्यामुळे शिक्षण जेथल्या तेथे राहत असल्याचे गंगूबाई पटवर्धनांनी 'चाकोरीबाहेर'मध्ये नमूद केले आहे. "आठवीपर्यंत मुली जेमतेम जात. मग त्यांचे लग्न लावून दिले जाई. त्यामुळे नववीसाठी मुलीच शिल्लक राहत नसत." (३०) अशी आपल्या शाळेची अवस्था सुमतीबाई शहांनी 'हे गीत जीवनाचे'मध्ये सांगितली आहे. यावरून मुलींच्या शिक्षणाची केविलवाणी अवस्था कळते. पारंपरिक रूढीला चिकटून राहिल्याने लोक मुलींना शिकायला पाठविण्यास तयार नसत. स्त्रीशिक्षणाची महतीच मुलींना शिक्षण द्यायचे ठरविले तरी त्यांना इंग्रजी शिक्षण द्यायचे की नाही हा प्रश्न निर्माण होत असे. साहेबांच्या शाळेत जाणे वाईट समजले जात असल्याचे 'स्मरणसाखळी'मध्ये कमलाबाई देशपांडे सांगतात. "स्त्रिया सुशिक्षित झाल्या म्हणजे पुढची पिढी आपोआप सुशिक्षित होईल अशी भीती वाटत होती. म्हणून बायकांना शिकविण्याचे धाडस करीत नसल्याचे व जिच्या हाती पाळण्याची दोरी तीच जगाला उद्धारी" (६) अशी स्त्रियांच्या मनाची धारणा करून दिल्याचे कमलाबाई देशपांडयांनी उल्लेखिले आहे.

सहशिक्षण रूढ नसल्याचे सुधाताई अत्रे निदर्शनास आणून देतात. पुरुष शिक्षकाने मुलींना शिकवणे ही सुद्धा एक प्रचंड सुधारणा समजली जाई असे 'हे गीत जीवनाचे'मध्ये शहाबाईंकडून कळते. गुरू आणि शिष्या यांच्यामध्ये एक पडदा असायचा. उभयतांची तोंडे त्यांना दिसायची नाहीत. फक्त आवाज ऐकू यायचे. त्या आवाजाच्या अनुरोधाने शिष्याने ज्ञानार्जन करावे. शंकानिरसनही याच

पद्धतीने पडद्याआडून घडायचे. शिक्षण घरात दिले जात असले तरी शिक्षकांजवळ मुलीला कधी एकटे बसविले जात नसे. तिच्याबरोबर कोणाला तरी बसविले जाई. "पालकांची व विद्यार्थिनींची आपल्या शिक्षिकेकडे बघण्याची वृत्ती अनादराची दिसत नसली तरी विशेष आदराचीही दिसत नव्हती." (९३) असे रोहिणी भाटे माझी नृत्यसाधनामध्ये स्वतःच्या अनुभवावरून बोलतात.

शिकलेल्या मुली नीटपणे संसार करू शकणार नाहीत असा समज होता. रमाबाई केदार 'वेचलेले मणी' या आत्मचरित्रात लिहितात, एकुलती एक लाडात वाढलेली मुलगी असल्याने रमाबाईंचा स्वयंपाक थोडा बिघडतो तेव्हा सासूबाई म्हणतात, "ह्या शिकलेल्या पोरींचा संसार वाऱ्यावरतीच होणार ! भटारखान्यातील रोटच्या खाऊनच ह्या पोट भरणार !" (३८) उषाबाई डांगे सांगतात, "त्याकाळी मुली फारशा शाळेत जात नसत. आमच्या वर्गात तर मी एकटीच मुलगी होते." (४) उषाबाई डांगे केव्हा पुस्तक घेऊन वाचायला लागल्या तर सासूबाई कडाडतात, "आमच्याकडे नाही हो हे थेर चालायचे. नानांकडे जा आणि करा हवं ते." (९) स्त्रीच्या शिक्षणाची आवश्यकताच समाजाला पटलेली नव्हती. त्यामुळे स्त्री–शिक्षणाकडे कधी सहानुभूतीने पाहिलेले दिसतच नाही. मुलीला घरकाम आले की पुरे असा समज होता. आपल्या शिक्षणासंबंधी सरोजिनी शारंगपाणी सांगतात," ... मी आईच्या मागे सतत भुणभूण लावायची पण तिने दाद दिली नाही. अगदी थोडा वेळसुद्धा अभ्यासासाठी द्यायचाच नाही असा तिचा निर्धार होता तिला मुलीचे नसते लाड नको होते. मुलीच्या जातीला घरकाम उत्तम आले की झाले असे तिचे मत होते." (१८) शिक्षण म्हणजे जास्तीचे, नको असलेले फाजील लाड समजले जात असत असे यावरून दिसते.

मुलांना बायकांकडून शिकण्यात कमीपणा वाटत असल्याचे 'दुर्दैवाशी दोन हात' मधून कळते. मुलींनी शिकून नोकरी करणे विक्षिप्तपणाचे मानले जात असे. शिकून मास्तरकीचा पेशा करणाऱ्या स्त्रीला किंवा नर्सला घरी उतरू देणे धोक्याचे समजले जाई. समाज त्यांच्याकडे संशयाने बघत असे. सुखवस्तू घराण्यातील स्त्री नर्सिंग कोर्स घेऊ शकते ही कल्पनाच सहन होण्यासारखी नसल्याचे प्रमिलाबाई भालेराव स्वानुभवावरून सांगतात. नर्सिंग कोर्सबद्दल तितकीशी आपुलकी तत्कालीन समाजात नव्हती असे राधाबाई आपट्यांकडून कळते. रमाबाई केदार लिहितात, "त्या वेळच्या परिस्थितीमुळे कोणतीच हिंदू मुलगी मिडवाइफ्रीचा कोर्स घेण्यास धजत नसे. एक तर शिक्षण अगदीच कमी प्रतीचे समजले जाई आणि दुसरे म्हणजे कोणी धजलीच तर तिची हिंदुस्थानात टिंगल होई. एवढेच नव्हे तर बहिष्कारही टाकला जाई." (२५–२६) मास्तरणीच्या पेशाकडे फारसे चांगल्या नजरेने पाहिले जात नसल्याचे यावरून दिसते. तसेच रोग्यांच्या सेवेचे

पवित्र कार्य करणाऱ्या परिचारिकेच्या व्यवसायाकडे सहानुभूतीने तर राहूच द्या पण कुत्सित नजरेनेच बघितलेले दिसते. हा व्यवसाय कनिष्ठ प्रतीचा समजला जातो.

स्त्रीशिक्षणाची अशी अवस्था असल्याने स्त्रियांची मने शिक्षणाकडे वळविण्यास फार सायास पडत असत. बायकांच्या शिक्षणासाठी हळदी-कुंकू, पाटर्या, सभा असे प्रकार करावे लागत असल्याचे रमाबाई रानडे, गिरिजाबाई केळकर, यशोदाबाई जोशी, यांच्या 'आमच्या आयुष्यातील काही आठवणी,' 'द्रौपदीची थाळी,' 'आमचा जीवनप्रवास' या आत्मचरित्रांवरून कळते. रानडे, मोरोपंत जोशी वगैरे सुधारकांनी आपल्या बालपाल्यांना शिकविण्यास सुरुवात करून हळूहळू स्त्रीशिक्षणात सुधारणा घडवून आणण्याचे प्रयत्न केलेले दिसतात. शिक्षणाची आवड असूनही केवळ परिस्थितीमुळे शिकायला न मिळाल्याचे लक्ष्मीबाई पटवर्धन 'माझा नंदादीप' मध्ये सांगतात. यशोदाबाई जोशी शिक्षणाला सुरुवात करतात तेव्हा स्त्रियांना बिलकूल शिकवू नये अशा अर्थाची पत्रे येत असल्याचे प्रतिपादतात. यावरून स्त्रीशिक्षणाला होणारा विरोध दिसतो. अशी स्त्रियांच्या शिक्षणाची अवस्था असली, समाजाला ते मान्य नसले तरी प्राप्त परिस्थितीला छेद देऊन कलाकार शांताबाई आपटे, हंसा वाडकर, स्नेहप्रभा प्रधान, ज्योत्स्नाबाई भोळे, रोहिणी भाटे यांनी आपापल्या क्षेत्रात नैपुण्य मिळविलेले आहे.

आनंदीबाई कर्वे, पार्वतीबाई आठवले, गिरिजाबाई केळकर व यशोदाबाई जोशी या स्त्रियांनी समाजाला पटत नसले तरी समाजसेवकाची भूमिका स्वीकारून ती यशस्वीरीत्या पार पाडलेली आहे. कमलाबाई देशपांडे, सुधा अत्रे, गंगूबाई पटवर्धन, सुमतीबाई शहा यांनी शिक्षणक्षेत्रात घवघवीत कार्य केले आहे. प्रमिलाताई भालेराव, राधाबाई आपटे, आनंदीबाई शिर्के, आनंदीबाई विजापुरे यांनी परिचारिकेचे शिक्षण घेऊन पीडितांची मनोभावे सेवा केलेली आहे. उषाबाई डांगे, सरोजिनी शारंगपाणी रूढीला बाजूला सारून, समाजाकडे दुर्लक्ष करून शिकलेल्या दिसतात. गोदावरी परुळेकरांनी स्वतःच्या कर्तृत्वाने वारल्यांमधील माणूस जागा केला आहे. मृणालिनी देसाई यांनी गांधींच्या स्वदेशी चळवळीत भाग घेऊन भारतीय स्वातंत्र्यलढ्याला हातभार लावलेला आहे. पण या सर्व स्त्रिया प्रातिनिधिक स्वरूपाच्या आहेत. तेवढ्यावरून सर्वसामान्य स्त्रीशिक्षणाचा निष्कर्ष आपल्याला काढता येणार नाही.

यांच्या पुढच्या पिढीने मात्र शिक्षणाच्या क्षेत्रात बरेच पुढचे पाऊल उचललेले दिसते. या संदर्भातील उल्लेख पूर्वी आलेले आहेत.

सुधारकांनी विविध सुधारणांनी स्त्रियांना शिक्षणाचे क्षेत्र खुले करून दिले. सरकारने लक्ष घालून, स्त्री-शिक्षणाचा प्रश्न हाती घेऊन विविध सुधारणा घडवून आणल्या व आणत आहे. यावरून भविष्यकाळ आशादायी वाटतो.

**तत्कालीन धार्मिक परिस्थिती**

खऱ्या धर्माची वाताहत होऊन धर्माच्या नावाखाली जातिभेद, सोवळेओवळे, अंधश्रद्धा यांचेच साम्राज्य निर्धास्तपणे चाललेले दिसते.

जातिभेदाची कठोरता रमाबाई सांगतात–"मिस हरफर्ड रमाबाईंना शिकवायला येत तेव्हा त्यांना शिवल्यावर आंघोळ करावी लागत असे. सभेला जाऊन आल्यावर लुगडे बदलूनही स्वयंपाकघरात शिवता येत नसे." (८६) हे रमाबाई रानड्यांचे स्वानुभवाचे बोल आहेत. ख्रिस्ती धर्माचा स्वीकार करण्यापूर्वी लक्ष्मीबाई उपाशी राहतात पण महारणीच्या हातचे खात नाहीत. जातिभेद कडकरीतीने पाळला जात असल्याने कोणी परदेशातून आला तर त्याला 'बाटलेला' म्हणून प्रायश्चित्त घ्यावे लागे. अण्णासाहेब जोशी परदेशातून आल्यावर प्रायश्चित्त घेत नाहीत म्हणून ब्राह्मण त्यांच्याकडे धार्मिक विधी करण्यास तयार होत नाहीत. इतर लोकही त्यांच्याकडे मोकळ्या मनाने येत नाहीत. प्रायश्चित्त घेतले नाही म्हणून टिळकांकडे मौंजीत त्यांना पंक्तीबाहेर जेवायला बसविल्याचा उल्लेख 'आमचा जीवन प्रवास' मध्ये यशोदाबाई जोशी करतात. महार–मांगांना त्यांची सावली पडू नये म्हणून विहिरीवर येऊ देत नसल्याचे पार्वतीबाई आठवले सांगतात. जैन, लिंगायत लोक ब्राह्मणांच्या हातचे पाणी घेत नसत. वैष्णव ब्राह्मण तर इतरांना शिवतही नसत. अशी ही परस्परांशी जातिभेदानुसार वागण्याची अमानुष चाल लक्ष्मीबाई पटवर्धन उद्धृत करतात. मराठवाड्यातील लोक जातिभेदामुळे राजस्थानी लोकांना स्वयंपाक करू द्यायला तयार नसत. त्यांनी पाणी भरलेले मात्र चालत असे अशी मजेदार पद्धत 'अश्वत्थाची फुले' मध्ये प्रमिलाबाई भालेराव यांनी सांगितली आहे. माणसाला एक माणूस म्हणून वागविणे, हा दृष्टिकोण पूर्णपणे विसरला गेलेला दिसतो. अशा या कर्मकांडाला चिकटून असलेल्या माणसाच्या जागी नव्या विचारक्षम, बुद्धिनिष्ठ माणसाची स्थापना करण्यास, जातिभेद आणि सोवळेओवळे पाळणे किती विसंगत आहे हे सुधारक आगरकर आपल्या निबंधात पटवून देतात. "जो कोणी या सोवळ्याओवळ्याच्या प्रश्नात आपले मन नीटपणे घालतील त्यांना या अडचणींमुळे आमच्या देशाचारात प्रचंड विचारशून्यता ओतप्रोत भरून चालली आहे असे कबूल केल्याशिवाय राहवणार नाही. ब्राह्मण लोक इतर जातींच्या हातचे पाणी पीत नाही असे म्हणतात. आमचे असे म्हणणे आहे की, थोडा विचार केला असता ते तशा प्रकारचे पाणी पितात असे दाखविता येईल. इतकेच नाही तर, एका प्रकारच्या जड पदार्थांचेही सेवन करतात असे दाखविता येईल. कोळ्यांच्या किंवा तांबोळ्यांच्या घरचा ओला चुना ज्यांनी कधीही खाल्ला नाही असे शुचिर्भूत ब्राह्मण किती सापडतील? गवळ्याच्या घरचे दूध न घेणारे किती ब्राह्मण निघतील? तथापि गवळ्यांच्या

दुधात पाणी पडते अशी तक्रार ज्यांनी कधीही केली नाही. अशांची संख्या किती निघेल ?"[7] अशी अनेक उदाहरणे देऊन आगरकरांनी त्यांतील फोलपणा स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

जातिभेद फक्त भारतातच पाळला जात होता असे नाही तर पाश्चात्य देशातही तो पाळला जात असे. अमेरिकेत निग्रोंना कमीपणाने वागविले जाई. निग्रोंसाठी हॉटेल्स वेगळी असत. आगगाडीतही निग्रोंसाठी शेवटी डबे जोडले जात. त्यांनी तेथेच बसले पाहिजे हा नियम कटाक्षाने पाळला जाई. 'आमचे कृतार्थ सहजीवन' मध्ये रुथबाई हिवाळ्यांनी ही उदाहरणे दिली आहेत. परदेशी असल्यामुळे आपल्याला बरेचदा वाईट वागणूक मिळत असल्याचे शीलवतीबाई 'मीच हे सांगितलं पाहिजे' मध्ये स्पष्ट करतात.

समाजाचा उत्कर्ष, त्याची धारणा, त्याची प्रगती, त्याचे वैभव हा खरा धर्म हेतू नष्ट होऊन निव्वळ कर्मकांडाचे स्वरूप धर्माला आले. उष्टे, खरकटे, सोवळे–ओवळे यालाच लोक धर्म समजू लागले. 'आहे ते चांगले आहे' यापेक्षा वेगळे काही असू शकेल असा पुसटता देखील विचार त्यांच्या मनात येत नाही. वर्षानुवर्षे कर्मकांडात पूर्णपणे बुडालेला हा समाज. महाराच्या पाण्याचा शितोडा अंगावर आला म्हणून नाना त्यांना दुरून आंघोळ घालायला लावतात. स्वच्छता म्हणजे सोवळे हा सोवळ्याचा अर्थ जाऊन प्रत्येक वस्तू धुऊन घेणे मग त्यातून मीठही सुटत नसे. कुणी शेजारी–पाजारी घरी आला तर तो परत जाताना त्याच्या मागून पाणी शिंपडत जाणे अशा नानांच्या सोवळ्याच्या गंमतीदार व चमत्कारिक तऱ्हा लक्ष्मीबाईंच्या 'स्मृतिचित्रा'तील 'सोने नाणे धुऊन घेतले' या प्रकरणभर वाचायला मिळतात. अंगात ताप असतानाही केवळ सोवळ्यापायी आपल्याला आंघोळ करावी लागल्याचे लक्ष्मीबाई पटवर्धन 'माझा नंदादीप'मध्ये सांगतात. यावरून रूढ असलेल्या सोवळ्याला माणसाच्या जीवाचीही पर्वा नसल्याचे जाणवते. केरसुणीच्या फडयावर पाय पडला तरी सोवळे बिघडत असल्याचे सत्यभामाबाई सुखात्मे 'गेले ते दिवस' मध्ये नमूद करतात. स्वयंपाक, देवाची पूजा ही स्वच्छतेची कामे करताना केरसुणीला हात लावू नये म्हणजे केर वगैरे काढायचे अस्वच्छ काम करू नये हा हेतू या नियमामागे असावा. पण इतर नियमांप्रमाणे त्याचाही खरा अर्थ विसरून अवडंबर झाले असले पाहिजे. कप–बशीसारख्या चिनीमातीच्या भांडयांचाही विटाळ होत असे. सोवळ्याच्या कल्पनेमुळे कोणाकडे चहा वगैरे घेतला तर सोवळे बिघडेल अशी भीती वाटे. शीलवतीबाई लिहितात– "सोवळेपणाला बाध येईल किंवा आपल्या हातून काही भ्रष्टाचार होईल या कल्पनेने लोक मी किंवा आमच्या नोकरांनी बनविलेला चहा घेत नसत." (२८)

[7] संपूर्ण आगरकर, भाग पहिला, संपा. मा. दा. अळतेकर, पुणे, १९३७, पृ. ६९

टिळक ख्रिस्ती झाल्यावर त्यांच्याकडे जाणार नाही अशी लक्ष्मीबाईंकडून शपथ घेववली जाते. लक्ष्मीबाई टिळकांकडे गेल्यावर पेंडशांच्या घरी त्यांना नीट जेवायला घातले जात नाही. ब्राह्मणाची बाई ख्रिश्चनांकडे म्हणजे लक्ष्मीबाईंकडे राहण्यास तयार होत नाही. मुलगा मोठा झाल्यावर त्याला आपल्या आईच्या हातची अंडी–मटण देण्याची पद्धत नसल्याचे उषाबाई डांगे सांगतात. अशा विविध तऱ्हा धर्माच्या नावाखाली चालताना दिसतात.

कर्मकांडाचे प्राबल्य, धर्माची अवनती त्यामुळे माणूस अनेक अंधश्रद्धांना कवटाळताना दिसतो. लहानपणी माधवराव पटवर्धन फार रडत. म्हणून त्यांच्या आत्याने त्यांची जोडच्याने तुला केली व घरातील मूळ पुरुषाचे महादेव हे नाव ठेवले. तेव्हापासून त्यांचे रडणे बंद झाले असे 'आमची अकरा वर्षे'मध्ये लीलाबाई सांगतात. नवीन गाय घरात घेताना शुभशकुन म्हणून तिच्या पायाला सोने व मोती लावून तिला घरात घेण्याची पद्धत सांगून सत्यभामाबाई तत्कालीन श्रद्धेवर प्रकाश टाकतात. घरात विंचू निघाला असताना देवाने संकट आणले व तोच आता निवारील असे म्हणून विंचू मारण्याऐवजी डोळे मिटून देवाची प्रार्थना केल्याची माहिती 'गेले ते दिवस' मध्ये मिळते. "घोडीला साप चावू नये म्हणून कुणी नारळ फोडीत होते, कुणी तुपाचे दिवे लावीत होते. कुणी रामाची द्वाही रामाची द्वाही म्हणून शपथ घालीत होते. कोणी आस्तिक आस्तिक म्हणत होते." (३०) अशी पद्धत 'सांजवात'मध्ये आनंदीबाई शिर्क्यांनी सांगितली आहे. काही झाले तरी देवाकडे धावायचे अशी लोकांची श्रद्धा होती. यावरून प्रयत्नवादापेक्षा ईश्वरवादाचे समाजात अधिक प्राबल्य असल्याचे दिसते. ब्राह्मण पानावरून उपाशी उठले तर पाप लागते या श्रद्धेने घरात मूल मेले असतानाही ब्राह्मणांना निमूटपणे जेवायला घालण्याचा प्रकार सत्यभामाबाईंनी सांगितला आहे. अण्णासाहेब जेव्हा विलायतेहून सुखरूप परत येतात तेव्हा समुद्राने आपल्या मुलाला सुखरूप परत आणले म्हणून सासूबाईंनी समुद्राची पूजा केल्याचे यशोदाबाई 'आमचा जीवन प्रवास'मध्ये ऐकवतात. बकरा बळी दिल्यावर देवीची साथ जाते अशी लोकांची श्रद्धा असल्याचे सुधाताई अत्र्यांकडून कळते. गुजराथमधील पहिल्या पेरणीच्यावेळची रीत आनंदीबाई शिर्के सांगतात, "पहिल्या पेरणीच्या वेळी शकुन पाहिला जाई. बैल औत नेताना समोरून गाय किंवा डोक्यावर भरलेली दूड घेतलेली सवाष्ण किंवा कुवारिणी समोरून यायला हवी म्हणजे शकुन समजला जाई. या शकुन देणाऱ्या बाई–मुलीने डोळ्यात काजळ घातलेले चालत नसे. कारण काजळ घातले तर पीक काळे येते असे समजले जाई. सहजगत्या सामोरे आले तर उत्तम नाहीतर कुणाला यायला लावीत." (१९) माणसाला काम करण्यास उत्साह यावा म्हणून हे शकुन–प्रकार मानले जात असावे. अशा अनंत प्रकारच्या अंधश्रद्धा आत्मचरित्रांत चित्रित झालेल्या बाबींवरून कळतात.

तत्कालीन समाजातील माणसे विलक्षण चमत्कारांवर विश्वास ठेवताना दिसतात. गाईला व अश्वत्थाला प्रदक्षिणा घालून आणि गोमूत्रातील दशमी खाऊन मूल झाल्याचा चमत्कार रमाबाई रानड्यांकडून कळतो. साधूने दिलेला रुद्राक्ष गळ्यात घातल्याने मूल झाल्याचा दाखला यशोदाबाई जोशांनी 'आमचा जीवन-प्रवास'मध्ये दिला आहे. महापुरुषाच्या धुनीतील अंगाऱ्याने पुत्रलाभ झाल्याचे रमाबाई केदार 'वेचलेले मणी'मध्ये सांगतात. यासाठीच सोळा सोमवाराचे व्रत सत्यभामाबाईंनी केलेले आहे. तुटलेल्या जिभेचा तुकडा अंगाऱ्याने पक्का चिकटल्याचाही चमत्कार 'आमच्या आयुष्यातील काही आठवणीं'मधून समजतो. अंधश्रद्धा, चमत्कार या सर्वांच्या मुळाशी माणसाची भीती असावी असे वाटते. आपण जे करतो ते देव पाहतो अशी लोकांची समजूत असल्याचे दिसते. तो आपले काहीतरी वाईट करून आपल्याला शिक्षा देईल या भीतीपायी लोक वाटेल ते करताना दिसतात. माणसाची जिजीविषा हेही या अंधश्रद्धांमागचे कारण असावे. जिवंत राहण्याची इच्छा सदासर्वकाळीच बलवत्तर असते. मग मनुष्य झपाटल्यासारखा श्रद्धा, अंधश्रद्धा यांना बळी पडतो. धर्माच्या नावाखाली अंधश्रद्धा व चत्मकार जोपासले जाऊ लागतात. यात्रा करून आलेल्या लोकांना भेटायला जाणे व त्यांना देव समजून नमस्कार करण्याची रूढी होती. वास्तुशांत झाल्याशिवाय दवाखान्यात न जाण्याची पद्धत आनंदीबाई विजापुऱ्यांनी सांगितली आहे. लग्नाच्या चोळीला पहिली कात्री लावण्याचे काम सुवासिनीकडूनच करून घेण्याची रीत सुशीलाबाई आठवल्यांकडून कळते. तेरावा घालणे वगैरे रीतींना फार महत्त्व असल्याचे सुधाताई अत्रे सांगतात. तत्कालीन समाजात अगणित नवसांनाही स्थान मिळाल्याचे दिसते. घरात नाग दिसला असताना आता घरात ज्या मुलाचा जन्म होईल त्याला तुझे नाव देऊ असा नवस केल्याचे यशोदाबाई जोशी सांगतात. अनंताला बरे नसताना पाच रविवार केवळ खडीसाखर खाऊन उपास करीन असा नवस सत्यभामाबाई बोलून जातात. काका आजारी असताना आजीबाई नवस करतात, "आम्हाला ही आंधळ्याची काठी जन्मभर लाभू दे. तुला चांदीची काठी वाहीन." (४७) आशालता सावे यांच्या 'पानाआडचे फूल' या आत्मचरित्रात या नवसाचा परिचय होतो.

पुरुषांपेक्षा स्त्रियाच धार्मिक अवडंबराला अधिक बळी पडलेल्या दिसतात. याचे कारण स्त्रियांच्या वाट्याला आलेली परिस्थिती. तिचे कार्यक्षेत्र मर्यादित होते व समाजाने अनेक बंधनांनी तिला आवळले होते.

हिंदूप्रमाणे ख्रिश्चनही कर्मठ असल्याचे लक्ष्मीबाई सांगतात. एका ठिकाणी त्या म्हणतात, "कित्येक वेळा ह्या कर्मठपणाची अशी परमावधी होते की त्याला कर्मठपणापेक्षा आचरटपणा हे नाव अधिक शोभेल. कर्मठपणा आमच्या

आकुंचित वृत्तीला बऱ्हंशी कारणीभूत आहे. कुंकू लावले म्हणून धर्मबाह्य वर्तन झाले, कासोटयाचे लुगडे नेसले म्हणून ख्रिस्ती धर्माला काळिमा लावला, महात्मा गांधींकरता प्रार्थना केली म्हणून धर्म बुडाला, इतके कशाला हिंदू खाणावळीत जेवू लागला म्हणून हिंदू झाला असे म्हणणारे हरीचे लाल ... आमच्यात आहेत. 'ज्ञानोदय' पत्र गुरुवारी निघते. त्यावर पूर्वी बृहस्पतिवार असे लिहिले जात असे. गुरू हा हिंदूंचा देव आहे. त्यांच्या देवाचा वार म्हणून जो वार ओळखण्यात येतो तो नको." (परिशिष्ट २, पृ. १६–१७) अशी ओरड व्हायची. मुलांना हिंदू नावे द्यायची नाहीत. कारण ती हिंदू देवतांची नावे असतात. असे हास्यास्पद अवडंबर 'स्मृतिचित्रांत' लक्ष्मीबाईंनी सांगितले आहे. हिंदु–पुराणांविषयी ख्रिश्चनांच्या मनात अतिशय आकस आहे. पुराणे म्हणजे भाकड कथा असा त्यांचा समज आहे. पण त्याच वेळी ग्रीक, लॅटीन पुराणातील कथा त्यांना चालतात. आणि ती पुराणेच आहेत हे त्यावेळी विसरले जाते. कोणताही धर्म घेतला तरी त्यात दुसऱ्या धर्मास तुच्छ लेखणे, नावे ठेवणे ह्या गोष्टी येतातच असे यावरून दिसते. भारतीय मोरपिसाला अतिशय शुभ समजतात तर पाश्चात्य मोरपीस अशुभ समजत असल्याचे शीलवतीबाई केतकर सांगतात.

धारणात धर्मः–समाजधारणा करणारा तो धर्म–या धर्माच्या व्युत्पत्तीनुसार खरा धर्म जाणणारे, काही मानवतावादी लोक याही कालखंडात असल्याचे आढळते. त्या काळात काही स्त्रियांना वैद्यकीय ज्ञान उत्तम असे. रमाबाई रानडयांच्या आईला वैद्यकशास्त्र अवगत होते. रमाबाई लिहितात, "घरातल्या कामातून मोकळिक झाली की औषधे, गोळया वगैरे काही ना काही करण्यात ती गुंतलेली असायची. आमच्या आईला वैद्यक्रिया फार उत्तम येत असे. किती किती वर्षांचे जुने रोगी ती हटकून बरे करी. त्यामुळे आमच्या गावाच्या आसपासच्या दहाबारा खेडयांतील लोक मोठ्या श्रद्धेने तिच्याकडे औषध घेण्यास येत. सर्व रोग्यांना आपल्या खर्चाने व आपल्या हाताने ती औषधे तयार करून देत असे. रात्रंदिवस वेळी अवेळी केव्हाही रोगी आले तरी ती कंटाळली नाही. तिने लागलीच उठून औषधपाणी द्यायचे. अतिशय गरीब असेल तर त्याला चार–आठ दिवस देवडीवर ठेवून घेऊन दोन्ही वेळ आपल्या हाताने पथ्याचे घालायचे व औषधे द्यायची. वायूने बेफाम झालेल्या व वेड लागलेल्या रोग्यांना ती डागीतही असे. या सर्व कामात माझ्या वडिलांची तिला संमती व मदत असे; कारण, त्यांना हे परोपकाराचे काम आवडे म्हणून. 'याबद्दल होणारा खर्च तू खुशाल कर. हा खरा धर्म आहे.' (१८–१९) असे ते तिला प्रोत्साहन देत." बाया कर्वे देव ही एक शक्ती आहे असे मानते. अनाथ, अपंगांना मदत करणे हा तिचा धर्म. 'माझी मुले' हे तिच्या आत्मचरित्रातील प्रकरण याची साक्ष द्यायला पुरेसे आहे. महाराच्या हातचे

पाणी न पिणाऱ्या लक्ष्मीबाई संडास स्वच्छ करण्याचे काम करण्याइतपत मानवतावादी बनलेल्या आहेत. पार्वतीबाई आठवले, सुमतीबाई शहा यांनी उद्ध्वस्त होऊ पाहणारी जीवने स्वतःचा आधार देऊन फुलविली आहेत. यासारखी काही उदाहरणे आत्मचरित्रांत सापडतात.

धर्माचे स्वरूप पुढील कालखंडात बरेच पालटलेले दिसते. विजातीय जातींमध्ये चालत असलेले बेटी–रोटी व्यवहार पाहून जातिभेदाचे स्वरूप पूर्वीइतके तीव्र नसल्याचे जाणवते. बुद्धिवादालाही बरेच प्रामाण्य आल्याचे दिसते. पण ही स्थिती फारच कमी लोकांची आहे. आजची पिढीसुद्धा परीक्षेला जाताना, " देवा, मला पास होऊ दे. तुला एक नारळ फोडीन " असे नवस करतांना दिसते. त्यामुळे समाजाची धार्मिक अवस्था बदलली असे निश्चितपणे म्हणता येत नाही. सर्वच बदल फार हळूहळू होताना दिसतात.

### तत्कालीन राजकीय परिस्थिती

विद्या आणि संपत्ती–सरस्वती आणि लक्ष्मी दोघींचा वरदहस्त ल्यालेली भारतभूमी इंग्रजांच्या आगमनामुळे परतंत्र झाली. पारतंत्र्यातील दुःखांचे अनुभव यायला लागल्यापासून भारतीयांची दृष्टी अधिक अंतर्मुख झाली. सामाजिक व्यवस्था मागासलेली असल्याने तुमच्या नशिबी पारतंत्र्य आले असे इंग्रजांचे म्हणणे होते तर धर्म सुटला, नीती गेली, ईश्वर अडगळीत पडला व सात्त्विक भावना लुप्त झाल्या. त्यामुळे पारतंत्र्य आले असे आध्यात्मिक प्रवृत्तीचे चिंतक म्हणू लागले. हिंदी स्वातंत्र्य लढ्याकरिता विचार, आचार व उच्चार करणारे चार प्रमुख पंथ होते. (१) आत्मनिरीक्षकांचा, (२) समाजसुधारणावाद्यांचा, (३) सनदशीर चळवळ करणाऱ्यांचा आणि (४) अत्याचारी मनोवृत्तीचा. पण यापैकी कोणताही पंथ पूर्णपणे एकांगी नव्हता. कोणाला धर्मावर संकट येण्याची भीती वाटली. कोणाला सामाजिक सुधारणांचे महत्त्व वाटले. कोणी शिक्षणाला प्राधान्य दिले. सर्व पंथ, धर्म, समाज, शिक्षण यात सुधारणा केली पाहिजे असे म्हणणारे असले तरी राजकीय पारतंत्र्य सर्व आपत्तींचे मूळ आहे असे मानणारे होते. या अवस्थेचे चित्र आत्मचरित्रांत उमटलेले दिसते.

भारतदेश गुलामगिरीत असला तरी संस्थाने मात्र तग धरून होती. संस्थानातही लग्गा, वशिला ह्या गोष्टी सर्रास चालत असल्याचे इंदिराबाई भागवतांनी स्वानुभवाने सांगितले आहे. यादवराव थिएटर चालविण्यास सर्वतोपरी पात्र असूनही केवळ जोरदार वशिला नसल्यामुळे यादवरावांना ' टाऊन हॉल ' थिएटर मिळत नाही. महाराजांच्या इच्छेनुसार सर्व कारभार चालत असल्याचे इंदिराबाई सांगतात. लक्ष्मीबाई पटवर्धन यांच्या ' माझा नंदादीप ' मधूनही संस्थानी वातावरणाचा परिचय होतो. संस्थानच्या रिकाम्या मैदानात लक्ष्मीबाईंनी आखलेले

बॅडमिंटन कोर्ट महाराणीसाहेबांची इच्छा नसल्याने बंद करावे लागते. संस्थानी वातावरणातही हाजी हाजीला विशेष महत्त्व दिसते. कोणतीही राजवट घेतली तरी लग्गा, वशिला राहतच असावा असे यावरून कळते.

स्त्री जसजशी शिकून सवरून बाहेर पडू लागली तसतशी तिची दृष्टी अधिक व्यापक बनायला लागली. व्यवसायाच्या निमित्ताने तिचा बाह्य जगाशी संबंध यायला लागला. वंगभंगाची चळवळ, टिळकांवरील खटले, रँडसाहेबांचा खून ही भोवतालची वादळे ती जवळून बघत होती. याचा परिणाम म्हणजे स्त्रीच्या मनात देशभक्ती अंकुरायला लागली. ‘ आपण आपल्या देशासाठी काहीतरी केले पाहिजे ’ या विचाराने पेटली. उदाहरणार्थ– ‘ हे काही तरी ’ करण्यास छोटचा कमलाबाई हुजुरपागा ही साहेबी शाळा म्हणून–शाळेत जाणे बंद करतात. तर बाल मृणालिनी देसाई तिसऱ्या वाढदिवसाला शिवलेला फुलाफुलांचा फ्रॉक स्वदेशीच्या होळीत घालून मोकळचा होतात. टिळकांना सहा वर्षांची शिक्षा झाल्यावर कमलाबाई व त्यांच्या मैत्रिणींमधील पुढील संवाद– तत्कालावरील राजकीय पडसादाचा बोलका पुरावा आहे. ‘ कशी जाणार सहा वर्षे ?’ हे इंग्रजांचे राज्य जाणार नाहीं का ? आपण काय केले म्हणजे इंग्रजांचे राज्य जाईल–इत्यादी बोलून आमच्या कल्पनां-प्रमाणे पुष्कळ बेत केले. त्यापैकी एक बेत पुढीलप्रमाणे होता. साधा तोंडचा हिशेब होता तो !

“ हे इंग्रज परदेशातून येऊन आपल्या देशावर राज्य करतात कसे व आपल्या टिळकांना तुरुंगात टाकतात कसे ? किती आहेत हे इंग्रज आपल्या देशात ?”

“ सारे. चार लाख. ”

“ आणि आपण लोक किती ? बत्तीस कोटी. अरे इतके पुष्कळ असलो तरी आपल्याजवळ तरवारी, बंदुका कुठे आहेत त्यांच्याबरोबर लढायला ? मग नसेनात ! दहा माणसांनी एकदम हल्ला केला तर काय एक साहेब पकडता येत नाही ? ते चार लाख आहेत; चार दाही चाळीस. आपले चाळीस लाख लोक पुरेत. म्हणजे काय अर्धा कोटीसुद्धा होत नाहीत की ! ”

तेव्हा असं करायचं– प्रत्येक गावात साहेब किती आहेत याच्या मुकाटचानं याद्या करायच्या आणि जितके साहेब एका गावात त्यांच्या दसपट आपले लोक त्या गावात तयार करायचे. अगदी मुकाटचानं हं. त्यांच्याखेरीज इतर कुण्णा कुण्णाला कळूं द्यायचं नाही आणि अगोदर ठरवून एक दिवस रात्री बरोबर बाराच्या ठोक्याला आपापल्या गावात जिथं साहेब निजला असेल तिथं जायचं व एकदम दहा जणांनी त्याला करायचं गिरफदार ! काय करतो एकटा साहेब ! आणि त्याचं काम करायला आपल्या दहापैकी द्यायचं एकाला नेमून ! दुसरे दिवशी

सकाळी सहा वाजता लोक जो उठतात तो काय ? राज्य आपलं हिंदुस्थानचं ! किती किती छान होईल हे असं केलं तर ! मग टिळकांना सोडवून आणायचं व काँग्रेसचे मुख्य करायचं एकदम. (३६–३७)

राष्ट्राचे स्वातंत्र्य, राष्ट्राचा विकास या विचाराने ती प्रेरित झाली. आधी राजकीय की आधी सामाजिक या प्रश्नात न गुरफटता दोन्हीचा समन्वय साधून काहीतरी भरीव काम करता येईल– असे तिचे मत. या दृष्टीने उल्लेखनीय वाटतात त्या कमलाबाई देशपांडे. आपल्या भाषणात त्या म्हणतात, " राजकीय दृष्टया मला टिळकांचे अनुकरण करावेसे वाटते पण सामाजिकदृष्टया नेमस्तांची सुधारक भूमिका मला पटते. यापुढे कार्य व्हावयाची ती या दोन्ही भूमिकांचे एकीकरण करून व्हायला हवी." (१२५)

स्वतंत्र, विचारशील असे हे बदलत्या काळातील स्त्रीचे चित्र आहे.

इंग्रजांचा राज्यकारभार सुरळीत व्हावा म्हणून १९०५ मध्ये झालेली बंगालची फाळणी, १८८५ साली स्थापन झालेल्या काँग्रेसची १९०९ मध्ये झालेली विभागणी, १९१४ मध्ये झालेले महायुद्ध, महायुद्धाचा परिणाम म्हणून वाढलेली महागाई, गोरगरिबांची बिकट अवस्था, शिधा वाटप पद्धती, १९२० मध्ये झालेला लोकमान्य टिळकांचा मृत्यू, जातीय वादावरून झालेले हिंदु-मुसलमानांचे दंगे, रझाकारांचा अत्याचार, चिमूर–आष्टी प्रकरण, गांधी–ईर्विन करार झाल्यावर लगेच आपण हरलो नाही हे जाहीर करण्यासाठी ब्रिटिशांनी लाहोरच्या तुरुंगात भगतसिंग; राजगुरू आणि सुखदेव यांना तेवीस मार्च १९३१ ला गुपचूप फाशी दिल्याचा उल्लेख, लाहोरच्या क्रांतिकारकांचा लढा व त्यांचा अन्नसत्याग्रह, १९४१ मध्ये हिटलरने सोवियत रशियावर केलेली स्वारी असे राजकीय घटनांवर प्रकाश टाकणारे काही उल्लेख आत्मचरित्रात आलेले आहेत. १९३० मध्ये महात्मा गांधींनी केलेला मिठाचा सत्याग्रह, १९४२ मध्ये झालेली स्वदेशीची चळवळ यांचे वर्णन; लोकांवर त्यांचा झालेला परिणाम मात्र बऱ्याच आत्मचरित्रांत विस्तृतपणे चित्रित झालेला दिसतो.

गांधींची दृष्टी इतर समाजसुधारकांपेक्षा पूर्णपणे वेगळी होती. इतिहासकार त्र्यं. र. देवगिरीकर गांधीजींच्या या दृष्टीबद्दल म्हणतात, " भारतीय सुधारक आपल्या समाजाकडे पाश्चात्य सुधारणांच्या तुलनेने पाहत. तो त्यांचा आदर्श होता. गांधींना सामाजिक सुधारणा ही भारतीय संस्कृती व मानवतेच्या दृष्टीतून हवी होती ... गांधीप्रणीत सामाजिक सुधारणा धर्मबुद्धी, नीती व संस्कृती वाढविणाऱ्या होत्या. प्रत्यक्ष कृती हे त्यांचे साधन होते ... गांधीजींचे राजकारण हे पाश्चात्य पद्धतीचे राजकारण नव्हते; किंवा भारतातील पारंपरिक पद्धतीचे राजकारण नव्हते. राज्यकर्ते हे प्रजेचे रक्षण, भरण करणारे पित्याप्रमाणे असावेत. अहिंसा,

सत्य, न्याय, अपरिग्रह, संयम, सेवा, साधे जीवन वगैरे राजकारणाचे अधिकार आहेत असे ते मानीत. राजकारणाचे अध्यात्मीकरण त्यांना हवे होते. त्यात शोषण, स्पर्धा वगैरेला स्थान नसे." [८]

समुद्राच्या पाण्यापासून तयार होणाऱ्या मिठाला गरिबांनासुद्धा कर द्यावा लागे अशी इंग्रजांच्या राज्यातील करुण अवस्था. समुद्राकाठचे मीठ उचलणे हा कायद्याने गुन्हा समजला जाई. ही दयनीय परिस्थिती पाहून गांधीजींचे हृदय कळवळले. दांडी येथील समुद्रकाठावरील मीठ गांधींनी पाच एप्रिल १९३० ला उचलले व सहा एप्रिलपासून मिठाचा सत्याग्रह सुरू झाला. खेड्यापाड्यातील लोकांनी त्यात उत्साहाने भाग घेतला. या सत्याग्रहाचे वारे इतके जोरदार होते की आपणही त्यात भाग घ्यावा असे लक्ष्मीबाई पटवर्धनांना वाटते. आपली अवस्था त्या सांगतात, " ... त्यातील ऐकू येणाऱ्या बातम्या व स्फूर्तिदायक गोष्टी ऐकून माझा जीव तळमळे. आम्ही मात्र घरातच बसून राहायचे. काहीच नाही का करता येणार ? आतल्या आत मी संतापत असे. चिडत असे." (३३) मध्यप्रदेशात जमखंडी येथे राहणाऱ्या लक्ष्मीबाईंची ही अवस्था आहे. अशी जागृती या सत्याग्रहाने देशाच्या (भारत) काऱ्याकोपऱ्यात केलेली दिसते. या सत्याग्रहासंबंधी यशोदाबाई सांगतात, " गांधीजींची सत्याग्रह चळवळ, त्यात निघणाऱ्या प्रभात फेऱ्या, सभांतून होणारी सरकारच्या निषेधाची भाषणे वगैरे प्रकार जोरात चालू होते." (१६९) आपला मुलगा कॉलेज सोडून सत्याग्रहात गेल्याचा उल्लेख गिरिजाबाई केळकर करतात. या सत्याग्रहाचा परिणाम शाळांवरही झाल्याचे गंगूबाई पटवर्धनांनी लिहिले आहे. या सरकारविरोधी चळवळीत रूळ उखडून टाकणे, तारा तोडून टाकणे हे नित्य घडत होते. त्यामुळे प्रवासात अनिश्चितता आणि धोकाही आला होता असे सरोजिनी शारंगपाणी यांच्या 'दुर्दैवाशी दोन हात' या आत्मचरित्रातून कळते. कॉलेज सोडून मुले चळवळीत पडल्याचे उषाबाई डांगे उल्लेखितात. शेतकरी, कामगार सर्वांनी स्वातंत्र्याच्या चळवळीत भाग घेतल्याचा उल्लेख 'पण ऐकतं कोण !' मध्ये येतो. असा उत्साह, अशी जागृती पुढे अगर मागे झालेल्या कोणत्याही लढ्यात दिसली नाही असे इतिहासकार मोठ्या अभिमानाने सांगतात. अहिंसायुद्धाचा एक आदर्श गांधीजींनी या सत्याग्रहाच्या निमित्ताने घालून दिला.

१९४२ साली गांधीजींची स्वदेशीची चळवळ सुरू झाली. इंग्रजांपासून भारताला मुक्त करण्यासाठी गांधीजींनी हा प्रयत्न केला.–'चले जाव' म्हणून ही चळवळ ओळखली जाते. 'करा किंवा मरा' असा या चळवळीचा गांधीजींचा संदेश होता. गांधीजींच्या या चळवळीलाही लोकांनी भरीव पाठिंबा दिलेला आहे.

---

[८] त्र्यं. र. देवगिरीकर, भारतीय स्वातंत्र्य लढ्याचा इतिहास, पुणे, १९६९, पृ. ६

स्वदेशीच्या चळवळीत बायकांनी सुद्धा सक्रिय भाग घेतलेला दिसतो. "स्वदेशीचा प्रचार करण्याकरता म्हणून घरी स्वदेशी बांगड्याही विकावयास ठेवल्या होत्या. याशिवाय पेन्सिली, रिळे, साबण, कागद वगैरे बऱ्याच वस्तू मी मागवीत असे." असा आपण स्वदेशीच्या चळवळीला हातभार लावल्याचे लक्ष्मीबाई पटवर्धन 'माझा नंदादीप' मध्ये सांगतात. सुमतीबाई शहांचा या चळवळीतील सहभाग असा—"चरखा चालवण्यापेक्षा विदेशी कपड्यांच्या होळ्या पेटवण्यात माझ्या बालसुलभ मनाला विशेष रस वाटे. मी मोठ्या उत्साहाने अशा होळ्या साजऱ्या करण्यासाठी गल्ली बोळातून हिंडत असे. लग्न–मुंजीसारख्या मंगल कार्यामधून देखील उंची वस्त्रांऐवजी खादीच्या कपड्यांना स्थान मिळू लागले होते. तसे पिकेटिंग करणाऱ्या मुलीत मी हमखास पुढे असे." (३९) चळवळीमुळे पुढाऱ्यांची धरपकड होई. म्हणून कॉलेजमध्ये हरताळ पाळल्याचा उल्लेख रोहिणी भाटे करतात. प्रत्येकजण आपल्याला शक्य होईल त्याप्रमाणे या चळवळीला हातभार लावताना दिसतो. प्रत्यक्ष लढ्यात भाग घेता येत नसला तरी खादी वापरून रुथबाई हिवाळ्यांनी या चळवळीला अनुमोदन दिल्याचे 'आमचे कृतार्थ सह-जीवन' वरून कळते. स्वदेशी व्रतासाठी प्रचार करण्याची कामे वनिता समाजातील अनेक स्त्रियांनी आनंदाने स्वीकारून निरनिराळ्या ठिकाणी भाषणे करून स्त्रिया तयार केल्याचे यशोदाबाई जोशी लिहितात. मृणालिनी देसाई यांनी आपले जीवनच स्वदेशी चळवळीला अर्पण केल्याचे 'निशिगंध' मधून कळते. चळवळीच्या काळातील धामधूम आशालताबाई सावेही चित्रित करतात. १९४२ मधील चळवळीचे उषाबाई डांग्यांनी केलेले वर्णन, "आपल्या राष्ट्रीय चळवळीत बेचाळीसचा उठाव काही औरच होता. कुठल्याही देशातील महान राज्य क्रांतीचेच ते दृश्य होते. सिंध प्रांतात हूर जमातीच्या लोकांनी उठाव केला. त्यांना दडपण्यासाठी मार्शल लॉ लावण्यात आला. बेचाळीसच्या चळवळीत तरुण मुलांनी ब्रिटिशांना खूपच सतावले. प्रभात फेरी काढणे हा एक बंडाचा प्रकार समजला जाई. म्हणून त्या काढणाऱ्या शाळकरी मुलांनासुद्धा पकडून फटक्यांच्या शिक्षा देण्यात येत. सत्याग्रहींना तुरुंगात दोराने बांधून ठेवत. विद्यार्थ्यांचा तरुण बंडखोर पुढारी हेमू कल्याणी याला सक्कर येथे फाशी देण्यात आले. ते ऐकून देशातील सर्व तरुण दु:खित तसेच संतप्त झाले. सबंध देशभर दडपशाहीचे सत्र सुरू झाले. नागपूरमध्ये तर गोळ्यांचा पाऊसच पडला. एका दिवसात अडीचशेपेक्षा जास्त माणसे ठार झाली... सरकारचे व्यवहार बंद पाडावे म्हणून देशभर तारेचे खांब, पूल इ. मोडून टाकण्याची मोहीम झाली. काही ठिकाणी पोलीस चौक्यांवर हल्ले करून लोकांनी हत्यारे लुटली. ती घेऊन सशस्त्र लढ्यांचा पवित्रा जनतेने सुरू केला. सरकारी खजिने लुटले... सर्वांत कौतुकाची गोष्ट म्हणजे खानदेशचे कार्यकर्ते उत्तमराव पाटील यांची पत्नी सौ. लीलाबाई पाटील या देखील येरवड्याच्या

तुरुंगातून फरारी होऊन भूमिगत झाल्या. जनतेच्या क्रांतिकारी धाडसाच्या व शौर्याच्या अशा इतरत्रही कित्येक घटना घडल्या." (१८३-१८४) या चळवळींची हकीकत राधाबाई आपटे कथन करतात– "१९४२ सालचा राष्ट्रीय लढा हा हिंदुस्थानच्या स्वातंत्र्ययुद्धातील संस्मरणीय काळ होय. त्या वेळच्या देशभक्तांनी राष्ट्राचा, आणीबाणीचा प्रसंग ओळखून महात्माजींच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून भराभर तुरुंग भरून काढले. स्वतःच्या बायका, मुले, माता-पिता, आप्त-इष्ट; शिक्षण-रक्षण सर्व बाजूला सारून तन-मन-धनेकरून या स्वातंत्र्ययुद्धात कित्येकांनी उडी घेतली... ही चळवळ जेवढी पेटवता येईल, पसरवता येईल तितकी हिंदुस्थानभर जनतेने पेटवली. स्त्री-पुरुष, मुलं ह्यांनी आपले देहदेखील समर्पण केले... नंदुरबारचा शिरीषकुमार, याच्यासारख्या कोवळ्या बालकाने झेंडा हातातून न सोडता प्राणार्पण केले... आझाद रणांगण गाजविले. स्त्रीने पुरुषा लाजविले." (२३०) असा गांधीजींच्या बेचाळीसच्या चळवळीचा लोकांवर झालेला परिणाम अनेक आत्मचरित्रांतून वाचायला मिळतो. गांधीजींच्या या क्रांतीचे यथार्थ मूल्यमापन आचार्य शं. दा. जावडेकर करतात, "...सनातन क्रांतिवृत्तीवर अधिष्ठित झालेला सत्याग्रही सर्वोदयवाद हा व्यक्तिवाद, राष्ट्रवाद व समाजवाद या तीनही तत्त्वज्ञानांहून भिन्न असला तरी या तिहीतील सत्तत्त्वे आत्मसात करून मानव संस्कृतीला सत्य युगाचे मार्गदर्शन करणारा असा हा तो शांतिमय क्रांतिवाद आहे." [१]

गांधीजींच्या आणि इतर सुधारकांच्या प्रयत्नांना यश येऊन भारताला पंधरा ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले. पंधरा ऑगस्टला स्वातंत्र्य मिळाल्यावर आपल्या आनंदाचे राधाबाई आपटे वर्णन करतात, "आमच्या आयुष्यातील फार मोठा आनंदाचा सण 'पंधरा ऑगस्ट १९४७' हाच होय." (२५२) राधाबाई आपटे गुरुजींचा वाढदिवस म्हणून पंधरा ऑगस्ट साजरा करतात. पण हा आनंद क्षणजीवी ठरला. स्वातंत्र्यानंतर लगेच झालेली भारत-पाकिस्तान फाळणी व तीस जानेवारी १९४८ रोजी झालेला गांधींचा वध या दोन घटनांनी अथक परिश्रमांनी मिळविलेल्या स्वातंत्र्याचा आनंद लगेच विझल्याचे मृणालिनी देसाई सांगतात. गांधींची हत्या झाल्यावर देशातील अवस्था सरोजिनीबाई शारंगपाणी लिहितात– "जातीय द्वेष, मत्सर, हिंसाचार, स्वातंत्र्य लढ्याचे वेळी दबून गेलेले सारे दुर्गुण उफाळून वर आले, त्यांनी उग्र स्वरूप धारण केलं. त्यात नथूराम गोडसे ब्राह्मण, ब्राह्मणद्वेषाने वेडे झालेल्यांना कारण मिळालं. ब्राह्मणांची घरंदारं लुटली जाऊ लागली. जाळपोळ, मारामारी यांना ऊत आला. वित्त, प्राण किंवा अब्रू सुरक्षित राहणं कठीण झालं. सांगली, मिरज, कोल्हापूर येथे तर ह्या दंगलींना अतिशय

[१] शं. दा. जावडेकर, आधुनिक भारत, दु. आ. पुणे, १९६८, पृ. १३

भीषण रूप आलं." (२३१) अंगावर शहारे आणणारी परिस्थिती या घटनेने निर्माण झाली.

देशाचे अंतरंग स्त्रीला उमगत होते. आपला त्याला हातभार लागावा म्हणून स्वेच्छेने ती लढ्यात उतरत होती पण कधी असेही घडत होते की, राजकीय चळवळीत पडलेल्या पुरुषाच्या पत्नीचा आपसूकच त्या चळवळीशी घनिष्ठ संबंध येई. तो जर ह्या चळवळीचा सूत्रधार असेल तर त्याच्या कारावासाने त्याच्या गैरहजेरीत पतीचे पुढारीपण त्याच्या स्त्रीकडे येई. याचे उत्तम उदाहरण म्हणजे उषाताई डांगे. त्या म्हणतात, "लग्न झाल्यानंतर माझे जीवन बदलू लागले. डींचा मित्रपरिवार माझा आप्तपरिवार बनला. मला नवे जग दिसू लागले. नव्या धर्तीची माणसे माझ्या नजरेसमोर आली. काहीतरी नवी भावना माझ्यात उतरू लागली. राजकारणाचे मतभेद मला इतके समजत नव्हते. टिळक, गांधी व स्वातंत्र्य चळवळ ही माझ्या जाणिवेची मर्यादा होती. या सर्वांपेक्षा 'डी' काही वेगळे म्हणतात व ते कम्युनिस्ट आहेत हे मला कळत होते. त्यांच्याबद्दल विश्वास होता, अभिमान होता. परंतु राजकारणात स्वत: उडी घ्यायची कल्पना किंवा तयारी झाली नव्हती. तरीपण नकळत मी त्यात ओढली जात होते." (३४) डींचे काम पुढे बाई सांभाळतात. त्यांचे कामगार चळवळीतील संस्मरणीय कार्य स्त्रीच्या पुढे पडलेल्या पावलाचे द्योतक आहे. पांढरपेशा स्त्रीप्रमाणेच अशिक्षित–गांजलेली कामगार स्त्री या चळवळीत पडली होती. त्यांची कामगिरी उषाताई सांगतात, "सैन्यातील शिपायांप्रमाणे त्यांची संघटना झाली होती. गिरणीच्या दारावर युनियनचा पट्टा घालून त्या पिकेटिंग करायला सज्ज राहायच्या. या तुफानी बायकांना झुगारून संप फोडण्याची मोठमोठ्या दादा लोकांची हिंमत होत नसे." (५५) कामगारांचा सार्वत्रिक संप, विविध मिलचा संप यांची हकीकत उषाताईंच्या आत्मचरित्रातून समजते.

१९६० मध्ये झालेल्या महाराष्ट्र राज्य स्थापनेचा उल्लेख सुधाताई अत्रे 'गोदातरंग'मध्ये करतात. १९६२ मध्ये सीमावादावरून झालेल्या भारत–चीन युद्धाची ओझरती ओळख 'अश्वत्थाची फुले' या प्रमिलाबाई भालेराव यांच्या आत्मचरित्रात वाचायला मिळते. १९६५ मधील भारत–पाक युद्धाची पुसटती दखल आत्मचरित्रांत घेतलेली दिसते. असे विविध छोटे, मोठे, स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर कालखंडातील राजकीय बदल आत्मचरित्रांतील समाजदर्शनावरून समजतात.

सामाजिक, धार्मिक व राजकीय परिस्थितीवरून असे निदर्शनास येते की, समाजात कोणतेही बदल अतिशय मंद गतीने होतात. समाजाचे स्वरूप विविध प्रयत्न करूनही पूर्णपणे बदलत नाही असे दिसते उदाहरणार्थ, १९२९ मध्ये

बाल विवाहास कायद्याने बंदी झाली. पण अजूनही समाजातून बालविवाहपद्धती पूर्णपणे नष्ट झाल्याचे दिसत नाही. सुधारणा शहरी भागात लवकर होतात. ग्रामीण भागात त्या पोचायला उशीर लागतो. ग्रामीण भागात पोचल्यावरही त्यांचा स्वीकार कितपत होईल याची निश्चिती देता येत नाही. बंडखोर लोक समाजाला मान्य नसतानाही आपल्या मर्जीनुसार वागताना दिसतात. आपल्याला पाहिजे ते बदल घडवून आणतात. काही लोक समाजाने मान्यता दिली असतानाही परंपरेपासून ढळायला तयार नसतात. 'जुने ते सोने' या म्हणीला ते कवटाळताना दिसतात. हेच समाजाचे खरे आणि मूळ रूप आहे असे वाटते.

***

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३१८२
२११२६
निबंध
२५।१२।८६

# स्त्री-आत्मचरित्रांची वैशिष्टये

प्रत्येक वाङमय-प्रकार आपापल्यापरीने साहित्यसृष्टीला काहीतरी देऊन तिला समृद्ध करण्याचा प्रयत्न करीत असतो. ललित वाङमय हे 'कल्पकता' या आपल्या वैशिष्टयाने साहित्याला विभूषित करण्याचा प्रयत्न करीत असते तर वैचारिक वाङमय हे 'विचार सौंदर्याने' वाङमयाला श्रीमंत बनवीत असते. ललितवाङमयाच्या सीमारेषेवरच्या चरित्र व आत्मचरित्र या वाङमय-प्रकारांनीही मराठी साहित्याला आपापल्यापरीने समृद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. कथा, कादंबरी, नाटक, काव्य वगैरे वाङमय-प्रकारांच्या तुलनेत चरित्र व आत्मचरित्र यांना मराठी साहित्यात एक वाङमय-प्रकार म्हणून बऱ्याच कालावधीनंतर मानाचे स्थान प्राप्त झाले. तुलनाच करायची झाल्यास सुरुवातीला चरित्रापेक्षाही आत्मचरित्र या वाङमय-प्रकाराची अधिक उपेक्षा झालेली आढळते.

मानवी जीवन हे सर्व वाङमय-प्रकारांचे उगमस्थान आहे. आत्मचरित्राचा गाभा 'व्यक्तिजीवन' हाच होय. आत्मवृत्ते, आत्मचरित्रात्मक कादंबरी, दैनंदिनी, आठवणी, पत्रे हे वाङमय-प्रकार तर आत्मचरित्राला जवळचे, आत्मचरित्राशी साधर्म्य दाखविणारे आहेतच. परंतु कादंबरी, व्यक्तिचित्रे, नाटक, कथा, प्रवासवर्णने या विविध वाङमय-प्रकारांनाही आत्मचरित्रात वाव मिळू शकतो. प्रा. श्री. के. क्षीरसागर यांनी आपल्या 'तसबीर आणि तकदीर' या आत्मचरित्राच्या प्रस्तावनेत केलेल्या विधानावरून वरील विचारास अधिक पुष्टी मिळते. ते म्हणतात, "माझ्या मूळ चरित्रातच तीन चार कादंबऱ्यांना बीज पुरवील असे साहित्य होते व ते या आत्मचरित्रातही आढळेल." [1] विविध वाङमय-प्रकारांना सामावून घेण्याचे फार मोठे सामर्थ्य आत्मचरित्र या एका वाङमय-शाखेत आहे. अधिक धाष्टर्याने असे म्हणता येईल की, आत्मचरित्र हा एकच वाङमय-प्रकार असा आहे की, जो इतर सर्व वाङमय-प्रकारांना जन्म देऊ शकतो. कारण वाङ-

[1] श्री. के. क्षीरसागर, तसबीर आणि तकदीर, मुंबई, १९७६, पृ. १४

मयाचे जे अधिष्ठान ‘ व्यक्तिजीवन ’ तोच आत्मचरित्राचा ‘ विषय ’ आहे. समीक्षक Bats म्हणतात, “ I find Autobiography in everything and everything in Autobiography.”[2] हे विचार मननीय आहेत. आत्मचरित्र या वाङ्मयप्रकाराचे हे फार मोठे वैशिष्टय मानावे लागेल. स्त्रियांनी आत्मचरित्रे लिहून त्यात अनेक वैशिष्टयांची भर घालून आत्मचरित्र या वाङ्मय–शाखेला अधिक समृद्ध केले आहे. पतीच्या निमित्ताने लिहिल्या गेलेल्या आत्मचरित्रांत रेखाटलेली पतिचित्रे, लेखनातून स्पष्ट झालेला पतीचा पत्नीकडे पाहण्याचा दृष्टिकोण, लेखनात साधलेले सत्यकथन, तटस्थता, ‘ स्व ’ला केंद्रस्थान, घटनांची निवड व कुशल मांडणी, वस्तुनिष्ठ निवेदन, सामान्यज्ञान, वाङ्मयीन दृष्टीने–साधेपणा, सरलता, प्रासादिकता, उत्कटता आणि अल्पाक्षरता ही स्त्री–लेखनाची कलामूल्ये, कलात्मक व अक्षर कलाकृती, साम्यवादी व गांधीवादी जीवनदृष्टी, आत्मचरित्रांतून घडणारा साहित्यविषयक परिचय–व्यवहारी अपूर्णांकांची पत्रभाषा ही स्त्री–आत्मचरित्रांची वैशिष्टये होत.

**पतिचित्रे**

[ काही स्त्रियांनी पतीची ‘ घरगुती ’ प्रतिमा रेखाटलेली आढळते. काहींनी पतीच्या खाजगी जीवनाबरोबरच त्याच्या समाजातील स्थानालाही महत्त्व दिले आहे. काही आत्मचरित्रांत पतीच्या लौकिक प्रतिमेलाच प्राधान्य मिळालेले दिसते. शीलवतीबाईंनी डॉ. व्यंकटेश केतकर यांचे एक माणूस म्हणून गुणावगुणांसह दर्शन घडवले आहे. पाश्चात्य संस्कृतीचा हा परिणाम असला तरी मराठी आत्मचरित्राने उचललेले हे पुढचे पाऊल आहे.

**रमाबाई रानडयांनी रेखाटलेले माधवराव रानडयांचे घरगुती चित्र**

रमाबाई रानडयांची ‘ आमच्या आयुष्यातील काही आठवणी ’ ही पतिचित्र रेखाटणारी मराठी साहित्यातील पहिली कलाकृती होय. रमाबाईंच्या या कारागिरीबद्दल र. गो. सरदेसाई कौतुकाने म्हणतात, “ रमाबाई रानडे यांनी आमच्या आयुष्यातील काही आठवणी लिहून महाराष्ट्रीय महिलांना एक नवा धडा घालून दिला.”[3] माधवरावांच्या मृत्यूनंतर त्यांच्या सत्तावीस वर्षांच्या दीर्घ सहवासाची आठवण रमाबाईंना क्षणोक्षणी येणे अगदी स्वाभाविक आहे. त्यावेळी आठवणी तीव्र होऊन कागदावर उमटल्या. त्यातून जन्मलेले हे माधवरावांचे निखळ घरगुती चित्र होय. महाराष्ट्राच्या दृष्टीने माधवराव कितीही मोठे असले तरी रमाबाईंच्या दृष्टीने ते त्यांचे ‘ पतिदेव ’ होते. घरातील लहान–मोठ्या घटना सांगून रमाबाईंनी माधवरावांचे जास्तीत जास्त ठळक पण घरगुती चित्र काढण्याचा प्रयत्न केला आहे.

---

[2] E. S. Bats, Inside out, Baisil Blackwell, 1937, P. XIV

[3] र. गो. सरदेसाई, आमचा संसार, दु. आ. मुंबई, १९५०. पृ. ४

माधवरावांचा एकमार्गी स्वभाव 'तूप' म्हणून दशमीबरोबर 'पाणी' खाण्याच्या प्रसंगातून दाखविला आहे. आपल्या मोलकरणीच्या मुलाला दागिने मिळत नाहीत. आपणच कशाला दागिने घालायचे ? यावरून त्यांची 'वसुधैव कुटुंबकम्' वृत्ती, स्पष्ट केली आहे. खांबाकडून बिनतोड पराभव स्वीकारणे, आईने सांगितलेल्या हातातील वडी (मोठी होती तरी) मोलकरणीच्या मुलाला देणे या आठवणींमधून माधवरावांच्या प्रामाणिकपणावर प्रकाश टाकलेला दिसतो. कुणाचेही काम घरी न पाहणारे माधवराव समतोल बुद्धीचे न्यायाधीश म्हणून रमाबाईंनी उभे केले आहेत.

रमाबाईंचे वडील माधवरावांना मुलगी द्यायचे ठरवितात तेव्हा, "आपण जुन्या घराण्यातील जहागिरदार आहात व मी सुधारक असून पुर्नविवाहाच्या पक्षाचा आहे. तसेच मी आपल्या शरीराने धट्टाकट्टा दिसलो तरी डोळयांनी व कानांनी अधू आहे. शिवाय मला विलायतेतून जाऊन यायचे आहे. तेथून परत आल्यावर मी प्रायश्चित्त घेणार नाही. तेव्हा आपण या सर्व गोष्टींचा विचार करून काय ते ठरवावे." (२४) लग्न टाळण्यासाठी माधवरावांनी केलेला हा युक्तिवाद आपल्या नवऱ्याच्या चातुर्याचे दर्शन घडवायला रमाबाईंनी दिला असावा असे वाटते. माधवराव आणि रमाबाई यांच्या वयात एकवीस वर्षांचे अंतर आहे. 'मी सांगतो ते तू मुकाटयाने कर' अशी माधवरावांची रमाबाईंशी अधूनमधून हुकमतीची वागणूक असली तरी इतरत्र माधवराव रमाबाईंशी पित्याच्या वात्सल्याने वागताना दिसतात. ताई, सासूबाई, वन्स यांच्या जबर सासूरवासाखाली आपली लहानशी बायको चिरडली जाऊ नये म्हणून प्रत्येकवेळी त्यांची वडिलांच्या मायेने समजूत घालून माधवराव सुधारणेकडे रमाबाईंचे मन तयार करताना आढळतात. घरातील जाचाने एखाद्या वेळी रमाबाई रडवेल्या दिसल्या तर, "थोडे सोसावयास शिकावे. उत्तर दिले नाही म्हणजे झाले. मी तुला कधी काही बोलत नाही ना ? इतर कोणी काही बोलले तरी रडत जाऊ नकोस." (४४) माधवरावांचा हा शांत, प्रेमळ व गंभीर उपदेश रमाबाईंना भरभक्कम धीर देऊन जातो. हरफर्डेबाईंना शिवल्याबद्दल स्नान करून स्वत:ची प्रकृती बिघडवून घेऊ नकोस असा सल्ला माधवराव देतात. "घरातल्या बायका त्यांच्या वेळच्या समजुतीप्रमाणे बोलतात. त्यात त्यांचा दोष नाही. आपण त्यांना दुखवावयाचे नाही. उत्तर द्यायचे नाही एवढे तू कर." (९०) घरातील बायकांची परिस्थिती समजून घेऊन घरात दुफळी व्हायला नको म्हणून माधवरावांनी केलेला हा उपदेश. यातून समजूतदार व उपदेशक माधवराव उभे करण्याचा रमाबाईंचा प्रयत्न असावा.

अशा या माधवरावांबरोबर रागीट माधवरावांचे चित्रही रमाबाईंनी कळतनकळत काढले आहे. "माधवरावांच्या रागाची रीत, ...राग म्हणजे इतर

लोकांसारखा आरडणे, ओरडणे अगर तोंडातून दुरुत्तर काढणे असा नसून उलट मुग्ध व उदासीन बसायचे. फार तर एखाद दुसरा सुस्कारा टाकायचा. ही स्थिती फार वेळ राही." (५३–५४) असे रमाबाई सांगतात. बोलण्यापेक्षा अबोल्याची शिक्षा फार भयंकर वाटते. मारले तरी चालेल, चार शिव्या हासडल्या तरी चालतील. पण हा जीवघेणा अबोला नको असे त्यावेळी होऊन जाते. माधवरावांच्या रागाचे असे कडक रूप होते. कैऱ्या तोडण्याच्या नादात रमाबाईंच्या हातून काठीचा छंद हरवतो. जेवणाच्यावेळी माधवराव कुत्सितपणे म्हणतात, "आज सकाळच्या पाऊणशे रुपयांचे लोणचे वाढावयास तरी आण." (१०९) माधवरावांचे हे रूप रमाबाईइतके चांगले कुणालाही जाणवणे शक्य नव्हते. माधवरावांच्या या रागाच्या तऱ्हा कौतुकाने रमाबाई सांगत असल्या तरी माधवरावांच्या दोषांवर त्यातून प्रकाश पडतो आणि समाजाला पूर्णपणे अपरिचित असलेले माधवरावांचे हे घरगुतीरूप पडद्याबाहेर येते.

माधवराव हे जसे कर्तव्यकठोर आहेत तसे भावविवशही आहेत. वडील जेव्हा करवीरास जाण्याचा बेत करतात तेव्हा माधवराव आपल्या वडिलांची गयावया करतात, करुणा भाकतात आणि शेवटी काकुळतीने म्हणतात, "मला येथे ठेवून सर्व मंडळी जाणार ! माझी आई गेली त्याच दिवशी मी पोरका झालो. आपण जाण्याचा बेत रहीत करीत नसाल तर मीही राजिनामा लिहिणार आहे."(३४) भाववेडे माधवराव यातून स्पष्ट होतात. माधवरावांच्या या भावकोमल अंतरंगाची जाण सर्वात जास्त रमाबाईंनाच असावी म्हणूनच रमाबाईंनी माधवरावांचे चित्र अचूकपणे रेखाटले. माधवराव आजारी असताना रमाबाई एकट्याच माधवरावांजवळ असतात. तेव्हा आजाराचा जोर जास्त होऊन माधवरावांचा धीर सुटतो. "तू अगदी एकटी आहेस." (१५०) असे म्हणून माधवराव हुंदके द्यायला लागतात. माधवरावांची आंतरिक चलबिचल रमाबाईंनी यातून टिपली आहे. माधवरावांच्या भावूक अंतःकरणाचाच हा एक आविष्कार. तो रमाबाईंपेक्षा अधिक चांगला कुणाला कळणार ?

माधवरावांना नोकराचाकरांवर रागावलेले आवडत नाही. गुणी लोकांची त्यांना किंमत आहे. पंडितांसारख्या मानी, तेजस्वी, हुशार व निरलस मनुष्य मिळणे फार दुरापास्त आहे, असे माधवराव नेहमी म्हणत. गाडीला जुंपावयाच्या घोड्यांना किंवा बैलांना जास्त वेळ चालविले जाऊ नये याची ते काळजी घेतात. यातून त्यांची भूतदया जाणवते. आजाऱ्यांकडे जातीने लक्ष देणारे माधवराव कनवाळू वाटतात. ईश्वरावर त्यांचा पूर्ण भरवसा आहे. तुकाराम हा त्यांचा आवडता कवी होय. ते तुकारामाचे अभंग घोळून घोळून तल्लीनतेने म्हणतात.

"जी गोष्ट अंतःकरणापावेतो पोचते म्हणजेच काळजाला लागते तिचे नाव काळजी" (१८३) अशी काळजीची समर्पक व्याख्या माधवराव करतात. "चांगली गोष्ट साध्य करण्यास फार श्रम लागतात. म्हणून तिच्यासाठी आपल्याला थोड्याबहुत तरी यमनियमांचे अवलंबन करावे लागते." (१२१) अशी तत्त्वज्ञाला शोभणारी विधानेही ते अधून मधून मांडतात.

माधवरावांची भावपूजा बांधत असताना कळत नकळतपणे त्यांच्या स्वभावातील दोषांची चर्चा करून रमाबाईंनी माधवरावांची अशी घरगुती प्रतिमा रेखाटलेली आहे. समीक्षक श्री. वि. सी. सरवटे या संदर्भात म्हणतात, "एका थोर विभूतीच्या गृहजीवनाचे इतके अव्याज पण जिवंत, हृदयंगम पण यथातथ्य चित्र मराठी साहित्यात दुसरे क्वचितच बघावयास मिळेल. न्यायमूर्तींची अंतर्बाह्य साधुवृत्ती, त्यांचा निरभिमान, त्यांची ईश्वरभक्तीतील एकतानता या सर्व गुणांचा परिचय या आठवणीत जितका जिवंतपणे येतो तितका न्यायमूर्तींच्या दुसऱ्या कोणत्याच चरित्रात येत नाही."[4] वि. सी. सरवट्यांचा हा अभिप्राय योग्य वाटतो.

### लक्ष्मीबाईंनी दाखविलेले टिळकांचे 'वेगळेपण'

'स्मृतिचित्रां'त लक्ष्मीबाई टिळकांकडे विशेष करून पती या दृष्टिकोणातून पाहतात. त्यामुळे समाजात मान्यता पावलेल्या टिळकांच्या प्रतिमेपेक्षा बरीच वेगळी प्रतिमा, 'स्मृतिचित्रां'त रेखाटलेली आढळते. 'टिळक दर्शन' या आपल्या लेखात श्री. प्रभाकर पाध्ये म्हणतात, "टिळकांची जी माहिती आपल्याला आहे ती कविपंचकातले एक कवी म्हणून, फुलामुलांचे एक कवी म्हणून, धर्मांतर म्हणजे देशांतर नव्हे असे मानणारे एक विद्वान म्हणून. विरागाच्या नव्हे तर अनुरागाच्या मागे जाणारा एक संन्यासी म्हणून. एक अभिजात विक्षिप्त, एक हाडाचा भटक्या, दोन हातांनी असेल नसेल ते समोरच्या याचकाला वाटून टाकणारा उदारमनस्क व काव्याचा नादी म्हणून जी ओळख नारायण वामनांची या पुस्तकावरून होते ती सर्वस्वी नवीन आहे."[5] 'माझे चरित्र जसे घडले तसे लिहा.' या टिळकांच्या आज्ञेवरून लक्ष्मीबाई दत्तू लिहीत असलेल्या टिळकांच्या चरित्राला कच्चामाल पुरविण्यासाठी म्हणून 'स्मृतिचित्रे' लिहायला बसल्या आणि त्यात टिळकांच्या गुणांबरोबरच त्यांच्यातील दोषांचे चित्रणही झाले. माणूस म्हटला की त्याच्या ठिकाणी दोष येणारच. त्या व्यक्तीच्या सहवासात अखंड राहणाऱ्यालाच ते दोष बरेचदा अधिक प्रमाणात जाणवतात, तेवढे तास दोन तास, दिवस-दोन दिवस

---

[4] वि. सी. सरवटे, मराठी साहित्य समालोचन, खंड ति., १९६९; पृ. १८७–१८८

[5] प्रभाकर पाध्ये, स्मृतिचित्रातील टिळक दर्शन, सत्यकथा, जुलै, १९७६; पृ. ३०–३१

सहवासात येणाऱ्याला जाणवत नाहीत. एकेचाळीस वर्षांच्या आपल्या वैवाहिक जीवनावरून लक्ष्मीबाईंनी रेखाटलेले हे टिळकचित्र होय.

मुलींबरोबर सागरगोटे सोंगटया खेळणारा, मुलींच्या खेळण्यामुळे आपल्या खाण्याची आबाळ होते म्हणून मुलींना प्रवेश बंद करून, लक्ष्मीबाईंना 'तंगडीच मोडीन' (भाग १, पृ. ८) अशी धमकी देणारा सखूचा भाऊ म्हणून लक्ष्मीबाईंनी टिळकांना 'स्मृतिचित्रा'त प्रवेश दिला आहे.

'न मातुः परदैवतम्' अशी आपल्या आईच्या बाबतीत टिळकांची वृत्ती असल्याचे 'स्मृतिचित्रे' सांगतात. लग्नानंतर लगेच टिळकांचे दोन गुण आपल्या लक्षात आल्याचे लक्ष्मीबाई स्पष्ट करतात. एक 'टिळकांचे प्रेम' आणि दुसरे म्हणजे 'टिळकांचा लहरीपणा.' लग्नसमारंभात भांगेची भजी खाऊन आपल्या पत्नीला भ्रमिष्टासारखे होऊ नये म्हणून भर पंक्तीत लक्ष्मीबाईंच्या पानातील भजी काढून घेणारे टिळक प्रेमळ पती वाटतात. वडिलांच्या अंगात येणारी देवी, "ही सून फार वाईट पायगुणाची आहे. हिच्यामुळे घरात सुख व शांती लाभणार नाही." (भाग १, पृ. १५) असे सांगते. देवीने असे सांगितले म्हणून तिला हळद-कुंकू न वाहण्याचा टिळकांनी घेतलेला निर्णय त्यांचे पत्नीप्रेम दाखवितो. लक्ष्मीबाईंना 'टाकून दे' या वडिलांच्या सूचनेवर "मी तसे कधीच करणार नाही. माझा संसार नाही झाला तरी चालेल" हे टिळकांचे तडफदार उत्तर त्यांच्या लक्ष्मीबाईंवरील प्रेमाला अधिक गहिरेपण आणते. पाणी भरण्याचा लक्ष्मीबाईंना त्रास होऊ नये म्हणून वडिलांच्या नकळत अंधारात उभे राहून पाणी भरणारे टिळक आपल्या पत्नीची काळजी घेणारे पती वाटतात! आपण आजारी असताना टिळकांनी आपली आईप्रमाणे सेवा केल्याचे लक्ष्मीबाई सांगतात. टिळकांच्या लक्ष्मीबाईंवरील प्रेमाचा सर्वोत्कृष्ट पुरावा म्हणजे टिळक ख्रिस्ती होऊन लक्ष्मीबाईं-कडे राहावयास येतात पण ख्रिस्ती धर्मावर गाढ श्रद्धा असूनही एरवी आपल्या मनाप्रमाणे सर्व घडवून आणणारे टिळक लक्ष्मीबाईंना त्यांच्या इच्छेविरुद्ध धर्मांतर करावयास लावत नाहीत. टिळकांनी दाखविलेला हा मनाचा मोठेपणा आहे. मुल्ल-भटाच्या मुदपाकखान्यात जाण्याचा क्रम ठेवून घरी लक्ष्मीबाईंच्या इच्छेनुसार निरामिष आहार तीस-पस्तीस वर्षे ठेवणारे टिळक आपल्या बायकोच्या भावनेचा व मताचा आदर बाळगताना दिसतात. दत्तूच्या जन्माच्यावेळी डॉक्टर आणणे, लक्ष्मीबाईंची कविता पाहून आनंदित होणे ही त्यांच्या लक्ष्मीबाईंवरील प्रेमाचीच निदर्शने होत. टिळकांना लहान मुलांचेही फार वेड आहे. त्यांच्याशी ते अतिशय जिव्हाळ्याने वागतात. असे आईवर गाढ श्रद्धा असणारे, लक्ष्मीबाईंवर प्रेम कर-णारे, लहान मुलांशी एकरूपतेने वागणारे टिळक कधी कधी फारच लहरीपणाने वागताना दिसतात, विक्षिप्तपणाने वाटेल ते करताना आढळतात, तर केव्हा केव्हा अगदीच बेफिकीर वाटतात.

न सांगता निघून जाणे हा टिळकांचा स्वभावधर्मच असल्याचे लक्ष्मीबाई सांगतात. लक्ष्मीबाईंना जलालपूरला नेऊन घातल्यावर "सहा महिनेपर्यंत टिळकांचा काही पत्ता नव्हता की पत्र नव्हते. या काळात ते कोठे दडी मारून बसले होते काही ठाऊक नाही." (भाग १, पृ. ६७) लक्ष्मीबाईंजवळ एक पैसा नाही. दत्तू लहान. घरात अन्नधान्याची सोय नाही. अशावेळी लक्ष्मीबाईंना सोडून जाताना टिळकांना भान राहत नाही. लक्ष्मीबाईंच्या अडचणीच्या काळात तर आपल्या या स्वभावाने टिळक नेहमीच लक्ष्मीबाईंना उपाशी ठेवतात. घरात तांदूळ नसताना उरलेल्या शेवटच्या एक रुपयाची दऊत आणणारे टिळक. सामानासाठी दिलेल्या तीन रुपयांचे घड्याळ आणणारे टिळक, लक्ष्मीबाईंना डब्यात बसवून तिकीट काढण्याच्या निमित्ताने बाहेर येऊन वादविवादात रममाण होणारे टिळक विक्षिप्त वाटतात. लक्ष्मीबाई घारूमाईच्या लग्नाला गेल्या असताना फक्त सर्दी झाली म्हणून लक्ष्मीबाईंना चार तारा करणारे टिळक चार चौघांपेक्षा चमत्कारिक ठरतात. "मनाला पटेल ते करावयाचे हा टिळकांचा पहिल्यापासून मोठा बाणा असल्याने त्या काळात अगदीच विलक्षण दिसणाऱ्या गोष्टी ते करीत." (भाग १, पृ. १३३) असे स्मृतिचित्रे सांगतात.

कर्णाची उदारता टिळकांना लाभलेली आहे. टिळक पैसा कसा जाईल या काळजीत तर मी पैसा कसा राहील या काळजीत असे लक्ष्मीबाईंनी दोघांच्या परस्पर विरोधी वृत्तीचे वर्णन केले आहे. कोणतीही वस्तू दुसऱ्याला देऊन मोकळे होण्याची संन्याशाची निस्संग वृत्ती टिळकांच्या ठिकाणी आहे, तर आपल्याला उपयोगी पडेल म्हणून प्रत्येक वस्तू जीवापाड जपण्याची संसारीवृत्ती लक्ष्मीबाईंची आहे. त्यामुळे त्याची वारंवार भांडणे होतात. टिळकांना व्यवहारज्ञान नाही असा लक्ष्मीबाईंचा त्यांच्यावर आरोप तर लक्ष्मीबाईंना मानसशास्त्र समजत नाही अशी टिळकांची लक्ष्मीबाईंविरुद्ध कैफियत. "यांची भांडणे ही पुस्तकी पंडित नवरा आणि संसारदक्ष बायको यांच्यातील भांडणे आहेत"[6] असे समीक्षक श्री. र. गो. सरदेसाई यांच्या भांडणाचे विश्लेषण करतात.

एखादी व्यक्ती जवळ असली की टिळक तिला हळूवारपणे जपतात पण ती दृष्टीआड झाल्यावर तिच्याबद्दल काळजी किंवा कळकळ वाटत नसल्याचे टिळकांच्या वागण्यावरून लक्षात येते. आपल्या बायकोने आठ दिवसांत शिकून तयार व्हावे असे टिळकांना वाटते. त्यासाठी पहिलीपासूम सहावीपर्यंतची क्रमिक पुस्तके आणून टिळक शिकवायला सुरुवात करतात. "शब्द म्हणजे काय ?" (भाग १, पृ. ८१) या टिळकांच्या प्रश्नाचे "शब्द म्हणजे शब्द" (भाग १, पृ. ८१) हे लक्ष्मीबाईंचे उत्तर आणि अखंड हसणे यामुळे टिळकांच्या जीवाचा संताप होतो. पुस्तके भराभर

[6] र. गो. सरदेसाई, आमचा संसार, दु. आ., मुंबई, १९५०, पृ. ४७

जाळली जातात. सात महिन्यांच्या गरोदर लक्ष्मीबाईंना जिन्यावरून ढकलताना संतापाच्या भरात टिळकांना भान राहत नाही. अशी टिळकांच्या संतापाची रीत आहे तर "मी तुला फार त्रास दिला. मला क्षमा कर" (भाग ३, पृ. १४३) अशी राग शांत झाल्यावर त्यांच्या पश्चात्तापाची तऱ्हा आहे. अशा प्रकारे टिळकांच्या स्वभावातील विरोध लक्ष्मीबाईंनी स्पष्ट केला आहे. "नारायण वामनांचा तालेवार संतापीपणा आणि लक्ष्मीबाईंचा सोशिक विनोद यांच्या संसाराची संघर्षचित्रे म्हणजेच ही 'स्मृतिचित्रे' प्रामुख्याने होत." [7] श्री. प्रभाकर पाध्ये यांनी 'स्मृतिचित्रां'बद्दल व्यक्त केलेला हा अभिप्राय समर्पक वाटतो.

'हे विश्वची माझे घर' ही टिळकांची वृत्ती. मनुष्यप्राणी हा जात्या दुष्ट नाही. परिस्थिती त्याला दुष्ट बनवीत असते. असे त्यांचे तत्त्वज्ञान आहे. कर्मकांडाला फाजील महत्त्व देणाऱ्या ब्राह्मणांपेक्षा आंधळ्या–पांगळ्यांना जेवू घालून दानधर्म करणे हा मानवतावादी धर्म त्यांना पसंत आहे. आपल्या जीवाची पर्वा न करता प्लेग झालेल्यांची स्वतःच्या हाताने ते शुश्रूषा करतात. जवळ काहीही नसताना दुष्काळात होस्टेलची बावीस मुले सांभाळतात. गरिबांना मिळत नाही म्हणून सुग्रास अन्न त्यांना खाववत नाही.

अशी प्रेमळ, लहरी, विक्षिप्त, उदार, संतापी, निष्पाप, परोपकारी टिळक-मूर्ती लक्ष्मीबाईंनी 'स्मृतिचित्रांत' रेखाटलेली आहे.

टिळकांच्या विक्षिप्त वागण्याने, लहरीपणामुळे, अमर्याद उदारतेने लक्ष्मी-बाईंचा जीव मेटाकुटीला येई. दुःख डोळ्यांवाटे बाहेर पडे. 'स्मृतिचित्रे' लिहिता-नाही लक्ष्मीबाईंच्या या जखमा उलून येताना दिसतात. तरी "सुरुकुळ–टिळक श्री. नारायण चरणी लीन जाहली. लक्ष्मी मी–तू हे विसरली." (भाग २, पृ. १०) ही आर्यवृत्तीच प्रधान आहे. टिळकांच्या दोषांचाही त्या आनंदाने स्वीकार करतात. नवऱ्याच्या दोषांनाही कौतुकाचे आवरण घालायचे या दृष्टिकोणातून तर टिळकांचे दोष सांगितले गेले नसावे अशी शंका येते. वरील चित्र अभावितपणे निघालेले आहे असे वाटते. किंवा माझे चरित्र घडले तसे लिहा या टिळकांच्या आज्ञेने अंकित झाल्याने लिहिले गेले असावे. चरित्र व आत्मचरित्र या वाङ्मय–प्रकाराचे अभ्यासक अ. म. जोशी लक्ष्मीबाईंनी चित्रित केलेल्या टिळकांच्या प्रतिमेबद्दल आपला "श्रीमती लक्ष्मीबाई यांनी रे. टिळक यांचे चित्र जसे यथातथ्य तेथे रंगविले आहे तसे कोणीही दुसरा मनुष्य रंगवू शकला नसता." [8] असा अभिप्राय व्यक्त करतात. अ. म. जोश्यांनी व्यक्त केलेला हा अभिप्राय मनाला पटतो.

---

[7] प्रभाकर पाध्ये, स्मृतिचित्रातील टिळक दर्शन, सत्यकथा, जून, १९७६, पृ. ३६

[8] अ. म. जोशी, चरित्र : आत्मचरित्र : तंत्र व इतिहास, द्वु. आ. नागपूर, १९६४, पृ. ११४

**'आमची अकरा वर्षे' मधील माधवराव पटवर्धन**

माधवराव आपल्याला परिचित आहेत ते नामांकित कवी म्हणून ! परंतु 'आमची अकरा वर्षे' मध्ये लीलाबाईंनी त्यांच्या या रूपाबरोबरच आपल्याला पूर्णपणे अबोध असलेल्या संसारी रूपाचेही दर्शन घडवले आहे. लीलाबाई आणि माधवराव यांचा अकरा वर्षांचा सहवास, पूर्वजांकडून मिळालेली माहिती व माधवरावांच्या मित्रमंडळीचा पत्रव्यवहार यातून ही व्यक्तिरेखा सिद्ध झालेली आहे.

माधवरावांचा जन्म एकवीस जानेवारी १८९४ साली बडोदे संस्थानात झाला. चाळीतल्या देवळात हिंडून, पुजाऱ्याच्या न कळत देवापुढे ठेवलेला पैसा लांबविण्याइतके माधवराव बालपणी व्रात्य होते. पटवर्धन घराण्यातील मूळ पुरुषाचे 'महादेव' हे नाव माधवरावांना दिले जाते. परंतु माधवरावांना 'महादेव' हे नाव आवडत नाही. त्यामुळे ते आपले 'महादेव' हे नाव बदलून 'माधव' ठेवतात. 'God's Good Man' ही कादंबरी वाचताना त्यातील कवी व नाटककार पात्राचे 'ज्युलियन अँडर्ले' हे नाव माधवरावांना आवडते. तेव्हापासून 'माधव ज्यूलियन' हेच नाव ते लिहू लागतात. असा 'माधव ज्युलियन' या नावाचा इतिहास 'आमची अकरा वर्षे' सांगतात.

माधवरावांना अभ्यासाची फार आवड असून शिक्षणाकडे त्यांचा ओढा आहे. पुस्तके विकत घेण्याची ऐपत नसते तेव्हा माधवराव शेक्सपिअरची नाटके हाताने लिहून काढतात. शिक्षणाच्या व अभ्यासाच्या आवडीला प्रयत्नवादाची व दृढनिश्चयाची जोड मिळालेली आहे. अनेक आपत्तींना तोंड देऊन माधवराव शिकतात. नामांकित प्रोफेसर म्हणून प्रसिद्धी पावतात. मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा बहुमानही मिळवितात. गुजराथी, फारसी, संस्कृत, जर्मन, इंग्रजी व मराठी या भाषांचे त्यांना ज्ञान आहे. परंतु माधवरावांचे अधिक प्रेम आहे ते मराठीवर. शुद्ध मराठी बोलणे व शुद्ध मराठी लिहिणे यावर त्यांचा कटाक्ष असे. साहित्य संमेलनाच्या वेळी माधवरावांच्या भाषणावरचा, "माधवरावांचे भाषण म्हणजे शुद्ध मराठीचा एक सुंदर नमुना आहे" (१८०) हा डॉ. केतकर व प्रा. वा. म. जोशी यांचा अभिप्राय माधवरावांच्या मराठी भाषेच्या प्रीतीवर प्रकाश टाकणारा आहे. झालेले लेखन कोणाला तरी वाचून दाखविल्याशिवाय माधवरावांना चैन पडत नसे. माधवरावांचे वाङ्मयीन स्नेही–श्री. के. क्षीरसागर यांना ते आपले लेखन वाचून दाखवीत व त्यांच्या पसंतीने माधवरावांचे समाधान होई. बरेचदा माधवराव आपल्या कविता आमूलाग्र बदलून टाकीत त्यामुळे त्या क्लिष्ट होत अशी लीलाबाईंची तक्रार आहे.

माधवराव पुरोगामी विचारसरणीचे आहेत. रविकिरण–मंडळातील सुविद्य तरुणींशी त्यांच्या परिचय होतो. नि त्यांच्या पुरोगामी विचारसरणीला यात

काहीही गैर वाटत नाही. समाजाची विचारसरणी एवढी सुधारक असणे शक्य नाही. या समाजाच्या मूळ स्वभावाचा त्यांना विसर पडतो. याचा परिणाम म्हणजे माधवरावांवर सामाजिक बहिष्कार टाकला जातो. हट्टी व हेकेखोर स्वभावामुळे लोक हसले, हेटाळणी केली तरी माधवराव त्याकडे दुर्लक्ष करतात. 'आमच्याकडे न आलात तर बरे होईल' असे मित्रमंडळींनी बजावण्याइतपत समाजाचा त्यांच्या वर रोष होतो. त्यावेळच्या अवस्थेसंबंधी माधवराव स्वतःच लिहितात,

" हा रस्त्यात दिसे न तो पटापट संभाषणे थांबती
दृष्टी यावर रोखिली प्रकटवी साशंक कौतूहल
याची पाठ फिरे न तोच उसळे हेटाळणीचे हसे
मागूनी विदग्ध शब्द सुटती काळीज भेदावया ।" (२८)

या पार्श्वभूमीवर माधवरावांचे लीलाबाईंशी लग्न होते. परंतु लग्नापूर्वी सर्व परिस्थिती लीलाबाईंना सांगायला माधवराव विसरत वा घाबरत नाहीत. ते लीलाबाईंशी स्पष्टपणे बोलतात–" लग्न हा जन्माचा संबंध आहे. तेव्हा तुम्हाला माझ्याशी लग्न करणे धोक्याचे वाटत असेल तर तुम्ही केव्हाही नकार देऊ शकता." (२९) ही सर्व परिस्थिती लीलाबाईंना माहीत असताना लीलाबाई मनाचा हिय्या करून माधवरावांशी विवाहबद्ध होतात. परंतु लीलाबाई व माधवराव या दोघांनाही सुरुवातीच्या दिवसात तरी हा विवाह मानवत नाही. माधवरावांचा ध्येयवाद आणि लीलाबाईंची संसाराची आवड असे द्वंद्व या विवाहातून निर्माण होते. त्यांच्या संसाराची सुरुवातच परिस्थितीने एकत्र आणलेल्या दोन भिन्न आवडीच्या माणसांसारखी चमत्कारिक रीतीने झालेली दिसते.

माधवरावांच्या तरल सौंदर्यदृष्टीला लीलाबाईंचे मोठे कुंकू बघवत नाही. लग्न झाल्याबरोबर 'कुंकू लहान करून मंडळीत ये.' अशी आज्ञा माधवराव करतात. लीलाबाईंना पूर्वाश्रमीच्या 'गंगू' या नावाने कोणी हाक मारलेली त्यांना खपत नाही. 'घरात सुपारी ठेवायची की नाही' यासारख्या छोट्या छोट्या गोष्टीत स्वतःचा तत्त्वनिष्ठ हेका चालवून माधवराव त्रास करून घेतात व नकळतपणे लीलाबाईंनाही त्रास देतात.

दोघांच्याही आवडी निवडी व स्वभाव दृढ झालेले आहेत. " तिने ज्या प्रकारचे व्हावे अशी माझी इच्छा आहे त्या प्रकारची ती खात्रीने होईल." (४६) असा माधवरावांचा लीलाबाईंवर विश्वास आहे. त्यावेळी लीलाबाईंच्या प्रौढ वयाचा किंवा शिक्षणाचा विचार त्यांच्या मनात येत नाही. या परस्पर भिन्नतेचा व्हायचा तोच परिणाम होऊन या संसारात प्रेमापेक्षा परकेपणाची भावना प्रधान होऊन बसते. माधवराव बहुतेक वेळी अस्वस्थ दिसतात तर माधवरावांच्या ध्येयाखाली लीलाबाई चेपलेल्या आढळतात. " पुरुषांनी स्त्रियांना दासी बनवू

नयेत." (८५) असा पत्नीकडे पाहण्याचा माधवरावांचा विशाल दृष्टिकोण असला तरी सुरुवातीला तरी माधवरावांनी लीलाबाईंचा या दृष्टीने विचार केलेला दिसत नाही. भावी काळासाठी बायकोला शिकून नोकरी करता येईल इतपत तयार करावे या विचारसरणीचा माधवरावांच्या मनावर जबरदस्त पगडा पडलेला दिसतो. या विचाराच्या आहारी गेल्याने लीलाबाईंनी दिवसाकाठी काहीतरी वाचलेच पाहिजे असा माधवरावांचा कटाक्ष होऊन बसतो. घरकामात सारा वेळ घालविण्यापेक्षा स्वयंपाकघरात दोन पदार्थ कमी करून लीलाबाईंनी विद्या वाढवावी असा माधवराव आग्रह धरतात. त्यासाठी ते लीलाबाईंना होस्टेलमध्ये ठेवून जी. ए. करवतात व बेळगावला नोकरीचा अनुभवही येऊ देतात. या परिस्थितीत लीलाबाईंची संसाराची आवड पार मारली जाते. परंतु लीलाबाईंच्या कुचंबणेचा माधवराव विचार करत नाहीत.

पुढील काळात अपत्यप्रेम, सहवासाने निर्माण झालेले प्रेम यामुळे माधवरावांचा कायापालट झालेला दिसतो. तडजोडीने संसार सुखमय होऊ शकतो याचा त्यांना अनुभव येतो. 'आपणच एकमेकांस आहोत' असे बोलण्याइतपत माधवरावांमध्ये फरक पडलेला आहे. आपल्या पूर्वीच्या वागणुकीचा त्यांना पश्चात्ताप होतो. त्या वागण्याला ते 'स्वप्नाळू मूर्खपणा' म्हणतात. माधवरावांमधील बदल लीलाबाई सांगतात, "पूर्वी म्हणजे १९२८ सालचे कठोर एककल्ली, हट्टी माधवराव आता संसारातील सुखदुःखाच्या झळी लागून शांत व अत्यंत मृदू अंतःकरणाचे झाले होते." (१७१) आजारपणात आवळा खाण्याची इच्छा असूनही लीलाबाईसाठी माधवराव हातातील आवळा टाकून देतात. इतकी तडजोड त्यांनी स्वीकारलेली आहे. थोडे दिवस का होईना माधवराव लीलाबाई संसारात समाधान पावलेले दिसतात. "एका थोर विभूतीचे अगाध प्रेम मला शेवटी मिळाले." (१९४) हे लीलाबाईंचे उद्गार माधवरावांच्या संसारात त्यांना मिळालेले सुख सांगतात. शेवटच्या काही दिवसांत का होईना लीलाबाई व माधवराव यांचे मनोमीलन साधलेले पाहून वाचकही संतुष्ट होतात.

अशी माधवरावांच्या व्यक्तिमत्त्वाची 'साहित्यिक' व 'सांसारिक रूपे' 'आमची अकरा वर्षे' मध्ये दृग्गोचर होतात.

**अन्नपूर्णाबाईंनी भक्तिभावाने काढलेले कन्हयाचे चित्र**

अन्नपूर्णाबाई रानडे यांनी 'स्मृतितरंगा'त अतिशय श्रद्धाळू अंतःकरणाने रानड्यांचे चित्र काढले आहे. एकोणतीस वर्षांच्या सहवासातून निघालेले हे चित्र आहे. रानड्यांच्या सामाजिक कार्याचा बाई अधूनमधून उल्लेख करतात पण तो विरळाच ! रानड्यांच्या घरगुती प्रतिमेवरच अधिकाधिक प्रकाश टाकलेला दिसतो. त्या स्वतःच आपल्या भूमिकेसंबंधी म्हणतात, "मी हे खाजगी आयुष्य त्यांच्या

ह्याती देत आहे." (१४२) अपार भक्तिभावाने बांधलेली ही रानडयांची भावपूजा आहे. दोषांकडे सोयीस्करपणे कानाडोळा झालेला दिसतो. त्यामुळे हे एक पतिस्तोत्र म्हणावे लागेल. अन्नपूर्णाबाई स्पष्ट करतात, "मुक्त मनाने स्तुती करता यावी म्हणून तर या लेखणीचा जन्म आहे. अथवा इतिकर्तव्यता आहे." (६१) आपली माणसे आपल्या नजरेला दोषहीन दिसतात. त्यांच्यातले दोष बघायला तिऱ्हाइतांची नजर आपल्याला फारशी लाभत नाही. दोषांनाही कौतुकाचे आवरण घालून त्यांना गुणांच्या वर्गात बसविण्याचा भाबडा प्रयत्न सुरू असतो. त्यामुळे चित्रित झालेले व्यक्तिमत्त्व बरेचदा अवास्तव वाटते. असेच काहीसे अन्नपूर्णाबाईंचे झाले आहे.

आत्मचरित्राची सुरुवातच रानडयांच्या हातात हात दिल्याने आपण पावन झालो या भक्तिभावाने केली आहे. कन्हया हे रानडयांचे टोपण नाव आहे. रानडयांचा उल्लेख "देवगुणांची माणसं" (३) असा त्या करतात. रानडयांची वृत्ती परोपकारी आहे. कुणाचेही काम पैशांचा किंवा शरीराचा विचार न करता ते करीत. त्यांच्या ऑफिस बँगला कौतुकाने "अजबखाना" (८६) म्हणतात. कुणाच्या शेअरच्या भानगडी, कुणाचे तक्रार–अर्ज, कोणाचे विम्याचे हप्ते हजार दोन हजार भानगडी. स्वत:ला साध्या सुपारीचेही व्यसन नसताना लगबगीने जेवून ऑफीसच्या शिपायांसाठी कुर्ल्याहून तंबाखू नेण्याची हकीकत सांगताना अन्नपूर्णाबाईंचा कंठ गदगदून येतो. कुठलेही काम शास्त्रशुद्ध पद्धतीने व दक्षतेने रानडे करीत असत. 'साधी राहणी व उच्च विचारसरणी' हे त्यांचे ब्रीद आहे. स्वत:ला केवळ चाळीस रुपये पगार मिळत असतानाही पंचवीस आपल्यासाठी ठेवून पंधरा रुपये ते शाळेला देणगी देत. असे अन्नपूर्णाबाईंनी रानडयांचे गुणगान केले आहे.

रानडयांच्या चांगुलपणाबद्दल अन्नपूर्णाबाई अतिशय भारावून बोलताना दिसतात. "इतकं चांगलं मनुष्यास होता येतं हे खरंच वाटत नसे मला." (६८) रानडयांना आपण पसंत नव्हतो ही बोच बाईंना अधून मधून जाणवते. त्यावर रानडयांनी अतिशय समजुतीने दिलेले उत्तर त्या उद्‌धृत करतात, "एकदा मनुष्य आपलं झालं की ते कुरूप का सुरूप हा विचारसुद्धा मनात येत नाही. मग मी काय सांगणार तुला ? माझी बायको यातच सर्व आलं नाही का ?" (६८) रानडयांचा स्वभाव भांडणविरोधी आहे. त्यांची वागणूक सर्वांशी सारखी राहते. त्यामुळे सर्वांना त्यांचा सहवास हवाहवासा वाटतो. रानडयांना लोकसंग्रहाची आवड आहे. मित्रांना त्यांच्या अंत:करणात मानाचे स्थान आहे. अखेरच्या दिवसात मित्रांना भेटण्याची त्यांची तडफड सुरू असते. त्यांच्या लोकसंग्रहाबद्दल अन्नपूर्णाबाई सांगतात, "एकदा त्यांच्या तावडीत सापडलेला मनुष्य कसल्याही स्वभावाचा असो तो झालाच त्यांचा मित्र." (३४) रानडे हाडाचे शिक्षक असल्याचेही अन्नपूर्णाबाई निदर्शनास आणून देतात. असे जवळजवळ प्रत्येक प्रसंगातून अन्नपूर्णाबाई रानडयांचे

असामान्यत्व दाखविण्याचा प्रयत्न करतात. इतर घटना व प्रसंगांना बऱ्याच पाल्हाळाने स्थान मिळाल्याने रानड्यांच्या व्यक्तिमत्त्वावरची पकड ठिकठिकाणी ढिली होताना दिसते. "सर्वसामान्य स्वरूपाचाच खूपसा मजकूर लिहिला असल्याने वाचकांच्या मनावर कन्हयाचे चित्र उमटते ते बरेचसे पुसट आहे."[९] असे र. गो. सरदेसाई खेदाने आपले मत मांडताना दिसतात.

**इंदिरा भागवतांनी रेखाटलेले 'उद्योगपती यादवरावां'चे चित्र**

यादवरावांच्या घराबाहेरील कार्यावर भर देऊन इंदिराबाईंनी यादवरावांचे रेखाटलेले हे चित्र होय. रमाबाई रानडे, लक्ष्मीबाई टिळक आणि अन्नपूर्णाबाई रानडे यांच्या पुढचे पाऊल इंदिराबाईंनी उचललेले आहे. त्यासाठी सांसारिक प्रसंगाचा उल्लेख क्वचित तुरळकपणे करून घराबाहेरील व्यवहारांचाच उपयोग इंदिराबाईंनी यादवरावांची व्यक्तिरेखा उभी करण्यात केला आहे. यादवरावांच्या असामान्य कर्तृत्वाची ओळख पटवून देण्याचा हा प्रयत्न. फोटोग्राफर, चित्रकार, सिनेमानट, नाटकांचे दिग्दर्शक, सिनेमा थिएटरांचे चालक व मालक अशा विविध नात्यांनी यादवराव ग्वाल्हेरला परिचित आहेत. प्रत्येक धंद्यात ते आपल्या आगळ्या वैशिष्ट्याने यशस्वी झालेले आहेत.

[" धंदा चांगला चालण्यास वक्तशीरपणा, खरेपणा, स्वच्छता, सुव्यवस्थितपणा, सतत उद्योग, सावधानता, वरचेवर नावीन्य आणि मुख्य म्हणजे गिऱ्हाइकांशी गोड बोलून त्यांना आपलसं करणं या सर्व धंद्याला आवश्यक असणाऱ्या गोष्टी त्यांच्या ठिकाणी होत्या. धंद्याचा चांगला जम बसण्यास चार-पाच वर्षं त्यांनी अगदी जीवापाड मेहनत केली."](२७) अशी इंदिराबाईंनी यादवरावांच्या धंद्यातील चोखपणाची ओळख करून दिली आहे. आपले तन, मन, धन सर्व काही यादवराव धंद्याला अर्पण करतात. आपला स्टुडिओ किंवा दुकान कधीही ते पाच मिनिटेसुद्धा उशिरा उघडत नसत. लोकांचे काम ठरल्यावेळी झालेच पाहिजे याकडे ते विशेष कटाक्षाने लक्ष देत. त्यासाठी रात्रीचा दिवस करावा लागला तरी यादवरावांना पर्वा नसे. नोकरांना फार आपुलकीने वागविले जाई. जिव्हाळ्याने बोलून गिऱ्हाइकांना आकर्षित करण्याची कला त्यांच्या ठिकाणी होती. स्टुडिओत बाळगलेली स्वच्छता, प्रत्येक वस्तूची कलात्मक व आकर्षक मांडणी गिऱ्हाइकाला जिंकण्यास मदत करीत. यशस्वी धंद्यासाठी आवश्यक अशा सर्व खुब्या यादवरावांच्या ठिकाणी होत्या असे इंदिराबाई वाचकांना पटवून देतात. 'तुमचे पैसे येणे आहेत.' असे कोणाकडून लिहून येणे किंवा आठवण करून देणे यामुळे आपल्या धंद्याची पत जाऊ नये म्हणून यादवराव अतिशय जपताना दिसतात. स्टुडिओ जोमात चालण्यासाठी यादवराव कल्पकतेने कॅमेरे वाटतात. वर्ग चालवून लोकांना मोफत फोटोग्राफीही शिकवतात.

---

[९] र. गो. सरदेसाई, आमचा संसार, दु. आ., मुंबई, १९५०; पृ. ८७

स्टुडिओइतकीच सिनेमा थिएटरेही यादवरावांनी यशस्वी रीतीने चालविली. 'हंस' पिक्चर्सच्या 'ब्रह्मचारी' या बोलपटाच्या वेळी सुकामेवा, मातीचे हंस, सायकलसारख्या मोठ्या वस्तू वाटणे, तिकिटांवर लकी नंबर्स सुरू करणे, अशी अनेक प्रकारे जाहिरात करून सबंध हिंदुस्थानचे रेकॉर्ड मोडल्याचे 'या सदाशिव'-मधून कळते. 'पुनर्मीलन,' 'कुंकू,' 'गोपाळकृष्ण,' 'खजांची' या संगीतप्रधान बोलपटांसाठी यादवराव गाण्यांच्या चढाओढी लावतात. 'शकुंतला' बोलपटाची हँडबिले पळसाच्या पानांना कमळाच्या पानांचा आकार देऊन त्यावर छापून वाटतात. 'पहिली मंगळागौर'च्या वेळी उखाण्यांची हँडबिले काढतात. परंपरेने चालत आलेली सिनेमापूर्वी बँडबाजा वाजविण्याची पद्धत बंद करून ग्रामोफोनच्या रेकॉर्ड्स लावतात. अशी यादवरावांची प्रत्येक जाहिरात कलात्मकतेने, कल्पकतेने काढलेली असल्याने नावीन्यपूर्ण ठरलेली आहे. प्रेक्षकांना आकर्षित करण्याचे आपले काम तिने चोखपणे बजावलेले आहे. ग्वाल्हेरचे 'चित्रा' व 'सेंट्रल,' झाशीचे 'क्रिक' ही तिन्ही थिएटरे यादवराव अभूतपूर्व यशाने चालवितात. 'चरणोंकी दासी' या चित्रपटात स्वतः काम करून अभिनेता म्हणून झळकतात.

नाट्यकलेच्या बाबतीत आधीच उज्ज्वल असलेली ग्वाल्हेरची परंपरा यादवरावांनी अधिक उज्ज्वल केल्याचे इंदिराबाई उल्लेखितात. 'भारती विहार' हा क्लब व नाट्यक्लब, 'आर्टिस्ट कंबाइन' या नावाची नाट्यसंस्था काढतात. मोठ्या कष्टाने स्त्रियांची कामे स्त्रियांनीच करावी म्हणून मुली मिळवतात. 'संशयकल्लोळ' हे नाटक छोट्या छोट्या मुलांकडून बसवून घेऊन एक नावीन्य-पूर्ण प्रयोग नाट्यपरंपरेत ते घडवून आणतात.

चित्रकलेतही यादवरावांनी अपूर्व यश मिळविलेले दिसते. त्यांना फॅशनची हौस आहे. निरनिराळ्या पद्धतीचे कपडे घालून नवीन नवीन फॅशन्स ते ग्वाल्हेर-मध्ये रुजवतात. 'वाय सदाशिव फोटो स्टुडिओ' हे त्यांच्या स्टुडिओचे नाव त्यांच्या कल्पकतेचेच प्रतीक होय.

सेंट्रलला आग लावली जाते. आपल्या कर्तबगारीचा होम यादवराव स्वतःच्या डोळ्याने पाहतात. पण ते डगमगत नाहीत. पुन्हा ताज्या हिंमतीने आणि नव्या उत्साहाने थिएटर उभे करतात व अतिशय यशस्वीपणे चालवून दाखवितात. लोकापवादाची ते कधीही पर्वा करीत नाहीत. फुसक्या धमक्यांना दाद देत नाहीत. "त्यांचं मन आपण जे करीत आहोत ते योग्य करीत आहोत याची ग्वाही देत होतं. लोकांना साहेब फसवीत आहेत असं वाटत होतं. पण ते आपल्या मनाला फसवीत नव्हते. त्यांच्या शुद्ध वर्तनाची, सचोटीची, सतत उद्योगशील स्वभावाची कालांतराने लोकांना खात्री पटली. पण साहेबांचा—स्वतःच्या खरेपणाबद्दल ग्वाही देणाऱ्या त्यांच्या मनाचा विजय होता, म्हणूनच त्यांना प्रत्येक कामात यश येत गेलं."

(१०९) असे इंदिराबाईंनी यादवरावांच्या यशस्वितेचे कारण सांगितले आहे. मनाचा मोठेपणा. सर्वांना सारखे वागविण्याची पद्धत, स्पष्टवक्तेपणा, परोपकारी वृत्ती हे सर्व गुणही यादवरावांना यश मिळवून देण्यास कारणीभूत ठरतात.

यादवरावांना स्वतःच्या संसाराबद्दल अनास्था नव्हती तशी आसक्तीही नव्हती. त्यांच्या धंद्यातच त्यांचे तन, मन सदैव गुंतलेले दिसते. त्यांच्या एकुलत्या एका मुलाची मौंजसुद्धा त्यांच्या वडिलांनीच उत्साहाने पार पाडली. यादवरावांनी त्यात जरूर पडेल तेव्हाच व तेवढेच लक्ष घातल्याचे इंदिराबाई सांगतात. यादवराव नेहमी कामाच्या गराड्यात व लोकांच्या घोळक्यात बुडालेले दिसतात. त्यामुळे 'संसारी' म्हणून त्यांची प्रतिमा मनावर बिंबत नाही किंवा 'या सदाशीव' मध्येही इंदिराबाईंनी त्या प्रतिमेला स्थान दिलेले नाही तर प्रामुख्याने त्यांच्या कर्तबगारीचे चित्र इंदिराबाईंनी काढलेले आहे.

यानंतरची १९५२ मध्ये प्रकाशित झालेली 'वेचलेले मणी' आणि 'माझा नंदादीप' ही दोन आत्मचरित्रे. रमाबाई रानड्यांप्रमाणे लक्ष्मीबाई पटवर्धनांकडे व रमाबाई केदारांकडे निव्वळ घरगुती दृष्टिकोणातून पाहत नाहीत. अन्नपूर्णाबाई रानड्यांप्रमाणे निव्वळ पतिस्तोत्र गात नाहीत. किंवा इंदिरा भागवतांप्रमाणे केवळ त्यांच्या कर्तबगारीचे चित्र रंगविण्यात त्या रंगत नाहीत तर संसार आणि कार्यक्षेत्र या दोहोतील 'मणी' वेचून रमाबाईंनी केदारांची प्रतिमा उभी केली आहे व लक्ष्मीबाईंनी 'नंदादीप' लावलेला आहे.

**रमाबाई केदारांनी रेखाटलेले तुकाराम केदार यांचे विविधांगी व्यक्तिमत्त्व**

साधुपुरुषाच्या आशीर्वादाने लाभलेले केदार घराण्यातील तुकाराम हे पुत्ररत्न होय. तीव्र बुद्धिमत्ता त्यांना लाभलेली आहे. लहानपणी आईला मंदिरात जायला सवड होत नाही म्हणून केदार घरीच तिला पुराण वाचून दाखवितात आणि छोटे पुराणिकबुवा म्हणून कीर्ती मिळवितात. लहानपणी झालेल्या संस्कारांचा वा मनाच्या जन्मजात वृत्तीचा परिणाम म्हणून त्यांची वृत्ती धार्मिक आहे. ईश्वरभक्ती, पूजाअर्चा व ध्यान केल्यानेच मनाला खरी शांती मिळते अशी त्यांची धारणा आहे. पण धार्मिकतेच्या नावावर बिनधोकपणे चालणारे अवडंबर मात्र त्यांना पसंत नाही. बुद्धिवादालाच ते प्रथम स्थान देतात. केदारसाहेब विलक्षण प्रामाणिक आहेत. मैनाबाईंचा बाजार आणून दिल्यावर उरलेले पैसे ते परत करतात. पेट्रोल घेतल्यावर मालकाने चुकून जास्त पैसे दिल्यावर आपले स्वतःचे तेवढे घेऊन उरलेले त्याच्या स्वाधीन करतात. दुर्मिळ असा प्रामाणिकपणा हा गुण केदारांच्या ठिकाणी प्रकर्षाने होता असे रमाबाई कौतुकाने सांगतात.

रमाबाईंना सासूबाई सासूरवास करीत. लाडाकोडात वाढलेल्या रमाबाईंना हा ताण असह्य होई. रमाबाईंची ही स्थिती पाहून केदारांचा जीव कळवळतो

आणि रमाबाईंची कीव येऊन त्यांची मन:स्थिती लक्षात घेऊन केदार आपण बायकोचा कैवार घेत आहोत असे चुकूनही न वाटू देता करायच्या त्या गोष्टी बिनबोभाट करतात. उदाहरणार्थ, रमाबाईंना माहेरी चहा घ्यायची सवय होती परंतु सासरी कोणीही चहा घेत नसे. त्यांना चहा मिळावा म्हणून केदार स्वत: चहा घ्यायला सुरुवात करतात. आईचे रमाबाईंवर रागवून दुसऱ्या मुलाजवळ जाणे या प्रसंगी केदार कुठल्याही प्रकारचा आक्रस्ताळेपणा न करता स्थिर मती ठेवतात. रमाबाईंची समजूत घालतात. हिंदु–संस्कृतीचा केदारांना विलक्षण अभिमान आहे. आपल्या सुनांशी ते मुलीप्रमाणे वागतात. पण परकीय सुनेला घरात शिरकाव द्यायला त्यांचे मन तयार होत नाही. सुधारणाप्रिय केदार या ठिकाणी सनातनी वाटतात.

> " देवा देशिल एक गोष्ट मजला, याची न अन्या वरा ।
> छोटे प्रेमळसे कुटुंब मजला दे देव देवेश्वरा ।।
> स्वर्गालाहि कुटुंबसौख्य न तुले पृथ्वीस थारा कुठे ।
> काशी हीच असे, प्रयाग, मथुरा सारीच तीर्थे इथे ।।" (१२३)

अशी त्यांची आपल्या घरकुलासंबंधी कल्पना आहे. पुरुषाचा विवेक व स्त्रीचा त्याग हाच संसारसुखाचा मूलमंत्र आहे असे केदार सांगतात.

'मृदूनि कुसुमादपि' अशी त्यांच्या मनाची ठेवण आहे. आपल्या लहानग्या मुलीच्या मृत्यूच्या वेळी केदार अतिशय हळहळतात. कोणाच्या पायाला लहानशी ठेच लागली तरी त्यांचे अंत:करण विव्हळते आणि ही स्थिती केवळ आपल्या आप्तेष्टांसाठीच नाही तर नोकरचाकरांसाठीही असल्याचे 'वेचलेले मणी' सांगतात. रमाबाई गावाला गेल्या असताना आजारी जमादारीणबाईंचे पथ्यपाणी केदार स्वत: करतात.

स्नानगृह हे केदारांचे समाधिस्थान. त्यांच्या चित्ताची एकाग्रता त्याठिकाणी साधली जाते आणि मग बाहेर येण्याचे भान त्यांना राहत नाही. दाराला धक्के मारून बाहेर येण्याची आठवण त्यांना करून द्यावी लागते. वेंधळेपणा आणि अव्यवस्थितपणा त्यांच्या अंगी असल्याचे रमाबाई नमूद करतात. केदारांचा स्वभाव अतिशय गडबड्या असल्याने कोणतीही गोष्ट करताना त्यांची विलक्षण धांदल उडत असे असे रमाबाई टिळकांना भेटायला जाताना उडालेल्या केदार साहेबांच्या धांदलीवरून सांगतात. नसेची डबी कुठेही टाकून द्यायची आणि आयत्यावेळी रमाबाईंना शोधाशोध करायला लावायची अशी त्यांना अव्यवस्थितपणाची खोड आहे. असे रमाबाईंनी काही प्रसंगांमधून केदारांचे 'घरातले रूप' वाचकांच्या स्वाधीन केले आहे. हे रूप रमाबाईंविना कोणालाही इतके स्पष्टपणे कळले नसते असे वाटते.

साहित्यप्रेमी, धुरंधर राजकारणी, सव्यसाची कायदेपंडित या त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विविध अंगांचा परिचयही रमाबाई करून देतात. केदारांना वाचनाची अतोनात आवड आहे. मोठ्या शहरात गेल्यावर तेथील ग्रंथालयांना ते भेट देत. त्यावेळी म्हणत, "असे वाटते की काही दिवस वकिली सोडून द्यावी व ग्रंथालयात नोकरी धरून ज्ञानलालसेची भूक मनसोक्त वाचन करून शमवून घ्यावी." (११८) अशी केदारांच्या ज्ञानपूजक व्यक्तिमत्त्वाची ओळख रमाबाईंनी करून दिली आहे. आपल्या कुलगुरुपदाच्या राजवटीत नागपूर विद्यापीठाचे ग्रंथालय ते अद्यावत करतात. पुस्तकांवर त्यांची विलक्षण श्रद्धा. वेदान्तापासून ललितवाङमयातील सर्व संग्रह त्यांच्याजवळ आहे. 'सुमती' नावाचे साप्ताहिक व 'सुबोध' नावाचे मासिक ते चालवीत. कविताही करीत असत. संस्कृत भाषेची त्यांना फार आवड होती. 'वेदस्थाने' हा त्यांचा प्रबंध त्यांच्या व्यासंगाचा निदर्शक होय. १९३३ मध्ये झालेल्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे स्वागतोपाध्यक्ष हे स्थानही ते भूषवितात.

त्यांना सरकारी नोकरीचा तिटकारा आहे. सरकारी नोकरी सोडून दहा रुपये महिन्याची शिक्षकाची नोकरी जेव्हा केदार स्वीकारतात तेव्हा वडीलधारी मंडळी केदारांना रागावतात. त्यावेळी केदार उत्तर देतात, "गुलामगिरीच्या बंधनात पडून मला माझ्या उज्ज्वल भवितव्याला व महत्त्वाकांक्षेला मूठमाती द्यायची नाही. नशीब काढणे दैवाधीन असेल कदाचित. पण कर्तृत्व दाखविणे मनुष्याधीन खास आहे. प्रयत्न केल्यास, चिकाटी दाखविल्यास मनुष्यास अशक्य व असाध्य काय आहे ? माझ्या कर्तृत्वास मला विशाल क्षेत्र पाहिजे. त्या क्षेत्राला कोणतेही बंधन नको व कोणतीही मर्यादा नको. एकदा का मी नोकरीच्या पाशात अडकलो म्हणजे माझे जीवनकर्तृत्व संकुचित झालेच म्हणून समजा. माझे मन त्यामुळे कोंडले जाईल व माझ्या साऱ्या आकांक्षा अतृप्त राहतील." (२१–२२) अशी आपल्या कर्तृत्वावर केदारांची श्रद्धा आहे. आत्मविश्वासाने ते एवढे धाडसी विधान करू शकले. आपल्या हिंमतीवर केदार वकील होतात. अनेक गुंतागुंतीच्या केसेस आपल्या बुद्धिप्रभेने जिंकतात आणि एक नामवंत वकील म्हणून झळकतात.

राजकीय क्षेत्रातही केदारांची कामगिरी अपूर्व आहे. वर्धा नगरपालिकेचे अध्यक्ष असताना केदारसाहेब अध्यक्षपदी असले तरी लोकसेवकाची भूमिका ते कधीच विसरत नाहीत. वर्धा नगरीचा पाण्याचा बिकट प्रश्न सोडवितात. पदाधिकारी व्यक्तीच्या जबाबदारीबद्दल ते सांगतात, "कोणतीही लहान अगर मोठी संस्था असो तिचे चालक आणि व्यवस्थापक प्रामाणिक व निःस्वार्थ बुद्धीने काम करणारे पाहिजेत. तेव्हाच ती संस्था ऊर्जितावस्थेत येऊ शकते. माणसाने त्याग केला तरच सार्वजनिक कार्य उत्तमरीतीने पार पडू शकते. म्युनिसिपालिटीच्या कारभारात तर या गोष्टींची अत्यंत जरूर असते." (७४) हे केदारांचे केवळ कोरडे

बोल नाहीत तर त्याप्रमाणे त्यांची वागणूक असल्याचे वेचलेल्या मण्यातून कळते. १९२८ साली लाभलेल्या मंत्रिपदाचाही उपयोग ते लोकसेवेसाठी करतात. दारु-बंदीच्या प्रश्नात लक्ष घालून एक नवीनच कायदा पास करून प्रयोग म्हणून पहिल्यांदा द्रुग जिल्ह्यात दारुबंदी आणतात. शिक्षणप्रसाराकडेही आत्मीयतेने लक्ष पुरवितात. राजकारणावर त्यांची आंधळी श्रद्धा नाही. सूत कातून स्वराज्य मिळेल या गांधींच्या तत्त्वावर ते निर्भीडपणे टीका करतात. 'गांधीचे ते एक फॅड आहे' असे स्पष्टपणे बोलतात.

केदार आपले कुलगुरुपदही यशस्वी रीतीने सांभाळतात. विद्यार्थ्यांच्या तारुण्य-सुलभ लहानसहान चुकांबद्दल त्यांच्या आयुष्याची घडी विस्कटून टाकणे त्यांना पटत नाही. या ठिकाणी केदार हाडाचे हितचिंतक वाटतात. ते उदार, शांत व न्याय्य चारित्र्याने लोकांच्या आदराचे स्थान बनतात. १९४३ मध्ये त्यांच्या कामगिरीवर खूष होऊन D. Lit. ही पदवी देऊन 'नागपूर विद्यापीठ' त्यांचा गौरव करते. केदारांच्या चांगूलपणाचा लोक अनेकदा गैरफायदा घेतात तेव्हा केदार म्हणतात, "अशा गोष्टी चालायच्याच. कोणी क्षुद्रपणा दाखविला तर आपण त्याची भरपाई क्षुद्रपणाने न करता उलट त्याच्या उपकाराच्या ओझ्यानेच करावी. यातच आपली खरी प्रतिष्ठा असते." (१०३) एवढे मनाचे मोठेपण केदारांजवळ आहे. नाटक, संगीत यांचीही त्यांना आवड आहे.

रमाबाईंना चहा मिळावा म्हणून स्वतः चहा घेणारे, आपल्या आईला आलेला सुनेचा रुसवा घालविण्यासाठी तिला यात्रेला नेणारे, कुणाच्याही किंचित दुखण्याने 'मृदूनि कुसुमादपि' होणाऱ्या केदारांबरोबरच, साहित्यप्रेमी, कायदेपंडित, राज-कारणी अशा केदारांची ओळखही रमाबाईंनी करून दिली आहे. केदारांच्या जीवनात रमाबाई चौफेर डोकावल्या आहेत हेच या व्यक्तिचित्राचे वैशिष्टय होय. डॉ. वि. भि. कोलते या संदर्भात म्हणतात, "कै. नानासाहेबांच्या व्यक्तित्वाची जी विविध अंगे होती त्यांचे स्थूल दिग्दर्शन माईंनी अतिशय ठसठशीतपणे केलेले आहे."[10] (प्रस्तावना–१०)

**लक्ष्मीबाई पटवर्धनांनी काढलेले पटवर्धनांचे चित्र**

डॉक्टरांच्या असामान्य व्यक्तिमत्त्वाची जनतेला ओळख करून द्यावी या हेतूने लक्ष्मीबाईंनी 'नंदादीप' लावला आहे. त्यातून डॉक्टरसाहेबांची प्रतिमा चित्रित होते ती अशी–

डॉक्टरांना शिक्षणाची विशेष आवड आहे. जवळ पैसा नसताना, गावात सोय नसताना अतिशय बिकट परिस्थितीला तोंड देऊन डॉक्टर आपले शिक्षण पुरे करतात. उत्कृष्ट डॉक्टर म्हणून नावलौकिक मिळवतात. निरलस नि कामसू वृत्ती-

[10] रमाबाई केदार, वेचलेले मणी, नागपूर, १९५२, पृ. १०

मुळे " कोणीही रोगी केव्हाही येवो, कधीही त्रासून न जाता त्याला पाहण्याचा; अगर कोणाचे घरी रोगी अत्यंत रोगपीडित असल्यास त्याचे घरी रात्री, अपरात्री जाण्याचा डॉक्टरांनी कधीही कंटाळा केला नाही. त्यामुळे थोडेच दिवसांत डॉक्टरांचे नाव सर्वतोमुखी होऊन डॉक्टर लोकप्रिय होऊ लागले," (२५) अशी त्यांच्या कर्तव्यदक्षतेतून लोकप्रियता जन्मल्याचे बाई सांगतात. स्वत: 'नेत्रज्ञ' असूनही केवळ ज्ञानलालसेपायी डॉक्टर भाजेकरांकडून ऑपरेशने शिकतात. एकदा त्या शाखेत 'तज्ज्ञ' झाल्यावर इतर शिकण्याची बहुतेकांची इच्छा असत नाही. आपले क्षेत्र एवढेच आहे अशी त्यांनी स्वत:ची समजूत करून घेतलेली असते. पण डॉक्टरांचे तसे नाही. तसेच कुणाच्या भिडेखातर ते आपला नियम मोडायला तयार होत नाहीत. विश्रांतीसाठी डॉक्टर आर्वीला आले असताना " माझे मोतीबिंदूचे ऑपरेशन करा. मी तुमची फी देईन." (४२) असे एक गृहस्थ डॉक्टरांना सांगतात. तेव्हा डॉक्टर उत्तर देतात, " मी केवळ विश्रांतीकरता येथे आलो आहे. मी आता डॉक्टर नाही. आपण कितीही फी दिली तरी मी ऑपरेशन करणार नाही. बरे, मोतीबिंदूचे ऑपरेशन ही स्वस्थपणे करण्याची गोष्ट आहे. कोणाला काही आकस्मिक, अपघाती रोग असेल तर नाइलाज म्हणून करणे भागच आहे. तशी केस असती तर काम केले असते. पण या ऑपरेशनचो घाई नाही आणि मी विश्रांतीला आलो असल्याने काम करण्याची व पैसे मिळविण्याची मला बिलकूल इच्छा नाही." (४२) असे सकारण पटवून देतात. आपल्या कामात हयगय झालेली त्यांना मुळीच चालत नसे. स्टेथॉस्कोपच्या नळया जुन्या झाल्या म्हणून त्यांना रोग्याच्या छातीतल्या पाण्याचे निदान करता येत नाही म्हणून त्यांना वाईट वाटते. रात्री, अपरात्री केव्हाही ते रोग्याच्या सेवेला तत्पर राहतात. एवढेच नव्हे तर परगावाहून येणाऱ्या लोकांच्या खाण्यापिण्याची व्यवस्थाही ठेवतात. कोणतेही काम करताना त्यांना अजिबात कमीपणा वाटत नाही. मुलींची व्यायामाची माहिती लिहून देण्याचे काम ते आनंदाने करतात. त्यांच्या कर्तव्य–जागरूकतेबद्दल लक्ष्मीबाई सांगतात, " कुठल्याही सुखाचा उपभोग घेताना ते तन्मयतेने घेत. पण त्याचवेळी जर कर्तव्याची हाक आली तर ते तितक्याच खुशीने आपले कर्तव्य पार पाडीत. त्याबद्दल कधीही नाखुशीचा शब्द मी ऐकला नाही." (२६) असे 'एक कर्तव्यदक्ष डॉक्टर' म्हणून लक्ष्मीबाईंनी डॉक्टरांची ओळख करून दिली आहे. तसेच त्यांचे घरगुतीरूपही लक्ष्मीबाईंनी तितक्याच तन्मयतेने रेखाटलेले दिसते.

वडील माणसांना कधी दुखवायचे नाही असा त्यांचा निश्चय होता. आत्याच्या समाधानासाठी ते कपाळ काळेकुट्ट होईपर्यंत कपाळाला अंगारा लावतात. गळयात वाटेल त्या फुलांच्या माळा घालतात. दिला तो प्रसाद खातात. ही माहिती लक्ष्मीबाईंइतकी दुसऱ्या कोणाला असणे शक्य वाटत नाही. निदान त्यामागचा हेतु तरी. रमाबाईंशीही त्यांचे वागणे समजुतीचे असे. आपल्याला

कोणत्याही गोष्टी न रागावता समजावून सांगत असल्याचे बाई स्वत: सांगतात. सुरुवातीला स्वयंपाकाचा अंदाज लक्ष्मीबाईंना येत नसे. बरेच अन्न उरे. उरलेले अन्न शेजारी देऊ का म्हणून त्या डॉक्टरसाहेबांना विचारतात. तेव्हा डॉक्टर म्हणतात, "अन्न उरले तर उरू दे ! प्रथम प्रथम चुकायचेच असे ! परंतु शेजारील कोणाही ब्राह्मण मंडळीचे घरी हे उरलेले अन्न देऊ नकोस. त्यात त्यांना अपमान वाटेल. घराच्या मागच्या बाजूला राहणारी जी इतर जातीची माणसे आहेत त्यांना हे अन्न देऊन टाक. त्यांनाही आनंद होईल." (१९–२०) शांतपणाने आणि विचारपूर्वक डॉक्टरांनी लक्ष्मीबाईंची घातलेली ही समजूत वाटते. दुसऱ्यांच्या मनाचा डॉक्टर अधिक विचार करताना दिसतात. बाळाच्या मौंजीत भेट आलेल्या वस्तू परत द्यायच्या नाहीत. जे काय द्यायचे ते विकत घेऊन द्या असे डॉक्टर सांगतात. लक्ष्मीबाईंच्या आजारपणात सासूबाईंच्या चोरून ते त्यांची सेवा करतात. आईचे मन दुखावले जाऊ नये व बायकोला नवरा आपली काळजी घेत नाही असे वाटू नये म्हणून डॉक्टरांनी राखलेला हा समतोल वाटतो. घरात खर्चासाठी ते वाटेल तेवढे पैसे देत पण 'हे एवढ्या लवकर कसे संपले' किंवा 'पैसे जास्त का खर्च झाले' अशी सर्वसामान्यपणे दिसून येणारी पुरुषी भुणभूण ते कधी लावीत नसत.

भीती हा शब्दच पटवर्धनांच्या कोशात नव्हता. 'भीती म्हणजे मनाचा घाबरटपणा' अशी त्यांची भीतीची व्याख्या होती. कोणत्याही गोष्टीत उतावीळपणा, घाबरटपणा त्यांना आवडत नसे. प्रत्येक गोष्ट शांतपणे व व्यवस्थित झाली पाहिजे यावर त्यांचा कटाक्ष असे. कोणतीही गोष्ट न करता उगीच वायफळ बडबड करीत बसणे त्यांच्या स्वभावात नव्हते. सृष्टिसौंदर्याची व कलाकौशल्याची डॉक्टर भालचंद्रांना आवड आहे. कार्डबोर्डावर चिकटविलेल्या सृष्टिसौंदर्याच्या चित्रासाठी ते तेवीस रुपये देतात. चारचौघात मिळून मिसळून राहणे त्यांना आवडत असे. डॉक्टरसाहेबांना पोहण्याची, नाटक, सिनेमा पाहण्याचीही आवड होती. कुठलीही गोष्ट चुकली तर पटवर्धन बोलत नसत. त्यांचे हे न बोलणेच बोलण्यापेक्षा भयंकर वाटे असे बाई म्हणतात. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची इतरांना अबोध असलेली ही बाजू बाईंनी उजेडात आणलेली दिसते. पटवर्धनांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकून त्यांचे सामान्यातील असामान्यत्व बाईंनी दाखविले आहे. प्रस्तावनाकार वि. स. खांडेकर या संबंधात म्हणतात, "हे चरित्र लिहून डॉक्टर पटवर्धनांच्या वैशिष्ट्यपूर्ण जीवनाचा परिचय महाराष्ट्राला करून दिला ही फार चांगली गोष्ट झाली."[11] खांडेकरांचा हा अभिप्राय लक्षणीय वाटतो.

---

[11] लक्ष्मीबाई पटवर्धन, माझा नंदादीप, पुणे, १९५२; पृ. ७

**'ढळला रे ढळला दिन सखया' आणि 'उमटलेली पावले' मधून प्रतीत होणारी आपटे गुरुजींची प्रतिमा**

१९५८ व १९६१ मधील 'ढळला रे ढळला दिन सखया' आणि 'उमटलेली पावले' हे राधाबाई आपटयांचे द्विखंडात्मक आत्मचरित्र.

'My Illness' वर आजारातून उठल्यावर आपटे गुरुजी लिहिणार होते. परंतु दुर्दैवाने त्यांना त्या आधीच मृत्यू आला. म्हणून 'His Illness' वर लिहिण्याचा राधाबाईंचा प्रयत्न म्हणजेच 'ढळला रे ढळला दिन सखया' होय. "मनात म्हटले होईल थोडेसे तरी त्यांच्या मनासारखे. विचार तर मनात ठाम झाला. या विचाराने मला जरा समाधान मिळाले." (ढळला रे ढळला दिन सखया, पृ. १५) असा आपला लेखनामागील हेतू राधाबाईंनी स्पष्ट केला आहे. 'ढळला रे ढळला दिन सखया' मधील आपटयांचे चित्र केवळ त्यांच्या आजारपणातील आहे. आजारपणातही आपटे गुरुजी खेळकर, आनंदी होते. सर्व समजूतदारपणे सोसत होते याचे चित्र राधाबाईंनी काढलेले आहे. ते एक 'पतिचरित्र' आहे एवढेच त्याला महत्त्व आहे. आपटयांच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडते ते 'उमटलेली पावले' मध्ये. आपटयांनी राधाबाईंना सहधर्मचारिणी म्हणून दिलेला मान व आपटयांच्या खांद्याला खांदा लावून राधाबाईंनी आपटयांना दिलेली साथ हे या व्यक्तिमत्वांचे वैशिष्टय व वेगळेपण आहे.

आपटे लहानपणापासून अगदी साधे राहत. आपल्याला मिळणारा खाऊ इतर भावंडांना वाटून त्यांच्या खाण्यात समाधान मानणाऱ्या आपटयांचा वाण सर्वसामान्यांहून निराळा असल्याचे राधाबाई त्यांच्या बाळपणाची ओळख करून देताना सांगतात. अगदी लहानपणी, टिळकांच्या व्याख्यानाहून आले की, "चित्त बेचैन व्हायचे व काहीतरी जे आयुष्यात करता येईल ते आयुष्यात करायचे; स्वराज्य मिळविण्याच्या कामीच जीवन लावायचे असा मनाशी संकल्प ठरे." (उमटलेली पावले पृ. ३७) बालपणापासून स्वराज्यप्राप्ती या ध्येयाने झपाटलेले आपटे गुरुजी राधाबाईंनी यातून उभे केले आहेत. घरातील वातावरणातूनही आपटयांच्या या वृत्तीला प्रतिसाद मिळतो. मराठी पाचवीत असताना शाळेत फुकट वाटलेले परदेशी साबण परदेशी म्हणून नाकारणाऱ्या आपटयांमध्ये 'स्वराज्य' प्राप्तीचे ध्येय किती प्रकर्षाने वास करीत होते हे कळते. बी. ए. पास झाल्यावर सरकारी नोकरी नाकारून सुखाचे व वैभवाचे पाश ते कायमचे तोडून टाकतात. "मी स्वतःकरिता नसून देशाकरिता व कुटुंबाकरिता आहे." (उमटलेली पावले पृ. ४४) असे खंबीरपणे जाहीर करतात. लोकमान्य टिळक हे राजकीय क्षेत्रातील आपटयांचे गुरू होत. टिळकांना अटक झाल्यापासून मुक्तीच्या दिवसापर्यंत आपटे साखर खात नाहीत. अशी त्यांची टिळकनिष्ठा आहे. 'कार्यात येणाऱ्या

अडचणी माणसाचे धैर्य वाढवितात' या टिळकांच्या वचनावर आपटयांचा दृढ विश्वास आहे.

'स्वराज्यप्राप्ती' या आपल्या ध्येयासाठी येवल्याच्या राष्ट्रीय शाळेतील शिक्षकाची नोकरी आपटे पत्करतात. राष्ट्रीय शाळेजवळील पैसे संपतात तेव्हा सर्व शिक्षकांनी थोडे थोडे पैसे घ्यावे व मलाही त्यांच्याप्रमाणे स्केल द्यावे असे स्वत: मुख्याध्यापक असूनही आपटे समजूतदारपणाने सांगतात. शाळेसाठी आठवड्यातून एक दिवस भिक्षा मागतात. त्यांच्या राष्ट्रीय भावनेला कोणाचा थोडा जरी धक्का लागला तरी आपटे चवताळताना दिसतात. ही सर्व धडपड स्वराज्यप्राप्तीसाठी सुरू असते.

लग्न झाल्यावर आपल्या ध्येयाची जाणीव आपटे राधाबाईंना करून देतात. पण आपले ध्येय राधाबाईंवर ते लादीत नाहीत. पत्नी असूनही सर्वसाधारणपणे त्या काळातील इतर पतींप्रमाणे तिच्यावर ते हक्क गाजवीत नाहीत. तर सहधर्मचारिणी म्हणून प्रत्येक ठिकाणी तिच्याशी वागताना दिसतात. आपटयांच्या मनाचा हा मोठेपणा आहे व यातच या व्यक्तिरेखेचे वेगळेपण सामावलेले आहे. लग्नानंतर राधाबाईंना लग्नापूर्वीची परिस्थिती, त्यांच्या महत्त्वाकांक्षा, अपेक्षेप्रमाणे स्थळ मिळाले की नाही ? शिक्षणाची आवड, संसार कसा असावा यासंबंधी विचार; कोणत्या गुणांची रुची यासंबंधी सविस्तर माहिती ते पत्रातून विचारतात. अगोदर आपली मते त्यांना कळवीत नाहीत. पत्नीला विचारस्वातंत्र्य देण्याचे व तिच्या ध्येयाआड न येण्याचे उदार धोरण यामागे असल्याचे जाणवते. कर्मधर्मसंयोगाने "पतीचे समाधान हाच आनंद व ध्येय होय" (उमटलेली पावले पृ. ४३) असे राधाबाई सांगतात. दोघांच्या जुळलेल्या विचाराने आपटे आनंदून जातात. पण तरीही ते बाईंवर हुकमत गाजविताना दिसत नाहीत. आपले विचार व ध्येय राधाबाईंना स्पष्टपणे सांगतात. "सहधर्मचारिणीस मनातील विचार कळविणे हे माझे कर्तव्यच ठरते" (उमटलेली पावले पृ. ४५) असे समजूतदारपणे वागताना दिसतात. "तुला विचारल्यावाचून मी कोणताच निर्णय आयुष्यात घेणार नाही." (उमटलेली पावले, पृ. ४९) असे वचन राधाबाईंना देतात. आपटयांनी पत्नी म्हणून बाईंना दिलेला हा मान आहे– "माझ्या मनातील सर्व तऱ्हेची खळबळ मी कोणाजवळ सांगू ?" (उमटलेली पावले, पृ. ८३) असे म्हणून बाईंना पूर्ण विश्वासात घेऊन आपटे त्यांच्याजवळ आपले मन मोकळे करतात. आपल्या ओबडधोबड जीवनाला राधाबाई नीटनेटके वळण लावू शकतील असा विश्वास राधाबाईंवर टाकतात. शंभूची मौंज हौशीने करण्याची राधाबाईंची इच्छा जाणून "लग्न झाल्यावर तू माझ्याकरिता तुझा आवडता चहा सोडलास. तेव्हा मलाही थोडीशी मुरड घालून तुझी इच्छा पुरी केली पाहिजे. शंभूबद्दलची कोणतीही इच्छा हा तुझ्या हृदयाचा उमाळा आहे." (उमटलेली पावले, पृ. १३०) राधाबाईंच्या इच्छे-

प्रमाणे शंभूची मौंज थाटामाटात होऊ देतात. आपट्यांनी जपलेले मातेचे हृदय, राधाबाईंच्या भावनांचा केलेला सन्मान यातून दिसतो. कामावरून थकून भागून आलेल्या राधाबाईंना कॉफी करून देणारे आपटे बाईंच्या जीवनाचे खरेखुरे सहकारी वाटतात. "माझी राधा खूष आहे ना माझ्या लिखाणावर ?" (ढळला रे ढळला दिन सखया, पृ.९७) आपल्या लिखाणावरची बाईंची पसंती त्यांना पुरेशी वाटते.

'पत्नी' म्हणून राधाबाईंनीही आपली जबाबदारी पूर्णपणे उचललेली दिसते. कीर्तने करून राधाबाई राष्ट्रीय शाळेला पैसे देतात. आपट्यांच्या बरोबरीने स्वदेशी चळवळीत भाग घेतात. स्वयंसेविका म्हणून काम करतात. पंधरा ऑगस्ट १९४७ हा आमच्या आयुष्यातील फार मोठा आनंदाचा सण असल्याचे त्या सांगतात. यावरून आपट्यांच्या ध्येयात झालेले त्यांचे एकजीवित्व जाणवते. "सचोटीने निर्भीड आणि कर्तव्यदक्ष कार्यकर्ते असा लौकिक ह्यांनी पुण्यात मित्रमंडळीत मिळविला होता." (उमटलेली पावले, पृ. २५७) असे कौतुकाने सांगून कर्तव्यनिष्ठ आपटेगुरुजी राधाबाई उभे करतात.

"कोणत्याही प्रसंगी आपल्यापेक्षा दुसऱ्यांचा विचार आपण आधी करावा. म्हणजे पश्चात्तापास जागा न राहता योग्य मार्ग आपणांस सुचतो." ( उमटलेली पावले, पृ. ६७ ) निराश अवस्थेत—

> "अवघाची काळ सजे । तरी अवघेची होती राजे ।
> काही सजे काही न सजे । ऐसे आहे. ।"
>
> ( उमटलेली पावले, पृ. ५८ )

ही आपट्यांनी घातलेली समजूत, अनुभवावरून जीवनतत्त्वे मांडणाऱ्या आपट्यांचे दर्शन घडविते. "जीवनाचे मोल देऊन मिळविलेले अनुभवांचे बोल येथे पाना पानांवर आढळतात." [12] अशी समीक्षक वि. म. कुलकर्णी 'उमटलेल्या पावलां'ची त्यात आलेल्या जीवनतत्त्वांबद्दल कौतुकाने पाठ थोपटतात.

अशी 'एक सहकारी' म्हणून राधाबाईंनी आपटे गुरुजींची व्यक्तिरेखा चितारलेली आहे. प्रस्तुत कालखंडात येणाऱ्या पस्तीस आत्मचरित्रांत पतीने पत्नीला एवढा मान दिलेली ही एकमेव व्यक्तिरेखा होय असे म्हटल्यास वावगे होऊ नये.

**मीच हे सांगितलं पाहिजे ! मधून घडणारे केतकर—दर्शन**

ज्ञानकोशकार डॉ. व्यंकटेश केतकर यांच्याबद्दल जनमानसात असलेले गैरसमज दूर करून त्यांचे खरे दर्शन घडविण्याचा प्रयत्न 'मीच हे सांगितलं पाहिज !' मध्ये शीलवतीबाईंनी केलेला आहे. "डॉक्टरांचे व्यक्तिमत्त्व जसं मला समजलं

---

[12] वि. म. कुलकर्णी, उमटलेली पावले, महाराष्ट्र साहित्य पत्रिका, ऑक्टो., १९६२, पृ. ७६

तसं लोकांसमोर उभं करण्याचा माझा प्रयत्न आहे." ( प्रस्तावना पृ. १८ ) असे शीलवतीबाई सांगतात. केतकरांचे खाणे–पिणे, पोषाख, खेळ अशा छोटया मोठया गोष्टींचा आधार घेऊन केतकरांचे चित्र काढण्याचा प्रयत्न शीलवतीबाईंनी केला आहे.

डॉक्टरांचे खाणे–पिणे, पोषाख शिष्टाचारांचा अभाव, असभ्यपणा व परदेशी पत्नीच्या तालावर नाचणे वगैरे आक्षेप सर्वसाधारणपणे केतकरांवर घेतले जात असल्याचे बाई सांगतात. खाण्याबद्दल 'हावरट', 'खादाड' ही विशेषणे अनेकां-कडून डॉक्टरांना लावण्यात येत असत. या आक्षेपांचे निरसन करण्यासाठी त्या खरी परिस्थिती वाचकांसमोर मांडतात. लहानपणी केतकर आपल्या चुलत्यांकडे राहत. त्यावेळी त्यांना अतिशय गलिच्छ, अयोग्य आणि अन्यायकारक वागणूक मिळत असे. लहानपणी ते सुदृढ, सशक्त आणि धडपडे होते. त्यामुळे त्यांची भूकही मोठी असे. भूक भागेल इतके अन्न त्यांना खायला मिळत नसे. जे वाटयाला येत असे त्यातही पक्षपात केला जाई. अशावेळी भूक अनावर झाली की, खिशात असतील त्या पैशांचे हॉटेलमधील तयार पदार्थ घेऊन आडोशाला जाऊन भूक शमवायची. कधी लाडू तर कधी भजी आणि केव्हा मेवामिठाई तर केव्हा शेंगदाणे जे त्यातल्या त्यात स्वस्त आणि बऱ्यापैकी मिळेल ते विकत घेऊन खात असत. केव्हाही, कोठेही व काहीही घेऊन खाण्याचा पाया असा हा बालपणातच असहाय परिस्थितीमुळे घातला गेला. ज्ञानकोशाच्या विक्रीसाठी जेव्हा डॉक्टरसाहेब फिरतीवर जात तेव्हा जवळ पैसे नसल्याने अर्धपोटी राहून दिवसातील चौदा, सोळा तास ते काम करीत. जे पैसे मिळत त्यातून घरच्या लोकांसाठी पाठवावे लागत. शीलवतीबाई गहिवरून सांगतात, "अनेकदा ही मनिऑर्डर दोन रुपयांचीही असे." (११) यावरून केतकरांच्या करुण परिस्थितीची कल्पना येते. केतकरांच्या खाण्यापिण्याच्या आवडी अगदी साध्या होत्या. बहुतेक सर्वच पदार्थ त्यांना आवडत. आणि थोडयानेही त्यांचे समाधान होई. त्यांना घरचे जेवण आवडे पण बाहेरचे जेवायचे नाही असाही त्यांचा हट्ट नसे. असा या संदर्भात शीलवतीबाईंनी खुलासा केला आहे.

कपडे घेण्यासही केतकरांकडे पुरेसे पैसे नसत. अंगात नीट न बसणारे, जुन्या फॅशनचे, आखूड व स्वस्त असे कपडे त्यांना घ्यावे लागत. "केतकरांना उत्कृष्ट शिवलेले, व्यवस्थित बेतलेले आणि चांगल्या कापडाचे कपडे घालायला आवडत. पण ही गोष्ट कोणी लक्षात घेत नाही. अर्थात त्यांना अशा प्रकारचे उत्कृष्ट कपडे घालण्याची हौस आयुष्यात कधीच पुरवून घेता आली नाही म्हणूनच बहुधा त्यांना चांगले कपडे आवडत हेही कोणाला समजले नाही." (१०७) अशी शीलवतीबाई सत्यपरिस्थिती समजावून सांगतात. आपल्याला सोयीचा होईल तो पोषाख डॉक्टर-साहेब करीत. कधीकधी लोकांचे लक्ष वेधून घेण्यासाठी मुद्दाम विशिष्ट प्रकारचा

पोषाख करीत. पण लोकांच्या आक्षेपांकडे कधी लक्ष देत नसत. केतकरांना बिनदिक्कतपणे 'अहंकारी' म्हटले जाते. डॉक्टरसाहेबांना स्वतःचे महत्त्व नीट कळत होते. आणि त्यांचा आत्मविश्वासही जबर होता अशी आक्षेपाचे निराकरण करणारी दुसरी बाजू केतकरबाईंनी मांडून दाखविली आहे.

स्त्रियांसमोर बोलू नये अशा काही विषयांवर शेजारच्या खोलीत बायका बसलेल्या असतानाही केतकर हे खास पुरुषीपद्धतीने मोठ्याने बोलत असत. म्हणून 'शिष्टाचाराचा अभाव' असा आक्षेप त्यांच्यावर घेतला जातो. पण वस्तुस्थिती अशी आहे की, भारतीय, अमेरिकन, इंग्लिश शिष्टाचारांची त्यांना चांगली माहिती होती. स्वभावतःच ते अतिशय आदबशीर असल्याचे 'मीच हे सांगितलं पाहिजे !' मधील हकीकतींवरून कळते. अनेक प्रकारच्या लोकांमध्ये डॉक्टरसाहेबांना वावरावे लागत असे. त्यामुळे निरनिराळ्या लोकांच्या शिष्टाचाराबद्दल केतकरांच्या मनात गोंधळ निर्माण होई. अशावेळी 'असभ्य' असे त्यांना लोकांकडून शिक्कामोर्तब केले जाई. 'आशास्थान' या स्वतःच्या घरात आजूबाजूला फार डास असल्याने राहणे अशक्य होते. म्हणून केतकर परत भाड्याच्या घरात आपले बिऱ्हाड हलवितात. यावरून केतकर आपल्या परदेशी पत्नीच्या तालावर नाचतात असा आरोप त्यांच्यावर घेतला जातो. वस्तुस्थितीकडे पूर्णपणे दुर्लक्ष करून वाटेल ते बोलण्याची लोकांची रीत यावरून कळते. असे केतकरांवर घेतल्या जाणाऱ्या आक्षेपांचे निरसन शीलवतीबाईंनी केले आहे. खरी बाजू इतरांपेक्षा शीलवतीबाईंनाच अधिक माहीत असणार आणि म्हणूनच त्या म्हणतात "मीच हे सांगितलं पाहिजे !" त्याप्रमाणे त्यांचे हे सांगणे आहे.

केतकरांची जबरदस्त महत्त्वाकांक्षा, त्यासाठी त्यांनी केलेले अथक परिश्रम; त्यांना असणारी प्राणिमात्रांची आवड, बालकांवरील प्रेम, निसर्गवेड, उदारवृत्ती याचे बाईंनी तोंडभरून कौतुक केले आहे. परंतु केतकरांमध्ये असलेले दोष, त्यांचे परस्परविरोधी वागणे तितक्याच परखडपणे त्यांनी सांगितले आहे.

केतकर परगावी गेले असताना शीलवतीबाई केतकरांच्या मित्रांबरोबर सिनेमाला जातात. त्यावेळी "पुन्हा असं होता कामा नये" (१०४) असे डॉक्टरसाहेब बजावून सांगतात. बाईंच्या मित्राने 'एडिथ' म्हणून एकेरी नावाने संबोधिलेले केतकरांना खपत नाही. मित्रांशी जास्तवेळ गप्पा मारलेल्या त्यांना चालत नाहीत. याउलट स्वतः केतकर मात्र तासन्‌तास तरुण स्त्रियांशी गप्पा मारीत असत. अशावेळी बाईंच्या मनात मत्सर उत्पन्न झाला तर तो शीलवतीबाईंचा मूर्खपणा आहे असे डॉक्टरांना वाटते. केतकरांच्या स्वभावातील ही विसंगती बाईंनी स्पष्टपणे सांगितली आहे. ब्राह्मणेतर सुशिक्षित तरुणींना आपल्या जमातीत सुशिक्षित नवरे मिळत नसतील तर त्यांनी ब्राह्मण तरुणांशी विवाह करावेत;

त्यामुळे त्यांचा दर्जा एकदम उंचावेल असा सल्ला ब्राह्मणेतर तरुणींना डॉक्टर-साहेब देतात. परंतु ब्राह्मण तरुणींनी मात्र आपल्या समाजाबाहेर जाऊन विवाह करणे त्यांना पटत नाही. यावरून इतर अनेक बाबतीत पुढारलेल्या केतकरांची संकुचित दृष्टी नजरेस पडते. शक्यतोवर बायकोने नवऱ्यापेक्षा वरिष्ठ हुद्यावर असू नये, नवऱ्यापेक्षा अधिक पगारही मिळवू नये हे केतकरांचे विचारही सनातनी वाटतात. हीही केतकरांच्या स्वभावातील विसंगती म्हणावी लागेल. मराठी भाषेबद्दल डॉक्टरसाहेबांना अतिशय अभिमान वाटे परंतु शीलवतीबाई व केतकर यांच्या गप्पा इंग्रजीतूनच झाल्या पाहिजे असा त्यांचा आग्रह असे. केतकरांची विसंगत वर्तणूक यावरून जाणवते. असे हे खरे केतकरी स्वरूप आहे.

अशी 'पतिचित्रे' पतीच्या निमित्ताने लिहिलेल्या आत्मचरित्रांतून रेखाटली गेली आहेत. त्यामुळे बऱ्याच अबोध व्यक्तिरेखा उजेडात आल्या आहेत. स्त्रियांची ही कामगिरी निःसंशय अभिनंदनीय आहे. समीक्षक बाळ सामंत यांचे विचार या दृष्टिकोणातून मननीय वाटतात. ते म्हणतात, "थोर पुरुषांच्या पत्नींनी लिहिलेली विविध आत्मवृत्ते हा मराठी वाङमयाचा अमोल ठेवा आहे."[13].

**पतीचा पत्नीकडे पाहण्याचा दृष्टिकोण**

मानवाच्या रानटी अवस्थेत स्त्रीने अतिशय महत्त्वपूर्ण कामगिरी बजावलेली आहे. त्याकाळी प्रचलित असलेली स्त्री–प्रधान संस्कृती स्त्रियांच्या कर्तृत्वाची साक्ष देते. परंतु पुढील काळातील पुरुष–प्रधान संस्कृतीमुळे स्त्री–प्रधान संस्कृती हळूहळू आकसत गेली. स्त्रीकडे पाहण्याची पुरुषाची दृष्टीच बदलली. ती एक 'अबला' आहे, आपल्यावर सर्वस्वी 'निर्भर' आहे असा त्याचा समज झाला. या संस्कृतीचे पडसाद आत्मचरित्रातही वाचायला मिळतात. पतीची पत्नीकडे पाहण्याची नजर धाकाची वाटते. वागणूक अधिकाराची दिसते. ती त्याला हुकमाची ताबेदार वाटते. हा अधिकार, ही हुकुमशाही कदाचित कळत न कळत गाजवली गेली असेल पण गाजवली गेली खरी. पत्नीच्या मनाचा, तिच्या भावनांचा फारसा विचार पतीकडून होताना दिसत नाही. "माळिये जेऊते नेले । तेऊते निवांतची गेले." अशी पत्नीची वागणूक त्यांना अपेक्षित आहे. खालील उदाहरणांवरून याची प्रचीती येते.

न्यायमूर्ती माधवराव रानडे स्त्री–स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते होत. माधवरावांनी स्त्री–स्वातंत्र्यासाठी केलेली कामगिरी उल्लेखनीय आहे. परंतु घरात प्रत्यक्ष स्वतःच्या बायकोशी माधवराव कित्येकदा स्त्री–स्वातंत्र्याचा विसर पडूनच वागताना दिसतात. प्रत्येकवेळी रमाबाईंनी आपल्या हुकुमाचे मुकाट्याने पालन करावे असे त्यांना वाटते. "प्रार्थना मंदिरात इतरांच्या वाचनाच्या वेळी गेले नाही तरी चालेल पण माधवरावांच्या वाचनाच्यावेळी रमाबाई हजर राहिल्याच पाहिजेत

[13] बाळ सामंत, हितगुज, मुंबई, १९६५, पृ. ३३

३९८२ २५१२६ १५।१०।९६ २२५

असा माधवरावांचा कटाक्ष असे. रमाबाई माधवरावांच्या उष्टया ताटात जेवतात पण त्याबद्दल सुधारणाप्रिय माधवराव कधी अवाक्षरही काढताना दिसत नाही. रमाबाईंच्या या कृतीत माधवरावांना आपला गौरव वाटत असावा काय ? असा प्रश्न उपस्थित होतो. अशी आणखी काही उदाहरणे 'आमच्या आयुष्यातील काही आठवणीं'मध्ये सापडतात. या उदाहरणांवरून तरी माधवराव रमाबाईंकडे 'हुकुमाची ताबेदार' या दृष्टीनेच पाहताना दिसतात.

रेव्हरंड टिळकांना स्वतःच्या बेशिस्त वागणुकीची जाणीव झाल्यावर ते; "मी तुला फार त्रास दिला. मला क्षमा कर." (भाग ३, पृ. १४३) अशी लक्ष्मीबाईंची क्षमा मागत असले तरी वेळी–अवेळी टिळकांमधील पतित्व जागे होताना दिसते. टिळक स्वत: मान्यवर प्राध्यापक आहेत. अनेक विद्यार्थी त्यांच्या हाताखाली शिकून तयार झाले आहेत. लक्ष्मीबाई खऱ्यांना लिहिता वाचता येते तर लक्ष्मीबाई टिळकांना यायलाच पाहिजे हा त्यांचा ध्यास आहे. ढीगभर पुस्तके गोळा करून "शब्द म्हणजे काय ?" (भाग १, पृ. ८१) या प्रश्नापासून ते लक्ष्मीबाईंना शिकवायला सुरुवात करतात. शिकवायला सुरुवात करताना लक्ष्मीबाईंची–आपल्या विद्यार्थ्याची तयारी किती आहे हा प्रश्न विचारात घेतला जात नाही. "तुला काही येत नाही" असे लक्ष्मीबाईंना म्हणून पुस्तकांना काडी लावून ते मोकळे होतात.

लक्ष्मीबाईंना मानसशास्त्र समजत नाही ही तर टिळकांची कायम तक्रार आहे. गोवऱ्या तापत्या तव्यावर वाळत घातल्या तर जळून जातील असे लक्ष्मीबाई परोपरीने समजावून सांगतात. पण बायकोला आपल्यापेक्षा जास्त थोडीच कळणार ? ती आपल्या कानाखालचीच ! या विचाराने, पती या नात्याने स्वतःच्या अधिकाराच्या जाणिवेने टिळक अखेरी तव्यावर गोवऱ्या भाजतातच ! आणि स्वतःचे हसे करून घेतात. अनोळखी सोनाराकडे नथ देऊ नका म्हणून विनविणाऱ्या लक्ष्मीबाईंना न जुमानता आपल्या अधिकाराचा फायदा घेऊन हट्टीपणाने टिळक सोनाराला नथ देतात आणि लक्ष्मीबाईंनाच उपदेश करतात. पती या नात्याने अधिकाराच्या जाणिवेतून हा हट्टीपणा जन्मला असावा असे वाटते. टिळकांच्या अधिकाराचे असे अनेक दाखले 'स्मृतिचित्रा'त वाचायला मिळतात. टिळक जाणूनबुजून असे वागत नसतील, पण नकळत का होईना एका पतीचा–पत्नीवर–टिळकांचा–लक्ष्मीबाईंवर अधिकार मात्र गाजविला गेला.

माधवराव पटवर्धन सुशिक्षित आहेत. पुरोगामी विचारसरणीचे आहेत. "स्त्री ही पत्नी असण्यापेक्षा मैत्रीण असावी" (५१) असा पत्नीविषयी त्यांचा उदार व विशाल दृष्टिकोण आहे. बरेच दिवस एकटे राहण्याची सवय असल्याने मनमानेल तशी वागण्याची त्यांना सवय होते. त्यामुळे लीलाबाईंवर आपल्याकडून

अन्याय होतो याची माधवरावांना जाणीव आहे. अधूनमधून ते तसे उद्गार काढतातही. पण अनवधानाने का होईना त्यांच्यातील नवरेपणा बरेचदा जागा होताना दिसतो. माधवरावांना विद्याव्यासंगाची आवड आहे तर लीलाबाईंना घर नीटनेटके ठेवण्याची ! शिवणा–टिपणाची ! थोडक्यात गृहिणीपदाला साजेशा गोष्टींची आवड आहे. पण माधवराव लीलाबाईंची ही आवड जोपासत नाहीत. लीलाबाईंनी वाचलेच पाहिजे असा त्यांचा हट्ट आहे. त्यासाठी साम–दाम यांचा उपयोग करून लीलाबाईंच्या डोळ्यातून पाणी काढायलाही ते मागेपुढे पाहत नाहीत. ही माधवरावांमधील पतिदेवांची करामत असावी की लीलाबाईंच्या भवितव्याचा विचार असावा ? लीलाबाईंना दोन्ही प्रकारचे शिक्षण त्यांना देता आले असते.

इंदिराबाईंनी कसे राहावे हे यादवराव भागवत ठरवितात. "तुझा चेहरा लांबट आणि वाळका आहे म्हणून सैल आंबाडा आणि बारीक कुंकू यांनी चांगला दिसेल." (१७) इंदिराबाई सनातनी आहेत. पारंपरिक संस्कारांमुळे त्या प्रथम भागवतांना नकार देतात. परंतु नंतर कबूल होतात. पत्नी पतीच्या कलाने वागत असली तरी त्यामानाने पती यादवराव पत्नीकडे–इंदिराबाईंकडे लक्ष पुरविताना दिसत नाहीत. बाळंतपणात झालेल्या हालांबद्दल सहानुभूतीने चार शब्दही बोलत नाहीत. मूल गेल्यावर चौकशीही करीत नाहीत. मूल इंदिराबाईंइतकेच त्यांचेही होते. हा माणसाच्या स्वभावाचा वेगळा नमुना म्हणावा की पती या नात्याने असे विचारण्यात त्यांना कमीपणा वाटत असावा हे समजत नाही. डॉक्टर केतकर स्त्रियांचे कैवारी आहेत. स्त्रियांची शोचनीय अवस्था पाहून त्यांचे मन कळवळते. आपल्या कादंबऱ्यांमधून त्यांनी स्त्री–समस्यांना वाचा फोडलेली आहे. असे असले तरी शीलवतीबाईंशी वागताना केतकरांमधील 'पतित्व' जागे होताना दिसते. शीलवतीबाई मित्राबरोबर सिनेमाला गेल्या म्हणून चिडणारे, मित्राने 'एडिथ' म्हणून संबोधल्यावर संतापणारे, बाईंच्या परवानगीशिवाय त्यांना काँग्रेसचे सभासदत्व स्वीकारायला भाग पाडणारे डॉक्टरसाहेब पती म्हणूनच आपले स्वामित्व गाजवतात असे वाटते. संपलेला जिन्नस आणायला सांगितल्यावर 'जिन्नस आताच कसा संपला' असे ठणकावून विचारणारे रामचंद्र फडणीस आपल्या अधिकाराचीच अंमलबजावणी करताना दिसतात. बंदरकर आपल्या अधिकाराच्या जोरावर हंसाबाईंसाठी चाबकाचाही वापर करतात. अडीअडचणीला उपयोगी पडावे म्हणून काटकसरीने पैसे साठविले तर 'मला न कळत हे पैसे का ठेवले ? कशासाठी ठेवले ?' अशी दटावणी शिर्के अधिकाराच्या जोरावर करतात. आपल्या कुटुंबियांसाठी रात्रंदिवस जीवापाड श्रम करणाऱ्या सावेबाईंची त्यांच्या नाजूक अवस्थेत तरी साव्यांकडून विचारपूस होते काय ? पतीने पत्नीकडून हवी ती सेवा करून घ्यावयाची असते. बाकी तिच्या सुख–दुःखाचा पती विचार करणार नाही अशी परंपरेची शिकवण आहे काय ? की जाणूनबुजून केलेला हा कानाडोळा आहे ?

शारंगपाणी स्वत: पदवीधर आहेत. सरोजिनीबाईही सुशिक्षित आहेत. पतीच्या अधिकारांची अमलबजावणी करून मधुसूदनराव पावलोपावली सरोजिनीबाईंना वाकायला लावतात. सरोजिनीबाईंची फिरायला जाण्याची इच्छा, किंचित उंची पातळे घेण्याची हौस अजिबात न पुरविता क्षणोक्षणी आपल्या तालावर सरोजिनीबाईंना नाचायला लावणारे शारंगपाणी आपला नवरेपणाच गाजवितात.

अशी उदाहरणे जवळपास सर्वच आत्मचरित्रांत सापडतात. क्वचित काही ठिकाणी याच्याविरुद्धही परिस्थिती असल्याचे जाणवते. 'पती' स्वत:ची हुकमत न गाजविता पत्नीशी नेहमी समझोत्याने, सहचारिणी या दृष्टिकोणातून वागताना दिसतात. पण अशी उदाहरणे बोटांवर मोजण्याइतकी कमी आहेत.

बायकोच्याने होत नाही म्हणून तिला मिरच्या कुटून देणारे, सतत येन केन प्रकारेण सहकार्यासाठी तयार असलेले सुखात्मे समजूतदार पती आहेत. राधाबाई आपट्यांना आपटे गुरुजी नेहमी आदराने वागवितात. कधीही आपला अधिकार गाजविताना दिसत नाहीत. "तुला विचारल्यावाचून मी कोणताही निर्णय आयुष्यात घेणार नाही." (उमटलेली पावले, पृ. ४९) अशी समजूतदारपणे वागण्याची त्यांची रीत आहे. आनंदीबाईंच्या बहकण्यावरही आपल्या नवरेपणाची हुकमत न गाजविणारे विजापुरे चारचौघांपेक्षा वेगळे वाटतात. ज्योत्स्नाबाईंना सर्व प्रकारच्या सवलती देऊन त्यांच्या गुणांचा विकास करणारे केशवराव भोळे एक आदर्श पती म्हणून संबोधायला हरकत नाही. ही बहुतांशी आत्मचरित्रे (१) सत्यकथन, (२) तटस्थवृत्ती, (३) 'स्व' ला केंद्रस्थान, (४) घटनांची निवड व कुशल मांडणी आणि (५) वस्तुस्थितिदर्शक निवेदन ह्या आत्मचरित्राच्या सर्वसाधारण निकषांतून उतरलेली दिसतात.

**(१) सत्यकथन**

पतिचरित्रासंबंधी बोलायचे झाल्यास एखाद दुसरे अपवाद म्हणून सोडले तर बहुतेक सर्व अजाण-भाबड्या पत्न्यांनीच ही लिहिलेली आहेत. आपले घर, आपले नातेवाईक सासर-माहेरच्या गावांशी ओळख हेच त्यांचे वावरण्याचे प्रमुख क्षेत्र असल्याने दिखाऊ-वेगडी बाह्यजगापासून त्या अलिप्त राहिलेल्या आहेत. असत्य बोलण्यास लागणारा बेडरपणा त्यांच्या ठायी नाही. जे घडले त्या रूपात स्मृतीवर पूर्ण भरवसा ठेवून लिहिण्याची त्यांची रीत आहे. म्हणूनच रमाबाई 'आमच्या आयुष्यातील काही आठवणीं'मध्ये माधवरावांच्या रागाच्या- 'राग आला की तासन्तास गप्प बसून राहणे' किंवा कधी आपला राग नासकाकुजका एखादा शब्द बोलून प्रकट करणे या तऱ्हा, 'मी सांगतो ते तू मुकाट्याने कर' अशी अधिकारवाणीने हुकूम सोडण्याची रीत सहजतेने सांगू शकल्या. त्यांना लपवाछपवी सहज करता आली असती. माधवरावांचे हे दोष गुणांचे नक्षीदार आवरण घालून त्यांना

सांगता आले असते. पण वाचकांपासून आपण काही लपवावे ही कल्पनाच त्यांच्या मनाला कधी स्पर्शताना दिसत नाही. तो त्यांचा पिंडच नाही. स्वत:चे अती तोंडाळपण, अती हसरेपण लक्ष्मीबाई टिळक प्रामाणिकपणे कबूल करतात. आपल्या जिजीविषेविषयी त्या सांगतात, " शरीराचा त्याग करायचे प्रसंग कितीतरी वेळा आले असतील पण मी तो कधीच केला नाही व मला वाटते तो कधी होणेही शक्य नव्हते. माझ्या मनाची ठेवणच अशी आहे की, सर्व निराशामय अंध:कारातून चाचपडत, धडपडत का होईना पण आपला मार्ग आक्रमायचा. मध्येच प्राण सोडायचा नाही. थोडक्यात म्हणजे रबरी चेंडूप्रमाणे माझे होते." (भाग २, पृ. २५) प्रत्येकाला जगण्याची तीव्र इच्छा असते. पण ती कबूल करण्याचे सामर्थ्य किती लोकांच्या ठिकाणी असते ? त्याला सोलीव प्रामाणिकपणाच अंगी असावा लागतो. सत्य सांगण्याची तयारी बाळगावी लागते. मला मरायचे होते पण त्याने मला मरू दिले नाही असे कोणीही सहज सांगेल. पण मलाच जगण्यांची इच्छा होती हे सांगण्याची हिंमत दुर्मिळ आहे. माधवराव आणि लीलाबाई यांच्या मूलभूत प्रवृत्तीतच फरक असल्याने, " दिवाळीपर्यंत आमचे दिवस मोठे चमत्कारिक गेले. मला मानसिक ताप असह्य होऊन बारीक ताप येऊ लागला. एकदा माझ्या मनात असेही आले की, आता आपण ह्यांच्यापासून काही दिवस दूर राहिले तर फार बरे होईल." (४९) माधवराव आणि लीलाबाई यांचे मनोमीलन साधत नसल्याचीच लीलाबाईंची ही प्रामाणिक कबुलीच होय. " दोघांनी बसून गप्पा गोष्टी करीत चहा घ्यावा असे इंदिराबाईंना नेहमी वाटे पण यादवरावांच्याभोवती सदा माणसांचा गराडा असल्याने ते जमले नाही. आपली लहानशी इच्छा यादवरावांनी पुरी न केल्याचे सत्य इंदिराबाईंनी सूचकतेने सांगितले आहे." शीलवतीबाईंना केतकरांसंबंधी नितांत आदर आहे. गाढ प्रेम आहे. पण प्रसंगी खटकलेले केतकरांचे दोष सांगून त्यांनी सत्य उजेडात आणले आहे. शीलवतीबाईंनी मित्रांशी गप्पा मारलेल्या केतकरांना आवडत नव्हत्या. त्याबद्दल ते त्यांना रागावत. पण ते स्वत: मात्र तरुणींशी तासन्‌तास गप्पा मारीत असत. त्याबाबतीत बाईंनी संशय घेतलेला त्यांना चालत नसे. अशी सत्यनिष्ठेची अनेक उदाहरणे पतिचरित्रांमधून वेचून दाखविता येतील.

इतर आत्मचरित्रांमध्ये एखाद दुसरे सोडल्यास सत्यासंबंधी शंका येत नाही. स्वत:च्या ताकदीबाहेरची कामे मोलकरणीकडून करून घेतल्यावर मोबदला म्हणून त्यांना धान्य देऊन त्यावर पुन्हा पूर्वीप्रमाणे स्वस्तिक रेखून सावपणे आपली चोरी खपविल्याचे सत्य बायाने सांगितले आहे. " आमचं घराणं कलावंतिणीचं." (१) आत्मचरित्राच्या प्रारंभीचे हे वाक्य हंसाबाईंच्या प्रांजल निवेदनाची ग्वाही देते. सुशीलाबाईंच्या सासूबाई पार्वतीबाई आठवले यांनी विधवांच्या उन्नतीसाठी आपले आयुष्य वेचले. पण नानाच्या लग्नाच्या वेळी सुनेच्या चोळीला पहिली कात्री

लागावी ती सुवासिनीचीच ! ह्या त्यांच्या स्वभावातील विरोधाचे सुशीलाबाईंनी केलेले दिग्दर्शन म्हणजे सत्यप्रीतीच म्हणावी लागेल. आशालताबाई सावे यांनी तर आपल्या जीवनाचा प्रत्येक कानाकोपरा न संकोचता 'पानाआडचे फूल'मध्ये वाचकांपुढे ठेवला आहे. अशी सत्यनिष्ठेची अनेक उदाहरणे आत्मचरित्रांतून काढून दाखविता येतील.

**तटस्थता**

'आमची अकरा वर्षे'मध्ये लीलाबाई आपल्या संकोची स्वभावामुळे त्रास झाला असे कबूल करतात. माधवरावांना समजून सांगितले असते तर ते असे वागते ना ? पावलोपावली अडविणाऱ्या संकोची स्वभावामुळेच आपल्याला माधवरावांशी जुळवून घेता आले नाही. त्यामुळे सतत होणारा मनस्ताप टळला असता. आपल्या पराभूत जीवनाचे कारणच लीलाबाईंनी तटस्थपणे शोधलेले आहे. हंसाबाई आपले जीवन तटस्थपणे न्याहाळतात. "जगावर सूड उगविण्याच्या निमित्ताने मी असे वागले पण शेवटी जगाला काहीच झाले नाही. मीच अधिकाधिक खोलात गेले." (१०६) जगावर सूड उगविण्याच्या निमित्ताने स्वतःच स्वतःच्या पायावर धोंडा पाडून घेतला. जग आनंदात राहिले व हंसाबाईंच्या पदरात मात्र वारेमाप दुःखे पडली. आपल्या पराभूत जीवनाला आपणच कारणीभूत असल्याची हंसाबाईंनी दिलेली ही कबुली होय. आनंदीबाई विजापुरे आपले जीवन तिऱ्हाइताच्या नजरेतून पाहतात. "दुःख मुकाट्यानं गिळणं भाग होतं. काकांना किंवा वसंताला दोष देण्याचा अधिकार मी माझ्या स्वैर वर्तनानं गमावला होता." (८५) स्वतःच्या स्वैर वर्तनानेच आपले आयुष्य पराभूत झाले. वयाला न शोभणाऱ्या गोष्टी केल्याने आयुष्याची सतत ससेहोलपट झाली. बेहऱ्यांच्या नादी लागून केलेल्या मनमानेल तशा वर्तनाने आपले जीवन पराभूत झाल्याचा आनंदीबाईंचा हा कबुलीजबाब आहे. स्नेहप्रभा प्रधान परोक्षपणे आपले जीवन तपासतात. नाहक मनस्तापापायी मी निद्रानाश करून घेतला आणि त्यातूनच असंख्य दुःखे जन्माला आली. आपल्या व्यथित जीवनाला आपणच कारणीभूत असल्याचे हे बाईंचे तटस्थपणे अवलोकनच आहे. सरोजिनी शारंगपाण्यांच्या सासरच्या लोकांनी त्यांना पावलोपावली छळले आहे. परंतु सरोजिनीबाई अंतर्मुख होतात. "कुणी सांगावे ? माझ्याकडूनही काही चुका झाल्या असतील." असे तिऱ्हाइताच्या नजरेने त्या आपले आयुष्य न्याहाळतात. अशी 'तटस्थता' ही आत्मचरित्राची कसोटी पाळलेली अनेक उदाहरणे आत्मचरित्रांत दाखविता येतील.

**'स्व'ला केंद्रस्थान–** पतिचरित्रे, सहचरित्रे, पुत्रचरित्रे सोडल्यास इतर आत्मचरित्रांमध्ये 'स्व'ला केंद्रस्थान मिळालेले आहे.

**घटनांची निवड व कुशल मांडणी**

आत्मचरित्र कोणत्या दृष्टिकोणातून लिहायचे हे एकदा ठरल्यावर स्वतःच्या जीवनातील निवडक व परस्परपोषक घटनांची निवड करून त्यांची कलात्मक मांडणी करणे आवश्यक असते आणि ती बहुतेक आत्मचरित्रांत साधली गेली आहे असे म्हटल्यास वावगे होऊ नये. काही आत्मचरित्रे अपवाद म्हणून सांगता येतील पण ती फारच थोडी आहेत.

घटनांची योग्य निवड झाल्यावर त्यांची कलात्मक मांडणी करून अवघ्या एकोणऐंशी पृष्ठांमध्ये छोटी छोटी प्रकरणे (एकही प्रकरण दहा पानांच्या वर जात नाही.) अर्थपूर्ण शीर्षके, अर्थवाही भाषा यांच्या साह्याने बाया कर्वेंने (माझे पुराण) एक उत्कृष्ट समाजसेवक, आदर्श पत्नी व उत्तम माता म्हणून 'स्व'चित्र सादर केले आहे.

सोन्या–नाण्यापासून मीठ–साखरेपर्यंत कोणतीही वस्तू ज्या घरात धुतल्याशिवाय चालत नसे अशा कर्मठ वातावरणात बालपण जाऊनही टिळकांची शिकवण, ख्रिस्तीधर्माचा प्रभाव यामुळे भंग्यांची कामेही हाताने करणाऱ्या लक्ष्मीबाईंचे संपूर्ण जीवनच नाटयपूर्ण आहे. घटनांची योग्य निवड व कलात्मक मांडणी यांच्या साह्याने लक्ष्मीबाईंनी हे नाटय अतिशय कलात्मकतेने टिपले आहे. त्यांचे पुस्तक एकदा वाचायला हातात घेतले की ते सोडवतच नाही, हीच त्यांच्या यशाची ग्वाही होय. "'स्मृतिचित्रे' लिहून लक्ष्मीबाईंनी मराठी साहित्याशी कधीही न तुटणारा संबंध जोडला आहे."[14] अशी 'स्मृतिचित्रां'ची अवीटता रा. बा. पुरोहितांनी स्पष्ट केली आहे.

आनंदीबाई शिर्क्यांनी कोणत्याही प्रकारचा अभिनिवेश न आणता तत्कालीन समाजात सुख–दुःखाच्या हेलकाव्यात कधी कोमेजलेले तर कधी उमललेले असे स्वतःचे व्यक्तिमत्त्व उभे केले आहे. आवश्यक त्या घटना, प्रसंगांची निवड योग्यरीतीने साधली आहे. मुखपृष्ठावरील 'सांजवात' लागण्यापूर्वीची निसर्गाची उदासीनता, 'सांजवात' लावल्यावर देवघरातील प्रसन्नता कलात्मक व प्रतीकात्म वाटते. अशी आणखी काही आत्मचरित्रे काढून दाखविता येतील.

काही आत्मचरित्रे घटनांची निवड व कलात्मक मांडणी या दृष्टिकोणातून पडलेली दिसतात.

गंगूबाई पटवर्धन बहुतेक सर्व घटनाप्रसंगांचा उल्लेख तारीख वारानुसार करतात. ज्या बाबींचा व्यक्तिमत्त्वाच्या घडणीत काहीही उपयोग झाला नाही अशा

---

[14] लक्ष्मीबाई टिळक, स्मृतिचित्रे, भाग चवथा, अभिनव आवृत्ती, नाशिक, १९७३, पृ. ११०

छोटया छोटया गोष्टी पाल्हाळिकपणे सांगतात: हा मजकूर इतक्या तपशीलवारपणे सांगितला नसता तरी चालले असते. सामान्य माणसाला हा तपशील कंटाळवाणा होतो. स्वतः गंगूबाईंनीदेखील आपल्या या दोषाची कबुली दिली आहे. "चरित्र हा एका व्यक्तीच्या जीवनाचा इतिहासच ! त्यामुळे कालानुक्रमे सर्व लिहिले आहे. तारीखवार लिहिले ते जरा तितक्या तपशीलवार नसते तर बरे झाले असते असे वाटते कारण सामान्य वाचकांना इतक्या तपशिलाचा कंटाळा येतो." [15] 'गोदातरंग' मध्ये सुधाताई अत्र्यांना व 'अश्वत्थाची फुले' मध्ये प्रमिलाबाई भालेरावांनाही घटनांच्या निवडीचे व मांडणीचे तारतम्य साधता आलेले नाही असे खेदाने म्हणावे लागते.

आत्मचरित्रांत लैंगिक अनुभवांचे सत्यदर्शन महत्त्वाचे वाटत नाही. ह्या अनुभवांतून व्यक्तीच्या मनावर होणाऱ्या प्रतिक्रिया महत्त्वाच्या वाटतात. आत्मचरित्रात अशा प्रकारचे विवस्त्र सत्य आवर्जून सांगण्यात आत्मप्रौढीचाच भाग जास्त वाटतो. इतरांनी करून दाखविले नाही ते आम्ही करून दाखवितो अशी त्यांना शेखी मिरवायची असावी अशी कल्पना होते. प्रसिद्धी मिळविण्याचा हा मार्ग असावा काय ? असेही वाटते. आशालताबाई सावे यांचे 'पानाआडचे फूल' आनंदीबाई विजापुऱ्यांचे 'अजून चालतेची वाट' व स्नेहप्रभा प्रधान यांचे 'स्नेहांकिता' ही आत्मचरित्रे यांची उदाहरणे म्हणून सांगता येतील.

या आत्मचरित्रांच्या तुलनेत इतर आत्मचरित्रांतील लैंगिक अनुभवांचे दर्शन संकेतानेच आढळते. स्त्री-जीवनात अशा काही पायऱ्या निसर्गसिद्धच आहेत की जे दुसऱ्यांना सांगायचे तर राहूच द्या पण आपले आपल्यास आठवायलादेखील संकोच वाटतो. ते चव्हाटयावर मांडण्यात स्वारस्य वाटत नाही. जे सर्वांना माहीत आहे ते कशाला सांगायचे ? हा प्रश्न निर्माण होतो. इतर बहुतेक आत्मचरित्रांमध्ये अशा प्रसंगांचे वर्णन संयमपूर्वक टाळलेले दिसते. 'माहेरी जाण्याची वेळ झाली होती,' 'मला तीन दिवस उपास घडला' अशी सभ्य वर्णने केली जातात. या सभ्यतेमुळे ही आत्मचरित्रे अधिक शोभली आहेत. या जागा मनमोकळेपणाने सांगितल्या नाहीत तरी त्यामुळे काही सांगायचे राहिले आहे किंवा आत्मचरित्रांत काही जागा कोऱ्या सुटल्या आहेत असे वाटत नाही.

**वस्तुस्थितिदर्शक निवेदन**

आत्मगौरव करणारी आत्मचरित्रे सोडल्यास जवळपास सगळ्याच आत्मचरित्रांत वस्तुस्थितिदर्शक निवेदन आढळते.

**सामान्यज्ञान**

आत्मचरित्र वाचता वाचता सामान्यज्ञानात भर पडते. हे ज्ञान, ही माहिती इतरत्र मिळू शकणार नाही. त्यासाठी आत्मचरित्रच वाचले पाहिजे असे नाही तर

[15] प्रस्तुत प्रबंध, परिशिष्ट

व्यक्तीच्या जीवनाबरोबरच इतर गोष्टींचेही आपसूक ज्ञान होते हेच आत्मचरित्रांचे वैशिष्टय आहे. प्रवासवर्णन वाचायला घेतले तर प्रवासाची माहिती त्यातून निश्चित मिळेल पण व्यक्तीचे जीवन त्यातून कळणार नाही. कारण प्रवासवर्णनाचा तो हेतूच नाही. इतर कुठलाही वाङ्मयप्रकार निवडला तरी तो आपल्या शीर्ष-काशी संबंधित तेवढीच माहिती पुरवील. आत्मचरित्र हा एकच वाङ्मय-प्रकार असा आहे की ज्यात इतरही माहिती मिळू शकते, कारण व्यक्तीचे जीवन आत्मचरित्राचा विषय आहे. आणि व्यक्तीचे जीवन विविधतेतून सिद्ध होत असते.

**प्रवासवर्णने**

प्रवास ही मानवी मनाची एक स्वाभाविक प्रवृत्ती आहे. आपण पाहिलेला नवा मुलूख, तेथील लोकाचार, निसर्ग, जाता–येता अनुभवलेले सुखाचे व संकटांचे प्रसंग यांची माहिती सांगण्याची वृत्ती व मानवी स्वभावसहज उत्सुकता तीच मुख्यत: प्रवासवर्णनपर वाङमयाला जन्म देते. त्यामुळे "प्रवास वर्णनेही आत्म-चरित्रात येतात. 'कोलंबो' फार स्वच्छ आणि सुंदर शहर आहे." (आमचे कृतार्थ सहजीवन, पृ, २२) असे रुथबाई कौतुकाने सांगतात. बोटीत साजऱ्या केल्या जाणाऱ्या ख्रिसमसची इत्थंभूत माहिती त्या पुरवितात. सवय नसल्याने समुद्रप्रवास करताना होणाऱ्या Sea–sickness चेही वर्णन करतात. बोट थांबल्यावर उतारूंची माहिती घेऊन फोटो काढून केवळ तीन–चार तासांत सर्व मजकूर व फोटो वृत्तपत्रात छापले जातात. अमेरिकेतील तांत्रिक प्रगतीची ही माहितीही प्रस्तुत आत्मचरित्रात मिळते. अमेरिकन स्त्रियांमध्ये प्रत्येक गोष्टीचे फार कुतूहल असते. प्रत्येक गोष्टीची माहिती त्या फार चौकसपणे विचारतात. अनवाणी चालणे परदेशात कमीपणाचे समजले जाते. हिवाळ्यात सूर्य दिसत नाही. त्यात जरा कोठे सूर्य दिसला नि थोडे ऊन पडले तर सर्वांनाच कितीतरी आनंद वाटतो. वाटेने भेटलेला मनुष्य अनोळखी असला तरी 'Lovely day, Lovely day.' (आमचे कृतार्थ सहजीवन, पृ. ६१) म्हणून कौतुकाने सांगतो. अशा छोटया छोटया गोष्टींची, सामान्यज्ञानात भर टाकणारी माहिती या आत्म-चरित्रात मिळते.

परदेशी लोकांना भारतीय संगीत फार आवडते. कीटस्‌चे उद्‌गार ज्योत्स्ना-बाई उद्‌धृत करतात; "तुमच्या भारतीय संगीताची सर जगातल्या कुठल्याच संगीताला येणार नाही. त्या रात्ररात्र रंगलेल्या मैफिली, ते श्रोते न् तो गायक यांच्यात निर्माण झालेली आत्मीयता, सारं बघण्यातही केवढं सुख असतं. तुमची भारतीय बैठकच मोठी विलोभनीय असते." (स्वरवंदना, पृ. १५४) भारतीय संगीताचे परदेशात होणारे मूल्यमापन यावरून कळते. आदर्श गृहिणी या पदाला योग्य बनण्यापूर्वी पुष्परचनेचा मंत्र आणि तंत्र दोन्ही साध्य करता यायला

पाहिजे अशी जपानी संस्कृतीची अट असल्याचे 'आमचे कृतार्थ सहजीवन' मधून समजते.

इंग्रज लोक दुसऱ्याने ओळख करून दिल्याशिवाय एकमेकांशी बोलत नाहीत. तेथे भिंतींना रंग देत नाहीत. त्याऐवजी रंगीत डिझाइनचे मोठ्या कापडासारखे लांब कागद मिळतात ते गोंदाने किंवा खळीने भिंतींना चिकटवितात. त्याला 'Papering the wall' म्हणतात. वाहनांची वेळापत्रके व नकाशे मिळतात. त्यामुळे रस्ता शोधणे सोपे जाते. रस्ता चुकला तर चौकाचौकातील पोलीस अचूक मार्गदर्शन करतात. या सामान्यज्ञानाचा बोध 'चाकोरीबाहेर' मधून होतो. अमेरिकेतील लोक कामाशिवाय एकमेकांकडे जात नाहीत. तेथील मोलकरणींना सर्टिफिकेट देण्याची पद्धत पार्वतीबाई आठवले सांगतात.

गिरसप्पाचा धबधबा जगातील पहिला खोल धबधबा आहे. बेळगाव गरिबांचे महाबळेश्वर होय अशी माहिती 'माझा नंदादीप' मध्ये येते. कैरोला फक्त वर्षातून एकदाच पाऊस पडतो. हे ज्ञान 'आमचे कृतार्थ सहजीवन' मधून होते. मध्यप्रदेशातील आदिवासी लोक रात्री चुलीतील राख भिजत घालतात. सकाळी त्या मिश्रणात पातळ बुडवून मग धुतात ही माहिती 'सांजवात' मधून मिळते.

कोलारच्या खाणीतून सोने कसे मिळविले जाते याचे सविस्तर वर्णन 'माझा नंदादीप' मध्ये वाचायला मिळते. लक्ष्मीबाई सांगतात, "बचकेएवढा दगड पाहिला तर त्याला कुठेतरी बारीक पिवळे सोन्याचे कण दिसतात. ते दगड कुटून, त्यांची बारीक पूड करून ती पाण्याच्या प्रवाहात सोडतात व लहान लहान नळचांमधून ते पाणी किंचित खोलगट ट्रेसारख्या पत्र्यावरून सोडले जाते. तेथे सोन्याचे कण खाली बसून माती पाण्याबरोबर वाहून जाते. पुन्हा ते पाणी निरनिराळ्या ठिकाणी मोठमोठ्या हौदांतून उकळून, घुसळून नंतर बाहेर टाकले जाते. सोन्याचा कणन्‌कण हाती लागावा म्हणून त्याकरता केलेला तो प्रचंड व्याप पाहून खरोखरीच 'मातीचे सोने' केले आहे असे वाटते... शेवटी ते अनंत सोन्याचे कण एका ठिकाणी मुशीत घालून त्याचे एकत्रीकरण करून त्यांना लांब अगर चपटचा तुकडचांचे आकार दिले जातात. सोन्याचे कण असलेले दगड पाहिल्यापासून शेवटी सोन्याचा तुकडा हातात घेऊन पाहीपर्यंत त्याची किती रूपांतरे होतात हे पाहिले म्हणजे 'टाकीचे घाव सोसल्याशिवाय देवकळा येत नाही' या म्हणीप्रमाणे शुद्ध व निष्कलंक सुवर्ण म्हणून जगापुढे येताना किती तऱ्हेच्या स्थित्यंतरांतून जावे लागते आणि शेवटी तावून सुलाखून निघाल्यावर सोने म्हणून त्याला जगात मोल येते त्याचे प्रत्यंतर आले." (८०-८१) सोने आहे त्या रूपात स्वीकारता येत नाही. त्यासाठी त्याला अक्षरश: बावन कसोटचा पार पाडाव्या लागतात हे यावरून कळते. म्हणूनच बावनकशी सोने हा वाक्प्रचार रूढ झालेला दिसतो.

अशी देशी–विदेशी प्रवासवर्णने आत्मचरित्रांत आलेली आहेत. त्यावरून परदेशातील प्रवासाच्या सोयी, तेथील विविध चालीरीती, विज्ञानाची प्रगती यांची माहिती मिळते. स्वदेशातील विविध स्थळांच्या वर्णनावरून भारताचे वैभव कळते. "निसर्गरम्य व प्रेक्षणीय स्थळे पाहण्यासाठी ज्या हौशीने, दगदग सोसून व पैसा खर्च करून आपण जातो त्या मानाने आपला वेळ कमी पडतो. त्यामुळे अतृप्त मनानेच परतावे लागते. कदाचित ते सौंदर्य थोडावेळ पाहण्याने त्यातील अवीटपणा अनुभवाला येत असेल. 'अतिपरिचयात् अवज्ञा' ह्या म्हणीप्रमाणे तेथे राहणाऱ्यांना त्या सौंदर्याची कल्पनाही नसेल." (माझा नंदादीप, पृ. ७८) असे प्रवासातील वास्तव लक्ष्मीबाईंनी सांगितले आहे. आत्मचरित्रांत येणारी ही प्रवासवर्णने वाचताना कंटाळा येत नाही किंवा ती आत्मचरित्रांत अवास्तवही वाटत नाहीत. ज्ञान आणि मनोरंजन साधल्याचा आनंद त्यातून मिळतो.

**विविध क्षेत्रविषयक माहिती**

काही स्त्रिया विशिष्ट ध्येयाने प्रेरित झाल्या आहेत. आपले ध्येय साध्य करण्यासाठी त्या विशिष्ट क्षेत्रात वावरतात. विविध क्षेत्रांतील आत्मचरित्रांमधून त्या क्षेत्राची माहिती मिळते. काही पतिचरित्रांमधूनही विशिष्ट उद्योगांचे गमक समजते.

[शांता आपटे सिनेमासृष्टीत वावरल्या. त्यांनी 'जाऊ मी सिनेमात ?' मध्ये स्वतःच्या अनुभवांवरून सिनेमासृष्टीचे हत्तीचे खाण्याचे दात निराळे आणि दाखवावयाचे दात निराळे हे रूप उकलून दाखविले आहे. सिनेसृष्टीच्या बाह्य झगझगाटाला भुलून जाणाऱ्या भोळ्याभावड्या जीवांना वाचविण्याचा प्रयत्न केला आहे.] एकदा सिनेमासृष्टीत प्रवेश केलेली स्त्री पतिव्रता राहूच शकत नाही असे हंसा वाडकर ठामपणे सांगतात. " ... या लाईनमध्ये कुठलीही स्त्री आणा, अगदी सती–सावित्रीसारख्या पतिव्रतेला देखील आणा ती आहे तशी राहूच शकत नाही. पातिव्रत्य, घरगुती वातावरण आणि ही लाईन कधी एकत्र येऊच शकणार नाही हा स्वानुभव आहे. ती म्हणत असेल की, होय मी अजूनही शुद्ध आहे तर ते मला पटत नाही. ती शुद्ध थाप आहे. ती स्वतःला फसवते आहे अन् लोकांना सुद्धा. या क्षेत्रामध्ये क्षणाक्षणाला एवढे मोह तुमच्याभोवती जाळी टाकत असतात की तुम्ही त्यातून निसटूच शकत नाही." (पृ. ११४–११५) हे कठोर वास्तव हंसाबाईंनी सांगितले आहे. रोहिणी भाटयांनी 'माझी नृत्यसाधना 'मध्ये भारतीय नृत्यकलेची व नृत्यकारांची माहिती करून देऊन नृत्यकलेचे महत्त्व पटविले आहे.

कमलाबाई देशपांडे, सुधाताई अत्रे, गंगूताई पटवर्धन यांनी शैक्षणिक क्षेत्रातील आपले अनुभव सांगून या क्षेत्रातील यशस्वितेचे गमक आपल्या कर्तृत्वाने उलगडून दाखविले आहे.

गोदावरी परुळेकरांनी माणसाला 'माणूस' म्हणून जागे करण्याची ताकद स्त्री-मध्ये आहे हे स्वतःच्या कर्तृत्वाने पटवून दिले नि त्या निमित्ताने अमोघ स्त्री-शक्तीचा परिचय करून दिला आहे.

पार्वतीबाई आठवले, आनंदीबाई कर्वे, गिरिजाबाई केळकर यांनी समाज-सुधारणा कशा व कोणत्याप्रकारे केल्या जाऊ शकतात याचे पाठ आपल्या आत्म-चरित्रांतून दिले आहेत. 'या सदाशिव', 'माझा नंदादीप' या पतिचरित्रांत निरलसपणे तन, मन, धन ओतून कष्ट केल्याने यश मिळते हे धंद्याचे गमक सांगितले आहे.

अशी विविध क्षेत्रांना पोषक, मार्गदर्शक माहिती वरील आत्मचरित्रांतून मिळते. "आत्मचरित्रांतील विचार-अनुभव आपल्या धंद्याला उपयोगी पडतात."[16] हे ना. रा. पाटकर यांचे मत वरील विधानाला पुष्टी देणारे आहे.

**आत्मचरित्रांचे वाङ्मयीन मूल्य**

ज्यातून मानवी आकांक्षांची तृप्ती होते त्याला मूल्य असे म्हटले जाते. ज्यामुळे वाङमयीन आनंद लाभतो ती वाङमयीन मूल्ये होत. या दृष्टीने 'सत्यम् शिवम् सुंदरम्'मधील 'सुंदरम्'चा उल्लेख केला जातो. परंतु वास्तवता, हित-कारिता, औचित्य, सूचकता व संयम या सर्वांखेरीज वाङमयीन सौंदर्य पूर्णतेला जात नाही. म्हणजे 'सुंदरम्' बरोबरच 'सत्यं, शिवं' ही मूल्येही अपरिहार्य आहेत. शैलीसमीक्षेच्या आधाराने ही आत्मचरित्रे तपासली तर- स्त्रियांच्या अनुभूतीची तीव्रता शब्दरूप घेते तेव्हा अमूर्त ते मूर्त झालेले दिसते. साधेपणा, सरलता, प्रासादिकता, उत्स्फूर्तता, अल्पाक्षरत्व ही वाङमयीन मूल्ये हाती येतात. अनुभवाच्या उत्कटतेनुसार शैली भिन्न भिन्न रूप घेताना दिसते.

काम कसंही केलं, कोणतंही केलं तरी पतिराज, सासूबाई, जाऊबाई, दीर थोडक्यात म्हणजे घरातील सर्वांचा ठपका ठरलेलाच. केलं तर का केलं आणि नाही केलं तर का नाही केलं अशी सर्वांची न संपणारी भुणभूण सुरूच ! तेव्हा आपला विटलेला, कंटाळलेला, त्रासलेला जीव सरोजिनीबाई वाचकांपुढे ठेवतात. "...जीवनातला सारा रस आटून जाऊन नुसतं फोलपट उरलं होतं कर्मयोग्याचं ! कर्म करीत राह्यचं, फळाची आशा धरायची नाही."(१८२) जाचाला कंटाळलेल्या सरोजिनींचा अनुभव येथे कलात्मक सचोटीतून उतरला आहे. या ठिकाणी अनुभव शब्दबद्ध करण्यास जीवनातील नित्य व्यवहारासाठी वापरले जाणारे शब्दभांडार उपयोगी पडले. भाषा सजविण्यासाठी केली जाणारी कोणतीही कृत्रिम खटपट येथे झालेली नाही. अनुभवाची उत्कटता असल्याशिवाय हे साधत नाही. या सहज लेख-

---

[16] ना. रा. पाटकर, आत्मचरित्रे एक वाङमयप्रकार व मराठी आत्मचरित्रे (अप्रकाशित प्रबंध), मुंबई विद्यापीठ, मुंबई, १९६६, पृ. ६

नात–बोलायची भाषा वेगळी व लिहायची भाषा वेगळी हा भेद फारसा आढळत नाही. म्हणूनच लक्ष्मीबाई टिळक, "मला नवल वाटते ते मी टिळकांना कशी पसंत पडली ह्याचे. माझे रूप, रंग अगदी बेताचेच होते; बाकी नाक डोळे जरी रेखीव नव्हते तरी ते होते व अगदी जागच्या जागी होते." (स्मृतिचित्रे भाग १, पृ. १०) असे बेधडकपणे लिहून जातात.

सहजतेला प्रांतिक शब्दांचा वगैरे जाच होत नाही. मराठवाड्यात वापरले जाणारे अहल्येचे 'आयलू' (अश्वत्थाची फुले) हे अशिक्षित बायकांच्या तोंडचे रूप नित्याच्या सहवासाने प्रमिलाबाईंच्या जिभेवर सहज रुळून जाते आणि त्या 'आयलू'च लिहून जातात. आपण काही चुकत आहोत हा विचारही त्यांच्या मनाला शिवत नाही. बडोदा संस्थानात मऊ भातासाठी वापरला जाणारा 'आटवल' (द्रौपदीची थाळी) हा शब्द गिरिजाबाई केळकर बिनधोकपणे वापरतात. कोकणात गुरांच्या पाणी पिण्याच्या दगडी हौदासाठी वापरला जाणारा 'दोणी' (माझे पुराण) हा शब्द लिहिताना बाया ग्रांथिक शब्दासाठी अडून बसलेली नाही. जमाखर्चासाठी 'बोटखत' (आमच्या आयुष्यातील काही आठवणी) हा पुणेरी शब्द रमाबाई सर्रास वापरतात. सांगलीकडे 'उत्साह' या शब्दासाठी वापरला जाणारा 'इसाळा' (स्मृतितरंग) हा शब्द अन्नपूर्णाबाई सहजतेने लिहून जातात. बादलीचे सांगलीत प्रचारात असलेले 'बालडी' हे नाव त्यांना गैर वाटत नाही. 'हुकूम निघणे' यासाठी पुण्याकडे प्रचलित असलेला 'बूट निघणे' (चाकोरीबाहेर) असा वाक्प्रयोग गगूबाई पटवर्धन बोलण्याच्या सरावाने लिहितात. चिरण्यासाठी वापरला जाणारा 'वानणे' (वेचलेले मणी) हा नागपुरी बोलीतील शब्द रमाबाई केदार नेहमीच्या सवयीने वापरतात. विवेचनाच्या ओघात;

"डोंगरी उपर दावा लागत है
खिडकीमें पडे अंजोर रे
सगाभाई हमरे ले लेहो जोहार रे" (४३)

असा आपल्या छत्तीसगडी बोलीचा त्यांनी परिचय करून दिला आहे. तर सांगण्याच्या ओघात आईच्या तोंडचे बोल "दुरग तू ललेच्या लग्नाक यो हां. शेवटलं कार्य असा." (स्वरवंदना, पृ. ११२) जसेच्या तसे घालून ज्योत्स्नाबाईंनी आईची इच्छा तिच्याच शब्दांत व्यक्त केली आहे. आनंदीबाई शिर्के यांनी आपल्या सासूचा संताप "मोप बोललीव ! मोप ! ऐकताय मी मघाधरनं. नखाएवढ्या पोरीला काय सांगताय." (सांजवात, पृ. २६७) जसाच्यातसा लिहिण्याचीही जात अशीच आहे.

पार्वतीबाई आठवले भाषणाचे वर्णन करतात, "भाषण अगदी झणझणीत झालं" (माझी कहाणी) मी गप्प बसणारी नव्हते. हे बाया शब्दात सांगते–

"मीही चांगली खमंग होते." (माझे पुराण, पृ. ५०) पार्वतीबाईंचा नवरा अनुरूप नसल्याने बायका त्यांच्या आईला म्हणतात, "आपली मुलगी अशा ठिकाणी वैरलीत." (माझी कहाणी, पृ. ५) स्वतःच्या गोऱ्यापान रूपाला उषाबाई डांगे यांनी धुतल्या तांदळाची (पण ऐकतं कोण, पृ. ७) उपमा दिली आहे. सरोजिनी शारंगपाणी सांगून जातात, "माझी सासू म्हणजे निव्वळ आग." (दुर्दैवाशी दोन हात) डब्याचे झाकण चटकण उघडावे तसे रमाबाई केदार केदारसाहेबांच्या झालेल्या झोपेचे वर्णन करतात. "त्यांची झोप उघडली" (वेचलेले मणी, पृ. १०८) या ठिकाणी स्वयंपाकघरातील शब्द वापरून साध्या निवेदनात परिणामकारकता साधली आहे. कधी स्वतःची अवस्था सांगण्यास रोजची कार्यक्षेत्रे या सरळ शैलीने निवडलेली दिसतात. संस्थेचा चालक गेल्यावर संस्थेची अवस्था कशी झाली हे सांगण्यास शब्दांची शोधाशोध न करता पार्वतीबाई लिहित्या झाल्या— "संस्थेस वैधव्य आलं." (माझी कहाणी, पृ. १९) वैधव्याच्या कळा पार्वतीबाईंनी स्वतः भोगलेल्या आहेत. त्यामुळे बिनाआसऱ्याची संस्थेची अवस्था त्यांना नेमकी हेरता आली.

आपले तीव्रतर अनुभव वाचकांपर्यंत पोचविण्यास कधीकधी अलंकारांची मदत होताना दिसते. बाया कर्वे लिहितात, "पंडिता रमाबाईंचा उपदेश मी टिकलीसारखा गोंदून ठेवला." (माझे पुराण, पृ, ३५) आईच्या प्रेमाचे उषाबाई डांगे वर्णन करतात, "ऊन वाऱ्याच्या माऱ्याने सुकल्यानंतरही सुगंध दरवळणाऱ्या बकुळीच्या फुलाप्रमाणे तिचे प्रेम होते. इतक्या मैलांवरही तिच्या प्रेमाचा सुगंध मला धीर देत होता." (पण ऐकतं कोण ?, पृ. २३) डोक्यात माळली जाणारी बकुल फुलांची माळ, त्याच्या निरीक्षणाने आलेला अनुभव आईच्या प्रेमाला चपखल उपमा देण्यास कारणीभूत ठरलेला दिसतो. पद्मश्री पदवीदानाच्या प्रसंगीच्या सभागृहाचं वर्णन सुमतीताई करतात, "मूळचंच सुंदर सभागृह आज विशेषच सजवलेलं. नववधूप्रमाणे त्याचं मुखकमल तेजःपुंज बनलेलं." (हे गीत जीवनाचे !, पृ. १) सासरच्या मंडळीकडून मनासारखं प्रेम मिळून, झालेले नववधूचे तेजाळ मुखकमल सभागृहाचे वर्णन करताना सुमतीबाईंना आठवले.

जो अनुभव वर्णन, निवेदन, स्पष्टीकरण, विवेचन, निर्देश यांनी स्पष्ट होऊ शकत नाही तेथे अनुभव आकलन सुलभ करण्यास प्रतिमांचा आधार घेतलेला दिसतो. सुशीलाबाई आठवले लिहितात—

> "दवबिंदुंनो क्षणैक चमकुनी सांगा लुप्त कुठे होता ।
> क्षणभंगुरता विश्वाची या सकलांना दाखविता ।"

(आंब्याचा टाळा, पृ. १४८)

भौतिक जगाचे क्षणजीवित्व सुशीलाबाईंनी 'दवबिंदू' या प्रतीकाच्या आधारे स्पष्ट केले आहे. मानवी जीवनातील सुखदु:खांचे चढउतार 'पुनव' आणि 'आवस' यांचा आधार घेऊन, "कधी पुनव उजळे कधी आवस काजळे" ( स्मरण साखळी ) असे कमलाबाई देशपांड्यांनी स्पष्ट केले आहेत.

एखाद्या व्यक्तीच्या स्वभावातील बारीकसारीक छटा टिपायच्या, निरीक्षणाच्या साह्याने त्यांचे सांधे जुळवून घ्यायचे आणि ते व्यक्तिमत्त्व हाडामांसाचे वाटेल असे जिवंत करायचे ही एक या साध्या निवेदनाची लकब. घरी राहणाऱ्या मुलाची चूक माधवरावांना जेवण होण्यापूर्वी सांगू नये हे लहान वयामुळे म्हणा किंवा या विचाराचे भान न राहून म्हणा रमाबाईंच्या लक्षात येत नाही. रमाबाई माधवरावांना त्यांची चूक सांगून टाकतात. तेव्हा 'वन्स' कडाडतात, "हीच काय हिताची आहे ? आम्ही काय कोणीच नाही ? कानामागून आली अन् तिखट झाली ?" (आमच्या आयुष्यातील काही आठवणी, पृ. १०४) वन्सचा जमदग्नीचा अवतार बारीकसारीक छटांसह रमाबाईंनी किती ताकदीने रेखाटला आहे. वन्सची भडकलेली आकृती चटकन डोळ्यांसमोर उभी राहते. लक्ष्मीबाई टिळक व्यक्तिचित्रे उभी करण्यास, चेहरेपट्टी, मन यांचा कधी आधार घेत नाहीत. तर बोलणे व कृती यांच्या आधारे त्या आपल्या व्यक्तिरेखांत प्राण भरतात. भुकेने व्याकूळ झालेल्या लक्ष्मीबाईंना व दत्तूला प्रेमाने फळे खाऊ घालणारी प्रेमा महारीण लक्ष्मीबाईंनी, "काय करू बाई ? तुम्हाला आमच्या हातचे चालत नाही. नाहीतर मुलाला मी जेवू घातले असते." ( स्मृतिचित्रे, भाग १, पृ. ११९ ) तिच्याच तोंडचे शब्द देऊन उभी केली आहे. यासारखी कितीतरी उदाहरणे 'स्मृतिचित्रां'त सापडतात. काही स्त्रिया चेहऱ्यावरील बारीकसारीक हावभावातून चित्र रेखाटतात. ज्योत्स्नाबाई आपल्या मानलेल्या भावाचे चित्र रेखाटतात, "त्यांची ती दशा पाहून मला रडूच कोसळले, मला रडताना पाहून तो हसला. विलक्षण विचित्र हसला. ते त्याचं हसणं माझं हृदय चरचर कापीत गेलं." (स्वरवंदना, पृ. १३९) दादूच्या चमत्कारिक हसण्याच्या आधारे ज्योत्स्नाबाईंनी दादूची व्यक्तिरेखा जिवंत केली आहे.

वेणूबाई आजरेकरांच्या लेखणीने उभे केलेले हे स्वत:चे करुणचित्र–बहिणीचा कपडा काढण्याच्या निमित्ताने पाण्यात उतरलेला काशीनाथ पाण्यात बुडतो तेव्हा, "... तो बुडाला ... पाण्यावर आला न आला तोच तळाशी गेला ... कोणासच काय करावे ते सुचेना. सर्व घाबरून गेलो. ... आरडाओरडा करून माणसे गोळा केली व काशीनाथला एकदाचे बाहेर काढले ... मनाची तळमळ कधीच शांत झाली नाही व पुढेही होणार नाही. सर्वत्र अंधार झाला." (माझा नाना, पृ. १५–१६) असे प्रसंगाधारे काढून करुण रसाची प्रतीती आणून दिली

आहे. " एखादी व्यक्ती, एखादा प्रसंग किंवा एखादे दृश्य व त्यामुळे उद्भूत झालेले मनोविकार यांचे सूचक शब्दांत परिणामकारक रीतीने काढलेले चित्र ते शब्दचित्र "[17] ही डॉ. अ. ना. देशपांड्यांची शब्दचित्राची व्याख्या उत्कटतेने आठवावी अशी ही शब्दचित्रे उतरलेली आहेत.

स्त्रीचे विनोदाशी फारसे सख्य नसले तरी एखाद दुसऱ्यावेळी तिला विनोदाची लटक येते. नि टोकदार अनुभूती उचित अशा विनोदातून दृग्गोचर होते. " कोठेही जाण्याचे झाले की सारे सामान आवरून, पेट्यांत भरून त्यावर माझ्या नावाचे सील करून मी ठेवत असे. कारण नाहीतर टिळक सर्व सामान वाटून टाकीत. अर्थात सीलबंद सामान त्यांच्या तडाख्यातून वाचे असे नाही. बहुतकरून एखादे गाव सोडले म्हणजे माझी व त्या सामानाची गाठ पडत नसे. किल्ल्यांची मात्र मी नेहमी धनीण असे." (स्मृतिचित्रे, भाग १, पृ. १७२) लक्ष्मीबाईंनी या प्रसंगातून विनोद साधला आहे. 'निरागस विनोद'[18] असे आचार्य अत्र्यांनी लक्ष्मीबाईंच्या विनोदाचे वर्णन केले आहे. तर लक्ष्मीबाईंइतका अकृत्रिम विनोद शोधूनही सापडणे कठीण झाले आहे.".[19] असे सरोजिनीबाईंनी आपले लक्ष्मीबाईंच्या विनोदासंबंधी मत व्यक्त केले आहे.

ज्या घरात पाऊल न टाकण्याचा निर्धार केला होता त्या घरात कायमचा पाय रोवून बसावे, सोने-नाणे धुऊन घेण्याऱ्या पित्याच्या कन्येने भंगिणीच्या हातचे खाण्याइतके ओवळे बनावे अशा विविध नाट्यपूर्ण प्रसंगांनी लक्ष्मीबाईंचे जीवन समृद्ध झालेले आहे. लक्ष्मीबाईंच्या लेखणीने ते नाट्य वाचकांपर्यंत पोचविले आहे. उदाहरणार्थ, लक्ष्मीबाई व मामंजी यांच्या पुढील संवादातील हे नाट्य–" ही शाई कोणी सांडली."

" मला नाही ठाऊक."
" हे पाऊल कोणाचे ? ठेव तेथे पाऊल. सांग शाई सांडलीस की नाही ?"
" मी नाही सांडली."
" तूच शाई सांडलीस. ही सरकारी शाई होती. तुला भरून द्यावी लागेल."
" मी कशी भरून देऊ ?"
" दळण दळ मोलाचे !" (स्मृतिचित्रे भाग १, पृ. ४९)

---

[17] अ. ना. देशपांडे, आधुनिक मराठी वाङमयाचा इतिहास, भा. दु., पुणे, १९६५, पृ. ५९२

[18] लक्ष्मीबाई टिळक, स्मृतिचित्रे, भाग चवथा, अभिनव आवृत्ती, नाशिक, १९७४, पृ. ११६

[19] सरोजिनी वैद्य, माती आणि मूर्ती, मुंबई, १९७५, पृ. ९८

असे लक्ष्मीबाईंनी साधले आहे. अभिव्यक्तीस घेतलेला नाटचाचा आधार यावरून समजतो.

प्रासादिक लिखाणात आशय नि अभिव्यक्तीची कधी फारकत होताना दिसत नाही. मुंबईच्या पानाफुलाविरहित रस्त्याचे वर्णन ज्योत्स्नाबाई 'निर्जीव रस्ता' (स्वरवंदना) असे करतात. हिवाळचातील सूर्याचे ऊन हवेहवेसे वाटते. कोवळे वाटते. उन्हाळी सूर्याची प्रखरता त्यात जाणवत नाही. प्रमिलाबाई भालेराव 'बालसूर्य' ( अश्वत्थाची फुले ) म्हणून हिवाळचातील सूर्याला अभिव्यक्त करतात. माधवरावांचे अभ्यासात लक्ष लागत नाही. याचे वर्णन लीलाबाई करतात, "त्यांचे अभ्यासावर चित्त जडेना." (आमची अकरा वर्षे, पृ. ११) आनंदीबाई शिर्के लिहितात, "दादा घरात नाहीत असे पाहून पानांचा बोकणा भरलाच तर न बोलताच जीभ व तोंड चहाडी करीत." (सांजवात, पृ. २७) चोरी पकडली गेल्याची ही भीती सुंदर अभिव्यक्त झाली आहे. नकळत्या वयाचे वर्णन 'माझे हे अर्धेकच्चे लहान वय' (सांजवात, पृ. ४९) असे आनंदीबाई करतात. स्त्रियांनी प्रसंगानुरूप, "दुसऱ्याचं लेणं अन् लाजिरवाणं" (माझे पुराण, पृ. १३), "गेले ओठांबाहेर ते गेले कोटाबाहेर" (माझे पुराण, पृ. २४), "कर नाही तेथे डर कशाला ?" (माझे पुराण), "खायला काळ भुईला भार" (स्मृतिचित्रे, भाग ३, पृ. ६), "लाच कधी घेऊ नये व नक्षीला भुलू नये" (सांजवात, पृ. २०) यासारख्या अनेक म्हणी वापरलेल्या आढळतात.

पतीचे नाव घेतले तर त्याचे आयुष्य कमी होते या भावनेने पछाडलेले; पारंपरिक विचारांवर पोसले गेलेले स्त्री–मन वेगळीच भाषा वापरते. अत्रे आपल्या 'कऱ्हेचे पाणी' या आत्मचरित्रात सुधाताईंचा उल्लेख 'सुधा' असा सहजतेने करतात. गंगूबाईंचा उल्लेख पटवर्धन 'माझा विरंगुळा' मध्ये 'गंगू' असा करतात पण "'स्वत:' (आमच्या आयुष्यातील काही आठवणी), 'पुरुष' (माझी कहाणी), 'कन्हया' (स्मृतितरंग), 'इकडची स्वारी–तिकडची स्वारी' (सामान्य), हे आले ते म्हणाले (सामान्य), कर्वे सांगत होते (माझे पुराण), टिळक बोलत होते (स्मृतिचित्रे), शारंगपाणी म्हणाले (दुर्दैवाशी दोन हात), 'देव' (स्मरणमाला), 'साहेब' हे अलीकडे नवऱ्यांसाठी वापरले जाणारे संबोधन (या सदाशिव) इत्यादी शब्दांनी नामनिर्देश करणारी स्त्रियांची रीत निवेदनाचे एक वेगळे रूप दाखवते तर कधी–गंभीरपणे अनेक जीवनतत्त्वे, सामान्य विधाने, जीवन सत्ये ती मांडून जाते.

"कुठले का बंधन होईला करकचून आवळले जाते त्याच क्षणी कोठून तरी ते काचायला सुरुवात होते." (निशिगंध, पृ. ७३) मृणालिनीबाईंनी बंधनाच्या अतिशयोक्तीची फलश्रुती याठिकाणी सांगितली आहे. सगळे काही बेतबात हवे.

अती तेथे माती नको. हेच मृणालिनीबाईंची लेखणी या ठिकाणी सुचवून जाते. " घराचा खांब उभा करणारी स्त्रीच असते आणि तीच जर जाग्यावर नसली तर घराची वाताहत होते. " (गोदातरंग, पृ. ९) स्त्रीचे घरातील महत्त्वपूर्ण स्थान सुधाताईंनी याठिकाणी स्पष्ट केले आहे. " संसारात पडल्याने स्त्रीचे जीवन आकसते." (स्नेहांकिता, पृ. २३) हे व्यावहारिक सत्य स्व-निरीक्षणाने स्नेहप्रभा प्रधान सांगतात. अशी अनेक उदाहरणे दाखविता येतील.

वरील विवेचनावरून ही शैली बोलणे तसे लिहिणे, कधी लिहिताना स्वयं-पाक खोलीचा आधार तर केव्हा अलंकाराचा आधार घेताना दिसते. कधी मनो-विकारांच्या साह्याने, कधी चेहरेपट्टीच्या मापनाने, केव्हा कृती-उक्तीच्या निरीक्षणाने व्यक्तिचित्रे रेखाटलेली आढळतात. ज्या ठिकाणी वर्णन, विवेचन, निर्देश, स्पष्टीकरण यांनी विषय सुबोध होत नाही त्या ठिकाणी प्रतीमांचा आधार घेतलेला दिसतो. प्रसंग आपल्या सरळ, साध्या रचनेने जिवंत केले आहेत. केव्हा केव्हा विनोदाचा अंगीकार तर कधी नाटयप्रसंगात रस घेतलेला आढळतो. क्वचित म्हणींचा वापर करून अल्पाक्षरत्व साधलेले दिसते. नवऱ्याचा नामनिर्देश करण्याची तिची तऱ्हा निराळी आहे. कधी कधी तिचे रूप चिंतनशील योग्यासारखे धीरगंभीर दिसते. या अवस्थेत मानवी जीवनसत्ये ती बोलून जाते. आपला तीव्रतर अनुभव टिप-ण्याचे तिचे हे मार्ग आहेत. नि ही त्याची काही उदाहरणे. यावरून या काळातील सगळीच्या सगळी आत्मचरित्रे कलात्मक पातळीवर पोचतात असा सरधोपट निष्कर्ष काढता येत नाही. 'माझे पुराण,' 'स्मृतिचित्रे,' 'सांजवात,' 'स्वरवंदना,' ' निशिगंध,' ' हे गीत जीवनाचे, ' ' गेले ते दिवस, ' ' सांगत्ये ऐका,' ' दुर्दैवाशी ' दोन हात ' ही आत्मचरित्रे कलात्मक उतरली आहेत. यातील काही अक्षर ठरावीत अशी आहेत.

**अक्षर वाङ्मयाच्या दृष्टिकोणातून**

वाङमयीन अक्षरत्वाच्या दृष्टीने विचार केल्यास चिरंतन मानवी मूल्ये ज्या कलाकृतीत चित्रिली जातात ती ' अक्षर ' कलाकृती मानली जाते. आत्मचरित्र म्हणजे मानवी-जीवनाचे चित्रण होय. मानवी जीवन ' अक्षर ' आहे. त्यामुळे आत्मचरित्र हा वाङमय-प्रकार ' अक्षर ' होईल असे वाटते. स्त्री आत्मचरित्रांच्या दृष्टीने विचार केल्यास-

सुष्ट आणि दुष्ट प्रवृत्ती, सुजनता आणि दुर्जनता या चिरंतन मानवी प्रवृत्ती आहेत. एकमेकांशी वाईट वागायला काही फार मोठे कारण असावे लागते असे नाही तर कुठल्याही क्षुल्लक कारणांवरून ही मानवी झुंज सुरू होते. कधी जाति-भेदाचे कारण याला पुरेसे होते. केव्हा सासू-सून या नात्याचा छत्तीसचा आकडा याला कारणीभूत ठरतो. समाज बदलला असे म्हटले जाते, पण समाज बदलला

तरी माणसाच्या या आदिम प्रवृत्तींमुळे हे सर्व शेवटपर्यंत असेच राहणार आहे. लक्ष्मीबाई टिळकांची 'स्मृतिचित्रे,' सत्यभामाबाई सुखात्मे यांचे 'गेले ते दिवस,' आनंदीबाई शिर्क्यांचे 'सांजवात,' सरोजिनी शारंगपाणी यांचे 'दुर्दैवाशी दोन हात' व हंसा वाडकर यांचे 'सांगत्ये ऐका' ही आत्मचरित्रे या दृष्टीने लक्षणीय वाटतात.

दुसऱ्यांचे दुःख पाहून कळवळणे, त्याला मदतीचा हात देण्यास पुढे सरणे, कोलमडणाऱ्याला सावरणे, पडलेल्याला उठविणे, माणसाकडे माणुसकीच्या दृष्टीने पाहणे ही मानवी सुजनताही 'अक्षर' आहे. हे मानवी मूल्य 'माझे पुराण,' 'गीत जीवनाचे'मध्ये उकलले आहे. या कलाकृती, मांडणी, भाषा या दृष्टीनेही कलात्मक वाटतात. त्यामुळे त्या 'अक्षर' ठरतील असे म्हटल्यास वावगे होऊ नये.

**साम्यवादी व गांधीवादी जीवनदृष्टी**

'जेव्हा माणूस जागा होतो' आणि 'पण ऐकतं कोण?' ही या कालखंडातील साम्यवादी आत्मचरित्रे. साम्यवाद ही कार्ल मार्क्सची एक जीवन पद्धती आहे. आर्थिक साम्यावर आधारलेली–शोषणमुक्त वर्गविहीनसमाजरचना हे या सरणीमागील मूळ तत्त्व. कलेचा संबंध मार्क्सच्या प्रगल्भ मानवतावादाशी आहे. गोदावरी परुळेकर व उषा डांगे शोषित वारली व कामगार यांच्यासाठी मार्क्सच्या तत्त्वानुसार झगडल्या आहेत. एक वेगळा जीवन दृष्टिकोण या आत्मचरित्रातून प्रकटला आहे.

मृणालिनी देसाई व स्वातंत्र्य लढ्यात हिरीरीने भाग घेणाऱ्या इतर स्त्रियांकडून गांधीवादी जीवनदृष्टीचा बोध होतो.

**आत्मचरित्रातील साहित्यविषयक परिचय**

माधवरावांच्या कवितांच्या जन्मकथा 'आमची अकरा वर्षे' मधून कळतात. बालकवींची घरगुती माहिती 'स्मृतिचित्रा'तील 'बालकवी ठोंबऱ्यांच्या आठवणी' या प्रकरणात वाचायला मिळते. मराठी लेखक आपल्या लेखणीच्या जीवावर स्वतःचे पोट भरू शकत नाही. मराठी लेखकाची ही दयनीय अवस्था–अंगठी गहाण ठेवणाऱ्या ना. ह. आपट्यांच्या उदाहरणावरून 'दुर्दैवाशी दोन हात'मध्ये सांगितली जाते.

**खाजगी पत्रलेखनासाठी व्यवहारी अपूर्णांकाची परिभाषा**

बायकोला लिहिलेली पत्रं चुकून कुणा तिऱ्हाइताच्या हातात पडली तर त्याला ती कळू नयेत म्हणून यादवरावांनी आपली पत्रे व्यवहारी अपूर्णांकात लिहिली. 'क' वर्ग 'च' वर्ग हे सात वर्ग पूर्णांक. त्या वर्गातलं जे अक्षर लिहायचं असेल ते छेदात लिहायचे आणि काना, मात्रा अंशात. शब्द पूर्ण झाला म्हणजे उणे (–) चिन्ह. एका शब्दातल्या दोन अक्षरांमध्ये धन (+) चिन्ह. स्वल्पविराम

द्यायचा असेल तर 'चे' चिन्ह, पूर्णविराम म्हणजे कंस. ( ) उदाहरणार्थ– ५ ५/४ − ५ ५/८ + ५ ३/१ + ४/१ + ७ ३/६ + ४ ५/१ − २/१ + ४ १/२ − ६ ३/१ + ६ ४/१ + १ १/१ + ६ १/२ + २ १/१ − ६१४ ४/२ + ७६३ ३/७ + ६ २/१ + ६ ३/२ − ६ १/७ + ४/१ + ४ ५/१ (मी मुंबईहून लवकरच ग्वाल्हेरला येईन, पृ. १०–११) या कल्पक आणि नावीन्यपूर्ण पत्रलेखन-पद्धतीचा बोध 'या सदाशिव' मधून होतो.

या वैशिष्टयांवरून "आत्मचरित्रे या दालनात स्त्रियांनी अविस्मरणीय कामगिरी बजावली आहे."[20] असे कमलाबाई टिळक कौतुकाने म्हणतात तर माधव मनोहरांना स्त्रियांची आत्मचरित्रे म्हणजे मराठी वाङमयाची "अम्लान भूषणे"[21] वाटतात. या मतांना बळकटी आणणारे, स्त्रियांनी आत्मचरित्रे लिहून मराठी वाङमयात अतिशय मोलाची भर घातली आहे असे बहुतेक आत्मचरित्र-कार स्त्रियांचे व या वाङमय–प्रकाराच्या अभ्यासकांचे म्हणणे असल्याचे त्यांच्या पत्रांवरून कळते. ही मते पटतात. या क्षेत्रात पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांचीच काम-गिरी विशेष उल्लेखनीय आहे. 'माझे पुराण,' 'स्मृतिचित्रे', 'गेले ते दिवस' या आत्मचरित्रांबरोबरच १९७० ते १९७५ या काळातील 'सांगत्ये ऐका,' 'हे गीत जीवनाचे,' 'सांजवात,' 'दुर्दैवाशी दोन हात' ही आत्मचरित्रे अक्षर ठरावी इतकी उत्कृष्ट उतरली आहेत. म्हणून पूर्वीची आत्मचरित्रे चांगली होती व आताची वाईट आहेत असा रोखठोख निष्कर्ष आपल्याला काढता येत नाही. चांगले आत्मचरित्र लिहिणे काळावर अवलंबून नाही तर व्यक्तीवरच आहे हेच खरे !

**उपसंहार**

'स्व' अस्तित्व टिकवण्याच्या प्रयत्नातून मूर्तिकला, शिलालेख, मठ, मंदिरे, स्तंभ, कबरस्थाने, छायाचित्रे या आंशिक चरित्राबरोबरच आत्मचरित्राचा जन्म झाला असावा. जन्मापासून–विठ्ठलप्राप्तीपर्यंत सर्व प्रसंग नामदेवांच्या अभंगांत ठळकपणे चित्रित झाल्याने नामदेव हे मराठीतील पहिले आत्मचरित्रकार मानले जातात. नामदेवाने पायंडा पाडलेल्या आत्मचरित्र या वाङमय–प्रकाराचा विकास तुकारामांच्या अभंगरचनेत दिसून येतो. संतमंडळींनी लिहिलेल्या आत्मचरित्रांचे घाट सारखे आहेत. अभंग हे त्यांच्या आत्माविष्काराचे माध्यम आहे. त्यांनी आपली सुखदुःखे विठोबाला आत्मीयतेने सांगितली आहेत. ही आत्मचरित्रे आत्मचरित्र हा वाङमय–प्रकार डोळ्यांसमोर ठेवून लिहिली गेली नाहीत. 'स्वतःच स्वतःचा गौरव

---

[20] कमलाबाई टिळक, मराठी साहित्यातील स्त्रियांची कामगिरी, भारतीय स्त्री, संपा. श्री. ना. बनहट्टी, मो. ज्ञा. शहाणे, पुणे, १९६७, पृ. १७४

[21] माधव मनोहर, स्मृतिचित्राशी नाते सांगणारे आत्मचरित्र, लोकमत (रविवारची पुरवणी), नागपूर दि. २७–८–७७, पृ. ६

करू नये ' हे भारतीय संस्कृतीने बाळकडू पाजलेले असल्याने आत्मचरित्र हा वाङ्मय-प्रकार प्राचीनकाळी आपल्याकडे रुजला नसावा. इंग्रजी वाङ्मयाच्या संपर्कानंतरच या वाङ्मय-प्रकाराचा खरा विकास आपल्याकडे झालेला दिसतो. १८७१ मध्ये लिहिले गेलेले दादोबा पांडुरंग यांचे आत्मचरित्र हे मराठीतील रूढ अर्थाने पहिले आत्मचरित्र म्हणून मराठी वाङ्मयाच्या इतिहासाने मान्य केले आहे. १८७१ ते १९७५ पर्यंतच्या आत्मचरित्रांत बोधवादी दृष्टिकोणापासून आत्मशोध घेण्यापर्यंत आत्मचरित्र या वाङ्मय-प्रकारात बदल होत गेलेला आढळतो.

आत्मचरित्राच्या तंत्रविषयक बाबींचा विचार करताना, " स्वजीवन तटस्थपणे न्याहाळून, त्यातून आवश्यक त्या बाबींची निवड करून त्यांचे प्रांजल निवेदन व कलात्मक मांडणी यातून स्वचित्र रेखाटणे म्हणजे ' आत्मचरित्र ' होय. अशी आत्मचरित्राची व्याख्या समर्पक होईल असे वाटते. आत्मचरित्रे ' स्वान्त:सुखाय ' लिहिली जातात. वेळ जावा, करमणूक व्हावी, आपला पराक्रम दुसऱ्यास सांगून भारावून टाकणे अशी स्वसुखाची अनेक परिमाणे असू शकतात. आपले दु:ख दुसऱ्याला सांगणे, आत्मशोध घेणे, आत्मस्तोत्र गाणे, केल्या कृत्यांचा कबूलीजबाब देणे, आपल्या जीवनापासून दुसऱ्यांना काही बोध होईल या बोधवादी हेतूने, म्हातारपणाची जाणीव झाल्यावर स्वत:चे अस्तित्व टिकवून ठेवण्याच्या उद्देशाने, अशा विविध हेतूंनी आत्मचरित्रे लिहिली गेली आहेत; लिहिली जात आहेत. आत्मचरित्र लिहिण्यास कादंबरीप्रमाणे कल्पनाशक्ती, शास्त्रीय ग्रंथास आवश्यक बुद्धिमत्ता व प्रगाढ व्यासंग, चरित्र व इतिहास लिहिण्यास लागणारे कठोर परिश्रम लागत नाहीत. शिवाय उत्तम कलाकृती निर्माण करण्यास लागणारी समरसता आत्मचरित्राइतकी दुसऱ्या कुठल्याही वाङ्मय-प्रकारात येऊ शकत नाही. म्हणून आत्मचरित्र लिहिणे सोपे वाटू लागते. परंतु सत्यकथन, तटस्थवृत्ती; ' स्व 'ला केंद्रस्थान, घटनांची योग्य निवड, घटनांची कुशल मांडणी, वस्तुस्थितिदर्शक निवेदन या आत्मचरित्रास आवश्यक बाबी आहेत. या आत्मचरित्रास आवश्यक अंगांचा तोल सांभाळल्या जाण्यापेक्षा त्यांचा तोल जाण्याचीच भीती अधिक असते. कारण सत्य सांगणे फार अवघड आहे. सत्य सांगताना, स्मरणशक्तीचे विस्मरण, माणसाचा नैसर्गिक संकोच, आत्मचरित्रकाराची ' स्व ' प्रीती वगैरे अडचणी येतात. जे सांगायचे ते प्रांजळपणे सांगितले तर सत्यकथनाबद्दल साशंकता निर्माण होणार नाही. गुणांबरोबर दोषांचेही यथातथ्य चित्रण झाल्याची वाचकांची खात्री पटते तेव्हा आत्मचरित्रकाराला त्याच्या सत्यप्रियतेबद्दल शाबासकी दिली जाते. तटस्थवृत्तीने ' स्व ' निरीक्षण करून दोष सांगण्यास फार मोठी ताकद असावी लागते. आपल्या चुका जाहीरपणे कबूल करायला सर्व अहंकार बाजूला ठेवावा लागतो. तटस्थवृत्तीने आत्मनिरीक्षण झाले तर आत्मचरित्र आत्मश्लाघा व आत्मसमर्थन या दोषांपासून अलिप्त राहील. आत्मचरित्राचे सौंदर्य

'स्व' दर्शनात साठविलेले असल्याने 'स्व' ला केंद्रस्थान मिळणे अत्यंत आवश्यक आहे. घटना, प्रसंगांची व इतर पात्रांची गर्दी होऊन 'स्व' प्रतिमा बाजूला सारली जाण्याची शक्यता असते. आत्मचरित्र कुठून सुरू करावे व कुठे संपवावे याविषयी आत्मचरित्रकार बंधमुक्त असला तरी आवश्यक त्या घटनांची निवड करायला हवी. आपल्या आयुष्यातील सर्वच घटना आपल्याला महत्त्वपूर्ण वाटत असतात. पण त्या सर्वच घटनांनी व्यक्तिमत्त्व घडविण्यात सारखेच काम केलेले नसते. म्हणून व्यक्तिमत्त्व उभे करण्यास महत्त्वपूर्ण घटनांची निवड करणे आवश्यक ठरते. घटनांची निवड झाल्यावर त्यांची मांडणीही कुशलतेने करता यायला हवी. घट-नांची मांडणी करताना मध्येच एखादी घटना आठवून तिला आत्मचरित्रात अकारण स्थान दिले जाते आणि आत्मचरित्रातील कलामूल्यांची हेळसांड होते.

सर्वसामान्य माणसाला आत्मस्तोत्र गाण्याची हौस असल्याने आत्मचरित्र अवास्तव ठरण्याची शक्यता असते. आत्मचरित्र वास्तव न होण्यामागील ही फार मोठी अडचण आहे.

आत्मचरित्रलेखनातील या संभाव्य अडचणींबरोबरच आत्मचरित्र कोणी लिहावे व केव्हा लिहावे हेही प्रश्न महत्त्वपूर्ण आहेत.

केवळ असामान्य लोकांनीच आत्मचरित्रे लिहून आपले जीवन दीपस्तंभ म्हणून जनतेसमोर ठेवावे असे नाही तर सामान्य लोकांचीही आत्मचरित्रे वाचनीय होऊ शकतात. शेकडा नव्व्याण्णव लोक सामान्य असल्याने सामान्यांचीच आत्म-चरित्रे अधिक लोकप्रिय होऊ शकतील. सर्वसामान्यांना ती विशेष जवळची वाटतील. जीवनाकडे तटस्थवृत्तीने पाहण्याची तयारी झाली की आत्मचरित्र लिहावे, तेच आत्मचरित्र यशस्वी होईल असे वाटते.

दुसऱ्याचे जीवन जाणून घेण्याचे पुरेपूर समाधान आत्मचरित्र हा वाङ्मय-प्रकार देऊ शकतो. गतजीवनाला सुसंगत आकार व अर्थ देण्याचा प्रयत्न आत्म-चरित्रात होत असल्याने बरेचदा वाचकही अंतर्मुख होतो. आत्मशोध करायला लागतो. मानवी जीवनाचा अभ्यास करायला फार मोठे साधन म्हणजे आत्मचरित्र होय. मानसशास्त्राला त्याचा उपयोग होऊ शकतो. तत्कालीन समाजाची सामाजिक, धार्मिक आणि राजकीय परिस्थिती आत्मचरित्रावरून अभ्यासता येते. आत्म-चरित्राची ही महत्त्वपूर्ण वैशिष्टये लक्षात घेऊन आत्मचरित्र या वाङमय-प्रकाराला साहित्यात स्वतंत्र व महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त होत आहे.

स्त्री-वाङमयाच्या दृष्टीने विचार केल्यास सहाव्या-सातव्या शतकातील ओवी वाङमयापासून स्त्री-वाङमयाला सुरुवात झालेली दिसते. सद्यःकाळात स्त्रीने ललित व वैचारिक दोन्ही वाङमय प्रकारात मोलाची कामगिरी करून महत्त्वपूर्ण स्थान मिळवलेले आढळते.

प्राचीन काळात स्त्रीने ओवी हे माध्यम आत्माविष्कारासाठी वापरले. ओवी-नंतर गाणे, उखाणे, कोडी वगैरे माध्यमातून तिने आपल्या सुखदुःखांना उद्गार दिला. यातील आत्माविष्कारामुळे ती आंशिक आत्मचरित्रे वाटतात. स्त्री आत्मचरित्राची सुरुवात जरी या काळापासून झाली नसली तरी स्त्री–आत्मचरित्राची पाळेमुळे येथे सापडू शकतात.

१९१० मध्ये प्रकाशित झालेले ' आमच्या आयुष्यातील काही आठवणी ' हे रमाबाई रानड्यांचे आत्मचरित्र मराठी वाङ्मयाच्या इतिहासाने पहिले स्त्री–आत्मचरित्र म्हणून मान्य केले. परंतु जनाबाईंच्या अभंगांत आलेल्या आत्मचरित्रावरून जनाबाई ही मराठीतील पहिली स्त्री आत्मचरित्रकार मानावी लागते. बहिणाबाईंच्या अभंगांत तिचे आत्मचरित्र जनाबाईंपेक्षा अधिक सविस्तरपणे रेखाटलेले दिसते. त्यामुळे प्राचीन आत्मचरित्रात्मक वाङ्मयाचे स्वरूप बहिणाबाईंच्या आत्मचरित्रावरून नीटपणे अभ्यासता येते. जनाबाई व बहिणाबाई यांनी आत्मचरित्र हा वाङ्मयप्रकार समोर ठेवून आत्मचरित्रे लिहिली नाहीत. परमेश्वराच्या भक्तीतून जन्मलेले ते आत्मगत उद्गार आहेत. परंतु या आत्मगत उद्गारांतून दोघींच्याही व्यक्तिरेखा–जन्म, जीवनकार्य, जीवनध्येय व त्याची प्राप्ती, त्यामुळे झालेला आनंद अशा सर्वांगांनी प्रकट झाल्या आहेत. ' स्व ' रेखाटन हे आत्मचरित्राचे अवतार–कार्य येथे विनासायास साधले गेले आहे. म्हणून जनाबाई व बहिणाबाई यांच्या अभंगातील आत्मगत उद्गार ' आत्मचरित्र ' म्हणून मान्यता पावले आहेत.

१९१० ते १९७५ या काळात एकूण पस्तीस स्त्री–आत्मचरित्रे येतात. घरगुती स्त्रियांची आत्मचरित्रे व इतर क्षेत्रांतील स्त्रियांची आत्मचरित्रे असे त्यांचे ढोबळ दोन गट दिसतात. त्यातील एकोणवीस आत्मचरित्रे घरगुती स्त्रियांची आहेत. त्यातील पुढील नऊ आत्मचरित्रे पतीच्या निमित्ताने लिहिली गेली आहेत. (१) ' आमच्या आयुष्यातील काही आठवणी ' : रमाबाई रानडे, (२) ' स्मृतिचित्रे ' : लक्ष्मीबाई टिळक, (३) ' आमची अकरा वर्षे ' : लीलाबाई पटवर्धन, (४) 'स्मृतितरंग' : अन्नपूर्णा रानडे, (५) ' या सदाशिव ' : इंदिरा भागवत, (६) ' माझा नंदादीप ' : लक्ष्मीबाई पटवर्धन, (७) ' वेचलेले मणी ' : रमाबाई केदार, (८) ' ढळला रे ढळला दिन सखया ' व ' उमटलेली पावले ' : राधाबाई आपटे, (९) ' मीच हे सांगितलं पाहिजे ' : शीलवती केतकर. ही बहुतेक आत्मचरित्रे पतीच्या निधनानंतर त्याची स्मृती जागती राहावी, त्याची अपुरी इच्छा पूर्ण करावी, पतीच्या कर्तृत्वापासून मुलानातवंडांत बोध व्हावा, पतीसंबंधी जनमानसात असलेले गैरसमज दूर व्हावे अशा विविध पतिविषयक दृष्टिकोणांतून लिहिली गेली आहेत. त्यांनी पतिप्रतिमेला प्राधान्य देऊन ' स्व ' प्रतिमा चित्रित केली आहे. रमाबाई रानडे, लीलाबाई पटवर्धन, अन्नपूर्णाबाई रानडे, इंदिरा भागवत, लक्ष्मीबाई,

पटवर्धन, राधाबाई आपटे या सर्व स्त्रिया पतिभक्तीने भारलेल्या आहेत. पतिनिधनानंतर 'परिमल निगालेया पवनापाठी। मागे फूल ओस राहे देठी।' अशी त्यांची अवस्था झाली आहे. एक मंगल व गुणवान व्यक्ती म्हणून त्या पतीकडे पाहतात. पती हाच परमेश्वर असल्याने त्याच्याविरुद्ध तक्रार करणे त्यांच्या मते पाप ठरते. त्या आपल्या व्यथांना शब्दरूप देताना दिसत नाहीत. राधाबाई आपट्यांनी आपणहून आपले अस्तित्व पतीच्या स्वाधीन केले आहे तर इतर स्त्रियांनी पुरुषांनी गाजवलेल्या वर्चस्वाला मनोमन मान्यता दिली आहे. शीलवती केतकर याला अपवाद आहेत. त्यांनी डॉक्टरसाहेबांच्या गुणांचे तोंडभरून कौतुक केले आहे परंतु त्याबरोबरच केतकरांचे दोषही सांगितले आहेत. पतिचित्र रेखाटताना 'स्व' अस्तित्वाचा विसर पडल्याने या स्त्री–प्रतिमा फारच फिक्कट उमटल्या आहेत. लक्ष्मीबाई टिळकांनी मात्र 'स्मृतिचित्रा'त आपले स्वतंत्र अस्तित्व जोपासले आहे. त्यामुळे पतिभक्त लक्ष्मीबाईंबरोबरच स्वतंत्र अस्तित्व असणारी लक्ष्मीबाईंची प्रतिमाही 'स्मृतिचित्रांत' चित्रित झालेली आढळते.

इतर घरगुती स्त्रियांच्या आत्मचरित्रांत, (१) 'माझे पुराण' : आनंदी कर्वे, (२) 'गेले ते दिवस' : सत्यभामाबाई सुखात्मे, (३) 'स्मरणमाला' : जानकी फडणीस, (४) 'अजून चालतेची वाट' : आनंदीबाई विजापुरे, (५) 'आंब्याचा टाळा' : सई आठवले, (६) 'दुर्दैवाशी दोन हात' : सरोजिनी शारंगपाणी, (७) 'पानाआडचे फूल' : आशालता सावे ही आत्मचरित्रे येतात. ही बहुतेक आत्मचरित्रे स्वतःची करमणूक व्हावी, दुसऱ्याला आपल्या जीवनापासून काही उपदेश द्यावा, जगासमोर यावे अशा रूढ हेतूतूनच जन्मलेली आहेत. 'स्व' प्रतिमा सर्व पैलूंसह रेखण्याचा प्रयत्न येथे झाला आहे. या स्त्रिया पांढरपेशा समाजातील आहेत. प्रत्येकीच्या वाट्याला आलेली समाजाची अवस्था जवळपास सारखी आहे. या स्त्रियांचे मुख्य कार्यक्षेत्र म्हणजे त्यांचे घर. घर सांभाळून काही करता आले तर त्या करतात. प्रत्येकीचे घर वेगळे–रीतिभाती वेगळ्या तसेच त्यातून घडत जाणारे प्रत्येकीचे व्यक्तित्वही वेगळे. अनाथ, अपंगांना मदतीचा हात देणे ही बाया कर्वेंची समाजसेवा आहे. सत्यभामाबाई सुखात्म्यांनी मुलांच्या सुखात आपले सुख मानून समाधान मिळवले आहे. जानकी फडणीस आदर्श गृहिणी म्हणून वाचकांसमोर आल्या आहेत. स्वतःच्या जबरदस्त महत्त्वाकांक्षेमुळे आनंदीबाई विजापुऱ्यांनी आपल्या जीवनाचे वाटोळे केले आहे. सई आठवले आपल्या 'आंब्याचा टाळा' या उपाधीने वेगळ्या ठरल्या आहेत. कन्या, प्रेयसी, पत्नी, आई या सर्व भूमिका यशस्वीरीत्या पार पाडल्यावर आशाबाईंनी स्वीकारलेले साधल्यांचे शिष्यत्व त्यांचे निराळेपण दर्शविते. सरोजिनी शारंगपाणी त्यांच्या दुर्दैवामुळे वाचकांच्या हृदयाचा ठाव घेऊन बसल्या आहेत.

'आमचा जीवन प्रवास' : यशोदाबाई जोशी व 'आमचे कृतार्थ सहजीवन' : रूथ हिवाळे या सहचरित्रांत अण्णासाहेब व यशोदाबाई जोशी आणि डॉ. हिवाळे व रूथबाई हिवाळे या प्रतिमा सारख्याच ताकदीने उभ्या केलेल्या असल्याने ही दोन यशस्वी सहचरित्रे वाटतात. 'माझा नाना' हे मुलाच्या स्मृती टिकवण्यासाठी वात्सल्यापोटी लिहिलेले आत्मचरित्र होय. यात नानाच्या चित्रणाला मुख्य व वेणूबाईंच्या चित्रणाला गौणस्थान मिळाले आहे.

इतर क्षेत्रातील स्त्रियांची आत्मचरित्रे एकूण सोळा आहेत. त्यांची क्षेत्रानुसार विभागणी अशी–(१) **शिक्षणक्षेत्र** : यातील आत्मचरित्रे (१) 'स्मरणसाखळी' : कमलाबाई देशपांडे, (२) 'गोदातरंग' : सुधा अत्रे, (३) 'चाकोरीबाहेर' : गंगूबाई पटवर्धन ही आत्मचरित्रे आत्मचरित्रासंबंधी रुळलेल्या प्रेरणांमधूनच लिहिली गेली आहेत. कमलाबाई देशपांडे सोडल्या तर इतर दोघींनी आपले संपूर्ण चित्र काढण्याचा प्रयत्न केला आहे. पण त्यांचे कार्यक्षेत्र असलेल्या शिक्षणक्षेत्रातील प्रतिमाच टिकावू ठरल्या आहेत. तिघींचे मुलींशी वागणे, मुलींच्या कल्याणासाठी सर्वप्रकारे जागृत राहणे सारखेच आहे. **समाजक्षेत्र** : (१) 'माझी कहाणी' : पार्वती आठवले, (२) 'निशिगंध' : मृणालिनी देसाई, (३) 'जेव्हा माणूस जागा होतो' : गोदावरी परुळेकर, (४) 'पण ऐकतं कोण ?' : उषा डांगे, (५) 'हे गीत जीवनाचे' : सुमती शहा, (६) 'अश्वत्थाची फुले' : प्रमिला भालेराव ही या क्षेत्रातील आत्मचरित्रे. बहुतेक रूढ हेतूंनीच ही आत्मचरित्रे लिहिली गेली आहेत. यात बहुतेक स्त्रियांनी आपल्या समाजकार्याच्याच अंगाने स्वदर्शन घडवले आहे. विधवांची उन्नती करणे हे पार्वतीबाईंचे ध्येय तर विधवा व परित्यक्ता स्त्रियांच्या सुखासाठी झटणे हे सुमतीबाईंचे जीवन उद्दिष्ट आहे. परंतु दोघींनी ध्येयप्राप्तीसाठी केलेले प्रयत्न भिन्न आहेत. पार्वतीबाई वपन केल्यानंतर केस वाढवून–समाजाला एक प्रकारचा धक्का देऊन विधवांसाठी केलेल्या कार्याने अमर झाल्या आहेत. तर सुमतीबाई आपल्या 'पद्मश्री' या पदवीने भारताला भूषणभूत ठरल्या आहेत देशसेवा करण्याच्या निमित्ताने एक देशभक्त म्हणून मृणालिनीबाईंनी भोगलेल्या यातना वेगळ्या वाटतात. आर्थिक साम्यावर आधारलेली शोषणमुक्त, वर्गविहीन समाजरचना या मार्क्सच्या तत्त्वांनुसार गोदावरी परुळेकरांनी वारली या आदिवासी जमातीतील माणूस जागा करण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. मार्क्सचीच जीवनपद्धती स्वीकारून नियतीने पदरात घातलेले वैधव्य झुगारून देऊन कामगारांच्या चळवळीतील कार्यकर्त्या म्हणून उषाबाईंनी आपला ठसा उमटवला आहे. प्रमिलाताई भालेराव रुग्णसेवक म्हणून अधोरेखित झाल्या आहेत. **चित्रपट, नृत्य, नाटक व संगीत क्षेत्र** : या क्षेत्रांत मोडणारी आत्मचरित्रे–(१) 'जाऊ मी सिनेमात ?' : शांता आपटे, (२) 'माझी नृत्य साधना' : रोहिणी भाटे, (३) 'स्वरवंदना' : ज्योत्स्ना भोळे, (४)

'सांगत्ये ऐका' : हंसा वाडकर, (५) 'स्नेहांकिता' : स्नेहप्रभा प्रधान. 'स्नेहांकिता' सोडल्यास त्या त्या क्षेत्राचे बरेवाईट रूप उलगडून दाखवणे हे जवळपास सगळ्या आत्मचरित्रांचे उद्दिष्ट आहे. स्नेहप्रभा प्रधान सिनेमात व नाटकात काम करणाऱ्या कलाकार आहेत. पण त्यांना ते क्षेत्र चितारायचं नाही तर त्यांच्या डॉ. शिरोडकरांशी असलेल्या आगळ्या वेगळ्या मैत्रीचा हा खुलासा आहे. शांता आपटे, हंसा वाडकर व ज्योत्स्ना भोळे या गायक, अभिनेत्री म्हणून प्रसिद्धी पावलेल्या आहेत. तिघींचेही वावरण्याचे क्षेत्र चित्रपटसृष्टी व रंगमंच आहे. शांताबाई व हंसाबाई आपल्याला त्या क्षेत्रात आलेले कडवट अनुभव सांगतात. त्यावरील बेगड काढून दाखवतात. कलाकारांना विफल करण्याचा त्यांचा हा प्रयत्न नसून कलाकारांना सावध करण्यासाठी त्यांनी घेतलेली ही दक्षता आहे. ज्योत्स्नाबाईंना मात्र या क्षेत्रात कुठेही वाईटपणा जाणवत नाही. सगळीकडे आनंदी आनंद दिसतो. एकाच क्षेत्रातील स्त्रियांच्या अनुभवातील ही भिन्नता आहे. शांता आपटे सिनेमाक्षेत्रांतील नेत्रदीपक यशाने, हंसाबाई–कलाकारांना दिलेल्या सावधगिरीच्या सूचनेने 'माणूस' म्हणून आणि जोत्स्नाबाई सर्व क्षेत्रात मिळवलेल्या कीर्तीमुळे 'स्व' स्मृती टिकवून आहेत. रोहिणी भाटे यांची नृत्याची आवड नृत्यकलेतील चांगुलपणावर प्रकाश टाकणारी आहे. साहित्य क्षेत्र : 'द्रौपदीची थाळी' गिरिजाबाई केळकर व 'सांजवात' आनंदीबाई शिर्के ही दोन या क्षेत्रातील आत्मचरित्रे. या दोघीही मान्यवर साहित्यिक आहेत. पण त्या केवळ साहित्यक्षेत्रातच गुंतलेल्या नाहीत. त्यांचे गृहिणीपदच महत्त्वाचे ठरले आहे. त्या काळात लेखिकांची अत्यल्प संख्या, त्यांचे समाजातील स्थान यांची ओळख या दोन्ही आत्मचरित्रांतून योगायोगाने होते.

प्रस्तुत कालखंडातील स्त्री–आत्मचरित्रकारांमधील काही स्त्रिया रक्ताच्या नात्याने एकमेकींशी बांधल्या गेल्या आहेत तर काही एकाच संस्थेशी निगडित आहेत. त्यांनी केलेले 'स्व' प्रगटन आणि इतरांनी केलेले त्यांचे चित्रण, एकाच संस्थेविषयी त्यांची भिन्न भिन्न मते यातून काही संगती हातात येते.

पार्वतीबाई आठवले व आनंदीबाई कर्वे यांचे बहिणींचे तर सुशीलाबाई आठवल्यांचे त्यांच्याशी असलेले सुनेचे नाते समजते. गिरिजाबाई केळकर व कमलाबाई देशपांडे यांच्या काकू–पुतणी संबंधावर प्रकाश पडतो. बायाचे सतत काम करत राहणे, पार्वतीबाईंचे विधवोन्नतीचे कार्य पण नानाच्या बायकोच्या चोळीला पहिली कात्री सुवासिनीकडून लावणे ही त्यांच्या वागणुकीतील विसंगती 'आंब्याचा टाळा' मधून कळते. बाया कर्वे, पार्वतीबाई आठवले, कमलाबाई देशपांडे, गंगूबाई पटवर्धन ह्या हिंगणे संस्थेत काम करणाऱ्या आहेत. बाया कर्वे व पार्वतीबाई आठवले आपल्या संस्थेच्या दोषांसंबंधी कधी काही बोलताना

दिसत नाहीत. कमलाबाई देशपांडे व गंगूबाई पटवर्धन यांनी संस्थेकडून आपल्यावर झालेले अन्याय व संस्थेच्या उणिवा धिटाईने दाखवल्या आहेत. गंगूबाई पटवर्धनांच्या उत्साहाचे व एकवचनीपणाचे दर्शन कमलाबाई देशपांड्यांकडून ' स्मरण साखळी 'त घडते. गंगूबाईंनी घातलेल्या सुधा अच्यांच्या समजुतीवरून त्यांच्यातील प्रेमळ स्त्री दिसते. वारल्यांमधील माणूस जागा करणाऱ्या गोदावरीबाईंना संपूर्ण वारली जमात मनापासून व चांगल्या भावनेने ' राणी ' म्हणत असल्याचा उल्लेख ' पण ऐकतं कोण ?' मध्ये वाचायला मिळतो. परंतु ' जेव्हा माणूस जागा होतो ! ' मध्ये प्रत्यक्ष गोदावरीबाईंनी मात्र आपल्या 'राज्ञी' पदावद्दल मौन धारण केलेले आहे.

अशी एकाच स्त्रीत्वाची ही विविध रूपे या आत्मचरित्रांत आढळतात. नैसर्गिकरीत्या लाभलेले स्त्रीत्व तेवढे समान असले तरी प्रत्येकीची मनोवृत्ती मात्र भिन्न आहे. ' व्यक्ती तितक्या प्रकृती ' याचा प्रत्यय या ठिकाणी येतो.

या आत्मचरित्रांवरून तत्कालीन सामाजिक, धार्मिक व राजकीय परिस्थितीचा बोध होतो.

आत्मचरित्रांत चित्रित झालेला काळ संक्रमणकाळ होय. पूर्वी समाज कर्मकांड, अंधश्रद्धा, रूढी, परंपरा यांच्या मगरमिठीत सापडला होता. ब्रिटीश राजवट, स्वातंत्र्य चळवळ, समाज सुधारणांचे अनेक प्रयत्न, औद्योगिक प्रगती यामुळे त्याचे आधुनिकीकरण झाले. व्रते, चूल नि मूल, सासुरवास, अज्ञान यात पिचलेली स्त्री हळूहळू कशी मुक्त झाली हे येथे वाचायला मिळते.

एकोणविसाव्या शतकाच्या उत्तरार्धापासून विसाव्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंतच्या काळातील संयुक्त कुटुंब पद्धतीचे दर्शन येथे घडते. कौटुंबिक चालीरीतींवरून वडील माणसाचा धाक, त्यांना दिला जाणारा मान, सुनांशी परक्याची मुलगी हक्काचा गुलाम म्हणून वागण्याची रीत समजते. लहान मुलांना आजच्यासारखे त्यांच्या मनाचा कानोसा घेऊन हळूवारपणे वागवले जात नसल्याचे दिसते. विवाहविषयक परिस्थितीवरून मुलींचे पूर्वीचे स्वातंत्र्य डावललेले आढळते. बालविवाह, बालजरठ विवाह हे त्याचे परिणाम होत. विधवांची समाजातील अवहेलना दृग्गोचर होते. इंग्रजी राजवटीनंतर झालेला संमतिवयाचा कायदा, नोंदणी पद्धतीने विवाह करण्याची रीत इ. वरून पुढच्या काळात विवाहबंधने बरीच शिथिल झालेली दिसतात.

शैक्षणिक परिस्थितीवरून स्त्री व शिक्षण परस्परविरोधी शब्द असल्याचे जाणवते. पण याही काळात मुलींना धैर्याने शिकवणारे थोडेफार लोक आढळतात. इंग्रजांच्या सहवासाने व भारताच्या स्वातंत्र्याने, सुधारकांच्या चळवळीने या परिस्थितीत बदल होऊन स्त्रियांना सर्व प्रकारचे शिक्षण घेण्याची सवलत मिळालेली दिसते.

धार्मिक परिस्थितीवरून खऱ्या धर्माची वाताहत होऊन धर्माच्या नावाखाली निर्धास्तपणे जोपासले गेलेले जातिभेद, सोवळे ओवळे, अंधश्रद्धा, विविध प्रकारचे चमत्कार, अनंत व्रतवैकल्ये आणि शकुनअपशकुन या धर्मावडंबरांचा बोध होतो.

राजकीय परिस्थितीवरून स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर भारतातील राजकीय उलाढालीचे दर्शन घडते. विविध संस्थाने, त्यात चालणारी हुकुमशाही, जातीय दंगे, पहिले व दुसरे महायुद्ध, काँग्रेसची दुफळी असे राजकीय परिस्थितीत बदल घडवून आणणारे उल्लेख वाचायला मिळतात. गांधींचा मिठाचा सत्याग्रह आणि स्वदेशीची चळवळ यांना भारतीय स्वातंत्र्यलढ्यात विशेष मानाचे व महत्त्वाचे स्थान मिळालेले दिसते. या लढ्यात स्त्रियांचा सक्रिय सहभाग आढळतो. स्वातंत्र्योत्तर काळातील भारत–पाकिस्थान विभाजन, गांधीजींचा वध, १९६० मधील महाराष्ट्र राज्य स्थापना, १९६२ मधील भारत–चीन युद्ध, १९६५ मधील भारत–पाकिस्थान युद्ध या महत्त्वाच्या घटनांचे निर्देश येतात.

सामाजिक, धार्मिक व राजकीय परिस्थितीवरून असे दृष्टोस पडते की, समाजात कोणतेही बदल अतिशय मंद गतीने होतात. समाजाचे स्वरूप विविध प्रयत्न करूनही पूर्णपणे बदलत नाही. उदा. १९२९ मध्ये बालविवाहास कायद्याने बंदी झाली. पण अजूनही समाजातून बालविवाह पद्धती पूर्णपणे नष्ट झाल्याचे दिसत नाही. सुधारणा शहरी भागात लवकर होतात, ग्रामीण भागात त्या पोचायला उशीर लागतो. शिवाय तेथे पोचल्यावरही त्यांचा स्वीकार कितपत होईल याची निश्चिती देता येत नाही. बंडखोर लोक समाजाला मान्य नसतानाही आपल्याला पाहिजे ते बदल घडवून आणतात. सर्वसामान्य लोक समाजाने मान्यता देऊनही परंपरेपासून ढळायला तयार नसतात. जुने ते सोने या म्हणीला कवटाळताना दिसतात. हेच समाजाचे खरे व मूळ रूप आहे असे वाटते.

स्त्री–आत्मचरित्रे, पतीच्या निमित्ताने लिहिल्या गेलेल्या आत्मचरित्रांतील पतिचित्रे, लेखनातून स्पष्ट झालेला पतीचा पत्नीकडे पाहण्याचा दृष्टिकोण; लेखनात साधलेले आत्मचरित्रांचे तंत्रविषयक निकष, सामान्य ज्ञान, वाङ्मयीन दृष्टीने साधेपणा, सरलता, प्रासादिकता, उत्कटता आणि अल्पाक्षरता ही स्त्री-लेखनाची कलामूल्ये, कलात्मक व अक्षर कलाकृती, साम्यवादी व गांधीवादी जीवनदृष्टी, साहित्यिकांची माहिती, व्यवहारी अपूर्णांकाची पत्रभाषा या गुणांमुळे वैशिष्ट्यपूर्ण ठरली आहेत. 'आमच्या आयुष्यातील काही आठवणीं'मध्ये–हुकुमशहा, छोटया छोटया गोष्टींनी रागावणारे घरगुती रानडे वाचायला मिळतात. प्रेमळ, उदार, निष्पाप, परोपकारी, लहरी, विक्षिप्त, संतापी–अशा गुणावगुणांचे रसायन असलेले टिळक लक्ष्मीबाई 'स्मृतिचित्रात' उभे करतात. साहित्यिक माधवरावांबरोबर–लीलाबाईंशी तऱ्हेवाईकपणे वागणारे, कुंकू मोठं झालं म्हणून, गंगू या

नावाने हाक मारली म्हणून, घरात सुपारी ठेवायची नाही–अशा क्षुल्लक कारणां-साठी स्वत:चा तत्त्वनिष्ठ हेकेखोरपणा चालवणारे माधवराव 'आमची अकरा वर्षे'मधून समजतात. अन्नपूर्णाबाई रानडयांनी एकोणतीस वर्षांच्या सहवासातून अतिशय भक्तिभावाने रानडयांचे चित्र काढले आहे.](स्मृतितरंग) उद्योगपती यादवराव 'या सदाशिव' मधून परिचित होतात. केदारांच्या–साहित्यप्रेमी, धुरंधर राजकारणी, सत्यत्वाची कायदे पंडित अशा बहुकक्षी व्यक्तिमत्त्वाची ओळख 'वेचलेले मणी' मध्ये होते. लक्ष्मीबाई पटवर्धनांनी दाखवलेले पटवर्धनांचे सामान्यातील असामान्यत्व (माझा नंदादीप) व 'मीच हे सांगितलं पाहिजे' मधील गुणावगुणी वास्तव केतकरांची ओळख लक्षणीय आहे.

पतीची पत्नीकडे पाहण्याची नजर धाकाची दिसते. वागणूक अधिकाराची. कळत नकळत नवरेशाही गाजवलेली आढळते. न्यायमूर्ती माधवरावांना रमाबाई हुकुमाची ताबेदार वाटतात. वेळी अवेळी टिळकांमधील पतित्व जागे होताना दिसते. स्त्री ही पत्नी असण्यापेक्षा मैत्रीण असावी या विचाराचे माधवराव प्रत्यक्षात मात्र बरेचदा आपले पतित्व गाजवतात. यादवराव भागवत छोटयामोठया बाबतीत नवरेपणाचा अधिकार बजावतात. स्त्रियांचे कैवारी डॉ. केतकर शीलवती-बाईंना मात्र आपल्या बंधनात ठेवू इच्छितात. जिन्नस आताच संपला म्हणून ठण-कावून विचारणारे रामचंद्रपंत फडणीस, मला नकळत पैसे का साठवले म्हणून जाब विचारणारे शिर्के, हंसाबाईंसाठी चाबकाचा वापर करणारे बंदरकर, आपल्या तालावर सरोजिनीबाईंना नाचायला लावणारे शारंगधर–नवरेशाहीच गाजवणारे ठरतात. याच्या उलट बायकोच्याने होत नाही म्हणून तिखट कुटणारे सुखात्मे, तुला विचारल्यावाचून मी कोणताच निर्णय घेणार नाही–असे बायकोला विश्वासात घेणारे आपटे, आनंदीबाईंच्या बहकण्यावरही नवरेपणाची हुकमत न चालवणारे विजापुरे, ज्योत्स्नाबाईंना सर्व प्रकारच्या सवलती देऊन त्यांच्या गुणांचा विकास करणारे भोळे–समजूदार पती वाटतात. परंतु अशी उदाहरणे फारच थोडी आहेत.

सत्यकथन, तटस्थवृत्ती, 'स्व 'ला केंद्रस्थान, घटनांची निवड व कुशल मांडणी, वस्तुनिष्ठ निवेदन या आत्मचरित्राच्या सर्वसाधारण कसोटयांतून ही बहुतेक आत्मचरित्रे उतरतात.

आत्मचरित्रकाराबरोबरच– देशी–विदेशी प्रवासवर्णने, काही पतिचरित्रे व विशिष्ट क्षेत्रात वावरणाऱ्या स्त्रियांकडून त्या उद्योगाची,–क्षेत्रांची माहिती मिळते. निरलसपणे, तन, मन, धन ओतून कष्ट केल्याने यश मिळते हे धंद्याचे गमक कळते. शैलीसमीक्षेच्या आधाराने ही आत्मचरित्रे तपासली तर स्त्रियांच्या अनुभूतीची तीव्रता शब्दरूप घेते तेव्हा अमूर्त ते मूर्त झालेले दिसते. साधेपणा, सरलता, प्रासादिकता, उत्स्फूर्तता, अल्पाक्षरत्व ही वाङमयीन मूल्ये हाती येतात. अनु-

भवाच्या उत्कटतेनुसार शैली भिन्न भिन्न रूप घेताना दिसते. बोलणे तसे लिहिणे, बोलताना कधी स्वयंपाकघराचा तर कधी अलंकाराचा आधार घेतला जातो. काही वेळा मनोविकारांच्या साह्याने, कधी चेहरेपट्टीच्या मापनाने तर केव्हा कृती उक्तीच्या निरीक्षणाने व्यक्तिचित्रे रेखाटलेली आढळतात. ज्या ठिकाणी वर्णन, विवेचन, निर्देश, स्पष्टीकरण यांनी विषय सुबोध होत नाही त्याठिकाणी प्रतिमांचा आधार घेतलेला दिसतो. प्रसंग साध्या, सरळ रचनेने जिवंत केले जातात. केव्हा विनोदाचा अंगीकार तर कधी नाट्यप्रसंगात रस घेतलेला आढळतो. क्वचित म्हणींचा वापर करून अल्पाक्षरत्व साधले जाते. नवऱ्याचा नामनिर्देश करण्याची तिची तऱ्हा निराळी आहे. जेव्हा ती जीवनसत्ये बोलून दाखवते तेव्हा चिंतनशील योग्यासारखी धीरगंभीर दिसते. ' माझे पुराण, ' ' स्मृतिचित्रे, ' ' स्वरवंदना, ' ' निशिगंध, ' ' हे गीत जीवनाचे, ' ' गेले ते दिवस, ' ' सांगत्ये ऐका, ' ' दुर्दैवाशी दोन हात ' ही आत्मचरित्रे कलात्मक आहेत.

गोदावरी परुळेकर व उषा डांगे यांच्या आत्मचरित्रांतून साम्यवादी जीवन-दृष्टीचा बोध होतो तर मृणालिनी देसाई व स्वातंत्र्य लढ्यात–विशेषतः मिठाचा सत्याग्रह व स्वदेशी चळवळीत हिरीरीने भाग घेणाऱ्यांकडून गांधीवादी जीवनपद्धतीचा परिचय घडतो.

माधवरावांच्या कवितांच्या जन्मकथा ' आमची अकरा वर्षे ' मधून कळतात. बालकवींची घरगुती माहिती ' स्मृतिचित्रां 'तील ' बालकवी ठोंबऱ्यांच्या आठवणी ' या प्रकरणात वाचायला मिळते. मराठी लेखक आपल्या लेखणीच्या जिवावर स्वतःचे पोट भरू शकत नाहीत. मराठी लेखकाची ही दयनीय अवस्था अंगठी गहाण ठेवणाऱ्या ना. ह. आपट्यांच्या उदाहरणावरून ' दुर्दैवाशी दोन हात 'मध्ये सांगितली जाते. यादवराव भागवत बायकोला लिहिलेली पत्रे चुकून कुणाच्या हातात पडली तर त्याला ती कळू नये म्हणून व्यवहारी अपूर्णांकात लिहितात.

' माझे पुराण,' ' स्मृतिचित्रे,' ' गेले ते दिवस ' या आरंभीच्या आत्मचरित्रांबरोबरच १९७० ते १९७५ या काळातील ' सांगत्ये ऐका,' ' हे गीत जीवनाचे,' ' सांजवात,' ' दुर्दैवाशी दोन हात ' ही आत्मचरित्रे अक्षर ठरावी इतकी उत्कृष्ट उतरली आहेत. म्हणून पूर्वीची आत्मचरित्रे चांगली होती व आताची वाईट आहेत असा रोखठोक निष्कर्ष काढता येत नाही. चांगले आत्मचरित्र लिहिणे काळावर अवलंबून नाही तर व्यक्तीवरच आहे हेच खरे. या क्षेत्रातील स्त्रियांची कामगिरी पुरुषांच्या तुलनेत लक्षणीय आहे.

* * *

# काही आत्मचरित्र-लेखिकांची व अभ्यासकांची पत्रे

आत्मचरित्र या वाङ्मय-प्रकाराचा अभ्यास करताना निर्माण झालेल्या विविध प्रश्नांची उकल व्हावी म्हणून काही स्त्री-आत्मचरित्रकार व या वाङ्मयप्रकाराचे अभ्यासक यांना पुढील प्रश्नावली तयार करून उत्तरे देण्याची पत्राद्वारा विनंती केली. त्यांची उत्तरे या परिशिष्टात समाविष्ट केली आहेत.

**प्रश्नावली**

(१) आपल्या आत्मचरित्रामागील लेखनहेतू कोणता ? तो आपल्या दृष्टीने सफल झाला आहे काय ?

(२) आपल्या आत्मचरित्राची आपल्याला काही वैशिष्टये सांगता येतील काय ?

(३) आत्मचरित्र या वाङ्मय-प्रकारासंबंधी आपले काय मत आहे ?

(४) आत्मचरित्र या वाङ्मय-प्रकारात स्त्रियांनी काही मोलाची भर घातली आहे काय ?

(५) आत्मचरित्र या वाङ्मय-प्रकाराच्या भवितव्यासंबंधी आपले विचार.

(६) आत्मचरित्रातील 'सत्या' संबंधीचे आपले मत.

यांपैकी आत्मचरित्रकार स्त्रियांसाठी सर्व प्रश्नांचा आणि आत्मचरित्र या वाङ्मय-प्रकाराच्या अभ्यासकांसाठी प्रश्न क्रमांक तीन, चार, पाच, सहा यांचा उपयोग करण्यात आला आहे.

**इंदिरा भागवत (या सदाशिव) यांचे पत्र : दि. २९-१२-७६**

(१) 'या सदाशिव' या चरित्रामागील माझा हेतू माझे पती श्री. यादवराव भागवत यांचे उत्साही चरित्र व कर्तृत्व यांचा परिचय बहुजन समाजास करून देणे.

(२) प्रस्तुत पुस्तक आत्मचरित्र नाही. ते चरित्र आहे. त्यातील खास वैशिष्टये माझ्या मते– (१) ग्वाल्हेरच्या भागवतांच्या खानदानी संस्थानी

घराण्यात जन्म घेऊन सुद्धा माझ्या पतींनी आधुनिक दृष्टिकोण कसा जोपासला ? (२) कलांना पोषक असे वातावरण ग्वाल्हेरला नसतानासुद्धा त्यांनी स्वतःच्या कल्पकतेने व धडाडीने आपले व्यक्तिमत्त्व कसे घडविले ? (३) घरात किंवा आसपासच्या नातेवाइकांत व्यापारधंद्याची वहिवाट नसतानासुद्धा 'सिनेमा' व 'फोटोग्राफी' सारख्या धंद्यात यश कसे मिळविले ? (४) ग्वाल्हेरच्या मासलेवाईक संस्थानी व राजेशाही वातावरणात कोणाचीही हुजुरी न करता आपले सर्व प्रयत्न प्रतिष्ठेने आणि खंबीरपणे कसे चालू ठेवले ? (५) स्वतःला उच्च महाविद्यालयीन शिक्षणाचा लाभ मिळालेला नसतानासुद्धा प्रगतिशील आणि विशाल दृष्टिकोणाने आपल्या घरातील पुढील पिढ्यांना खेळीमेळीने कसे प्रोत्साहन दिले ? याबद्दलचे चित्रण करणे ही आहेत.

(३) आत्मचरित्र हा वाङमय-प्रकार अत्यंत हळूवार परंतु हाताळण्याला अत्यंत कठीण आहे. आत्मचरित्र लिहिताना लेखक स्वतःविषयी लिहीत असतो. अशावेळी तो एकतर स्वतःची प्रौढी मिरवण्यात वास्तवापासून दूर जातो किंवा संकोच, सामाजिक निंदेची भीती आणि न्यूनगंड यांच्या दबावाखाली यथार्थ-हूबेहूब चित्रण करू शकत नाही. तेव्हा यथार्थ, संतुलित आणि रंजक अशा भाषेत आत्मचरित्र मांडणे कठीण कोटीचे असते. दुसरे असे की, आत्मचरित्राचे लेखन लेखकाचे पुस्तक पूर्ण होताच थांबत नाही. वास्तविक ते प्रकाशात आल्यावर त्याच्याबद्दलच्या उलटसुलट प्रतिक्रिया त्याच्याबरोबर वाचल्या जाणे हे आत्मचरित्राच्या मूल्यमापनासाठी आवश्यक असते. अशारीतीने आत्मचरित्र हा एक नाजूक, हृदयस्पर्शी असा वाङमय-प्रकार आहे.

(४) या वाङमय-प्रकारात लक्ष्मीबाई टिळक, रमाबाई रानडे, लीलाबाई पटवर्धन यांसारख्या कर्तृत्ववान पुरुषांच्या सहचारिणी असलेल्या स्त्रियांनी साधारणपणे समाजात पुढे आलेल्या या पुरुषांच्या जीवनाची हळूवार आणि घरगुती बाजू अत्यंत बाळबोधपणे मांडली आहे.

(५) स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणाचे लोण समाजाच्या सगळ्या थरापर्यंत पोचविण्याचा प्रयत्न चालू झाल्यामुळे आतापर्यंतच्या शतकानुशतके तोंड असून मूक बनलेल्या समाजातले अनेक भाग आता अक्षराच्या माध्यमातून आणि आपल्या स्वाभाविक बोलीतून आपले विचार मांडू लागले आहेत. त्यामुळे पूर्वी मध्यम आणि शिक्षित वर्गाची मिरासदारी असलेले वाङमय आता अधिक विशाल आणि खोल होत चालले आहे. आणि एक गोष्ट स्पष्ट झाली आहे की, यापूर्वी मध्यम वर्गाने मध्यमवर्गाशिवाय इतर वर्गांबद्दल लिहिलेले वाङमय कृत्रिम होते. त्याऐवजी आता वाङमयात अधिक जिवंतपणा येऊ लागला आहे. तेव्हा भविष्यकाळात आतापर्यंत अलक्षित वर्गातील लेखक जेव्हा आत्मचरित्रपर लिखाण करतील तेव्हा समाजाचे

तंतोतंत चित्रण होऊ शकेल. तेव्हा आत्मचरित्र या वाङमय-प्रकाराचे भवितव्य निश्चितच उज्ज्वल आणि महत्त्वाचे आहे. मात्र या प्रकारच्या लेखकांमध्ये प्रामाणिकपणा आणि संतुलित दृष्टिकोण ह्याविषयी जागरूकता निर्माण व्हायला हवी.

**लक्ष्मीबाई पटवर्धन (माझा नंदादीप) यांचे पत्र : दि. ७-१-७७**

(१) ‘ माझा नंदादीप ’ हे आत्मचरित्र नसून एका पत्नीने आपल्या पतीचे त्याच्या मागून लिहिलेले चरित्र आहे. त्यामध्ये सहचारिणी म्हणून ओघाने आलेले तिचे कार्य आहे.

(२) १९४८ मध्ये म. गांधींच्या वधाच्या वेळी आमचे घर जळाले. सर्व वस्तुमात्र नामशेष झाले. फक्त मी आणि मुले अंगावरच्या वस्त्रानिशी उरलो. आमच्याजवळ भूतकाळाच्या फक्त स्मृतीच होत्या. त्याही कालौघात विस्मृत होण्याची शक्यता. तेव्हा त्या स्मृती अक्षरबद्ध केल्या तर मुलांना, इतरेजनांना डॉक्टरांच्याबद्दल काही तरी कळेल हीच कल्पना. डॉक्टर केव्हातरी म्हणत असत की, एवढंसं कोणी काही केलं तर वृत्तपत्रातून केवढी जाहिरात होते. आम्ही इथे केवढाली कामे करतो आहोत पण कुणाला पत्ताही नाही. कोणी अवाक्षरही बोलत नाही. चरित्र लिहिण्यामागे हेही एक कारण आहे. पुढे बरेच लोक पाहिले पण डॉक्टरांच्यासारखे व्यक्तिमत्त्व मला कुठे आढळले नाही. म्हणून सामान्यातल्या या असामान्यतेला चरित्ररूप दिले गेले.

(३) ज्या व्यक्तींचा अनेक लोकांशी संबंध येतो, कारणा कारणाने का होईना ज्यांना गावांतून प्रांतातून, हिंडावे, रहावे लागते अशा व्यक्तींनी, विशेषत: स्त्रियांनी आपले आत्मचरित्र जरूर प्रामाणिकपणे लिहावे. कारण पुरुषांना अनेक व्यवसाय असतात. स्त्रीने बाहेरचे व्याप केले तरी तिचे चूल आणि मूल हे कार्यक्षेत्र राहतेच. त्याशिवाय तिचे जीवन म्हणजे स्वादाशिवाय फळ ! स्त्रीच्या जीवनात विवाहाने होणारे संक्रमण हा फार महत्त्वाचा भाग आहे. दोन भिन्न घराण्यांतील भिन्न चालीरीती असलेली दोन माणसे एकत्र यायची आणि त्यांनी आपले जीवन एकीने, एकजीवाने जगायचे हे निसर्गसिद्ध ठरलेले आहे. एकमेकातूनच दोघांनी सुख व समाधान मिळवायचे. एकाशिवाय एक म्हणजे काहीच नाही आणि एक नि एक दोनच नाही तर अनेक असे हे स्त्री-जीवन तिने कसे पेलले, दुसऱ्याच्या घरात जाऊन तिथल्या पद्धती, अनेक स्वभाव यातून ती त्या घराशी, त्या व्यक्तींशी कशी समरस झाली व त्या घरात तिने आपले स्थान कसे बळकट केले हे तिच्या शब्दतूंन, अनुभवांतून इतरांना समजणे जरूर आहे. कारण व्यक्ती तितक्या प्रकृती या म्हणीप्रमाणे प्रत्येक दोन माणसांचे एकत्र येणे भिन्नच असते. पति-पत्नींनी आपल्या जीवनात सुख-समाधान मिळवायचेच असते. पण त्याशिवाय त्यांच्यामुळेच कुटुंबियांना, भोवतालच्या परिवाराला सुख-समाधान द्यायचे असते हे

लक्षात घेऊनच स्त्रीची पतिगृही प्रतिष्ठापना व्हायची असते, ते घर सर्वांचे विसाव्याचे स्थान व्हायचे असते आणि अशा तऱ्हेने तिने जीवनाची कृतार्थता समजायची असते. समाजाच्या नव्या पिढीची वाढ तिच्याच अंगाखांद्यावर व्हायची असते. म्हणजे स्त्रीने तीन पिढ्यांना सांभाळायचे असते. हीच संसाराची कल्पना; तो हेतू कसा साध्य झाला ? किती प्रमाणात फळाला आला ? हे तिच्या आत्मचरित्रातूनच इतरांना कळायचे नाही का ?

(४) माननीय रमाबाई रानडे, लक्ष्मीबाई टिळक यांच्या चरित्रातून त्यावेळच्या समाजाच्या चालीरीती, भोळ्या समजुती, स्वच्छता, सोवळे, आर्थिक परिस्थिती कळून येते. सामान्यजनांना तीच उपयुक्त असते. सामान्य बहुजनांना सामान्यांचेच आदर्श मार्गदर्शन उपयुक्त ठरते असे मला वाटते.

(५) व्यक्तीचे भवितव्य तसेच चरित्रांचे त्या त्या काळात अत्यंत उपयुक्त. कालांतराने या विनाशी जगात सर्वच नाश पावते तसेच तेही मागे पडणे स्वाभाविक आहे. पण ज्यावेळी पुन्हा मागचे पाहावे असे वाटते तेव्हा ही चरित्रे समाजाचे पूर्ण चित्र उभे करतील असे वाटते.

**राधाबाई आपटे (ढळला रे ढळला दिन सखया आणि उमटलेली पावले) यांचे पत्र : दि. ६–३–७७**

(१) ही पुस्तके लिहिण्याचा हेतू माझ्यापुरताच होता. तो म्हणजे माझे मन मोकळे करायला आणि व्यवस्थिशीर रडायला समाजाकडून मी लेखनामुळे मुभा घेतली. त्यामुळे माझे पती ह्यांच्या गुणांच्या सहवासात मी राहण्याची इच्छा केली होती ती पूर्ण झाली.

(२) माझ्या लिखाणाचे वैशिष्टच––माझ्या मते अहंकारविरहित लिखाण झालेले आहे. त्यामुळे भपका, असत्यता यापासून मी बचावले आहे. कदाचित डागडुजी कमी असेल पण निर्मलता स्पष्ट आहे.

(३) आत्मचरित्र हा वाङमय-प्रकार श्रेष्ठ दर्जाचा आहे पण पुष्कळवेळा सत्य बाजूला राहून भपकेदार, लोकपसंतीचे वाङमय उगीचच्याउगीच लिहिले जाते. वाचकवर्ग आता सूज्ञ आहे त्यामुळे अशा आत्मचरित्रांची किंमत कमी होते.

(४) स्त्रियांनी आजपर्यंत जी आत्मचरित्रे लिहिली आहेत त्यांपैकी जी माझ्या वाचनात आली आहेत त्यावरूनच मी निष्कर्ष काढते.

स्त्रियांच्या वाङमयात ‘ रसपरिपोष ’ आढळतो. ‘ विनोद शैली ’ पुष्कळ कमी वाटते. लक्ष्मीबाई टिळक सोडल्या तर ‘ मी ’ चे गाणेच आढळते. हा दोष स्त्रियांनी दूर केल्यास उच्च दर्जाचे वाङमय खात्रीने निर्माण होईल. याचे कारण त्यागाच्या भूमिकेवरच स्त्री सदोदित वावरत असते.

(५) आत्मचरित्राचे भवितव्य उज्ज्वल आहे. पण लेखक-शिल्पकारांनी सचोटीने आत्मचरित्र लिहिल्यास समाजाला पुष्कळ शिक्षण आपोआप मिळेल.

**गिरिजाबाई केळकर (द्रौपदीची थाळी) यांचे पत्र : दि. १९-१-७७**

(१) माझ्या पुतण्याच्या सांगण्यावरून एकदा आयुष्यात मागे डोकावून पाहावेसे वाटले व झाली तर करमणूक हाच हेतू.

(२) ज्या काळात स्त्री-शिक्षण फारच कमी होते त्या काळात प्रतिकूल परिस्थितीतही मनात आले तर एखादी स्त्री इतके साहित्य निर्माण करू शकते हे वैशिष्टच वाचकांना जाणवले.

(३) आजकाल आत्मचरित्र हा प्रकार बराच रूढ झाला आहे. त्यात सर्व सत्‌चरित्रे असतात असे नाही. आयुष्यात आलेले बरेवाईट अनुभव लिहून सुप्रसिद्ध व्यक्तीबद्दल समाजाचे मन कलुषित करणाऱ्या गोष्टी लिहिण्याने लिहिणाऱ्याला समाधान वाटले तरी माझ्या मते तो प्रकार त्याज्य होय. रमाबाई रानडे, लक्ष्मीबाई टिळक, कमलाबाई देशपांडे, वहिणाबाई या स्त्रिया व नेहरू, गांधी, योगानंद यांची चरित्रे वाचनीय आहेत. मध्यमवर्गाची सामाजिक रहाटी स्त्रियांच्या आत्मचरित्रांतून पाहायला मिळते तर पुरुषांकडून त्या त्या काळच्या चळवळींचा सामाजिक व तात्त्विक ऊहापोह वाचायला मिळतो.

(४) सर्वच वाङमय दिवसेंदिवस समृद्ध होत आहे. त्यात स्त्रियाही भर घालीत आहेत. आत्मचरित्रांनी अशी कितीशी भर पडणार ? अर्थात स्त्रियांना त्यापासून बराच बोध घेता येईल.

(५) या प्रकाराने फारशी भर पडेल असे वाटत नाही.

**मृणालिनी देसाई : (निशिगंध) यांचे पत्र : दि. २६-२-७७**

(१) 'निशिगंध' लिहिण्यामागचा हेतू स्वतःच्या भूतकाळाकडे एकदा अलिप्तपणे वळून पाहावे आणि तो हेतू पूर्ण झाला आहे.

(२) या पुस्तकात काही वेगळेपणा असला तर तो हाच की, एका व्यक्तीच्या निमित्ताने जाणीवपूर्वक एका कालखंडाचे चित्रण उभे करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यातील मी अपरिहार्य असेल पण ती चित्रकाराच्या कुंचल्यासारखी. चित्रात ती सर्वत्र असली तरी तिचे तपशील नाहीत, ते नसावेत असा प्रयत्न आहे. त्याशिवाय अलिप्तपणा येणे कठीण.

(३) आत्मचरित्र हा वाङमय-प्रकार प्रत्येक व्यक्ती हाताळू शकेल इतका त्याचा फलक मोठा आहे आणि गंमत अशी की, ज्या व्यक्तीकडे तो जातो त्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वासारखा आकार घेऊन तो आपल्यापुढे येतो.

(४) मराठी साहित्यात तरी या दालनात स्त्रियांच्याच लेखणीचे वैभव दिसून येईल. अतिशय निखालस, साधे, सरळ आणि संपूर्ण स्वतंत्र असे साहित्य येथेच आढळेल.

(५) आपल्या सर्वांच्याच आयुष्याच्या कक्षा खूप रुंदावल्या आहेत. नवीन क्षेत्रे पाहता पाहता उघडत आहेत. जुनी मूल्ये बदलत आहेत. हे सारे अनुभव टिपून घेणारी आत्मचरित्रे प्रादेशिकच नाही तर राष्ट्रीय व जागतिक क्षेत्रातही स्थान मिळवू शकतील.

**ज्योत्स्ना भोळे (स्वरवंदना) यांचे पत्र : दि. २०-१२-७६**

(१) माझ्या दृष्टीने 'स्वरवंदना' हे माझे आत्मचरित्र नाही. तो खूप मोठ्या आयुष्याचा छोटा आढावा घेतला आहे. आम्ही गप्पा मारीत होतो. ते शैलजा राजे यांनी संकलित केले. मी जर स्वतः आत्मचरित्र लिहिले असते तर त्याला 'मान सांगावा जनाला' हे नाव दिले असते.

(२) हल्ली पुष्कळ स्त्रियांनी आपली चरित्रे सांगून काय मिळवले हे काही मला समजत नाही. आत्मचरित्र त्याने लिहावे की ज्याच्या आयुष्यात काही दुसऱ्यांना उपयोगी पडण्यासारखं असेल ! आपण चुका करायच्या आणि त्याच पुन्हा वेशीवर टांगायच्या हा प्रकार दुसऱ्याला मार्ग दाखवू शकतो असे मला वाटत नाही. अलीकडे या चरित्रांनी नुसता हैदोस घातला आहे.

**सुमती शहा (हे गीत जीवनाचे) यांचे पत्र : दि. १२-१-७७**

(१) मला अनेकांनी आत्मचरित्र लिहिण्याविषयी आग्रह केला कारण एवढ्या श्रीमंत घराण्यातील मुलीने लग्न का केले नाही हे जाणून घेण्याची उत्कंठा लोकांना होती. लग्न न करता समाजकार्याची, गरिबांच्या उद्धाराची प्रेरणा कसकशी मिळाली, यांची माहिती त्यांना जाणून घ्यायची होती. त्यातूनच हे आत्मचरित्र मी लिहायला घेतले.

(२) हे आत्मचरित्र लिहिल्याची सफलता झाली असे वाटते.

(३) प्रत्येकाने आत्मचरित्र लिहावे कारण आत्मचरित्राने ज्योतीने ज्योत पेटविल्यासारखे होते, पुढच्या लोकांना आदर्श मार्गदर्शन होते असे मला वाटते.

(४) वाङमयात स्त्रियांनी अतिशय मोलाची भर घातली आहे. नव्हे तर वाङमयाची मूळ नायिकाच स्त्री आहे. प्रत्येक स्त्रीने आपला अनुभव शब्दरूप केला तर वाङमयाचे बळ वाढेल.

(५) आत्मचरित्र हे भविष्यकालीन युगाला एकप्रकारे नौकेसारखे आधार देणारे असते. त्यामुळे संसारसागरातील आपली जीवननौका कोणत्या पैलतीराला पोहचवावी व शांतता मिळवावी हे त्यातून समजते.

**आनंदीबाई शिर्के (सांजवात) यांचे पत्र : दि. ८–२–७७**

(१) प्रत्येक माणसाचे आयुष्य हे कादंबरीचा विषय होऊ शकते. माणसाच्या काळजाला कळ पोचते. ती व्यक्त करायला समोर कोणी सुहृद नसतो. तेव्हा तो लेखणी हाती घेतो. मी आत्मचरित्र लिहिले ते माझ्या मुलांसाठी. त्यांना आपली आई कशी होती हे कळावे हा हेतू. विद्वान, मान्यवर यांच्या अनुकूल अभिप्रायावरून हेतू सफल झाला असे म्हणायला हरकत नाही.

(२) आयुष्य जसे घडले तसेच लिहिले. त्यातील साधी-सरळ भाषा काहींना आवडली तर काहींना रोजच्या जीवनात येणारे बरे-वाईट अनुभव, त्यास सामोरे जाण्याचे धैर्य हृद्य वाटले.

(३) आत्मचरित्रात लेखकाचे आत्मनिवेदन असते. सगळ्या सत्य घटना व्यक्त झाल्या तर ते एक वास्तव वाङमय तयार होते आणि कादंबरीपेक्षाही अद्भुत, मनोरंजक असे वास्तववादी वाङमय म्हटले जाते. आत्मचरित्र विद्वानांनीच लिहावे, इतरांना हा मार्ग बंद असा काही दंडक नाही. कधी कधी गरीब साधी व्यक्ती खडतर जीवनाशी झगडत असते. कधी ध्येय गाठते, कधी कामी येते. पण तिचे अनुभव प्रसिद्ध झाले तर ती एक हृदयस्पर्शी वाङमयनिर्मिती होईल. वास्तववादी वाङमय टिकते. वाचावयास आवडते. त्या वाचनाने माणूस अंतर्मुख होतो. आपणातील दोष सुधारण्याच्या मार्गास लागतो. आत्मचरित्राचे आवर्जून वाचन करणारे काही लोक आहेत.

(४) आत्मचरित्र या वाङमय-प्रकारात स्त्रियांनी निश्चितपणे मोलाची भर घातली आहे. लक्ष्मीबाई टिळक, रमाबाई रानडे व लीलाबाई पटवर्धन ही आत्मचरित्रे म्हणजे मोलाची भर होय.

(५) आत्मचरित्रे ही वास्तवावर आधारित असल्याने वाचनीय असतात. त्यातील अनुभव जिवंत असतात. हा वाङमयप्रकार चिरस्थायी व्हावा.

**प्रमिला भालेराव (अश्वत्थाची फुले) यांचे पत्र : दि. ९–३–७७**

(१) मागच्या गोष्टी मुलांना सांगताना मुले म्हणत, हे सर्व लिहून ठेव. मजा वाटेल वाचताना. पूर्वीच्या वातावरणाचे वर्णन मुलांसाठी व माझी आवड म्हणून लिहून ठेवले.

(३) आत्मचरित्र लिहिल्याने त्यावेळची रूढी, विचार हे पुढच्या पिढीस समजतात. आपल्या देशात अनेक अडचणी सोसून व रूढीला डावलून स्त्रियांनी संधी मिळेल त्याप्रमाणे पावले पुढे टाकली आहेत. पण सर्वांनीच असे लेखन केलेले नाही. त्यामुळे खाणीत पडलेल्या हिऱ्याप्रमाणे त्या झाकून राहिल्या. स्वतःचे गुणही पैलू न पाडल्या गेल्याने झाकून राहिले.

(५) आत्मचरित्र जसं घडलं तसं असावं. पुढच्या पिढीला त्यातून जे शिकता येण्यासारखे असेल ती पिढी शिकू शकेल व जे अयोग्य वाटेल ते टाकू शकेल. माझ्या मते आत्मचरित्र या वाङमय-प्रकाराचा भविष्यकाळ उज्ज्वल आहे.

**आनंदीबाई विजापुरे (अजून चालतेची वाट) यांचे पत्र : दि. १५–१–७७**

(१) जोडीदाराबद्दलची अपेक्षा, जीवनाबद्दल कल्पना फोल ठरल्या. ते दुःख माझ्या मनात अहोरात्र डाचत होतं. अन्यायाला वाचा फोडावीशी वाटत होती. सारखं वाटे कोणाला तरी सांगावं, लिहावं. मात्र बुरखा पांघरून नव्हे. सत्य जगा पुढे यावं. लोकांची सहानुभूती मिळविण्यासाठी नव्हे. एखाद्या स्त्रीने माझं चरित्र वाचून जर धडा घेतला तर माझ्या लिहिण्याचा उद्देश सफल झाला असे मला वाटेल. बुभुक्षित पुरुषाच्या थापेबाजीला बळी पडता कामा नये.

(२) मला जे वाटलं आणि जे घडलं ते प्रामाणिकपणे मांडलं. हेच माझ्या आत्मचरित्राचे मला वैशिष्टच वाटते.

(३) आत्मचरित्र हा प्रकार मला फार आवडतो. त्यातून व्यक्तीच्या जीवनाचे जवळून दर्शन होते. प्रत्येकाच्या आयुष्यातील प्रसंग, अनुभव, परिस्थिती भिन्न भिन्न असते.

(४) 'स्मृतिचित्रां'सारख्या चांगल्या आत्मचरित्रांनी मराठी वाङमयात कितीतरी मोलाची भर घातली आहे. 'सांगत्ये ऐका', 'सांजवात', 'स्नेहांकिता' या आत्मचरित्रांनी भिन्न भिन्न प्रकारचे जीवनदर्शन घडवून फार मोठी कामगिरी केली आहे.

(५) आत्मचरित्राचे भवितव्य निश्चित उज्ज्वल आहे.

**गंगूबाई पटवर्धन (चाकोरीबाहेर) यांचे पत्र : दि. २२–१–७७**

१) माझे पती कै. ना. म. पटवर्धन यांनी 'विरंगुळा' या नावाने आपले आत्मचरित्र लिहिले. त्यात आमच्या नैष्ठिक ब्रह्मचर्याच्या आणाभाकांचा उल्लेख केला. त्यावरून काही मैत्रिणींमध्ये मी असे जीवन का स्वीकारले ह्याबद्दल कुतूहल निर्माण झाले. काही मंडळींनी भलत्या शंका काढून त्यावर अवास्तव टीका केली. तेव्हा माझ्या जीवनाला विशिष्ट वळण कसे लागले हे लोकांस समजावे, माझ्या लहानपणाचे संस्कार व अनुभव त्याला कसे पोषक ठरले व त्यास पुढे अनुकूल वातावरण प्राप्त होऊन मनाने केलेले दृढनिश्चय प्रत्यक्षात कसे उतरले हे एकदा आपण लिहून काढावे म्हणजे लोकांना शंकाकुशंका घेण्यास जागा उरणार नाही असे वाटून मी माझे चरित्र लिहिण्याचा निश्चय केला. नाव काय द्यावे हा प्रश्न पडला तेव्हा आपण इतर मुलींपेक्षा वेगळ्या आहोत. आपल्या जीवनात, सामान्य स्त्रीवर्गाला आवडणाऱ्या पुष्कळ बाबींपासून आपण अलिप्त राहिलो आहोत. त्या

चाकोरीत आपण बसूच शकत नाही असे मनात आले व ' चाकोरीबाहेर ' हे नाव सुचले. माझा लेखन–हेतू सफल झाला आहे असे मला वाटते.

(२) सरळ साध्या भाषेत जसे जीवनात घडले तसे मी आठवणी, डायऱ्या व पत्रे ह्याआधारे विनासंकोच व प्रामाणिकपणे लिहिले आहे. चरित्र हा एका व्यक्तीच्या जीवनाचा इतिहासच ! त्यामुळे कालानुक्रमे सर्व लिहिले आहे. तारीखवार लिहिले ते जरा तितक्या तपशीलवार लिहिले नसते तर बरे झाले असते असे वाटते. कारण सामान्य वाचकांना इतक्या तपशिलाचा कंटाळा येतो.

(३) ' आत्मचरित्र ' हा वाङमय-प्रकार मनोरंजक व उद्‌बोधक आहे असे मला वाटते. व्यक्तीव्यक्तीत आढळून येणारे निरनिराळे स्वभाव व चारित्र्य हे त्यांच्या वेळच्या सामाजिक, राजकीय वातावरणावर व कौटुंबिक परिस्थितीवर कशी अवलंबून असतात हे आपणास समजते व विशाल दृष्टिकोण प्राप्त होतो.

(४) कै. लक्ष्मीबाई टिळक, कै. रमाबाई रानडे ह्या स्त्रियांनी लिहिलेले लिखाण तर मोलाचे आहेच पण अलीकडे श्री. स्नेहप्रभा प्रधान, विजापुरे, आनंदीबाई शिर्के या स्त्रियांनी हा वाङमय-प्रकार हाताळला आहे. त्याने महत्त्वपूर्ण भर पडली आहे. स्वतःचे प्रामाणिक अनुभव स्त्रियांनी चरित्ररूपाने मांडले तर, स्त्रीजीवनातील खऱ्या समस्यांची समाजास जाणीव होईल असे मला वाटते.

(५) ह्यापुढे पुष्कळ स्त्री-लेखिका आत्मचरित्र लिहिण्यास पुढे येतील. एकंदरच हा वाङमय-प्रकार भविष्यात अधिक लोकप्रिय होईल असे मला वाटते.

**सरोजिनी शारंगपाणी (दुर्दैवाशी दोन हात) : यांचे पत्र दि. १–१–७७**

(१) एखादी सत्‌प्रवृत्त, सुशिक्षित, समंजस स्त्री समाजाकडून कशी पीडली जाते, आपला संसार यशस्वी करण्याची महत्त्वाकांक्षा आणि जिद्द अंगी असूनही ठिकठिकाणी स्वार्थ, कोत्या समजुती, सामाजिक, नैतिक आणि कायदेशीर बंधने तिला पदोपदी कशी अडवू शकतात ह्याचे एक उदाहरण म्हणून माझे आत्मचरित्र आहे. कोणत्याही कल्पित कादंबरीपेक्षा अशी आत्मचरित्रे अधिक प्रभावी ठरतात असे मला वाटते. माझ्या पुस्तकाबद्दल जी चर्चा होत आहे त्यावरून मला यश मिळाले असे वाटते.

(२) आत्मचरित्र संयमाने लिहिले आहे. आपला कोणत्याही प्रकारचा अट्टहास, अभिनिवेश नाही किंवा आपली प्रतिमा झगझगीत प्रकाशात उभी केली नाही. त्यात फक्त सामान्य, शिक्षित स्त्रीच्या भावना, विचार आणि कृती यांचे कथन आहे.

(३) आत्मचरित्र हा वाङमय-प्रकार अतिशय लोकप्रिय होण्यासारखा आहे. सामाजिक अडचणी आणि समस्या ह्या लेखनप्रकाराद्वारे उत्तम रीतीने हाताळता येतील.

(४) ह्या वाङ्मय-प्रकारात स्त्रियांनी निश्चितच मोलाची भर टाकलेली आहे. लक्ष्मीबाई टिळक ह्यांची ' स्मृतिचित्रे ' किंवा रमाबाई रानडयांचे आत्म-चरित्र यांचे मोल न जाणणारा साहित्यिक कोठे सापडेल काय ? आत्मचरित्रे ही त्या त्या काळचा सामाजिक इतिहास असतो. सामाजिक इतिहासाचे महत्त्व मनुष्याच्या प्रगतीच्या खुणा त्यात दडलेल्या असल्यामुळे अतिशय असते. असा इतिहास मनमोकळेपणाने सांगणारी आत्मचरित्रे म्हणजे मानवजातीच्या पाऊल-खुणा आहेत असे मला वाटते.

(५) आत्मचरित्र हा वाङ्मय-प्रकार अमर आहे. त्याची रुची इतर कोण-त्याही वाङ्मयप्रकारापेक्षा वेगळी आहे. सामान्यांपासून असामान्यांपर्यंत सर्वांच्या आत्मकथनाला साहित्यात स्थान आहे.

**आशालता सावे (पानाआडचे फूल) यांचे पत्र : दि. १–१–७७**

(१) ' काहीतरी लिहावे ' ही सुप्त इच्छा बरेच दिवस मनात घर करून होती. लोकांच्या मनी-मानसी जाऊन पोचावे असे मला वाटे. काही लिहिता येईल काय ह्याबद्दल मी साशंक होते. बरे, निश्चित काय लिहावे तेही समजत नव्हते. ' तुम्ही तुमच्या जीवनातील अनुभव लिहून काढा. त्यातून सुद्धा सुरेख साहित्य निर्माण करता येईल,' असे जेव्हा मला सांगण्यात आले तेव्हा सामान्य माणसाच्या जीवनातही सांगण्यासारखे काहीतरी असतेच असा विचार करून मी 'पानाआडचा फुला'चा प्रपंच मांडला. माझ्या दृष्टीने या आत्मचरित्रामागील लेखन–हेतू स्पष्ट झाला आहे.

(२) आमच्या रीतिरिवाजासहित थोडक्यात घडविलेले आमचे समाजदर्शन आणि आमच्या वैवाहिक जीवनातले काही अत्यंत नाजूक प्रसंग यांचे मनमोकळे व स्वच्छ निवेदन हे या आत्मचरित्राचे वैशिष्टय होय.

(३) आत्मचरित्र हा वाङ्मय-प्रकार मला आवडतो. प्रत्येकाच्या जीवनाची जडणघडण वेगळी असते. प्रत्येकाच्या जीवनातला संघर्ष सुखदु:ख, आशानिराशा, आनंद व उत्साह हाही वेगवेगळया प्रकारचा असतो. ते वेगळेपण जाणून घेण्यातही एक आगळा आनंद असतो. कल्पनेपेक्षा त्यात ' वास्तवता ' अधिक असल्याने उत्सुकता व ओढ असते.

(४) आत्मचरित्र या वाङ्मय-प्रकारात स्त्रियांनी खरोखर मोलाची भर घातली आहे. लक्ष्मीबाई टिळकांची 'स्मृतिचित्रे', आनंदीबाई शिर्क्यांचे 'सांजवात', स्नेहप्रभा प्रधान यांचे 'स्नेहांकिता', हंसा वाडकरकृत 'सांगत्ये ऐका', आनंदीबाई विजापुरे लिखित 'अजून चालतेची वाट' ही उल्लेखनीय आत्मचरित्रे आहेत.

(५) आत्मचरित्र या वाङमय-प्रकाराचे भवितव्य निश्चितच उज्ज्वल आहे. आतापर्यंत ज्ञात व अज्ञात स्त्रियांनी लिहिलेल्या आत्मचरित्रांचे वाचकांकडून स्वागतच झाले आहे.

**मालतीबाई बेडेकर यांचे पत्र : दि. १०-७-७७**

**आत्मचरित्रातील सत्य–** मनुष्य स्वतःकडे साक्षी म्हणून पाहू शकतो असे क्वचितच घडते. असा मनुष्य विरळाच असतो. त्यामुळे आत्मचरित्र हे निःपक्षपाती आणि सत्याला धरून होऊ शकत नाही. सर्व आयुष्य निःपक्षपातीपणाने पाहण्या-इतकी माणसाची स्मृती धड नसते आणि त्याचे सामर्थ्यही कोते पडते. मनाने जवळची माणसे व मनाने दुरावलेली माणसे त्याबद्दल लिहिताना त्यांचा म्हणून एक रंगीत चष्मा असतो. त्यामुळे लिहिणे त्या रंगाचे होऊन बसते. मनुष्याने आपला अहंभाव सर्वस्वी विसरून टाकायचे म्हटले तरी ते त्याला जमतेच असे नाही. बाल्याबद्दल तो जितके सत्याला स्मरून बोलेल तितका तो पुढील जीवना-बद्दल बोलेलच असे नाही. आत्मचरित्र हे पुष्कळदा शब्द सोडलेल्या धडद्यासारखे असते. म्हणून स्वतःवर लिहिलेली कादंबरी असेच आत्मचरित्राचे स्वरूप जास्त करून असते. कल्पना व सत्य यांची भेसळ त्यात होते. आत्मचरित्र लिहिण्यासाठी अलिप्त मन पाहिजे. जीवनाचे सत्य पाहण्यासाठी जी तत्त्वज्ञाची बैठक पाहिजे ती किती दुर्मिळ असते ? आत्मचरित्र लिहिण्यास घेणारी व्यक्ती स्वतःच्या जीवनात सांगण्यासारखे बरेच आहे अशा अहंकाराने भारलेली असते. किंवा आपले दुःख लोकांना सांगून मनावरचे दडपण कमी करण्यासाठी ती लिहू लागते. लोक काय म्हणतील याची जाणीव लेखकाच्या लेखणीला मनमोकळेपणाने लिहू देत नाही.

**आत्मचरित्र या वाङ्मय-प्रकारात स्त्रियांनी घातलेली भर**

लक्ष्मीबाई टिळक, बाया कर्वे, शीलवती केतकर, आशालता सावे, पार्वती-बाई आठवले अशा काही स्त्रियांच्या आत्मचरित्रांनी मोलाची भर घातली आहे. अर्थात लक्ष्मीबाई टिळक या एकमेव सम्राज्ञी आहेत. आजवरच्या आत्मचरित्रांत त्यांच्या घरगुती जीवनाला प्राधान्य असते. त्यात भावनांचा आविष्कार असतो. स्त्रीजातीने दिलेला सामाजिक लढा त्यात असतो. या सर्व आत्मचरित्रांतून स्त्रीच्या सामाजिक मनाचा विकास आणि त्या विकासासाठी तिला जे सोसावे लागले त्याची कहाणी असते. त्यामुळे स्त्रियांची आत्मचरित्रे जास्त वाचनीय असतात.

**आत्मचरित्राचे भवितव्य**

आनंदीबाई विजापुरे, स्नेहप्रभा प्रधान यांच्याहून मनमोकळे sex-life लिहिण्याऱ्या बायका भेटतील. पण स्वतःशी साक्षीभूत होऊन सत्य लिहिण्याची ताकद कुणाला येईल का हे काळच ठरवील.

**व. रा. बोरगावकर यांचे पत्र : दि. १५-९-७७**

**(१) आत्मचरित्र या वाङ्मय-प्रकाराविषयी मत**

आत्मचरित्र हा एक स्वतंत्र वाङ्मय-प्रकार आहे. आत्मशोधन ही त्यामागील प्रेरणा आहे. बहिर्मुख व अंतर्मुख दृष्टिकोणातून स्वत:कडे व स्वत:भोवती पसरलेल्या जीवनाचे चित्रण त्यात असते. स्वत:ला जाणून घेणे ही खोलवरची इच्छा असते. आत्मनिवेदन हीही आत्मचरित्रलेखनामागील एक प्रेरणा आहे. जिव्हाळा ही या लेखनाची शक्ती आहे. या लेखनात विश्वसनीयता येण्याची अधिक शक्यता आहे. तटस्थपणे स्वत:कडे पाहता यायला हवे. चरित्रलेखन अंतरंगाकडून बाह्य-जीवनाकडे जाऊ इच्छिते. याउलट आत्मचरित्रलेखन अंतरंगाकडून बाह्यजीवनाकडे जाऊ इच्छिते. म्हणून चरित्रलेखनाहून ते वेगळे ठरते. आत्मचरित्रात जीवन-दर्शनाचे सामर्थ्यही अधिक जाणवते.

आत्मचरित्रलेखनाची प्रक्रिया चरित्रलेखनाशी जुळते. कारण सामग्रीची आवश्यकता असते. स्मरण एरव्ही जागे होणार नाही. आत्मचरित्र लेखनात ताजेपणा जाणवतो. आत्मचरित्र लिहिताना आत्मविसर व्हायला हवा. काळाचे चित्र व स्वत:चे चित्र यात प्रमाण हवे. आत्मगौरव, समर्थन, पूर्वग्रह ह्यावर विजय मिळवायला हवा. उतारवयात ही प्रेरणा होते म्हणून समंजसपणा येतो. आत्म-चरित्रकाराने उणिवांचा विचार करायला हवा. लेखनात विमुक्तता हवी. जगण्याला प्रेरणा देणारे हे लिखाण असते. आत्मचरित्रात आत्मशोध अपुरा राहतो. कारण मृत्यूनंतर लिहिता येत नाही. परंतु तरीही पुष्कळसे सांगता येते हे समाधान असते.

**आत्मचरित्रातील सत्य**

आत्मचरित्रातील सत्य मर्यादित व व्यक्तिसापेक्ष असते. आत्मविसर असल्यास सत्यदर्शन होऊ शकेल. तरीही सर्वांचे समाधान होणार नाही. स्वत:ला न्याहाळता यायला हवे. स्वत:चे कुतूहल हवे. तरच हे शक्य होईल. सामाजिक संकेत आड येतील. उघडउघड लिहिणे शिष्टमान्य ठरणार नाही. स्त्रियांच्या आत्मचरित्रांत आणखी मर्यादा येतील. व्यक्तीविषयीचे सत्य त्रिकालाबाधित असणार नाहीच. शिवाय आत्मचरित्र एकदाच व एकाकडूनच लिहिले जाते. तेव्हा सत्यदर्शनावरच भर हवा.

**आत्मचरित्र या वाङ्मयप्रकारात स्त्रियांनी घातलेली भर**

स्त्रियांची आत्मनिवेदनाची गरज आंतरिक असायला हवी. कारण दुसऱ्याच्या कलाने जीवन जगताना स्वत:च्या इच्छा आकांक्षांना मुरड घालावी लागते. आत्म-चरित्रात मन मोकळे करणे शक्य होते. पण त्यासाठी विमुक्तता हवी. संकेत, रूढी यांचे बंधन नको.

स्त्री-स्वातंत्र्याला सामाजिक प्रतिष्ठा असली म्हणजे स्त्री आत्मनिवेदनाला सिद्ध होईल. स्त्री ही स्वत:बद्दल तर लिहीलच तरी पण ती आपल्या जीवन-साथीदाराबद्दल अधिक लिहू शकेल. स्त्रीला शिक्षण हवे, विमुक्तता हवी, समानता हवी म्हणजे हे शक्य होईल.

**आत्मचरित्र या वाङ्मयप्रकाराचे भवितव्य**

आत्मचरित्र हा वाङमयप्रकार मराठी वाङमयात अत्यंत अविकसित, मर्यादित म्हणून त्याचे भवितव्य उज्ज्वल आहे. विविध क्षेत्रांतील लोक आता लिहिताहेत. जीवन रूढिमुक्त होत आहे. अनुभवक्षेत्रे विस्तारताहेत. तेव्हा आत्मचरित्र हा वाङमयप्रकार समृद्ध होण्यास वाव आहे. शिवाय आता दलित लिहू लागले, स्त्रिया शिकू लागल्या, सर्व क्षेत्रात वावरू लागल्या. स्त्री-पुरुष संबंध समानतेच्या पातळीवर येऊ लागले. जीवनाविषयी जाण व समज वाढली. ह्यामुळे आत्मचरित्र-लेखनाला खूप वाव आहे. भवितव्य आहे.

**डॉ. जान्हवी संत यांचे पत्र : दि. २३-१०-७७**

**आत्मचरित्र या वाङ्मय-प्रकाराविषयी मत**

आत्मचरित्र हा चरित्राचाच एक प्रकार आहे. प्रत्येक व्यक्तीचे जीवन एक कादंबरी असते. प्रत्येक व्यक्ती आत्मचरित्र लिहू शकते. वाङमयाच्या विविध प्रकारांपैकी सर्वात सोपा पण तितकाच अवघड असा हा प्रकार आहे. सोपा असण्याचे कारण स्वत:च्या जीवनाशी माणूस सहज समरस होतो. परंतु स्मरणशक्ती व सत्यकथन यामुळे ते लिहिणे कठीण होते. निवेदनकौशल्यास फार महत्त्व आहे. स्वत:चे भावविश्व आत्मचरित्रकारच साकार करू शकतो. व्यक्तीच्या जीवनामागील दृष्टिकोणही तोच सुसंगतपणे व्यक्त करू शकत असल्याने आत्मचरित्र या वाङमय-प्रकाराचे महत्त्व आगळे आहे.

**आत्मचरित्रातील सत्य**

सत्य हे व्यक्तिसापेक्ष असते. मनुष्याला आपल्याबद्दल जे वाटते ते सत्य वा दुसऱ्याला आपल्याबद्दल जे वाटेल ते सत्य ? त्यामुळे संपूर्ण सत्य सांगण्याचा आग्रह करणे अयोग्यच. सत्यकथन तर असावे परंतु आत्मस्तुती टाळून स्वत:ची वंचना न करता बऱ्यावाईट गोष्टींची माहिती द्यावी. ज्या घटनाप्रसंगांमुळे व्यक्तित्व साकार होईल त्या घटनाप्रसंगाचा उल्लेख करावा.

**आत्मचरित्रांत स्त्रियांनी घातलेली भर**

मराठीत पुरुषांपेक्षा स्त्रियांनीच हा वाङमय-प्रकार अधिक कलात्मकतेने हाताळला आहे व मोलाची भर घालण्यास त्या कारणीभूत झाल्या आहेत. उदाहरणार्थ, रमाबाई रानडे यांचे ‘आमच्या आयुष्यातील काही आठवणी.’

न्यायमूर्ती रानड्यांसारख्या राजकीय व सामाजिक पुढाऱ्याचे घरगुती चित्रण, खाजगी व्यक्तित्व साकार करताना त्यांच्या सार्वजनिक जीवनाला धक्का लागत नाही. हेच या आत्मचरित्राचे वैशिष्टय होय. आनंदीबाई कर्वे यांचे ' माझे पुराण ' यातून भारतीय स्त्रीच्या विकासाची वाटचाल कळते, तसेच विधवा स्त्रियांची तत्कालीन परिस्थिती चटका लावते. ' स्मृतिचित्रे ' म्हणजे लक्ष्मीबाईंनी मराठी वाङमयाला दिलेली अमोल देणगी होय. कलात्मक गुण, विनोद व चटका लावणारे प्रसंग यातून रसिकता व मार्मिकता हे गुण आत्मचरित्रास किती आवश्यक आहे हे जाणवते. आत्मचरित्र कसे असावे याचे उत्तम उदाहरण म्हणजे ' स्मृतिचित्रे ' होय. नाटयमय घटनांनी भरलेले जीवन म्हणजे हंसा वाडकरकृत ' सांगत्ये ऐका ' हे आत्मचरित्र होय. खळबळजनक घटना, धक्कादायक प्रसंग व त्यांची प्रांजलपणे मांडणी या आत्मचरित्रात झालेली आहे.

**आत्मचरित्र या वाङ्मय-प्रकाराचे भवितव्य**

ललित आणि ललितेतर या दोन्ही प्रांतांवर आपला हक्क गाजविणाऱ्या या वाङमय-प्रकाराला आधुनिक जीवनाच्या विविध प्रांगणांत वावरणाऱ्या व्यक्तीं-करिता विविधांगी विषय उघडे पडले आहेत. आत्मचरित्र का लिहावे ? कशा-करिता लिहावे याची जाणीव होणे आवश्यक आहे. पण आज आम्ही जीवनाकडे सखोलतेने पाहत नाही. वेळ नाही. इच्छा नाही. बदलणाऱ्या जीवनाचा मागोवा घेण्याची कुवत नाही. आत्मचरित्रांचे मराठी साहित्यातील स्थान आतापर्यंत आशादायक नाही. ते पाहता भवितव्य उज्ज्वल आहे असे म्हणता येत नाही.

०००

# संदर्भ–सूची

**आधारभूत ग्रंथ**


–अत्रे सुधाताई, गोदातरंग, आवृत्ती पहिली, ग. पां. परचुरे, मुंबई, १९६९

–आजरेकर वेणूबाई, माझा नाना, आवृत्ती पहिली, वेणूबाई आजरेकर, पुणे १९४९

–आठवले पार्वतीबाई, माझी कहाणी, आवृत्ती दुसरी, भा. धों. कर्वे, पुणे, १९३६

–आठवले सई, आंब्याचा टाळा, आवृत्ती पहिली, शांता आठवले, पुणे, १९७४

–आपटे राधाबाई, उमटलेली पावले, आवृत्ती पहिली, राधाबाई आपटे, पुणे, १९६१

–आपटे राधाबाई, ढळला रे ढळला दिन सखया, आवृत्ती पहिली, कमल आपटे, पुणे, १९५८

–आपटे शांता, जाऊ मी सिनेमात ?, आवृत्ती पहिली, बी. गोविंद, मुंबई, १९४०

–कर्वे आनंदीबाई, माझे पुराण, आवृत्ती दुसरी, के. भि. ढवळे, मुंबई, १९५१

–केतकर शीलवती, मीच हे सांगितलं पाहिजे, आवृत्ती पहिली, ह. वि. मोटे, मुंबई, १९६९

–केदार रमाबाई, वेचलेले मणी, आवृत्ती पहिली, व्ही. टी. केदार, नागपूर, १९५२

–केळकर गिरिजाबाई, द्रौपदीची थाळी, आवृत्ती पहिली, मनोहर केळकर, पुणे, १९५९

–जोशी यशोदाबाई, आमचा जीवन प्रवास, आवृत्ती पहिली, व्हीनस, पुणे, १९६५

–टिळक लक्ष्मीबाई, स्मृतिचित्रे, अभिनव आवृत्ती, अ. दे. टिळक, नाशिक, १९७३

–डांगे उषा, पण ऐकतं कोण ?, आवृत्ती पहिली, अपूर्व मुंबई, १९७०

–देशपांडे कमलाबाई, स्मरण–साखळी, आवृत्ती पहिली, मनोहर केळकर, पुणे, १९४३

–देसाई मृणालिनी, निशिगंध, आवृत्ती पहिली, पॉप्युलर, मुंबई, १९६८

–पटवर्धन गंगूबाई, चाकोरीबाहेर, आवृत्ती पहिली, गंगूबाई पटवर्धन, पुणे, १९७४

–पटवर्धन लक्ष्मीबाई, माझा नंदादीप, लक्ष्मीबाई पटवर्धन, पुणे, १९५२

–पटवर्धन लीलाबाई, आमची अकरा वर्षे, आवृत्ती पहिली, य. गो. जोशी, पुणे, १९४५

–परुळेकर गोदावरीबाई, जेव्हा माणूस जागा होतो, आवृत्ती पहिली, मौज, मुंबई, १९७०

–प्रधान स्नेहप्रभा, स्नेहांकिता, आवृत्ती पहिली, पॉप्युलर, मुंबई, १९७३

–फडणीस जानकीबाई, स्मरणमाला, आवृत्ती पहिली, साहित्य सहकार संघ, मुंबई, १९७०

–भागवत इंदिराबाई, या सदाशिव, आवृत्ती पहिली, डी. जी. जोशी, पुणे, १९४८

–भाटे रोहिणी, माझी नृत्यसाधना, आवृत्ती पहिली, सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला, पुणे, १९५०

–भालेराव प्रमिलाबाई, अश्वत्थाची फुले, आवृत्ती पहिली, मराठवाडा साहित्य परिषद, नांदेड, १९७२

–भोळे ज्योत्स्नाबाई, स्वरवंदना, आवृत्ती पहिली, स्वाती, पुणे, १९७०

–रानडे अन्नपूर्णाबाई, स्मृतितरंग, आवृत्ती पहिली, रा. ज. देशमुख, पुणे, १९४७

–रानडे रमाबाई, आमच्या आयुष्यातील काही आठवणी, आवृत्ती सातवी, के. ग. शारंगपाणी, पुणे, १९५३

–वाडकर हंसाबाई, सांगत्ये ऐका, आवृत्ती दुसरी, राजहंस, पुणे, १९७२

–विजापुरे आनंदीबाई, अजून चालतेची वाट, आवृत्ती पहिली, कुलकर्णी ग्रंथागार, पुणे, १९७२

–शहा सुमतीबाई, हे गीत जीवनाचे, आवृत्ती पहिली, कुलकर्णी ग्रंथागार, पुणे, १९७१

–शारंगपाणी सरोजिनी, दुर्दैवाशी दोन हात, आवृत्ती पहिली, प्रपंच, पुणे, १९७५

–शिर्के आनंदीबाई, सांजवात, आवृत्ती पहिली, मौज, मुंबई, १९७२

–सावे आशालता, पानाआडचे फूल, आवृत्ती पहिली, पॉप्युलर, मुंबई, १९७५

–सुखात्मे सत्यभामाबाई, गेले ते दिवस, आवृत्ती पहिली, ग. पां. परचुरे, मुंबई, १९६४

–हिवाळे रुथबाई, आमचे कृतार्थ सहजीवन, आवृत्ती पहिली, अ. ज. प्रभू, पुणे, १९६८

## संदर्भ ग्रंथ

### मराठी ग्रंथ

–अत्रे प्र. के., कऱ्हेचे पाणी, खंड पहिला, वि. ग. परचुरे, मुंबई, १९६३

–अत्रे प्र. के., कऱ्हेचे पाणी, खंड दुसरा, ग. पां. परचुरे, मुंबई, १९६४

–अत्रे प्र. के., कऱ्हेचे पाणी, खंड तिसरा, ग. पां. परचुरे, मुंबई, १९६५

–अत्रे प्र. के., कऱ्हेचे पाणी, खंड चवथा, ग. पां. परचुरे, मुंबई, १९६७
–अत्रे प्र. के., कऱ्हेचे पाणी, खंड पाचवा, ग. पां. परचुरे, मुंबई, १९६८
–अत्रे प्र. के., मी कसा झालो, ग. पां. परचुरे, मुंबई, १९६७
–आजगावकर ज. र., महाराष्ट्र संतकवयित्री, भारत गौरव ग्रंथमाला, मुंबई, १९३९
–आनंदकर पिरोज, संत कवयित्री, दि रिसर्च आयडियल पब्लिशिंग हाऊस, पुणे, (का. ना.)
–आपटे ह. ना., विदग्ध वाङमय, आवृत्ती तिसरी, आर्यभूषण, पुणे, १९३५
–कर्वे इरावती, गंगाजल, देशमुख आणि कंपनी, पुणे, १९७२
–कर्वे इरावती, धर्म, आवृत्ती दुसरी, देशमुख आणि कंपनी, पुणे, १९७२
–कर्वे धों. के., आत्मवृत्त, का. र. मित्र, मुंबई, १९१५
–कऱ्हाडे सदा, चरित्र आणि आत्मचरित्र, लोकसाहित्य, मुंबई, १९७६
–किर्लोस्कर शं. के., शंवाकीय, किर्लोस्कर, पुणे, १९७४
–कीर धनंजय, महात्मा ज्योतीबा फुले, पॉप्युलर, मुंबई, १९७३
–कुलकर्णी कृ. पां., कृष्णाकाठची माती, भारती, मुंबई, १९६१
–कुलकर्णी गो. ग., साहित्य दलित आणि ललित, नूतन, पुणे, १९७७
–कुलकर्णी गो. म., वाटा आणि वळणे, नवसाहित्य, बेळगाव, १९७५
–कुलकर्णी वा. ल., वाङमयीन टीपा आणि टिप्पणी, पॉप्युलर, मुंबई, १९७०
–कुलकर्णी वा. ल., वाङमयातील वादस्थळे, पॉप्युलर, मुंबई, १९६२
–कुलकर्णी वा. ल., साहित्य स्वरूप आणि समीक्षा, पॉप्युलर, मुंबई, १९७५
–केळकर का. न., वाळवंटातील पावले, ल. ग. ठोकळ, पुणे, १९६३
–केळकर न. चिं., गतगोष्टी, अर्थात माझी जीवनयात्रा, य. न. केळकर, पुणे, १९३९
–कोल्हटकर चिं. ग., बहुरूपी, आवृत्ती दुसरी, मौज, मुंबई, १९६३
–गाडगीळ गंगाधर, खडक आणि पाणी, पॉप्युलर, मुंबई, १९६०
–गाडगीळ गंगाधर, साहित्याचे मानदंड, पॉप्युलर, मुंबई, १९६२
–गाडगीळ न. वि., पथिक, भाग पहिला, व्हीनस, पुणे, १९६४
–गाडगीळ न. वि., पथिक, भाग दुसरा, व्हीनस, पुणे, १९६५
–गाडगीळ न. वि., पथिक, भाग तिसरा, व्हीनस, पुणे
–गोडसे गोपाळ, गांधीहत्या आणि मी, अस्मिता, पुणे, १९६७
–घाटे वि. द., दिवस असे होते, मौज, मुंबई, १९७३
–चापेकर ना. गो., जीवनकथा, ल. ना. चापेकर, पुणे, १९४३
–जोग वि. स., मार्क्सवाद आणि मराठी साहित्य, विजय प्रकाशन, नागपूर, ८१

–जोशी अ. म., चरित्र, आत्मचरित्र, तंत्र आणि इतिहास, सुविचार, नागपूर, १९६४
–जोशी मो. वा., एका पथिकाची जीवनयात्रा, पॉप्युलर, मुंबई, १९६४
–जोशी रा. भि., साहित्य संवाद, इनामदार बंधू, पुणे (का. ना)
–जोशी. वा. म., विचार-सौंदर्य, व्हीनस, पुणे, १९५९
–टिळक कमलाबाई, स्त्री-जीवनाची नवी क्षितिजे, जगन्नाथ, पुणे, १९६५
–टेंबे गो. स., माझा संगीत व्यासंग, किर्लोस्कर, किर्लोस्कर वाडी (का. ना.)
–ठाकरे प्रबंधनकार, माझी जीवनगाथा, सोमैया पब्लिकेशन्स, मुंबई, १९७३
ठिपसे प्रतिभा, हृद्‌गत, रामचंद्र धोंडो दास्ताने, पुणे, १९८१
–तळवलकर गोविंद, नवरोजी ते नेहरू, के. वि. कोठावळे, मुंबई, १९६९
–दांडेकर गो. नी., स्मरणगाथा, मॅजेस्टिक, मुंबई, १९७३
–दांडेकर वि. पां., मराठी साहित्याची रूपरेषा, वि. पां. दांडेकर, बडोदे, १९६१
–देवगिरिकर त्र्यं. र., भारतीय स्वातंत्र्याचा इतिहास, भारत ग्रंथमाला, पुणे, १९६९
–देवधर सी. ग., माझा जीवनवृत्तांत, पु. वि. बापट, सातारा, १९२७
–देशपांडे अ. ना., आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास, भाग पहिला, व्हीनस, पुणे, १९७४
–देशपांडे अ. ना., आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास, भाग दुसरा, व्हीनस, पुणे, १९५८
–देशपांडे अ. ना., प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, उत्तरार्ध, व्हीनस, पुणे, १९६९
–देशपांडे कमलाबाई, अपौरुषेय वाङ्मय, मनोहर ग्रंथमाला, पुणे, १९६८
–देशपांडे कमलाबाई, स्त्रियांच्या कायद्याची वाटचाल, मनोहर ग्रंथमाला, पुणे, १९६०
–देशमुख प्र. रा., सिंधू संस्कृती-ऋग्वेद व हिंदू संस्कृती, प्राज्ञशाळा मंडळ, वाई (का. ना.)
–देशमुख शारदा, शिवकालातील व पेशवेकालातील स्त्री-जीवन, पुणे विद्यापीठ, पुणे, १९७३
–देसाई वसंत, अशीच गोष्ट, सोमैया पब्लिकेशन्स, मुंबई, १९७३
–नगरकर राम, रामनगरी, मजेस्टिक, मुंबई, १९७५
–पटवर्धन ना. म., विरंगुळा, व्हीनस, पुणे, १९६०
–परुळेकर ना. भि., निरोप घेता, सकाळ, पुणे, (का. ना.)
–पाध्ये प्रभाकर, टिकेकर श्री. रा., आजकालचा महाराष्ट्र, भारत गौरव ग्रंथमाला, मुंबई, १९३५
–पंगु द. सी., पुष्पांजली, द. सी. पंगु, कोल्हापूर, १९४८

–पांगारकर ल. रा., चरित्रचंद्र, ल. रा. पांगारकर, नाशिक, १९३९
–पांगारकर ल. रा., मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड तिसरा, के. भि. ढवळे, मुंबई
–पिंगे रवींद्र, शतपावली, राजहंस, पुणे, १९७४
–पेंढारकर बाबुराव, चित्र आणि चरित्र, व्हीनस, पुणे, १९६१
–पेंडसे श्री. ना., श्री. ना. पेंडसे लेखक आणि माणूस, मौज, मुंबई, १९७४
–फडकुले निर्मलकुमार, लोकहितवादी, काल आणि कर्तृत्व, कॉंटिनेंटल, पुणे, १९७३
–फडके ना. सी., माझे जीवन, एक कादंबरी, कुलकर्णी ग्रंथागार, पुणे (का. ना.)
–फडके य. दि., बाळगोपाळांचा शोध, श्रीविद्या, पुणे, १९७७
–बापट प्र. वा., गोडबोले ना. वा., मराठी कादंबरी, तंत्र आणि विकास,
–प्र. वा. बापट, ग्वाल्हेर, १९३८
–बाबर सरोजिनी, महाराष्ट्र लोकसंस्कृती व साहित्य, नॅशनल बुक ट्रस्ट, दिल्ली, १९७३
–बेडेकर दि. के., साहित्य विचार, पॉप्युलर, मुंबई १९६४
–भावे वि. ल., महाराष्ट्र सारस्वत, वि. ग. माटे, पुणे, १९५४
–भागवत दुर्गा, केतकरी कादंबरी, मौज, मुंबई, १९६७
–भागवत दुर्गा, डूब, ग्रंथाली, मुंबई, १९७५
–भागवत दुर्गा, धर्म आणि लोकसाहित्य, पॉप्युलर, मुंबई, १९७५
–भोसले शिवाजी, महात्मा ज्योतिराव फुले, एक चिंतन, व्हीनस, पुणे, १९७०
–भोळे केशवराव, जे आठवतं ते, प्रेस्टीज, पुणे, १९७४
–मर्ढेकर बा. सी., सौंदर्य आणि साहित्य, मौज, मुंबई, १९६०
–माटे श्री. म., साहित्यधारा, ठोकळ, पुणे, १९६३
–माटे श्री. म., चित्रपट, व्हीनस, पुणे, १९५७
–माटे श्री. म., आपापले हितगूज, आवृत्ती तिसरी, श्री. म. माटे, पुणे, १९४५
–मोटे कृष्णाबाई, काळाची पाऊले, विश्वकर्मा साहित्यालय, पुणे, १९७३
–राजंदेकर, ह. सी., महाराष्ट्रीय पंचांग, वा. ह. राजंदेकर, अकोला, १९७६–७७
–वाटवे के. ना., माझी वाटचाल, जोशी आणि लोखंडे, पुणे, १९६४
–वैद्य सरोजिनी, माती आणि मूर्ती, मॅजेस्टिक, मुंबई, १९७५
–शिंदे कर्मवीर, माझ्या आठवणी व अनुभव, श्री लेखन-वाचन भांडार, पुणे, १९५८
–सरदार गं. बा., तुकाराम-दर्शन, मॉडर्न बुक डेपो, पुणे, १९६८
–सरदेसाई र. गो., आमचा संसार, परचुरे, मुंबई, १९५०
–सरवटे वि. सी., मराठी साहित्य समालोचन, खंड तिसरा, महाराष्ट्र साहित्य सभा, (स्थ. ना.,) १९६९
–सहस्रबुद्धे अ. वा., माझी घडण, साधना, पुणे, १९५७
–साधले आनंद, मातीची चूल, सुनंदा, मुंबई, १९७०

—सामंत बाळ, हितगूज, सोमैया, मुंबई, १९६५
—सावरकर वि. दा., माझी जन्मठेप, सारस्वत प्रिंटिंग अ‍ॅण्ड पब्लिशिंग कंपनी लोकसेवक, मुंबई, १९२७
—संत जान्हवी, चरित्र–आत्मचरित्र, मोघे, कोल्हापूर, (का. ना.)
—संत दु. का., वाङ्मयीन विद्वत्ता, पुणे विद्यापीठ, पुणे, १९७६
—क्षीरसागर श्री. के., टीकाविवेक, पॉप्युलर, मुंबई, १९६५
—क्षीरसागर श्री. के., तसवीर आणि तकदीर, पॉप्युलर, मुंबई, १९७६
—क्षीरसागर श्री. के., समाज-विकासः समाज आणि संस्कृती यासंबंधीचे विचार,
—कॉन्टिनेंटल, पुणे, १९५१

## संपादित व अनुवादित ग्रंथ

—अनसूयाबाई आणि मी, संपा. सुरेश डोळके, व्हीनस, पुणे, १९६२
—अर्वाचीन मराठी साहित्य, संपा. मानेपाटील, जोशी, नेने, बडोदे, १९३५
—आधुनिक भारत, संपा. शं. दा. जावडेकर, स. ज-भागवत, सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला, पुणे, १९६८
—उद्ध्वस्त क्षितिज, संपा. अशोक जैन, ग्रंथाली, मुंबई, १९७६
—तरंग आणि तुषार, संपा. दातार-राजगुरू–आंबेकर, काँटिनेंटल, पुणे, १९७०
—नवसमीक्षा काही विचारप्रवाह, संपा. गो. म. कुलकर्णी, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९८२
—प्रदक्षिणा, काँटिनेंटल, पुणे, १९६८
—भारतीय स्त्री, संपा. श्री. ना. बनहट्टी, मो. ज्ञा. शहाणे, हिंगणे स्त्री-शिक्षण संस्था, पुणे, १९६७
—भारतीय स्त्री-धर्माचा आदर्श, अनु. कमल पाध्ये, प्राज्ञशाळा मंडळ, वाई, १९६७
—मी इझाडोरा डंकन, अनु. रोहिणी भाटे, महाराष्ट्र राज्य संस्कृती मंडळ, मुंबई, १९७९
—रावबहादूर दादोबा पांडुरंग, संपा. अ. का. प्रियोळकर, केशव भिकाजी ढवळे, मुंबई, १९४७
—लीळाचरित्र उत्तरार्थ, भाग पहिला, संपा. शं. गो. तुळपुळे, सुविचार, नागपूर, १९६४
—लीळाचरित्र एकांक, संपा. शं. गो. तुळपुळे, सुविचार, नागपूर, १९७२
—लोकहितवादींची शतपत्रे, संपा. पु. ग. सहस्रबुद्धे, काँटिनेंटल, पुणे, १९६३
—विश्रब्ध शारदा, खंड पहिला, संपा. ह. वि. मोटे., ह. वि. मोटे, मुंबई, १९७२
—सत्याचे प्रयोग, अनु. सी. पु. पटवर्धन, नवजीवन, अलाहाबाद, १९६९
—संपूर्ण आगरकर, भाग पहिला, संपा. मा. दा. अळतेकर, पुणे, १९३७

—स्मृतिस्थळ, संपा. वा. ना. देशपांडे, सरस्वती, यवतमाळ, १९३९
—श्रीसकलसंतगाथा : खंड एक, संपा. का. अ. जोशी, र. शं. आवटे, पुणे, १९६७
—श्रीसकल संतगाथा : खंड दोन, संपा. का. अ. जोशी, र. शं. आवटे, पुणे, १९६७
—श्रीज्ञानेश्वरी, महाराष्ट्र राज्य शिक्षण खाते, मुंबई १९३०

**अप्रकाशित प्रबंध**

—गायधनी त्र्यबंक गंगाधर, प्राचीन मराठी चरित्रे आणि आत्मचरित्रे यांचा वाङमयप्रकारात्मक अभ्यास—प्रारंभापासून १८१८ पर्यंत, मार्गदर्शक: डॉ. म. अ. करंदीकर, मुंबई विद्यापीठ, मुंबई, १९६५
—पाटकर रा. ना., आत्मचरित्र : एक वाङमय प्रकार आणि मराठी आत्मचरित्रे, मार्गदर्शक: गं. ब. ग्रामोपाध्ये, मुंबई विद्यापीठ, मुंबई, १९६६
—बोरगावकर व. रा., प्राचीन मराठी वाङमयातील चरित्रात्मक आणि आत्मचरित्रात्मक लेखनाचा समीक्षणात्मक अभ्यास, मार्गदर्शक : वा. ल. कुलकर्णी, मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, १९६७
—संत दु. का., मराठी साहित्यातील स्त्री-जीवन, मार्गदर्शक के. ना. वाटवे, मुंबई विद्यापीठ, मुंबई, १९५०

**संस्कृत-ग्रंथ**

—श्रीसार्थ मनुस्मृति : संपा. वे. शा. सं. पंडित रामचंद्रशास्त्री अंबादास जोशी, श्रीगुरुदेव प्रकाशन, पुणे, (का. ना.)
—श्रीमन्महाभारतम्, प्रथमो भागः, गीताप्रेस, गोरखपूर, (प्रथम संस्करणम्) संवत् २०१३
—श्रीमद्भागवतम्, प्रथमः खन्डः, गीता प्रेस गोरखपूर, (पंचम संस्करणम्) संवत् २०२१
—श्रीमद्भगवद्गीता, अ. नु. श्रीहरिकृष्णदास गोयन्दका, गीता प्रेस, गोरखपूर, (एकादश संस्करणम्) सवंत् २०२४

**हिंदी-ग्रंथ**

—आचार्य चतुरसेन, वैशालीकी नगरवधू, उत्तरार्थ, चतुरसेन कथा साहित्य, (स्थ. ना.) १९४६
—दुआ सरला, आधुनिक हिंदी साहित्यमें नारी, श्रद्धानंद पार्क, कानपूर, १९६५
—बजाज जानकीदेवी, मेरी जीवनयात्रा, सत्साहित्य, दिल्ली, १९५६
—मिश्र भुवनेश्वरनाथ, जीवनके चार अध्याय, लोकभारती, इलाहाबाद (का. ना.)
—राकेश मोहन, लहरोंके राजहंस, राजकमल, देहली, १९६३

–शर्मा बेचन, अपनी बखर, राजकमल, देहली, १९६०
–क्षेमचन्द्र ' सूमन,' योगेंद्रकुमार मल्लिक, साहित्यविवेचन, रामलालपुरी, देहली, १९६३

संपादित व अनुवादित-ग्रंथ

–जीवनस्मृतियाँ, संपा. क्षेमचन्द्र ' सुमन ' रामलालपुरी, देहली (का. ना.)
–यादोंकी बारात, अनु. हंसराज, राजपाल एन्ड सन्स, देहली, १९७२
–हिंदीकी महिला साहित्यकार, संपा. सत्यप्रकाश ' मिलिंद,' रूपकमल, देहली, १९६०

इंग्रजी-ग्रंथ

–Bats E. Stuart, Inside out, An Introduction to Autobiography Vol. II, Basil Blackwell, 1937.
–Boswell James, Boswell's life of Johnson, Vol. I, Henry Frowde, London, 1904
–David Daiches, Critical approaches to Literature, orient Longmans, Bombay, 1967
–Gill Eric, Autobriography, The Right Book Club, London, 1944
–Maurois Andre, Aspects of Biography, C. U. P. 1929
–Naik D. G, Art of Autobiography, Vidarbha Marathawada Book Company, Poona, 1962
–Nicolson Harold, The Development of English Biography, The Hogarth Press, London, 1947
–Roy Pacal, Design and Truth in Autobiography, Rontledge and Kegan Paul, London, 1960
–Sideney Lee, The Perspective of Autobiography, London, 1917

संपादित इंग्रजी-ग्रंथ

–Autobiography as an Art. Ed. James Clifford, Oxford University Press, New York Toranto, 1962
–Encyclopeadia Britannica, Vol. 2, William Benton, London, 1969.
–Dictonary of World Literature, Ed. J. Shipley, Littlefield, Adams, 1964

–Oxford, Dictonary of English Language Ed. By R. W. Burchfield Oxford University Press, London, 1957
- Webster New International Dict onary, Ed Philip Babcock Gove and The Merriam webster Editorial staff. Vol. I. U. S. A. 1967.

**नियतकालिकांतील संदर्भ**

–कर्वे चिं. ग., माझे पुराण, म. सा. प. जुलै, १९४५
–कवडी नरेश, दोन आत्मचरित्रे, सत्यकथा, जुलै, १९७६
–कवडी नरेश, दोन आत्मनिवेदने, सत्यकथा, जून १९७४
–कवडी नरेश, स्मरणगाथा: वास्तव आणि अवास्तव, सत्यकथा, ऑक्टोबर १९७७
–कालगावकर, माझ्या इतिहास संशोधनाची अव्वल, अखेर हकीकत व तदंतर्गत आत्मचरित्रे, म. सा. प. ऑक्टो-डिसें. १९१९.
–काळे अक्षयकुमार, तसबीर आणि तकदीर, युगवाणी, जून-जुलै, १९७७
–किर्लोस्कर शं. वा., मी आत्मचरित्र का लिहिले ? ललित, दिवाळी, १९७२
–कुलकर्णी अंजली, अश्वत्थाची फुले, प्रतिष्ठान, आक्टोबर, १९७४
–कुलकर्णी गो. ग., स्मरणगाथा, संदर्भ, जानेवारी-फेब्रुवारी, १९७५
–कुलकर्णी गो. ग., आजची आत्मचरित्रे, आलोचना, डिसेंबर १९७३
–कुलकर्णी द. भि., सरगम, युगवाणी, ऑगस्ट-सप्टेंबर, १९७७
–कुलकर्णी द. भि., सांजवात, ललित, मे १९७३
–कुलकर्णी द. भि., माय स्टोरी, तरुण भारत (रविवार), नागपूर, ८-५-१९७७
–कुलकर्णी द. भि., पंचवीस वर्षांतील आत्मचरित्रे, युगवाणी, जून-जुलै १९८०
–कुलकर्णी पद्माकर, एका रसिक विचारवंताची कहाणी, महाराष्ट्र टाइम्स २६-६-१९७७
–कुलकर्णी भीमराव, हितगूज, म. सा. प., एप्रिल-मे-जून, १९६६
–कुलकर्णी वि. म., उमटलेली पावले, म. सा. प., ऑक्टोबर, १९६२
–चपळगावकर नरेंद्र, स्त्रियांचे चरित्र-आत्मचरित्रपर लेखन, प्रतिष्ठान, मार्च, १९७१
–चाफेकर ना. गो., प्रो. कर्वे यांचे आत्मवृत्त, विविध ज्ञान विस्तार, जानेवारी, १९४८
–जावळे बाबा, माझ्या जीवनातील हंसा वाडकर, अपर्णा, दिवाळी, १९७६
–जोग ल. ग., १९७४ मधील चरित्र-आत्मचरित्र, ललित ऑगस्ट, १९७५
–जोग ल. ग., १९७५ मधील चरित्र-आत्मचरित्र, ललित ऑगस्ट, १९७६
–जोशी अ. मु., स्मरणसाखळी, म. सा. प., एप्रिल, १९७४

–जोशी ना. ग., चरित्रे-आत्मचरित्रे, म. सा. प., जाने-मार्च, १९६२
–जोशी रा. भि., चरित्र-आत्मचरित्रे, म. सा. प., जुलै-सप्टें., १९६५
–दामले आशा, स्नेहांकिता, सत्यकथा, जुलै, १९७३
–दारव्हेकर पुरुषोत्तम, स्मरणमाला, आलोचना, जुलै, १९७०
–दावतर वसंत, १९६७ मधील चरित्र-आत्मचरित्र, ललित, फेब्रु. १९६८
–दावतर वसंत, मीच हे सांगितलं पाहिजे, आलोचना, जुलै, १९६९
–दावतर वसंत, सांजवात, कौटुंबिक जीवनातील हर्षामर्ष व्यक्त करणारे आत्मकथन, आलोचना, एप्रिल १९७३
–देव वीणा, आप्पा, ललित, जुलै, १९७६
–देशमुख मा. गो. माझे जीवन एक कादंबरी, प्रतिष्ठान, डिसें., १९६९
–डबीर विजया, गोदातरंग, प्रतिष्ठान, नोव्हें., १९७०
–पगडी सेतुमाधवराव, मी आत्मचरित्रे का वाचतो ?, सोबत, दिवाळी, १९७६
–पाटकर र. ना., १९७० मधील आत्मचरित्रे, ललित, फेब्रु. १९७१
–पाटील सुशीला, गेल्या शतकातील धर्मकल्पना, मनोरा, दिवाळी, १९७६
–पाध्ये द. वि., निशिगंध, आलोचना, जानेवारी, १९६९
–पाध्ये प्रभाकर, स्मृतिचित्रांतील टिळकदर्शन, सत्यकथा, जुलै, १९७६
–पारसनीस कुंदा, स्नेहांकिता, युगवाणी, फेब्रु. मार्च, १९७६
–पारसनीस कुंदा, सांजवात, युगवाणी, एप्रिल–मे, १९७३
–पंडित वि. वा., स्त्रियांचे अधिकार, वि. ज्ञा. वि., ७–६–१९१५
–पांगारकर ल. रा., दादोबांचे आत्मचरित्र आणि मराठी गद्यग्रंथांचा उदय, वि. ज्ञा. वि.
–फडके भालचन्द्र, रामनगरी, ललित, जुलै, १९७६
–फडके भालचन्द्र, अलिकडील आत्मचरित्रे: काही विचार, म. सा. प. एप्रिल–मे–जून, १९७६
–फडके य. दि., दोन आत्मवृत्ते, सत्यकथा, जाने., १९६६
–बागूल बाबुराव, गोदातरंग, आलोचना, मे, १९७०
–बाबर सरोजिनी, स्त्रियांची भाषा, म. सा. प., जुलै–सप्टे., १९६६
–बांदिवडेकर चंद्रकांत, जेव्हा माणूस जागा होतो, आलोचना, नोव्हे., १९७०
–बेहरे ना. के., आत्मचरित्रे, म. सा. प., डिसें. १९५३
–भणगे भा. शं., ठाकरे यांची जीवनगाथा, समाज प्रबोधन पत्रिका, मे–जून, १९७४
–भागवत दुर्गा, सनसनाटी यशासाठी, ललित, जाने., १९७२
–भागवत दुर्गा, माझी जीवनयात्रा, आप्पा पटवर्धन, ललित, मार्च, १९७२

—भावे नीलिमा, पेडणेकर अ. ना., दोन आत्मचरित्रे गृहिणींची, सत्यकथा, ऑक्टो., १९७७
—भेंडे सुभाष, जेव्हा माणूस जागा होतो, नवभारत, सप्टें., १९७०
—महाराष्ट्र साहित्य पत्रिका-आत्मचरित्र विशेषांक, दिवाळी, १९८३
—मनोहर माधव, लोकमत (रविवारची पुरवणी), नागपूर, २७–८–१९७७
—मनोहर यशवंत, सांगत्ये ऐका, प्रतिष्ठान, फेब्रु., १९७१
—माडखोलकर ग. त्र्यं., मातीच्या चूलच्या निमित्ताने, ललित, डिसें. १९७१
—मोटे कृष्णाबाई, स्नेहांकिता, सत्यकथा, मे, १९७३
—मोटे कृष्णाबाई, १९६८ मधील चरित्रे, आत्मचरित्रे व आठवणी, ललित, मे, १९६९
—राजाध्यक्ष म. वि., कुणा एकाची भ्रमणगाथा, छंद, मार्च–एप्रिल, १९५८
—वगळ सुधा, १९७२ मधील चरित्र-आत्मचरित्र, ललित, मार्च, १९७३
—वैद्य सरोजिनी, १९७१ मधील चरित्र-आत्मचरित्र, ललित, मे, १९७२
—शेळके शांता, चरित्रे-आत्मचरित्रे, म. सा. पा., जाने.–मार्च, १९६१
—सरदार गं. बा., ज्ञानेश्वरांची धर्मकल्पना, प्रतिष्ठान, जून, १९६६
—सरवडेकर द. ग., स्मरणसाखळीचे वैशिष्टय, सह्याद्री, जुलै, १९४४
—साधले आनंद, आत्मचरित्राविषयी काही विचार, सत्यकथा, डिसें., १९७२
—हेरवाडकर र. वि., चरित्रे-आत्मचरित्रे, म. सा. प., जाने–मार्च, १९६१
—क्षीरसागर श्री. के., थोरांच्या सहचारिणी, म. सा. प., मार्च, १९४५
—क्षीरसागर श्री. के., आत्मचरित्र कोणी वाचावे ? लोकसत्ता, दिवाळी, १९७७

□□□

REFBK-0025126

# शुद्धिपत्र

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ३६ | १४ | अपौरुषय | अपौरुषेय |
| ३६ | १५ | भर्जपत्रे | भूर्जपत्रे |
| ३७ | ३ | ललित वाङ्मयाचा | स्त्री–वाङ्मयाचा |
| ४४ | १९ | इष्ट होण्यास | दूर होण्यास |
| ४४ | २० | हीच सांगणे | सांगणे हीच |
| ४८ | ९ | गुरुजींच्या | गुरुजींना |
| ४९ | २ | भावे | सावे |
| ५७ | २२ | चित्रपट, नृत्य | चित्रपट, नाटक, नृत्य |
| ६३ | ८ | म्हणतात त्याप्रमाणे | म्हणतात (वेचलेले मणी पृ. १०) त्याप्रमाणे |
| ६६ | १७ | ठिकाणी टिळकांच्या | ठिकाणी त्यांनी टिळकांच्या |
| ९४ | २६ | आपली नित्याची | आपली नि त्यांची |
| १०१ | २२ | गहिवर त्या | गहिवर कसा येतो त्या |
| १०३ | २ | निरागसपणे | निरागसपण |
| १०३ | २९ | उलधाल | उलघाल |
| १३९ | १८ | उपराचाची | उपचाराची |
| १५७ | २० | त्रियांचा वर्ग | स्त्रियांचा स्वर्ग |
| १५७ | २३ | अध्यक्षीय भाषणे ही | अध्यक्षीय भाषणे वगैरे |
| १७० | १६ | शारंगधर | शारंगपाणी |
| १७५ | तळटीप ५ | लोकहितवादींची शतपत्रे– संपा. पु. ग. सहस्रबुद्धे, आ. ति., पुणे, १९६३; पृ. ३६. | कमलाबाई टिळक, स्त्रीजीवनाची नवी क्षितिजे, पुणे, १९६५, पृ. ८ |
| १७५ | २९ | घोडनवरा. आमचा जीवन प्रवास ह्या स्मृतिचित्रे | घोडनवरा–असे ‘आमचा जीवन प्रवास’, ‘स्मृतिचित्रे’ |

| | | | |
|---|---|---|---|
| १७६ | ६ | जोडपे होई सत्यभामाबाई सुखात्मे (१०) आनंदीबाई | जोडपे होई. आनंदीबाई |
| १८२ | ३२ | पक्षाप्रमाणे | पक्ष्याप्रमाणे |
| १८३ | २३ | तयार नसत. स्त्री शिक्षणाची महतीच मुलींना | तयार नसत. मुलींना |
| १८५ | ८ | बालपाल्यांना | बालपल्यांना |
| २०१ | ११ | आपल्या | आपल्याला |
| २४६ | ३० | मुलानातवंडात | मुलानातवंडांना |

**प्रा. डॉ. विमल भालेराव** यांनी १९१० ते १९७५ या कालखंडातील 'आधुनिक मराठी वाङ्मयातील स्त्रियांची आत्मचरित्रे' या विषयावर लिहिलेला हा ग्रंथ अनेक दृष्टींनी वैशिष्ट्यपूर्ण आहे. आत्मचरित्र हा आज भरावर असलेला एक वाङ्मयप्रकार असून गत जीवनाला सुसंगत आकार व अर्थ देण्याचा प्रयत्न आत्मचरित्रात होत असल्याने बरेचदा वाचकही त्यामुळे अंतर्मुख होतो. स्त्रियांनी लिहिलेल्या आत्मचरित्रांमुळे मराठी वाङ्मयाचे एक दालन चांगलेच समृद्ध झाले आहे. कविवर्णित कोमल व विमल अंतःकरणाच्या ललनांची प्रत्यक्ष जीवनानुभूती प्रगट करणारी आत्मचरित्रे रसिकांच्या विशेष कुतुहलाला आवाहन करीत असल्यामुळे हा अभ्यासविषय एका परीने अभिनवच म्हणावा लागेल.

अन्य वाङ्मयप्रकारांच्या तुलनेत आत्मचरित्र हा प्रकार वाटतो तितका मुळीच सोपा नसून अनेक धोके लक्षात घेऊन लिहिली गेलेली आदर्श आत्मचरित्रे मराठीत किती आहेत याचा खरोखर शोधच घ्यायला हवा. असे अत्यंत अवघड आव्हान डॉ. भालेराव यांनी स्वीकारले आहे. स्त्रियांच्या आत्मचरित्रांचे आगळेपण हे त्यांच्या मुक्त व प्रामाणिक आविष्कारात असते. या कलाकृतींमधून पतिचित्रे, सहचित्रे, पुत्रचित्रे, शिक्षणक्षेत्र, समाजक्षेत्र, साहित्य-संगीतक्षेत्र अशा विविधतेचे विलोभनीय दर्शन घडते. वाङ्मयीन दृष्टीने साधेपणा, सरलता, प्रासादिकता, उत्स्फूर्तता, कलात्मकता, अल्पाक्षरत्व इत्यादी लक्षणीय गुणवैशिष्ट्यांचेही विवेचन प्रबंधात आले आहे.

या अध्ययनाच्या निमित्ताने डॉ. भालेराव यांनी केलेला आत्मचरित्राच्या तंत्राचा विचारही अतिशय अभ्यासपूर्ण आहे. त्या अनुषंगाने आत्मचरित्र कुणी लिहावे, केव्हा लिहावे यासंबंधी विविध आत्मचरित्रकारांनी व्यक्त केलेली मते सांगून त्यांतून त्यांनी काढलेले निष्कर्ष खूपच बोलके आहेत. स्वातंत्र्योत्तर काळात स्त्रिया वेगवेगळ्या क्षेत्रांत चमकू लागल्यावर त्यांच्या अनुभवाचे क्षेत्रही व्यापक बनले याचा अतिशय मर्मग्राही परामर्श येथे घेतला आहे, हे सहजच जाणवते.